आचार्य
काका कालेलकरांचे जीवनचिन्तन

संपादक
डॉ. ग. ना. जोशी

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3823



REFBK-0026356

पुस्तक कृपया जपून
वापरावे. धन्यवाद.
सेंट्रल लिब्रेरी
3823
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

13 NOV 1991
30 NOV 1991
18 MAR 1992
25 APR 1992
15 AUG 1992
17 FEB 1993
3 MAR 1993
15 APR 1998

(क्र. मा. पहा)
२०००-१२-८८

आचार्य
काका कालेलकरांचे जीवनचिन्तन

आचार्य
काका कालेलकरांचे जीवनचिन्तन

आचार्य दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर : १८८५–१९८१

संपादक
प्रा. डॉ. गजानन नारायण जोशी

REFBK-0026356

मॅजेस्टिक प्रकाशन

आणि

मराठी तत्त्वज्ञान–महाकोश मंडळ, पुणे

आचार्य काका कालेलकरांचे जीवनचिन्तन
आवृत्ती पहिली
जानेवारी १९९१

© मराठी तत्त्वज्ञान–महाकोश मंडळ, पुणे (प्रथम आवृत्ती)
© Copyright Navajivan Trust by the permission of Navajivan Trust, Ahmedabad – 380 014 (India)

प्रकाशक
अशोक केशव कोठावळे,
मॅजेस्टिक प्रकाशन,
३१६, प्रसाद चेंबर्स,
गिरगाव, मुंबई–४०० ००४

आणि

प्रा. डॉ. ग. ना. जोशी, संचालक,
मराठी तत्त्वज्ञान–महाकोश मंडळ,
फर्ग्युसन महाविद्यालय आवार,
पुणे ४११ ००४

मुद्रक
रवींद्र केशव कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे–४११ ०३०

मुखपृष्ठ
चंद्रमोहन कुलकर्णी

मूल्य : १०० रुपये

मराठी तत्त्वज्ञान–महाकोश मंडळ, पुणे

निवेदन

मराठी तत्त्वज्ञान–महाकोश मंडळाचे (मतम मंडळाचे) हे १८ वे प्रकाशन वाचकांच्या हाती देण्यास आम्हाला अत्यंत आनंद वाटतो. तत्त्वज्ञानप्रधान पुस्तके तयार करवून प्रसिद्ध करणारी मतममंडळ ही महाराष्ट्रातील एकटीच संस्था असावी.

आचार्य काका कालेलकरांचे जीवनचिन्तन हे आमचे प्रस्तुत पुस्तक काका कालेलकरांच्या नुकत्याच साजऱ्या झालेल्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांना मतम मंडळाने वाहिलेली **वैचारिक आदरांजली** आहे. मतम मंडळाने आतापर्यंत रवीन्द्रनाथ टागोर, बर्ट्रांड रसेल, आनंद कुमारस्वामी, मानवेंद्रनाथ रॉय, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित जवाहरलाल नेहरू या थोर पुरुषांना त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या विषयी व त्यांच्याच विचारांची पुस्तके प्रसिद्ध करून आदरांजली वाहिली आहे; तशीच काका कालेलकरांना ही 'वैचारिक आदरांजली' त्यांच्या अनेक पुस्तकांतून काही उतारे निवडून त्यांचा हा संग्रह पुस्तकरूपाने प्रसिद्ध करून मतम मंडळ वाहात आहे.

काका कालेलकर ऊर्फ दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर (१८८५–१९८१) हे गांधीयुगातील एक थोर विचारवंत व प्रतिभावंत लेखक होऊन गेले. ते गांधीजींची दृष्टी स्वीकारून ज्याला गांधीवाद म्हटले जाते त्याचे जीवनाच्या सर्व अंगांत उपयोजन करून महात्मा गांधींना अभिप्रेत असलेल्या जीवनपद्धतीचे व समाजप्रणालीचे एक द्रष्टे भाष्यकार होते. गांधीजींच्या अगदी जवळ त्यांचे तत्त्वज्ञान मनापासून स्वीकारलेल्या ज्या निवडक थोड्या व्यक्ती होत्या त्या महाराष्ट्रीय होत्या, व त्यांत काका कालेलकर, विनोबा भावे, दादा धर्माधिकारी यांचा समावेश आहे; आणि या तिघांनी ज्याला गांधी–तत्त्वज्ञान म्हणता येईल त्याचे अत्यंत समर्थपणे व प्रभावीपणे विवरण व मांडणी केलेली आहे. काका कालेलकरांचे स्थान एक थोर विचारवंत व लेखक म्हणून खूप उच्च प्रतीचे आहे.

काका कालेलकर हे त्यांच्या 'हिमालयाचा प्रवास', 'लोकमाता' इत्यादी पुस्तकांद्वारा जरी मराठी वाचकांना परिचित झाले असले तरी त्यांचे इतरही अनेक ग्रंथ मुख्यतः गुजराती भाषेत असल्याने मराठी वाचकांना फारसे माहीत नाहीत. काका जन्माने महाराष्ट्रीय असले तरी त्यांचे कार्य गुजरात प्रांतात झाले व बहुतेक लेखन

गुजराती भाषेत झाले. त्यांची सुमारे ६५ पुस्तके महात्मा गांधींच्या समजल्या जाणाऱ्या अहमदाबाद येथील **नवजीवन प्रकाशन संस्थेने** प्रसिद्ध केली आहेत. काका कालेलकरांना गुजराती 'काकासाहेब' या गौरवशाली नावाने ओळखतात. काका हे गांधीजींचे अत्यंत निष्ठावंत अनुयायी असले तरी त्यांच्या विचारात एकांगीपणा आला नव्हता. ते कविमनाचे व कलात्मक वृत्तीचे असल्याने ते जीवनातील सर्व प्रकारच्या घटना, वस्तू व प्रसंग यांच्याकडे रसिकवृत्तीने पाहू शकत असत व सर्वांमधील मर्म व सत्य समजू शकत असत. काकांची दृष्टी सत्यशोधकाची होती व ते तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी व प्रेमी असल्याने ते सर्व गोष्टींचा व्यापक व मूलगामी वेध घेऊ शकत असत. काका पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात १९०४ ते १९०७ या काळात विद्यार्थी होते व ते १९०७ साली तत्त्वज्ञान विषय घेऊन पदवीधर झाले. त्यावेळी फर्ग्युसन महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर आणि आचार्य जे. बी. कृपलानी हेही त्यांचे सहाध्यायी होते, व ते तिघेही महाविद्यालयाच्या वसतीगृहात राहात असताना देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी तरुणसुलभ वृत्तीने गुप्तपणे योजना तयार करीत असत. काका हे एक स्वातंत्र्यसैनिक होते व स्वातंत्र्याच्या अनेक आंदोलनांत त्यांनी अनेक बेळा कारावास भोगला होता. ते एक व्रतस्थ, विरक्त वृत्तीचे व समर्पित जीवनाचे देशसेवक होते. गांधीजींना अभिप्रेत असलेले असे ते एक श्रेष्ठ विधायक कार्यकर्ते आणि सत्याग्रही होते, व आपली सबंध हयात त्यांनी फकिरी वृत्तीने देशाची व समाजाची सेवा करण्यात व्यतीत केली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांना राज्यसभेचे सदस्य होण्याचा मान मिळाला व मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी विचार व शिफारसी करण्याकरिता सरकारने नेमलेल्या आयोगाचे अध्यक्ष म्हणून कार्य करण्याची जबाबदारी सरकारने त्यांच्यावर सोपविली होती. भारत सरकारने 'पद्मविभूषण' हा मानाचा, किताब देऊन त्यांना गौरविले. तसे साहित्य अकादमीने त्यांच्या 'जीवनव्यवस्था' ग्रंथाला पारितोषिक देऊन व फेलोशिप देऊन त्यांचा गौरव केला. हिंदुस्तानी भाषेची रचना व प्रचार करण्यासाठी त्यांनी आपल्या उतार वयात खूप कार्य केले.

काका हे आधुनिक काळातील एक **जीवनऋषी** होऊन गेले. त्यांनी आपले सर्व चिंतन व लेखन मानवी जीवन उन्नत, सुंदर, तेजस्वी, पुरुषार्थी, वीर्यवान, सृजनशील व आध्यात्मिक दृष्ट्या उदात्त होण्यासाठी केलेले आहे. काका हे एक जीवनवीर आहेत व त्यांच्या अनेक पुस्तकांच्या शीर्षकांचा आरंभ 'जीवन' या शब्दाने झालेला आहे. काका हे थोर संस्कृतिचिन्तक होत व त्यांच्याच शब्दांत सांगायचे झाल्यास ते नवसंस्कृती घडविणारे एक **समाजऋषी** आहेत. त्यांनी संपूर्ण व सर्वांगीण जीवनाचा व्यापक दृष्टीने विचार करून नवसमाजरचनेसाठी मोलाचे विचार 'गीताधर्म' या पुस्तकात मांडले आहेत. औद्योगिक व तंत्रज्ञाननिर्मित नवसमाजात निर्माण झालेल्या

जीवनविषयक समस्यांचा त्यांनी आस्थेने व साक्षेपी रीतीने विचार केला आहे. गांधीजींनी सुचविलेल्या अनेक उपायांची त्यांनी बुद्धिनिष्ठ व आधुनिक परिभाषेत मांडणी केली आहे, व मानवी जीवनाची नव्या संस्कृतीत होणारी अधोगती कशी टाळता येईल, मानव समाजाला वैश्य (व्यापारी) वृत्तीपासून वाचवून कसे अध्यात्म-प्रवण करता येईल, याविषयी त्यांनी आपले विचार सविस्तरपणे मांडले आहेत. हे सर्व अत्यंत वाचनीय व मननीय आहेत. विशेषतः सध्याच्या परिस्थितीत तरुण पिढीला जीवनाचा अर्थ, हेतू, ध्येय समजेनासे होऊन ती विलासी व वैषायक वृत्तीच्या प्रचंड लोंढ्यात सापडून भरकटत चालली आहे. सर्व जगच विनाशाच्या व हिंसेच्या भोवऱ्यात व झंझावातात सापडले आहे. अशावेळी डोके शांत ठेवून मानव-जातीला, व विशेषतः भारतीयांना, संभाव्य विनाशापासून वाचविण्यासाठी काकांची ऋषिवाणी निश्चितच दिलासा देऊन मार्गदर्शन करू शकेल असे आम्हांला वाटते, व म्हणून मतममंडळ हे पुस्तक प्रकाशित करीत आहे.

काकांची शैली साधी, सरळ, सोपी व हृदयाचा ठाव घेणारी आहे. त्यांची भाषा प्रसन्न, मधुर, ललित, अर्थगर्भ व बुद्धीला पटणारी आहे. त्यांची काव्यात्मक निसर्ग-वर्णने तर बहारीची आहेत. त्यांनी केलेली नद्या, सागर, पर्वत, दऱ्या, आकाश, तारका, पक्षी, पाने, फुले, वृक्ष, सूर्यास्त, सूर्योदय, भरती–ओहोटी व इतिहासप्रसिद्ध स्थळे व तीर्थस्थाने यांची वर्णने तर पुनःपुनः वाचत राहावीशी वाटतात.

काकांची ग्रंथसंपदा मोठी व समृद्ध आहे. त्यातील काही उतारे निवडण्याचे अवघड कार्य मतम मंडळाचे संचालक डॉ. ग. ना. जोशी यांनी स्वतः त्यांची गुजराती पुस्तके वाचून केले आहे, व गुजरातीतून त्यांच्या लेखांचे मराठीत भाषांतरही अत्यंत रसिकतेने व आस्थेने केले आहे, व म्हणूनच हे पुस्तक तयार करणे व प्रसिद्ध करणे शक्य झाले आहे. डॉ. जोशी हे गुजराती भाषा चांगल्यापैकी जाणतात. या पुस्तकाचे संपूर्ण श्रेय डॉ. ग. ना. जोशी यांचेच आहे. असे एक सुंदर पुस्तक तयार करून ते प्रसिद्ध करण्याची विरळ संधी डॉ. ग. ना. जोशी यांनी मंडळास दिली याबद्दल मतम मंडळ त्यांचे फार आभारी आहे.

काकांच्या बहुतेक सर्व पुस्तकांचा कॉपीराइट अहमदाबादच्या **नवजीवन ट्रस्ट** या संस्थेकडे आहेत. त्याचे मॅनेजिंग ट्रस्टी श्री. जितेंद्र देसाई यांना मतम मंडळाने विनंती करताच त्यांनी काकांच्या पुस्तकातील निवडक लेख व उतारे या मराठी पुस्तकाच्या रूपाने प्रसिद्ध करण्यास उदार मनाने संमती दिली याबद्दल मतम मंडळ **नवजीवन ट्रस्ट, अहमदाबाद** आणि त्याचे मॅनेजिंग ट्रस्टी श्री. जितेंद्र देसाई यांचे अत्यंत आभारी आहे. काका कालेलकरांची जवळजवळ सर्व पुस्तके डॉ. जोशींना फर्ग्युसन महाविद्यालयाच्या वाडिया ग्रंथालयातून या कामासाठी मिळाली म्हणून मतम मंडळ फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य आणि ग्रंथालयातील सेवक यांचे

फार आभारी आहे.

तसेच पुण्यातील सुप्रसिद्ध विचारवंत व लेखक श्री. श्रीपाद जोशी यांनी आपल्या संग्रहातील 'जीवनसंस्कृति' हे काकांचे गुजराती पुस्तक डॉ. ग. ना. जोशी यांना उतारे निवडण्यासाठी उपलब्ध करून दिले याबद्दल मतम मंडळ त्यांचे आभारी आहे.

हे पुस्तक प्रसिद्ध करण्याची व त्याची आर्थिक जबाबदारी अंशतः पत्करण्याची तत्परता आमचे मित्र मॅजेस्टिक प्रकाशनाचे श्री. अशोकराव कोठावळे यांनी दाखविली, व श्री. रवींद्र कोठावळे यांनी ॐ मुद्रणालयात छापून अवघ्या दोन महिन्यांत हे पुस्तक वाचकांना उपलब्ध करून दिले त्याबद्दल मतम मंडळ त्या दोघांचे अत्यंत आभारी आहे. या बंधुद्वयाचा मतम मंडळावर लोभ आहे याचा आम्हाला विशेष आनंद व अभिमान वाटतो. तसेच श्री. चंद्रमोहन कुलकर्णी या सुविख्यात चित्रकारांनी काकांचे सुंदर चित्र असलेले मुखपृष्ठ तयार करून दिले याबद्दल मतम मंडळ त्यांचे आभारी आहे. ॐ मुद्रणालयातील सर्व सेवकांनी या पुस्तकाचे सुंदर मुद्रण केल्याबद्दल त्यांनाही आमचे धन्यवाद!

'आचार्य काका कालेलकरांचे जीवनदर्शन' हे मतममंडळाचे नवे पुस्तक मतम मंडळाच्या यापूर्वीच्या पुस्तकांसारखेच वाचकांना आवडो व उपयुक्त ठरो व वाचकांकडून याचे चांगले स्वागत होवो हीच इच्छा. असे झाल्याने काका कालेलकरांना मतम मंडळाने वाहिलेली ही 'वैचारिक आदरांजली' सार्थ ठरेल.

मतम मंडळाने प्रसिद्ध केलेल्या व **डॉ. ग. वा. तगारे** यांनी लिहिलेल्या '**शैव दर्शन**' या मराठी पुस्तकाचा तामीळ भाषेत श्री. के. एस्. श्रीनिवासाचार्य यांनी केलेला अनुवाद **शैव तत्त्वम्** या नावाच्या पुस्तकरूपाने मद्रास येथील अलायन्स कंपनीने नुकताच प्रसिद्ध केला आहे.

७ जानेवारी १९९१

पां. ल. गाडगीळ
अध्यक्ष, गव्हर्निंग बॉडी, मतम मंडळ.



प्रस्तावना

आधुनिक भारताच्या घडणीत, नवरचनेत ज्या शेकडो व्यक्तींनी कामगिरी करून महत्त्वाची भर घातली त्यात आचार्य काका कालेलकरांचे स्थान फारवरचे आहे. काका कालेलकर हे गांधीयुगाचे एक महान प्रवक्ते म्हणून प्रसिद्ध होते. महात्मा गांधींनी भारताला सर्वच बाबतींत अभूतपूर्व वळण लावले. गांधीजींची जीवनदृष्टी काही लोकांना जगावेगळी, जुनाट व विक्षिप्तपणाचीही वाटत होती, परंतु अत्यंत बारकाईने, बुद्धिनिष्ठ रीतीने आणि आस्थेने नीट विचार केला तर गांधीजींच्या विचारात एक प्रकारची मौलिकता, मूलग्राहित्व, आणि जीवनाला उदात्ततेकडे नेणारी, जीवनाचे आध्यात्मिक उन्नयन करणारी तत्त्वे आढळून येतात. गांधीजींच्या जीवनदृष्टीचे खरे मर्म व हार्द नीट समजावून घेऊन तिचे उपयोजन जीवनाच्या सर्व अंग–प्रत्यंगांना करून दाखविण्याचे व त्यांचे महत्त्व स्पष्ट करून सांगण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य भारतात ज्या महाभागांनी केले त्यांच्यात **आचार्य दत्तात्रेय बाळकृष्ण तथा काका कालेलकर** हे अग्रगण्य आहेत. गांधीजींच्या प्रभावळीत जी तेजस्वी रत्ने, विचारवंत व भाष्यकार झाले त्यांच्यात आचार्य विनोबा भावे, आचार्य काका कालेलकर, आचार्य दादा धर्माधिकारी, आचार्य किशोरलाल मश्रुवाला, केदारनाथ, स्वामी आनंद इत्यादींचा प्रामुख्याने समावेश होतो. हे सर्व आचार्य गांधी तत्त्वज्ञानाचे भाष्यकार असून प्रत्येकाने गांधीप्रणीत विचारांची आपापल्या वैशिष्ट्यपूर्ण रीतीने मांडणी केली आहे. काका कालेलकर हे तत्त्वज्ञ असूनही एक श्रेष्ठ प्रतीचे रसिक व शैलीकार साहित्यिक होत. काकांच्या लेखणीत विलक्षण सौंदर्य, माधुर्य, प्रसाद, वैचारिक स्पष्टता, भावनांचा ओलावा, कल्पकतेची रमणीयता आणि धार्मिक व आध्यात्मिक उदात्तता यांचे सुमधुर रसायन पाहावयास मिळते. काका कालेलकर हे आधुनिक संस्कृतीचे थोर प्रणेते ऋषी होत.

काका कालेलकर हे 'काकासाहेब' या आदरार्थी नावाने ओळखले जात. त्यांचे पूर्ण नाव '**दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर**' असे आहे. त्यांचा जन्म १ डिसेंबर १८८५ रोजी सुप्रसिद्ध सातारा गावी झाला. त्यांचे कुटुंब मूळचे सावंतवाडीकडील. माणगाव कसबा जवळील कालेली गावावरून त्यांचे मूळ आडनाव 'राजाध्यक्ष' असूनही ते कालेलकर या नावाने ओळखले जाऊ लागले. आर्थिक संकटात सापडल्याने काकांचे वडील बाळकृष्ण जिवाजी बेळगाव भागात स्थलांतरीत झाले. थोडेसे इंग्रजी शिक्षण प्राप्त करून त्यांनी सरकारी नोकरीत प्रवेश केला. काकांच्या जन्माच्या वेळी त्यांचे वडील सातारा जिल्हाधिकाऱ्यांचे मुख्य अकौंटंट होते. काकांच्या आईचे माहेरचे नाव राधाबाई होते. राधाबाई या शहापूरच्या भिसे कुटुंबातल्या. विवाहानंतर

त्यांचे नाव 'गोदावरी' ठेवण्यात आले. त्यांचे आई व वडील दोघेही जुन्या धार्मिक वातावरणात वाढल्याने शुद्ध, पवित्र व सदाचारी जीवन जगण्याचे आग्रही होते. काका हे सहा भाऊ व एक बहीण या सात भावंडांत सर्वांत धाकटे असल्याने त्यांच्यावर वडील भावांचे बरेच नियंत्रण चालत असे. घरात धार्मिक व्रत–उद्यापने, सणवार, उत्सव, यात्रा, कुळधर्म, कुलाचार यांचे अत्यंत कसोशीने पालन होत असल्याने काकांना धर्माचरणाचा अत्यंत चांगला परिचय व संस्कार होता. कारवारच्या हिंदु हायस्कुलात काकांचे शिक्षण झाले होते. नोकरीच्या अनेक गावी बदली होत राहिल्याने लहानपणी काकांचे शिक्षण एखाद्या जिप्सी विद्यार्थ्यांसारखे सावंतवाडी, मिरज, जत, रामदुर्ग, कारवार, धारवाड, मुधोळ, जमखंडी, सावनूर, बेळगाव इत्यादी गावी झाले. त्याची माहिती त्यांच्या 'स्मरणयात्रा' पुस्तकात मिळते. कोकण, कारवारचा परिसर निसर्गसौंदर्याने नटलेला असल्याने लहानपणापासून काकांना वृक्षवेली, पशुपक्षी, नद्या, समुद्र, डोंगर, दऱ्या, आकाश, ढग, तारका, पर्जन्य, भरती, ओहोटी, ऋतूंचे बदलते देखावे यांचे रम्य दर्शन सतत मिळत गेल्याने ते निसर्गवेडे बनले. त्या काळातील पद्धतीनुसार काकांचा विवाह ते इंग्रजी सहावीत शिकत असताना वयाच्या सतराव्या वर्षी शिरोडकर कुटुंबातील लक्ष्मीबाई यांच्याशी झाला. मॅट्रिक झाल्यावर काका शिकण्यासाठी पुण्यास फर्ग्युसन कॉलेजात १९०४ साली दाखल झाले. १९०४ ते १९०७ ही चार वर्षे ते फर्ग्युसन कॉलेजात शिकले व तत्त्वज्ञान विषय घेऊन पदवीधर झाले. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर व आचार्य जे. बी. कृपलानी हे फर्ग्युसन कॉलेजात व वसतिगृहात काकांचे सहाध्यायी होते. या काळात पुण्यातील वास्तव्यात त्यांच्या विचारावर लोकमान्य टिळकांच्या विचारांचा खूप प्रभाव पडून ते राजकारणाकडे, मुख्यतः स्वातंत्र्याच्या लढ्याकडे आकृष्ट झाले. या काळात त्यांच्यात देशसेवा करण्याची प्रवृत्ती दृढमूल झाली व एक निष्ठावंत देशभक्त बनून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य देशाच्या स्वातंत्र्यासाठी व सेवेसाठी अर्पण केले. विद्यार्थीदशेत व ऐन तारुण्यात काकांना क्रांतिकारकांच्या कार्याचा परिचय झाला, पण त्याचबरोबर आध्यात्मिक साधनेविषयी आकर्षण वाटू लागले, भारताची पारतंत्र्यातून आणि अज्ञान, दारिद्र्य, रोगराई, अंधश्रद्धा, लाचारी, पराधीनता यांमुळे निर्माण होणाऱ्या सर्व दुःखांपासून मुक्त होण्याचा सर्वोत्तम मार्ग 'शिक्षण' हाच असल्याने त्यांनी शिक्षकाचे, अध्यापकाचे कार्य व्रत म्हणून स्वीकारले, आणि एक उच्च दर्जाचे शिक्षणतज्ज्ञ, शिक्षणकार, विचारवंत व लेखक बनून काकांनी आपले संपूर्ण आयुष्य व्यतीत केले. त्यांनी म्हटले आहे की 'भविष्यात लोक मला भलेही लेखक म्हणून न ओळखोत, पण एक शिक्षक, शिक्षणकार म्हणून लोकांना माझे दीर्घकाल स्मरण राहावे यात मला आनंद वाटेल.'

काका हे राष्ट्रीय शिक्षणाचे पुरस्कर्ते व योजनाकार होते. बी. ए. झाल्यानंतर काकांनी मुंबईस कायद्याचे शिक्षण घेतले, पण ते अपुरेच सोडले. नंतर त्यांचे शैक्ष-

णिक काय सुरू झाले. बेळगाव येथील गणेश विद्यालयात त्यांनी शिक्षकाचे काम १९०८ साली केले. लवकरच त्यांच्या मातापित्यांचे निधन झाले व काका राष्ट्रीय शिक्षणात अधिकच कार्य करू लागले. बडोदे येथे स्थापन झालेल्या गंगानाथ भारती विद्यालयाचे ते आचार्य झाले. या संस्थेचे उद्दिष्ट राष्ट्रसेवेच्या आदर्शाने प्रेरित सेवावीर तयार करण्याचे होते. पण ती संस्था नंतर बंद पडली. भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृती व अध्यात्म यांना प्राधान्य देणाऱ्या अनेक संस्कारी शिक्षणसंस्थांमध्ये काकांनी शिक्षकाचे कार्य करून आपले अनुभवविश्व समृद्ध केले.

गंगनाथ विद्यालय सोडल्यावर मध्ये अकस्मातपणे संन्यासी होण्याचे ठरवून काका हिमालयात निघून गेले. हिमालयात सर्व प्रमुख तीर्थस्थानांची त्यांनी यात्रा केली व २५०० मैलांचा प्रवास पायी केला. ते अनुभव त्यांनी 'हिमालयांचा प्रवास' या आपल्या पुस्तकात विस्तृतपणे कथन केले आहेत. १९१३ मध्ये हिमालयाची यात्रा पूर्ण करून काकांनी कृपलानी, स्वामी आनंद व योगानंद यांच्यासमवेत नेपाळची यात्रा केली व हिमालय उतरून ते रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनात जाऊन पोहोचले. काकाही कवी प्रकृतीचे व कलाप्रेमी असल्याने शांतिनिकेतनात ते रमले व तेथे शिक्षक बनले. तेथेच त्यांची गांधीजींशी भेट झाली व काका गांधीजींच्या कार्याकडे आकृष्ट होऊन मग गांधीजींचे अनुयायी व सहकारी बनले. दरम्यान हरद्वार जवळील सनातन्यांच्या ऋषिकुलाचे मुख्य अधिष्ठाते म्हणून सहा महिने कार्य केले. नंतर आर्य समाजाचे 'कांगडी गुरुकुल,' वैष्णवांचे 'आचार्यकुल', भारतभक्त प्रेमधर्मी राजा महेंद्रप्रताप यांचे 'प्रेम महाविद्यालय', रवींद्रनाथांचे 'शांतिनिकेतन' जीवतराम कृपलानी, चोइथराम गिडवाणी, नारायण मलकानी यांनी चालविलेला 'सिंधु ब्रह्मचर्याश्रम' या शिक्षणसंस्था पाहिल्या व काही काळ वास्तव्य करून त्यांच्यात राष्ट्रीय शिक्षणाचे कार्य केले. पण त्यांचे खरे भरीव कार्य अहमदाबाद येथील राष्ट्रीय शिक्षणाच्या गुजरात विद्यापीठाचे आचार्य, कुलगुरू म्हणूनच झाले, व त्याच्या रचनेत व विकासात काकांनी महत्त्वाची कामगिरी केली. शिक्षणाच्या विविध पातळ्यांवर आशयपूर्ण अशी व्यापक योजना तेथे असतानाच काकांनी तयार केली होती व तेव्हापासून काका एक अग्रगण्य शिक्षणकार म्हणून ओळखले जाऊ लागले.

काकांनी देशकार्याला वाहून घेण्याचे ठरविल्यानंतर ते गांधीजींबरोबर आश्रमवासी बनले. आश्रमीय जीवनाची त्यांनी संहिता बनविली व जीवनाच्या सर्वांगीण विकासाच्या योजना तयार केल्या. काका गांधीजींनी सुरू केलेल्या सर्व चळवळींत वेळोवेळी सहभागी होत गेले आणि त्यांनी अनेक वेळा कारावासाच्या शिक्षा भोगल्या. हिंडलगा, हैदराबाद, येरवडा अनेक ठिकाणी ते तुरुंगात राहिले. पण तुरुंगात वाचन व लेखन अव्याहतपणे त्यांनी चालूच ठेविले व प्रचंड ग्रंथसंभार निर्माण केला.

काका जन्माने महाराष्ट्रीय असून व त्यांची मातृभाषा मराठी असूनही त्यांनी

बरेचसे लेखन गुजराती भाषेत केले. गुजराती साहित्यात काकांना एक महान शैलीकार लेखक व विचारवंत म्हणून मोठा मान प्राप्त झाला आहे. त्यांनी अनेक साहित्य परिषदांचे अध्यक्षस्थान भूषविले आहे. काका बहुभाषा कोविद होते. हिंदी भाषा तर त्यांना चांगलीच अवगत होती; पण राष्ट्रभाषा म्हणून 'हिंदुस्तानी' भाषेची त्यांनी नव्याने घडण केली आणि भारताच्या सर्व प्रांतांना वापरायला सोपी व सुगम अशी हिंदुस्तानी भाषा विकसित केली.

काका हे मुळात पिंडाने तत्त्वज्ञानी होते. त्यांना जागतिक तत्त्वज्ञानाचा चांगला परिचय होता. नवभारताच्या रचनेत जे अनेक लहान मोठे बदल करावयाचे आहेत त्यांचा काकांनी अत्यंत बारकाईने व आस्थेने विचार करून नवभारताचे राष्ट्रीय जीवन निकोप, समतोल, निर्भळ, नीतिशुद्ध, ज्ञानपूर्ण, संयमी व उदात्त बनावे यासाठी पुष्कळ चांगल्या सूचना व मार्गदर्शक विचार मांडले आहेत. एकूण समाजाच्या संपूर्ण व सर्वांगीण जीवनाचा विचार करणारे असे काका कालेलकर हे महान **जीवनऋषी** होऊन गेले. काका हे संस्कृतीचे भाष्यकार व चिंतक होत. समाज-जीवनाच्या शिक्षण, धर्म, कला, नीती, अध्यात्म, आर्थिक, राजकीय, सामाजिक, मानसिक, तत्त्वज्ञानात्मक, व संघटनात्मक सर्व अंगांचा बारकाईने व तपशीलवार विचार करून समन्वित अशी 'जीवनव्यवस्था' काकांनी आपल्यासमोर मांडली आहे. तसेच काकांना या जगाचे, निसर्गाचे, विश्वातील घटनांचे कमालीचे आकर्षण व प्रेम वाटत असे. त्यांना निसर्गदर्शनाचा कधी कंटाळा आला नाही. त्यांनी सबंध भारताच्या कानाकोपऱ्यात जाऊन भारतातील नद्या, डोंगर, दऱ्याखोरी, समुद्र, तीर्थस्थाने, ऐतिहासिक स्थळे, मंदिरे, किल्ले, राजवाडे, धार्मिक स्थळे अशा सर्व गोष्टींचे बारकाईने निरीक्षण तर केलेच होते, पण त्याचबरोबर नेपाळ, ब्रह्मदेश, श्रीलंका (सिलोन), आफ्रिका, जपान, चीन, वेस्ट इंडिज, ब्रिटिश गियाना, डचगियाना, अमेरिका, मॉरिशस, माडागास्कर अशा अनेक देशांना भेटी देऊन तेथील निसर्गसौंदर्य, लोक जीवन व संस्कृती यांचे निरीक्षण करून आपले अनुभवविश्व व्यापक व समृद्ध बनविले होते.

काका प्रकृतीने यथातथाच होते. त्यांची अंगकाठी कृश होती. त्यांना क्षयाची बाधा झाली होती, तरीही ते सतत परिश्रम करून ९६ वर्षांचे प्रदीर्घ जीवन जगले. त्यांच्या संपूर्ण जीवनात एक प्रकारची प्रसन्नता, समाधान व आनंद भरून राहिलेला होता. काका रवींद्रनाथांसारखे एक आनंदयात्री, तपस्वी, जीवनपरायण ऋषी होते, आणि गांधीजींच्या जीवनतत्त्वज्ञानावर आधारलेल्या संपूर्ण आदर्श जीवनाचे त्यांनी अत्यंत सोप्या पण आकर्षक, सुंदर, ललित व हृदयस्पर्शी भाषेत सम्यक् दर्शन घडविले आहे. त्यांचे हे जीवनदर्शन भविष्यकालीन भारताच्या उभारणीला खूपच मार्गदर्शक, प्रेरक व उपयुक्त ठरणारे असल्याने त्याला महत्त्व आहे.

देशसेवेच्या कार्यात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात त्यांनी सरकारी पातळीकरूनही भाग घेतला. काकांची सरकारने दोन वेळा म्हणजे सुमारे १० वर्षांसाठी राज्यसभेचे सदस्य म्हणून नियुक्ती केली होती व ती त्यांनी स्वीकारली होती. काकांनी अनुसूचित जमातींच्या पहिल्या आयोगाचे अध्यक्ष म्हणून काम केले. १९५९ साली भरलेल्या गुजराती साहित्य परिषदेच्या अहमदाबाद येथील अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. हिंदी विश्वकोश समितीचे ते एक सदस्य होते. १९६४ साली त्यांना भारत सरकारकडून 'पद्मविभूषण' हा मानाचा किताब मिळाला. १९६६ साली 'जीवनव्यवस्था' या निबंधसंग्रहाला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले. १९७१ साली त्यांना साहित्य अकादमीची फेलोशिप देऊन गौरविण्यात आले.

काका कालेलकर हे व्यासंगी पंडित होते हे तर खरेच, पण त्यांचे सर्व चिंतन मानवी जीवन समृद्ध, सुखी, सफल व कृतार्थ करण्यासाठी होते. ते जीवनवादी, जीवनपरायण, जीवननिष्ठ व जीवनकेंद्री विचारवंत जीवनयोगी होते. ते एक उच्च प्रतीचे जीवनवीर होते. त्यांच्या अनेक पुस्तकांची नावे 'जीवन' या शब्दाने सुरू होणारी आहेत. उदा. **जीवननो आनंद, जीवनविकास, जीवनभारती, जीवन-चिंतन, जीवनप्रदीप, जीवनव्यवस्था, जीवनलीला.** शेवटी मानवाचे सर्व कार्य, विचार, चिंतन, साहित्य, धर्म, कला, नीती, वैज्ञानिक संशोधन, तंत्रज्ञान सर्व काही मानवी जीवन सुखी, समृद्ध, गौरवशाली, उन्नत व उदात्त होण्यासाठी असते व ती सर्व मानवजीवनाच्या उदात्तीकरणाची साधने आहेत असे मानणारे काका आहेत.

काका कमालीचे निसर्गवेडे आहेत. काकांना सर्वत्र निसर्ग, निसर्गातील सर्वच लहानमोठ्या वस्तू, वृक्षवनस्पती, पशुपक्षी, घटना, दिव्य आनंदाने थरथरतांना दिसतात. त्यांना संपूर्ण निसर्गातून परमेश्वराचा आनंद भरभरून वाहात राहून तो अनंत रूपांनी, रंग, नाद, आकार, गंध, यांच्यातून व्यक्त होताना दिसतो. डोंगर असो की नदी, सागर असो की सरोवर, निर्झर असो की प्रपात, कोमल गवत असो की महावृक्ष, पक्षी, प्राणी, हिंस्र पशू, अंधार, प्रकाश, उषा, संध्या, अमावास्या, पौर्णिमा, चिखल, त्यातील कमळे, फुले, ताऱ्यांचे शांत शीतल तेज, सूर्याचे रणरणते उन्ह ही सर्व काकांना सुंदर, रम्य, मनोहर वाटतात. त्या सर्वांतून काकांना प्रभूचे सौंदर्य, त्याची कृपा, त्याचे चैतन्य ओसंडून वाहात असताना दिसते, व त्या सर्वांविषयी त्यांना उच्च प्रकारचा आदर, भक्ती व आत्मीयता वाटते. 'ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्' याचा साक्षात्कार काकांनी जन्मभर घेतला. निसर्गाची सूक्ष्मता, स्थूलता, भव्यता, क्षुद्रता, रहस्यमयता, व्याप्ती, गहनता, संकुलता, गंभीरता कठीणता, कठोरता, मृदुता, स्थिती, गती, रंग, आकृती यांची जिवंत शब्दचित्रे काकांनी जशीच्या तशी उभी केली आहेत. त्यांनी निसर्गातील वस्तू व घटना यांच्यात

होणाऱ्या हालचाली, क्रिया व धडामोडी बारकाईने टिपल्या असून त्यांची मांडणी करण्यासाठी अचूक शब्दरचना, नादमयता, गतिमानता वापरली आहे. त्यांच्यापाशी भरपूर प्रसंगोचित काव्यात्मकता व शब्दांचे लालित्य असल्याने त्यांनी केलेली निसर्ग-वर्णने जिवंत, चित्तहारक व आनंददायी बनली आहेत. काकांचे बोट धरून जर आपण त्यांच्याबरोबर उघड्या निसर्गात चालत राहिलो तर ते निसर्गात लपलेले ईश्वराचे, विराट चैतन्याचे सौंदर्य आपणांस उघडून दाखवितात व त्यामुळे मन एका उच्च, विषयातीत, अपौरुष आनंदाने परिप्लुत होते व नाचू लागते. काकांच्या कानांनी निसर्गाचे संगीत ऐकावे, त्यांच्या नेत्रांतून रंगांचे व आकारांचे सौंदर्य पाहावे व मनात शिरून प्रसन्नतेने भरून जावे. निसर्गाशी काका जणू वैयक्तिक नाते जोडतात आणि संपूर्ण निसर्ग त्यांच्याशी जशा नाजूक गुजगोष्टी करतो तसा आपल्याशीही करू लागतो असा अनुभव येतो.

काका हे एक नित्य फिरस्ते, भटके प्रवासी होते. त्यांना एक प्रकारचे विचारी भटके, फिरस्ते (Intellectual Vagabond) म्हणणे योग्य ठरेल. तसेच ते निसर्ग-वेडे, सौंदर्यप्रेमी भटके होते. सौंदर्याच्या व आनंदाच्या शोधात काका सदैव भटकत, परिभ्रमण करीत राहात. ते एक धार्मिक परिव्राजक होते. ज्याला एक घर नसते त्याला सर्वच घरे आपली असतात. शहरातील अलिशान बंगल्यात राहण्यापेक्षा डोंगर पर्वतात, अरण्यात, नदीकाठी, सागरतीरी, दऱ्याखोऱ्यात, वादळवाऱ्यात अनिकेत अवस्थेत फिरत राहण्यात काकांना विशेष रस वाटत असे, आनंद मिळत असे. तसे काका हे केवळ पृथ्वीचेच नाही तर अखिल विश्वाचे यात्री होते. 'यत्र विश्वं भवत्येक नीडम्' अशी त्यांची भावना होती. डोळे, कान व मुख्यतः हृदय उघडे व उत्सुक ठेवून काका जन्मभर संधी मिळेल तेव्हा व तेथे फिरतच राहिले. त्यामुळे त्यांचे जीवन समृद्ध, विविधांगी, विशाल, सर्वप्रेमी, रसिक व आनंदी राहिले.

काकांना केवळ भारत देशच नाही तर संपूर्ण पृथ्वीच आपली, प्रेमाची व आदरणीय वाटत असे. काकांनी म्हटले—'ही संपूर्ण धरती विश्वव्यापी विष्णूची पत्नी आहे, जीवमात्राची ती माता आहे. तिचा कणकण, रजकण पवित्र आहे. जीवन समृद्ध आहे, आणि तिच्या प्रत्येक कणात चैतन्य स्फुरण पावतांना मला दिसत आहे.'

काका सौंदर्यप्रेमी व निसर्गवेडे रसिक असल्याने ते स्वाभाविकपणे कलाप्रेमी बनले. त्यांनी स्वतःविषयी म्हटले आहे—"मी कलेचा भक्त आहे. माझ्या जीवनाच्या फिलॉसॉफीत कलेला वरचे स्थान आहे...मी तर जीवनभरचा भटक्या, फिरस्ता आहे. कोणी जर माझी 'निसर्गवेडा' म्हणून ओळख करून दिली तर मला संकोच वाटणार नाही, की त्याला माझी हरकत नाही. शहरे आणि गल्ल्या, महाल आणि दिवाणखाने माझ्यासाठी नाहीत. मी कपडे घालतो ते सुद्धा माझ्या कृश शरीराच्या दर्शनापासून लोकांना वाचविण्यासाठीच; नाही तर माझे स्थान पर्वतराजीतील अरण्यांत

समुद्राच्या रेतीत, नदीच्या काठी, घनदाट वृक्षराईतच असावयाचे.

....असे सर्व असूनसुद्धा मी माणूसघाणा नाही. मी मनुष्यप्रेमी आहे. मानवजातीचा पुरुषार्थ, तिच्या योजना, मानवाच्या चुका व त्यांना सुधारण्याचे प्रयत्न, त्याच्या भीती व आकांक्षा, त्याचे प्रेम व त्याचे बलिदान— या प्रत्येकात मला रस आहे. या विशाल विश्वाइतकीच मनुष्यहृदयाची आणि त्याच्या संस्कृतीची गहनता पाहून मी चकित होऊन जातो आणि म्हणून जगाला दूर सारत असलो तरी त्याचा सहवास मी शोधत असतो. ज्या रसिकतेने मी वृक्ष आणि डोंगर पाहिले आहेत तेवढ्याच रसिकतेने मी झोपड्या व राजवाडे पाहिले आहेत. ज्या रसिकतेने मी शंखशिंपली पाहिली आहेत तेवढ्याच आवडीने मी म्युझिअम पाहिले आहेत. ज्या शरीरकष्टांनिशी मी अरण्यात विचरलो, भ्रमंती केली आहे त्याच वृत्तीने मी यात्रा, संमेलने आणि अध्यापन यांच्यात समरस झालो आहे. सूर्योदय, सूर्यास्त आणि मध्याह्न पाहताना मला जो आनंद वाटत आला आहे तोच आनंद मला रविभाई, कनुभाई आणि सोमालाल शाह यांच्या कलाकृती पाहून मिळाला आहे. मी माझ्या पद्धतीने कलेवर आशक होतो हेच माझे वेडेपण दुसऱ्यांनाही चिकटविण्याचा प्रयत्न करीत आहे. जगात अनेक रूपांत विचरणाऱ्या, विकसणाऱ्या आणि विलासणाऱ्या कलेला ओळखण्यासाठी मी जेवढा भटकलो आहे तेवढेच जर मी माझ्या श्रोत्यांना व वाचकांना कल्पनांद्वारा फिरविले तर माझे काम पुरे झाले.'

(जीवननो आनंद : ४८६–४८७)

कलानिर्मिती कशी होते हे स्पष्ट करताना काकांनी म्हटले आहे, "सौंदर्याशी भावांचे मीलन झाले की त्यातून सर्जनशक्ती जागृत होत असते आणि ती आपल्या प्रतिभेने नवनवी रूपे, नवनव्या आकृती, नवेनवे वर्णविन्यास आणि नवेनवे आलाप निर्माण करीत असते. भावांची जागृती, त्यांची नवनिर्मिती, त्यांचे संप्रेषण आणि त्यातून उत्पन्न होणाऱ्या अस्वस्थतेपोटी प्राप्त होणारी तृप्ती हे सर्व कलेचे स्वरूप आहे. त्यासाठी वाहन म्हणून कोणती वस्तू वापरली जाते ही गोष्ट गौण आहे. माती, दगड, लाकूड, धातू, काच, साबण, मेण, हस्तिदंत, कोणताही पदार्थ वापरा, रंगरेखा, मणी कशाचीही मदत घ्या, गद्य आणि गेय शब्द वापरा किंवा मूक अभिनय करा, कला स्थापत्याची असो की नगररचनेची असो, सर्व कला एकच असते.'

काकांच्या मते कलेने जो आनंद मिळतो तो निर्हेतुक असतो व ते विषयसुख नसते. तो इंद्रियांच्या द्वारा मिळत असला तरी ते इंद्रियसुख नसते. कलेचा आनंद अतींद्रिय स्वरूपाचा असतो व त्यातून अध्यात्माचा विकास होत असतो. कलेच्या आदर्शात तादात्म्य आणि ताटस्थ्य या दोन्ही परस्परविरोधी वाटणाऱ्या वृत्तींचे संपूर्ण मीलन व्हावयास पाहिजे. अनासक्त कर्मयोगात जो आदर्श अभिप्रेत आहे तोच उच्च कलेत असतो. तादात्म्य आणि ताटस्थ्य यांच्या किमयेनेच जीवन आणि कला ही

दोन्ही सर्वोच्च कोटीला पोहोचू शकतात.

काकांनी कलेचे स्वतःचे असे नावीन्यपूर्ण तत्त्वज्ञान रचले आहे. त्यांनी मांडलेले कलेचे स्वरूप व अर्थ मौलिक व उच्च दर्जाचा आहे. तो सामान्य लोकांना सामान्यपणे पटेल असा नाही; पण त्यांच्या मते अंतिम अवस्थेत कला, धर्म, नीती, तत्त्वज्ञान व पुरुषार्थी कार्यप्रवण भौतिक जीवन यांच्यात विरोध असण्याचे कारण नाही. काकांच्या मते कलेची दैनंदिन जीवनाशी व उपयोगाच्या वस्तूंशी फारकत होऊ नये. कलेची उपयुक्ततेपासून फारकत करण्याने उपयोगी वस्तू कुरूप, बेढब व हिणकस बनण्याचा संभव आहे; आणि कला ही जीवनापासून, उपयुक्ततेपासून दूर जाण्याने केवळ अमूर्त बनून कलावंताच्या अभिव्यक्तीला अपाय करणारी कृत्रिम व असत्य ठरेल. ते म्हणतात— "कलावंत आणि कारागीर यांना वेगळे करू नका. तसे कराल तर कलावंताची कला चिमटून जाईल आणि कारागीराच्या कौशल्याचा लय होईल. कला भुतासारखी दिसेल आणि कारागिरी मुडद्यासारखी, प्रेतासारखी निर्जीव बनेल.' पूर्वीच्या जमान्यातील सुतार, सोनार, कुंभार, लोहार, गवंडी हेही कलावंत होते आणि ते ज्या कलाकृतींची निर्मिती करीत व आता करतात तिचेही मूल्य कमी लेखता कामा नये, असे काका मानतात. ते म्हणतात– 'प्रत्येक प्रामाणिक, जीवनपोषक मजुरीत कलेचा शुद्ध आनंद वसत असतो. जी वस्तू निर्माण करण्याच्या समयी पदोपदी व क्षणोक्षणी एकाग्र अवधानाची आवश्यकता असते... तेथे तेथे कलेला स्थान असते.' दैनंदिन उपयोगाच्या व उपभोगाच्या वस्तूही सुंदर, स्वच्छ, नक्षीच्या, चकचकीत व आकर्षक असल्या तर सभोवतालचे वातावरणही सुंदर, रोचक व मनोहर बनते आणि त्यामुळे जीवनाचा आनंद वाढत राहतो. दररोजच्या उपयोगाच्या तांब्यापितळाच्या भांड्यावरही पूर्वी नक्षीकाम केलेले असे. त्यांच्यावर वेलबुट्टी, फुले, पाने, देवादिक यांचे आकार व आकृती कोरलेल्या असत. दिवे, समया, करंडे, संध्येच्या पळ्या, घागरी यांच्यावर नाग, मोर, पक्षी, फुले, पाने, महिरपी यांचे आकार असत. मडक्यांवर, घड्यांवर, कुंड्यांवर, खुज्यांवर सुंदर वेलबुट्टी मातीत कोरलेली किंवा रंगविलेली असे. वीणा, तंबोरे, सतारी, इत्यादी वाद्यांना सुंदर आकार दिलेले असत. रांगोळ्या काढल्या जात. घराच्या छपरावर व खांबांवर कमळे, वेली, पाने, फुले, नर्तिका, वादक, झाडे कोरलेली असत. या सगळ्याचा अर्थ उपयुक्ततेतही भारतीय लोक रोचकता, सौंदर्य निर्माण करून उपभोग्य जीवन अधिकच रसमय, आकर्षक करून जीवनातील आनंदाचा चांगल्या रीतीने आस्वाद घेत. सोन्याचांदीच्या वस्तूंत व दागिन्यांत किती सुंदर नक्षीकाम केले जात असे! ही जीवनाकरिता कला नाही का? म्हणून काकांनी म्हटले आहे— 'कलेमध्ये संपूर्ण पुरुषार्थ सामावलेला नसेल, पण कला ही पुरुषार्थाला विघातक तर असताच कामा नये. समाजोपयोगी प्रत्येक श्रमाच्या कार्यात (मजुरीत) कला पाहण्याइतकी

दृष्टी आपणापाशी जरी नसली तरी कलेने श्रमाचा तिरस्कार तर करताच कामा नये. श्रमाचा तिरस्कार करण्याने जर जीवनच टिकू शकत नाही तर कला कितपत टिकेल?' काका 'जीवनाकरिता कला' या तत्त्वाचा पुरस्कार करतात आणि कलेने जीवन उन्नत व शुद्ध केले पाहिजे असे म्हणतात.

काका हे मुख्यतः **जीवनवादी, जीवननिष्ठ व जीवनपरायण तत्त्वज्ञ** आहेत. मानवाच्या सर्व कृती जीवन सुंदर, आनंदमय, उन्नत व उदात्त होण्यासाठी, त्या दिशेने व्हावयास पाहिजेत असा त्यांचा आग्रह आहे, आणि याला ते कला अपवादात्मक समजत नाहीत. काका कलेचे प्रेमी, सौंदर्याचे आणि आनंदाचे उपासक आहेत. त्यांना मानवी जीवन ज्ञान, कला, धर्म, नीती, विवेक यांच्यापासून मिळणाऱ्या आनंदाने परिपूर्ण असावे असे वाटतेच, पण त्याचबरोबर कलावंताचे खाजगी, वैयक्तिक आचरणही स्वच्छ, निर्मळ, नीतिशुद्ध, प्रामाणिक, उत्कट व विकारमुक्त असावे असे वाटते. काका पावित्र्याचे प्रेमी व पुरस्कर्ते आहेत व त्यांच्या मते जीवन हे एकसंघ असले पाहिजे. त्यात फरी पडून अंतर्विरोध असता कामा नये. कलावंत उच्च कलेचा जसा निर्माता असावा तसेच त्याचे आचरणही स्वच्छ, निर्मळ, नीतिशुद्ध व पवित्र असावयास पाहिजे, असे ते आग्रहाने म्हणतात. काकांच्या दृष्टीने प्रत्यक्ष जीवन हे सार्वभौम, सर्वोच्च मूल्य आहे आणि कलावंत त्याला अपवाद असता कामा नये. कलावंताचे स्वतःचे आंतरिक जीवन इतरांपेक्षा वेगळे, क्षुद्र, वासनाग्रस्त, विषयलोलुप, विकारी, कुरूप व व्यसनाधीन असता कामा नये. कलानिर्मितीसाठी नीती, सदाचार, तपश्चर्या, पवित्रता इत्यादींची आवश्यकता असते. ते म्हणतात— 'कला ही काही यदृच्छाप्राप्य वस्तू नाही. तिच्यासाठी तपस्या करायला हवी, पवित्रपणे तिची उपासना करावयास पाहिजे... खरी कलादृष्टी खिळविण्यासाठी, वृद्धिंगत होण्यासाठी विषयविरक्ती अत्यंत आवश्यक असते....दैवी संपत्‌चा आचार करण्याने कलेचा विकास व्हावयाचा असतो...कला म्हणजे आदर्श जीवनाचा सहज सुगंध होय. चांगली कला व कलावंताचे आचार–जीवन यांच्यात विसंवाद व विरोध असता कामा नये. जीवन सुगंधी व सुंदर असेल तरच कलाही तशी निपजेल.' कलावंताचे आचरण जर स्वच्छ व निर्मळ नसेल तर त्यामुळे समाजाची हानी होणे टळणार नाही असे त्यांना वाटते. कलावंत हा स्वतःही जीवनवीर असला पाहिजे तरच तो समाजजीवनाची पातळी उंचावू शकेल असे ते मानतात.

काका कालेलकर हे केवळ एक उच्च प्रतीचे साहित्यिक व कलावंत लेखक नाहीत तर ते मुख्यतः स्वतंत्र प्रज्ञेचे व दृष्टीचे व मौलिक विचारांचे एक **शिक्षणकार** आहेत. ते गांधीजींच्या दृष्टीचे एक सर्वस्पर्शी तत्त्वचिंतक आहेत. ते गांधीजींचे शिष्य असले तरी नेहमींच्या अर्थाने ते आंधळेपणाने गुरूला सर्वश्रेष्ठ मानणारे भक्त नव्हते. त्यांनी गांधीजींची जीवनदृष्टी चिकित्सकपणे विचार करून आत्मसात् केली होती व

त्या दृष्टीतून ते समग्र जीवनाचा विचार करून जीवनाचे विविधांगी स्वरूप त्याच्या भव्यतेला व उदात्ततेला धक्का लागू न देता साध्या, सोप्या, सरळ व सुबोध भाषेत व्यक्त करणारे एक महान् भाष्यकार आहेत.

काका हे जातिवंत व निष्ठावंत शिक्षक व शिक्षणकार होते. मानवी जीवनाला अर्थ, महत्ता, प्रकाश, उंची, खोली व उदात्तता जर कशाने प्राप्त होत असेल तर ती ज्ञानाने व शिक्षणाने होते. शिक्षणानेच माणसाला मनुष्यत्व प्राप्त होत असते हे फार मोठे सत्य असल्याने काका जीवनाच्या उन्नतीसाठी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देतात. अहमदाबाद येथील राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या गुजरात विद्यापीठाचे ते कुलगुरू झाले तेव्हा त्यांना शिक्षणाची संपूर्ण योजना तयार करण्याची संधी मिळाली. भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आवश्यक ते स्वदेशप्रेम, स्वदेशनिष्ठा, स्वदेशाभिमान विद्यार्थ्यांच्या ठिकाणी निर्माण करण्याचे कार्य तर त्यांनी केलेच; पण भारताचा प्राचीन धर्म, तत्त्वज्ञान व संस्कृती यांचा समृद्ध वारसा नव्या काळात कसा जोपासून त्याला प्रेरक व फलदायी करावयाचा यावर विचार करून त्यांनी शिक्षणाला नवी दृष्टी व दिशा दिली. पाश्चात्त्यांच्या केवळ व्यापारी (वैश्य) वृत्तीच्या शिक्षणाचे अनुकरण करण्याने या देशात जी निःसत्त्व, पौरुषहीन, दास्यवृत्तीची, भोगप्रिय सुखवादाची, लाचारीची, स्वाभिमानशून्य मनोवृत्ती तयार होत होती ती थांबवून स्वाभिमानी, तेजस्वी, पुरुषार्थसंपन्न अशी साहसी तरुण पिढी तयार होण्यासाठी काकांनी राष्ट्रीय प्रवृत्तीची शिक्षणयोजना तयार केली, व तिच्याद्वारे उच्च जीवनमूल्यांचा साक्षात्कार करून घेण्यास पोषक, प्रेरक व अनुरूप अशा राष्ट्रीय शिक्षणाचा हिरिरीने पुरस्कार केला व तरुण पिढीवर तेजस्वी संस्कार घडविले.

मुलांना शिक्षण मातृभाषेतून व राष्ट्रभाषेतूनच द्यावयास पाहिजे यावर त्यांनी भर दिला. त्यासाठी त्यांनी राष्ट्रभाषा म्हणून हिंदी व हिंदुस्तानी भाषांचा प्रसार व प्रचार केला. भारताला राष्ट्रीय एकता, अखंडता, एकात्मता लाभण्यासाठी राष्ट्रभाषेचा सर्वांना उपयोग करण्यावर त्यांनी भर दिला. तसेच शिक्षणात शारीरिक श्रम व काम यांना महत्त्वाचे स्थान देणे अत्यावश्यक आहे असे ते म्हणतात. गांधीजींनी जी मूलोद्योगाची, श्रमाधारित जीवन शिक्षणाची योजना मांडली तिला काकांनी तात्त्विक बैठक दिली. नुसते ज्ञान, नुसते कर्म, नुसती भक्ती किंवा श्रद्धा यांना एकेकट्याला अतिरेकी महत्त्व शिक्षणात मिळता कामा नये, कारण कर्माशिवाय ज्ञान पांगळे बनते, भक्तीशिवाय व श्रद्धेशिवाय ज्ञान शुष्क, कोरडे ठरते, आणि ज्ञानाशिवाय कर्म व भक्ती आंधळी व दिशाहीन बनते; म्हणून ज्ञानभक्तिकर्मयुक्त एकसंध जीवनशिक्षणाची आवश्यकता काका प्रतिपादतात. श्रमाला प्रतिष्ठा दिल्याशिवाय श्रम न करणारा श्रीमंत व धनिक वर्ग आणि केवळ शारीरिक कष्ट करून जगणारा श्रमजीवी मजूरवर्ग यांच्यातील अंतर, मानसिक दुरावा, दर्जा, उच्चनीच भाव व त्यामुळे निर्माण झालेली सामाजिक

विषमता नष्ट केल्याशिवाय समाजात समता धर्म येणार नाही यावर भर देऊन ते एका एकसंध व समन्वित शिक्षणपद्धतीचा पुरस्कार करतात. त्याचबरोबर शिक्षण म्हणजे नुसते कन्डिशनिंग न होता शिक्षणाने माणसाची सर्व प्रकारच्या बंधनांतून सुटका करावयास पाहिजे, 'सा विद्या या विमुक्तये' या तत्त्वाचा त्यांनी पुरस्कार केला आहे. त्यासाठी उत्तम, कर्तृत्व संपन्न, ज्ञानी, तेजस्वी, चारित्र्यसंपन्न व प्रेरक शिक्षकाची जरूर आहे असे काका म्हणतात ते योग्यच आहे. आदर्श शिक्षकाच्या ठिकाणी त्यांच्या मते पटवून देण्याची, प्रबोधन करण्याची क्षमता (Persuasion), धीर (Patience), सेवावृत्ती आणि त्यागक्षमता (Sacrifice) या गुणांची आवश्यकता असते. शिक्षकाच्या ठिकाणी शिकविण्याची उत्कट इच्छा, अखंड जागृतता व सावधानता, शुद्ध व निर्मळ चारित्र्य आणि शील सांभाळण्याविषयी दक्षता आणि नित्यनूतन विचार व चिंतन करण्याची इच्छा व सवय ठेवून सातत्याने बदलणाऱ्या परिस्थितीचे यथार्थ आकलन स्वतः करून ते छात्रांना प्रभावीपणे समजावून देण्याची अविश्रांत इच्छा व तयारी ठेवण्याची वृत्ती असावयास पाहिजे. शिक्षण हे वैश्य, व्यापारीवृत्तीचे बनताच कामा नये असे ते आग्रहपूर्वक सांगतात.

काकांना पाश्चात्त्यांचे अंधानुकरण जसे मान्य नाही तसेच जुन्या भारतीय परंपरांना पोथीनिष्ठ, पुराणप्रिय व हट्टाग्रही वृत्तीने चिकटून बसून 'जुने तेच सोने' मानून नव्याला विरोध करणे मान्य नाही. जे जुने सदोष असेल व आधुनिक वैज्ञानिक सत्याला अनुरूप नसेल त्याचा त्याग करण्यावर, आणि निरीक्षण, प्रयोग, परीक्षण, चिकित्सकता, संशोधन यावर आधारलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अवलंब करण्यावर काका भर देतात. विज्ञानाने शोधून काढलेली तत्त्वे व सत्ये आपण नाकारता कामा नये, त्यांचा स्वीकार व उपयोग करावयास पाहिजे व त्यामार्गे जीवनाचा विकास व उत्कर्ष साधावयास पाहिजे, असे ते म्हणतात. पण वैज्ञानिकतेच्या नावाखाली जे सुंदर, कलात्मक, आनंददायी आहे ते वरून साधे व अनलंकृत दिसत असले तरी तेही टिकवून लोकांमधील रसिकता, नवसर्जकता, कलात्मकता शोधून काढून ती टिकवून ठेवण्यासाठी व तिचा अधिक विकास करण्यासाठी तिला प्रेरक, पोषक व वर्धक शिक्षण दिले पाहिजे, असे काका आवर्जून म्हणतात.

शिक्षण व कला यांच्याप्रमाणे काकांनी **धर्माचाही** साक्षेपी व विवेक पद्धतीने विचार करून सध्याच्या काळाला अनुरूप, पोषक, संवर्धक असा धर्म कसा असेल याचे सुंदर विवेचन केले आहे. त्यांच्या दृष्टीने खरा धर्म कर्मकांडात बंदिस्त झालेली अविवेकी अंधश्रद्धा नसून उच्च दर्जाची आध्यात्मिकता (Spirituality) आहे. त्यांना अभिप्रेत असलेला धर्म गांधीजींनी प्रतिपादलेला नीतिप्रधान व श्रद्धायुक्त आचारधर्म आहे. त्यांच्या मते खरा धर्म कर्मकांड, पूजा-अर्चा, उपासतापास, तीर्थयात्रा, सणवार करणे नसून त्याचा गाभा नैतिक सदाचरण, शुद्ध व निर्मळ चारित्र्य, करुणा,

मैत्री व विश्वप्रेमाची भावना यांनी बनत असतो. काकांना अभिप्रेत असलेला धर्म संपूर्ण जीवनाला व्यापून राहणारी **आध्यात्मिक वृत्ती** आहे. काकांचा धर्म हा **जीवनधर्म** आहे व त्याचे उद्दिष्ट समाजहित साधणे आहे. काकांची धर्मभावना त्याग, वैराग्य, साधना, तपश्चर्या वगैरेंचे माणसाच्या आध्यात्मिक उन्नतीमध्ये असणारे मूलभूत महत्त्व मान्य करूनही व्यक्ती आणि समष्टी यांची सत्त्वसंशुद्धी आणि धारण-पोषण यांचा व्यावहारिक बुद्धीने विचार करायला विसरत नाही. काकांना अभिप्रेत असलेला जीवनधर्म संपूर्ण जीवनाला व्यापून राहणारे व संपूर्ण जीवनाचे नियंत्रण करून जीवनाला उदात्त बनविणारे प्रेरक तत्त्व आहे. त्यांचा जीवनधर्म व्यक्तीचे शरीर, मन, अंतःकरण, बुद्धी व आत्मा यांच्या उन्नतीला पोषक होऊन तो इंद्रियोप-भोग, शिष्टाचार, कौटुंबिक जीवन, व्यावसायिक आणि व्यावहारिक प्रवृत्ती, संपत्ति-शास्त्र, राजकारण, राष्ट्राच्या इतर प्रवृत्ती व आंतरराष्ट्रीय संबंध वगैरे जीवनाच्या अंगांत कार्य करणारी अशी शक्ती समजायला पाहिजे.

'धर्म' शब्दाच्या अर्थातील गूढ व रहस्यमय भाग काढून टाकून धर्माला पार-लौकिकत्वापासून ऐहिकाकडे वळवून माणसाचे पृथ्वीवरील प्रत्यक्ष वैयक्तिक व सामूहिक सामाजिक जीवन सुखमय, आनंदी व समाधानी बनविण्यास धर्म कसा प्रत्यक्ष मदत करतो हे काकांनी चांगल्या रीतीने दाखविले आहे. लोकांची धारणा ज्यामुळे होऊ शकेल, लोक परस्परांशी सहकार्य करून आपला उत्कर्ष साधू शकतील तो धर्म, असे ते म्हणतात. जसा वृक्षात जीवनरस असतो आणि तो वृक्षाला टिकवून ठेवीत असतो व कृतार्थ करीत असतो तसे मनुष्य-समाजाला टिकवून धरणारे आणि उन्नतीच्या मार्गावर घेऊन जाणारे जर कोणते तत्त्व असेल, जर कोणता संजीवनीरूप जीवनरस असेल तर तो धर्म होय; या हेतूच्या विरुद्ध असे जर काही सिद्ध झाले तर तो धर्म नव्हे, आणि धर्माच्या नावाखाली जर काही चालत असेल तर त्याची धर्मातून हकालपट्टी करावयास पाहिजे, कारण सर्व प्राण्यांच्या विकासासाठी, उदयासाठी, प्रगती साठी धर्माचे अस्तित्व असते, असे काका मानतात.

अशा शुभंकारी, व्यापक, पारमार्थिक व ऐहिक कल्याणाकडे नेणारा धर्म हेच समाजरचनेचे मार्गदर्शक तत्त्व असले पाहिजे असे काका म्हणतात. गीतेत **दैवी संपत्** अंतर्गत ज्या गुणांचे वर्णन केलेले आहे त्या गुणांचा प्रत्यक्ष आचार जसा व्यक्तीच्या आध्यात्मिक उन्नतीला आवश्यक व साहाय्यक ठरतो तसाच त्या गुणांच्या आचरणामुळे समाजही निकोप, बलवान, ज्ञानपूर्ण व तेजस्वी बनतो. म्हणजे धर्म माणसाला निवृत्ती, वैराग्य, संन्यासवृत्ती शिकवून समाजापासून, जगापासून दूर नेतो असे म्हणणे दिशाभूल करणारे ठरते. उलट खरा धर्म समाजाची सुरक्षितता, स्थिरता, प्रगती व उन्नती साधत असतो. खरा धर्म जीवनाचे शास्त्र बनवितो. कर्मकांडाचा धर्म माणसांना संकुचित, हट्टी व जड बनवितो, तर पारमार्थिक धर्म मानवाला उदार

करुणार्द्र, मैत्रीपूर्ण, सर्वांवर प्रेम करायला शिकविणारा व विश्वात्मक बनवितो. काका 'नारायण' या शब्दाचा अर्थही मानवसमाज असा करतात, आणि ब्रह्म म्हणजे 'समाज ब्रह्म' असे म्हणतात. आदर्श, निर्दोष व तेजस्वी समाज गीताप्रणीत दैवी संपत्तीवरच कसा आधारता येईल त्याचे मार्गदर्शक विवेचन या पुस्तकात दिलेले आहे.

काकांनी शिक्षण, कला, धर्म यांच्याप्रमाणे **संस्कृतीचेही** मूलगामी चिंतन केले आहे. काका चांगले समाजशास्त्रज्ञ आहेत. त्यांनी समाजजीवनाची मूलतत्त्वे शोधून काढून त्यांच्या अनुरोधाने निकोप, शांतिप्रिय, निर्दोष व आदर्श समाजाची रचना कशी करता येईल याविषयी मौलिक विचार मांडले आहेत. पाश्चात्त्यांनी तयार केलेले समाजशास्त्र कसे अपूर्ण, सदोष व अशास्त्रीय आहे असे काकांनी आपल्या 'जीवन-संस्कृति' या ग्रंथात स्पष्टपणे दाखविले आहे. त्यांच्यामते व्यष्टी व समष्टी यांच्यात जो विरोध दर्शविला जातो तो कृत्रिम व खोटा आहे. उलट व्यक्ती व समाज ही परस्परावलंबी व परस्परपूरक असल्याने त्यांचा विकास व कल्याण एकमेकांत गुंतलेले असतात, आणि म्हणून दोघांच्या विकासात विवेकपूर्ण रीतीने समन्वय साधण्याची आवश्यकता ते प्रतिपादतात. संस्कृती मानवसमाजाच्या सर्व विविध अंगांचा सारखाच विचार करून त्यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न करीत असते; आणि सर्व संस्कृती अखंड, एकसंध व अविकल असते. त्यांनी म्हटले आहे—'फूल जेव्हा उमलते तेव्हा एकेक पाकळी करून ते पूर्ण होत नाही, पण कळीच्या रूपात सर्वच पाकळ्या घेऊन ते जन्मते आणि एकदमच (सर्व पाकळ्यांनिशी) उमलते. जीवनाचेही असेच आहे,' त्यांच्यामते प्रकृतीच्या आद्य दशेतून विकृतींचे शुद्धीकरण करीत राहणाऱ्या प्रयत्नाद्वारा मानव शुद्ध संस्कृतीच्या दिशेत प्रगती करीत राहिला आहे. काका समाजशास्त्र व मानसशास्त्र यांचा उपयोग करून नवी जीवनमूल्ये साकार करणाऱ्या आधुनिक जीवनपद्धतीला संस्कृतिरूपात ओळखतात. काकांच्या मते धर्म संकुचित वृत्तीचा असतो, तर संस्कृती समन्वयकारी व म्हणून व्यापक व समावेशक असते.

संस्कृती चांगल्या व निकोप रीतीने फुलण्यासाठी अहिंसेचा स्वीकार करणे ते अत्यावश्यक मानतात, समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, निर्भयता व सहकार्य टिकून राहण्यासाठी व लोकशाही प्रभावी रीतीने कार्य करीत राहण्यासाठी अहिंसेचे पालन होणे ही अनिवार्य अट असली पाहिजे असे काका म्हणतात त्याला फार महत्त्व आहे.

या पुस्तकाचे शीर्षक 'जीवनचिन्तन' ठेवण्यात औचित्य आहे. काका हे जीवनावर निरतिशय प्रेम करणारे चिंतक **जीवनऋषी** आहेत. काकांना हवे असलेले जीवन नुसते सुंदर व आनंदपूर्ण नसून त्याचबरोबर ते तेजस्वी, कर्मप्रवण, श्रमशील, भावनासमृद्ध, उत्कटतेने भारलेले, रसिकतेने परिप्लुत आणि सेवाभावी आहे. काका

अहिंसेचे पुरस्कर्ते असले तरी त्यांना नेभळट, मिळमिळीत, दुर्बल, रडके, पराभूत-वृत्तीचे, समाजविन्मुख, निष्क्रिय, भित्रे, विरक्तीचे व संघर्षाला भिऊन पळ काढणारे जीवन नको आहे. पुरुषार्थी, साहसी, प्रयोगशील, उत्साही, वीर्यवान व नवीन आव्हानांचा स्वीकार करणारे जीवन त्यांना हवे आहे. त्यांना आवडणारी शांती ही निष्क्रियता, कर्मसंन्यास, आळशीपणा, कामटाळूपणा, दरिद्री व दीनवाणे जीवन जगणारी अल्पसंतुष्ट करंटी कर्महीन दैववादी वृत्ती नाही. काकांना हवे असलेले जीवन चैतन्याने खळाळणारे, आनंदाने रसरसलेले, उत्साहाने भिरभिरणारे, आशेने पल्लवित होणारे, भक्तीने थबथबणारे, विश्वप्रेमाने ओसंडणारे, सौंदर्याने पुलकित होणारे, प्रकाशाने झळाळणारे व सभोवताली चैतन्य, प्रसन्नता, उत्साह व आनंद पसरविणारे असे असावयास पाहिजे. काका अध्यात्माचे प्रेमी व पुरस्कर्ते तर आहेतच पण त्यांचे अध्यात्म भौतिक जीवनाची उपेक्षा व द्रोह करणारे व जगाच्या प्रगतीसंबंधी उदासीन नाही. त्यांचे अध्यात्म रडके, नेभळे, दुर्बल, शरणागती पत्करणारे, जगाचा तिरस्कार करणारे नाही. त्यांना धरणीवर ईश्वराचे शुभंकारी व कल्याणकारी राज्य यावे असे वाटते; आणि त्यासाठी मानवाने सतत कार्यरत राहावयास पाहिजे कारण प्रयत्नांनी व कार्य करण्यानेच मानव जात आपली उदात्त स्वप्ने या धरणीवर साकार करू शकली आहे. असे काका एक महान द्रष्टे **जीवन-ऋषी** व **जीवन-आचार्य** होऊन गेले व त्यांचे विचार नव्या पिढीला निश्चितच प्रेरक व मार्गदर्शक ठरतील.

काका कालेलकर हे उच्च प्रतीचे तत्त्वचिन्तक आहेत. त्यांनी **हृदयदीक्षेची** आवश्यकता प्रतिपादिली आहे. ते म्हणतात मानवाचे सारसर्वस्व त्याच्या बुद्धीपेक्षा हृदयात आहे. एकदा मानवाचे हृदय करुणेने, प्रेमाने, उदारतेने, उत्साहाने व आदर्शाने भारले गेले म्हणजे त्याच्या ठिकाणी दुर्दम्य संकल्पशक्ती, इच्छाशक्ती, प्रेरणा व प्रयत्नसंपन्न पुरुषार्थ जागा होईल व मग मनुष्य विजिगीषु वृत्तीने कोणत्याही संकटांशी यशस्वीपणे मुकाबला करू शकेल. काका काही बाबतींत आग्रही असले तरी ते एकांगी वृत्तीचे नाहीत. त्यांचा पिंड **समन्वय** करण्याचा आहे. त्यांच्या विचारात जुने व नवे, प्राचीन व अर्वाचीन, पूर्व व पश्चिम, धर्म व विज्ञान, कला व उपयुक्तता, ज्ञान व कर्म, श्रद्धा व विचारस्वातंत्र्य, हक्क व कर्तव्य, स्वार्थ व परार्थ यांच्यात विरोध नसून त्यांचा उच्च पातळीवर समन्वय घडविण्याच्या शक्यतेवरील विश्वास व्यक्त झालेला आहे. त्यांच्या मते मानवाने विवेकाने संयमपूर्वक वागून वैयक्तिक व सामाजिक जीवनात जबाबदारीने वागावयास पाहिजे. काका हे त्याचबरोबर रसिकतेने, आनंदाने, समाधानाने जगून जीवन समृद्ध, सुखी व समाधानी करण्याचा आवर्जून उपदेश 'करतात. 'जीवनात खरे दुःख निर्धनता हे नसून नीरसता हे खरे दुःख आहे' हे त्यांचे वाक्य प्रत्येकाने मनन करण्यासारखे आहे.

काका हे एक अत्यंत प्रभावी व शैलीकार लेखक म्हणून मान्यता पावले आहेत.

त्यांच्या लेखनात सर्वत्र प्रसन्नता, सरलता, शब्दांचे सौंदर्य, भाषेची अस्खलितता, प्रसंगानुरूप वापरलेली कल्पकता, योग्य उपमाउत्प्रेक्षांची मनोज्ञ रचना व सर्वांत अधिक म्हणजे हृदयाला पुलकित करणारी निवेदनशैली यांचा सुंदर मिलाफ पाहावयास मिळतो. त्यांचा कोणताही लेख वाचताना कंटाळा येत नाही. उलट त्यांची निसर्ग-वर्णने असोत की गंभीर विषयावरील विवेचन असो ते वाचतांना चांदण्यातून विहार करीत असताना अनुभवायला मिळणारी शीतल व रम्य प्रसन्नता अनुभवायला मिळते. काका हसत खेळत अनिष्टाविषयी आपल्या मनात अरुची निर्माण करून उदात्ततेचे शीतल वाऱ्याचे झोत वाहवून आपणास नकळत उन्नत आध्यात्मिक जीवनाची शिखरे चढत जाण्यास प्रवृत्त करतात, आणि आपल्या मनात पावित्र्याचा व मांगल्याचा सुवास भरून टाकतात. काका हे आधुनिक काळात होऊन गेलेले एक आदर्श ऋषी, वंदनीय मुनी व दैवी जीवनाचे प्रेरक जीवनवीर होऊन गेले.

काका कालेलकरांचे निवडक विचार विविध विषयांवरील आहेत व ते आजही फार महत्त्वाचे आहेत. काकांचे बहुतांश लेखन गुजराती भाषेत असल्याने महाराष्ट्रीय वाचकांना त्यांचा फारसा परिचय नाही. पण काकांचे विचार सध्याच्या परिस्थितीत भांबावलेल्या तरुण पिढीला व शिक्षित वाचकांना मोलाचे वाटावेत असे आहेत. कमालीची महागाई, बेकारी, समाजातील बेदिली, फुटीरपणा, चैनीपणाची व सुख-लोलुपतेची वाढणारी वृत्ती, आपल्या कर्तव्याविषयी बेफिकिरी, अप्रामाणिकपणा, स्वार्थीपणा, ढोंगीपणा, व्यापारी वृत्तीचा अतिरेक, कायदा व सुव्यवस्थेविषयी अनादर अशा अनेक अनिष्ट प्रवृत्तींच्या काळात चांगले, सत्प्रवृत्त, समाधानी, पुरुषार्थी, आत्मोन्नती करणारे जीवन कसे जगावे व जीवनसाफल्याचा अनुभव कसा घ्यावा याविषयींचे काकांचे विचार निश्चितच उपयोगी व मार्गदर्शक ठरण्यासारखे आहेत, व म्हणून 'काका कालेलकरांचे जीवनचिन्तन' हे नावीन्यपूर्ण व औचित्यपूर्ण पुस्तक मतममंडळाने प्रकाशित केले याबद्दल मी मतममंडळाचा अत्यंत आभारी आहे. हे पुस्तक प्रसिद्ध करण्यास मतम मंडळाच्या नियामक समितीचे अध्यक्ष **मा. प्रा. पां. ल. गाडगीळ** व सदस्य **श्री. मा. श्री. दा. गो. देशपांडे** यांनी मनःपूर्वक अनुमती दिली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

या पुस्तकासाठी मी आचार्य काका कालेलकर यांच्या अनेक मूळ गुजराती पुस्तकां-तील उताऱ्यांचे व लेखांचे मराठीत भाषांतर केले आहे. काका कालेलकरांच्या सर्व गुजारती पुस्तकांचे हक्क अहमदाबाद येथील '**नवजीवन ट्रस्ट**'कडे आहेत. त्यांचे मॅनेजिंग ट्रस्टी श्री. जितेंद्र देसाई यांना पत्राने विनंती करताच त्यांनी काकांच्या सर्व पुस्तकांतील निवडक लेखांचा मराठीत अनुवाद करण्यास व त्यांचा संग्रह मराठीत पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यास सत्वर परवानगी दिली त्याबद्दल मी स्वतः व मतम मंडळ **नवजीवन ट्रस्ट** आणि वैयक्तिक श्री. **जितेंद्र देसाई** यांचे अत्यंत आभारी

आहेत. काकांची बहुतेक गुजराती, काही हिंदी व मराठीतील अनुवादित पुस्तके मला पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या बाई जेरबाई वाडीया ग्रंथालयातून विनाआयास मिळाली. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयात गुजराती पुस्तके मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत ही आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. मला ही पुस्तके वापरण्यास दिल्याबद्दल फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य व ग्रंथालयातील सेवक यांनी हार्दिक मदत केली म्हणून मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

काकांचे 'जीवनसंस्कृति' हे मूळ गुजराती पुस्तक फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयात उपलब्ध होऊ शकले नाही. ते मला पुण्यातील सुप्रसिद्ध विचारवंत व लेखक मा. श्री. श्रीपाद जोशी यांनी स्वतःच्या संग्रहातून उपलब्ध करून दिले याबद्दल मी श्री. श्रीपाद जोशी यांचा अत्यंत ऋणी आहे.

गुजरातीतून मराठीत अनुवाद करताना मला काही शब्दांचे अर्थ समजण्यास अडचण आली तेव्हा त्यांचा अर्थ समजावून घेण्यात मला फर्ग्युसन महाविद्यालयातील मानसशास्त्राच्या प्राध्यापिका श्रीमती गीता मेहता यांनी मोलाचे साहाय्य केले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

शेवटी हे पुस्तक **मॅजेस्टिक प्रकाशन** संस्थेचे **श्री. अशोकराव कोठावळे** व **श्री. रवीन्द्र कोठावळे** यांनीही तत्परतेने अत्यंत अल्प अवधीत छापून प्रसिद्ध करण्यात मला जे सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

काकांचे वैचारिक साहित्य विस्तृत व अनेक विषयांवरील आहे. त्यातील फक्त काही थोडे उतारे मी या पुस्तकाद्वारा मराठीत आणू शकलो, आणि इतर तर खूपच वाचण्यासारखे आहे. हे पुस्तक वाचल्याने जर काकांची इतरही पुस्तके वाचण्याची वाचकांना इच्छा होऊन त्यांचा वाचकांना उपयोग झाला तर या पुस्तकाचे प्रयोजन सफल झाल्याचे मला समाधान लाभेल.

'आचार्य काका कालेलकरांचे जीवनचिन्तन' हे मतमचे पुस्तक ज्या काकांची जन्मशताब्दी नुकतीच साजरी झाली तिच्यानिमित्त काकांच्या स्मृतीचा वाहिलेली ही 'वैचारिक आदरांजली' (Academic tribute) आहे हे एक मोठेच समाधान मला वाटत आहे.

५–१–९१

डॉ. ग. ना. जोशी
संपादक

'जीवन विहार'
३४, क्षिप्रा सोसायटी,
कर्वेनगर, पुणे–४११०५२

अनुक्रमणिका

विभाग पहिला १–३६

जीवन

१. जीवन ३
२. जीवनकला ४
३. जीवनयोग–१ ६
४. जीवनयोग–२ ९
५. जीवनाचे संगीत १०
६. जीवनाचा अर्थ १२
७. जीवनसाफल्य १२
८. जीवनाची सार्थकता १२
९. उत्कटता हेच जीवन १४
१०. जीवनाचा पंथ १५
११. जीवननिष्ठ व्यवस्थेचे स्वरूप १६
१२. नवे जीवनदर्शन १७
१३. जीवनात सौंदर्याचे स्थान १८
१४. जीवन आणि नीती २०
१५. आजचे कलाविहीन जीवन २३
१६. सदाचार ही जीवनाची सुंदरता २५
१७. मंगल मंदिर खोलो २८
१८. मृत्यू : एक वरदान ३०
१९. मृत्यूचे तर्पण ३१
२०. मरणोत्तर जीवन : सांपरायाविषयी ३५
२१. दुःखं जन्तोः परं धनम् । ३५

विभाग दुसरा ३७–५८

शिक्षण

१. शिक्षण म्हणते ३९

२. सा विद्या ३९
३. शिक्षणाची मूलतत्त्वे ४०
४. शिंगे आणि पाय ४२
५. भावीयुगाचे शिक्षण ४७
६. शिक्षणकर्त्यांचे मिशन ५०
७. संस्कारितेद्वारा जीवनपरिवर्तन ५२
८. नव्या शिक्षणाचे स्वरूप ५८

विभाग तिसरा ५९–७७

तत्त्वज्ञान

१. मूलगामी मनन ६१
२. ज्ञानपद्धती ६३
३. उपनिषदे ६४
४. स्व-तंत्र म्हणजे आत्म-तंत्र ६७
५. वास्तववाद वि. ध्येयवाद ७०
६. तत्त्व आणि व्यवहार ७०
७. आचार्य ७१
८. खरा समन्वय ७२
९. आमंत्रण ७४
१०. प्रेम आणि प्रणय ७५
११. सार्वभौम भरती–ओहोटी ७६
१२. सामान्यात असामान्यत्व ७६
१३. अहिंसा ७७

विभाग चौथा ७९-१२५

धर्म आणि अध्यात्म

१. खरा धर्म : जीवनाचे शास्त्र ८१

२. धर्माचे सारस्वरूप ८२
३. धर्मसंस्करण ८३
४. धार्मिक शिक्षण ८८
५. खरी आस्तिकता ९२
६. नास्तिकता ९३
७. आपल्या ईश्वराचे स्वरूप ९७
८. अद्वैताचे मर्म ९९
९. सनातन धर्म ९९
१०. हिंदुधर्म : विश्वधर्म १०१
११. सुख व दुःख दोन्ही हवीत १०३
१२. धर्म म्हणजे प्रेम १०४
१३. सर्व-धर्म-ममभाव १०४
१४. हृदय १०५
१५. हृदयधर्मांची दीक्षा १०६
१६. हृदय व संगीत १०७
१७. कवी, तत्त्वज्ञ आणि धर्मज्ञ १०७
१८. तर्क आणि भावना १०९
१९. हिंदुधर्म जागृती धर्मपीठांकडून नव्हे १११
२० धर्माच्या अधोगतीची मीमांसा १११
२१. संघटना हानिकारक ११२
२२. सत्याच्या विरुद्ध सत्ता ११३
२३. आत्म्याचे गुण ११४
२४. आत्मौपम्य ११८
२५. मांगल्य ११८
२६. करुण रस १२०
२७. संयमात संस्कृती १२१
२८. अघमर्षण १२२
२९. पक्षीगीत १२४

विभाग पाचवा — १२७–१७४

कला

१. शारदेचे उद्‌बोधन — १२९
२. कलेचे पूर्ण स्वरूप — १३०
३. कलेची व्याख्या करणे अशक्य — १३१
४. कलानंद — १३२
५. कलेचा आनंद इंद्रियातीत — १३६
६. कलेचा आदर्श — १३८
७. कलेचे प्रयोजन — १३९
८. कलेचे विज्ञान — १४४
९. निसर्गाची कलादीक्षा — १४६
१०. परस्मैपदी आणि आत्मनेपदी कला — १४८
११. कला आणि विलासिता — १५०
१२. कला, जीवन आणि तत्त्वज्ञान — १५१
१३. हुन्नर आणि कला — १५५
१४. साहित्य, संगीत आणि कला — १५७
१५. संगीत ही भावनेची भाषा — १५९
१६. संगीतकारांना विनंती — १५९
१७. संगीत : जन्मसिद्ध हक्क — १६१
१८, काव्य आणि संगीत — १६१
१९. कवी — १६३
२०. कवीचे द्रष्टेपण — १६५
२१. तत्त्वज्ञानी आणि कवी — १६६
२२. सदाचार ही सर्वश्रेष्ठ कला — १६८
२३. पाहिजेत जीवनकलाकार — १६८
२४. प्रगतिशील साहित्य — १६९
२५. साहित्याची प्रेरणा — १६९
२६. कला अशी नको — १७०

२७. वीररस, प्रेमरस १७१
२८. आनंदाचे निर्झर १७२

विभाग सहावा १७५–२००

सौंदर्य

१. सृष्टीचे रहस्य १७७
२. सृष्टिसौंदर्य नित्य ताजे टवटवीत १७७
३. निर्हेतुक आनंद १७८
४. सौंदर्य आणि सत्य १७८
५. लावण्य १७९
६. नदी मुखेनैव समुद्रम् आविशेत् १८०
७. सागर–सरितेचा संगम १८१
८. कृष्णेच्या आठवणी १८२
९. दक्षिणगंगा गोदावरी १८२
१०. गंगामाई १८४
११. यमुनाराणी १८७
१२. बदरीधाम १८९
१३. नगाधिराज १८९
१४. अर्णवाचे आमंत्रण १९१
१५. लाटांचा तांडवयोग १९१
१६. सागराची पूर्णता १९३
१७. रण की सरोवर? १९३
१९. हिंदुस्थानची व्याख्या १९५
२०. परमस्नेही अंधकार १९६
२१. पक्षी होणे आवडेल १९९

विभाग सातवा २०१–२२५

समाज आणि संस्कृती

१. समाजब्रह्म २०३

२. नारायण २०५
३. समाजजीवनाची आधार तत्त्वे : दैवी आणि आसुरी संपत् २०६
४. संस्कृतीचे हार्द २०९
५. संस्कृतींचा जीवनक्रम २११
६. संस्कृतीचा विस्तार २१२
७. भारतीय संस्कृती २१४
८. भारतीय संस्कृती वृक्षासारखी २१५
९. परंपरा आणि सुधारणा २१६
१०. समन्वय २१७
११. संस्कृतिनिष्ठा म्हणजे कातनिष्ठा नव्हे २१८
१२. बेसुमार संग्राहकता २१८
१३. सुधारणेची खरी दिशा २१९
१४. ऋषी २२१
१५. संस्थायुग २२३
१६. समाजाच्या अवनतीची कारणे २२५

विभाग आठवा २२८–२५४

भगवत् गीता आणि दैवी संपत्

१. जगद्गुरु गीता २२९
२. गीता : आत्मज्ञानाचा ग्रंथ २२९
३. गीतेचा संदेश २३०
४. गीताधर्म : गीतेचे समाजरचनाशास्त्र २३१
५. दैवी संपत् २३३
अभय २३४
सत्त्वसंशुद्धि २३५
धृति २३५
शम-दम २३६
तेज २३७

यज्ञ, दान आणि तप २३७
क्षमा २४०
मार्दव २४१
आर्जव २४१
अद्रोह २४२
अपैशुन २४२
ह्री २४३
शौच २४३
अलौलुप्त्वम् २४४
अचापलम् २४५
नातिमानिता २४५
अक्रोध २४६
ज्ञानयोग-व्यवस्थिति २४६
स्वाध्याय २४७
दया २४८
अहिंसा २४८
सत्य २५०
शान्ति २५२
खरे ब्रह्मचर्य २५३

विभाग नववा २५५–२५९

विचार कालिका २५६
संदर्भ ग्रंथसूची २६०
आचार्य काका कालेलकरांची मूळ पुस्तके २६१

मराठी तत्त्वज्ञान–महाकोश मंडळाची प्रकाशने

(कार्यालय : मराठी तत्त्वज्ञान–महाकोश मंडळ,
फर्ग्युसन कॉलिज आवार, ग्रंथालयामागे, पुणे ४११ ००४)

१. मराठी तत्त्वज्ञान–महाकोश (खंड १, २, ३)
२. पारिभाषिक शब्दावलि
३. आनंद कुमारस्वामी : लेखक–विश्वनाथ श्री. नरवणे अनुवाद–ग. ना. जोशी
४. बर्ट्रान्ड रसेल : लेखक– सु. वा. बखले
५. रवीन्द्रनाथ टागोर : लेखक– विश्वनाथ श्री. नरवणे अनुवाद– ग. ना. जोशी
६. नीतिमीमांसा : लेखक– श्री. ह. दीक्षित
७. मानवेंद्रनाथ रॉय : लेखक– द. धों. बंदिष्टे
८. तत्त्वज्ञ सावरकर : संपादक– य. दि. फडके
९. विश्व आणि मानव : (आकाशवाणीवरील भाषणांचा संग्रह)
१०. Philosophy in Fifteen Modern Indian Languages :
Ed. Prof. V. M. Bedekar
११. Philosophical Reflections : Select Papers of
Prof. D. D. Vadekar.

वरील पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध नाहीत.

१२. साहित्याचे तत्त्वज्ञान : लेखक– वि. ना. ढवळे
१३. भारतीय तर्कशास्त्राची रूपरेखा : लेखक : सुरेंद्र बारलिंगे व क्रांतिप्रभा पांडे
१४. पाणिनीय व्याकरण आणि भाषा-तत्त्वज्ञान :
लेखक– पं. वामनशास्त्री भागवत.
१५. नीतिविचार : लेखिका– मेरी वॉर्नॉक : अनुवाद– श्री. ह. दीक्षित
१६. शैवदर्शन : लेखक– ग. वा. तगारे
१७. डॉ. आंबेडकरांचे समाजचिन्तन : संपादक– भालचंद्र फडके
१८. पंडित जवाहरलाल नेहरूंचे तत्त्वचिन्तन :
संपादक– ग. ना. जोशी व श्री. वा. कावळे

क्र. १२ ते १८ ही पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

आगामी प्रकाशन

डॉ. राधाकृष्णन् यांचे तत्त्वचिन्तन

विभाग पहिला

जीवन

काका हे खरेखुरे जीवनचिंतक आहेत. त्यांच्या दृष्टीने जीवन हेच सार्वभौम मूल्य आहे. मानवाचे जीवन हीच खरी त्याची दौलत व संपत्ती आहे, आणि ते जीवन मानवाला अर्थपूर्ण व आनंदपूर्ण रीतीने, तृप्तीने व उत्कटतेने जगायला मिळून त्याला जीवन-साफल्याचा, कृतार्थतेचा अनुभव घेता आला पाहिजे असे त्यांना वाटते. माणसाला आपले जीवन उत्कटतेने जगता आले पाहिजे. खरे जीवन कर्म-प्रवण, ज्ञानपूर्ण, पुरुषार्थी, विक्रमी, आदर्शवादी, ध्येयार्थी असले पाहिजे आणि जीवनसमृद्धीसाठी साहित्य, कला, विज्ञान, धर्म, सामाजिक चळवळी, सांस्कृतिक उपक्रम, शिक्षण सर्व काही असावयास पाहिजे असे काका मानतात. जीवनाचे मूलगामी, व्यापक, सर्वांगीण व रसिक असे चिंतन काकांइतके क्वचितच कोणी केले असेल. जीवनाचा अर्थ काय आहे व सुंदर, समृद्ध, आनंदी, समाधानी व उत्साही जीवन माणसाने कसे जगावे याविषयींचे त्यांचे विचार फारच उद्‌बोधक आहेत. काकांचे जीवनावर कमालीचे प्रेम आहे. त्यांच्या पुस्तकांची नावेही जीवनपरच आहेत. उदा. जीवनाने आनंद, जीवनविकास, जीवनसंस्कृति, जीवन भारती, जीवन-लीला, जीवनचिंतन, जीवन व्यवस्था, जीवन प्रदीप इत्यादी.

१. जीवन
२. जीवनकला
३. जीवनयोग–१
४. जीवनयोग–२
५. जीवनाचे संगीत
६. जीवनाचा अर्थ
७. जीवन साफल्य
८. जीवनाची सार्थकता
९. उत्कटता हेच जीवन
१०. जीवनाचा पंथ
११. जीवननिष्ठ व्यवस्थेचे स्वरूप
१२. नवे जीवनदर्शन
१३. जीवनात सौंदर्याचे स्थान
१४. जीवन आणि नीती
१५. आजचे कलाविहीन जीवन
१६. सदाचार हीच जीवनाची सुंदरता
१७. मंगल मंदिर खोलो
१८. मृत्यू : एक वरदान
१९. मृत्यूचे तर्पण
२०. मरणोत्तर जीवन : सांपरायाविषयी
२१. दुःखं जन्तोः परं धनम् ।



१. जीवन

जीवन कसे असायला पाहिजे? धीरगंभीर सागरासारखे की हसत्या, उड्या मारणाऱ्या निर्झरासारखे?

हसणारा, उड्या मारणारा निर्झर धावतधावत कोठे जात असतो? हसत, खेळत, नाचत निर्झर नदीत जाऊन मिळत असतो. सर्वच निर्झर नेहमी वाहात असतात असे नाही. कित्येक ओढे उन्हाळा सुरू होण्यापूर्वी सुकून जात असतात.

आणि नदी? नदी अखंड वाहात असते. पण काही वेळा ती खडकांमधून खळखळ खळखळ वाहाते, तर काही वेळा गंभीरपणे व शांतपणे वाहाते; काही वेळा दुसऱ्या नदीला जाऊन मिळते किंवा दुसऱ्या नदीला स्वतःमध्ये सामावून घेते. काही वेळा एका नदीचे विभाग होऊन फाटे फुटतात व त्यांपासून अनेक नद्या तयार होतात. शेवटी अखंड वाहणारी ही नदी सागराला जाऊन मिळते व कृतार्थ होते. जेवढ्या काही नद्या असतात त्या सर्व समुद्रायण होत असतात असे आपल्या ऋषींनी म्हटले आहे.

आणि समुद्र कोठे सतत धीरगंभीर राहात असतो? समुद्र काही वेळा वादळांवर स्वार होतो, काही वेळा शांत होत असतो, पण शांत होऊन स्तब्ध बसत नाही. त्याची भरती ओहोटी अखंड चालूच राहते. जशी जिवंत माणसाच्या हृदयात धडधड, स्पंदन चालते तशीच समुद्राची भरती ओहोटी चालू असते.

आता सांगा तुमचा प्रश्न कोठे राहिला? संस्कृतात पाण्याला 'जीवन' म्हणतात. हे पाणी जितक्या रीतींनी वाहात असते तेवढ्या रीतींनी आपण जीवन जगावयास पाहिजे. मी लहान होतो तेव्हा निर्झर होतो, मोठा झालो तेव्हा नदीसारखा झालो. आज सागर होण्याचा प्रयत्न करीत आहे. हे तिन्ही अनुभव माझ्या ठिकाणी आहेत. प्रत्येकात आनंद आहे- प्रकार मात्र वेगळा. कैरी आंबट असते तेव्हाही आपण आवडीने तिचा स्वाद घेत असतो, आणि पिकून मधुर गोड झाल्यावर तेव्हा पण तिचा आस्वाद घेत असतो. बालपणातही संकटे आणि विपत्ती येतात तेव्हा बालकांनाही गंभीर व्हावे लागते, आणि वृद्धावस्थेतही काही लोक बालकांप्रमाणे निर्दोष आनंद अनुभवू शकतात. जीवनात शांती पण पाहिजे असते आणि वादळेही हवी असतात. एखादा प्रकार जर राहून गेला तर ते जीवन अपूर्ण राहते. जीवन सुकून जाणार नाही एवढेच पाहायला हवे. पण त्याचबरोबर असा विश्वास असावयास पाहिजे की, जीवन सुकेल तेव्हा वाफेच्या रूपाने हवेत असेलच आणि योग्य वेळी ढग आणि पाऊस बनून धोधो वर्षाव करणारच. जीवन सनातन आहे. त्याचा आनंद सुद्धा सनातन आहे. अलबत्, जो उपभोग घेईल त्याच्याचसाठी.

—अवार नवार १९१–१९२

२. जीवनकला

जीवनाच्या पूर्वदशेत प्रथम सद्‌गुण शिकवायला पाहिजेत, दृढ करायला पाहिजेत; सदाचाराची महत्ता आणि दुराचाराची हीनता हृदयावर शिलालेखाप्रमाणे कोरलेली असली पाहिजे. असे झाल्यावरच कलेची दीक्षा घेण्याची तयारी झाली असे समजावे. यौवन ज्याप्रमाणे चारही पुरुषार्थांचा उत्तम काळ असतो तसाच अनंत प्रमादांचे उगमस्थान होण्याचा हाच काळ असतो. यौवनापाशी सर्व काही असते, फक्त एक सुकाणू नसते हे सुकाणू जर धर्मसंस्कार व सदाचार यांच्यापासून मिळाले नाही तर कलेपासून ते मिळणारच नाही. व्यापकधर्म एकदा जीवनात प्रतिष्ठित झाला म्हणजे माणसात सर्व शक्ती येऊन गेली. धर्मवीर्याने मनुष्य हव्या त्या क्षेत्रात किंवा विषयात खोलवर उतरू शकतो आणि त्या त्या क्षेत्राचे यथार्थ रहस्य त्याला कळू शकते; समग्र जीवनात प्रत्येक वस्तूचे कोणकोणते स्थान, प्रयोजन व विनियोग आहे ते ते निर्मळ दृष्टीने निश्चित करू शकतो.

धर्माच्या म्हणजे सदाचाराच्या पायावर श्रद्धायुक्तपणे रचलेली कला रसगंभीर असते, प्राणपोषक असते, अनंतवीर्य आणि अमितविक्रम असते. कलेच्या वर रचलेल्या (घडविलेल्या) सदाचारामध्ये बऱ्याच वेळा वरवरचा पोकळ विवेकच असतो. जसा सडलेल्या फळावर पातळ रंगीत कागद बांधून त्याला पिकलेला म्हणून दिखाऊ रूप देण्याचा प्रयत्न केला जातो तसेच असंस्कारी व असंयत जीवनावर शहरीपणाचा (सुसंस्कृतपणाचा) मुलामा चढवून जीवन सदाचारी आहे असे दाखविले जाते. केवळ कलेने शिकविलेला सदाचार हा तर हलक्या धातूवर चढविलेला मुलामाच समजावा. धर्म जेव्हापासून अप्रतिष्ठित बनला तेव्हापासून सुधारणा तर फक्त एक प्रकारचे व्हीनियर–दिखाऊ बनली आहे. व्हीनियर म्हणजे हलक्या लाकडाच्या वस्तूवर शिसवी किंवा महागनी यांसारख्या मौल्यवान लाकडाचा चढविलेला पापुद्रा असतो.

मांसाहार सदाचाराच्या विरुद्ध आहे असे जर आपण मानत असलो तर या मताचा पाया आपणास धर्मामधून मिळावयास पाहिजे, कलेतून नव्हे. मांसाहारात क्रौर्य आहे, पाप आहे, हृदयधर्माचा द्रोह आहे, अशा भावनेने केलेला मांसाहाराचा त्याग स्थिर असतो, बलप्रद असतो. कित्येक कलावंत आणि कवी म्हणतात, 'आम्ही मांसाहार करीत नाही, कारण मांसाहार हा किळसवाणा आहे. मांसाहार आमच्या सौंदर्याच्या कल्पनेला आघात पोहोचवितो; म्हणून आम्ही निरामिषभोजी आहोत.' अशा लोकांच्या निरामिषभोजनात व्रताची दृढता नसते. काही दिवशी ते मांस खाऊन पण घेतात. एकट्या कलेचे समर्थन कलेची उपासना करू जाणे, जीवन परिवर्तनद्वारा करावयाचे पूजन ती करू शकणार नाही. अशा पूजनाची वृत्तीच धर्मातून येत असते.

स्वार्थ आणि अहंकार यांना नष्टं केल्याशिवाय आत्मार्पणाने होणारे पूजन संभवतच नाही.

जीवनाविषयींची कल्पना जोपर्यंत शुद्ध झालेली नसते तोपर्यंत कला काय वस्तू असते याची जाणीव होऊ शकत नाही. पशूंप्रमाणे माणसातही भोगवृत्ती वसत असते, स्वामित्वबुद्धी वसत असते, आळस वसत असतो, खाली घसरण्यात आनंद वाटण्याची अधःपतनाची वृत्ती असते. मनुष्य बुद्धिमान प्राणी आहे, म्हणजे या सर्व वृत्तींना सुव्यवस्थित रूप तो देऊ शकतो, शब्दजाल पशुजीवनालाही रसमय किंवा योग्य दाखवू शकतो. भोगप्रधान जीवन रसमय किंवा योग्य (यथार्थ) होऊ शकत नाही असा अनुभव तर उशीरा यावयाचा असतो, आणि एकाच्या अनुभवापासून मिळणाऱ्या शहाणपणाचा लाभ फुकट घेण्यास जोपर्यंत दुसरा नकार देतो तोपर्यंत भोगाच्या फिलॉसॉफीला व त्याच्यावर आधारलेल्या सौंदर्यशास्त्राला नवेनवे अनुयायी मिळतच राहणार.

—जीवननो आनंद, ४१७-१८

मी असे मानतो की मी सुचविलेल्या सर्व कला एकाच सार्वभौम जीवनकलेच्या वेगवेगळ्या बाजू किंवा अंगे आहेत, आणि जीवनकलेत तर पुरुषार्थ, समभाव, प्रेम, निष्ठा इत्यादी अनेक वृत्तींचाच प्राधान्याने समावेश असतो. जीवनकलेच्या अंगांचाच विचार करायचा असेल तर त्यांच्यात ज्ञाननिष्ठा, सत्यपरायणता, बुद्धीची प्रगल्भता सज्जनता, उदारता, समयसूचकता, प्रमाणबद्धता, रसज्ञता, औचित्य, सहानुभूती, सेवाभाव, त्यागवीरता, श्रद्धा, निश्चितता आणि ईश्वरभक्ती हे सर्व गुण येतात. जीवनकलेच्या दृष्टीने या प्रत्येक गुणाचा संबंध कोणता आहे, त्याचे महत्त्व किती आहे, या सर्वांचे वर्णन करू गेल्यास कलेचे सर्वमान्य क्षेत्र सोडून आदर्शाच्या गगनात विहार करावा लागेल. माझा तर असा विश्वास आहे की दैवी संपत्ती फुलण्यानेच कलेचा विकास व्हावयाचा आहे. कलेचे पूर्ण स्वरूप ओळखण्यासाठीसुद्धा एवढी पूर्वतयारी आवश्यक आहे...कलेच्या उपासनेत सांप्रदायिकता नसते. म्हणजे हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती, खोजा, मोमीन—सर्वच पंथांचे आणि सर्वच धर्मांचे लोक एकत्र येतील आणि एक होऊन दाखवितील.

समानमस्तु वो मनः
समाना हृदयानि वः।

—जीवननो आनंद : ५४३-५४४

३. जीवनयोग–१

योगाचा अर्थ आहे 'जीवनयोग.' दर्शनांचा विचार करत असता योगाला आम्ही 'उत्थानयोग' म्हणतो. केवळ मोक्षाचा किंवा ईश्वरप्राप्तीचा विचार समोर ठेवून आमच्या संस्कृतीने ज्ञानयोग, भक्तियोग आणि कर्मयोग असे तीन योग चालविले आहेत. ध्यानयोग आणि उपासना-योग यांनाही आमच्या संस्कृतीत स्थान आहे. पण प्राधान्य तर या तीन योगांनाच आहे. असे म्हणतात की ईश्वरप्राप्तीसाठी हे तीन वेगवेगळे मार्ग आहेत. मनुष्य आपला स्वभाव किंवा अभिरुची यानुसार एक मार्ग पसंत करीत असतो.

जीवन-योगाच्या दृष्टीने विचार करता कर्मयोग हाच खरा आणि संपूर्ण जीवन-योग आहे. ज्ञानयोग कर्मयोगाचा पाया आहे आणि भक्तियोग या कर्मयोगाचा सुगंध आहे. ज्ञान, कर्म आणि भक्ती ही तिन्ही मिळून एक योग बनतो. या तिघांत प्राधान्य कोणालाही मिळो, पण तिघांच्या समन्वयाशिवाय योग पूर्ण होऊ शकत नाही. ज्ञान आहे दर्शन आणि ध्यान आणि उपासना त्याचा योग आहे. उपासना–योग आणि भक्ति-योग यांच्यात फरक असण्याचे काही कारण नाही.

—समन्वय संस्कृतीकी ओर : २११

अद्वैत दर्शनानुसार आपण जगाला भलेही मिथ्या म्हणू, पण आपले व्यक्तिगत जीवन आणि सामाजिक जीवन जगाला सत्य मानूनच चालले आहे. जगाला आम्ही तुरुंग म्हणावे की स्फूर्ती ते आमच्या जीवनाचे क्षेत्र आहे. केवळ शरीराला आम्ही क्षेत्र मानत नाही. आपले शरीर, आपले कुटुंब, आपला समाज, जीवसृष्टी आणि पंचमहाभूतात्मक सर्व विश्वसुद्धा आपले जीवन–क्षेत्र आहे.

या जीवनक्षेत्रात आपणास जगायचे आहे, पुरुषार्थ करावयाचा आहे, आत्मपरिचय मिळवायचा आहे, जगाला साधन बनवून जीवन–साफल्याकडे प्रयाण करावयाचे आहे, आणि सर्वत्र ऐक्याचा, अद्वैताचा, अभेदाचा अनुभव घ्यावयाचा आहे. आपल्यासाठी जीवनाची कृतार्थता हेच अंतिम लक्ष्य आहे. मोक्ष–षड्रिपूंच्या बंधनापासून मुक्ती, विकृती आणि एकांगीपणा यांपासून मुक्ती, त्याचे एक साधन आहे.

जीवनाचे सार, रहस्य किंवा प्रयोजन अनुभूती ही आहे. आपण अनुभूतीसाठी जगत असतो. समग्र जीवन अनुभूतीचीच साधना आहे. म्हणून जीवन नेहमी गतिशील आणि गतिरूपच असते. जीवन–साधना अखंड चालत असते. साधकदशा असो की सिद्धदशा, जीवन तर प्रवृत्तिरूपच असू शकते. जिला आपण निवृत्ती म्हणतो ती सुद्धा साधनदशेत भिन्न गतीची प्रवृत्तीच असते.

यासाठी जीवनाला आपण उद्योग म्हणू शकतो. प्रवृत्ती किंवा उद्योगच जीवन-साधनेचा पहिला योग आहे. या योगाच्या द्वारा आपण आपल्या जीवनाला अनुभूति-समृद्ध करीत जात असतो, आणि अनुभूती जसजशी वाढत जाते तसा आपला प्रवृत्ति-योग विज्ञान-योगाचे रूप धारण करीत असतो. विज्ञानयोगाची साधना आरंभी बाह्य जगाकडे वाढत असते. आपली इंद्रिये आपापल्या विषयाच्या अनुभवासाठी बाहेर पळत असतात... इंद्रियांना चालना देणारे, इंद्रियांचा उपयोग करणारे, अनुभूतीचे मनन करणारे जे आंतरिक इंद्रिय-अंतःकरण आहे, त्याचे स्वरूप समजण्याचा आपण प्रयत्न करीत असतो. ही सर्व प्रवृत्ती जेव्हा अत्यंत खोलपर्यंत जाऊन पोहोचते तेव्हा त्यातून अध्यात्मयोग फुटून व्यक्त होतो.—

...समानशील, समानधर्मा व्यक्तींचा सहयोग प्राप्त करणे जीवन-साधनेसाठी आवश्यक असते, अपरिहार्य असते. 'समान-शील-व्यसनेषु-सख्यम्।' हे सख्य कधी कधी मैत्रीचे रूप घेते. कधी कधी उत्तराधिकारी बनविते. परंतु नेहमी तो सह-साधक तर असतोच.

सहयोगाने जीवन-साधनेचे क्षेत्र वाढत जाते, साधना-शक्ती वाढत असते. सहयोगा द्वारा अनुभूतीची परीक्षा होते आणि सर्व प्रकारच्या प्रयोगांचे सातत्यही चालू शकते. मानवजातीचे भाग्य यातच आहे की दिक् आणि काल या दोघांच्या मर्यादांवर विजय मिळविण्याची शक्ती त्याला सहयोगाद्वारा मिळत असते.

—समन्वय संस्कृतीकी ओर : २१२-२१३

कितीही व्यापक, दीर्घकालीन आणि जटिल प्रयोग चालवावे लागोत मनुष्य सहयोगाद्वारा सिद्धी प्राप्त करून घेऊ शकतो.

सहयोगावर विश्वास ठेवणाऱ्या आणि सहयोगापासून लाभ घेणाऱ्या जीवनयोग्याची श्रद्धा म्हणते—

'उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा।'

सहयोगाच्या मार्गावर पुढे जाता जाता अनुभूतीची समृद्धी तर वाढतेच, पण तिच्यात अनंत प्रकारची विविधताही येते. ही गोष्ट तर स्पष्ट आहे की जेथे विविधता आली, भिन्नता आली, तेथे संघर्षही आला. जितका सहयोग अधिक, तितके संघर्षाचे क्षेत्रही व्यापक व विशाल असते. मनुष्यजातीचा सर्व इतिहास सहयोग आणि संघर्ष यांचाच इतिहास आहे. या दोघांनी मिळून मानवजातीच्या अनुभूतीला समृद्ध केले आहे, त्याची शक्ती आणि पुरुषार्थ यांना सर्वसमर्थ व सर्वगामी बनविले आहे.

—समन्वय संस्कृतीकी ओर : २१२-२१४

संघर्षाच्या परिहारासाठी आणि वैयक्तिक जीवनाच्या पूर्ण विकासासाठी 'साम्ययोगाची' मदत घ्यावी लागते. साम्ययोगाशिवाय सहयोग वाढू शकत नाही, कृतार्थ होऊ शकत नाही. योग–मार्ग असो की प्रयोग–मार्ग, सहयोगासाठी साम्ययोगाची आवश्यकता असतेच, आणि संघर्षाच्या शेवटी प्रत्येक साधक व्यक्तीला आणि समाजाला समन्वयाचा रस्ता मिळतच असतो. संघर्षयुगानंतर जेव्हा समन्वय–युग येते तेव्हा माणसाची साधना एक नवे रूप घेत असते.

आज सर्व विश्वात संघर्ष इतका व्यापक आणि स्थायी बनला आहे की आता समन्वयाचा उदय झाल्याशिवाय राहणार नाही. समन्वयाची लक्षणे सर्वत्र दिसत आहेत. एका बाजूला संघर्ष इतका भयानक होत आहे की मनुष्याला प्रलयकालाचीच भीती दिसू लागली आहे...

संघर्षावर इलाज समन्वय आहे. जेव्हा जीवनयोगाची साधना करणाऱ्या साधक व्यक्ती आणि राष्ट्र अनासक्तियोगाचे अनुशीलन करतील तेव्हा हे होऊ शकेल. अनासक्तीशिवाय ना साम्ययोग सिद्ध होऊ शकतो, ना समन्वयापर्यंत मनुष्य पोहोचू शकतो. मनुष्याची प्रवृत्ती जितकी वाढते आणि जितकी जटिल होत जाते, तितकी अनासक्तीची आवश्यकता वाढत जाते. अनासक्ती ही केवळ मोक्षासाठी (निःश्रेयसासाठी) आवश्यक नाही. ऐहिक उन्नति–अभ्युदयासाठीही तिची तितकीच आवश्यकता आहे. अनासक्ती हा मानव–समाज–शास्त्राचा पाया आहे. गीतेने आदर्श मानवसमाजासाठी आवश्यक असणाऱ्या लक्षणांना दैवीसंपत् म्हटले आहे.

संयुक्तराष्ट्रसंघाच्या (यूनो) स्थापनेबरोबरच सर्व देशांनी मिळून जे मानवकल्याणाचे घोषणापत्र तयार केले त्यात साम्ययोगाची आणि समन्वय योगाची थोडीशी झलक आहे. त्याच्याऐवजी गीतेच्या दैवी–संपत्ला समाजशास्त्राच्या परिभाषेत ग्रथित करून तिचा स्वीकार केला गेला असता तर तिची अधिक मदत झाली असती. संयम आणि अनासक्ती याच्याशिवाय समन्वय होऊ शकत नाही, साम्ययोग टिकू शकत नाही आणि विश्वात्मैक्याची व अद्वैतयोगाची मंजिल गाठता येणे शक्य होणार नाही.

येथे ज्या अद्वैत–योगाचा उल्लेख केला गेला आहे त्याचे स्वरूप समजण्याची योग्यताही आज मानवसमाजात नाही. साम्ययोग, समन्वययोग आणि अनासक्तियोग यांची सतत आणि दीर्घकालीन साधना केल्यानंतरच अद्वैतसिद्धीचे थोडेसे तरी दर्शन होऊ शकेल.

येथे जी अष्टयोगमूलक विश्व–साधना दाखविण्यात आली आहे तिचा प्रयत्न व्यक्तिगत रूपानेच व्हावयास पाहिजे, आणि सामाजिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही व्हावयास पाहिजे. समय परिपक्व झालेला आहे. मानवजातीला तिचे दर्शन झाल्याशिवाय राहणार नाही. यासाठी आतापासून या योगाष्टकाचा क्रम समजून

द्यावयास पाहिजे. त्याचा साधक प्रकट होणारच आहे, याविषयी शंका किंवा संदिग्धता नाही.

— समन्वय संस्कृतीकी ओर : २१४–२१५

४. जीवनयोग–२

अमुक एक पदार्थ खाण्याने, कुपथ्य घडण्यामुळे, एकाएकी प्रकृती बिघडते असे कळत असूनही आजारी माणसाला एखादा अपायकारक पदार्थ खाण्याचा मोह आवरता येत नाही. याचे कारण काय ?

याचे कारण एवढेच असते की त्याच्या वासना व त्याचे ज्ञान या दोघांत मेळ, सुसंवाद नसतो. वेदान्ती सांगतात की ब्रह्म सत्य आहे व जगत् माया आहे; पण व्यवहारात पडलेल्या लोकांना जगच सत्य वाटते, आणि हव्या तेवढ्या तार्किक युक्तिवादांनी सिद्ध करा तरीही ब्रह्मच मायारूप वाटते, आणि म्हणूनच ब्रह्मज्ञान सोडून व्यवहारातून मिळालेल्या ज्ञानालाच अनुसरून ते वागत असतात. आजारी माणसाला आजची किंवा ह्याच क्षणाची वासनातृप्ती जेवढी प्रत्यक्ष (जिवंत) असते तेवढा उद्या प्रकृतीत होणारा बिघाड प्रत्यक्ष वाटत नाही. आपल्या संपूर्ण जीवनाशी त्याचे तादात्म्य झालेले नसते. प्रिय आणि हित या दोघांपैकी त्याला 'प्रिय'चीच प्रतीती होत असते. हितकर भागाची प्रतीती झाली न झाली सारखीच असते. याचेच नाव 'असंस्कारिता' होय.

एखादी गोष्ट बौद्धिक युक्तिवादांनी समजत असेल ते वेगळे, आणि आग्रहपूर्वक दृढ आचाराच्या जोरावर ते रक्तात (हाडांत) भिनले असले तर ते वेगळे. पाण्यात पोहण्याचे ज्ञान पूर्णपणे झाले असूनही मनुष्य पाण्यात पोहू शकत नाही, आणि पोहण्याची कला हस्तगत–शरीरगत–झाल्यानंतर बुडावयाचेच आहे, असे म्हणून पाण्यात पडल्यानंतरही माणसाला पाण्यात बुडून जाणे अवघड होऊन बसते. पोहण्याच्या बाबतीत 'पडिले वळण इंद्रियां सकळां' अशी स्थिती बनत असते. त्यालाच साक्षात्कार म्हणतात.

माणसाचे जीवन सामाजिक असते. समाजाशिवाय त्याला मनुष्यरूपाने जगणे आणि विकास साधणे जवळजवळ अशक्य बनत असते.

असे असूनही मनुष्य पदोपदी समाजद्रोह करीत असतो. जसा आजारी मनुष्य कुपथ्य आहार घेऊन आपला स्वतःचाच जीवनद्रोह करीत असतो तसाच समाज-

द्रोह करून माणूस स्वतःचाच जीवनद्रोह करीत असतो. सामाजिक जीवनाचा संपूर्ण विचार करून तसेच सामाजिक हित आणि व्यक्तिस्वातंत्र्य या दोघांचा मेळ बसवून जे जीवनशास्त्र घडविलेले असते त्यालाच 'धर्म' नाव दिलेले आहे. धर्म हा मनुष्याच्या सर्व शुभ शक्ती आणि वृत्ती यांच्यात मेळ साधून त्यांचा विकास करणारा असतो. धर्माच्या वातावरणात व्यक्ती आणि समाज या दोघांच्या हितसंबंधात विरोध टिकू शकत नाही. धार्मिक जीवनच माणसाचे सर्वांगपरिपूर्ण जीवन असते. असंस्कारी माणसाचे सर्व व्यवहार कामाने प्रेरित असतात. काम म्हणजे सर्व प्रकारच्या कामनांची तृप्ती करण्यासाठींचा आवेग. या कामरूपी हत्तीला अंकुशात, ताब्यात, ठेवणारा जो नियंता असतो, जे महाव्रत असते, तोच 'धर्म' या नावाने ओळखला जातो. सुखाच्या मागे धावणे, बायल्याप्रमाणे दुःखापासून दूर पळणे, चारित्र्याची हानी करून मरणापासून शरीराला वाचविणे, उद्याचे नुकसान करून आजची चैन करणे, स्वकीयांचे नुकसान करून स्वतःचा एकट्याचा स्वार्थ साधून घेणे, ही सर्व कामपरायणतेची लक्षणे आहेत, कामसेवनापासून माणसाला जे सुख मिळते त्यामुळे देहात्मभाव दृढ होत असतो आणि त्याची चैतन्यनिष्ठा नाश पावत असते. या आपत्तीपासून दूर राहता यावे यासाठी गीतेने धार्मिक जीवनाविषयी आग्रह धरलेला आहे, आणि 'धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ।' असा विवेक उपदेशिला आहे. काम एका बाजूला खेचत असता, त्याने सांगितलेले असते ते न करता जे योग्य असेल त्यालाच चिकटून राहणे हा एक प्रकारचा 'योग' आहे. काम हा एक शत्रू आहे. कामाचे मार्गदर्शन फेकून देऊन ते मार्गदर्शन धर्मावर सोपवावे यातच जीवनसिद्धी व जीवनविकास वसत असतो. हे कार्य करण्याची जी युक्ती अथवा कला तिचेच नाव 'योग' होय. या योगाच्या साहाय्याने सर्वत्र समान राहून सर्व प्रकारच्या कर्मात कौशल्य प्राप्त करणे आणि शेवटी सर्व विश्वाशी स्वतःचे तादात्म्य अनुभवणे हाच मानवाचा धर्म होय.

अयं हि परमो धर्मः यद्योगेनात्मदर्शनम्।

—गीताधर्मः १४१–१४३

५. जीवनाचे संगीत

आपण प्रथम हे समजायला पाहिजे की संगीत हे काही जीवनसर्वस्व नाही. त्याचबरोबर हे पण समजायला हवे की संगीताशिवायचे जीवन अनेक रीतींनी नीरस आणि

अपूर्ण असते. संगीत ही अत्यंत तीव्र, गतिमान वस्तू आहे. त्याचा अधिकात अधिक उपयोग असतो, आणि म्हणूनच त्याचा खूप दुरुपयोगही होऊ शकतो. संगीत ही काही ठराविक लोकांची मक्तेदारी नाही अथवा एखादा अस्पृश्य विषय पण नाही. संगीत हे मनुष्यजीवनाचे अत्यंत आवश्यक आणि सार्वजनीन अंग आहे. सकाळ–संध्याकाळ निसर्गाला मुखरित करणाऱ्या पक्ष्यांना संगीताची जेवढी आवश्यकता असते तेवढीच माणसालाही आवश्यकता असते. थकलेल्या माणसाला अन्नाची की झोपेची जितकी आवश्यकता असते तितकीच संगीताची गरज असते. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत काम करणाऱ्या मजुराला विचारा की तुझा एकमात्र विसावा कोणता आहे? सकाळी उठून जात्यावर दळणाऱ्या गृहिणी, गावाची घाण धुणारे धोबी व भंगी, जगाची लाज झाकणारे विणकर, नव्या घरांची बांधणी करणाऱ्या मजूर स्त्रिया, नांगर चालविणारे जगाचे अन्नदाते खेडूत, मालाची ने–आण करणारे बंजारी, गायी चारणारे गुराखी, समुद्रात संचार करणारे नावाडी, जगाला स्वतःपेक्षा श्रेष्ठ मानणारे साधू व फकीर, लोकांचे मनोरंजन करणारे कथेकरी आणि वादक, अरे, भिकारी आणि पशूसुद्धा संगीताच्या द्वारा स्वतःच्या भारभूत वाटणाऱ्या जीवनात रस घेऊ शकतात आणि जीवन रेटू शकतात, हलके व सह्य करू शकतात.

संगीताची असाधारण शक्ती पाहून त्याचा दुरुपयोग करणारे पण काही कमी झाले नाहीत. संगीत एक प्रकारची मानसिक मदिरा बनू शकते हे पाहूनच हिंसा-कुशल लोकांनी लढाईत संगीताला स्थान दिले आहे. (रणे) शंखाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः। जेव्हा एकदम वाजू लागतात तेव्हा मनुष्य मूळ स्वभावाला (प्रकृतीला) विसरून जातो, रणमत्त होतो, आणि वाटेल ते करावयास तयार होऊन जातो. लष्करी बँड हा तर फौजेचा अर्धा प्राण. सात्त्विक लोक याच संगीताला भक्तिभाव वाढविण्यासाठी साहाय्यक म्हणून वापरीत असतात. आणि कित्येक लोक तर टाळ, मृदंग वगैरे वाद्यांचा महान कोलाहल माजवून वृत्तींना बधिर करून टाकतात. आणि या उन्मादालाच आध्यात्मिक उन्नती समजून चालतात. पूजा करण्याच्या आधी अफू खाऊन पूजेत एकाग्रता साधण्याचा प्रयत्न जितका चुकीचा, प्रमादमूलक असतो तितकाच असा प्रयत्न चुकीचा आहे.

—जीवननो आनंदः ४४८

६. जीवनाचा अर्थ

जीवनाचा अर्थच आहे हृदयविकास, ज्ञानाचा विस्तार आणि कौशल्याची परिसीमा. जर या तिन्ही बाबतींत आपली उत्कृष्टता वाढली तर आपण पुढे जाऊ, नाहीतर आपला उद्योग निरर्थक ठरेल. जीवनात पार्थिव गोष्टींचा नफातोटा दैवाधीन असतो, आणि आपले वास्तव सुखदुःख–हा नफातोटा, त्याच्या आधीन नाही. आपण किती हृदयांत प्रवेश करू शकलो, आणि किती व्यक्तींशी आत्मैक्य किंवा अभेद प्रस्थापित करू शकलो हेच खरे पाहायचे. आणि हे सुद्धा कित्येक अंशी दैवाधीन असते. खरी पाहायची ती हृदयशुद्धी आणि हृदयसमृद्धी ही होय. शुद्धी आणि समृद्धी परस्परांस फक्त पूरकच नसतात तर परस्परांची कसोटी पण असतात.

—जीवन प्रदीपः १९

७. जीवनसाफल्य

जीवनाची सफलता कशात असते ? कसे जीवन जगण्याने आपण निष्प्राण होत नाही, हीन बनत नाही, विनाशाचे प्रवासी होत नाही हे आरंभी निश्चित करावयास पाहिजे, आणि नंतर अशा मंगल आणि तेजस्वी जीवनाला अनुकूल अशा शुभ कला फुलविल्या पाहिजेत. इंद्रियांचे आपापल्या विषयांकडील आकर्षण स्वाभाविक असते. या आकर्षणालाच जर कोणी कलावृत्ती समजत राहील तर त्याने अपघात केला आहे आणि कलेचा अपमान केला आहे असे समजावे. कलेचे कार्य इंद्रियगोचर असते, पण तिचा कलात्मक आनंद विषयातीत असला पाहिजे.

—जीवननो आनंदः २२६

८. जीवनार्चा सार्थकता

माणसाचे जीवन म्हणजे श्रेय आणि प्रेय यांच्यातील संग्राम. प्राकृत, सर्वसामान्य माणसाला जी वस्तू प्रिय वाटते, जी जी वस्तू आकर्षित करते आणि म्हणूनच त्याला

जी अत्यंत महत्त्वाची वाटते ती खरे पाहता जीवनाच्या दृष्टीने मोलाची नसते. आज युरोपात व अमेरिकेत कित्येक लोक असे पडले आहेत की जे विषयोपभोगाला आणि अहंकार तृप्तीला जीवनाची सार्थकता अथवा जीवनाचा आविष्कार (Expression of life) म्हणून समजतात. यापेक्षा श्रेष्ठ काही नसतेच असे ते प्रामाणिकपणे समजतात व म्हणत असतात. पण त्यांना दिसत नाही की जीवनाच्या कृतार्थतेच्या शेवटी त्यांना जी परमशांती मिळावयास पाहिजे, मुक्कामाला पोहोचल्याचे समाधान व्हायला पाहिजे, ते तर त्यांना मिळतच नाही.

आपल्याकडे जीवनाविषयींची कल्पना इंद्रियतृप्तीपेक्षा काही अधिक असते. इन्द्रियतृप्तीमार्फत अथवा इंद्रियनिग्रहद्वारा आत्म्याला ओळखणे, चैतन्याचा विकास करणे आणि शेवटी सर्व इन्द्रियांवर विजय मिळविणे हाच आपल्याकडील सर्व संप्रदायांचा उद्देश, ध्येय आहे. काही लोक इन्द्रियांबरोबर जुळवून घ्यावे असे सुचवितात. काही लोक इन्द्रियांवर विश्वास ठेवून स्वाभाविक परिस्थितीत इंद्रिये आपण स्वतः होऊनच आत्मविकासाकडे आपणास घेऊन जातील असे मानतात. काही लोक इंद्रियांशी कामचलाऊ, तात्पुरती जुळणी करून घ्यावी असे सुचवितात, तर काही आत्मवीर निश्चयपूर्वक म्हणतात की इंद्रियांबरोबर जुळणी होणारच नाही. इंद्रिये चिडून विकृती निर्माण करीत नाहीत एवढी एक सावधगिरी बाळगून इंद्रियांशी अखंड जीवनयुद्ध चालविणे हाच पुरुषार्थाचा मार्ग आहे. आत्मा आणि अनात्मा, जड आणि चेतन ही एकमेकांशी इतकी काही सदृश असतात आणि परस्पर-विरुद्ध असतात की एकाचा विकास हा दुसऱ्याचा घातच ठरतो. म्हणून कोणतीही दयामाया न दाखविता इंद्रियांना ताब्यात आणले तरच घडगत. एक जरी इंद्रिय सैल पडले तरी पखालीला छिद्र पडले तर त्यातून जसे पाणी निघून जाते तशी आत्मशक्ती निघून जावयाची.

जीवनाची सार्थकता आत्म्याचे खरे स्वरूप ओळखण्यात, जीवनाचा सर्व प्रकारांनी विकास साधण्यात आणि सर्वत्र आत्म्याचे सामर्थ्य स्थापण्यात सामावलेली असते. देहधर्माच्या नावाने, जीवनाच्या साक्षात्काराच्या नावाने, कलारसिकतेच्या नावाने अथवा आत्मदेवाच्या पूजनाच्या नावाने आपण जे इंद्रियोपभोग घेतो ते आपणास मोक्षाप्रत घेऊन जाणारे नसतात, तर उलट खाली खेचणारे असतात. यासाठी कोणत्याही कारणास्तव, कोणत्याही मिषाने इंद्रियांच्या मोहात आपण सापडता कामा नये हीच सावधानता असते; उद्धाराचा हा एकच मार्ग असतो.

—जीवनव्यवस्था : ३१४–३१५

९. उत्कटता हेच जीवन

काही लोक शंभर वर्षे जगतात, काही चाळीस वर्षांतच आपली जीवनयात्रा पूर्ण करतात, आणि काही तर 'जगतो आहोत' एवढे सांगण्यासाठीच या जगात येतात, सर्वांना काही सारखेच जगता येत नाही. जगणाऱ्यांतही चोवीस तासांमध्ये सारखेच जगतात असे नसते. चोवीस तासांत काही कमी जगतात, कोणी व्यवस्थित जगतात, आणि काही लोक तर चोवीस तास पुरेपूर जगून दाखवितात. चोवीस तास घालविले, कसेतरी संपविले, पुरे केले एवढ्यावरून काही माणूस चोवीस तास जगला असे म्हणता येणार नाही. जीवन कालगणनेवर अवलंबून राहात नाही. पण जीवन जगणे हे एकाग्रतेवर, व्यापकतेवर आणि उत्कटतेवर अवलंबून असते.

शिथिलता हा जीवनाला होणारा रोग असतो. या रोगाने आपण क्षणाक्षणाला अप्रतिहतपणे मरत असतो. जेवढे ध्यान, जागरूकता कमी तेवढे आपले जीवन मंद होत असते.

आपल्या सभोवती केवढे मोठे जग पसरलेले असते. आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय अनेक घटनांचा प्रवाह सतत वाहत असतो. किंवा असंख्य घटनांचे धागे निरनिराळ्या रीतींनी विणले जाऊन अद्‌भुत आकार तयार होत असतात, नक्षीकाम होत असते. त्यात आपले लक्ष जितके अधिक असेल तितके आपण अधिक जगू. उसात रस भरलेला असतो, जेवढा रस आपण अधिक किंवा कमी चोखून घेऊ तेवढा आपला.

महान् पुरुषांना ओळखावे, आपल्या शक्तीनुसार त्यांच्या सत्कार्याचे अनुकरण करावे, नैतिक सामर्थ्यात त्यांच्यासारखे होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगावी याचे नाव जीवन होय. अशा लोकांनाच महान पुरुषांचे समकालीन म्हणता येईल. जेवढ्या प्रमाणात आपण सावध राहिलो, जागृत राहिलो तेवढ्या प्रमाणात आपण जगलो. जेवढ्या प्रमाणात गाफील राहिलो, चुकत राहिलो तेवढ्या प्रमाणात आपण मरण्याच्या स्थितीत राहिलो असे म्हणावे लागेल. म्हणूनच बुद्धाने म्हटले आहे—

अप्पमादो अमतपदं, पमादो मच्चुनो पदम्।

—जीवननं काव्य : ४५८–४५९

१०. जीवनाचा पंथ

जीवन ही सत्याची प्रयोगभूमी आहे, सत्याचे अन्न आहे. ज्या प्रमाणात आपण जीवनाला पिळून काढू त्या प्रमाणात सत्याची प्राप्ती व्हावयाची असते. जेव्हा दोघांच्या मध्ये विरोध येत असतो तेव्हा प्रथम चर्चेनेच विरोध नाहीसा करण्याचा प्रयत्न होत असतो. काही काही वेळा जे चर्चेने साध्य होत नाही ते समायोजन, जुळणी करून जमून जाते. काही काही वेळा असे सुद्धा होते की विरोध तात्काळ जरी शमला नाही तरी कालांतराने तो नष्ट होतो. ईश्वराच्या योजनेत शेवटी असेही घडते की विरोधाच्या दोन्ही तत्त्वांचा—दोन्ही बाजूंचा नाश करून पण भगवान विरोध संपुष्टात आणतो.

व्यवहारात अनेक प्रकारची उदाहरणे पाहावयास मिळतात, पण विरोध नष्ट करण्याचा सर्वांत श्रेष्ठ मार्ग बलिदानाचाच आहे. विरोधकांना मारून त्यांचा बळी घेणे, आणि त्याचा नाश करून विरोध संपविणे आणि स्वतः पुष्ट होणे हा अपवित्र मार्ग आहे. त्यात तात्पुरता फायदा दिसतो खरा, पण शेवटी सत्यानाश असतो...

दुसरा रस्ता सत्याच्या बेदीवर आपल्या जीवनाचे बलिदान करून विरोधाचे मूळच उखडून काढण्याचा आहे. दोन राष्ट्रांमध्ये जेव्हा लढाई होत राहून ती थकतात तेव्हा त्या लढाईचा निकाल लागतो. धर्मविहीन समाजाचा हा मार्ग आहे. सर्व शुभंकर धर्म म्हणतो—ज्याला सत्याची प्रतीती झाली आहे त्याने स्वतःच आपल्या जीवनाची किंमत मोजून सत्याची स्थापना करायला पाहिजे.

शारीरिक (भौतिक) शक्ती आणि बुद्धिशक्ती वापरून समोरील पक्षाला चीत करण्याचा काळ होता. त्यांचा विस्तार आज पण आपणास दिसत आहे. चर्चा आणि वाटाघाटीद्वारा कार्य साधण्याचा काळ आणण्याचे प्रयास कितपत यशस्वी होतात ते अजमावणे सध्या चालू आहे. या दोन मार्गांची कुवत किती आहे ते अजून कळले नाही. सर्वत्र या मार्गांविषयी अश्रद्धा आहे. तिसरा आणि शेवटचा मार्ग आहे आत्मबलिदानाचा. त्याचा काळ आता यावयाचा आहे. त्याचे आता फक्त मंगलाचरण झाले आहे.

आता बलिदानाचे पर्व सुरू झाले आहे. मानवजातीची पापे खूप आहेत, दृढमूल आहेत. माणुसकीचे देणे फार वाढवून ठेवले आहे. ते सर्व चुकविण्याची वेळ आली आहे. आता जगभर सर्वत्र बलिदानाचे गुलमोहोर फुलू लागले तर त्यात आश्चर्य नाही. एका प्राचीन, संस्कारी आणि सुप्तसामर्थ्यशाली राष्ट्राच्या राष्ट्रपुरुषाने त्याचे मंगलाचरण नुकतेच गायिले आहे. आता त्याला 'एकमेकाद्वितीयम्' ठेवण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे, कारण की ते जीवनप्रवाच्या विरुद्ध आहे. जीवन आता बलि-

दानाचा उत्सव सुरू करील, आणि या मार्गाने सत्यनारायणाचा साक्षात्कार घडवील.
—जीवनचिंतन : ११८–११९

११. जीवननिष्ठ व्यवस्थेचे स्वरूप

ज्याला जीवन जगावयाचे असते त्याने स्वतःच्या आणि आपल्या आसपासच्या जीवनाचा आणि उन्नतीचा विचार करायलाच पाहिजे. आपल्या भक्तीचा मुख्य विषयच जीवन आहे पुरुषार्थासाठींची आपली पुंजी पण आपले जीवनच आहे. जिला आपण सेवा म्हणतो ती पण स्वतःच्या जीवनाद्वारा आपल्या लोकांचे जीवन सुखी व समृद्ध करण्याचे प्रयत्न असतात. जीवनशुद्धी, जीवनवृद्धी, जीवनसमृद्धी, जीवनविकास आणि जीवनाची कृतार्थता हेच आपल्या चिंतनाचे आणि पुरुषार्थाचे विषय असतात. आपल्या युगाच्या महान कवींनी जे जे गायिले ती सर्व जीवनदेवतेची स्वतः केलेली उपासनाच आहे.

प्राचीन संस्कृतीची भक्ती करणाऱ्या भारताच्या जीवनावरचा कलंक काढून टाकून पुनः त्याला जिवंत करण्याच्या प्रयत्नांत जे लिखाण केले त्याच्यासाठीही त्यांनी 'नवजीवन' असे व्यापक नावच धारण केले. तेही उन्नत जीवनाचेच उपासक होते. धर्म, राजकारण, अर्थव्यवस्था, आरोग्य, साहित्य, संगीत, कला ही सर्वच जीवनाच्या संस्कारासाठी आहेत. जेव्हा आपण जीवन पूर्ण करून भगवंतासमोर उभे राहू तेव्हा पण आपणास उत्तर द्यावे लागेल, 'स्वतःच्या जीवनाचे काय केलें?' ते याच विषयी.

अशा जीवनपरायण वातावरणात राहून वेळोवेळी लिहिलेले माझे लेख प्रकाशित करण्याचे 'नवजीवन' संस्थेने नक्की केले तेव्हा ही एक जीवनमाला आहे म्हणून प्रत्येक संग्रहाच्या नावाचा जीवनाशी काहीतरी संबंध असावा असे मला सुचविण्यात आले. मला ती सूचना आवडली आणि म्हणूनच 'जीवन विकास,' 'जीवन-भारती,' 'जीवननो आनंद,' 'जीवनचिंतन,' 'जीवनप्रदीप' वगैरे नावे मी स्वीकारली. अशा नावात तोचतोचपणा असण्याचा दोष येतो हे कळत असूनही मी मूळ संकल्पाला चिकटून राहिलो.

—जीवन व्यवस्था : ३

१२. नवे जीवनदर्शन

प्रत्येक दर्शन (तत्त्वज्ञान संप्रदाय) स्वयंभू सम्राटासारखे असते. ते स्वतःच्या शक्तीने स्वतः सर्व काही करू शकते. आपल्याला दुसऱ्या कोणाच्या मदतीची गरज नाही, आपण स्वतः असहाय नाही, मदत घेतलीच तर ती औदार्य दाखविण्यासाठी आणि उत्तेजन देण्यासाठीच असते, अशी वृत्ती प्रत्येक दर्शनाची असते. असे असल्याशिवाय त्यात दर्शनत्व कसे येऊ शकणार? यहुदी लोकांच्या परमेश्वरासारखे प्रत्येक दर्शन द्वितीयाक्षम म्हणजे सर्व भक्षक, सर्वांना गिळंगृत करू पाहणारा ईश्वर असतो.

काही लोक प्रत्येकामधून थोडे थोडे चांगले तत्त्व गोळा करून चांगलेपणाचा संपूर्ण मसाला तयार करू पाहतात. पण दर्शनाचा (System) स्वभावच असा असतो की एक दुसऱ्यात मिसळत नाही. तेल व पाणी जसे एकमेकांत मिसळत नाहीत, तशी दोन दर्शने एकत्र मिसळून चालत नाही. अशी भीती राहते की त्यांची खिचडी करण्याने ते स्वतः तर खराब होईलच पण जीवनही बिघडवून टाकील. तरीही मानवस्मृतीच्या आरंभापासून मनुष्य जात तर प्रत्येकातून थोडे थोडे गोळा करूनच आपले जीवन निभावीत, टिकवीत आली आहे. अश्रद्धाळू मानवजात आपली जबाबदारी एकाच हातात सोपविणार नाही. सर्व दर्शनांची समिती नेमून ती आपला कारभार तिच्या हातात सोपवीत असते.

मानवजातीची यामुळे सोय भले पुष्कळ झाली असेल, सुरक्षितता पण जाणवली असेल, पण हा क्रम उन्नतीसाठी योग्य नाही. एकेकाच्या हाती आपले जीवन सोपवून मानवजातीने कितीतरी प्रयोग केले, पण त्यात तिला नेहमीच पश्चात्ताप करावा लागला आहे. पण यात दोष दर्शनांचा नाही, दोष हा मानवजातीच्या अधीरपणाचा आहे. प्रत्येक दर्शनाने जीवनाची व्यवस्था व कारभार आपल्या हाती घेण्यापूर्वी जो संमतिकरार केला किंवा प्रतिज्ञा केली तिच्यात त्याने अशी एक अवघड अट घातली की आमचा प्रयोग एकाग्रतेने खूपच दीर्घकाळ करू दिला पाहिजे. ही धीर धरण्याची अट मानवजात पाळू शकली नाही. म्हणून एकाच दर्शनाची पूर्ण कसोटी झाल्याचे समाधान ना दर्शनाला मिळाले, ना मानवजातीला. मानवजातीला जवळचा, त्वरित मिळणारा फायदा पाहिजे असतो, आणि शेवटी सुंदर फळ पण हवे असते. आरंभी मध्यंतरी आणि शेवटी फायदेशीर, सुखकारक आणि सोपे असेल असे काही मानवजातीला हवे असते. अशी इच्छा कितीही स्वाभाविक असली तरी जीवनधर्माच्या विरुद्ध आहे. धीर म्हणतो की जसा मध्यरात्रीशिवाय सूर्योदय नसतो तसे निराशेमधून गेल्याशिवाय आशेचे सुवर्णकिरण श्रद्धा सुद्धा बनवू शकत नाही.

दर्शनांच्या या महान स्वयंवरात मानवजातीच्या हातून वरमाळ मिळविण्यासाठी एक दर्शनराज उपस्थित झालेला आहे. त्याचे नाव आहे विनय म्हणजे शिक्षण. शिक्षण ही एक अद्‌भुत जडीबुट्टी आहे, अलौकिक रसायन आहे, अमृतसंजीवनी आहे, कामधेनू आहे, कल्पकता आहे. जे कल्पाल ते सर्व तर शिक्षण आहेच आणि त्यापेक्षाही अधिक आहे. सत्ययुग आणण्याची शक्ती तर त्याच्यात आहेच–अशा तऱ्हेचा दावा शिक्षणाचे तत्त्वज्ञानी करीत असतात. या दर्शनाचे स्वरूप, त्याची मागणी, त्याचे कलावंत, त्याच्या अटी आणि त्याची फलश्रुती आपण लक्षपूर्वक ऐकायला पाहिजे. हा शेवटचा राजपुत्रच या स्वयंवरात यशस्वी होईल असा संभव आहे. आतापर्यंत कोणाला यश प्राप्त झाले नाही म्हणजे शिक्षणही यशस्वी होऊ शकणार नाही असे अनुमान काढण्यात अजाणतेपणाने अधीरता होण्याचा संभव आहे. प्रत्येकाचे जर आपण ऐकत आलो असलो तर शिक्षणाचेही का नये ऐकू?

—जीवनव्यवस्था : १२६–१२७

१३. जीवनात सौंदर्याचे स्थान

सौंदर्य स्वतः सुंदर वस्तू आहे पण त्याविषयींचे विवेचन किंवा मीमांसा सुंदरच असेल असे नाही. काव्य, संगीत किंवा विनोदात असलेला आनंद आपण अनुभवत असतो, पण या सुंदर कलांची मीमांसा करायला जातो तेव्हा हे कार्य आनंदरहित आणि असुंदर पण होऊन बसते. सौंदर्याच्या आनंदाचा अनुभव सौंदर्यमीमांसेपासून निर्माण होऊ शकणार नाही.

सूर्याकडे दृष्टी लावून चालताना प्रकाश मिळत असतो आणि छाया पण आपल्या मागे आपोआप चालत राहते, पण त्याच्या उलट बाजूने पाहून आपण जर छायेमागे चालू लागलो तर आपणास प्रकाश तर मिळत नाही आणि छाया तर कधीच हाती सापडत नाही, ती तर पुढे पुढेच धावत राहते; तसेच सौंदर्याच्या मागे लागल्यास व त्याचा पाठपुरावा केल्यास ते प्राप्त होत नसते. सौंदर्याविषयी बेफिकिर राहिल्यास आनंद व सौंदर्य दोन्ही सहज प्राप्त होतात. बालकांच्या जीवनात व्यक्त होत राहणारे सौंदर्य त्याचे त्याला भान होऊ लागल्यावर व ते त्याची काळजी घेऊ लागल्यावर नष्ट होण्यास सुरुवात होते. सौंदर्याची जाणीव आली म्हणजे त्यात विकृती निर्माण व्हायचीच. जोपर्यंत सौंदर्याचे भान होत नाही तोपर्यंतच जीवनात सौंदर्याला स्थान राहात असते. एखी सुंदरता अशी गोष्ट असते की त्याच्यासंबंधी तटस्थता किंवा

उदासीनता बाळगण्याने ते सहज प्राप्त होत असते, पण त्याच्यासाठी प्रयत्न करू गेल्यास ते लाजून दूर जाऊ लागते. ज्यात सौंदर्य वसत असते त्याचीच उपासना करण्याने सौंदर्य आपोआप येत असते.

असे असतानाही माणूस कोणत्या ना कोणत्या रीतीने स्वतःची सुंदरता वाढविण्याचा प्रयत्न करीतच राहतो. बाजारात सौंदर्याची, म्हणजे दिखाऊपणाची किंमत असते, म्हणजे माणूस कृत्रिम सुंदरता शिकण्याचा प्रयत्न करीत असतो. राजेमहाराजे अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यापूर्वी त्यांच्या छायाचित्रावरून, ते लोकांवर आपली छाप पाडू शकतील असे दिसतात की नाही त्याची खात्री करून पाहतात. व्यापारातही दिखाऊपणा, प्रभाव पाडू शकतील अशा रंगढंगाचा विक्रेता यशस्वी होणारच असे मानले जाते. असे सौंदर्य वाढविण्याचा प्रयत्न चांगला की वाईट मानायचा ही गोष्ट वेगळी. परंतु प्रत्येकाच्या जीवनात त्याला स्थान असतेच. पण बालकांच्या बेफिकीरपूर्ण सौंदर्यात त्याची जी कल्पना असते तिच्यापासून ही कल्पना पूर्णतः वेगळी आहे. ज्यांना जीवन समृद्ध करावयाचे असते, जीवन सुंदर रीतीने व्यक्त करण्याची इच्छा असते, त्यांच्यासमोर सौंदर्य येतच असते, आणि त्यांच्या जीवनात त्याचे स्थानही असामान्य असते.

बालकाच्या जीवनात सहज शोभणाऱ्या गोष्टीचे प्रौढावस्थेत अनुकरण करण्याने ती असुंदरच दिसणार, कारण वय वाढल्यावर सौंदर्याच्या कल्पनाही बदलत जातात. सौंदर्यात जास्तीत जास्त महत्त्वाचे स्थान असते ते औचित्याचे. वेळोवेळी व प्रसंगानुरूप सुंदरतेची कल्पना बदलत राहते.

जबाबदारी, कर्तव्य आणि जाणीव, तसेच प्रेम, करुणा, न्याय, सुवृत्ती जसजशा जाग्या होऊ लागतात तसतशी सौंदर्याविषयींची कल्पना उन्नत होत जाते, आणि शेवटी अशी प्रतीती येते की जे सुंदर रीतीने कसे जगावे हे समजतात तेच सौंदर्यमय असतात. प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी सौंदर्याची भूक तर असतेच, प्रत्येकाच्या जीवनात त्याला स्थान असतेच; मात्र जीवन कर्तव्यशील बनण्याने त्याची कल्पना विकसित होते आणि माणूस त्याची अधिक उन्नत रूपे पाहू शकतो. अशा रीतीने जबाबदारीतच सौंदर्य प्रतिष्ठित असते.

सौंदर्याची कल्पना जशी जबाबदारीमुळे बदलत असते, तशीच प्रेमामुळेही बदलत असते, आणि अशा रीतीने ती प्रेमाशी अधिक संलग्न असते. टॉल्स्टॉयची प्रख्यात नायिका ॲना कॅरेनिना हिला ७० वर्षांपर्यंत दंपतीजीवन जगल्यानंतर आपल्या पतीवरील प्रेम ओसरू लागते तेव्हा त्याच्यात दिसणारे सौंदर्यही कमी दिसायला लागते. याप्रमाणे सौंदर्याची कल्पना जेव्हढी प्रेमाच्या मागे जाते तेव्हा ती आंधळी बनत असते, कारण प्रेम आंधळे असते आणि प्रेमाचे लक्ष्य बदलते तेव्हा सौंदर्याची कल्पनाही बदलत असते.

म्हणून काही लोक म्हणतात की सौंदर्याची सर्वांना मान्य होण्यासारखी (सवग्राह्य) व्याख्या करणे अशक्य आहे. पण ही तर आत्मनेपदी (Subjeetive) सौंदर्याची गोष्ट झाली. परस्मैपदी (Objeetive) सौंदर्य पण असते. स्वरूपतः निष्पक्षपाती, तटस्थ, समभावी निसर्गाची सौंदर्य सर्वांनाच आवडत असतात. वृक्ष, फुले, नद्या, लहान मोठी जनावरे सर्वांत काही ना काही सौंदर्य तर वास करीतच असते. सामान्यतः असे म्हणता येईल की निसर्गाच्या स्वतःच्या सर्जनात तर ती सुंदरता काठोकाठ, ओतप्रोत भरलेलीच असते; पण जेव्हा माणसाचे पाऊल तेथे पडते तेव्हा त्यात विकृतीचाही प्रवेश होत असतो. माणसाच्या मनातील पापाची छाया वस्तूच्या किंवा प्रसंगाच्या सुंदरतेला झाकोळून टाकते व तेथून सुंदर–असुंदर अशा भेदाला प्रारंभ होतो, व सौंदर्यात अपूर्णता येत असते. पक्षपात, स्वार्थ किंवा गरज ही जर नसतील तर प्रत्येक वस्तूत सौंदर्य प्रतीत होईल व त्याचा आनंद लुटता येईल. ज्याच्या मनात पाप असते तोच असुंदर परिस्थिती व प्रसंग निर्माण करतो किंवा पाहू शकतो. विकृत मनासमोर सुंदर असुंदराचा भेद पडतो, आणि जेथे नीतीचा अभाव असतो तेथे सौंदर्याचे नावनिशाणही राहात नाही. खरे पाहता ज्यात माणूस आणि वस्तू यांचा स्पर्श, स्पष्ट संयोग होत असतो तेथेच सुख व दुःख उभे राहात असते. पण सौंदर्य सुखदुःखाहून भिन्न व अतीत अशी वस्तू असते आणि ती आनंददत्तधन असते.

—जीवननो आनंद : ४१४.

१४. जीवन आणि नीती

कला आणि नीती म्हणजे सदाचार यांना एकमेकांशी काय करायचे आहे असे विचारणारे आता पुष्कळ लोक तयार झाले आहेत. "कला ही काही नीतीची दासी नाही, नीतीचे नियम नीतीच्या घरी भलेही चालोत; आमची कला तर नीतिनिरपेक्ष आहे" असे कित्येक जण अभिमानाने सांगतात. इतर कित्येक कलेचे उपासक याही पुढे जाऊन म्हणतात की, "नीतीने जेथे तेथे विधिनिषेधाच्या पाट्या लावून जीवनाचे उद्यान कुरूप करून टाकले आहे; आपल्या आग्रहाने नीतीने जीवन तर सुधारले तर नाहीच, पण निर्दोष सुख व बाजवी आनंद यांचीही जेथे तेथे कत्तल केली आहे. जीवनाची स्वाभाविकता नष्ट करून विकृतीचे साम्राज्य पसरविले आहे, नीतीसारखी आनंदविनाशिनी दुसरी शक्ती किंवा प्रवृत्ती क्वचितच असेल. नीतीने जे बिघडविले

ते सुधारण्याचे काम कलेचे आहे. कलेच्या हाती जीवन सुरक्षित राहील, सुखमय होईल आणि सोपे तर बनेलच. कला नीतिनिरपेक्ष आहे, एवढेच नव्हे तर नीतीऐवजी जीवनाचे सुकाणू हातात घेण्याची कलेची लायकी आहे. कलेलाच जीवनधर्म बनवून टाका. नीतिधर्माचे प्रयोग आतापर्यंत आपण पुष्कळ केले आहेत."

प्रत्येक नव्या व उत्साही प्रयोगशील माणसाच्या बाबतीत एक गोष्ट नेहमी अशी होत असते की जुन्या प्रथेचे दोष हे लोक चटचट मोजू शकतात; नव्याचा प्रयोगच जेथे सुरू झालेला नाही तेथे त्याचे दोष कोण दाखवू शकेल? जुन्याचे दोष जो एवढ्या बारकाईने दाखवितो त्याची दृष्टी व्यापक असलीच पाहिजे, त्याचे सामर्थ्य अमोघच असेल असा पूर्वग्रह सहज तयार होतो. वर वर्णन केलेल्या कलावाद्यांनी या स्थितीचा पुरेपूर फायदा घेतला आहे; आणि धर्म, नीती, सामाजिक रूढी, लोक संकेत, कायदा कानून, राज्य घटना, सर्व सोडून 'मामेकं शरणं व्रज' या प्रकारची हाकाटी सुरू केली आहे. कलेसारखी रमणीय प्रेरक शक्ती जर जीवन स्वामिनी झाली आणि तिच्यापासून जर फक्त मंगलच होत असेल तर त्यापेक्षा चांगले ते काय?

—जीवननो आनंद : ४९६–९७

कलेची तरफदारी करतेवेळी कलेचा जो व्यापक अर्थ करण्यात येतो त्याला जर हे लोक चिकटून राहिले तर कोणतीच हरकत नाही; कारण की कला म्हणजे जीवन-कला, सर्व धर्मांचा समन्वय, आदर्श जीवनाचा सहज सुवासः त्याच्यासमोर काय सांगणार? पण कलेचे सार्वभौमत्व आणि मांगल्य सिद्ध केल्यानंतर कलेचे व्हाइसरॉय म्हणून ज्या व्यक्ती समाजधुरीण होण्यासाठी उभ्या राहतात त्यांच्याकडे पाहूनच कलेचे नेतृत्व स्वीकारावयाचे की नाही हे ठरवावे लागते. तात्त्विक दृष्टीने विचार करता धर्म, नीती, कायदा, शिक्षण, घटना या सर्व गोष्टी आदर्शरूपात निर्दोष आहेत, सर्व समर्थ आहेत, पण प्रत्यक्ष व्यवहारात काही काही वेळा शिक्षणकर्तेच अशिक्षित असतात, धर्माचार्यच अधर्म आणि अनाचार यांच्या मूर्ती असतात. राज्यकर्त्येला मार्गदर्शन करणाऱ्या एका विदुषीविषयी लिहिलेले आहे– "She taught virtue by precept and vice by examlple." हे धारदार वचन स्वतःला लागू पडते की नाही असा प्रश्न धर्माचार्य शिक्षणकर्ते, कायदेपंडित, न्यायाधीश, वृत्तविवेचक आणि प्रजासेवक हे जर स्वतःच्या हृदयाला विचारतील तर कित्येकांची मने अस्वस्थ झाल्याशिवाय राहणार नाहीत. कलेचे उपासक इतर जीवन व्यवस्थापकांवर टीका करता करता स्वतःच खड्ड्यात पडलेले पाहावयास मिळतात. वर सांगितल्याप्रमाणे कलेची साधना अवघड असते. धर्म, सदाचार आणि लोकरुची या सर्वांना तिलांजली देऊन केवळ कलेचेच तंत्र स्वीकारणाऱ्या लोकांचा जेव्हा अधःपात होतो तेव्हा तो सर्वांत भयंकर असतो. अप्रतिम गाणारे, नवनव्या रागांची निर्मिती करणारे, चित्रां-

द्वारा रोज गंधर्वनगरी उभी करणारे, कवितांच्या द्वारा माणसांना अलौकिक अनुभव घडवणारे आणि हृदयाला हलवून सोडणाऱ्या प्रवचनांद्वारा जीवन-जागृती करणारे कित्येक कलाकार यांची जीवने शंकास्पद असतात, एवढेच नाही तर असंस्कृत लोकांनाही तिरस्कार वाटेल अशी असतात. आणि हे सर्व पाहून आश्चर्यमूढ होऊन मग माणूस विचारतो, " ईश्वराने इतकी दिव्य शक्ती अशा सडलेल्या हृदयाला कशी दिली असेल ? "

—जीवननो आनंद : ४९७-९८

पण यात आश्चर्य कसले ? पावसाळ्याच्या शेवटी आपणास अशी चिखलाने भरलेली डबकी पाहावयास मिळत नाहीत का की ज्यांच्यात घाण चिखल कुजत असतो, ज्यांतील पाणी स्वच्छ नसते, विषारी वनस्पती, जीवजीवाणू, किडे, अळ्या वळवळत असतात, ज्यातून विषारी वायू निर्माण होतात. त्यांची खोली एक वीत पण नसते पण ज्यावर अनेक माशा, कीटके घोंघावत असतात, आतून जरी घाणेरडे असले तरे त्याचा पृष्ठभाग मात्र शांत व चमकत असतो, आणि ती डबकी वरचे अनंत आकाश, त्यात भटकणारे लाल पिवळे मेघ व त्यांच्यातून डोकावणाऱ्या अनंत तारका या सर्वांना सुंदर रीतीने प्रतिबिंबित करीत असतात ! एक वीत खोल असणाऱ्या डबक्यात जर अनंत आकाश प्रतिबिंबित होऊ शकते तर ज्याचा जीवन-हेतू असंस्कृत माणसाइतकाही स्वच्छ किंवा खोल नसतो असा कलावंत जीवनाची असंख्य गूढ रहस्ये आपल्या अलौकिक कल्पनांद्वारा व्यक्त करील तर आश्चर्य ते काय ? अशांना अशी शक्ती कोठून मिळते आणि एवढे दिव्यदर्शन त्यांच्या जीवनात परिवर्तन घडवायला का समर्थ होत नाही हे एक ईश्वराच्या सृष्टीत मोठे गूढ आहे. किती तरी बिघडलेली, कुजलेली, माणसेही अद्‌भुत कलाकृती निर्माण करू शकतात हेसुद्धा खरे आहे. तरीही उच्च कला आणि आर्य सदाचार या दोघांत मेळ असावयास पाहिजे अशी श्रद्धा आपण सोडू शकत नाही. ती दोन परस्परांना अनेक रीतींनी पोषक होऊ शकतात याविषयी तर शंकाच नाही.

कलांद्वारा जीवनाची कोमल, ललित, उदात्त, अद्‌भुत, भव्य आणि चमत्कृतिजनक प्रसंग ओळखण्याची शक्ती आपण विकसित करीत असतो. यातून सदाचार तयार होईलच अशी खात्री देता येणार नाही. तरीही सदाचार म्हणजे जर जीवनाची भव्यता, आर्यता, उदात्तता आणि कृतार्थता निर्माण करणे असेल तर कलेची संस्कारिता आणि समभाविता या बाबतीत खूप मदत करील याविषयी शंका नाही. तरीही एक गोष्ट समजल्याशिवाय सुटका नाही. दुराचार, पाप, नीचता, दुष्टता या सर्वांसाठी औषध, उपचार असू शकेल असे आहे; पण अरसिकतेवर व भावनाशून्यतेवर व बथ्थडपणावर औषध नसते. कित्येक कलाकार उदात्त, कोमल, प्रसन्नगंभीर आणि

भीषणसुंदर अशा कलेची अनेक व्यक्त रूपे वारंवार पाहून पाहून इतके बथ्थड, रसिकताशून्य व भावनाशून्य बनलेले असतात, त्यांची संवेदनशीलता इतकी गोठून बधिर होऊन गेलेली असते की ते जणू मंदिरातील पुजारी व तीर्थस्थानावरचे पंडेच असतात! त्यांच्यावर कशाचाच परिणाम होत नाही. एका इंग्रज कवीने चिडून अशांच्या हृदयाला Leather hearts कातड्याच्या हृदयाचे (निगरगट्ट) म्हटले आहे. हृदयाचे जर कमावलेले कातडे किंवा चामडे करून टाकले तर त्याला कोण शिकवू शकेल, संस्कारित करू शकेल?

खरे पाहता कला आणि नीती, सदाचार आणि सदभिरुची, या दोघांमध्ये विरोध उभाच राहता कामा नये. विनाशक, जीवनद्रोही अशी कोणतीही वस्तू व गोष्ट चांगल्या माणसाला चांगली किंवा कलापूर्ण वाटतच नाही. अमुक पदार्थ शिळा, कुजलेला व उष्टा आहे, अमुक रमणी कुलटा आहे, अमुक रुचकर फळ विषारी आहे, अमुक उपदेश शत्रूचा गुप्तहेर आहे असे कळल्यावर जसे त्याविषयींचे आकर्षण तावडतोब नष्ट होऊन जाते, त्याचप्रमाणे ज्यात सदाचाराला विरोध आहे, ज्या गोष्टीत जनतेचा द्रोह आहे, ज्यातून दुःख, मोह अथवा पश्चात्तापच निर्माण होतील असे समजून येईल, त्याविषयी आकर्षण व गोडी वाटणे त्याचक्षणी संपुष्टात येईल. जे कोणी जीवन द्रोही आणि समाजकंटक असतील तेच अशा गोष्टींना चिकटून राहतील.

—जीवननो आनंद : ४९८–४९९

१५. आजचे कलाविहीन जीवन

समाजविकासाचे रहस्य समजून समाजाला शास्त्रीय रीतीने मार्गदर्शन करण्याचा दावा करणारा एक पंथ जगात तयार झाला आहे. हा पंथ म्हणतो की 'आतापर्यंत माणसाचे जीवन अशास्त्रीय होते. आमचा साम्यवाद जन्माला आला, मार्क्सने सामाजिक जीवनाचा कायदा ओळखला, तेव्हापासून सर्वत्र प्रकाश पसरला. त्यानंतर जीवनाच्या आकलनात शास्त्रीयता आली! कोणत्या तरी नव्या शास्त्राच्या आचार्याला सर्वज्ञ मानण्याची चूक सर्वच धर्मांचे व पंथांचे अनुयायी करीत आले आहेत, तर साम्यवादी त्याला कसे अपवाद ठरतील? जगात वर्ग पहिल्यापासून होते, आजही आहेत व जगाच्या अंतापर्यंत राहतील. या वर्गांत परस्पर अज्ञान व अनास्था असू शकेल. पण संपूर्ण समाजच वर्गविग्रहावरच अवलंबून राहतो, असे अनुमान यावरून काढणे हे कितपत बरोबर आहे हे तपासून पाहायला पाहिजे.

मात्र धन मागे पडून जेव्हा माणूस संस्कृतीसारख्या गोष्टीलाच नाकारतो तेव्हा वर्ग तयार होणार व ते झगडणार हे खरे. पण ही स्थिती तर अगदी अलीकडची आहे. आजच्या स्थितीवरून सामान्य सिद्धान्त बसवून प्राचीन काळची सर्व ग्रंथ-संपत्ती आणि सर्व कलाकृती, स्थापत्य आणि संगीत हे सर्वच 'बूर्ज्वा' लोकांचे होते आणि त्यात गरीब, अकिंचन लोकांचा द्रोह करण्याचा हेतू होता, असे सिद्ध करायला बसावे हे तर विचित्रच आहे. अधिकार (सत्ता) मिळविण्यासाठी चिडून लढणाऱ्या लोकांचा संस्कृतीच्या कोमलतेशी मेळ बसत नाही. ते तर एकच गोष्ट जाणतात की 'जे प्रत्यक्ष आमच्या विरोधात नाहीत ते आमच्या बरोबरच आहेत' असे मानण्याची त्यांना शिकवण देण्यात येते. रशियात कला आणि कलावन्त यांच्यात आता असा फरक पडतो आहे. **कार्यकाले च निष्ठुराः कार्यं कृत्वा पुनर्नम्राः** हे वर्णन विजेत्यांनाही लागू पडते. आपल्याकडे साहित्य आणि कला यांवर साम्य-वाद्यांनी अशा तऱ्हेच्या टीकेचा हल्ला चढविला आहे. आजची आपली कला जन-हिताचा विचार करते आहे की नाही हे आपण नीट तपासून पाहण्यासारखे आहेच.

जोपर्यन्त साहित्यश्रवण आणि संगीताच्या मैफली मंदिरात घडत असत, मूर्ती बनविण्याची शिल्पकला व चित्रकला मंदिरांत अथवा विहारांत बहरत होत्या, आणि गायनचार्य गंगेसारख्या नदीला आपले संगीत ऐकविण्यासाठी घाटावर संगीतामृत-प्रवाह वाहवीत होते तेव्हा त्यांचा गरीब व श्रीमंत लोकांना सारखाच लाभ मिळत असे. उत्सवप्रसंगी व विवाहप्रसंगी जातीजातींत भलेही भेद असोत, पण धनिक व धनहीन यांत तीव्र भेद आपल्याकडे नव्हते; आणि त्यामुळे कलेचा आनंद, कलेचा पुरुषार्थ आणि कलेची संस्कारिता सर्वांना सारख्या रीतीने मिळत असे, आणि काही काही वेळा तर सर्वश्रेष्ठ कलावंत वैराग्याची दीक्षा घेऊन आपल्या धुंदीच्या आनंदात आवडेल तेथे, कोठेही राहात असत. धनिकांची श्रीमंती आणि त्यांची खुशामत या आपल्याच मस्तीत व धुंदीत राहणाऱ्या विराग्यांना मोहवू शकत नसे. गरिबांतला गरीब मनुष्यही अशा वस्तादांची सेवा करून कलावंत बनू शकत असे.

हल्ली ही स्थिती राहिली आहे असे म्हणण्याची हिंमत होत नाही. आज साहित्य, संगीत, कला तिन्ही धनवान व सत्ताधीश यांच्या आश्रित बनल्या आहेत. मंदिरात अशी कला व्यक्त होत असे तशी ती लोकांना समजावूनही देत असत. आज पदार्थ-संग्रहालयांत आणि प्रदर्शनांत ठेवली जाणारी कला गरिबांना कोणी समजावून देत नाही. अशा ठिकाणी गरीब लोक जनावरांसारखे फिरत राहतात व वस्तूंकडे आश्चर्याने पाहात राहातात. चमकून गेल्यानंतर जशी अंधाराच्या गडदपणाची जाणीव अधिकच तीव्रतेने होते तसे अशी प्रदर्शने पाहून आलेले गरीब लोक आपला अज्ञानीपणा आणि असंस्कृतपणा यांना स्वतःच्या मनावर ठसवून परत येत असतात. कलाकृती

पाहिल्यानंतर उत्साह, आशा आणि श्रद्धा वाटायला पाहिजे, तसे न होता त्याच्या ऐवजी विषाद, निराशा, निर्वीयता, असंतोष हे त्यांच्या मनात घर करू लागतात. ही गोष्ट दुःखाने मान्य करावयास पाहिजे की आज गरिबांचे सेवक जितके कमी आहेत तितके या प्राचीन राष्ट्रात पूर्वी कधी कमी नव्हते.

— जीवननो आनंदः ५२१–५२४

१६. सदाचार ही जीवनाची सुंदरता

सदाचार हीच जीवनाची सुंदरता आहे. न्याय, उदारता, कारुण्य, क्षमा, शांती, त्याग, वीरता—या सर्व गोष्टीच जीवनाचा उत्तम भाग आहे. त्यांना दगा देऊन, त्यांना नाकारून जर कोणती कला माणसासमोर येऊन उभी राहिली, आणि तिचे तोंड, दर्शनी भाग जरी कितीही मनोहर असला तरी ती आपणास कोणत्या प्रकारे आकर्षू शकेल?

सदाचाराच्या नावाने अनेक रूढी आणि समाजाच्या नेत्यांची जुनी किंवा नवी जाचक मते समाजावर आपली हुकमत चालवीत असतात. त्यांतील टाकून देण्यासारख्या गोष्टी जरूर टाकून देऊ या, पण कलेने स्वतःचे निर्विवाद स्वातंत्र्य नव्याने सिद्ध करण्यासाठी सदाचाराला विरोधच करावयास पाहिजे असे कशाकरिता समजायचे? सदाचार हीसुद्धा शेवटी सर्वोच्च जीवनकलाच आहे.

आणि सदाचाराने पण कलेवर सासूपण गाजविण्याचा आग्रह सोडून द्यावयास पाहिजे. कलेचे गुपित कोणत्याही गोष्टीचा तटस्थपणे स्वीकार करण्याच्या, तटस्थतेने वापरण्याच्या, आणि एखाद्या योग्यासारखे कलेशी प्रारंभापासून शेवटपर्यंत तादात्म्य अनुभवत राहूनही अनासक्त राहण्याच्या कौशल्यात बसत असते.

या कौशल्यापासून जर कलावंत ढळेल तर खरे कलावंत स्वतःच त्याला वाळीत (जातीबाहेर) टाकतील. विषयलोलुपता, विलासिता आणि लंपटता या सदाचाराच्या जितक्या शत्रू आहेत तितक्याच कलेच्याही शत्रू आहेत. ढोंगी सदाचार जसा या डाकिणींबरोबर पुष्कळ वेळा जुळवून घेतो तर मग फसवी कला तसे केल्याशिवाय कशी राहील? विलासिता, लंपटता, विषयलोलुपता यांची जेव्हा कलेमध्ये मेसळ होईल तेव्हा त्यावर इलाज करण्याचे काम समर्थ कलावंताच्या हातूनच होऊ शकले तर चांगले. जात आपल्या जातीला चांगल्या रीतीने ओळखते. म्हणजे कलेच्या उच्छृंखलपणाला नीतीच्या कायद्यांनी विरोध करण्याऐवजी जीवननिष्ठ, सदाचारपरायण,

आर्य कलाकार तयार करावे व त्यांच्याच मार्फत हीन दर्जाच्या कलेला निस्तेज करून टाकावे हा चांगला उपाय आहे. श्रेष्ठ कलावंत जेव्हा आपल्या या जबाबदारीला पुरे पडत नाहीत तेव्हाच समाजधुरीणांना हा प्रश्न हाती घ्यावा लागत असतो.

—जीवननो आनंद : ४९९–५००

येथे एक गोष्ट लक्षात घ्यावयास पाहिजे. आपण जर कंबर कसली नाही तर जगात निरपवाद दुराचार व विलासिताच पसरेल असे समजणे चूक होईल. त्यात अश्रद्धा आहे, नास्तिकता आहे. जर या विश्वात चैतन्य-तत्त्व भरलेले असेल तर या सदसदात्मक विश्वात माणसाने ठरविले तरी पूर्णपणे दुराचरण होऊ शकणार नाही. महात्मा होणे जितके कठीण असते तितकेच निर्भेळ दुरात्मा होणे अशक्य असते. प्रत्येक पाप आणि पतन यांचे औषध (त्यावरील उपाय) त्याच्याबरोबरच जन्माला येत असते; आणि माणसाचा आपल्या पापाविषयींचा धीरही शेवटी कमी पडतो. म्हणून माणसाने एवढेच पाहावयाचे असते की पापपुण्य, दुराचार-सदाचार, सुरुची–कुरुची यांच्यातील सनातन रस्सीखेचीत स्वतःची खेच सत्पक्षाकडेच व्हावयास पाहिजे. आक्रोश करण्याने आणि धीर सोडून बसण्याने काहीच साध्य होणार नाही.

समाजाला व जगाला शुद्ध करायला जाताना प्रथम आपल्या स्वतःच्या जातीलाच योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न आपण करू तर ही प्रवृत्तीच उशीरा की लवकर कशी का होईना संक्रामक म्हणजे संसर्गजन्य होणारी आहे.

सदाचार आणि रूढाचार यांच्यातील भेद येथे स्पष्ट समजायला पाहिजे. सदाचार ही हृदयाची भावना आहे, ती अंतर्गत स्वच्छता आहे, तर रूढाचार हा समाजाच्या मान्यतेवर आधारलेला असतो. तो लोकभावनेला वश राहात असतो. रूढाचारी सदाचारी असण्याचे यशस्वीरीत्या सोंग आणू शकतो, पण सदाचाराचे फळ किंवा पुण्य मिळवू शकणार नाही. शरीराचे अवयव शक्य होईल तेवढे झाकण्यात सदाचार असतो असे एका काळात मानले जात होते व शिकविलेही होते. त्यातून रूढीचे आदर्श विकसित झाले. जर चित्रांमध्ये नग्नता दाखविण्यात आली तर सामाजिक नीतीचे भयानक नुकसान होते असे लोक मानायला लागले.

याच्या उलट इतर कित्येक म्हणू लागले की जेथे मोकळेपणा व निष्कपटता असते तेथे पवित्रता असलीच पाहिजे. पण अनुभवाने असे सांगितले आहे की रूढाचारात अनाचार लपून राहू शकतो तसाच स्वैराचारातही अनाचाराला वाव मिळू शकतो. रूढिनिष्ठा आणि बंडखोरपणा दोघांतही सत्यनिष्ठा अथवा शिवपरायणता वसतेच किंवा असलीच पाहिजे असे सिद्ध झालेले नाही.

गेल्या दशकात या प्रश्नाची खूपच चर्चा झाली. कलेत नग्नतेचे दर्शन घडवायचे की नाही ? हा तो प्रश्न होता. पण त्यावेळी हा प्रश्न अगदी नवीन नव्हता. जुन्या

काळात आपल्या शाक्त तांत्रिकांनी नग्नतेची उपासना काही कमी केली नाही. आणि तिचा परिणाम काय झाला तेही आपणास पाहावयास मिळाले. आपल्या भाषेत निंदेच्या अर्थाने वापरला जाणारा 'छाकटा' हा शब्द 'शाक्त' या शब्दापासून आला आहे. हेच या प्रश्नाला पुरेसे उत्तर आहे.

तशी वृत्ती, हेतू व कौशल्य असेल तर नग्नतेतही पूर्ण पावित्र्य दाखविता येते. दक्षिणेत भद्रबाहू बाहुबली गोमटेश्वराची मूर्ती नग्न आहे. ती इतकी मोठी आहे की कित्येक मैलांपर्यंत लोकांना ती दिसू शकते. पण तिच्या चेहऱ्यावर मूर्तिकाराने असा काही उपशम दाखविला आहे की ती पवित्र नग्नता पाहणाऱ्याला दीक्षारूप बनून जाते. पुरुषाचे शरीर असो की स्त्रीचे, पशूचे असो की पक्ष्याचे असो, त्यात बीभत्सता नसतेच. अश्लीलता शरीरावर नसते, तर ती मनामध्ये असते. स्वतःचे दिगंबर चित्र अश्लील करावयाचे अथवा कलापूत बनवायचे हे चित्रकाराच्या हातात असते. आजकाल जेथे जेथे विकारांचे उद्दीपन करून समाजापासून पैसा काढण्याचा प्रयत्न चालू आहे, तेथे तर ही गोष्ट समजणेच शक्य नाही. साहित्यात काय आणि कलेत काय, लोकांची चित्तवृत्ती कामुक व विलासप्रवण बनविण्याचा प्रयत्न करणारे 'कलाधर' (कलावंत) आणि जुन्या काळातील भांग पिऊनपिऊन निःसत्त्व बनलेले राजेमहाराजे यांची विषयवासना पुनः जागृत करून देणारे त्यांचे आश्रित यांच्यामध्ये काळाचा फरक असेल, पण जातीत वेगळेपणा नाहीच. पद्धतीत वेगळेपण असेल पण जात तीच. समाजाला अशा धीट वर्गाची, खुशमस्करी लोकांची गरज असेल तर समाज भलेही त्यांना ठेवो, पण त्यांना कलावंत म्हणू नये.

शुद्ध सौंदर्याची दृष्टी ठेवून धैर्याने नग्नतेलामुद्धा कलेचा विषय बनवावे हे वेगळे; आणि विकारांना उत्तेजन मिळेल अशी चित्रे काढून विकारलोलुप लोकांच्या तोंडावर त्यांना सुंदर म्हणावे हे वेगळे; विकाराचे अस्तित्व सिद्ध करणे अथवा विकारितेचा कोणावर आरोप करणे हे कठीण आहे, पण आपले स्वतःचे मन विकारी बनते की नाही हे स्वतःसाठी नक्की करणे ही गोष्ट थोडीसुद्धा अवघड नाही. त्याची अडचण ढोंगी काळातच अनुभवायला येते. विकार तर संपूर्ण शरीरात कमी अधिक प्रमाणात एक विशिष्ट रोमांच (Thrill) निर्माण करतात. त्यात क्षणिक उत्तेजन आणि शेवटी शैथिल्य अथवा दौर्बल्य ही दोन्ही असतात; आणि वृत्ती जर बथ्थड झालेली नसली तर काही प्रमाणात तरी लाजिरवाणेपणा येतच असतो.

—जीवननो आनंद ५०१–५०२

१७. मंगल मंदिर खोलो

जीवन आणि मरण ही विराट जीवनाचीच दोन अंगे आहेत; परमात्म्याच्या दोन विभूती आहेत. त्यांत जीवन जगणे ही माणसाची कठोर कसोटी आहे; मरण ही त्या क्षमाशील आणि परम कारुणिकाची दया आहे. मृत्युसमयी माणसाला जी जी वेदना होते ती मृत्यूमुळे नव्हे. मृत्यूत तर झोपेइतकाच गोडवा असतो. जी वेदना होते ती जगण्यामुळेच होते. जीवन आपला तावा सोडायला तयार नसते आणि या लोभाच्या ओढाताणीत वेदना उत्पन्न होत असते. मृत्यूजवळ धीर असतो; तो जीवनाला स्वतःकडून शक्य ते सर्व करू देतो. जेव्हा जीवन हार खाते, त्याचा पराभव होतो आणि ते स्वतःच्या आग्रह सोडून देते, तेव्हा मृत्यू आपले पंख पसरून प्राण्याला आपल्या छत्रछायेत, कुशीत घेत असतो.

मनुष्य जीवनाला सुखस्वरूप समजत असतो आणि मरणाकडे ते महासंकट आहे असे पाहात असतो. पण निसर्गात जसे दिवसानंतर रात्रीला स्थान असते, तिची उपयोगिता आणि सौंदर्य असते, एवढेच नाही तर वैभवही असते त्याचप्रमाणे मरणातसुद्धा उपयोगिता, सौंदर्य आणि वैभव असते. उपयुक्तता कदाचित आपण लगेच समजू शकत नसू, पण मरणाची भव्यता आणि त्याची उपकारक सुंदरता तर सहज लक्षात यावयास पाहिजे. चिडलेल्या माणसाला ते समजू शकत नाही यात मरणाचा काही दोष नाही.

—जीवन व्यवस्था : २०२

थकलेल्या मजुराला विश्रांती हवी असते, नाचून कुदून कमालीच्या दमलेल्या मुलाच्या डोळ्यांत झोप मावत नाही, पिकलेले फळ जमिनीत पेरून नवी यात्रा सुरू करण्यासाठी वृक्षमातेचा संबंध तोडून टाकते; त्याप्रमाणेच माणसाने जीवन पुरे करून अनासक्त वृत्तीने त्याचा त्याग करावयास शिकले पाहिजे आणि नवी संधी मिळविणाऱ्या परवानारूप मरणाचे आनंदाने स्वागत करावयास पाहिजे.

जर माणसापाशी प्रसन्नता असेल तर त्याला कौशल्याने जगता पण येते, तसेच शांततेने व प्रतिष्ठेने आपले जीवन पुरे करता येते, आणि पराक्रम गाजविल्यामुळे त्याचे फळ म्हणून सन्मानाचा किताब किंवा पदक मिळते, तशीच जीवनाच्या शेवटी मरणाची कृतार्थता मिळविण्यास तो तयार राहतो.

'मंगल मंदिर खोलो' हे श्री. नरसिंहराव दिवेटिया यांचे सुंदर भजन मृत्यूला उद्देशूनच लिहिलेले आहे, हे न कळल्याने काही गायक 'मंगल' आणि 'मंदिर' या शब्दांमुळे विवाहासारख्या मंगल समजल्या जाणाऱ्या प्रसंगी हे गातात. विवाहाला मंगल आणि मृत्यूला अशुभ किंवा अमंगल मानणाऱ्या समाजासाठी अशा पसंतीमध्ये

औचित्याचा भंग होतो ही गोष्ट स्पष्ट आहे.

जीवा–जीवात खरे आकर्षण आत्मौपम्याचे, आत्मैक्याचे असावयास पाहिजे, हे आकर्षण आध्यात्मिक असल्याने त्यात विकारी किंवा पार्थिव तत्त्वाला वावच नाही असे जे लोक मानतात, ते विवाहाला लाचारीचे एक पाऊल समजतात. इंद्रियांनी आपला जोर दाखविला, वासना प्रबळ ठरल्या म्हणून त्यांना धर्ममार्गाकडे वळविण्यासाठी चांगले निष्ठामूलक विवाहबंधन स्वीकारावे लागले. लाचारीमुळे जे पाऊल उचलावेच लागले त्यातूनच शुभ परिणाम निष्पन्न करण्याचा जो शुभ प्रयत्न झाला त्याचे नाव विवाह. खरे पाहता विवाह हे एक बंधन असते. त्याला आपण संस्कृतीच्या मदतीने साधनारूप बनवू शकतो ही गोष्ट वेगळी.

मरण हे खरोखर मुक्तिरूप आहे. वासनाद्वारा त्याला जर क्लेशमय व कलुषित न केले तर मरण हा **परममित्र** आहे हे सहज समजेल. मृत्यू मित्र असो की वडिलधारा, आश्रयदाता असो, तो दयामयच असतो. त्याचे द्वार मंगलमय असतेच. लोक मरणाची गडद अंधाराशी तुलना करतात आणि जीवनाला प्रकाशरूप मानतात. दिवसाच्या धवल अंधाराविषयी आणि रात्रीच्या काळ्या प्रकाशाविषयी मी जे काही लिहिले आहे ते येथेही सत्य आहे.

अरण्यातून निघून जेव्हा मोकळ्या मैदानात, उघड्यावर आपण येतो तेव्हा जसा आपणास उत्साहपूर्ण आनंद होतो तसेच जीवनवन तुडविल्यावर आणि अंधारा मार्ग ओलांडल्यावर जो ज्योतिर्लोक आपणास मिळतो त्याच्या प्रकाशात वाजतगाजत, आनंदमय वातावरणात आपण भगवान मृत्यूच्या हृदयात स्थान मिळवायला पाहिजे. परदेशात विक्रम करीत असता प्रवाशाला जसे स्वदेशाचे अखंड स्मरण होत असते आणि तो स्वदेशाच्या नावाचा जसा अविरतपणे जप करीत असतो, त्याचप्रमाणे जर माणूस मरणविरहातच जीवन पूर्ण करील तर शेवटी त्याची तहान भागायचीच, आणि भगवान मृत्यूपासून मिळणाऱ्या अमृतधारांनी तो पूर्णपणे न्हाऊन निघावयाचाच. कारण मृत्यू हा जीवनाचा पूर्णविराम नाही, परंतु अमरलोकात प्रवेश करण्याचे द्वार आहे. जो मरणाचे स्मरण ठेवून अलिप्तपणे जगू शकतो त्यालाच अमरलोकाचा अधिकार प्राप्त होत असतो. बाकी सगळे जे नाराजीने व कुरकूर करीत मरणाकडे जातात त्यांना पामर समजून मरण पुनः पुनः जीवनक्षेत्रात परत पाठवीत राहते–ढकलून देत असते.

जे मरणाला ओळखतात आणि मनःपूर्वक त्याची इच्छा करतात त्यांनाच जीवनाचा खरा मार्ग सापडतो आणि खरा आनंद प्राप्त होत असतो.

—जीवनव्यवस्था : २०३–२०४

१८. मृत्यू : एक वरदान

आपणास पाहिजे त्यापूर्वीच मरण आले तर लोक मरणाचा शोक करतात. खरे पाहता मरण हे ईश्वराने आपणास दिलेले उत्तम वरदान आहे. जर मरण नसते तर आपली कशी अवस्था झाली असती ? अनंत कालपर्यंत जगतच राहायचे ? जगतच राहायचे ? त्यात मनुष्य हैराण नाही का होणार ? कंटाळणार नाही का ?

ज्यांचा पुनर्जन्मावर खरोखर विश्वास आहे, त्यांच्या दृष्टीने मरण आणि झोप यांच्यामध्ये तत्त्वतः कोणताही फरक नसतो. एखादा थकलेला मनुष्य जर झोपू पाहात असेल तर त्याविषयी आपण काही शोक किंवा दुःख करीत नाही, उलट त्याची झोपण्याची तयारी करून देतो, त्याच्या झोपेत काही व्यत्यय येणार नाही अशी त्याची सोय करून देतो. मरणोत्तर जीवनाविषयी जर एवढी खात्री असली तर मरण्याच्या अवस्थेत असणाऱ्या माणसाला त्याच्या सुटकेसाठी आपण चांगली तयारी करून देऊ शकतो. थकल्यानंतरही काम करीत राहणाऱ्या मित्राला जसे आपण आग्रह करून झोपायला लावतो, तसेच मरण्याला उत्सुक असणाऱ्यांनाही आपण अधिक काळ जगत राहण्याची गळ नाही घालणार. मरणाची भीती आणि जगण्याची जाणीव या खरोखर मरणोत्तर स्थितीविषयींच्या आपल्या अज्ञानामुळे निर्माण होतात. पुनर्जीवनाविषयींच्या आपल्या श्रद्धेची ही कसोटी आहे.

एकाने लिहिले आहे की मरण्यात जी एक लिज्जत, खुमारी आहे ती जर माणसाला सुरुवातीपासूनच कळली तर लोक ऊठ सूठ मरणाकडे धाव घेतील. खरंच, मरणात दुःख नसते. ज्याला मरणाचे दुःख आपण समजतो ते खरे पाहता कष्टासहित जगण्याचे दुःख असते. ते जेव्हा असह्य होते तेव्हा मित्रासारखा मृत्यू येऊन आपली सुटका करतो. दुःख जगण्याचे, जीवनाचे असते, मृत्यूचे नसते.

आणि जीवन तर वापरण्यासाठी असते; सत्कार्यासाठी, महत्कार्यासाठी जर जीवन वापरले नाही तर त्या जगण्यात रस कसला ? स्वारस्य कसले ? अज्ञानी प्राण्यांना बुद्धिपुरःसर जगता येत नाही. म्हणून निसर्गाने त्यांना जगण्याचा उत्साह दिलेला आहे. ती जिजीविषा शिकवावी लागत नाही. प्राणिमात्रांत ती असतेच. प्राणिमात्रांची शिकार करण्यास सरावलेले मरण आपल्या मागे धावत येते आणि शिकारी कुत्रा मागे लागल्याने जसे हरीण किंवा ससा हे जीव घेऊन पुढे जोरात धावत सुटतात तसे आपणही मृत्यूला चुकविण्यासाठी धावत सुटतो हे माणसाच्या प्रतिष्ठेला कितपत शोभते ? मरण येते तेव्हा त्याच्यासाठी आपल्याजवळ स्वागतमाला, फुलांचा हार तयारच असावयास पाहिजे. जीवनाचे कर्तव्य समजणाऱ्या माणसासाठीचं भगवान मनूने म्हटले आहे :

नाभिनन्देत मरणं । नाभिनन्देत जीवितम् ।
कालमेव प्रतीक्षेत । निर्देशं भृतको यथा ॥

—जीवनव्यवस्था : २०५

मृत्यू : विश्रांतीचे स्थान

माणूस आपला मृत्यू का नेहमीच अनिष्ट समजत असतो ? निराश होऊन आत्महत्या करण्यास तयार झालेल्या दुर्दैवी माणसाजवळ जाऊन त्याला विचारा की तू मृत्यूला इष्ट समजतोस की अनिष्ट ? ज्यांची भोगेन्द्रिये आणि ज्ञानेन्द्रिये निरुपयोगी झालेली आहेत पण ज्यांना समाज तसाच प्राण रजा देत नाही अशा म्हाताऱ्या-कोताऱ्यांना विचारले तर ते पण सांगतील की आम्ही रात्रंदिवस परमेश्वराजवळ अशीच प्रार्थना करीत असतो की, 'आता आम्हाला मृत्यूची विश्रांती दे.' आणि जीव काही वेळा अशी इच्छा करतात की आपल्या प्रियतमाची अंतिम पीडा दूर होण्यासाठी जर मृत्यू हा एकमेव उपाय असेल, तर त्या निष्ठावान मित्राला (मृत्यूला) पाठविण्यास हे भगवन्, एकाही क्षणाचा उशीर करू नकोस.

जगात जर मरण नसते तर नव्या नव्या प्राण्यांनी जन्म पण घेतला नसता. जन्म आणि मरण या एकाचं नाण्याच्या दोन बाजू आहेत. मरण आहे म्हणूनच जगात जमा खर्चाच्या बाजूंची जुळणी होते. मरणाविषयी कोणी तिरस्कार धरू नये, मरणासमोर कोणी तक्रार करू नये. मरण सर्वांचा मित्र असतो; तो सर्वसमर्थ आहे, त्याने कधी कोणाला निराश केलेले नाही.

—जीवनव्यवस्था : २०७–२०८

१९. मृत्यूचे तर्पण

ही एक नवलाईची गोष्ट आहे की आपण मरणशील आहोत हे प्रत्येकाला माहीत असूनही आपण मरणाला नीट ओळखत नाही, त्याचा आपणाला नीट परिचय होत नाही. सामान्य लोक तर मरणाला इतके भयंकर भीतात की मरण ही खरोखरच काय चीज आहे त्याचा ते पुरेसा विचारही करायला तयार होत नाहीत. मृत्युसमयी शरीरात असह्य वेदना होत असतात म्हणून लोक मृत्यूचा तिरस्कार करतात, त्याच्याविषयी घृणा बाळगतात. आपल्याला झालेला रोग वा आजार बरा करण्यासाठी आपल्या जवळ येणाऱ्या डॉक्टरला दुष्ट समजणे जर योग्य ठरत असेल तर कोणा

माणसाला रोग, करुणास्पद दुःख, निराशा किंवा असा काही आघात असह्य होतो तेव्हा त्याची पीडा दूर करण्यासाठी जेव्हा मृत्यू येतो त्याला दोषी ठरविणे योग्य ठरेल. चिंतेमुळे, अपमानामुळे, नैतिक अधःपतनामुळे अथवा एखाद्या रोगामुळे जर एखादा मनुष्य सबंध रात्र अंथरुणात तळमळत पडला असेल, आणि शेवटी दयाळू निद्रेने येऊन त्याला शांत केले असेल तरी काही त्याला असे वाटणार नाही की ती निद्रादेवी त्याची शत्रू होती. एका इंग्रजी कवीने तर आपल्या निद्रास्तोत्रात तिला 'माणसाची दयाळू (प्रेमळ) धात्री, दाई' (Kind nurse of men) म्हटले आहे. मरणाला जर न्याय द्यावयाचा असेल तर माणसाने त्याला 'परमसखा' म्हणायला पाहिजे. मोठमोठे धन्वंतरी आणि मानसशास्त्रज्ञ सुद्धा जी शांती आणि जो दिलासा माणसाला देऊ शकत नाहीत तो हा परमसखा निश्चित आणि स्थिर स्वरूपात प्रदान करू शकतो.

—जीवनव्यवस्था : २०८

जोपर्यंत आपण जीवनाला ओळखत नाही तोपर्यंत आपण मृत्यूलाही ओळखू शकणार नाही. बालपणापासून आपण मानत आलो आहोत की जीवन आणि मरण परस्पर-व्यावर्तक आहेत, परस्पर-विरोधी आहेत. 'प्रकाश जाताच अंधार होतो याचप्रमाणे मरण येताच जीवन समाप्त होते' (ही उपमा मुद्दामच उलटी मांडली तर त्यांना सुलट्या रूपात मांडताच येणे शक्य नाही.)

'जेथे अंधार नाही तेथे प्रकाश आहे, अथवा जेथे मरण नाही तेथे जीवन आहे' असे आपण कसे म्हणू शकू? खरा विचार केल्यास मरणाचा जीवनावर कोणताच परिणाम दिसत नाही. नेत्रांच्या दृष्टीने नेत्रांच्या उघडझापांना जेवढी किंमत असते तेवढीच किंमत जीवनासाठी मरणाला असते. मरण हे विशाल जीवनात कोणताही अडथळा किंवा अडचण उभी करीत नाही कीं त्याच्यात वाढ किंवा घटही करू शकत नाही. जीवन हे तर सदोदित, नित्य अखंडपणे चालूच राहते. अनेक मृत्यू आले तरी जीवनाचा प्रवाह अनेक अंकी नाटकाप्रमाणे चालूच असतो. मधून मधून मृत्यूचा पडदा पडत राहतो ते इष्टच असते; नाहीतर नाटक भाररूप होऊन आपणास कंटाळून सोडेल.

—जीवनव्यवस्था : २०९

मरण आल्यावर व्यक्तित्व कोठे निघून जाते? ते विष्णुलोकात जाते, इंद्रलोकात जाते की चंद्रलोकात जाते असे म्हणणे हे तर लहान मुलांना पटविण्यासारखे आहे; आणि जेव्हा ती फक्त एक कल्पना आहे असे समजते तेव्हा ती कल्पना सोडून देण्याऐवजी तिला रूपक बनवून त्यातून कोणता ना कोणता दार्शनिक किंवा आध्यात्मिक

अर्थ काढण्याची प्रवृत्ती तयार होते. शुद्धबुद्धी तर म्हणते की जसा मिठाचा किंवा साखरेचा गोळा पाण्यामध्ये पडताच विरघळून जातो तसेच मृत्यूनंतर माणसाचे व्यक्तित्व आसपास भरून राहिलेल्या सामाजिक जीवनात विलीन होऊन जात असते. माणसाने जे काही भले बुरे केलेले असेल ते, त्याची शारीरिक, मानसिक किंवा आध्यात्मिक कार्येच, त्याचा आत्मा होते. मरणापूर्वी माणूस मुख्यतः आपल्या शरीरात राहून आपल्या व्यक्तित्वाला समाजात अथवा विश्वात वाटेल तेवढा वाढवू शकतो. मरणानंतर त्याचे शारीरिक केंद्र नष्ट होत असते; परंतु जोपर्यंत समाजाला त्याच्या व्यक्तित्वाची आठवण राहते तोपर्यंत त्याचे जीवन चालू राहते. त्याच्या बऱ्यावाईट कर्माचा समाजावर जो परिणाम राहतो ते त्याचे मरणोत्तर जीवन असते.

—जीवनव्यवस्था : २१०–२११

मनुष्याच्या मरणानंतर त्याला जीवात्मा म्हणा की संस्कार–समुच्चय म्हणा, त्याचे व्यक्तित्व वातावरणात अथवा परिस्थितीत विलीन होऊन जाते, आणि शेवटी तेच संपूर्ण समाजात संस्कृतीच्या रूपात राहात असते. संस्कृती हे सर्व संबद्ध व्यक्तींचे मरणोत्तर जीवन असते, म्हणून संस्कृतीला समाजाचा आत्मा म्हणता येईल. असंख्य जीवात्मे एकत्र होतात म्हणून मग आपणास सामाजिक विराटात्मा मिळतो. व्यक्तीची कीर्ती ही जीवात्म्याची छाया होय. समाजाची प्रतिष्ठा आणि त्याची शक्ती हे सामाजिक आत्म्याचे व्यक्त स्वरूप असते.

या सामाजिक आत्म्याची सेवा आपण जीवनामार्फतच करू शकतो. मरण हे तर जीवनाचे एक आवश्यक अंग आहे, म्हणून संधी येते तेव्हा जर मरता नाही आले तर आपले जीवन क्षीण आणि व्यर्थ बनत असते. मरणात प्रत्येक वेळी जीवनद्रोह नसतो; कितीतरी वेळा मरणात जीवनाची परिपूर्ति आणि सार्थकताच होत असते.

जे लोक संधी येते तेव्हा मरणाला आपलेसे करीत नाहीत त्यांचे जीवन निस्तेज, भाररूप आणि व्यर्थ होत असते. त्यानंतर त्यांच्यासाठी '**यज्जीवति तन्मरणं यन्मरणं साऽस्य विश्रांतिः ।**' म्हणजे तो जितका जगतो तितके त्याच्या व्यक्तित्वाचे मरण असते, आणि नंतर जे शारीरिक मरण येते ती त्याची विश्रांती असते.

—जीवनव्यवस्था : २११–२१२

मरणानंतर व्यक्तीच्या आत्म्याची (व्यक्तित्वाची) वसती एकाच शरीरात न राहता स्मृतिरूपाने, कार्यरूपाने अथवा प्रेरणारूपाने तो जेवढ्या समाजात व्यापलेला असेल तेवढ्या समस्त समाजात त्याची वसती असते; आणि या जीवनाला अनुलक्षूनच त्याचे श्राद्ध संभवू शकते. शिवाजी महाराजांसारखा पुण्यश्लोक राजा मोक्ष

पावला असेल की या देशात अथवा दुसऱ्या देशात त्याने राष्ट्रपुरुषाचा जन्म घेतला असेल, या त्याच्या नव्या यात्रेचे-करिअरचे-आपण श्राद्ध करीत नाही. परंतु आज आपल्या हृदयात शिवाजी महाराज राहून जगत आहेत, आणि तेथे मोठे होत आहेत, विभूतिरूपाने वर्धमान होत आहेत, त्यांचे आपण श्राद्ध करीत असतो. श्राद्ध मेलेल्या जीवांचे होत नसते, परंतु देहत्याग केल्यानंतर जे अंश समाजात जिवंत राहात असतात, समाजद्वारा प्रवृत्ती घडवीत असतात, विकास पावत असतात आणि पुरुषार्थ करीत असतात, त्यांचेच श्राद्ध होऊ शकत असते. हे जे मरणोत्तर सामाजिक जीवन तेच खरे पारलौकिक जीवन होय. जिवंतपणाची सहा लक्षणे शास्त्रकारांनी सांगितली आहेत. '**अस्ति, जायते, वर्धते, अपक्षीयते, परिणमते, म्रियते**' ती सर्व या जीवनाला पण लागू पडतात. म्हणून हे जीवन काल्पनिक नाही, पण वास्तव आहे, व्यापक आहे, दीर्घजीवी आहे, परिणामकारी आहे. हेच पारलौकिक जीवन होय. हे जीवन सुंदर, उन्नतिकर, शुभंकर असेल तर तो जीवाचा स्वर्ग आहे; हेच जीवन जर समाजाचा अधःपात करणारे असले, आर्यत्वाचा ध्वंस करणारे असले तर तोच नरक होय. असा विचार करता प्रत्येक जीवाचा स्वर्ग-नरक त्याच्या मरणानंतर सुरू होत असतो; परंतु तो जीव तर या लोकात (जगात)च ओतप्रोत भरून राहणार भाहे.

—जीवनव्यवस्था : २२१

जिला आपण कीर्ती म्हणतो ते खरे पाहता या पारलौकिक जीवनाचे प्रतिबिंब आहे. पारलौकिक सुदीर्घ जीवनाबरोबरचे प्रमाण काढता जन्ममरणाच्या खुंट्यांमधील आपले सुखदुःखात्मक ऐहिक जीवत फारच लहान किंवा अल्प म्हणता येईल. परंतु पुरुषार्थाच्या दृष्टीने पाहता हे जीवन फार महत्त्वाचे आहे, कारण की हीच कर्मभूमी आहे. भोगाच्या दृष्टीने पाहिल्यास हे देहगत जीवन अत्यंत अल्प आणि तुच्छ आहे. एवढाच नफानुकसानीचा चांगला हिशेब जे करू शकतात त्यांनी ऐहिक सुखावर जास्त दृष्टी न ठेवता पारलौकिक यशःशरीराची आणि त्यात मिळणाऱ्या कीर्तिरूपी सुखोपभोगांची आणि लोकांच्या द्वारा अखंड मिळत राहणाऱ्या कृतज्ञतेचीच काळजी घ्यावी.

या लोकात (जगात) जर आपण सत्कर्मे करू, लोकांना सत्प्रेरणा देऊ आणि सर्व बाजूंनी मागे राहणाऱ्यांचा विस्तार करू तर मरणानंतर हे सर्व वाढत राहून आपले मरणोत्तर जीवन परिपुष्ट आणि लोकोन्नतिकारक होईल.

—जीवन व्यवस्था : २२२

२०. मरणोत्तर जीवन : सांपरायाविषयी

१. मनुष्य मरणानंतरही आपले विचार, आपल्या भावना, आपले संकल्प आणि आपण प्रेरित केलेल्या पुरुषार्थांच्या मार्गे समाजात जिवंत राहात असतो. हे मरणानंतरचे जीवन मरणपूर्व जीवनाइतकेच महत्त्वाचे असते. ते परिपुष्ट होते आणि क्षीण पण होते. ते जीवन समाजोन्नतिकारक असले तर तो मनुष्यांचा तोच स्वर्ग, आणि समाजाला अधोगतीला नेणारे असले तर तोच नरक होय. पंचमहाभूतात्मक देहापेक्षा समाजरूपी देहात वास करून मनुष्य अति दीर्घ जीवन प्राप्त करून घेऊ शकतो, आणि जीवनसाफल्याचा अधिकारी बनतो. या मरणोत्तर जीवनाचे व्यक्तिरूपी आरशात, अहंकाररूपी आरशात प्रतिबिंब पडते तीच कीर्ती, तेच यश.

२. मरणोत्तर समाजरूपी जीवनाची जाणीव माणसाला नसते म्हणूनच कीर्ती, यश, पुण्य, स्वर्ग-नरक कल्पना रचून मनुष्यासमोर आलेल्या आहेत. परलोक पृथ्वीच्या बाहेर दूर कोठे तरी आहे असे काहीच नाही. परलोक म्हणजे मरणोत्तर स्थिती. त्यालाच उपनिषदांत **सांपराय** हे नाव दिले आहे. बालबुद्धी मूर्ख लोकांना या सांपरायाचा परिचय होत नाही. **न सांपरायः प्रतिभाति बालम्।** देह, त्याची सुखदुःखे त्या सुखदुःखांना साधनभूत होणारी मालमत्ता (वस्तुजात), त्या सुखदुःखाचा भोक्ता अहंकार (अस्मिता) आणि देह टिकेल इतका काळ पुरणारे आयुष्य एवढ्यातच संपूर्ण जीवन पर्याप्त होते असे मूढ लोक समजतात. या सर्व गोष्टी मिळून जे व्यक्तित्व तयार होते, तो आपल्या जीवनाचा फक्त अल्पांश असतो. खरे पाहता, देश (व्याप्ती) यांच्या आधाराने विचार करता आपले जीवन अत्यंत विशाल आहे. हे ज्याला समजले व ज्याच्या गळी उतरले तो निष्पाप आणि अमर होणारच.

३. जो मनुष्य म्हणतो 'मरण माझे मरोनि गेले, झालो मी अमर' त्याचा अर्थ समजणे कठीण नाही. जीवनाच्या दृष्टीने शारीरिक मरण ही तुच्छ गोष्ट आहे एवढे तर सहज समजायला हवे.

—जीवनव्यवस्था : २२२–२२३

२१. दुःखं जन्तोः परं धनम्।

सुख आणि दुःख या दोघांपैकी सुख आहे पोषक, आणि दुःख आहे बोधक, सुख जीवनरूपी महासागरात कसे पोहावे ते शिकविते, दुःख हे महासागरात बुडी

मारून त्याच्या आतून महान तत्त्वरूपी मोती काढून आणण्याची कला शिकवते व हिंमत देते. कोणा बुद्धिमान विद्वानाने '**सर्वं दुःखं मनीषिणाम्**' असे सांगितले तेव्हा त्याने दुःखापासून पळून जाऊन सुटका करून घेण्यास शिकवले नाही. मला तर वाटते की सुख माणसाला छचोर, उथळ बनवू शकते, आणि मोहमायेत फसवू शकते. जीवनाला समजण्याची बुद्धी आणि जीवन जगण्याची हिंमत तर आपणास दुःखातूनच मिळत असते म्हणूनच मी म्हटले आहे—

"**दुःखं सत्यं, सुखं माया, दुःखं जन्तोः परं धनम्॥**"

मरणासारख्या परमसख्याची संगत सुखाशी जोडली तर माणसाची प्रतिष्ठा थोडीही राहणार नाही. महात्मा मरणाशी महात्मा दुःखाला जोडून देणे उचित होय.

—जीवननुं काव्य : ४९७

विभाग दुसरा

शिक्षण

काका हे जरी गांधीजींचे प्रमुख अनुयायी व सहकारी असले, एक प्रथितयश साहित्यिक, तत्त्वचिंतक, देशभक्त, स्वातंत्र्यसैनिक आणि कर्मयोगी असले तरी ते मुख्यतः एक उत्तम प्रतीचे शिक्षक होते. त्यांनीच असे म्हटले आहे की लोक मला साहित्यिक वगैरे म्हणून विसरून गेले तरी मी एक शिक्षणकार म्हणून दीर्घकाळ मी लोकांच्या स्मरणात राहावे अशी माझी आंतरिक इच्छा आहे. काका राष्ट्रीय शिक्षणाचे एक महान प्रवर्तक होते. अमदाबादच्या गुजराथ विद्यापीठाचे (राष्ट्रीय) ते एक आचार्य होते व त्या काळात त्यांनी शिक्षणावर मूलभूत चिंतन करून समग्र शिक्षणयोजना तयार केली होती. गांधीजींच्या मूलोद्योग शिक्षणपद्धतीची त्यांनी तात्त्विक व शास्त्रीय मांडणी केली होती. शिक्षणाचे कार्य मानवाला स्वावलंबी, तेजस्वी, पुरुषार्थी, स्वतंत्र, प्रज्ञाशील, समाजहितैषी व अध्यात्मप्रवण बनवणे हे आहे असे ते म्हणतात. नुसते बौद्धिक शिक्षण माणसाला एकांगी, पंगू व दुबळा बनविते. तर बौद्धिक शिक्षणाबरोबर माणसाने शारीरिक श्रम व काम, भावनांचे अनुशीलन, नैतिक सद्‌गुण व दैवीगुणांचा विकासही साधला पाहिजे. शिक्षणाने कायम स्वतंत्र, स्वावलंबी व सार्वभौम राहिले पाहिजे असेही ते म्हणतात. शिक्षण हेच खरे जीवन-परिवर्तनाचे साधन आहे आणि 'सा विद्या या विमुक्तये' या आपल्या ध्येयाचा शिक्षणाला कधी विसर पडता कामा नये असे ते आवर्जून सांगतात.

१. शिक्षण म्हणते
२. सा विद्या
३. शिक्षणाची मूलतत्त्वे
४. शिंगे आणि पाय
५. भावी युगाचे शिक्षण
६. शिक्षणकर्त्यांचे मिशन
७. संस्कारितेद्वारा जीवन-परिवर्तन
८. नव्या शिक्षणाचे स्वरूप

१. शिक्षण म्हणते

शिक्षण म्हणते " मी सत्तेचा दास नाही, कायद्याचा किंकर नाही, विज्ञानाचा सखा नाही, कलेची प्रतिहारी (द्वारपाल) नाही, अर्थशास्त्राचा नोकर नाही, मी तर धर्माचे पुनरागमन आहे. मनुष्याचे हृदय, बुद्धी तसेच सर्व इंद्रिये यांचा स्वामी आहे. मानसशास्त्र व समाजशास्त्र हे माझे पाय आहेत. कला आणि कारागिरी (हस्त-कौशल्य) माझे हात आहेत. विज्ञान माझे शिर आहे. धर्म माझे हृदय आहे. निरीक्षण आणि तर्क माझे दोन नेत्र आहेत. इतिहास माझा कान आहे. स्वातंत्र्य माझा श्वास आहे. उत्साह आणि उद्योग माझी फुफ्फुसे आहेत. धीर माझे व्रत आहे. श्रद्धा माझे चैतन्य आहे. अशी मी जगदंबा आहे. जगद्धात्री आहे. माझी उपासना करणारा दुसऱ्या कोणाचा मिंधा राहू नये. त्याची सर्व कामना माझ्याद्वारा तृप्त होऊ शकेल अशी आहे. "

—जीवनव्यवस्था १६६–१६७

२. सा विद्या

माणूस बद्ध असतो, अज्ञानी असतो, कुवासनांनी गुरफटलेला असतो. परिस्थितीने जखडलेला असतो, त्यामुळे त्याचा आत्मा दाबला गेलेला असतो. विकासाकरता त्याला अवसर मिळत नसतो. या सर्व बंधनांपासून त्याला जे मुक्त करते तेच खरे शिक्षण होय. शरीराला रोग व दुर्बलता यांपासून मुक्त करील, बुद्धीला ज्ञान व चुकीच्या विचारांपासून मुक्त करील, हात–पाय वगैरेना कर्मेन्द्रियांच्या जडतेपासून मुक्त करील, मनाला मोह, भय व क्षुद्र स्वार्थ यांसारख्या कुवासनांपासून मुक्त करील, हृदयाला कठोरता तसेच खोट्या भावनेपासून मुक्त करील ते खरे शिक्षण. समग्र मानवाला–मनुष्य–समाजाला नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, बौद्धिक वगैरे सर्व दास्यांपासून मुक्त करील, रसिकतेला (रसवृत्तीला) विलासापासून मुक्त करील, शक्तीला मदापासून मुक्त करील, आत्म्याला कृपणता की अहंकार यांच्या पंजातून मुक्त करील तीच विद्या– तेच शिक्षण.

' अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः ' ही वस्तुस्थिती आहे. यापासून जी मुक्ती मिळवून देईल ती (खरी) विद्या.

—जीवनविकास : १५–१६

३. शिक्षणाची मूलतत्त्वे

आतापर्यंत होऊन गेलेल्या सर्व ऐतिहासिक युगांमध्ये सर्वसाधारण असे जर काही तत्त्व असेल तर ते सत्तेचे आहे. कुटुंबाच्या प्रमुखाची सत्ता, धर्मगुरूची सत्ता, गुलामांच्या मालकाची सत्ता, नोकरावर चालणारी मालकाची (सावकाराची) सत्ता, परंपरेची सत्ता, स्त्रीजातीवर चालणारी पुरुषाची सत्ता, एका राष्ट्राची दुसऱ्या राष्ट्रावर चालणारी सत्ता हे सर्व प्रकारचे प्रयोग मनुष्यजातीने करून पाहिले आहेत. सत्तेचे सामर्थ्य पाहून सत्तेसाठी झटापटी होत आल्या आहेत. धर्माची सत्ता नष्ट करून राजांनी सत्ता प्रस्थापित केली. राजांची सत्ता नाहीशी करून जनतेने सत्ता स्थापन केली. जमीनदारांची सत्ता नष्ट करून कारखानदारांनी सत्ता प्रस्थापित केली, आणि त्यांचीही सत्ता नष्ट करून मजुरांनी आपली सत्ता आणली. पण उपासना मात्र सत्तेचीच चालत असते. सत्तेचा स्वभावच असा असतो की ती आंधळी असते, एकांगी असते; न्यायाविषयी बेदरकार असते आणि स्थितिप्रिय असते. युरोपात प्रॉटेस्टन्ट लोकांनी पोपची सत्ता झुगारली पण बायबलची सत्ता इतकी वाढली की जुन्या प्रॉटेस्टन्ट लोकांची असहिष्णुता आपणास आश्चर्यकारक वाटते. अमेरिकेत गेलेले प्रॉटेस्टन्ट लोक धर्माच्या बाबतीत जितके असहिष्णू होते तितके एखाद्या वेळी रोमन कॅथॉलिक लोक पण असहिष्णू नव्हते. जोपर्यंत सत्तेची उपासना चालत राहते तोपर्यंत सत्तेचा आधार बदलेल, रूप बदलेल, पण तिचे दोष असतात ते तसेच राहतात. भविष्यकालीन शिक्षणाने सत्तेचा आधारच नष्ट करावयास पाहिजे. राज्याचे रूप कसे असावे अशी चर्चा करण्यापेक्षा राज्यच कशासाठी असायला हवे अशा प्रकारचे 'चॅलेन्ज' (आव्हान) शिक्षणाने सुरू करायला पाहिजे. धर्मतंत्र कसे असावे याची चर्चा करण्यापेक्षा धर्मतंत्राची जरूरच काय आहे असा प्रश्न प्रथम उपस्थित करावयास पाहिजे.

जोपर्यंत शिक्षण सत्तेचा स्वीकार करीत राहते तोपर्यंत शिक्षणाला कवाईत व कसरत यापेक्षा अधिक महत्त्व प्राप्त होणार नाही. शिक्षणाला सार्वभौम बनवायचे असेल व त्यामार्गे जगाला नवा रस्ता दाखवायचा असेल तर शिक्षणामध्ये सत्तेवर संपूर्ण बहिष्कार टाकला जायला पाहिजे. शिक्षणाच्या आदर्शात, शिक्षणाच्या रचनेत व शिक्षणाच्या संस्थांमध्ये व्यवस्था कितीही मजबूत असली तर असो, पण तिच्यात सत्तेला स्थान असताच कामा नये.

शिक्षणाचा पहिला उद्देश **सत्याचा शोध** करण्याचा आहे, सत्याचा प्रचार करण्याचा आहे, सत्याला आत्मसात करण्याचा आहे. हे कधीही सत्तेकडून होणार नाही. सत्य आणि सत्ता यांच्यामध्ये कमालीचा विरोध असतो. जेथे सत्ता असते तेथे सत्य निष्प्राण होत असते, सत्तेला वितळविल्याशिवाय सत्य प्रस्थापित होऊच शकत नाही.

शिक्षणाचे दुसरे तत्त्व **श्रद्धा** आणि **नम्रता** आहे. दुसऱ्यांच्या समोर मस्तक नमविण्याच्या वृत्तीला लोक नम्रता म्हणून ओळखतात. खरी नम्रता ही नव्हे. वडील माणसे, शास्त्रे जे सांगतात त्यांचा विचार न करता स्वीकार करण्याच्या जडतेला लोक 'श्रद्धा' म्हणून ओळखतात. खरी श्रद्धा ही नव्हे. डॉ. भांडारकरांनी एकदा श्रद्धेचा अर्थ 'the open mind' (खुले मन) असा केला होता. श्रद्धेची इतकी सुंदर व्याख्या दुसरी कोणती होऊ शकणार नाही. कोणत्याही गोष्टीविषयी विचार केल्याशिवाय अनुकूल किंवा प्रतिकूल ग्रह तयार न करणे, आणि कोणत्याही गोष्टीला अनुभवाच्या कसोटीवर घासून पाहून मगच उच्च पातळीवर चढण्याची संधी देणे याचे नाव श्रद्धा होय.

या श्रद्धेच्या मागे असलेली नम्रता एवढीच असते की आपण सर्वज्ञ नसतो असे मानणे. मनुष्यजातीचा अनुभव अल्प आहे. अनुभवाच्या क्षेत्रात आज येऊ शकणार नाहीत अशा कित्येक गोष्टी पडलेल्या आहेत की ज्या आपल्या जीवनावर जबरदस्त परिणाम करूनच राहतात. आपणास खूप समजायचे आहे, सत्याचा नवा नवा साक्षात्कार करून घ्यावयाचा आहे अशा प्रकारची अपेक्षा व उत्कंठा हिचे नाव नम्रता. श्रद्धा आणि नम्रता या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी स्वाभाविक बनावयास पाहिजेत. जेथे या नसतील तेथे शिक्षण शक्य नाही. श्रद्धा-नम्रतेचा अभाव हे जडतेचे म्हणजे वार्धक्याचे लक्षण आहे.

शिक्षणाचे तिसरे तत्त्व (**धैर्य**) हिंमत मानता येईल. शिक्षणाचा अर्थच असा आहे की आपणांस शिक्षणाच्या क्षेत्रात प्रवास करावयाचा आहे. ज्या समुद्राच्या चतुःसीमांचा नकाशा आपणापाशी नाही अशा सागरात आपले सर्वस्व बरोबर घेऊन आपले जहाज हाकारायचे आहे. ही गोष्ट धैर्याशिवाय होणे शक्य नाही. माणूस आपले सर्वस्व, जीवनसर्वस्व धोक्यात घालू शकतो या वृत्तीचे नाव आस्तिकता आहे. मी कल्याणाच्या मार्गाने जात आहे, माझे अकल्याण (नुकसान) होणार नाही, माझा विनाश होणार नाही, अशी धारणा असणे ही आस्तिकता शिक्षणाच्या पायात वसत असते. खूप परिश्रम करावे लागणार असतील पण त्यांचे फळही खूप मोठे मिळावयाचे असेल. माझा प्रयोग व्यर्थ ठरणार नाही या प्रकारचा विश्वास असणे ती आस्तिकता होय. ही ज्या ठिकाणी असेल तेथे हिंमत करायला, धैर्य दाखवायला, साहस करायला माणसाने डगमगता कामा नये. आजचे शिक्षणकर्ते, अध्यापक व शिक्षक ही कसोटी लावल्यास इतके क्षुद्र दिसून येतात की त्यांच्या हाती शिक्षणासारखे पवित्र कार्य कसे गेले ह्याचे आश्चर्य वाटते. जेव्हा खरे शिक्षण जागृत होईल तेव्हा अशी सर्व मंडळी आपण होऊनच नाहीशी होतील. विस्तवाला पाहून जनावरे जशी पळायला लागतात तसे.

शिक्षणाचे चौथे तत्त्व **अमीदृष्टी** हे आहे. स्वतःचा स्वार्थ आड येऊ न देता

सर्वांचे हित होवो, सर्वकाळ हित होत राहो अशी सद्भावना ही अमीदृष्टी आहे. परोपकार शिकण्यासाठी अंगी बाणवणे हा सद्गुण असत नाही. तो स्वाभाविक (सहज) असावयास पाहिजे. 'मला या जीवनात बरोबर असे काय घेऊन जावयाचे आहे की ज्यासाठी मी पक्षपात करावा! माझ्या मनाला सर्वच सारखे-समान वाटोत. सर्वांचे हित पाहून मला संतोष वाटावा. दुसरे कोणते सुख जर मला माहीतच नसेल तर त्याच्यासाठी मी कशाकरिता धडपड करीन!' अशी जी वृत्ती तीच शिक्षणाची वृत्ती होय. सत्तेपासून एकदा फारकत केली की मग शिक्षणाच्या हातून जगाचे अकल्याण होण्याचे कारणच राहात नाही, जर अज्ञानाने, रूढीमुळे व आळसाने शिक्षणाची वासलात लावली तर ती शिक्षणाची आत्महत्या ठरेल. मग अशा शिक्षणाकडून जगाचे कोणते अहित होणार नाही हे सांगणे कठीण आहे. शिक्षण म्हणजे अखंड जागृती, अखंड शुद्धी आणि अखंड प्रगती. या गोष्टी अशा अमीदृष्टीशिवाय घडणे शक्य होणार नाही. जेवढी म्हणून एकांगी तत्त्वे आहेत ती शिक्षणाच्या विरुद्ध आहेत. जे संपूर्ण आहे, सर्वांगीण आहे. व्यापक आहे, चिरंतन आहे तेच शिक्षणाला अनुकूल असते.

—जीवन विकास : १४-१७

४. शिंगे आणि पाय

आपल्या शिक्षणात बुद्धीला काही व्यायाम करावयास लावणारे, कल्पनेला खुराक पुरवणारे आणि साहित्याच्या मार्गाने नेणारे शिक्षण हे 'सांबर व त्याची शिंगे' या गोष्टीतल्या सांबराला भारभूत झालेल्या त्याच्या शिंगांसारखे बनले आहे; आणि जीवनदायी उद्योगाचे शिक्षण हे दिसायला ओबडधोबड पण मजबूत असलेल्या सांबराच्या पायांसारखे आहे, शिंगांच्या सौंदर्यासमोर अशा टांगांची आपणास लाज वाटते पण राष्ट्रीय जीवनात उपयोग तर त्यांचाच (पायांचा-उद्योगांचा) होत असतो.

हातपाय वापरण्याने माणसाची प्रतिष्ठा कमी होते असा एक समज तर लोकांमध्ये दृढ झालेला आहे, पण हातपायांचा वापर करण्याने माणसाची बुद्धी पण मंद होत असते असा एक संशय कित्येक चांगली शिकलेली माणसे सामान्य लोकांत पसरवीत आहेत ही आश्चर्याची व दुःखाची गोष्ट आहे. बुद्धिप्रधान लोकांनी शारीरिक कष्टांचे काम करू नये असा नियम करण्याच्या आधी खाण्यासारखे पार्थिव कामही त्यांनी

करू नये असाही नियम त्याच्याबरोबरच करावयास पाहिजे होता. देव आणि पितर जसे अन्न न खाता निद्रेनेच तृप्त होत असतात असे मानले जाते तसे बुद्धिमान लोकांचे पण होऊ शकेल. जर ते व्याकरण खाऊन व काव्यरस पिऊन जगू शकत असतील तर त्यांना शारीरिक श्रम करण्याची कोणतीच जरूर पडणार नाही. खरी गोष्ट तर अशी आहे की बुद्धीच्या वापराने जसे हातापायांचे काम अधिक सुंदर व व्यवस्थित होत असते, प्रमाण-शुद्ध आणि थोड्या वेळात होत असते तसे हातापायांचा वापर करण्याने बुद्धीच्या व्यापारात एकाग्रता आणि चिकित्सकपणा येत असतो. सामान्यपणे ज्या बाजूला बुद्धी जाण्याचा संभव कमी असतो त्या बाजूलाही हातांनीं केलेल्या प्रयोगांमुळे बुद्धी जाऊन पोहोचते आणि अज्ञाताचा शोध करण्याचा आनंद अनुभवायला मिळतो. तपशिलात शिरण्याची सवय सामान्यपणे बुद्धीला नसते; तर एकेका तपशिलात शिरल्याशिवाय हातापायांचे काम होऊच शकत नाही. हातापायांच्या मार्फत शिक्षण घेण्याने हा मुख्य लाभ होत असतो.

बुद्धीने केलेल्या कल्पनांची वेळोवेळी जर समीक्षा केली गेली नाही तर बुद्धीला खोट्या कल्पना करण्याची सवय पडत जाते. चुकीच्या कल्पना करण्याची किंवा त्यांना टिकवून ठेवण्याची एकदा सवय लागली की शास्त्रीयतेची हत्याच झाली असेच समजायचे.

वेदान्तात मोक्षाचे उत्तम साधन कोणते याची चर्चा करताना ज्ञान आणि कर्म यांच्यामध्ये निवड करण्यापर्यंत शोध जाऊन पोहोचला. काही लोक म्हणतात की जीवनाचे सार कर्मच आहे, इतर काही म्हणतात की जीवनाचे मर्म (सार) ज्ञानरूपी अत्तरातच येऊन जाते, आणि ज्ञानरूपानेच ते आपला सुगंध पसरवीत असते. 'जीवन म्हणजे विचार' आणि 'जीवन म्हणजे आचार' या दोन समीकरणांतून कोणाची निवड करावयाची हा एक प्रश्न आहे. शेवटी समीकरणाऐवजी त्यांचा समुच्चय (एकत्र) करण्याचे लोकांना सुचले; आणि ज्ञानकर्माच्या समुच्चयाने किंवा संयोगानेच मोक्ष मिळतो असे शहाण्या लोकांनी निश्चित केले. पक्ष्याला उडण्यासाठी जशी दोन पंखांची गरज असते, एका पंखाने उडता येत नाही, त्याचप्रमाणे ज्ञान आणि कर्म हे दोन पक्ष परस्परांशी सहकार्य करतील तेव्हाच जीवन उन्नत व्हावयाचे. जीव बंधनमुक्त होऊन शिवरूप अनंतात विहार करायचा.

आपले आजचे शिक्षण ज्ञान-कर्म संयोगाला (समुच्चय) स्वीकारील तर पाहता पाहता समाजाचा उद्धार होईल. पण आपल्याकडे केवळ ज्ञानवादी पण ज्ञानाचा खरा अर्थ घेत नाहीत. ज्ञान म्हणजे पुस्तकी ज्ञान, पार्थिव (व्यवहारी) शहाणपण, माहितीचा संचय, किंवा चातुर्याची परिसीमा असाच अर्थ करण्यात येतो, तथापि गीतेमध्ये ज्ञानाची व्याख्या करताना समाजाला उन्नत करणाऱ्या सर्व सद्गुणांची मालिकाच रचून ठेविली आहे. आणि हे सद्गुण केवळ विचाराने, तत्त्वचिंतनाने

की ग्रंथपरिशीलनाने शिकविता किंवा विकसित करता येत नाहीत, पण प्रत्यक्ष जीवन जगण्याने, चांगल्या सवयी दृढ करण्याने आणि आचरण करतेवेळी विचारपूर्वक चालण्याच्या प्रयासानेच हे आचरणात आणता येतात. **चित्तस्य शुद्धये कर्म** असे जे म्हटले आहे ते अक्षरशः खरे आहे, आणि भर्तृहरीने तर स्पष्टच सांगून टाकले आहे की बुद्धीचे शिक्षण (संस्करण) कर्माच्याच द्वारा होऊ शकते. **बुद्धिः कर्मानुसारिणी।**

सर्व उपनिषदांत मंत्रोपनिषद म्हणून ज्याची प्रतिष्ठा सर्वांत अधिक आहे ते ईशावास्य उपनिषद् पण सांगते की ज्ञान आणि कर्म हे अलग अलग असले तर ते अंधाऱ्या खड्ड्यात घेऊन जातात, दोघे एकत्र परस्पर सहकाराने चालतील तरच नैतिक मृत्यू टाळून माणूस आध्यात्मिक अमरत्व मिळवू शकतो. जसा प्रवास उजव्या पायाने होईल की डाव्या पायाने असे भांडण आपण उभे करीत नाही, पण दोन्ही पाय सारखेच वापरून यात्राधामाला जाऊन पोहोचतो तसेच ज्ञान आणि कर्म, बुद्धी आणि कौशल्य या दोघांचा सप्रमाण व समप्रमाण उपयोग करण्यानेच आपण जीवन-साफल्याच्या शिखरापर्यंत चढून जाऊ शकू.

निष्णातांच्या हातांच्या केवळ हालचाली पाहून पाहून शिकणारे शागीर्द केवळ कर्माचे तंत्रच जाणतात. यंत्राच्या मागील मूळ रहस्य कोणी समजू शकत नाही. केवळ कर्माला वरलेल्या लोकांची स्थिती तशीच होऊन जाते.

आणि केवळ बुद्धीचा विलास करणाऱ्याची दशा तर याहीपेक्षा वाईट होत असते. नुसत्या कर्मात काही नसले तरी कौशल्य व सफलता असते. केवळ बुद्धीचा विकास पंपाने हवा भरलेल्या चेंडूसारखा होत असतो. लाथ बसते तेव्हा तो चेंडू उसळतो आणि पुनः खाली पडतो. आणि त्या चेंडूला जर कोणी टोकदार सुई टोचली तर त्यात जशी हवा भरली जाते तशी ती चटकन निघूनही जाते. आणि मग मात्र त्याचा फक्त केविलवाणा चिमटलेला फुगा शिल्लक राहतो. नुसता कर्ममार्गी थोडी तरी बुद्धी वाढवितो, पण केवळ बुद्धिवादी कर्माचा तर विकासच करीत नाही. उलट आपल्या ठिकाणी कर्मकौशल्य येऊ नये अशी सतत भीती व जाणीव ठेवीत राहतो आणि नेहमी पराजित राहात असतो. कर्मकौशल्याच्या अभावी उत्तमांतील उत्तम बुद्धी पण विकृत बनत असते आणि ती स्वतःच्या संरक्षणासाठी आडवळणाच्या व मलिन रस्त्याचा अवलंब करीत असते. हातापायाच्या वापराशिवायची बुद्धी वांझ आणि आत्मविश्वास-रहित बनत असते.

जेथे कल्पना धावावयाच्या असतात तेथे बुद्धीचे पंख चालतात; पण निर्णय करण्याची शक्ती तर जो कर्मपरायण असतो त्याच्याच ठिकाणी असते.

नुसत्या कल्पनांचे वारू चालविणे ही एक गोष्ट असते, आणि सुयोग्य विचारशक्ती वापरून उलगडा घडवून आणणे ही दुसरी गोष्ट असते. एखाद्या परिस्थितीचा उकल

कर्मांद्वारा घेतलेल्या प्रत्यक्ष अनुभवाशिवाय सुचणारच नाही.

एका वस्तूकडे भल्याभल्या शिक्षणकर्त्यांचे पण लक्ष गेले नाही. हातापायांच्या शिक्षणाने बुद्धी विकास पावत असते आणि संस्कारिता फुलत असते याची जाणीव इतक्या लोकांना झालेली नाही ही दुःखाची गोष्ट आहेच. पण हातापायांच्या स्वाश्रयाशिवाय चारित्र्यसुद्धा कधीही घडविले जात नाही; घडले तरी ते दृढ होत नाही. संकट-प्रसंगी दगा देणाऱ्या या गोष्टीकडे कोणीही पद्धतशीरपणे लक्ष वेधले नाही. म्हणजे लक्ष वेधूनही लोक याकडे दुर्लक्ष करतात अशी तक्रार करायला अद्याप वाव मिळाला नाहीं. विलसिता आणि अपंगता यांना जपून ठेवून कोणाला चांगले चारित्र्य सांभाळता आले असे आजपर्यंत झाले नाही. ही गोष्ट मनुष्य स्वभावाच्याच विरुद्ध आहे. स्वावलंबन आणि संयम ही दोन चारित्र्याची फुफ्फुसे आहेत. ही दोन जर चालली नाहीत तर चारित्र्याचा प्राण क्षणभरही टिकणार नाही. जेथे स्वावलंबन (स्वाश्रय) आणि संयम नसतो तेथे पावलोपावली हार खाल्लेले जीवन अनेक प्रकारची लबाडी आणि कपटनीती यांचा आश्रय शोधत असते, आणि नंतर आडव्यातिडव्या युक्तिवादांनी, आत्मवंचना आणि समाजवंचना यापासून आपला बचाव कसा करायचा याचा शोध घेत असते. जो माणूस हातपाय वापरून कष्टाचे काम करण्याचा आनंद अनुभवत असतो त्याच्या ठिकाणी अखंड धैर्य असल्याने त्याच्यावर निराश होण्याची वेळ येत नाही.

तो उदार व दिलदार असतो. दुसऱ्यांच्या व्यथा पाहून त्याचे हृदय सहज विरघळते, कठीणांतल्या कठीण परिस्थितीतही आपण टिकून राहू की नाही असा संदेह त्याच्या ठिकाणी निर्माण होत नाही, कारण स्वतःच्या श्रमांच्या बँकेचे कधी दिवाळे निघत नसते. दुष्टपणाचे प्रमाण काढायला बसलो तर जे हातपाय न वापरल्याने अपंग बनलेले असतात, परावलंबित आणि आश्रित बनलेले असतात त्यांच्या ठिकाणी दुष्ट प्रवृत्ती अधिक असते. स्वावलंबन (स्वाश्रय) तर नेहमी उदारच असते, आणि अधिक म्हणजे उदारतेचे ढोंग करणारा श्रेष्ठत्वाचा खोटा आविर्भावही त्याच्या ठिकाणी नसतो हा एक मोठाच फायदा आहे.

बुद्धीच्या प्रयोगांनी जीवनपरिवर्तन करण्याची आवश्यकता ज्यांना समजते पण ज्यांना हातापायांचा वापर करण्याचे शिक्षण मिळालेले नसते त्यांची असहायता खरोखरच कीव करण्यासारखी असते. शेतात सोन्याची खाण आहे आणि त्याच्यावर बसलेला अपंग माणूस उपाशी मरत आहे. घरात धान्य, पाणी, जळणाची लाकडे, भांडी सर्व काही पडलेले आहे, परंतु अन्न शिजवता येत नाही म्हणून दुसऱ्या कोणाचे पाय धरून किंवा कोठे पैसे देऊन जेवायला मिळू शकेल की काय अशा आशेने डोळ्यांत प्राण आणून वाट पाहात बसावे लागते. जीवनपरिवर्तन करावयाचे असेल, सवयी लावावयाच्या किंवा बदलावयाच्या असतील तर ज्याला आपले हातपाय म्हणजे

सर्व इंद्रिये वापरता येतात त्यालाच ते शक्य आहे. नाहीतर जिवत असूनही इंद्रिये पक्षाघात झाल्यासारखी बनतात.

महाभारतात एका कथेत एक कोल्हा स्वतःपाशी बुद्धी आहे पण हात व हाताची बोटे नसल्यामुळे आपण स्वतः किती असहाय आहोत याचे दुःख करीत आहे, आणि हातपाय असूनही विषाद मानणाऱ्या, निराश होणाऱ्या आणि भाररूप होऊन जगणाऱ्या माणसाचा धिःकार करून त्याचे महद्भाग्य त्याला समजावून देतो. ईश्वराने माणसाला चार बोटे दिली, आणि या चार बोटांपासून वेगळा असून चार बोटांशी स्वतंत्र सहकार्य करणारा अंगठाही दिला यापेक्षा अधिक मोठे वरदान इतर कोणत्याही प्राण्याला मिळालेले नाही. हाताची शक्ती हाच एक मोठ्यांतला मोठा शोध आहे. हिला शिकवून माणूस सबंध जगाचा ताबा मिळळून अनेक प्रकारच्या योजना घडविण्याचा व त्या प्रत्यक्षात आणण्याचा आनंद मिळवू शकला. संस्कृतात हत्तीला 'करी' म्हणतात. त्याऐवजी माणसाला हा शब्द लावला असता तर काही चूक झाले नसते. मननशील तो मनुष्य आणि करसंपन्न तो करी. प्राचीन काळी योद्धे स्वतःच्या शास्त्रांमध्ये मंत्र भरून त्यांची अस्त्रे बनवीत असत. आपणही आपल्या हातांच्या बोटांमध्ये आपली कुशलता, आपली योजनाशक्ती, आपल्या चित्ताची एकाग्रता इत्यादी वेगवेगळ्या प्रकारची मानसिक शक्ती भरून या बोटांना अलौकिक अवजार बनवीत असतो. त्यात बुद्धी आणि नीती या दोन्ही विकसित होत असतात.

उद्योगी माणसाचा सामाजिक प्रभाव किती अद्भुत असतो हे पण जाणण्यासारखे आहे. उद्योगी माणसाचा आत्मविश्वास संसर्गाने पसरणारा असतो. कोठेही जर एखादे काम बिघडले किंवा बंद पडले तर तावडतोब 'करी' माणूस पुढे येऊन म्हणतो 'थांबा, मी करून दाखवितो. हे काम तर असेच होईल. दुसऱ्या रीतीने होणार नाही.' ते पाहणाऱ्याला मार्ग तर सापडतोच; पण त्याला असेही वाटू लागते की आपणही अशी शक्ती आपल्या अंगी खिळविली पाहिजे. या शक्तीमध्ये काही विशेष आहे. याप्रमाणे कुशल माणूस आपले स्वतःचे काम सुधारतो, एवढेच नाही, तर समाजाचे संपूर्ण वातावरण सुधारत असतो. लोकसंग्रह तर अशाच माणसाकडून होऊ शकतो. कर्म करणारा मनुष्य स्वतः तरून जातो आणि अनेकांना सहज रीतीने तारून नेत असतो.

आणि हस्तकौशल्याशिवाय कला कोठून विकसित झाली असती? कला ही वस्तू असते कल्पनेची, सर्जन शक्तीची. पण तिचा आविष्कार इंद्रियांद्वारां, इन्द्रियशक्तीनेच होत असतो.

ज्याच्यापाशी कलेसाठी इंद्रियांची शक्ती योग्य रीतीने वापरण्याचे धैर्य नाही तो तर कलेचे फक्त विवेचन करील, आस्वाद घेईल, आणि स्वतः असे मानेल की आपण बरेच काही केले. कलेच्या आस्वादाने मनुष्य अमुक एका मर्यादेपर्यंत शिकतो

खरा, परंतु कलेत प्रवीण झाल्याशिवाय माणूप उन्नत होत नाही. हात आहे तरीही तो मनाची कल्पना चित्रित करू शकत नाही, हृदयात ललित व उदात्त भाव स्फुरतात पण गळ्यातून आवाज काढू शकत नाही. मनात उत्कट भावना पेटून उठते, परंतु तेजस्वी वाणीद्वारा तो दुसऱ्याला चेतवू शकत नाही. मनात योजना आहे पण ती लोकांसमोर नीट मांडून लोकांमध्ये एकसूत्रता आणू शकत नाही. अशा माणसाची अपंगता, त्याचा विरस आणि विषाद एक महान शाप बनतो. अशा शापाचे निवारण हातापायाचे शिक्षण, इंद्रियशक्तीचा विकास आणि कर्मयोग यांच्या द्वाराच होऊ शकतो. प्रत्येक इंद्रियांची अभिरुची शिकविली जाईल, इंद्रियांच्या एकेक नसेवर पूर्ण नियंत्रण मिळविले जाईल, आणि विचार, विकार, भावना आणि प्रेरणा यांची सूक्ष्मातिसूक्ष्म छटाही इंद्रियांच्या द्वारा विविध रीतींनी व्यक्त होऊन कृतार्थ होईल तेव्हाच शिक्षणाला शिक्षण समजता येईल. तेव्हाच जीवन कृतकृत्य होईल.

याचसाठी भक्त प्रल्हादाने त्याला ईश्वराकडून प्रेरणा मिळताच गायिले—

योऽन्तः प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्ताम्
संजीवयत्यखिल शक्तिचरः स्वधाम्ना ।
अन्यांश्च हस्त-चरण-श्रवण-त्वगादीन्
प्राणान्नमो भगवते पुरुषाय तुभ्यम् ॥

—जीवन विकास : १०१-१०८

५. भावीयुगाचे शिक्षण

सामान्य लोक भविष्यकाळ अस्पष्ट, दूरवर्ती आणि पडद्याखाली झाकलेला असतो असे मानतात; पण ही गोष्ट खरी नाही. भविष्यकाळ वर्तमानकाळातच गुप्त रीतीने विचरत असतो. वर्तमानकाळात राहूनही भविष्यकाळ वर्तमानकाळाच्या नियमांनी बांधलेला राहात नाही. त्याचे स्वतःचे भविष्याचे नियम वेगळेच असतात व त्यांनाच तो जबाबदार राहात असतो. आजची बालके, आपल्या मांडीवर खेळणारी मुले भविष्यकाळाचे नागरिक आहेत. त्यांना भविष्यकाळाला अनुरूप व अनुकूल असे शिक्षण देण्याचे आपले काम आहे.

कित्येक लोक असे मानतात की शिक्षण म्हणजे मानवजातीने भूतकाळात केलेल्या कमाईचा संग्रह करून त्याचा भाता बालकांना तयार करून द्यावयाचा, ते होय. पण हा समज चुकीचा आहे. भूतकाळाचा संचय हा बऱ्याच वेळा भारभूतही होऊन राहतो. भूतकाळाचे संपूर्ण ओझे उचलून घेऊन जीवनयात्रेला प्रयाण करायला

बालकांना सांगायचे ही क्रूरताच समजायला पाहिजे. भूतकाळाचा अनुभव फेकून देण्याची मी शिफारस करीत नाही. भूतकाळाकडूनच वर्तमानकाळ घडत असतो, त्याच्यापासूनच भविष्यकाळाकडे पाहण्याची दृष्टी मिळत असते, हे खरे आहे; पण तेवढ्याचसाठी भूतकाळाने भुताप्रमाणे भविष्यकाळाच्या मानगुटीवर बसता कामा नये. भूतकाळ कितीही शहाणा व वयस्क (प्राचीन) असला तरीही त्याच्या ठिकाणी वार्धक्याचे अंधत्व आलेले असते. लहान बालकांचे हात धरून म्हाताऱ्यांनी चालावे या निसर्गाच्या प्रथेप्रमाणे जीवनयात्रेचे नेतृत्व बालकरूपी भविष्यकाळाच्या हातातच असावयास पाहिजे.

जीवनविकास : ५९६–९७

भविष्याचे शिक्षण (केळवणी) भूतकाळाच्या शिक्षणापेक्षा पूर्णपणे निराळे आहे. शिक्षणाच्या पद्धतीचा विकास तपासून पाहिला तर त्यात आपणास स्वाभाविक विकास होत गेलेला आढळून येतो. मनुष्य सर्वांत आधी शरीरालाच ओळखतो व सर्व काम शरीरामार्फतच करू पाहतो. मुलांमध्ये स्मरणशक्ती विकसित नाही झाली, करा त्याला शारीरिक शिक्षा– काढा त्याला झोडपून; मुलाला व्याकरणाचे नियम समजू शकत नाहीत, सांगा त्याला तोंडाने घोकंपट्टी करायला. मुलांची खूप काम करण्याची वृत्ती व चैतन्य मस्ती–दांडगाईमध्ये परिणत होते; त्याने दांडगाई केली तर करा त्याला उपाशी ठेवण्याची शिक्षा. असा एका काळाचा रिवाज होता, प्रथा होती. शरीराच्या मार्फत मनाला शिकविण्याच्या प्रयासांत आध्यात्मिक जगतात प्राणायामाची प्रथा उद्‌भवली आहे. श्वास रोखून धरून मनाला रोखण्याची ती एक युक्ती आहे. देहदंडन हा याच युगाचा एक इलाज आहे. या पद्धतीला आपण 'शारीरिक युग' असे म्हणू शकतो.

नंतर 'बुद्धियुग' अवतरले. बुद्धियुगात तर्कावरचा विश्वास अमर्याद होता. गुरू आणि शिष्य यांच्यात झालेले विख्यात संवाद नोंदवलेले अजून पाहावयास मिळतात. बुद्धीला सर्वश्रेष्ठ मानण्याने सर्वस्व प्राप्त होऊ शकते असे त्याकाळी मानले जात होते. त्याचमुळे सभा जिंकणे हा शिक्षणाचा अंतिम आदर्श असे. याच युगात भरदिवसा मशाली पेटवून पहिलवानांप्रमाणे विजयाकांक्षी पंडित देशभर फिरत राहायचे.

पण शेवटी तर्क अप्रतिष्ठित असतो असे माणसाला दिसले. मानवाचे रहस्य त्याच्या डोक्यात नसून ते हृदयात वसत असते असे लोकांना आढळून आले, आणि हृदयाचे युग सुरू झाले. या युगात संगीत आणि कला यांचा शिक्षणात अंतर्भाव करण्यात आला. संस्कार व विधी यांना महत्त्व प्राप्त झाले. हृदयाच्या द्वाराच शिक्षण द्यावे या तत्त्वाबरोबर गुरुभक्ती आणि गुरु–उपासना अस्तित्वात आली.

त्यानंतरचे युग ते 'आत्मयुग.' मानवजात या आत्मयुगात प्रवेश करण्याची तयारी करीत आहे. आत्म्याचा स्वभाव आहे स्वतंत्रता, निर्भयता, तेजस्विता व स्वयंस्फूर्ती.

आत्म्याचा स्वभाव आहे निर्वैरता आणि प्रसन्नता. या वृत्तींच्या द्वारा जे शिक्षण दिले जाते त्याला आध्यात्मिक शिक्षण म्हणता येईल. बालपणापासूनच जर असे शिक्षण दिले गेले तर ते बलप्रद व सामर्थ्य देणारे ठरल्याशिवाय राहणार नाही.

आत्मिक शिक्षणात स्पर्धेला स्थान नसेल; तेथे तर सात्त्विक सहकारच असेल. आत्मिक शिक्षणात भीती किंवा लालूच यांना जागे करून काम करून घेतले जात नाही, पण चैतन्यात जो स्वाभाविक उत्साह असतो त्याच्याद्वाराच काम करून घेण्यात येते. आत्मिक शिक्षणात कर्मयोग प्रमुख राहील, तरीही त्याच्याबरोबर ध्यानयोग व भक्तियोग हे पूर्णपणे मिसळलेले असतील. थोडक्यात सांगायचे झाल्यास आत्मिक शिक्षण म्हणजे कर्म, भक्ती, ध्यान आणि ज्ञान यांचे यांचे अपूर्व रसायन.

वीरयुगात कलहवृत्ती शिकविणे हा सुद्धा शिक्षणाचा एक आदर्श राहात असे. आत्मिक शिक्षणात आत्म्याची स्वाभाविक निर्भयता व तेजस्विता यांच्यावरच अधिक जोर दिला जातो. अशा शिक्षणामार्फतच आत्मिक युगाचे, अहिंसात्मक स्वराज्याचे आवाहन होऊ शकते. ज्यांना आत्मिक शिक्षण मिळालेले असते अशीच मुले अहिंसात्मक स्वराज्याविषयी संपूर्ण श्रद्धा दाखवू शकतील.

प्रेम, पावित्र्य आणि धैर्य हे आत्मिक शिक्षणाला पायाभूत असतात. असे शिक्षण शारीरिक शिक्षेच्या द्वारा देता कामा नये. तर्कवितर्काच्या जाळ्यात विद्यार्थ्याला पारंगत करून पण दिले जाणार नाही, वेगवेगळ्या प्रकारच्या विधींच्या, कर्मकांडाच्या सोपस्कारांनी विकसित करता येणार नाही. गुरू हा फक्त अनुकूल वातावरण निर्माण करतो, आपल्या शुद्ध वृत्तीने शुभसंस्कार आणि शिवसंकल्प वातावरणात प्रवाहित करीत असतो, आणि मुलांना स्वयंस्फूर्तीने व स्वेच्छेने त्यांचे ग्रहण करू देतो. **गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्याः संछिन्न संशयाः** या बीजमंत्राचा अर्थ आता आपण बरोबर समजू शकू. याचा अर्थ असा नाही की गुरूशिवाय शिक्षण दिले जाऊ शकते. आज देशात असंख्य गरीब बालके शिक्षणाशिवाय पडलेली आहेत. या स्थितीला कोणी नैसर्गिक शिक्षण म्हणत नाही. क्रूर निसर्गात आत्मविकासाची व्यवस्था नाही. गुरू स्वतः प्रत्यक्ष जगूनच साक्षीरूप राहून आत्म्याला स्वाभाविक वातावरण मिळवून देत असतो, आणि आत्मा जागृत होताच स्वयंविकासाचा आरंभ होत असतो.

राजकारणाप्रमाणेच शिक्षणात आत्मनिर्णयाचा अथवा स्वयंविकासाचा आदर्श प्रविष्ट व्हावयास पाहिजे. आज जगात दोन आदर्शांमध्ये भांडण चालू आहे. एक आदर्श साम्राज्याचा आणि दुसरा स्वराज्याचा. साम्राज्याच्या आदर्शाला सर्व तंत्र एकाच्याच हातात आणावयाचे असते. एक हुकूम करतो व सर्व तो मानतात, एकाच्या सत्तेनुसार सर्व चालतात, हा साम्राज्याचा आदर्श आहे. रावणाने याच आदर्शाचा प्रयोग करून पाहिला होता. शिक्षणात पण एक जागतिक शिक्षणखाते

उभे करून सर्वत्र एकाच छापाचे शिक्षित लोक निर्माण करावयाचे अशा आदर्शाला साम्राज्याचा आदर्श म्हणता येईल. स्वराज्याचा आदर्श यापेक्षा वेगळा आहे. आत्मा एकच आहे आणि तो परमात्म्याचा अंश आहे म्हणून शिक्षणाचे रहस्य सर्वत्र एकच असेल; पण तो आत्मा प्रत्येकात स्फुरण पावत असल्याने प्रत्येकाला स्वतंत्र रीतीने आपला विकास साधण्यासाठी वाव असावा, स्वातंत्र्य असावे, असा स्वराज्याचा आदर्श आहे.

खरी गोष्ट तर अशी आहे की आपण अद्याप भविष्याच्या शिक्षकांना नीट समजलो नाही. भविष्याचा शिक्षक हा जुना कारकून नाही, तो प्रजेचा गुरू आहे. आजचे राजकारण व समाजाचे नेतृत्व भले कोणत्याही वर्गाच्या हातात असो, पण भविष्यात मुलांची मनोरचना घडविणारा अध्यापकच समाजाचा नेता आणि राजकीय पुढारी सुद्धा होईल; कारण भावी कालाचा अध्यापक मानसशास्त्रज्ञही असेल आणि समाज-शास्त्रज्ञही असेल. समाजाच्या प्रत्येक अंगप्रत्यंगाप्रत त्याची ज्ञानपूर्ण सहानुभूती असेल, आणि प्राचीन काळच्या दूरदृष्टीच्या ब्राह्मणांना जे मानाचे स्थान समाजात लाभत असे तेच स्थान भविष्यकाळातील अध्यापक व त्यांच्या शिक्षणसंस्था यांना उपभोगायला मिळेल. खरा ब्राह्मण राजाच्या शासनाच्याही वर– पलीकडे राहात असतो. त्याचप्रमाणे शिक्षणसंस्थाही स्वतंत्र राहावयास पाहिजेत. ब्राह्मणाला दान करून नमस्कार करण्याची प्रथा आहे, तशीच आजही धनवान लोकांनी शिक्षण-संस्थांना श्रद्धापूर्वक मदत करावयास पाहिजे; आणि धनाचा सद्व्यय करण्यासाठी स्वतःला संधी देण्यासाठी नेहमी अध्यापक वर्गाचे ऋणी राहवयास पाहिजे. अध्यापक ज्या प्रमाणात समाजाचा विश्वास संपादन करतील आणि समाज त्यांना जेवढे स्वातंत्र्य येईल त्याप्रमाणातच ते व त्यांचे शिक्षण प्राणवान म्हणजे जिवन्त व प्रभावी बनेल. अश्रद्धेने जर अध्यापकांवर सत्ता चालवायला जाल तर त्यांच्याकडून निष्प्राण शिक्षणच मिळेल.

—जीवनविकास : ५९८–५९९

६. शिक्षणकर्त्यांचे मिशन

लोकमान्य टिळकांची एक गोष्ट पुनःपुनः आठवते. ते म्हणत असत की कवी स्वयंभू असतो; त्याला कोणी तयार करीत नाही. ही गोष्ट जितकी खरी आहे तितकी ही पण गोष्ट खरी की शिक्षक आणि वृत्तपत्रकार स्वयंभू असतात. त्यांना असे वाटले

पाहिजे की मजजवळ जगाला देण्यासारखे असे काहीतरी आहे, आणि जर मी ते दिले नाही तर जग बुडून जाईल. ज्यांनी संपूर्ण जीवनाचा विचार केलेला असेल, आपल्या सामाजिक जीवनासाठी आपण स्वतः जबाबदार आहोत हे ज्यांच्या मनावर ठसले असेल अशांच्याच ठिकाणी लोकमान्य म्हणतात तशी वृत्ती उद्‌भवू शकेल.

शिक्षण हे जीवनाकरिता असते, जीवनव्यापी असते, हे ज्याच्या मनात चांगले ठसलेले असते तोच स्वयंभू शिक्षक असतो. शिक्षणाचे सिद्धांत, शिक्षणाचे विषय आणि शिक्षणाच्या पद्धती ही सर्व जीवनासाठी असतात; जीवनाला सार्थ, समृद्ध आणि सफळ करण्यासाठी असतात. लग्नाच्या जानीत जमा झालेले वऱ्हाडी हेच गर्दी करून वधू व वर यांनाच घरातून काढून टाकू लागले तर कसे चालेल? त्याच-प्रमाणे जीवनाचा विचार कोरा ठेवून शिक्षण देण्याची खटपट कोणी करू लागले तर कसे जमेल? गेल्या शेपन्नास वर्षांत आपण दुसरे काय करीत आलो आहोत?

धर्मकारण, समाजकारण, राजकारण यांच्या क्षेत्रात जितके व जसे स्वतंत्र व मूलगामी चिंतन आपल्या लोकांनी केले तसा खोल व मूलगामी विचार शिक्षणाच्या बाबतीत आपल्या देशात केला गेला नाही. एक गोष्ट खरी आहे की शिक्षणाच्या क्षेत्रात नवा उत्साह, नवे बंड अथवा नवी क्रांती पुरेपूर झाली नाही, आणि शिक्षणाचे संदेश, शिक्षणाची स्मृती की शिक्षणाचे काव्य ही जनतेपुढे ठेवण्यात आलीच नाहीत. शिक्षणाचे महत्त्व, शिक्षणाचा परिणाम व शिक्षणाचे सामर्थ्य यांविषयी लोक काही जाणत नाहीत हे तर खरेच, पण शिक्षणाची किरकोळ विक्री करणाऱ्या शिक्षकांनाही काही कळत नाही ही मोठी दुःखाची गोष्ट आहे.

आपण लोकांना हे समजावून दिले पाहिजे की जेथे धर्मसुधारणा यशस्वी होत नाही, जेथे स्मृती काम करू शकत नाहीत, जेथे औद्योगिक चळवळी पंगू ठरतात, जेथे सामाजिक सुधारणा निष्प्राण बनतात आणि राजकीय चळवळी पण थकून जातात, तेथे शेवटी शिक्षणच मदतरूप ठरते.

अपबल तपबल और बाहुबल चौथा है बल दाम।
सूर किशोर कृपा से सब बल हारे को हरनाम॥

हे जसे कवीने गायिले आहे तसे आपणही लोकांच्या मनावर हे ठसवायला पाहिजे की जेव्हा सर्व उपाय निरुपयोगी ठरतात तेव्हा खरे शिक्षण, राष्ट्रीय शिक्षण समाजा-साठी संजीवनीरूप बनत असते.

जगाचे सुधारक जीवनाचे गांभीर्य जेव्हा ओळखत नाहीत, सामाजिक मनोरचना ओळखत नाहीत, आणि आमजनता अज्ञानामुळे कशाचाही विचार करण्याला नकार देते तेव्हा समाजात नवचैतन्य कोठून येणार? राजकीय चळवळीत पाहिजे असलेला स्वार्थत्याग, आणि संपासाठी लागणारे मनाचे ऐक्य जोपर्यंत तयार होत नाहीत,

आणि जोपर्यंत लोक गैरसोयी सहन करण्यास तयार होत नाहीत, तोंपर्यंत स्वराज्याची प्राप्ती होऊ शकणार नाही. आत्म्यावर दृढ श्रद्धा आणि पारमार्थिक जीवनाची अभिलाषा जोपर्यंत निर्माण होणार नाही तोपर्यंत धर्मसुधारणा ही नव्या भांडणांचे व मतभेदांचे साधनच बनून राहणार. सर्व रीतींचे असे दौर्बल्य पाहिल्यानंतर 'तेव्हा काय करायचे?' असा जेव्हा प्रश्न मनासमोर उभा राहतो तेव्हा एकच उत्तर मिळते की, 'लोकांना प्राणदायी जिवंत शिक्षण द्या.' शिक्षणानेच राष्ट्र चैतन्यशील बनेल, शिक्षणानेच लोकामध्ये नवा उत्साह संचरेल, शिक्षणानेच वार्धक्याची कात टाकली जाईल आणि त्यात यौवनाचा जोश संचरेल.

पण असे शिक्षण देणारी व्यक्ती सामाजिक परिवर्तन, धार्मिक मनोमंथन, औद्योगिक जागृती व राष्ट्रीय आंदोलनाचे रहस्य, त्याचा इतिहास, त्यातील उणीवा वगैरे सर्व जाणणारी असली पाहिजे; तेव्हाच पर्वतशिखरावर उभी राहून समाजाला जागृत करणारे रणशिंग ती फुंकू शकेल.

मगच ती लोकांच्या हिताहिताचे प्रश्न त्यांच्यासमोर मांडून त्यांना चेतवू शकेल व लोकांचे लक्ष वेधून घेऊ शकेल. 'पूर्ण आराम हा कायमचा हराम असतो' हे मॅझिनीचे वाक्य शिक्षणकारांच्या तोंडूनच समाजाने ऐकावयास हवे. शिक्षणकारच समाजाला सावध करू शकतात; शिक्षणकारच आत्मोन्नतीचा मुहूर्त लोकांना जाहीर करू शकतात. आज शिक्षणकारांचे मुख्य काम स्वतःचे ईश्वरी कार्य ओळखण्याचे आहे, ते ओळखल्यानंतर त्याला लायक बनण्याचे आहे, आणि त्याला लायक बनल्यावर मग त्याची दीक्षा घेऊन एकनिष्ठपणाने त्या कार्याला स्वतः वाहून घेणे हे आहे.

—जीवनविकास : ४६–४७

७. संस्कारितेद्वारा जीवनपरिवर्तन

स्वरी कार्यशक्ती विकसित करणारी संस्कारिता निर्माण करणे हा शिक्षणाचा उद्देश आहे. आज दोन प्रकारांची संस्कारिता समाजात प्रचलित आहे. उद्योगविमुख रिकाम्या लोकांनी रसिकतेचे पोषण करील व तिला प्रतिष्ठा मिळवून देईल अशी भोक्त्या लोकांची संस्कारिता घडविली आहे. जेथे व ज्यापासून भोग्य वस्तू मिळतील तेथे व तेथून त्या मिळवायच्या, आणि त्यांच्या पुरेपूर आस्वाद घेता येण्याइतकी भोगशक्ती मिळवायची याच्याच मागे ही संस्कारिता लागली आहे. आमचा समाज

या भोगैश्वर्यप्रधान संस्कृतीलाच संस्कृती म्हणून ओळखतो. हिलाच तो खरी संस्कृती समजतो. ही त्याग व उद्योग यांच्या मागे मागे येते, आपल्या देशात या संस्कारितेची योग्य कदर करण्याचे अनेक शतकांपासून सोडून दिले त्यामुळे ती अपमानित झाली आहे. स्वराज्याची शक्यता ही त्यागोद्योगप्रधान संस्कृतीवरच आधारलेली आहे. अशी संस्कारिता समाजात आणण्यासाठी शिक्षण पूर्णतया वेगळ्याच धर्तीचे असावयास पाहिजे.

संस्कारिता धर्माच्या द्वारा घडविण्याचा प्रयत्न प्राचीन काळापासून केला जात आला आहे, आणि धर्माची ही शक्ती नित्य व कायम राहिली आहे. प्रवासाच्या द्वारा आणि लोकव्यवहार पाहून ही संस्कारिता नेहमी घडविण्यात आली आहे. गेली आठदहा शतके झाली संस्कारिता घडविण्याचे कार्य साहित्याने आपल्या शिरावर घेतले आहे. त्यामुळे आपले सर्व शिक्षण साहित्यप्रधान बनले आहे. आता फुरसत ही एकतर फकीराला मिळते नाहीतर अमीराला (श्रीमंताला) मिळते. फकीर विरागी असतो. त्याने वासनेचा क्षय केलेला असतो, म्हणून तो हवे तेवढे रिकामपण काढू शकतो. परंतु तो एका विशिष्ट प्रकारचेच साहित्य निर्माण करू शकतो. अमीरी फुरसत तर खूपच लोकांना अज्ञानात ठेवून त्यांची कमाई सक्तीने कमी करून घेऊन मिळविली जाते. म्हणजे सामाजिक अन्याय केल्याशिवाय अमीरी फुरसत संभवूच शकत नाही. म्हणून पुष्कळ वेळा साहित्यिक आणि साहित्यप्रधान शिक्षणाचे पुरस्कर्ते स्वतः गरिबीत राहात असूनसुद्धा अमीरी फुरसतीचे पोषण करीत असतात, आणि अन्यायाला आधार देत असतात, अथवा काही नसले तरी अन्यायाला मान्यता देऊन तो सहन करीत असतात.

संस्कारिता शिकविण्याचे आव्हान पत्करून अलीकडे अलीकडे भौतिक शास्त्रज्ञांनी ते कार्य स्वतःकडे घेतले आहे. भौतिकशास्त्रांच्या ठिकाणी बुद्धी आणि कल्पनेला प्रखर करण्याची शक्ती असाधारण आहे. निरीक्षण, परीक्षण आणि ध्यानाची शक्ती शिकवून भौतिकशास्त्रांनी मनुष्यजातीला खूप उंच चढविले आहे. पण विज्ञानाचा उपयोग भोग आणि ऐश्वर्य यांच्याच साठी होत असल्याने भौतिकशास्त्रांनी सामाजिक अथवा राष्ट्रीय महत्त्वाचे उद्योग जनतेच्या हातून शक्य तेवढे हिरावून घेऊन विशिष्ट वर्गाच्या हाती ते सोपविले आहेत, आणि त्यामुळे जगद्व्यापी होऊ शकणारा अन्याय शक्य केला आहे. या भौतिकशास्त्रात सध्याचे संपत्तिशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र यांचाही समावेश होतो.

संस्कारिता शिकविण्याची आशा आता तर कलेपासून अधिक बाळगली जाते. कलेद्वारा अभिरुची घडविली जाते, वृत्तींच्या वेगात मार्दव येते, कोणतीही बेसुरता सहन होत नाही. क्षणिक वासनेला वश न होता संपूर्ण जीवनच प्रमाणबद्ध करण्याकडे प्रवृत्ती वाढत जाते. कलेच्या द्वारा संपूर्ण विश्वाचे, आणि त्यातील मनुष्यजीवनाचे

रहस्य अधिकात अधिक प्रकट होत असते, आणि त्यामुळे कला ही संस्कारितेचे सर्वोच्च साधन असते. खरे शिक्षण तर कलेतच असते, आणि म्हणून कलांद्वाराच सामाजिक स्वास्थ्य साध्य होऊ शकते असे आजच्या काळाचे मत आहे. स्वतःला विसरल्याशिवाय कला संभवत नाही. मंथनामधूनच कलेची ज्योत प्रकट होत असते. कला ही भोगविलासाची वस्तू नाही, पण आत्म्याची शक्ती प्रकट करण्याची व सर्व हृदयांशी एकता अनुभवण्याची युक्ती आहे. कलेच्या या बाजूकडे जर लक्ष दिले गेले तर कला विशुद्ध बनेल, आणि ती लोकांना आशीर्वादरूप ठरेल. आपल्या देशात साहित्य, संगीत आणि कलांनी राजवैभवाची सेवा पत्करून, नीतीला विसरून केवळ रसिकता शिकविली आणि त्यामुळे त्या कला क्षीणवीर्य बनल्या, खऱ्या संस्कारिते-ऐवजी जर बरबरची दिखाऊ चमकच आपण शिकवीत गेलो तर आत मात्र खूपच अन्याय, भ्रष्टता व नैतिक अधःपतन भरून राहू शकते, आणि कालांतराने त्याची असह्य दुर्गंधी येऊ शकते.

संस्कारिता जर जनव्यापी (सार्वत्रिक) करावयाची असेल तर ती उद्योगप्रधान व्हावयास पाहिजे. ईश्वराच्या दुनियेत उद्योग हेच मनुष्यजीवनाचे प्रधान अंग आहे. तुकाराम, कबीर, सेंट पॉल यांच्यासारखे संत उद्योगाच्या प्रवृत्तीने आपले जीवन शुद्ध ठेवू शकले. धर्माचा दिलासा, समाजसेवेची शांती, उद्योगाचे रसायन, आणि शिक्षणाचे तेज या चतुर्विध पुरुषार्थातूनच व्यक्तिगत आणि राष्ट्रगत कृतार्थता माणसाला मिळावयाची असते, हे जेव्हा समजेल तेव्हाच सत्ययुगाला सुरुवात होईल; आणि पौराणिक भाषेत सांगायचे झाले तर रामराज्य पाहायला मिळेल.

त्यांगोद्योगाचे शिक्षण देणे हा आता आपला मुख्य उद्देश आहे. असे उद्योग आपण शोधावयास पाहिजेत की ज्यांपासून चार धनिकांना रोज हजार रुपये मिळणार नाहीत, पण भुके मरणाऱ्या हजारो लोकांना जगण्यासाठी रोजगार देता येईल. अशा राष्ट्रीय उद्योगांना मध्यवर्ती स्थान देऊन त्यांच्या रुंद व मजबूत पायावर राष्ट्रीय जावनाची इमारत उभारावयाची आहे. अशा शिक्षणाच्या परिणामाने जीवनपरिवर्तन झालेच पाहिजे. आजचा काळ साधेपणा व गरिबी यांना इतका भितो व तो इतका भ्याड बनला आहे की गरिबीचा स्वीकार करण्यापेक्षा त्याच्यामागे असलेल्या सत्याचाच तो युक्त्याप्रयुक्त्या करून इन्कार करण्यासाठी खटपट करीत राहतो.

शिक्षणाद्वारा आपण समाजसेवक तयार करण्यासाठी प्रयत्न करतो; त्याच्या आड काय काय येते ते आपण तपासून पाहावयास हवे. जेथे श्रम व प्रयत्न न करता प्रत्येक वस्तू मिळेल तेथे जाणे अशी शहरी जीवनाची वृत्ती असते हाच एक मोठा अडथळा आहे.

उपयोगाच्या आणि उपभोगाच्या वस्तू मिळविण्यासाठी केवढी धडपड, किती यातायात, केवढा अन्याय, किती जीवनव्यय होत असतो याची शहरी जीवन पर्वा

करीत नाही. त्यामुळे सामाजिक अन्यायाविषयी धर्मबुद्धी सर्वदा बेदरकार राहात असते. अशा रीतीने मिळविलेल्या साधनसामग्रीचा जास्तीत जास्त कोण उपभोग घेणार हाच एकमेव प्रश्न शहरासमोर असतो. त्यातून खर्चिकताही खूप वाढते, आणि खर्चिकता म्हणजेच सामाजिक अन्याय होय. एकदा का त्याची सवय जडली की जीवनात चुकीच्या वस्तूंवर जोर दिला जातो, आणि मध्यमवर्गाची, उच्चवर्णीयांची संकुचित वृत्ती आणि चतुराई तयार होते. मध्यमवर्गाच्या विद्वान लोकांमधून जीवन-दृष्टी जाऊन त्यांच्या ठिकाणी वकिली दृष्टी येते. कौटुंबिक सहकार कमी पण कायदे-बाजपणाच अधिक निर्माण होतो. संकोच न बाळगता कितीही स्वार्थ वृद्धिगत केला आणि कितीही संकुचितता शिकविली तरीही लाजिरवाणे कसे वाटणार नाही याचाच शोध जेथे तेथे चालत राहतो. यातूनच जातीयवाद प्रकट झालेला आहे. युरोपातील राष्ट्राराष्ट्रांतील संघर्ष पाहून आपल्याकडे जातीयवादाला आधार मिळत जातो ही गोष्ट कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाही. शहरी जीवनात आळस किंवा रिकामपण अधिक दिसून येत नाही, लोक नेहमी कामात गुंतलेले दिसतात हे खरे, पण ही सर्व प्रवृत्ती वरवरचीच असते. साधने व सोयी या प्रमाणात पाहिल्यास मध्यम वर्गातील व उच्च वर्गातील लोक जी बौद्धिक व औद्योगिक मेहनत किंवा कष्ट करतात ते जवळजवळ काहीच नसतात असे म्हटले तरी चालेल.

साहित्यप्रधान शिक्षणाने बुद्धीचा विकास होतच असतो असे आपण समजतो खरे, पण असे मानण्यामागे काही भ्रम, गैरसमज आहे. केवळ साहित्यप्रधान शिक्षण उसन्या विचारांचा तयार माल पुरवीत असते. त्यामुळे अनेक लोकांपाशी अनेक विचार असतात. फार थोडे लोक स्वतंत्र विचार करीत असतात. हे विचारांचे शिक्षण नाही, तर विचाराचे पिशाच्च (भूत) आहे. ही शक्ती नाही, पण ओझे आहे. उद्योगप्रधान जीवनाच्या कसोटीवर मते व विचार रोज घासून पाहिले तर विचारमय धार्मिक जीवन खरोखरच शिकता येईल. आयते, तयार विचार धारण करण्याची एकदा सवय जडली म्हणजे मग ग्रंथावर अवलंबून राहणे वाढत राहते. यातूनच परदेशाकडून प्रेरणा घेण्याची सवय आपणांस जडू लागली आहे. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, जर्मनी, रशिया असे जे कोणते देश विचारांचा तयार माल आपणाकडे पाठवतील त्याचा आनंदाने स्वीकार करण्यास आपण तयार होत असतो.

जगाबरोबर आपणास काही असहकार करावयाचा नाही. अनुभव आणि विचार जेथून मिळतील तेथून घेऊ या, पण ते जसेच्या तसे धारण करण्याकरता नकोत, तर आत्मसात् करण्यासाठी पाहिजेत. अन्नापासून रक्त तयार होतं तेव्हाच ते शरीराला पोषण देऊ शकतं. आपले स्वतःचे प्रयोग चालत असतील, सामाजिक जीवनाचे प्रयोग आपण सतत करीत राहू, तरच तेथील किंवा परदेशांचे साहित्य आपणास उपयोगी पडू शकेल, पण जर आपण प्रयोग करायला कंटाळत असू, नव्यानव्या

जबाबदाऱ्या पार पाडण्यास खबरत असू, ज्यांत कष्ट करावे लागणार नाहीत असेच कार्यक्रम पसंत करीत असू, आणि साधेपणा, सोपेपणा, कष्ट करावे लागू नयेत व सुरक्षितता मिळावी यालाच प्राधान्य देत असू, आणि जरी जोश, उत्साह, हिंमत व धैर्य यांचा कितीही आव आणला तरी आपण वर चढू शकणार नाही. जेवढे काही अवघड, कठीण असेल ते गुंतागुंतीचे असते असे ठरवून जर ते आपण बाद करीत गेलो तर आपल्या जीवनात काहीच उरणार नाही. धर्माचे जुने विधी आणि पौराणिक मते आता टिकून राहणार नाहीत. ज्या समाजासाठी व ज्या प्रकारच्या जीवनासाठी ती होती त्यांचा काळ आता राहिला नाही. म्हणजे धैर्याने आता नवा वेश परिधान केला तरच ठीक. अज्ञान, भीती, लालूच, संशय, कायदा आणि सक्ती या माणुस-जातीच्या सहा शत्रूंच्या साहाय्यानेच धर्माने आजपर्यंत आपले व्यवहार भागविले आहेत, एवढेच नाही तर उत्साहाने त्यांची मदत मागून घेतली आहे. त्यामुळेच धर्मासारखी सार्वभौम आंतरिक शक्ती मानवजातीला वाचविण्याऐवजी कित्येक वेळा मानवाची प्रगती अडविण्यास साहाय्यक झालेली आहे. धर्माने त्रस्त व अगतिक होऊन जर आपण जडवादाचा स्वीकार केला तर कालचक्राला मागे फिरविण्यासारखे ठरेल आणि शिक्षणाने उलटेसुलटे केले असे मानण्यात येईल. शिक्षण हे प्रगतीकरता असते. गेलेला, संपलेला काळ परत आणण्यासाठी ते नसते.

शिक्षणद्वारा आपणास एका महान क्रांतीची तयारी करावयाची आहे. बाह्य वस्तूची मोडतोड, करून क्रांती होत नसते. सामाजिक संस्थांमध्ये शाब्दिक बदल की निरुपयोगी भांडणे व वितंडवाद उभे करून अथवा शिवीगाळ व आरोप–प्रत्यारोप करून क्रांती होत नसते. क्रांती म्हणजे आंतरिक बदल, मनोवृत्तीतील परिवर्तन असते. दुधाचे दही करणे हा क्रांतीचा अर्धा भाग आहे; त्यानंतर शांतपणे दही घुसळून त्यातून लोणी काढणे हा क्रांतीचा दुसरा भाग आहे. आज आपणांस झटपट, घाईने क्रांतीची पूर्वतयारी करावयाची आहे. विचार व सवयी यात क्रांती करून आपण आरंभ करू या. त्यातून आदर्शाची क्रांती होईल. एकदा नवे आदर्श नक्की केले म्हणजे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय क्रांती व्हावयाला वेळ लागणार नाही.

आंधळ्या रीतीने लोकांना भडकावून पण क्रांती होऊ शकते. पण त्यातून चांगलेच निष्पन्न होईल अशी खात्री राहात नाही. दिशाहीन (आंधळ्या) भडकावणीने नेहमी गरीब जनतेला वाईट परिणाम भोगावे लागतात, आणि लबाड लोकच त्याचा फायदा करून घेत आले आहेत. आता आपणांस अशी क्रांती करायची आहे की गरिबांच्या खांद्यावर चढून बसलेल्यांना खाली उतरून स्वतःच्या पायांनी चालावे लागेल, आणि रिकामटेकड्या ढोंगी लोकांचे ओझे वाहून ज्यांचे पाय ढिले झाले आहेत त्यांना पण चालण्याचा उत्साह येईल. अशा रीतीने दोन्ही वर्ग आत्मनिर्भर बनतील.

जशी विवेकहीन भडकावणी उपयोगाची नाही तशीच केवळ तात्त्विक चर्चाही

कामाची नाही. केवळ तात्त्विक चर्चांनी काम होत असेल तर पाचपंचवीस विचारवंतांना समुद्राच्या किनाऱ्यावर किंवा गिरिशिखरांवर झोपड्या बांधून देऊन प्रत्येकाला एकेक ग्रंथालय आणि एकेक मासिक सुपूर्त करून आपण समाजाचा उद्धार करू शकलो असतो. पण क्रांती तर जनतेच्या जीवनामधून, त्यांच्या सवयीमधून, त्यांच्या उद्योगांमधून आणि त्यांच्या अधीरपणातून व चिडीतून जन्म घेत असते. तेव्हा विद्वान लोकांनी आपले शास्त्रीय शब्दजाल आणि पांडित्याची अलिप्तता सोडून देऊन जनतेशी समरस व्हावयास पाहिजे, मग पोषाखाची टापटीप आणि विवेकाची मुलायम घडी भलेही विस्कळीत होवो. आपसांत एकमेकांशी भांडत बसण्यापेक्षा जनतेच्या हितासाठी जनतेच्या शत्रूशी ते झगडले तर विद्येचे वंध्यत्व तरी दूर होईल!

राष्ट्रीय शिक्षण साहित्यप्रधान ठेवून चालणार नाही. त्याला स्वार्थप्रधान किंवा प्रतिष्ठापरायण ठेवूनही चालणार नाही. सध्याची शिक्षणपद्धती काही व्यक्तींचा दर्जा उंचावते खरी, पण राष्ट्रीय शक्ती मात्र निखालसपणे खच्ची करीत आहे. शिक्षण सेवाप्रधान असायला पाहिजे, स्वराज्यप्रधान असायला पाहिजे, स्वधर्मप्रधान असायला पाहिजे. खेडोपाडी पसरू शकेल असे असायला पाहिजे. त्यात उद्योग आणि 'संस्कारिता' या दोघांचाही समन्वय असायला हवा...आपली ध्येयनिष्ठा आणि विविध अनुभव यांपासून जोपर्यंत विद्यार्थी आपली प्रेरणा व धैर्य चोखून घेऊ शकणार नाही तोपर्यंत त्याला पुरे पडेल असे चारित्र्य, माहिती, कौशल्य, लढण्यासाठी बळ या सर्वांचा मिळून भाता पूर्ण भरण्यासाठी शिक्षण हवे आहे.

जीवनाचे विभाग नाहीच पडत. गरजेपुरती आजीविका (निर्वाहक्षमता), सर्व अडीअडचणींना पुरून उरता येईल अशी प्रकृती (आरोग्य), शुद्ध सामाजिक संबंध आजच्या जमान्याला आवश्यक इतका बुद्धीचा विकास, सामाजिक घाण व अनिष्ट गोष्टी दूर करण्याइतके हृदयाचे आर्यत्व आणि प्रत्येक प्रसंगात टिकून राहता येईल एवढी ईश्वरनिष्ठा या सर्व गोष्टी शिक्षणात यावयास पाहिजेत. तरच वाचलेली पुस्तके आणि शिकलेले उद्योग जनतेच्या जीवनात प्राण फुंकतील, चैतन्याचा संचार करतील. थोडक्यात सांगायचे झाल्यास शिक्षणद्वारा नवाच मानव घडवायचा आहे, दैवी मनुष्य निर्माण करावयाचा आहे. त्याची संपूर्ण मनोवृत्तीच आगळी, मनाची व जीवनाची घडणच वेगळी; त्याचे आदर्श वेगळे, त्याचा मार्ग वेगळा, आणि त्याचे समाधान पण आगळेवेगळेच असेल.

—जीवन विकास ५–१२



८. नव्या शिक्षणाचे स्वरूप

एका सुप्रसिद्ध विद्वानाने म्हटले आहे की मनुष्यजीवनाचे पिकलेले फळ विचार नसून क्रिया आहे. आपल्या लोकांनी हा विचार व्यक्त करण्यासाठी या जगाला 'कर्मभूमी' म्हटले आहे. कर्म करण्यानेच माणूस जगत असतो. कर्मानेच ज्ञानाचा साक्षात्कार घडत असतो, आणि कर्मानेच हृदयात निश्चय बांधला जातो.

शिक्षणात कर्माला अलीकडे स्थान मिळू लागले आहे. जुन्या शिक्षणरचनेत अक्षर व स्मृती यांच्यावरच भिस्त ठेवली जात असे. जुन्या काळात कर्माचे कौशल्य शिकविले जात नव्हते असे तर काही नाही, पण शिक्षणाचे हे क्षेत्र कमी समजले जात असे. हळुहळू संगीत, चित्ररेखन वगैरे ललितकलांचा शिक्षणात प्रवेश झाला, आणि हौसेच्या हुन्नरालाही त्यात स्थान मिळाले. लेखन, वाचन, गणित हा जुना त्रिविध कार्यक्रम जेव्हा अपुरा समजला जाऊ लागला तेव्हा डोके, हात व हृदय या तीन अंगांचा सार्वत्रिक विकास हेच शिक्षण अशी व्याख्या आपल्यासमोर आली. अशा रीतीने इंद्रियांच्या विकासाच्या आदर्शाची जतन करण्यासाठी हस्तकौशल्याकडे लक्ष देण्यात येऊ लागले...इंद्रियांचे शिक्षण, शारीरिक विकास आणि हस्तकौशल्याची आवड ही सर्व एकत्र येऊन औद्योगिक शिक्षणाचा आदर्श तयार करण्यात आला. आणि 'डोके, हात व हृदय' सूत्र मागे पडून 'सांस्कृतिक शिक्षण की औद्योगिक शिक्षण' हा प्रश्न उभा राहिला.

खरे पाहता 'संस्कारांचे शिक्षण आणि उद्योगांचे शिक्षण' असा फरकच करायला नको होता. जर राष्ट्रीय सामर्थ्य आणण्याची इच्छा वाटत असेल, तेजस्विता जागृत करावयाची असेल, दीर्घोद्योग विकसित करावयाचा असेल, तर अक्षर आणि हुन्नर यांच्यात फारकत होता कामा नये. औद्योगिक शिक्षणद्वारा शरीर कमविले जात असते, इंद्रियांचा विकास होत असतो, आर्थिक चिंता दूर केली जाते, स्वावलंबन शक्य होते, वगैरे फायदे तर होतातच, हे निर्विवाद आहे; पण औद्योगिक शिक्षणाचा मुख्य लाभ तर चारित्र्याची तेजस्विता हाच राहिला आहे. औद्योगिक शिक्षण घेणारी जनता चारित्र्यसंपन्न व खंबीर वृत्तीची असते. औद्योगिक शिक्षणाचा हा फायदा आपण पुरेसा लक्षात घेतलेला नाही उद्योग हा सार्ववर्णिक विश्वधर्म आहे. शिक्षणात त्याला आद्य व प्रधान स्थान असावयास पाहिजे. ज्याला आपण आज संस्कारिता म्हणून ओळखतो तो बराचसा वरवरचा शृंगार, देखावा असतो. खऱ्या संस्कारितेत सांगाडा तर उद्योग व त्याच्याबरोबर येणारी उदारता हाच असतो. उद्योगाच्या शरीरात ज्ञानाचा श्वास फुंका आणि प्रेमसमभावाच्या चैतन्याला प्रवाहित करा, म्हणजे जनतेच्या शिक्षणाचा उद्धारकर्ता अवतीर्ण झाला असे समजा. असे शिक्षण जनतेसाठी काय करू शकणार नाही?

—जीवनविकास ५१-५२

विभाग तिसरा

तत्त्वज्ञान

काका हे मुळात तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी असून सर्व गोष्टींकडे ते बुद्धिनिष्ठ दृष्टीने पाहतात. त्यांच्या सर्व तात्त्विक विचारांचा येथे उल्लेख नाही, पण त्यांना जीवनाच्या सर्व विचारांत, कृतींत, भावनांत तत्त्वज्ञान गवसते व त्याकडे ते लक्ष वेधतात. काका हे उच्च दर्जाचे निसर्गप्रेमी, कलाप्रेमी व रसिकवृत्तीचे लेखक आहेत. पण त्यांचे तत्त्वज्ञान हे जीवनापासून अलिप्त नसून त्यांना सामान्यातही असामान्यत्वाचा साक्षात्कार होतो आणि नैसर्गिक घटनांतही त्यांना तत्त्वज्ञान दिसते. तत्त्वज्ञानाची मजबूत बैठक जीवनाला आवश्यक असते, आणि जीवनापुढे उच्च, उदात्त व भव्य आदर्श असले तरच मानवाला खरे समाधान व कृतार्थता लाभते असे काका म्हणतात. तत्त्वज्ञान व्यापक दृष्टीचा अवलंब करीत असते व तशा दृष्टीने ते समन्वय करीत राहते. खऱ्या समन्वयाचे स्वरूप त्यांनी स्पष्ट केले आहे. यात काकांचे मूलगामी मनन व्यक्त झाले आहे.

१. मूलगामी मनन
२. ज्ञानपद्धती
३. उपनिषदे
४. स्व-तंत्र म्हणजे आत्म-तंत्र
५. वास्तववाद वि. ध्येयवाद
६. तत्त्व आणि व्यवहार
७. आचार्य
८. खरा समन्वय
९. आमंत्रण
१०. प्रेम आणि प्रणय
११. सार्वभौम भरती-ओहोटी
१२. सामान्यात असामान्यत्व
१३. अहिंसा

१. मूलगामी मनन

—And having found his instrument,
Forgets or disregards or more presumptuous still,
Denies the Power that wields it.

—William Cowper

निसर्गात बुद्धी, हेतू आणि योजना नाही असे कोण म्हणू शकतो ? मदान्ध होऊन जी बुद्धी निसर्गाविषयी असे संकुचित मत धारण करते ती बुद्धीही निसर्गाचीच कृती नाही का ?

सृष्टीत असंख्य जीव उत्पन्न होतात. त्यांना पोषण मिळत असते, त्यांचा विकास होत असतो आणि त्यांचा नाशही होत असतो. आणि हे सर्व विशिष्ट कल्याणकारी नियमाच्या धर्माप्रमाणे होत असते ही गोष्ट काय दर्शविते ? जेथे पाहावे तेथे व्यवस्था असते, योजना असते, औचित्य असते, आनुकूल्य असते, सुंदरता असते, धीर असतो, विकास असतो. हे सर्व महाबुद्धीशिवाय होऊच शकत नाही. वनस्पतीचे जीवन तपासा. सूक्ष्मकोटीचा जीवधर्म शोधून काढा. ताऱ्यांच्या विस्ताराचे व त्यांच्या विराट नर्तनाचे चिंतन करा. हृदयाच्या गूढ आणि जटिल भावनांच्या महासागरात अवगाहन करा. ज्ञात आणि अज्ञात सर्व काही अद्‌भुत आहे, व्यवस्थित आहे, हेतुपूर्ण आहे. पर्णांचे आकार, मेघांच्या अस्पष्ट रेखा, हाडाची रचना, शंखांचे सुंदर वळणदार नक्षीकाम, पक्ष्यांचे पंख, हिंस्त्र जनावरांची भूक, श्वापदांची भीती, दुष्टांची कारस्थाने, आणि प्रत्येकाला व्यापून राहणारी अल्प किंवा महानिद्रा—हे सर्वच हेतुपूर्ण आहे. काही आपल्याला आवडते, काही आवडत नाही. काहींनी आपणास संतोष वाटतो, काहींचा आपणास वीट येतो. हा आपला जीवनधर्म झाला. आपण छोटे, अंशमात्र आहोत. अंशाच्या भावनेने संपूर्णाची रचना की योजना मोजता येणार नाही, त्याचे मूल्य ठरविता येणार नाही. भुकेशिवाय जसे अन्न पचत नाही, जिज्ञासेशिवाय जसे निरीक्षण होत नाही, अखंड जागृतीशिवाय उन्नती जशी साधता येत नाही तसे नम्रतेशिवाय, स्वतःच्या अल्पज्ञानाची जाणीव झाल्याशिवाय विश्वरहस्याचे अंधुकही दर्शन होणार नाही; एवढे तरी माणसाला कधी समजणार ?

जीवनव्यवस्था : १२८

जेथे पाहावे तेथे किती सुंदरता आहे, केवढी व्यवस्था, किती परस्पर-अनुकूलता, किती मितव्ययता, केवढे सामंजस्य !

मग का निसर्गात भांडण तंटे, संघर्ष, स्पर्धा, अपव्यय, अनाचारच नाहीत का ? ते आहेत आणि नाहीतही. प्रत्येक प्रयोगात अमुक वैशिष्ट्य असेल आणि प्रत्येकाचा

अनुभव घेणारे चैतन्याचे केंद्र अथवा व्यक्तित्व प्रत्येक प्रयोगात असले, तर मग विसंवाद, भांडण, अपव्यय, संघर्ष कोठे राहिला ? निसर्गात समृद्धी आहे, धीर आहे आणि बुद्धीची अनंतता आहे. जे सुकून जाते, गळून पडते, दुष्काळात नष्ट होते, अपुरे राहून जाते, किंवा दुसऱ्याचे भक्ष्य बनते ते सर्व का व्यर्थ गेले ? नाही. मुळीच ना ! प्रत्येक वस्तू जशी सकारण असते तशीच सप्रयोजनपण असते. निसर्गात व्यर्थ काहीच नाही. आपली बुद्धी आणि ती महाबुद्धी यांच्यात जातीचे ऐक्य जाहे, पण ऐश्वर्याचे ऐक्य नाही, म्हणूनच आपली बुद्धी महाबुद्धीचे आकलन करण्याची हिमत करू शकते, आणि तरीही नम्रतेच्या द्वाराच ते करण्याची आशा ठेवू या.

आणि ती महाबुद्धीसुद्धा पूर्ण विकसित झाली आहे का ? पूर्णपणे व्यक्त किंवा प्रकट झाली आहे का ? तिचा नित्य विकास होतच चालला आहे. या विकासाची सीमा केव्हा गाठली जाईल ते कोण सांगू शकणार ? तिला अंत किंवा सीमा कशासाठी असेल ?

व्यक्तीचे किंवा विश्वाचे जीवन प्रवाहरूप असते.

आपल्याला वाटते की यौवनात बाल्यकाळ संपतो, आणि वार्धक्यात बाल्य आणि यौवनाचा लोप होऊन जातो; पण तसे होत नसते. सर्व अवस्था— विकासाच्या क्रमाप्रमाणे जेवढ्या अवस्थांमधून आपण गेलेलो असतो त्या सर्व अवस्था – एकत्रच आपणांमध्ये असतात. कथेच्या शेवटाला आपण येऊन भिडतो तर का तिचे आदि–मध्य नष्ट झालेले असतात ? संगीताचा राग पूर्ण झाला म्हणजे का त्याच्या अस्ताई अंतरांचा नाश झाला ? तसे होत असते तर रागाचे ज्ञानच आपणांस झाले नसते. भूतकाळसुद्धा वर्तमान असतो. नदी जरी समुद्रात मिसळून गेली तरी तिचा उगम व मध्य प्रवाह वाहतच राहतो ना ? निसर्गाची महाबुद्धी व्यक्त होत चालली आहे, विकास पावत चालली आहे. तरी तिच्या प्राथमिक स्वरूपाचे अवशेष तर टिकून राहतातच. हिंदुधर्मात जसे **तानि धर्माणि प्रथमानि आसन्**– पासून अद्यतन विचार आणि आचारापर्यंत सर्वांनाच स्थान आहे.

सर्वांना आदर आहे, तसा निसर्गात सर्व स्थितींचा समास आहे. ठिकठिकाणी स्थूल रूपात, तर काही ठिकाणी सूक्ष्म रूपांत.

—जीवनव्यवस्था : १२९

पुरुषसूक्तात म्हटले आहे की विराट पुरुषाला असंख्य शिरे, असंख्य नेत्र, आणि असंख्य पाय आहेत. यावरून आपण समजावे की विराट पुरुषाला असंख्य मने आणि असंख्य हृदये पण आहेत, कारण हे सर्व एकरूप आहेत, या अनंत मनात कोणताही विचार स्फुरला, कल्पना जागृत झाली की भावनेचा तरंग उठला की तो कोणत्या ना कोणत्या रीतीने मूर्त होणारच. म्हणूनच तर मनोव्यापारावर जबरदस्त नियंत्रण ठेवणे योग्य ठरते.

जेवढी मानसिक पापे मी करतो ती सर्वच माझ्या आचरणात भलेही न उतरो, पण कोठेतरी ती आचरणात व्यक्त होणारच. आपले विचार, आपले मनोरथ आणि कल्पनातरंग आपण अलग किंवा अलिप्त राखू शकतो ही आशा वा उमेद बाळगणे व्यर्थ आहे.

पाण्यात पडलेले मीठ जसे सर्वत्र पसरते, आकाशात उठलेली ऊर्मी अनंतापर्यंत पोंहोचते, तशा आपल्या वासना विश्वात पसरतात आणि विश्वाला घडवितात किंवा अडवितात. एकट्या आचरणावरील निर्बंध पुरेसे नसतात, चैतन्य तर संकल्पात असते. संपूर्ण विश्व आणि त्यातील प्रत्येक कण संकल्पप्रभव असतो म्हणून संकल्प-शुद्धी हीच महासाधना असते.

—जीवनव्यवस्था : १२९–१३०

प्रश्न : मनुष्य जीवनाचे मुख्य ध्येय कोणते ?

उत्तर : सतत उद्योग करता करता प्रसन्न राहणे हे जीवनाचं मुख्य ध्येय आहे. स्वतःचा स्वार्थ विसरून जावा, सर्वांच्या आनंदात आनंद मानावा, आणि दररोज ज्ञान तशीच कार्यकुशलता वाढवीत राहावी हे मुख्य ध्येय असावयास पाहिजे.

—जीवनव्यवस्था : २८७

२. ज्ञानपद्धती

कितीतरी समाजांत जिजीविषाच मुख्य असते. ती प्राप्त झाल्यानंतर विजीगिषा येत असते. ऐश्वर्य आणि भोग हे तर प्राकृत मनुष्यसमाजाचे सामान्य आदर्श आहेतच. पण भारतवर्षाचा परम पुरुषार्थ मुमुक्षा आहे. आपण नित्य स्वातंत्र्यवादी राहिलो आहोत; आणि ते स्वातंत्र्य आपणांस एवढ्यासाठीच पाहिजे आहे की आपणात विश्वात्मैक्यभाव प्रकट व्हावा. आपण जी काही विद्या आणि शास्त्र शिकवू त्याचा उद्देश आत्मौपम्यभाव प्रगट करणे हाच असेल. आपण ज्या काही कृती करू त्या सर्वोदयकारी असतील. एवढ्याचसाठी आपण साधनांच्या शुद्धतेकडे एवढे लक्ष देत आहोत. धर्मशास्त्र असो की विज्ञानशास्त्र, ज्योतिषशास्त्र असो की भूगर्भशास्त्र, आपण एकाच शुभंकारी वृत्तीने त्यांचा विकास करू. कारण आपणास माहीत आहे की जे शिव नाही ते सत्य नाही, मग सुंदर तरी कोठून असणार ?

सत्यप्राप्तीचे एकमेव साधन अहिंसा आहे असे म्हणून गांधीजींनी भारतवर्षाच्या

साधनेचे परम रहस्य आपणास सांगून ठेविले आहे.

आधुनिक विज्ञानाला ही गोष्ट मान्य नाही हे मला माहीत आहे. त्याचे निरीक्षण, परीक्षण आणि प्रयोग हे तर हिंसामूलकच आहेत. घर्षण, छेदन, तापन, ताडन वगैरेंच्या द्वारांच विज्ञान प्रकृतिमातेपाशी आपले रहस्य प्रकट करायला तयार होते. पोलिस ज्याप्रमाणे कोणाही गुन्हेगाराला मारझोड करून त्याच्यापासून सर्व गुप्त माहिती काढून घेतात तसेच हे सर्व प्रयोग असतात. ज्या योगविद्येचा उल्लेख आपल्या संस्कृत साहित्यात येत असतो ती कशी होती हे आपणास माहीत नाही, पण प्रेमशक्तीच्या साहाय्याने **गुह्यं आख्याति पृच्छतिच्या** स्वतंत्र पद्धतीने आपण अवश्य ज्ञानविस्तार करू शकू असे आहे.

विच्छेदनद्वारा (Vivisection) जे ज्ञान प्राप्त होऊ शकते ते आम्हांला अयोग्य वाटते. असे ठरविल्याने मनुष्यजातीचे काही नुकसान होणार नाही; उलट मनुष्य-हृदयाची उन्नतीच व्हावयाची आहे. आणि हृदय जर पुरेसे उन्नत झाले तर जगाच्या आतले व बाहेरचे सर्व ज्ञान आपलेच होईल. प्रयोगपद्धतीपेक्षा योगपद्धती श्रेष्ठ आहे हे आपण सिद्ध करून दाखवायचे राहिले आहे.

—जीवनविकास : १८१

जी गोष्ट विज्ञानाची आहे तीच विशेषरूपाने कलांची आहे. कलेचाही उद्देश आनंद व्यक्त करण्याचा आहे. ही कलासुद्धा शुभंकारी असावी हाच आपला आदर्श आहे. प्रसन्नता, शुचिता, सर्वांगैकता हाच आपल्या कलेचा परम उद्देश आहे. आणि त्याला सुद्धा आपण आपल्या संयमप्रधान जीवनाच्या द्वाराच प्रकट करू. विराट पुरुषाची जी सनातन रसवृत्ती आहे तिचेच भान ठेवून आपण मंगलमयी कलेचा आविष्कार करीत राहू. तादात्म्याबरोबर ताटस्थ्य ही तिची साधना आहे.

—जीवनविकास : १८२

३. उपनिषदे

उपनिषदे म्हणजे वैदिक परंपरेच्या ऋषींचा स्वतंत्र, स्वयंभू, मूलभूत धर्मानुभव, आणि त्यांना योगयुक्त स्थितीत नेहमी झालेले ज्ञानस्फुरण. धर्मप्रामाण्य नेहमी धर्मानुभवाचेच असावयाचे; मग तो धर्मानुभव प्राचीन असेल की अर्वाचीन; स्वकीय असेल की परकीय.

आपण असे मानत आलो आहोत की वैदिक परंपरेच्या ऋषींची हृदये प्रसन्न असल्यामुळे आणि त्यांच्या ठिकाणी पूर्वग्रह कमीतकमी असल्याकारणाने ते ईश्वरी-कृपेचे अधिकाधिक अधिकारी होते. आणि या योग्यतेमुळेच त्यांना सत्यज्ञानाचे स्फुरण सहज झाले.

नंतर लोकांनी असा अर्थ केला की उपनिषदांच्या वचनांत चूक, भ्रांती किंवा परस्पर विरोधीपणा हे मुळात नाही; कारण शुद्ध अनुभव कोठेही असला तरी तो एकच असणार, ही दृष्टी तर्कशुद्ध असेल; परस्पर-विरोध दिसत असतो तो वर-वरचा असतो. सिद्धान्तभेद दिसतो त्याचे कारण भूमिकाभेद आहे असे जे सांगण्यात येते ते खरे असेल. उपनिषदांत चुकीच्या कल्पना, भ्रांतविचार आणि विसंगती काही काही ठिकाणी जरी दिसली तरी काय बिघडले? खाणीतून काढलेल्या सोन्याच्या मातीत कचरासुद्धा असू शकतो. उपनिषदांतील वचनांचा आपण आंधळेपणाने स्वीकार करावयाचा नसतो. थोडक्यात, उपनिषदांची वचने ही अंधारात प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या हातातील बॅटरी (विजेरी) असते. विचारांना जागृत करून भिन्न भिन्न दिशांत दूर कसे दिसते ते सुचविण्याचे काम उपनिषदांचे आहे. जी दिशा मनात भरेल त्या दिशेने स्वतः चालत जाऊन पाहावयाचे असते. उदा. गणितातील एखादा अवघड प्रश्न असला तर तो सोडविण्यासाठी त्यावर हल्ला करण्याचे दोनचार मार्ग शिक्षक दाखवितो व मध्येच थांबतो. त्या सर्वच मार्गांनी जाऊन उत्तर मिळू शकेल असे नसते. काही प्रयत्न निष्फळ ठरतात, तर काही बरोबर लागू पडतात. पण असे विविध दिशांनी प्रयत्न करण्याने गणितबुद्धी तीक्ष्ण व ताजी बनते; कारण लागू न पडणारी पद्धतीसुद्धा समर्थ गणित शास्त्रज्ञांनी सुचविलेली असते ही गोष्ट विसरता कामा नये.

एखाद्या विशिष्ट उदाहरणात ही दृष्टी किंवा रीत भलेही उपयोगी न वाटली तरी गणितात बुद्धी कशी चालवायची ते तर यावरून आपणास उत्तम रीतीने कळायला मदत तर होतेच ना!

कोणताही शास्त्रीय किंवा तात्त्विक शोध लागल्यावर तो समजावून सांगण्याची पद्धती तार्किक असते, युक्लिडी असते, परस्मैपदी असते. पण स्वतः शोध करीत असताना मनुष्य त्या पद्धतीचा अवलंब करीत नसतो. शास्त्रज्ञ अथवा तत्त्वज्ञ जेव्हा स्वतःच शोध करायला, संशोधन करायला निघतो तेव्हा तो कवी असतो, त्याची पद्धती आत्मनेपदी असते. लॉजिकल आणि सायकॉलॉजिकल यांच्यासारखाच हा फरक असतो. उपनिषदांत केवळ अंतिम तत्त्वज्ञान नाही पण तत्त्वजिज्ञासू विचार-वीरांची ती दररोजची नोंदवही, चिन्तनिका (डायरी) असते. स्वतः कोठे कोठे व कशा कशा बुड्या मारल्या होत्या, आणि कोठे काय कळले, हाती लागले त्यांची ती नोंदवही असते. म्हणूनच उपनिषदांना एवढे प्रामाण्य प्राप्त झाले आहे.

—जीवनप्रदीप : ११-१२

उपनिषदांत जसे अंतिम ज्ञान आहे तसेच बुद्धीच्या मर्यादा ओलांडून मोठ्या कल्पनांच्या उड्या पण आहेत. प्राचीन उपनिषदांमध्ये तत्त्वज्ञानाच्या पुड्या बांधून ठेवलेल्या नाहीत, पण तत्त्वान्वेषी बुद्धीच्या कसरतीच्या उड्या दाखविलेल्याच आहेत.

हृदयाने जे शुद्ध असतात, ज्यांनी मनोविजय, वासनाविजय केलेला असतो, आणि ज्यांच्या ठिकाणी तत्त्वजिज्ञासेची अकुतोभय हिंमत असते असे लोकच आप्त म्हणजे विश्वासपात्र समजले जातात. त्यांनी सांगितलेली गोष्ट मनुष्यजातीने श्रद्धेने, आस्तिकतेने, पारमार्थिकतेने स्वीकारून, नंतर ती स्वतंत्रपणे तपासून पाहिली पाहिजे. शोध नास्तिक असू शकतो आणि आस्तिक पण असू शकतो. शोधाच्या मुळाशी जी आस्तिकता असते तीच श्रद्धा होय. अशा श्रद्धेने एखाद्या वचनाकडे पाहणे याचेच नाव त्याचे प्रामाण्य स्वीकारणे असते. श्रद्धा किंवा प्रामाण्य म्हणजे आपल्याकडून अनुभव घेण्याची आवश्यकता टाळणारा आळस, ऐदीपण किंवा आंधळेपण नव्हे.

—जीवनप्रदीप : १२

श्रद्धा म्हणजे एखादी गोष्ट आस्तिकपणे शोधण्याची तयारी असणे. अशा तयारीशिवाय शोधाची डोकेफोड तरी कोण करील ? उपनिषद्वचने श्रद्धेने स्वीकारून त्याला अनुसरून धर्मानुभव घेण्यापूर्वी ब्रह्मसूत्राप्रमाणे त्यांची बौद्धिक छाननी करावयास पाहिजे, नंतर गीतेच्या समन्वयदृष्टीने जीवनात ही वचने कशी लागू करावयाची त्याची कला हातगत करावयास पाहिजे, आणि शेवटी प्राचीनांचा धर्मानुभव मार्गदर्शनासाठी वापरून स्वतःच्या अनुभवाने कृतार्थ व्हावयास पाहिजे. मोक्षाचा मार्ग समजावून घेऊन त्याला अजमावण्याचे जे साधन तीच प्रस्थानत्रयी होय. या तिघांत उपनिषदांचा मूळ आधार असला तरीही या उपनिषदांना भगवद्गीतेने पूर्णतया नवे रूप दिलेले आहे; म्हणूनच गाय-वासराचे रूपक वापरून गीता महात्म्यात म्हटले आहे—

सर्वोपनिषदो गावो, दोग्धा गोपाल नंदनः ।
पार्थो वत्सः, सुधीर्भोक्ता; दुग्धं गीतामृतं महत् ॥

—जीवनप्रदीप : १३

उपनिषदे अशी काही आहेत की त्यांचे भाष्यासहित वाचन केल्याने त्यांच्या मूळ स्वादाचा आस्वाद घेता येत नाही. भाष्यकारांना अशी काही खोड असते, वाटल्यास तुम्ही त्याला मर्यादा म्हणा– की ते एक विशिष्ट तर्कशुद्ध आणि समन्वित गोष्ट (उपपत्ती, दृष्टिकोण) उपनिषदांतून तयार करून दाखवायची. अशा रीतीने वाचण्या-

साठी उपनिषदे नाहीतच. उपनिषदे हे तर ज्ञानवीर परमहंसांचे उत्स्फूर्त (inspired) उद्‌गार आहेत. आपल्या वचनांत परस्पर विरोध आहे की काय, त्यांच्यातून घाटदार व सुबद्ध तत्त्वज्ञान निष्पन्न होते की काय यासारखा विचार ऋषींनी केला नसेल. त्यांच्या विचारात आणि कल्पनांत शुद्ध कौमार्य आहे. त्यांच्या भाषाप्रवाहाचा एकदा परिचय झाला म्हणजे जसे आपण धारोष्ण दूध पिऊन जातो त्याच रीतीने उपनिषदांच्या अमृताच्या सरींचे पान करावयास पाहिजे.

—जीवनव्यवस्था : १२३–१२४

उपनिषदांची वचने हे तर विजेचे चमचमाट आहेत. त्यांची संपूर्ण अर्थ अजून कोणी लावला नाही. पाचपंचवीस हजार वर्षांपर्यंत नवनव्या रीतींनी प्रयत्न केला तरी त्यांतून समजण्याचे काही मागे उरणारच. प्रत्येक काळ आपल्या अनुभवाच्या मदतीने नव्या रीतीने उपनिषदांपाशी जाईल आणि अनुभवाने तीक्ष्ण बनलेल्या बुद्धीच्या द्वारा उपनिषदांमधून नवी प्रेरणा मिळवील. हे एक वचन घेऊ या–

'सन्मूलाः सोम्य इमाः सर्वाः प्रजाः सदायतनाः सत्प्रतिष्ठाः।'

यात समग्र मानवसमाजशास्त्र आहे.

'सर्वासां विद्यानां हृदयं एकायनम्'

हे वाचल्यानंतर शिक्षणाची सर्व दिशा बदलण्याची इच्छा नाही का होणार!

'हृदयेन हि रूपाणि जानाति।
हृदये हि एव रूपाणि प्रतिष्ठितानि भवन्ति।'

हे याज्ञवल्क्याचे निरूपण वाचणारा कला व आनंद मीमांसा नव्या रीतीने समजेल. 'हृदयेन हि सत्यं जानाति। हृदये हि एव सत्यं प्रतिष्ठितं भवति॥ या वचनाने तर संपूर्ण तत्त्वज्ञानाचा पायाच बदलण्याची गरज आहे असे वाटल्याशिवाय राहात नाही.

—जीवनव्यवस्था : १२४

४. स्व-तंत्र म्हणजे आत्म-तंत्र

माणूस तंत्राशिवाय राहू शकत नाही. स्वतंत्र जीवन त्याला जमतच नाही. तंत्रा-

शिवाय त्याच्या सर्व शक्ती व्यर्थ ठरतात आणि त्याचे जीवन क्षणजीवी खाजेप्रमाणे अदृश्य होऊन जाते. म्हणजे प्रश्न एवढाच राहतो की जर तंत्र मानवी जीवनाला अपरिहार्यच असेल, तर सर्वांत चांगले, उत्तम तंत्र कोणते ? स्वाभाविक वृत्ती लगेच म्हणते– स्वतःचे तंत्र हेच उत्तम तंत्र असते. स्व–तंत्रातच माणसाचा उत्तम विकास होऊ शकतो. जीवनाची प्रतिष्ठा स्व–तंत्राशिवाय संभवतच नाही. स्व–तंत्र मनुष्यच जीवनाचे रहस्य समजू शकतो, जीवनाचा उत्तमांत उत्तम उपयोग करण्याच्या स्थितीत राहतो, आणि सृष्टीच्या व्यापारांच्या महान उद्देशाबरोबर सहकार्य करू शकतो. स्व–तंत्रता हीच जीवनशुद्धी आणि जीवनसाफल्याचे एकमात्र व्याकरण आहे.

एवढ्याविषयी काही कोणाला शंका नाही. शंका असली तर ती फक्त 'स्व'च्या स्वरूपाविषयी आहे. स्वविषयी आपली कल्पना स्थिर नसते. 'स्व'विषयींचा माणसाचा अनुभव नवानवा अवतार धारण करीत जात असतो.

—जीवनचिंतन : २१३

जेव्हा मनुष्य म्हणतो, 'मला स्व–तंत्र राहावयाचे आहे, स्व–तंत्र जगावयाचे आहे' तेव्हा तो स्व–तंत्र असेलच असे नाही. त्यावेळी तो वासना–तंत्र म्हणजे वासनाधीन असतो. वासनेची त्याच्यावर अशी काही घट्ट पकड बसलेली असते की त्याला आपले हित–अहित कशामध्ये आहे याचे भानही राहात नाही. लहान मुले एखादे खेळणे मिळविण्यासाठी आणि मोठी मुले फाऊंटनपेन, घड्याळ किंवा दुचाकी मिळविण्यासाठी जेव्हा वाटेल तशी वचने देतात आणि वाटेल त्या अटी स्वीकारतात, ती स्व–तंत्र असतात असे कोण म्हणू शकेल ? वासनेच्या वेगात सापडून ती स्वतःचे भान विसरून जातात. जे खेळणीमय किंवा दुचाकीमय झालेले असतात ते आत्ममय तर नसतातच. आणि जेव्हा इजिप्त किंवा इराणचा बादशहा आपल्या वासनांच्या तृप्तीसाठी युरोपियन लोकांकडून कर्ज घेतात आणि परक्या लोकांना स्वराज्याचे काही हक्क लिहून देतात तेव्हा तेही स्व–तंत्र नसतात. ज्यांच्यापाशी आपला 'स्व'च नसतो ते कोणत्या रीतीने 'स्व–तंत्र' होऊ शकतील ? अविचारी आणि अमर्याद वासनांना जर आपण माणसांचे शत्रू मानले तर कितीतरी स्वतंत्र समजल्या जाणाऱ्या माणसांना आपल्या शत्रूंच्या हातात सापडलेले म्हणजे शत्रु–तंत्र समजायला पाहिजे. शत्रू आपल्या शरीरात राहिला एवढ्यासाठी काही त्याला स्वकीय किंवा स्नेही समजता येणार नाही. रोगसुद्धा आपल्या शरीरातच राहात असतो.

तर माणसावर तंत्र कोणाचे असावे ? जी माणसाचे हित समजू शकते आणि त्याला खड्यात पडण्यापासून वाचवते अशी मनोविकार आणि वासना यांना ताब्यात ठेवणारी त्याची बुद्धी हा एकच विश्वासपात्र असा पहारेकरी आहे. वासना आणि विकार यांच्याशी तुलना करता बुद्धीपाशी अधिक प्रमाणात दूरदृष्टी असते,

तिच्यापाशी तटस्थता असते, सारासार–विचार असतो. वासना कितीही खेचोत तरीही ज्यांचे वागणे त्यांच्या आधीन नसते पण बुद्धीच्या, सारासार विचाराच्या आधीन असते, त्यांनाच आपण संस्कारी म्हणतो, त्यांनाच चांगले म्हणतो. ज्या माणसाचे वासनांवर नियंत्रण नसते त्याच्यावर समाजाचा विश्वास बसत नाही. असा मनुष्य समाजात मोकळेपणाने मिसळू शकत नाही. लोक त्याच्याविषयी साशंक राहतात, भयभीत राहतात. त्याच्यावर जबाबदारीचे काम सोपवीत नाहीत. वासनांवर नियंत्रण असणे हाच नीतीचा म्हणजे सामाजिक जीवनाचा पाया असतो.

—जीवनचिंतन : २१४

'वासना स्वाभाविक असते म्हणून तृप्त व्हायलाच पाहिजे; जेवढे नैसर्गिक असते तेवढे योग्यच असते. वासनांवर ताबा मिळविणे अशी मूठभर धार्मिक लोकांची अपेक्षा असू शकते. सर्व सामान्य समाजाची प्रवृत्ती चतुराईने वासनापूर्ती करून घेण्याकडेच असते आणि तीच योग्य आहे' अशा तऱ्हेचा युक्तिवाद अलीकडे बऱ्याच प्रमाणात करण्यात येतो, आणि समाजाकडून कित्येक वेळा मोठ्या उत्साहाने त्याचे स्वागत पण केले जाते. पण ही सर्व अधोगतीची लक्षणे आहेत, कारण ती समाजाच्या मुळांनाच उखडून काढतात. युरोपातील विचारी लोकसुद्धा या वाढत्या समाजद्रोही वृत्तीला घाबरले आहेत, आणि त्यांनी समाजाला जागृत करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

येथे हे स्पष्ट करायला पाहिजे की वासनांवर ताबा मिळविणे याचा अर्थ असा नाही की प्रत्येक वासनेला दाबून टाकायचे किंवा मारून टाकावयाचे. दुर्वासनेचा नाश करणे इष्ट आहे. सद्वासनेला पोषण मिळायलाच हवे, आणि अनेक सद्वासना एकत्रच अस्तित्वात असतील तर त्यांच्यामध्ये संगीतासारखा मेळ निर्माण करावयास पाहिजे आणि सामान्य असंस्कृत वासनांवर संस्कार करून त्यांचे स्वरूप उन्नत आणि पोषक करावयास पाहिजे. याला म्हणतात वासनांवर ताबा किंवा नियंत्रण. हे ज्याला साध्य झालेले असेल त्यालाच 'मनुष्य' पदवी शोभते. वासना ही गोष्ट वेगवान असते, पण बुद्धिमान नसते. ती शुभ आणि अशुभ अशा दोन्ही मार्गांनी वाहात असते. तिला प्रयत्नपूर्वक बुद्धीच्या आधीन ठेवावे यातच जीवनाचे साफल्य असते. हेच खरे स्वतंत्र होय.

—जीवनचिंतन – २१४–२१५

५. वास्तववाद वि. ध्येयवाद

वास्तववाद आणि ध्येयवाद यांच्यात विरोध कोठे आहे ? ज्या लोकांना कोणताही पुरुषार्थ करावयाचा नसतो ते वास्तववादाच्या आधाराने ध्येयवादाला विषेष विरोध करीत राहतात. त्याग, बलिदान, आत्मसंयम, निर्भयता वगैरे चारित्र्याच्या उज्ज्वल बाजू नष्ट करण्यासाठी ध्येयवादाला विरोध करणे सोपे आहे.

....खरी गोष्ट तर अशी आहे की वास्तववादाच्या चिखलातून जीवनकमळाचा जन्म होत असतो. पण ध्येयरूपी सूर्यप्रकाशाद्वाराच त्याच्या आकर्षणाने ते कमळ जीवनाच्या पृष्ठभागावर वर येऊन आपली कल्याणमय प्रसन्नता फुलवू शकते. घाणेरड्या पण पौष्टिक चिखलापासून कमळाला जर दूर केले तर पाण्यात तरंगत राहूनही ते सडून जाईल, पण जर सूर्यप्रकाशापासून त्याला सर्व प्रकारे वंचित करण्यात आले तर कमळाचे अस्तित्वच असंभवित होऊन जाईल. मग तर त्याचा रंग, रूप, सुगंध आणि कोमल प्रसन्नतेचा प्रश्नच उपस्थित होणार नाही. वास्तववादाचा स्वीकार आवश्यक आहे, पण त्याच्याच बरोबर ध्येयवादाची प्रेरणा पण प्राणस्वरूप, प्राणदायी आहे. ज्यांना किडे बनून चिखलातच राहावयाचे असेल ते भलेही तेथे राहोत; पण तेथे पडून राहून ध्येयवादाची निंदा करून देशाचे स्वातंत्र्य आणि भाषेचे चैतन्य यांचा द्रोह तरी त्यांनी कधीही करू नये.

—जीवनव्यवस्था : १३०–१३१

६. तत्त्व आणि व्यवहार

व्यवहार ही एक सत्य वस्तू आहे, पण ती गोष्ट नेहमीच काही चांगली नसते. आजारीपणात अपायकारक वस्तूही खाण्याची इच्छा होते. ही वासना सत्य तर असतेच, पण तिला वश होण्यात श्रेय नसते आणि पुरुषार्थही नसतो.

बऱ्याच वेळा तत्त्व हे माणसाला उन्नत करणारे असते, तर व्यवहार हा माणसाची अवनती घडवीत असतो. या दोघांत सनातन संग्राम चालत आलेला आहे. त्या दोघांत सुसंवाद किंवा जुळणी करण्याचे अनेक प्रयत्न जगात होत आले आहेत. पण व्यवहार फार दुराग्रही असतो. समाधानाच्या अटी तत्त्वपक्ष कबूल करतो, पण व्यवहारपक्ष जसजशा सवलती मिळत जातात तसतसा अधिक सवलती मागतच राहतो, आणि शेवटी तत्त्वाचा खून करूनच शांत होतो. म्हणून तत्त्वपक्षाने नेहमीच सावध

आणि जागृत राहावयास पाहिजे आणि व्यवहाराशी कधीही कायमची तडजोड व समेट करता कामा नये.

तत्त्व आणि व्यवहार यांच्यातील या नित्य चालणाऱ्या झगड्यात आपण कोणता पक्ष स्वीकारावा ? कोणत्या पक्षाविषयी सहानुभूती बाळगावी ? कोणत्या ध्वजाखाली उभे राहावे ?– हा जीवनाचा सर्वांत मोठा प्रश्न आहे. आयुष्यात व्यवहारपक्षाचे अस्तित्व मान्य करण्याशिवाय सुटका नाही. पण व्यवहारपक्ष आहे एवढे कबूल करणे वेगळे आणि त्याचे समर्थक बनणे वेगळे. व्यवहारपक्ष हा आरंभी सौम्य, समजूदार आणि सुंदर स्वभावाचा भासतो आणि म्हणूनच आपण त्याला वश होत असतो. पण एकदा व्यवहारपक्षाच्या बाजूने मत दिले, हात उंच केला की त्याचे साम्राज्य (वर्चस्व) आपल्या डोक्यावर बसलेच समजावे. आणि असे सुरू झाल्यानंतर तर व्यवहाराचा जुलूम भराभर व जोराने वाढतच जाणार.

व्यवहार असा आहे की चतुर असतो की तत्त्वाचा खून केल्यानंतरही त्याचे मढे (प्रेत) अशा रीतीने जतन करून ठेवितो की तत्त्वपक्षाच्या लोकांना असा भ्रम राहतो की त्यांचे तत्त्व जिवंतच आहे. व्यवहार नेहमी म्हणत असतो, 'नावाचा राजा कोणीही असो, मला त्याची पर्वा नाही. सत्ता माझी स्वतःची चालत राहिली म्हणजे झाले.'

—जीवनव्यवस्था : १०४–१०५

७. आचार्य

"आचिनोति हि शास्त्रार्थं, आचारे स्थापयत्युत ।
स्वयमाचरते यस्तु स आचार्यः प्रचक्षते ॥"

अशी आचार्याची व्याख्या आहे. समाजात ज्ञानी, कुशल आणि पवित्र लोक कसे वागतात, कशा प्रकारचे जीवन पसंत करतात हे सर्व पाहून जीवनशास्त्राची रचना करावयाची असते. अशा जीवनशास्त्राची परंपरा समजावून घेऊन त्यातील उद्देश आणि त्याची व्यवस्था निश्चित करून लोकांसमोर ठेवणे हे आचार्याचे पहिले कर्तव्य असते. शास्त्राची ही दिशा सद्यः परिस्थितीत आचरणात कशी उतरवावी ते नक्की करून समाज सदाचारी बनावा, त्याची आर्यवृत्ती वाढत राहावी याची चिंता मनात ठेवून सतत प्रयत्न करीत राहणे हे दुसरे कर्तव्य असते. हे साधण्यासाठी त्याचे स्वतःचे जीवन सर्वश्रेष्ठ असावयास पाहिजे. आत्मोन्नतीच्या हेतूने, नवे नवे अनुभव

वाढविण्याच्या हेतूने, आचार्याचा स्वतःचा आचार अत्यंत निर्मळ, उज्ज्वल, कडक, प्रसन्न व अखंड उच्च विचारप्रवृत्तीने जागृत असावयास पाहिजे, हे त्याचे तिसरे कर्तव्य असते. अशा आचार्यांनी जगात चालू असलेले वेगवेगळे प्रयोग तपासून पाहायला पाहिजेत, जबाबदारीने स्वतः अनेक प्रयोग करावयास पाहिजेत, जीवन-शास्त्राचा विकास होत राहिला पाहिजे, खुलत राहिले पाहिजे, ते मागे पडणार नाही अशी खबरदारी घेतली पाहिजे, आणि निरलसपणे समाजाचे निरीक्षण करीत राहून समाजसेवा चालू ठेवायला पाहिजे.

अशी महत्त्वाची जबाबदारी शिरावर घेणाऱ्याच्या हाती इतर कामे व इतर अधिकार आपोआप यावयाचेच. नवी कामे व नवे अधिकार मूळच्या जबाबदारीला पोषक आहेत की बाधक याचा सूक्ष्म विचार व्हावयास पाहिजे. असा विचार केल्यास असे लगेचच लक्षात येईल की हा आचार्यवर्ग जेवढा तटस्थ व अलिप्त राहील आणि एकाग्रपणे स्वकर्तव्यात गढलेला राहील तेवढ्याच प्रमाणात तो कृतार्थ होऊ शकेल. या लोकांच्या हाती व्यावहारिक सत्ता नसेल तेवढे चांगले. लोकांना शिक्षा करणे, त्यांच्याकडून कर वसूल करणे इत्यादी राजत्वाचे अधिकार या वर्गापाशी असू नयेत, नाहीतर तो भ्रष्ट व्हावयाचा. हा वर्ग आपल्या चारित्र्याने, तपाने व दानाने, निःस्पृहता आणि सर्वांविषयी प्रेम बाळगण्याने सर्वमान्य, श्रद्धायोग्य आणि अनुकरणीय होईल. या वर्गाची सत्ता आध्यात्मिक स्वरूपाचीच राहील. लोकांच्या बुद्धीवर तसेच हृदयसंघटनावर जी नैसर्गिकरीत्या प्रभाव पाडू शकेल तीच या वर्गाची शक्ती असते.

असा वर्ग लोकांच्या दानबुद्धीवर अवलंबून राहील आणि राजनियंत्रणापासून बऱ्याच अंशी मुक्त राहील. संपूर्ण समाजाच्या धर्मबुद्धीच्या कसोटीवर त्याचा कस पाहिला जाईल हाच त्याच्यावरील मुख्य अंकुश राहील. हे लोक समाजावर राज्य करणार नाहीत, सत्ता चालविणार नाहीत आणि समाजही त्यांच्यावर सत्ता व अधिकार चालविणार नाही अशी नैसर्गिक स्थिती असावयास पाहिजे. साधेपणा, गरिबी आणि संयम तसाच निरलस अखंड उद्योग, निःपक्षपातीवृत्ती, अखंड सेवा या गुणांनी हा टिकून राहू शकेल.

—जीवनविकास : २४९–२५०

८. खरा समन्वय

समन्वयवादी सर्व धर्म, सर्व दर्शने आणि सर्व पंथांचे ग्रंथ, विचार, रिवाज इत्यादींचा

सहानुभूतिपूर्वक अध्ययन करीत असतो आणि सर्वांमधून आपल्या कामाच्या गोष्टी घेत असतो.

भांडणे व मतभेद टाळण्यासाठी लोक परस्पर-विरोधी वचनांतून एकच अर्थ काढण्याचे प्रयत्न करीत असतात. अशा प्रयत्नाला 'एकवाक्यता' म्हणतात. एकवाक्यता स्थापन करण्यासाठी भाषेची ओढाताण आणि बुद्धीची कसरत करावी लागत असते. समन्वयवादी मतभेदांना नाकारणार नाही. मतभेदांचा स्वीकार करून समन्वयवादी असे दाखवील की जीवनाच्या दृष्टीने दोन्ही विचार भिन्न असूनही परस्पर-मारक नाहीत, दोन्ही बरोबर चालू शकतात आणि दोघे कधी कधी एक-दुसऱ्याला पोषकही होऊ शकतात. एकच मनुष्य कोणाचा पिता असेल, कोणाचा पुत्र, कोणाचा भाऊ आणि कोणाचा न्यायाधीश. भिन्न भिन्न परिस्थितीनुसार संबंध बदलण्याने माणसाचा तोंडावळा (रूप) बदलत असतो.

...जीवनशुद्धीची आवश्यकता नेहमीच असते. या प्रवृत्तीला कधीच अंत येत नाही. जसा भक्तीचा आदर्श नेहमी वाढत राहतो, तसाच जीवनशुद्धीचा आदर्श उत्कट आणि उत्कटतर होत राहतो... चित्तशुद्धीसाठी सेवा-कर्म आवश्यक आहे. श्री शंकराचार्य म्हणतात—"**चित्तस्य शुद्धये कर्म।**" कर्माचा उद्देशच चित्तशुद्धी करणे हा असतो. कर्म करीत असताना जेव्हा आपण जीवनशुद्धीचे आणि जीवन-समृद्धीचे चिंतन करतो तेव्हा प्रगती होत असते. सेवा कर्माशिवाय केलेले चिंतन पुष्कळ वेळा दिखाऊ ठरते... कायद्याच्या द्वारा बाह्य नियंत्रणाने समाज समर्थ बनविता येतो, पण कायद्यामुळे आत्मोन्नती नाही होऊ शकत.

...संप्रदाय तयार होणे चांगले नसते, परंतु अपरिहार्य ठरते. प्रत्येक संप्रदाय स्वतःला चांगला व दुसऱ्यांना चूक समजत असतो. समन्वयवादी म्हणेल की प्रत्यक्ष पक्ष आपल्या आपल्या भूमिकेनुसार ठीक (बरोबर) आहे. परंतु सर्वांमध्ये सुधारणेला वाव असतो. म्हणून आपण सांप्रदायिक अभिमान सोडून गुणग्रहण करण्याची शक्ती व्यक्त करावयास हवी.

संप्रदायांच्या प्रवर्तकांमध्ये कदाचित् अशी उदारता येऊ शकेल, पण अनुयायांमध्ये येणे फार कठीण आहे. अनुयायांची शक्ती त्यांच्या कट्टरपणात असते, आणि कट्टरपणात विवेक नाहीसा होत असतो; त्यात अभिमान व आंधळेपणा हे येत असतात. मग असे लोक आपल्या नेत्याचीच असेवा करीत असतात. कार्यहानी तर होतेच होते.

विज्ञानापासून आपणास तीन गोष्टी शिकाव्या लागतील, तेव्हाच समन्वयदृष्टी विकसित होईल. विज्ञानात व्यक्तिनिष्ठा, ग्रंथनिष्ठा आणि वचननिष्ठा यांचा अभाव असतो. विज्ञानात सत्यनिष्ठा, आत्मनिष्ठा आणि जीवननिष्ठा असते. या तीन निष्ठांच्या जोरावरच आपण सामूहिक साधना करू शकू आणि समन्वयद्वारा जीवन-

शुद्धी, जीवनसमृद्धी आणि जीवनसिद्धीपर्यंत पोहोचू शकू.

—समन्वय संस्कृतीकी ओर : २१७–२१९

९. आमंत्रण

शांतीची मृगया सनातन आहे. तेजोमेघातून जेव्हा सूर्य घट्ट झाला आणि त्याच्या व्योमव्यापी प्रचंड भोवऱ्यातून स्फुल्लिंगरूपाने ग्रह व उपग्रह फेकले गेले, तेव्हापासून शांती आणि अशांती यांच्यामध्ये रस्सीखेच चालूच आहे. पण प्रकृतीत गती म्हणजे काही प्रगती नाही, आणि निश्चेष्टता ही काही शांती नाही. जेथे चैतन्य असते तेथे परिवर्तन असणारच. मानवी पुरुषार्थाशिवाय संतोष किंवा शांती यांना संधी नसते. चैतन्याच्या पुरुषार्थात सामंजस्य कसे आणावयाचे, विराट शब्दात कोलाहल संपवून त्यातून संगीत कसे वाहवावयाचे हीच एक महान अन्वेषणा आहे. तिचा जो इतिहास ते मानवजातीचे बृहत् चरित्र होय. या चरित्राचे समग्र आकलन गगन-विहारातच होऊ शकते. महाकान्ताराला पादाक्रान्त करणाऱ्या वनकेसरीला सुद्धा जे संपूर्ण अरण्याचे दर्शन घेणे दुःसाध्य ठरते, ते दिनमणीच्या पूजनासाठी आकाशात उड्डाण करणाऱ्या चंडोलाला आणि गरुडाला सहज साध्य होते.

जीवनविहारी कवीने हृदयसागराच्या खोल खोल अंतरंगात अवगाहन केलेले असले पाहिजे, आणि मानवतेच्या बृहत् चरित्राबरोबर त्याने चिंतन यात्रा करावयास पाहिजे. आपल्याच प्रगतीचा अमर्ष शिकून दिवसेंदिवस नवनवे पराक्रम करून दाखविणाऱ्या जनतेच्या जीवनात जेव्हा उषेच्या रंगासारखे बदल दिसतात तेव्हा कवीला पण विविध शैलीत व वृत्तांत त्यांच्याबरोबर ताल धरता आला पाहिजे. क्षणात पर्वताला छेदून टाकणारे तडित्तांडव, क्षणात विशाल भूप्रदेशाला बुडवून टाकणाऱ्या धारावर्षा, आणि क्षणात वनस्पतींच्या हास्याला वाढविणाऱ्या दवबिंदूच्या मोत्याच्या माळा असे दृश्य जेथे दिसत असेल, तेथे त्या त्या रंगांनी रंगविण्याची शक्ती नसेल तर कवींनी निसर्गाची संगत सोडून देऊन कृत्रिम काव्याची करामत करायला बसावे.

वसंत येतो तेव्हा एकटा येत नाही. त्याच्या बरोबर बालवृत्ती ढग पण येतात, आणि चंचलमती पवनही घेतो; जगाचे अशेष दुःखाची फजिती करणारी फुले पण येतात, आणि गाऊ गाऊन या सर्वांची शोभा वाढविणारा कोकिळही येतो; सर्व दिशा-दिशांत भराभर हिंडणारे पतंग कीटकही येतात, आणि शापमुक्त झाल्याने स्मृती जागृत होत असावी अशा रीतीने वनस्पतिसृष्टीत नवनवे अंकुरही फुटून तरारून वर

येतात. राष्ट्राचा उत्थानकाळ जेव्हा जवळ येतो तेव्हा जीवनवीरही जागे होतात आणि साहित्यवीरही खुलतात; सेवावीर प्रकट होतात आणि यात्रावीर परिक्रमेसाठी प्रयाण करतात. उगवणाऱ्या सृष्टीशी ज्यांचा विशेष संबंध असतो असे कितीतरी माळी कोणाला दिसण्यापूर्वीची उमलत्या कळ्यांना शोधून काढतात आणि त्यांचे विकासाचे हास्य पाहून आनंदून जातात. या आनंदांत सहभागी होण्यास मी वाचकांना आमंत्रण देतो.

—जीवनभारती : १५८–१६०

१०. प्रेम आणि प्रणय

प्रेम (स्नेह) आणि प्रणय यांतील फरक समजायला पाहिजे. प्रेम अनंत असते, प्रणय परिमित असतो. प्रेमाची परिणती आत्मोत्सर्ग आणि आत्मौपम्यात असते. प्रणयाची परिणती इन्द्रियतृप्तीत आणि ग्लानीत असते. प्रणयाप्रमाणे प्रेम पुरुषार्थाला हानी करीत नाही, यशाला मलिन करीत नाही, आणि 'आपण दोघे'ची संकुचितता धारण करीत नाही. प्रणयातून जो मुक्त होऊ शकतो तो प्रेमाला ओळखू शकतो. प्रेम 'वज्रादपि कठोर' होऊ शकते आणि 'कुसुमादपि मृदु' ही होऊ शकते. प्रेमात नित्य गौरव असतो. प्रणय मोहक असतो, स्वाभाविक असतो, व्यापक असतो, पण तारक की पोषक तर नसतोच. प्रणयाला आपल्या स्वतःच्या स्थानी राहू देणे हेच श्रेयस्कर आहे. प्रणयाच्या विकासाच्या दृष्टीने विचार करता असे म्हणता येते की संयमातच प्रेमाचे पोषण व शुद्धीकरण होत असते.

हल्ली प्रेमाच्या नावाखाली प्रणयाचाच प्रचार सर्वत्र होताना दिसतो आहे. काही उन्मत्त लोक तर प्रणयाला लोकोत्तर सद्‌गुण म्हणून मानायलाही कमी करीत नाहीत. धर्माची मर्यादा प्रणयाला पोषक असते आणि शेवटी प्रणयाचे रूपांतर प्रेमात करण्यात साहाय्यक होत असते एवढेही ते स्वतः लक्षात ठेवीत नाहीत किंवा कबूल करीत नाहीत. जगाला स्वतःच्या अधःपाताची दीक्षा देण्यात ते फार मोठी समाजसेवा मानतात. नीतिबाह्य प्रणयाचे कीर्तन करताना त्यांना तर इतका रस सुटतो की अनीतीचे आचार्यसुद्धा इतया उत्साह दाखविणार नाहीत. असे लोक प्रेमाचे तर द्रोही असतातच, पण प्रणयाचेही द्रोही नसतात, आणि मनुष्यजीवनाला पशुजीवनापेक्षाही नीरस आणि निर्वीर्य करून टाकण्यात यशस्वी बनतात.

— जीवनभारती २७२–२७३

११. सार्वभौम भरती-ओहोटी

आपण श्वास घेतो आणि सोडतो ही पण एक प्रकारची भरती-ओहोटीच आहे. हृदयाची धडधड होते आणि तिच्याबरोबर रक्त सर्व शरीरात फिरून येते ही पण एक प्रकारची भरती-ओहोटीच आहे. बाल्यकाळ, तारुण्य आणि म्हातारपण ही पण मोठी भरती-ओहोटी आहे. अशा रीतीने भरती ओहोटीचा क्रम विशालापेक्षा विशाल होऊन संपूर्ण विश्वाला पोहोचू शकते. सर्वत्र भरती ओहोटीच असते. राष्ट्रांची भरती-ओहोटी होत असते, संस्कृतींची भरती-ओहोटी होत असते. धार्मिकतेतही भरती-ओहोटी होत असते...

पाण्याच्या ठिकाणी जमीन आणि जमिनीच्या ठिकाणी पाणी करू शकते ती 'अघटित-घटना पटीयसी' अशी ईश्वराची माया आहे असे म्हटले जाते....अद्‌भुत गोष्ट रोजची झाली म्हणजे का ती निःसार झाली? माझ्या जीवनात तीन गोष्टींनी आपल्या गांभीर्याने अधिकात अधिक परिणाम घडविलेला आहे. हिमालयाचे उत्तुंग पर्वत, कृष्णरात्रीचे रत्नजडित गंभीर आकाश, आणि विधात्याचे अखंड स्तोत्र गाणार महार्णव या त्या तीन गोष्टी आहेत.

—जीवनलीला : २३७-२३८

१२. सामान्यात असामान्यत्व

जीवनात अशी कोणतीही घटना नसते की जिला महत्त्व नसते. सामान्यातल्या सामान्य समजल्या जाणाऱ्या बीच्या मागेही महान रहस्य लपलेले असते, फक्त आपल्याला ते पाहता किंवा त्याचे दोहन करता यावयास पाहिजे. भौतिकशास्त्रज्ञ जसा एका सूक्ष्म बीजात महान वृक्षाचा विस्तार कल्पू शकतो, तसाच कल्पनाधन तत्त्वज्ञानी सामान्य प्रसंगांत एखादा महान सिद्धान्त अंतर्भूत असलेला पाहात असतो, आणि त्या सिद्धांताच्या दृष्टीने पाहिल्यास त्या प्रसंगाचे सामान्यपण नाहीसे होऊन असाधारण गांभीर्य त्याला गवसते.

—जीवनभारती : ४२४

१३. अहिंसा

आपल्या क्रांतीची कोणाला भीती वाटता कामा नये, कारण आपली क्रांती अहिंसामूलक, प्रेममूलक आणि आत्मार्पणमूलक असेल. आपण अन्यायाचा प्रतिकार असहकाराने आणि बळजबरीला प्रतिकार अहिंसेने करू....

विचार करून पाहिल्यास अहिंसा हा शिक्षणपद्धतीचा मुख्य सिद्धांत आहे. अहिंसेचा अर्थच हृदयपरिवर्तन आहे. शिक्षणाच्या द्वारा आपण नेहमीच हे करीत असतो. बोध (ज्ञान देणे) आणि धैर्य, सेवा आणि स्वार्पण हेच शिक्षणाचे चतुर्विधसाधन आहे. यातच अहिंसेचे सर्व तत्त्व येऊन जाते.

अहिंसेचा स्वभावच असा आहे की त्यातून उद्‌भवणाऱ्या सत्याग्रहाचे परिणाम समन्वयाचे रूप धारण करतात, आणि जगात खरे सामर्थ्य समन्वयाचेच असते. अहिंसेने समन्वय, समन्वयाने शांती आणि सामर्थ्य, सामर्थ्याने सेवा, आणि सेवेने मुक्ती, हाच मानवी उत्क्रांतीचा क्रम आहे.

याबरून हे स्पष्ट होते की अहिंसक युद्धाने कधीही संस्कृतीचा नाश होत नाही, उलट अहिंसेने संस्कृती उज्ज्वल बनत असते, म्हणूनच अहिंसामूलक सत्याग्रहाला शिक्षणाचे एक उग्र रूप मानलेले आहे.

—जीवनविकास : २००

विभाग चौथा

धर्म आणि अध्यात्म

धर्माचे खरे कार्य मानवाला प्रेमपूर्ण, सहृदय, उदार, सर्वहितरहित, बनवून त्याला उदात्त, पवित्र, मंगलमय जीवन जगण्यास प्रवृत्त आणि पात्र बनविण्याचे असते. खरा धर्म माणसाच्या ठिकाणी आध्यात्मिक गुणांचा विकास करायला प्रेरणा देणारा असतो; इतर धर्मांशी स्पर्धा करायला व झगडायला कधीच सांगत नाही असे काका आवर्जून सांगतात. ते नुसताच सर्वधर्म समभाव सांगत नाहीत तर सर्वधर्मसम भाव वाढविण्याचे प्रतिपादन करतात. धर्म-संस्करण आणि धार्मिक शिक्षण, आस्तिकता, सनातनधर्म, हृदयधर्म, आत्म्याचे गुण, आत्मौपम्य, मांगल्य, सत्वसंशुद्धी इत्यादी महत्त्वाच्या संकल्पनांचे त्यांनी केलेले विवेचन फारच मौलिक व मार्गदर्शनपर आहे. त्यांच्या मते खरा धर्म मानवाला विश्वप्रेम, विश्वात्मकता व उदात्तता शिकवतो आणि अर्थ प्राप्त करून देतो. माणसाची जीवनशुद्धी व जीवनसमृद्धी करणे हे खऱ्या धर्माचे उद्दिष्ट असते असे ते आवर्जून सांगतात. धर्माच्या अवनतीची त्यांनी केलेली मीमांसा महत्त्वाची आहे.

१. खरा धर्म : जीवनाचे शास्त्र
२. धर्माचे सारस्वरूप
३. धर्म-संस्करण
४. धार्मिक शिक्षण
५. खरी आस्तिकता
६. नास्तिकता
७. आपल्या ईश्वराचे स्वरूप
८. अद्वैताचे मर्म
९. सनातन हिंदुधर्म
१०. हिंदुधर्म : विश्वधर्म
११. सुख व दुःख दोन्ही हवीत
१२. धर्म म्हणजे प्रेम
१३. सर्व धर्म मम भाव
१४. हृदय
१५. हृदयधर्माची दीक्षा
१६. हृदय व संगीत
१७. कवी, तत्त्वज्ञ आणि धर्मज्ञ
१८. तर्क आणि भावना
१९. हिंदुधर्म जागृती धर्मपीठाकडून नव्हे
२०. धर्माच्या अधोगतीची मीमांसा
२१. संघटना हानिकारक
२२. सत्याच्या विरुद्ध सत्ता
२३. आत्म्याचे गुण
२४. आत्मौपम्य
२५. मांगल्य
२६. करुण रस
२७. संयमात संस्कृती
२८. अघमर्षण
२९. पक्षीगीत

१. खरा धर्म : जीवनाचे शास्त्र

कोणास ठाऊक कशामुळे आजचा काळ धर्माला घाबरून फिरतो आहे. धर्माच्या नावें देश आपसांत लढले आहेत. धर्माच्या नावाने एका वर्गाने दुसऱ्या वर्गावर जुलूम केले आहेत. धर्माच्या नावाखाली ज्ञानाचा दिवा विझवून टाकून अज्ञान आणि संशय यांचा अंधार मुद्दाम व न जाणता खूप पसरविण्यात आलेला आहे. धर्माच्या नावाने काही काही वेळा जीवन असार आणि खारट बनविण्यात आले आहे. धर्माच्या नावाखाली माणसाची प्रगती सफलतापूर्वक अडविण्यात आलेली आहे. शास्त्रधर्माने व रूढिधर्माने एकत्र कारस्थान करून हृदयधर्म, प्रेमधर्म, माणुसकीचा धर्म आणि विश्वमांगल्याचा धर्म या सर्वच उच्च धर्मांचा पुष्कळवेळा उच्छेद केला आहे हे खरे आहे. पण असे सर्व उत्पात करणारे 'धर्म' हे खरे धर्म नाहीत, पण माणसाची संकुचितता, माणसाचा धर्मवेडेपणा, अभिनिवेश आणि त्याचे अज्ञान धर्माच्या नावाखाली अधर्म पसरवीत आहेत. धर्म इतकी उग्र, आणि तेजस्वी वस्तू आहे की त्याची शक्ती पाहून त्याच्या मदतीने आपले काम करून घेण्यासाठी प्रत्येक क्षुद्र वृत्ती खटपट करीत असते. मानवद्रोही वृत्ती धर्माचा आधार घेत असतात म्हणून हा आश्रय काढून टाकण्यापूर्वी सर्व अशुभ वृत्ती नष्ट होणार आहेत किंवा भुकेने मरणार आहेत असे मानण्याचे काही कारण नाही, ईश्वर, आत्मा, परलोक, पुनर्जन्म वगैरे गोष्टींविषयी आज आपणामध्ये एकमत होत नाही या कारणास्तव या सर्वांचा अंतर्भाव असणारा धर्म ही गोष्टच त्याज्य आहे असे अनेक लोकांना वाटत आहे.

आत्मा, ईश्वर, परलोक आणि पुनर्जन्म या सर्व गोष्टी धर्माचे भांडवल आहे ही गोष्ट भलेही खरी असली तरी आंधळेपणाने त्यांना आपण चिकटून राहावे असे धर्म सांगत नाही. धर्म म्हणजे जीवनव्यवस्था. लोकांची धारणा ज्याने होऊ शकते, लोक परस्परांशी सहकार्य करून आपला उत्कर्ष साधू शकतात तो धर्म होय, असे शहाणे लोक सतत सांगत आले आहेत.

ज्या कोणत्या जीवनव्यवस्थेने, विचारपद्धतीने आणि आचारव्यवस्थेने लोकांचे सर्व प्रकारे उत्तम कल्याण होऊ शकत असेल त्याला धर्म म्हणण्यात येते. धर्म म्हणजे जीवनमीमांसा, जीवनव्यवस्था जीवनदृष्टी. जसा वृक्षात जीवनरस असतो आणि तो वृक्षाला टिकवून ठेवतो, कृतार्थ करीत असतो, तसेच मनुष्यसमाजाला टिकवून ठेवणारा आणि उन्नतीच्या मार्गाने घेऊन जाणारे जे कोणते तत्त्व असेल, जो कोणता संजीवनरूप जीवनरस असेल तो धर्म होय. या हेतूच्या अथवा प्रयोजनाच्या विरुद्ध असे जे काही सिद्ध होईल तो धर्म नाही. धर्माच्या नावाखाली जर असे काही चालत असेल तर त्याची धर्मामधून हकालपट्टी करावयास हवी. '**प्रभवार्थाय भूतानां**

धर्मप्रवचनं कृतम्।' सर्व प्राण्यांच्या विकासासाठी, उदयासाठी, प्रगतीच्यासाठी धर्माचे अस्तित्व असते. **'धारणाद् धर्मम् इत्याहुर् धर्मो धारयते प्रजाः।** हेच धर्माचे खरे स्वरूप आहे. धर्म म्हणजेच संस्कृती. धर्म म्हणजेच व्यापक समाजशास्त्र.

—जीवनव्यवस्था : १८१–१८३

२. धर्माचे सारस्वरूप

प्रत्येक धर्मात बुद्धी, दिव्य अनुभव, श्रद्धा, अंतःकरणाच्या भावना, काव्यकल्पना आणि कलारसिकता या सर्व गोष्टी असतात, व असल्याच पाहिजेत. त्यांच्याबरोबर व्यक्तीचा समाज व विश्व यांच्याबरोबरचा संबंध, जीवनव्यापी संघ स्थापण्याची वृत्ती आणि आवश्यकता तशीच क्षेमवृत्ती, स्थितिप्रियता (Conservatism) आणि परिवर्तनवृत्ती या दोन्ही बाजू धर्मात स्वभावतःच असतात, आणि असायला हव्यात. यातील एक जरी बाजू कमी झाली, उणी पडली तर धर्म विकलांग बनावयाचा, आणि मनुष्यजीवनासाठी अपर्याप्त ठरावयाचा. धर्मात श्रद्धेचे प्रमाण वाढल्याने धर्म बिघडत नाही. भावना आणि कोमलता वाढल्याने तो नेभळा बनत नाही. काव्यकल्पना वाढल्याने तो असत्यप्रेरक बनत नाही. कलारसिकता वाढल्याने तो हीनतेचा संग्राहक बनत नाही. विश्वाबरोबरचा संबंध पूर्णपणे स्वीकारण्याने तो अव्यवहारी होत नाही. स्थितिप्रिय वृत्तीचा अंगीकार करण्याने तो जड बनत नाही. परिवर्तनशीलतेचे स्वागत करण्याने तो विनाशक होत नाही धर्माचे मरण तर अज्ञान, विलासिता आणि बाह्यसत्तेत असते. भ्रममूल असत्याने सत्य झाकले जाईल, पण कधीही भंग पावत नाही, कारण असत्याच्या उदरातही सत्यच दडलेले असते. सत्याचा पराजय सत्तेत होत असतो. कोणताही धर्म जेव्हा अज्ञान सहन करतो तेव्हा असा धर्म प्रारंभी सुलभ बनतो, रोचक होतो, विशाल होतो, आणि शेवटी बुडबुड्याप्रमाणे फुटून जातो. सरकारी मदतीने पसरलेला धर्म क्षीणवीर्य आणि क्षणजीवी होत असतो ही गोष्ट सम्राट अशोकाने अनुभवली होती आणि अकबराने पण अनुभवली होती.

—जीवनव्यवस्था : २८–२९

३. धर्मसंस्करण

मानव जीवनाचा सर्व बाजूंनी समग्रपणे विचार करणारा जर कोणी असेल तर तो धर्मच होय. जीवनाचे स्थायी अथवा अस्थायी असे एकही अंग नाही की ज्याचा विचार धर्माला करावयाचा नाही.

म्हणून धर्म मनुष्याच्या सनातन जीवनाएवढाच अथवा त्याहीपेक्षा अधिक व्यापक असावयास पाहिजे, आणि समग्रजीवन त्याचे क्षेत्र होऊन ते उत्कटपणे जगले जावयास पाहिजे.

हल्ली जगात जे प्रख्यात धर्म आहेत ते बऱ्याच अंशी असे व्यापक धर्म आहेत. स्थापनेच्या समयी ते सर्व जिवंत होतेच. परंतु त्यांच्या चैतन्याला धार्मिक पुरुषांनी वारंवार जागे करून, चेतवून त्यांना जिवंत ठेवले आहे. शेगडीतील विस्तव आपोआपच जेव्हा मंद होऊन हळुहळू विझू लागतो, त्याच्यावर राख धरते म्हणून त्याच्यात चांगला कोळसा घालून व फुंकून त्याला पुनः फुलवावे लागते आणि धगधगीत करावे लागते त्याचप्रमाणे समाजात धर्मतेजाला जागृत व तेजस्वी ठेवण्यासाठी धर्मपरायण समाज पुरुषांना त्याच्यावर फुंकर घालत राहून व त्यात नवे जळण घालत राहण्याचे काम करावे लागत असते. हे काम जर वेळोवेळी होत राहिले नाही तर धर्मजीवन क्षीण आणि विकृत होऊन जाते, आणि धर्माचे क्षीण आणि विकृत स्वरूप अधर्माइतकेच नुकसान करीत असते. धर्माला चैतन्यशाली आणि प्रज्वलित ठेवण्याचे कार्य फक्त धर्मपरायण व्यक्तीच करू शकतात. ही शक्ती धर्मग्रंथांत नसते, धार्मिक रीतिरिवाजांत किंवा संस्कारांत नसते, धार्मिक संस्थांमध्ये नसते, की धर्माला आधार देणाऱ्या राज्यव्यवस्थेतही नसते. शास्त्रग्रंथ, संस्कार, रिवाज आणि धार्मिक व राजकीय संस्था धार्मिक जीवनाला कमी अधिक प्रमाणात उपयोगी पडतात हे खरे; धार्मिक वातावरण स्थिर करण्यात त्यांची सेवा अनेक परींनी महत्त्वाची ठरली आहे हे खरे, परंतु मूळ शक्ती तर धर्मप्राण अशा ऋषींची, संतांची व महात्म्यांचीच असते. धर्माचा अंतिम आधार पवित्र मनुष्य हृदय असते. '**धर्मशास्त्रं महर्षीणां अन्तःकरण-संभृतम्**' असे जे उपनिषदांत म्हटले आहे ते पूर्णपणे यथार्थ आहे.

—जीवनव्यवस्था : ६८

धर्मजिज्ञासा असणे आणि धर्मचिंतन करणे हा मनुष्याचा स्वभावच आहे. आणि त्यामुळे प्रत्येक काळात आणि प्रत्येक प्रदेशात उन्नतीच्या कक्षेप्रमाणे मनुष्य हृदयात धर्माचा आविर्भाव झालेलाच आहे. हा हृदयधर्म वाटेल तितका कलुषित झाला, मलिन झाला तरीही मूळ वस्तू शुद्ध आहे. अशुद्ध सुवर्ण काही पितळ नसते, पितळ कितीही शुद्ध, चकचकीत आणि सुंदर असले तरी ते सोने नसते. त्याचप्रमाणे केवळ

बुद्धीच्या बळावर उभा केलेला, लोकांमध्ये असलेल्या रागद्वेषाचा फायदा घेऊन सुरू केलेला आणि कमी किंवा जास्त सामर्थ्यवान लोकांचा स्वार्थ पोसणारा धर्म तो धर्म नव्हे. असंस्कृत हृदयाची क्षुद्र वासना तशीच दंभातून उत्पन्न होणारी विकृती यांना झाकून टाकणारा शिष्टाचार किंवा चातुर्याने व तर्काने केलेला त्याचा बचाव हा पण धर्म नाही. अज्ञान (म्हणजे अल्पज्ञान), भोळेपणा आणि अंधश्रद्धा या तीन दोषांनी कलुषित झालेला धर्म अधर्माच्या स्थितीला जाऊन पोहोचला तर ती गोष्ट वेगळी, आणि मुळातच जो धर्म नाही, पण केवळ शिताफीने धर्माचे रूप धारण करील तर ती गोष्ट वेगळी. मानवाच्या इतिहासात वर सांगितलेल्या धर्माचे दोन्ही प्रकार मोठ्या प्रमाणात पाहावयास मिळतात इतका मनुष्य-समाज परिपक्व (पोक्त) झाला आहे. परंतु या दोन्ही गोष्टींचे पृथक्करण करून त्यांचे यथार्थ स्वरूप ओळखण्याचा त्रास माणसाने अद्याप घेतला नाही.

हृदयधर्म जेव्हा बुद्धिप्रधान लोकांमध्ये स्वतःचे कार्य सुरू करतो, शिष्टमान्य बनतो आणि त्यामुळे संस्थाबद्ध बनत असतो तेव्हा त्याची शास्त्रे निर्माण होत असतात, मग त्या शास्त्रांचा अर्थ बसविणारी मीमांसा-पद्धती उत्पन्न होत असते, आणि अंतिम निर्णय देणाऱ्या शास्त्रज्ञांचा एक वर्ग तयार होत असतो; अथवा पोप किंवा पीठस्थ शंकराचार्यांसारख्या अधिकारारूढ व्यक्तींचा स्वीकार होत असतो.

धर्माची शास्त्रात गुंफण करणे आणि संस्थांमध्ये त्याची बांधणी करणे हे बुद्धि-प्रधान आणि व्यवहारकुशल लोकांच्या हातून होत असल्याने या मार्गे धर्माची स्वाभाविक भविष्योन्मुख दृष्टी क्षीण होत असते आणि त्याच्यावर भूतकाळाचाच थर जमा होत जातो. भूतकाळात नेहमीच अग्नीपेक्षा राख जास्त असण्याने धर्मतेज मंदावते हे वेगळे समजण्याची जरूर नाही. याच कारणामुळे प्रत्येक धर्माला संस्करणाची गरज राहात असते.

—जीवनव्यवस्था : ६८–६९

धर्माची सार्वभौम शक्ती पाहून प्रत्येक गरजू माणसाने आपली गरज कोणत्या ना कोणत्या स्वरूपात धर्माच्या गळ्यात बांधली आहे व यामुळे पण धर्माचे तेज वारंवार क्षीण होत आले आहे.

एखादे चालू दुकान जसे आपली प्रगती व भरभराट कायम ठेवण्यासाठी आणि वाढविण्यासाठी जुना व निरुपयोगी झालेला माल वारंवार काढून टाकीत असतो, आणि पडून राहण्याने खराब झालेला माल झाडून पुसून स्वच्छ करीत असतो त्याच प्रमाणे धर्माला वारंवार आपले संस्करण करावे लागते. परंतु असे संस्करण अस्सल सोने ओळखण्याची व सांभाळून जतन करण्याची ज्यांच्यात शक्ती व कुवत असेल अशा कुशल, धर्मज्ञ समाजसेवकांच्या हातीच असावयास पाहिजे. जगात वाढलेल्या

बऱ्याचशा प्रचलित नास्तिकतेमुळे धर्मसंस्करणाचा अभावच आहे.

—जीवनव्यवस्था : ७०

कोणताही समाज वृद्ध किंवा क्षीणवीर्य होतो तेव्हा त्याला दोन कारणे असतात; विलासिता आणि धर्मजडता.

समाज विलासी बनतो तेव्हा आपल्यापाशी असलेली धनसंपत्ती त्याला अपुरी पडत असते, पुरुषार्थ आपोआप कमी होत जातो, 'असे असले तरी काय? आणि तसे असले तरी काय? कशातच काही नाही' असे नैष्कर्म्य आणि एक प्रकारचा झोपाळूपणा त्याच्यावर जमा होत असतो. आणि मग नवे नवे अनुभव घेण्याऐवजी जुन्याविषयी कृत्रिम व ढोंगी आग्रह वाढून त्याला ढालेप्रमाणे पुढे केले जाते.

दुसऱ्या बाजूने मनुष्याच्या ठिकाणी जेव्हा जेव्हा बौद्धिक जागृती मंदावते, क्षीण बनते, प्रयोग करण्यापेक्षा प्रामाण्यावरच अधिक भर देण्याची वृत्ती वाढते तेव्हा समाजात एक प्रकारचे धर्मजाड्य उत्पन्न होत असते. हे धर्मजाड्य दिसते तर धर्माभिमानासारखेच, परंतु वास्तविकपणे ती बेफिकिरी असल्याने एक प्रकारची नास्तिकताच असते. अभिमान आणि आग्रह यांच्या मुळाशी खरा आदरभाव अथवा खरी श्रद्धा असतेच असा अनुभव नाही.

—जीवनव्यवस्था : ७०

खेड्यापाड्यांत खरीखुरी धर्मनिष्ठ, पवित्र आस्तिकता आणि उच्च चारित्र्यशक्ती कालपर्यंत होती; आजही तिचे अवशेष कोठे कोठे पाहावयास मिळतात. परंतु आता निर्बुद्धता, जडता आणि छुपी नास्तिकता यांचेच साम्राज्य सार्वत्रिक व्हावयाला लागले आहे. यामुळे खेड्यांच्या समाजमानसात वार्धक्य अधिक पाहावयास मिळते. खेड्यांत अज्ञान आहे, अनारोग्य, रोगराई आहे व गरिबी आहे. हे तीन जर दूर केले नाहीत तर ग्रामीण समाज आता टिकणारच नाही. परंतु ज्ञान, आरोग्य आणि उद्योग ही लोकांवर बाहेरून किती लादता येतील? बाहेरून लादण्याच्या उपायाला मर्यादा असते. या तारक त्रिपुटीचा लोकांनी स्वेच्छेनेच स्वीकार करावयास पाहिजे, आणि त्यांचा स्वेच्छेने स्वीकार होण्याच्या आधी समाजाचे वार्धक्य दूर व्हावयास पाहिजे. समाजात उत्साह आणि उत्थान यावयास पाहिजे. धर्मसंस्करणाशिवाय ही गोष्ट होणार नाही. म्हणून इतर सर्व गोष्टींपेक्षा आधी खेड्यापाड्यांत धर्मसंस्करणाचा यथायोग्य प्रयत्न व्हावयास पाहिजे.

खेड्यापाड्यांत जे धर्म पाळले जातात त्यांच्यात भय, लाच, दैववाद, जादूटोणा, मंत्रतंत्र, जंतरमंतर, गंडेमाळा यांचे कर्मकांड याच गोष्टी मुख्य असतात; मग तो हिंदुधर्म असो की मुसलमान धर्म असो की ख्रिश्चन धर्म असो. खेड्यांतील लोकांना

आपले दौर्बल्य, अज्ञान, भोळेपण आणि अनाथ स्थिती यांच्या अनुभवातून निर्माण झालेले एवढे कटू ज्ञान असते की ते स्वाभाविकपणेच शक्ति-उपासक बनत असतात; मग ते लोक भलेही जैन असोत की लिंगायत असोत. या अज्ञानमूलक शक्तिपूजेनेच जादू आणि जंतरमंतर, जादूटोणा यांवर विश्वास बसत असतो. धर्म म्हणजे शीतला-देवीची आराधना अथवा खरेदी केलेली त्यांची राखण एवढाच अर्थ सामान्य लोक समजत असतात.

—जीवनव्यवस्था : ७१

धर्माच्या द्वारा मांगल्यावरची श्रद्धा वाढवायची असते, चारित्र्याची तेजस्विता स्वाभाविक बनवायची असते. ऐहिक अनुभवांत पदोपदी जे विषाद प्राप्त होत असतात ते दूर करण्यास समर्थ असणारे दैवी आश्वासन मिळवायचे असते, आणि जीवनांतर्गत प्रत्येक मूल्यांचे नव्या दृष्टीने नवेच मूल्य करवायचे असते. सफलता आणि निष्फळता यांविषयींचे विचार बदलून या भौतिक जगतात आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळवायचे असते.

तात्त्विक विवेचनाच्या दृष्टीने हा दृष्टिकोण खूपच अपुरा समजला जाईल. परंतु हृदय हृदयाशी बोलेल तेथे उन्नत भूमिकेचे आमंत्रण सरळ सरळ आरपार पोहोचून जाते, आणि एकदा हृदयात परिवर्तन झाले म्हणजे मग कोणत्याही उपायाने त्याची पीछेहाट होत नाही. असे हृदयाचे आवाहन करणाऱ्या व्यक्तीच्या हृदयात कोणाही विषयी तुच्छभाव असता कामा नये. आपले आवाहन अमोघ आहे अशी त्याच्या ठिकाणी अमर आस्तिकता असावयास पाहिजे. तसेच मनुष्यमात्राच्या हृदयाविषयी प्रेम आणि आस्था, आदर असायला पाहिजे.

(धर्मज्ञान देतांना किंवा घेताना त्याचे ग्रहण करणाऱ्याविषयी आजपर्यंत बेसुमार चर्चा झाली आहे. आता धर्मज्ञान देणाऱ्याच्या अधिकाराविषयी ऊहापोह करण्याचे दिवस आले आहेत. वर सांगितलेली अस्तिकता ज्यांच्या ठिकाणी असेल त्यांनीच धर्मबोधाचे व धर्मसंस्करणाचे काम आपल्या शिरावर घ्यावे.)

धर्मांधतेच्या रूपात खेडेगावात सध्या नास्तिकता किती पसरली आहे त्याची नेमकी जाणीव झाल्याने मनाला आघातच व्हायला पाहिजे व आघात होतोच.

—जीवनव्यवस्था : ७१

कोणताही समाज युगकल्पनेच्या मागे राहून यशस्वी होणार नाही. आजचे युग केवळ तात्त्विक मानव समानतेचे नाही. स्त्रीपुरुषांची समानता, जाती-जातींची समानता आज स्वीकारायलाच पाहिजे. एवढेच नाही तर सर्व धर्मांनासुद्धा समान दर्जा मिळावयास पाहिजे.

सर्व धर्मांविषयी समान अनादर, त्यांच्याविषयी सारखी अनास्था, अथवा एक-सारखे अज्ञान यालाही समानतेचा एक मार्ग समजण्यात येते. पण हा मार्ग घातक आहे. आजच्या युगात समाजात राहणाऱ्या प्रत्येक माणसाला मुख्य मुख्य धर्मांची सामान्य माहिती असावयास पाहिजे पण अशी माहिती मिळविण्यात आणि देण्यात तार्किक, चिकित्सक किंवा केवळ ऐतिहासिक दृष्टी असणे हे नाही चालणार. प्रेम, आदर आणि सहानुभूती या सर्वांसहित जागृत जिज्ञासाबुद्धीने सर्व धर्मांचा परिचय व्हावयास पाहिजे. खेड्यांतील धर्मज्ञान फारच मागासलेले असते, दृष्टी संकुचित असते, आणि जीवनाचा आशय फार उन्नत असत नाही. अशा वेळी विशेष प्रेमाने जगाच्या वेगवेगळ्या सत्पुरुषांनी आणि चारित्र्यपरायण संघांनी केलेल्या प्रयत्नांची माहिती द्यावयास पाहिजे. यात उद्देश धर्मजागृतीचा असावयास पाहिजे, केवळ बहु-श्रुततेचा नको.

आजच्या समाजाचा एक महान दोष आहे तो वर्गविग्रहाचा. लोकांना ईर्ष्या, द्वेष किंवा मत्सर करण्यासाठी एखादी ध्यानमूर्ती असावी लागते. स्त्रियांनी पुरुषांशी झगडायचे, तरुणांच्या विरुद्ध वृद्ध, गरिबांच्या विरुद्ध श्रीमंत, हिंदुमुसलमान हे परस्पर-विरुद्ध, गोरे लोक विरुद्ध काळे व पिवळे, असे सर्वत्र विग्रहाचे वातावरण आहे. कमीजास्त लोकांना संघटित करून त्यांचे नेतृत्व घेण्याची प्रवृत्ती असेल तर सर्वांच्या द्वेषबुद्धीला केंद्रित करून त्यांना द्वेष करता येण्यासाठी एखादे लक्ष्य उपलब्ध करून देऊन संशयाचे वातावरण उभे करणे हा सोपा मार्ग आहे.

हा रोग धर्मामध्ये फार चटकन शिरू शकतो. आजकाल या दिशेने खूप प्रयत्न करणेही चालू आहे. या सर्वांचा परिणाम म्हणजे परस्परांचा नाश आणि शेवटी आत्महत्या होणारच. आपण जो धर्मसंस्करणाचा विचार करीत आहोत त्यात या रोगापासून मुक्त राहण्याची पुरेपूर खबरदारी घेतली पाहिजे.

वाईट तत्त्वे काढून टाकताना एवढे लक्षात ठेवायला पाहिजे की त्यांच्या जागी सात्त्विक आणि खऱ्या तत्त्वांची स्थापना करावयास पाहिजे. केवळ पोकळी असणे भयानक ठरते.

—जीवनव्यवस्था : ७२

व्यवहारकुशल लोक म्हणतील की हे सर्व विवेचन सुंदर आहे, उद्‌बोधक आहे, परंतु यात योजनेसारखे काही नाही असे दिसते....पण व्यवहारात कार्यक्रमाची कलमे हाती येताच हेतू आणि उद्देश गौण ठरून शेवटी ते विसरले जातात. समाजाला अशा कलमबद्ध योजनेची सवय लागलेली आहे. परंतु याने जीवन यांत्रिक बनत असते. भावनेची जागा योजना कोणत्या रीतीने भरू शकेल? भावनेचे क्षेत्र शिक्षणाने नवपल्लवित होत असते, तर उलट योजना शेवटी व्यवस्थेचे रूप धारण करीत असते.

येथे कथिलेले परिवर्तन कोणत्याही सत्तेच्या जोरावर होत नसते, परंतु ते प्रत्यक्ष उदाहरणाने हृदयपरिवर्तन घडवून आणूनच व्हावयाचे आहे. चांगल्या सार्वजनिक योजना घडविल्याने हे येणार नाही.

भावना मुळात शुद्ध असेल आणि सुरक्षित तशीच जिवंत राहील तेथे आपल्या आवश्यकतेप्रमाणे अनेक योजना निर्माण होतील आणि बदलत राहतील.

—जीवनव्यवस्था : ७२–७३

४. धार्मिक शिक्षण

अशा परिस्थितीत धार्मिक शिक्षण कोण कोणाला देणार ? विहिरीत असेल तरच हाळात (पोहऱ्यात) येणार ना ?

तर का मग जगात धार्मिकता राहिलीच नाही ? असे तर काही म्हणता येणार नाही. हे सर्व जग धार्मिकतेच्या आधारावरच टिकले आहे; आणि म्हणून जग चालू आहे तोपर्यंत धार्मिकतेचा पूर्ण लोप झाला आहे असे तर म्हणताच येणार नाही. धार्मिकता मेलेली नाही, पण तिचा कोंडमारा मात्र झाला आहे, ती गुदमरली आहे. कशाने असे झाले आहे ? अधर्माने नाही. पण धर्मानेच असे झाले आहे. धार्मिकता जतन करून ठेवण्यासाठी माणसाने बनविलेल्या 'धर्म' नावाच्या कलेवरात धार्मिकता गुदमरली आहे, तिचा श्वास रोखला गेला आहे. म्हणूनच तिचा प्रचार करणे कठीण झाले आहे. आज धार्मिक शिक्षणाचा प्रश्न छेडायला लागलो तर प्रश्न उभा राहतो 'कोणत्या धर्माचे शिक्षण ?' कोणत्या प्रकारचे शिक्षण ? मतांचे शिक्षण की आचाराचे शिक्षण ? का सिद्धान्तांचे शिक्षण ? इतके काही धर्म झाले आहेत की त्यांपैकी कोणता धर्म सार्वजनीन, सर्वमान्य समजायचा ? कोणता आचार सर्वमान्य, सर्वांना स्वीकार्य म्हणता येईल ? हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती वगैरे भेद तर आहेतच. प्रत्येक धर्मात अंत नाहीत इतके पंथ आहेत. प्रत्येकाचा आचार वेगळा.

—जीवनविकास : ३२९–३३०

सर्व धर्मांचा हृदभाजक काढून सर्वसामान्य म्हणजे सामाईक शिक्षण द्यायला जायचे तर असंख्य संख्यांमध्ये जसा सर्वव्यापक आणि निरुपद्रवी एक हा आकडा (१) हाच एक हृदभाजक निघतो, तसे सर्व धर्मांतून जर काही सामान्य तत्त्व निघाले तर ते अळणीच वाटायचे.

आत्मा, परमात्मा, इहलोक, परलोक, पुनर्जन्म, ईश्वरापुढे होणाऱ्या न्यायाचा दिवस, वगैरेविषयींची भांडणे सोडून देऊन फक्त सज्जनतेचे, सौजन्याचे, चांगुल-

पणाचे शिक्षण देऊ या, तेवढे पुरेसे आहे. नीतिशिक्षणात सर्व धार्मिक शिक्षण समाविष्ट असते असे सूत्र गेल्या काळात (शतकात) खूपच लोकप्रिय होते. पण ते फार काळ टिकले नाही. नुसती नीती पुरेशी नाही असे अनेक लोक म्हणू लागले, तर कित्येक 'मुक्त' पुरुष आवेशाने म्हणू लागले, 'नीतीची वगैरे जरूर नाही. नीती म्हणजे काय ? अमुक संशयी लोकांची दुर्बळ मते– रसिकतेने जगावे आणि जीवनाचा मनसोक्त उपभोग घ्यावा आणि लहान मोठे पराक्रम करून मानमरातब, प्रतिष्ठा मिळवावी यातच जीवनाचे सार येऊन जाते.'

धर्म गेले, नीती गेली आणि त्यांच्या जागी कला आली आहे. कलेचे समर्थन करणारे कलावंत होण्यातच जीवनाची सार्थकता आहे असे मानायला आणि सांगायला लागले आहेत. तर केवळ नीतीचे समर्थक पीनल कोडाच्या कलमात सापडणार नाही एवढीच नीतीची मर्यादा पुरेशी आहे असे व्यवहारात मानायला लागले आहेत. 'धार्मिक शिक्षणाच्या भांडणात आपण उतरू नये, केवळ नीतीचे शिक्षण पुरेसे आहे. शिवाय नीतीचे शिक्षण उपदेशद्वारा देऊ गेल्यास ते नीरस, शुष्क आणि दांभिक बनते. म्हणून शिक्षकाचे आचरण हेच विद्यार्थ्यांसाठी नीतीचे शिक्षण समजायला पाहिजे. मुक्त विद्वानांच्या मते नीती आणि अनीती हा तर लोकांनी त्या त्या काळासाठी सोयीकरिता व्यवस्थित घडविलेला विवेक असतो. फार फार तर नीतीला एक प्रकारचा आजार समजा. अनीतिमान् मनुष्य तिरस्काराला योग्य नाही. तो सहानुभूतिपात्र आहे. दबाव आणि मताग्रह तर या काळात चालवितच कामा नये. निसर्गाच्या प्रेरणा जशा आहेत तशाच समजून जे आहे ते चांगले आहे अशी श्रद्धा शिकविली पाहिजे ! अशी केवळ नैतिक शिक्षणाला मानणाऱ्या लोकांची आजची वास्तविक अवस्था.

धार्मिक शिक्षण मानणारे सज्जन, जुने असोत की नवे, आग्रही असोत की आग्रह न धरणारे, कोणत्या तरी पंथाला चिकटून राहाणारे आहेत. त्यांच्यात तात्त्विक सिद्धांताची मनोरंजक किंवा नीरस कशीही चर्चा नित्य नैमित्तिक चालूच राहणार. पण या सिद्धांताचे अनुशीलन कसे करावयाचे ? आचारात तर बाह्याचरणाचेच पालन नियमबद्ध करता येते व तपासता येते. या स्थितीत ज्यांचे बाह्याचरण सारखे समजले जाते तेवढेच लोक एकत्र राहतात ही गोष्ट अपरिहार्य होऊन जाते. पण संस्थाबद्ध गुरु–शिष्यांचा आचार जमात ठरवील तसाच राहिला पाहिजे. आणि जसा हिंदुजीवनाचा ऊत्कर्ष होईल तसा हिंदु कायद्यात बदल होऊ शकणार नाही. तसाच जमातींच्या संस्थांमध्ये त्या जमातीच्या शास्त्राप्रमाणेच आचार चालणार हे स्वीकारावेच लागते. दांभिकता, कृत्रिमता आणि बाह्य देखावा ही जर नंतर पाहायला मिळणार असतील तर तक्रार कशी करता येईल ?

—जीवनविकास : ३३०–३३१

तर मग शिक्षण कसे द्यावयाचे ? धर्मात जेव्हा धार्मिकता पुनः नव्याने जागी होईल आणि धर्माभिमानी लोकांत जेव्हा धर्मनिष्ठा उदय पावेल, म्हणजे जेव्हा व्यक्ती धर्मपरायण होईल तेव्हाच धार्मिक शिक्षण देणे शक्य होईल. गुलाबाचा किंवा चाफ्याचा सुगंध कशा रीतीने पसरेल याची चर्चा कधी करावी लागते का ?

मनुस्मृतीत एक वचन आहे—

अन्ये कृतयुगे धर्माः त्रेतायां द्वापरे ऽ परे
अन्ये कलियुगे नृणां युगहासानुरूपतः ॥

या न्यायाने हल्लींच्या काळात आणि आपल्या देशाचा एक सार्ववर्णिक धर्म असावयास पाहिजे. असा जर धर्म आपल्या हाती आला तर धार्मिक शिक्षणाचा काही मार्ग सुचतो खरा.

—जीवनविकास : ३२३

धर्माचे **उद्यम** हे एक तत्त्व आहे. उद्यमशीलता, उद्योगशीलता हे एक महत्त्वाचे तत्त्व आहे. आळशी मनुष्य स्वतःचा उत्कर्ष गमावून बसतो आणि समाजाचा द्रोह करतो हे मान्य करायला हरकत नाही. आळस हे सहावे महापातक हे अद्याप आपण समजून घेत नाही. आळस ही असत्य, दंभ, ईर्षा, द्रोह आणि हिंसा याची जननी आहे ही गोष्ट विचारजागृत आळशी माणूस आणि त्यासारखे लोक प्रसंग पडेल तेव्हा समजू शकतात. जर सभोवताली उद्यमाचे वातावरण असेल, विचार—जागृती, कार्यदक्षता आणि नियमितपणाचे वातावरण असेल तर धार्मिक शिक्षणाचा पाया मजबूत झाला असे म्हणता येईल.

दुसरे तत्त्व आहे ते जीवनाच्या **उत्साहाचे**. जीवन ही एक कर्मभूमी आहे, त्यात शेवटपर्यंत पुरुषार्थ करावयाचा आहे अशी दृढ भावना असणे तो उत्साह होय. निराशा, जडता, अकर्मण्यता ' चालू दे बुवा ' अशी वृत्ती हे आता सर्वत्र पाहावयास मिळते. माणूस जर धूर्त असला तर तो याला सात्त्विकता, साधुता आणि परमार्थ-परायणता यांचे स्वरूप देऊ शकतो. ईश्वराला शरण गेल्याचे सोंग करून माणूस नशिबाला शरण जाऊ शकतो. ही अधार्मिकता विशेष करून आपल्या समाजात पसरली आहे. म्हणूनच चारित्र्यभ्रष्ट लोक सुद्धा म्हणू शकतात, ' आम्ही धर्म मानत नाही. धर्म म्हणजे दंभ. '

असमर्थो भवेत्साधुः ।

—जीवनविकास : ३३३–३३४

स्वाश्रय हे धार्मिकतेचे वज्रकवच आहे. स्वावलंबन हे आत्म्याचे अन्न आहे. त्याच्या अभावामुळे फक्त आपला देशच नाही तर संपूर्ण मानवी समाज हीनदीन बनला आहे. प्रेम आणि स्वेच्छासहकारापासून उत्पन्न होणारे परस्परावलंबन हे शुद्ध स्वावलंबनच आहे. हे तर पूर्वी आपल्याकडे होते त्यापेक्षा कमी होत चालले आहे. बाकी जे आहे त्याला काय वाटेल ते नाव द्या, पण ते निरोगी परस्परावलंबनच आहे...

—जीवनविकास : ३३४

आपल्या वृत्तींवर ताबा मिळवण्यात. आपल्या शुद्ध मताप्रमाणे वृत्ती कार्य करतील अशा रीतीने त्यांना मार्गदर्शन करण्यात मुख्य धार्मिक शिक्षण येते. माणसाच्या जेवढ्या काही स्वाभाविक वृत्ती असतात त्या सर्वच शुभ असतात असे म्हणता येणार नाही. आजच्या विकारी काळात वृत्तींचे नैसर्गिकपण राहिलेलेच नाही. अस्वाभाविक वृत्ती लघुदृष्टिप्रमाणे इतक्या काही पसरल्या आहेत की त्यांनासुद्धा आता नैसर्गिक समजावे लागते. अस्वाभाविक किंवा अकुशल वृत्तींचा प्रभाव कमी होईल असे प्रयत्न केल्याशिवाय जीवनाचा उत्कर्ष व्हावयाचा नाही. वृत्ती इतक्या काही फसव्या (मायावी) असतात की सरळ त्यांच्यासमोर जाणे अथवा त्यांना सौम्य व सह्य करण्यासाठी प्रयत्न करणे आपल्याला नेहमीच जमेल अशी खात्री देता येणार नाही. वृत्ती या लहरी वाऱ्यासारख्या असतात. त्यांचा वेग की त्यांची दिशा निश्चित नसते. अशा वाऱ्याची मदत घेऊन हुशार तांडेलाप्रमाणे जहाज ठरविलेल्या बंदराकडे घेऊन जावयास पाहिजे. वारा एका बाजूला वाहात असेल तर तांडेल (नावाडी) शीड अशा रीतीने पसरील की वाऱ्याच्या जोरापैकी जेवढा भाग आपल्या आदर्शाला अनुकूल असेल तेवढाच वापरला जाईल, आणि जेवढा भाग बाधक असेल त्याला जहाजाच्या मजबूत बाजूला घेऊन आत सामावून घेईल. वृत्तींचेही असेच करावे लागते. त्यांच्यासाठी दिशेची स्पष्ट जाणीव आरंभापासून असावयास पाहिजे. वृत्तींच्या वेगाचे स्वरूप आणि प्रमाण लक्षात यावयास पाहिजे. वृत्तींचे पृथक्करण करण्यास शिकविलेल्या बुद्धीचे शीड आपल्यापाशी असावयास पाहिजे आणि त्यानंतर खंबीरपणे रस्ता सांभाळण्यासाठी, चुकू न देण्यासाठी, धैर्य व धीर असावयास पाहिजे. असे जो कोणी शिकू शकेल तो माणूस धार्मिक शिक्षणाचा आचार्य बनेल. तारुण्यात विद्यार्थ्याच्या सर्व शक्ती विकसित होणे, त्याला जगाचा मर्यादित पण यथार्थ अनुभव मिळणे हे आवश्यक असते. पण जगणे म्हणजे काही गंमत नसते. तो सर्वांत मोठा पुरुषार्थ आहे. त्यासाठी वृत्ती शुद्ध आणि मजबूत असावयास पाहिजेत. असे हृदयबदल किंवा चारित्र्यबदल शिकण्यासाठी, वाढविण्यासाठी मदत करील तो विद्यार्थ्याचा परम हितकर्ता असतो. उपनिषदात म्हटले आहे तसे–

शुभाशुभाभ्यां मार्गाभ्यां वहन्ती वासनासरित् ।
पौरुषेण प्रयत्नेन योजनीया शुभे पथि ॥

यात सर्व धार्मिक शिक्षण येऊन जाते.

—जीवनविकास : ३३४–३३५

५. खरी आस्तिकता

—ईश्वर किंवा शास्त्र यांवर विश्वास ठेवणे ही खरी आस्तिकता नाही. खरी आस्तिकता तर अशी आहे की माणसाच्या हृदयावर विश्वास ठेवला जावा. आस्तिकतेचे लक्षण हे आहे की मनुष्य असा विश्वास बाळगेल की कोणत्या ना कोणत्या दिवशी मनुष्य आपला स्वार्थी, मत्सरी किंवा क्रूर स्वभाव सोडून देऊन समस्त मानव जातीचे एक विश्वकुटुंब स्थापित करील आणि हा कुटुंब-भाव वाढवीत वाढवीत चांगल्याबाईट सर्व प्राण्यांचा त्यात अंतर्भाव करील.

...आपण संकृति-समन्वयाची दृष्टी विकसित करून आपल्या देशासाठी तीन धारांचा समन्वय करणे आवश्यक बनले आहे. बौद्धदर्शन, जैनदर्शन आणि वेदान्तदर्शन ही आपसात वाटेल तितका वाद करोत, संस्कृतीच्या दृष्टीने या तिघांमध्ये सुंदर समन्वय पाहणे आजचे युगकार्य आहे.

भगवान महावीरांनी संयमाचा मार्ग शिकविला. त्यांनी असेही सांगितले की मनुष्याचा अनुभव एकांगी असतो, दृष्टी एकांगी असते; त्या सर्व दृष्टींच्या समन्वयानेच केवल सत्याचे, संपूर्ण सत्याचे ज्ञान होईल.

भगवान महावीरांनी असेही दाखविले की लोभ आणि वासना यांच्यावर विजय मिळविण्यासाठी आणि सर्व कल्याणकारी समन्वयदृष्टी प्राप्त करण्यासाठी आत्मशक्ती विकसित करावयास पाहिजे. स्याद्वादाला किंवा अनेकान्तवादाला मी 'बौद्धिक अहिंसा' असे नाव दिले आहे. जसे शांततापूर्ण सहअस्तित्व (Peaceful co-existence) राजनैतिक किंवा सामाजिक अहिंसा आहे, तशीच 'अनेकान्त' ही बौद्धिक अहिंसा आहे.

—समन्वय संस्कृतीकी ओर ; ८३–८४

जरा बारकाईने विचार केला तर असे दिसते की ईश्वरकेंद्रित आणि आत्मकेंद्रित धर्मसुद्धा जीवनपरायण असतातच. म्हणून या तिघांचे सामंजस्य होऊ शकते

आणि आता तेच करण्याचे दिवस आले आहेत. परमात्म्याला प्राधान्य देणारा वेदांत धर्म, तपस्या आणि अहिंसा द्वारा आत्मशक्तीचा साक्षात्कार करणारा जैनधर्म आणि सम्यक् दृष्टीद्वारा जीवनाला शुद्ध आणि दुःखमुक्त करणारा बौद्धधर्म–या तिघांचा समन्वय करण्याची वेळ आली आहे. बौद्धांचे धर्मप्राधान्य, जैनांची अहिंसा-तपोमूलक आत्मनिष्ठा आणि विश्वात्मैक्याला परमपुरुषार्थ मानणारा वेदान्त अथवा ब्रह्मपरायणता किंवा ब्रह्मनिष्ठा– या तिघांचा समन्वय करण्याने विश्वशांतीची, सत्ययुगाची आणि सर्वोदयाची स्थापना होईल.

—समन्वय संस्कृतीकी ओर : ८०

६. नास्तिकता

नास्तिकता आणि आस्तिकता हे दोन शब्द आपण येता जाता, विचार न करता वापरत असतो. खरे पाहता ते इतके सोपे नाहीत. 'आहे' असे जो मानतो तो 'आस्तिक', आणि 'नाही' असे मानणारा 'नास्तिक', असे या शब्दांचे मूळ अर्थ आहेत. जगात पुष्कळशा वस्तू आहेत, आणि म्हणून पुष्कळशा वस्तू नाहीत. जगात भुते नाहीत असे जर मी मानत असलो तर भुतांविषयी मी नास्तिक आहे. हिंसेने मनुष्य जातीचे कल्याण कोणत्याही रीतीने होणार नाही असा माझा दृढ विश्वास असेल तर हिंसेविषयी मी नास्तिक आहे.

...पण भाषेत 'नास्तिक' शब्दाचा अर्थ इतका व्यापक नाही. जुने लोक 'वेदांना न मानणारे ते नास्तिक' असा अर्थ करीत असत. 'नास्तिको वेदनिन्दकः।' म्लेंच्छ, काफिर, ह्रीदन वगैरे शब्दांसारखीच नास्तिकाची किंमत होती. नास्तिकाचा अधिक शास्त्रशुद्ध आणि व्यापक अर्थ 'परलोकाविषयी' अश्रद्धा बाळगणारा' असा आहे.

न सांपरायः प्रतिभाति बाल प्रमाद्यन्तम् वित्तमोहेन मूढम्।
'अयं लोको, नास्तिपर' इति मानीः पुनः पुनर्वशमापद्यते मे॥

सांपराय म्हणजे परलोक नाही; परममंगल तत्त्व नाही; इंद्रियातीत वस्तू जाणण्याचे साधन नाही; भोगैश्वर्याच्या पर (वर) असे संतोष मिळविण्याचे अन्य तत्त्व नाही; असे जे मानतात ते नास्तिक होत.

सामान्य व्यवहारात ईश्वर नाही असे जाहीरपणे म्हणण्याची जो हिंमत करतो आणि जो समाजमान्य रूढी हिंमतीने तोडून टाकतो त्यालाच नास्तिक म्हटले जाते. या व्याख्येत जे बसत नाहीत त्या सर्वांना 'आस्तिक' म्हणतात. या मताप्रमाणे जे आस्तिक समजले जातात ते सर्व जर खरे आस्तिक असते तर सध्या 'सत्ययुग' आहे असे म्हणण्यात थोडीही 'अतिशयोक्ती' झाली नसती.

काही लोकांना सध्या धर्मनिष्ठा आणि ईश्वरनिष्ठा ही राजनिष्ठेइतकीच औपचारिक होऊन राहिली आहे. 'ईश्वर नाही' असे म्हणून समाजात बदनाम होण्यापेक्षा आणि आपल्या मनाला अस्वस्थ करून टाकण्यापेक्षा 'ईश्वर आहे' असे मानूनच चालू या! यात आपले काय बिघडते?' अशी वृत्ती सर्वत्र पाहावयास मिळते.. ईश्वर आहे असे मानण्याने या पृथ्वीवरच्या वास्तव्यात आपल्या जीवनात चांगला फरक पडत असेल तर ती श्रद्धा, निष्ठा अथवा आस्तिकता खरी ठरेल.

पुष्कळ वेळा 'ईश्वर नाही' असे म्हणणाऱ्या प्रामाणिक आणि नास्तिक माणसांत आस्तिक लोकांपेक्षा अधिक निष्ठा असते. असा सर्वत्र धिक्कारला जाणारा पण शुद्ध नास्तिक जेव्हा म्हणतो की 'ईश्वर नाही', तेव्हा त्याचा अर्थ एवढाच होतो की 'ईश्वराचा मी शोध केला आहे, त्याचे स्वरूप अनाकलनीय आहे, त्याची भाषा अगाध आहे, त्याचे आकलन करून घेण्यास मानवी शक्ती असमर्थ आहे, त्याच्याविषयी मी तरी काही सांगू शकत नाही.' ईश्वराच्या शोधात राहून एवढा अनुभव जो मिळवू शकला त्याला 'आस्तिक' म्हणण्यात काय नुकसान?

'यस्यामत तस्यमतम्।'

—जीवनव्यवस्था : १७२

पण ईश्वर आहे की नाही, त्याचे स्वरूप कसे आहे याच्या तत्त्वज्ञानात्मक चर्चेमध्ये उतरण्याची जरूर काय आहे? हृदयात अखंड स्फुरणाऱ्या आत्मतत्त्वावर ज्याचा विश्वास असतो तो आस्तिक होय. प्रत्येकाच्या हृदयात आत्मारामाचा वास असतो. प्रत्येकाच्या हृदयात कमीजास्त सज्जनता वसतच असते; पाप्यांतला पापी मनुष्य पण गहन पुण्याची व पवित्रतेचीच उत्कट इच्छा धरत असतो अशी जी श्रद्धा ती आस्तिकता होय. जग वाटेल तितक्या दुःखाने पीडित होवो, पावलोपावली साधू लोकांची पीछेहाट होवो, दुर्जन उन्मत्त होऊन सत्तेचा उपभोग घेवोत, तरीही शेवटी धर्माचाच विजय असतो, प्रत्येक हृदयात सज्जनतेचाच उदय व्हावयाचा आहे, अशी जी श्रद्धा ती आस्तिकता होय.

—जीवनव्यवस्था : १७२–१७३

पावित्र्याला पसंत करणे, निष्कटपणाविषयी आदर बाळगणे, आणि सदाचरणाने प्राप्त होणाऱ्या स्थितीत समाधान मानणे हा प्रत्येक हृदयाचा धर्म आहे. या धर्माला कितीही काळ ग्रहण लागलेले असले तरी ते ग्रहण संपूर्ण (खग्रास) होणार नाहीच, आणि या धर्माचा संपूर्ण अस्त कोणत्याही काळी होणार नाही, असा जो दृढविश्वास त्याचे नाव 'आस्तिकता' होय. मातेच्या हातात मूल जसे स्वतःला सुरक्षित मानते तसे सत्याच्या ओटीत आपण नेहमीच सुरक्षित आहोत असे मानणारी जी श्रद्धा ती आस्तिकता असते. आणि सत्याचा द्रोह कोणाही कडून होऊ शकणार नाही, सत्य अपंग नाही, दुर्बळ नाही, त्याचा सदा विजयच होतो, सत्य कोणाच्याही हातून आपल्या रक्षणाची अपेक्षा करीत नाही, आपल्या अमोघ सामर्थ्यामुळे सत्यापाशी कधीही न संपणारा धीर असतो, या धीरातच त्याचा विजय असतो, अशी सत्याविषयींची दृढ श्रद्धा ही परम आस्तिकता होय.

—जीवनव्यवस्था : १७३

शेळ्यामेंढ्यांना मारून खाणाऱ्या वाघाच्या ठिकाणी सुद्धा भूतदया सुप्त रीतीने वसतच असते अशी श्रद्धा ती आस्तिकता होय. क्षणिक किंवा सहस्रयुगेपर्यंत टिकणाऱ्या स्वार्थाला वश होणाऱ्या मानवजातीतही मुख्य प्रेरक तत्त्व प्रेमच असते. आणि शेवटी त्याचेच (प्रेमाचेच) साम्राज्य जगात सर्वत्र स्थापावयाचे आहे, अशी सूक्ष्म रीतीने चमचमणारी, कडूतल्या कडू अनुभवाची परंपरा मागे असूनही विझून न जाणारी श्रद्धा हीच मुख्य आस्तिकता आहे. अशी श्रद्धा असेल तर मग सगुण किंवा निर्गुण ईश्वराला माना की न माना. ईश्वराची विभूती एक माना की अनेक माना, शास्त्राची मूर्तिपूजा करा किंवा तिला शिल्लक ठेवा, त्याला फारसे महत्त्व नाही.

खरे पाहता आस्तिकता आणि नास्तिकता असा भेद करणेच व्यर्थ आहे. प्रत्येक हृदयात आस्तिकता तर वसतच आहे. ती किती प्रमाणात सुप्त आहे आणि किती प्रमाणात जागृत आहे, व्यापक आहे, तीव्र आहे, हाच महत्त्वाचा प्रश्न आहे. शिक्षक जेव्हा एखाद्या विद्यार्थ्याला म्हणतो की तुला ही गोष्ट कधी येणार नाही तेव्हा तो शिक्षक नास्तिक बनतो. भीती, लालूच किंवा बाह्य रस चाखवल्याशिवाय मुले शुद्ध ज्ञानपिपासेने उत्तम रीतीने शिकणार नाहीत असे जर शिक्षक, आईवडील समजू लागले तर तेही नास्तिकच होत. आपल्या सैनिकाची वाखाणणी केल्याशिवाय, छातीवर लावण्यासाठी त्यांना रंगीबेरंगी बिल्ले दिले नाहीत तर त्यांच्या ठिकाणी शौर्य प्रकटणार नाही असे मानणारा सेनापती नास्तिक आहे. सेनापती लढतो तो वरिष्ठ सेनापती होण्यासाठी, पण सैनिक लढतात ते देशासाठी, स्वधर्म पालनासाठी, हे सेनापतीच्या लक्षात येत नाही. बाहेरचा दंभ आणि आचरणाचे आडंबर दाखविल्याशिवाय आपल्या धार्मिकतेचा प्रभाव लोकांवर पडणार नाही असे मानणारा धर्मोप-

देशक धर्मावर जगणारा असूनसुद्धा नास्तिकच असतो. अमुक लोकांत क्षात्रतेज कधीच येणार नाही, जनतेचे अमुक वर्ग नेहमी दास्यातच राहण्यासाठी निर्माण झालेले आहेत अशी मूर्खपणाची समजूतही नास्तिकपणाचेच एक रूप आहे.

अहो, मायावी नास्तिकता कितीतरी रूपे धारण करीत असते ! आजारी माणूस कुपथ्य काय ते जाणत असूनही ते खाऊन एवढ्याने काही बिघडणार आहे असे जेव्हा मनाला सांगतो तेव्हा तो नास्तिकताच वाढवीत असतो. लपवून केलेले पाप स्वतःला किंवा इतरांना नडणार नाही असे मानणारा प्रतिष्ठित मनुष्य नास्तिकतेचाच आश्रय घेत असतो. सद्गुण आणि पात्रता यांचा कोणी पुरस्कर्ता मिळाला नाही तर तो व्यर्थ जाणार आहे असे मानणारा कृपण सुद्धा नास्तिकतेलाच वरत असतो. हल्ली सर्व जगात सर्वत्र पसरलेली नास्तिकता तर 'धूर्तता, लुच्चेपणा, कपट आणि उद्धटपणा यांचाच विजय आहे' असे मानण्याची वृत्ती आहे. जगातील दरिद्री आणि सहनशील जनता अनंतकाळापर्यंत अन्याय सहन करीतच राहील, कधीही सामना करणारच नाही, ईश्वराचा अवतार होऊन गेला तो गेला, ईश्वर आता मरून गेला, नाहीतर कुंभकर्णी निद्रेत घोरत पडला आहे, आता त्याला भिण्याचे कारण नाही, असे जे व्यवहारी मत सत्ताधारी लोकांत घर करून बसले आहे हा पण नास्तिकतेचा ताजा अवतार आहे.

—जीवनव्यवस्था : १७४

सत्ययुग आपण होऊनच उगवणार आहे, त्यासाठी आपण कोणताही प्रयत्न करण्याची जरूर नाही, अशी आशा बाळगणे ही सुद्धा वेगळ्या प्रकारची नास्तिकताच आहे हे विसरता कामा नये.

अशा सूक्ष्म म्हणजे शुद्ध दृष्टीने पाहता मनुष्यहृदयात नास्तिकता किती व्यापून राहिलेली आहे याची थोडीतरी जाणीव होईल. पण याची संपूर्ण जाणीव झाल्यानंतरही ब्रिटिश साम्राज्यापेक्षाही मोठ्या अशा या नास्तिकतेला शेवटी अंत येणार आहे अशी खात्री जर आपल्या ठिकाणी नसेल तर आपण आस्तिकतेच्या लष्कराचे सैनिक होऊ शकणार नाही. नास्तिकता ही सरपणाच्या ढिगासारखी आहे आणि आस्तिकता ही देवतांच्या दिव्यत्वाच्या ठिणगीसारखी आहे. सरपण ओले असेपर्यंत टिकते, मानवजातीच्या बेफिकिरीची वृत्ती हा नास्तिकतेचा ओलेपणा आहे. ओलेपणा संपला म्हणजे होळी पेटायचीच. एक लाकूड जळते ते दुसऱ्याला जाळते, आणि अशा रीतीने स्वतःमधूनच अग्नीला खाद्य पुरवून स्वतःला भस्मसात करते.

श्रद्धा आणि धीर हे अग्नीला घातले जाणारे तूप होय.

—जीवनव्यवस्था : १७४

७. आपल्या ईश्वराचे स्वरूप

ईश्वर काय आहे ? कोण आहे ? एवढे तर स्पष्ट आहे की जर ईश्वरासारखे काही असेल तर तो आपल्या हृदयातच आहे. ईश्वराचे सर्वोत्कृष्ट नाव 'अंतर्यामी' असे आहे. आपल्या हृदयात अनेक वेळा अनेक प्रकारच्या मंगल आकांक्षा जन्मत असतात. त्या केवळ कल्पनेसारख्या वाटत नाहीत, पण व्यावहारिक अशा या जगापेक्षा त्या अधिक सत्य आणि अधिक महत्त्वाच्या वाटतात. आपल्या जीवनाचा मुख्य भाग खाणे-पिणे आणि राज्य करणे हा नाही, पण ज्या परम मंगल कल्पना आणि आदर्श आपल्या हृदयात वसत असतात आणि आपल्या जीवनाला मार्गदर्शन करीत असतात त्याच होत. अनादी काळापासून मानवजात आदर्शांचे पालन करीत आलेली आहे. हे आदर्श भिन्न असूनही एकरूप आहेत असा अनुभव येत असतो. जेथे भेद दिसतात, जेथे विरोध दिसतात तेथे शुद्धीकरणाची क्रिया एकदम प्रवेश करत असते, आणि नंतर समन्वयवृत्ती या आदर्शांमध्ये मेळ घालत असते. हे आदर्श, ही शुद्धीकरणाची क्रिया, आणि या सर्वांचा मेळ ही सर्व एकरूपच आहेत असा अनुभव येत असतो. हे सर्व विश्व, अथवा वेगळ्या शब्दांत सांगायचे तर आपले संपूर्ण मनुष्य जीवन, कोणत्या तरी सत्यावर रचलेले आहे अशी आपणास अखंड प्रतीती येत असते. कोणतेही तत्त्वज्ञान वस्तुतः या प्रतीतीला नाकारू शकत नाही, मग तार्किक भाषा काहीही म्हणो. या परम सत्यावर, या अमर अखंड सनातन सत्यावर रचलेले जे काही आहे ते शुद्धच असले पाहिजे. त्याच्या स्वभावात (स्वरूपात) मेळच असला पाहिजे; त्यात अनंत विविधता असल्याने त्यात जडता संभवूच शकत नाही, असे आपणांस वाटत असते.

—जीवनव्यवस्था : १७७-१७८

आपली ही जी अमर भावना आहे तिच्यातच आपणास ईश्वरी तत्त्व गवसणार आहे. माणसाने ईश्वर आपल्या कल्पनेने निर्मिलेला आहे की ईश्वराने माणसाला घडविले आहे या समस्येत अर्थच नाही, कारण या दोघांत भेदच नाही. मानवात ईश्वर आहे, आणि ईश्वरात मनुष्य आहे. मग कोणाला कोणी निर्माण केले असे समजावयाचे ? आपण तर ईश्वराचे स्वरूप समजावून घेण्यास निघालो आहोत आणि आपल्याला त्याची उपयुक्तता सिद्ध करावयाची आहे. हे जीवन जर सत्य असेल तर ईश्वर सत्य आहे. जर जीवनात काही मर्म (रहस्य) असेल तर ईश्वर परममंगल आहे. जर जीवनात तृप्ती आणि अतृप्ती दोन्ही तत्त्वे वसत असतील तर आदर्शांला अस्तित्व आहे, आदर्श हे वास्तव आहेत. मनुष्यजीवनाचा परम उत्कर्ष, सर्व आदर्शांची कृतार्थता, सर्व प्रकारच्या विरहाचा अंत, सर्व अशांतीची शांती, सर्व

गन्तव्य, मुक्कामाचे ठिकाण आणि तरीही सर्व आकांक्षांची चिरंतन अतृप्ती हाच ईश्वर आहे. जर ईश्वर सर्व रीतींनी प्राप्त झाला असला तर तो ईश्वरच राहात नाही. म्हणजेच ईश्वराचे खरे नाव अनन्त आहे.

—जीवनव्यवस्था : १७८

असा ईश्वर नाकारायचा हे स्वतःचे जीवन नाकारण्यासमान आहे. आणि सर्व प्रामाणिक नकारामागे जो सत्याचा शोध वसत असतो, जो प्रामाणिकपणा वसत असतो, जी उत्कटता आणि एकाग्रता कार्य करीत असते, त्यांना पण नाकारण्यासारखे असते.

या ईश्वराला जसे स्वतःचे नाव नाही, आपण त्याला नाव दिले आहे; तसेच त्याला रूप पण नाही; आपण त्याला जे रूप देऊ ते धारण करण्याचे सामर्थ्य त्याच्या ठिकाणी आहे. प्रत्येक देहात जसे फेरबदल होत राहतात तसे या ईश्वराच्या रूपातही अखंड बदल झालाच पाहिजे. जसे मूल सूर्यकिरणांना मुठीत पकडण्यासाठी प्रयत्न करते, पण ते किरण जसे त्याच्या हातात बंदिवान होत नाहीत, तसा माणूस ईश्वराला आपल्या सोयीसाठी आपल्या स्वभावामुळे एकरूपात बांधण्याचा प्रयत्न करीत असतो आणि तेव्हा ईश्वर त्या रूपात बांधला जाण्यास, अडकवून घेण्यास, नकार देत असतो. जोपर्यंत त्याला बांधण्यासाठी आपण प्रयत्न करीत नाही तोपर्यंत तो आपलाच असतो आणि तोपर्यंतच आपला असतो.

तर मग काय माणसाचा आदर्श हाच ईश्वर?

आदर्श हा ईश्वर असे म्हणण्यात ईश्वर फार सोपा व स्वस्त बनून जाईल. ईश्वर त्यापेक्षा मोठा आहे. ईश्वर हाच माणसाचा आदर्श आहे ही गोष्ट खरी आहे. आणि आदर्शाविषयींची कल्पना शुद्ध आणि व्यापक केल्यास आदर्श हाच ईश्वर आहे हे सुद्धा खरे आहे. पण परम आदर्श मनुष्यकृत नसेल, तो स्वयंभू असेल. तो माणसाला आदर्श खरा, पण त्याच्यासाठी माणूस हा माणूसच असतो. नव्हे तर माणसासाठीच आदर्श निर्माण झालेला आहे. आदर्शामुळे मनुष्याचे जीवन सत्वपूर्ण होत असते. पण आदर्शाचे पूर्ण आकलन माणसाला होऊ शकणारच नाही. ज्याचे संपूर्ण आकलन झाले तो आदर्श राहातच नाही. कारण तो मग सान्त झाला. आदर्श तर अनंतच असणार.

—जीवनव्यवस्था : १७८–१७९

८. अद्वैताचे मर्म

काळे फत्तर आणि शुभ्र बर्फ यांखेरीज जेथे काहीच मिळावयाचे नाही अशा हिमालयाच्या सौंदर्याशी शंकराचार्यांच्या अद्वैत वेदान्ताच्या तत्त्वज्ञानाची तुलना करता येईल. वनस्पतींना ज्या ठिकाणी काहीही स्थान नाही अशा हिमालयामधूनच वनस्पतिसृष्टीच्या आणि म्हणून प्राणिमात्रांच्या माता, सिंधू, सतलज, गंगा, यमुना, शरयू आणि ब्रह्मपुत्र यांसारख्या नद्या निघतात आणि देशाला समृद्ध करतात; त्याचप्रमाणे शंकराचार्यांच्या अद्वैत सिद्धान्तामधूनच ज्ञान, भक्ती, कर्म आणि उपासनारूपी नद्या वाहतात, आणि हिंदुधर्माला आजचे बहुरूपी समृद्ध आणि संघटित रूप देतात. शंकराचार्यांच्या चरित्रात करुण आणि अद्‌भुत, वीर आणि शांत, सर्वच रस भरलेले आहेत. शंकराचार्यांची मातृभक्ती त्यांच्या प्रखर ज्ञाननिष्ठेहून यत्किंचितही कमी नव्हती. वासनांवर विजय मिळविणारा हा वैराग्यवीर हृदयधर्माचा द्रोही झाला नव्हता.

मायावादाचा परिणाम म्हणून आपल्यावरील जबाबदारी विसरण्याऐवजी लोक जर आपले दुःख विसरतील, आपला दुबळेपणा विसरतील, दुसऱ्यांनी केलेला अपकार आणि उपकार विसरतील, आणि हे सर्व मायारूप आहे असे ओळखतील तर किती बरे चांगले होईल! सर्वांचा आत्मा एकच आहे याविषयी ज्यांना शंका नाही त्यांनी आता हे जाणले पाहिजे की सर्वांचे मन आणि हृदयसुद्धा एकच आहे. सुखदुःख, हित-अहित, उन्नती आणि अवनती अशा सर्व परिस्थितींत आपण जगाशी जोडलेले आहेत, एकरूप आहोत, एवढे जर मनुष्य जातीने समजून घेतले तर ऐहिक आणि पारलौकिक असे दोन्ही मोक्ष साधतील. अशा दृष्टीने पाहिले तर शंकराचार्यांचे काम येथून पुढे सुरू व्हावयाचे आहे.

—जिवंत व्रतोत्सव : ३८-३९

९. सनातन हिंदुधर्म

सनातन हिंदुधर्माने कालमाहात्म्य ओळखले आहे. जसा काळ बदलेल तसे स्वतःचे शरीर बदलले पाहिजे हा जीवनधर्म आहे. याप्रमाणे चाललो नाही तर काळाचा बळी व्हावे लागेल असे समजूनच सनातन हिंदुधर्म नित्यनूतन आणि चिरंजीव झाला आहे. सनातन धर्माला कळते की 'घाईने आंबा पिकत नाही', सनातन धर्माला हेही माहीत आहे की, 'जो थांबला तो मेला असे समजावे.'

सायकल चालत राहील, तिची गती थांबली की ती पडून जाईल. प्रत्यक्ष देवांचा राजा इंद्र याने सांगितले आहे की जो बसून राहील, निष्क्रिय होईल त्याचे नशीबही बसून राहील. जो उठला त्याचे नशीबही उठलेच, जो झोपला राहिला त्याचे नशीबही झोपून राहिले, जो चालू लागतो त्याचे नशीबही चालते. म्हणून चालू लागा. चालत रहा. जो चालेल तोच पोहोचेल. आपल्या ऋषिमुनींनी जीवनाला 'यात्रा' म्हटले आहे. कारण जीवनात गतिमानता, चलनवृत्ती आहे. सनातन हिंदुधर्म गंगानदीप्रमाणे सदैव वाहात आला आहे, म्हणूनच तो ताजा, टवटवीत, वेगवान व चिरंतन राहिला आहे. सनातन हिंदुधर्म वेदाला प्रमाण मानतो, आधारभूत मानतो, पण वेदांपाशी अडकून राहात नाही. वेदाचीच नवी आवृत्ती जी स्मृती, अथवा धर्मशास्त्र तिचाही तो स्वीकार करतो. तेथेही तो थांबत नाही. इतिहास-पुराणांना पांचवा वेद म्हणून स्वीकारून त्यांच्याकडेही धर्माची नवी प्रेरणा देण्याचे काम सोपविले. पुराणांनंतर तंत्रे आली. त्यांनाही हिंदुधर्मात स्थान आहेच. हे सर्व खूप चांगले बदल होते, तर काही फार खराब असे बदल झाले. प्रत्येक काळाची व्यथा सारखीच नसते; बुद्धी सारखी नसते, आणि इलाजही सारखे नसतात. काही काही वेळा एखाद्या रोगावर तो बरा होण्यासाठी जे औषध आपण देतो तेच औषध रोगापेक्षा अधिक अपायकारक ठरते; आणि नंतर त्या औषधावरच औषधोपचार करण्यातच आपला दम निघतो. तंत्राच्या मार्गात इतका काही दुराचार बोकाळला की धर्म आणि सदाचार हे स्वतःच त्याच्या घाणीत गुदमरतात की काय, अशी भयंकर भीती निर्माण झाली. हा सर्व सडलेला भाग धुवून स्वच्छ करण्याचे कार्य संतांनी केले. वैष्णव धर्माची संपूर्ण प्रवृत्ती जुने सडलेले धुवून काढून धर्माला भक्तीच्या उज्ज्वल आसनावर बसविण्यासाठी होती. त्यामुळेच संतवाणी पण सनातन हिंदुधर्मात आधारभूत समजली जाऊ लागली. ज्या कोणाला धर्मानुभव आलेला आहे, ते संत हिंदुधर्माला प्रमाणभूत आहेत आणि अनुभव मात्र कोणत्याही काळी व कोणत्याही स्थळी सारखाच असला पाहिजे. म्हणून जर कोणी नवा माणूस अनुभवाची गोष्ट घेऊन आला, तर सनातनी लोक जुन्या अनुभवाशी तो ताडून पाहतात, त्याचे साम्य तपासून पाहतात. प्रत्येक काळाची भाषा जुनी, विचारपद्धती जुनी, कोणाचा अनुभव कच्चा असेल, कोणाचा अपुरा असेल, एकांगी असेल. काहींना आपला अनुभव योग्य शब्दांत मांडायला येत नाही आणि काही तर ऐकणाऱ्याची शक्ती पाहूनच बोलणारे असतात. अशामुळेच अनुभव-अनुभवात फरक जाणवतो. हा फरक किंवा या तफावतीपर्यंतच्या अनुभवाचे सारखेपण दाखविण्याची, एकवाक्यता करून देण्याची जबाबदारी धर्मकारांची आहे.

जसे सृष्टिविकासाचे तत्त्व सर्वांना लागू पडत असते, तसेच धर्माच्या साक्षात्कारात विकासाचे तत्त्व आहे. ईश्वर आपल्याला, माणसाला ज्ञान देतो ते क्रमाक्रमानेच देत असतो. माणसाला मुक्ती मिळते पण ती क्रमाक्रमानेच मिळत असते. हे जे क्रमाचे

महान् तत्त्व आहे त्यालाच 'कालमाहात्म्य' म्हणतात.

जो खरा सनातनी असतो तो गतिमान धर्मप्रवाहावर विश्वास ठेवत असतो. ईश्वराने एकदा ऋषिमुनींना आणि पैगंबरांना प्रेरणा दिली आणि ईश्वर झोपी गेला असे समजायला ते नकार देतात. ईश्वर सर्वांच्या हृदयस्थानी प्रतिष्ठित आहे. त्याचा आवाज ऐकण्याइतकी अंतःकरणाची शुद्धी केलेली असेल तर तो आवाज कोणालाही ऐकता येईल असा तो असतो असे सनातन धर्म मानतो. म्हणूनच धर्मशास्त्राच्या अक्षरार्थाला किंवा शब्दप्रामाण्याला चिकटून न राहणाऱ्या पुरुषांना नास्तिक किंवा भ्रष्ट म्हणून सुळावर चढविण्याची, जाळून मारण्याची, दगडांनी ठेचून मारण्याची चूक सनातन धर्माने कधी केली नाही. सनातन धर्मात कालमाहात्म्याला महत्त्वाचे स्थान आहे. कालमाहात्म्य हे सनातन धर्माचे वैशिष्ट्यच आहे.

—जीवनव्यवस्था : १९०–१९१

१०. हिंदुधर्मः विश्वधर्म

हिंदुधर्म हा राष्ट्रीय धर्म आहे. एका महान राष्ट्राचा तो धर्म असल्यामुळे त्याला महाराष्ट्रीय धर्मही म्हणता येईल. पण हिंदुधर्माची तत्त्वे सार्वभौम आहेत, विश्व-धर्माची आहेत; त्याचा प्रसार सर्वत्र होण्याजोगा आहे. हिंदुधर्माने मनुष्यजातीचा जीवनधर्म शोधून काढला आहे. काय केले असता मानवसमाज शांतीने राहू शकेल, उत्कर्ष पावेल, परमतत्त्वाला ओळखू शकेल, हे हिंदुधर्माने केव्हाच नक्की करून टाकले आहे. '**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।**', '**नहि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति।**' '**धर्मोरक्षति रक्षितः**' अशी श्रद्धा किंवा अनुभव या धर्माने नोंद करून ठेवला आहे. हिंदुधर्म हा प्रचार-परायण (मिशनरी) धर्म नाही. आपल्या धर्माचा जगात प्रसार करावा असा हिंदुधर्माचा आग्रह नाही. हिंदू हा आपला धर्म स्वतःच्या आचरणात उतरविण्याचाच प्रयत्न करीत असतो, त्यात त्याला सफलता मिळाली तर त्यचा प्रभाव शेजाऱ्यावर पडणारच. प्रभाव पाडण्यासाठी मुद्दाम प्रयत्न करणे यात उतावीळपणा आणि घाई आहे, म्हणजे जीवनाचा कच्चेपणा आहे, असे समजून हिंदू हा अधिक प्रयत्नपूर्वक आत्मशुद्धीच करीत राहील.

सामाजिक हिंदुधर्म म्हणजे ही सतानत तत्त्वे आपल्या विशिष्ट समाजाला अनुकूल करण्याचा प्रयत्न असून दुसऱ्या समाजाला हीच तत्त्वे वेगळ्या रीतीने आपल्या

जीवनात आणता येतील. हिंदुधर्माची ही सनातन तत्त्वे समाजात व्यक्त करण्याचे अनेक प्रयोग या देशात झाले आहेत. रूढ सनातन धर्म या देशाच्या बाहेर बिलकूल पसरलेला नाही. पसरविण्याचे प्रयत्न कधीकाळी झाले आहेत की नाहीत ते आपल्याला माहीत नाही. हा रूढ सनातनधर्म या देशातूनच नष्ट करण्याचे प्रयत्न झाले आहेत, हे प्रयत्न निष्फळ झाले आहेत एवढे आपण जाणतो. पण रूढ सनातन पद्धती सोडून दुसऱ्या पद्धतीने झालेले प्रयोग जगभर चांगलेच प्रसृत झाले आहेत. बौद्धधर्म हा याला पुरावा आहे. बौद्धधर्म हाच अगदी पहिला मिशनरी धर्म दिसून येतो.

बौद्ध आणि जैन धर्म मिशनरी धर्म होण्याला लायक आहेत. दोन्ही विश्वधर्म आहेत. स्याद्वादरूपी बौद्धिक अहिंसा, जीवदयारूपी नैतिक अहिंसा आणि तपस्यारूपी आत्मिक अहिंसा जो धारण करू शकतो त्यालाच विश्वधर्मी होता येईल, तोच अकुतोभय असा विचरू शकेल. '**यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजतेचयः।** (जो लोकांस कंटाळत नाही आणि ज्यास लोक कंटाळत नाहीत) हे वर्णन त्यालाच लागू करण्यासारखे आहे...मिशनरी धर्माने तत्त्वाच्या बाबतीत एकनिष्ठ राहावे पण आपल्या रूपाविषयी आग्रह ठेवू नये. 'देश तसा वेष' हा नियम धर्मालाही विशेषकरून विश्वधर्माला लागू करता येण्याजोगा आहे. विश्वधर्म खरोखर विश्वधर्म असेल तर तो आपल्या नावाचाही आग्रह ठेवणार नाही. बौद्धधर्माची किती तरी रूपे झालेली आहेत.

विश्वधर्म एकच असावा असे मानण्याचे कारण नाही. एखाद्या खोलीत ठेवलेले चारपाच दिवे जसा आपापला प्रकाश खोलीत सर्वत्र पसरून टाकतात, सबंध खोलीचे राज्य उपभोगतात, आणि तरीसुद्धा स्वतःचे व्यक्तित्व टिकवून ठेवू शकतात तसे अनेक विश्वधर्म एकच वेळी सगळ्या जगाचे राज्य उपभोगू शकतील. धर्मात द्वेष व मत्सर कोठून असणार? एका म्यानात दोन तलवारी राहणार नाहीत, एका दरवारात दोन मुत्सद्दी कारभार करणार नाहीत, पण जगात एकाच वेळी वाटेल तितके धर्म मात्र साम्राज्य चालवू शकतील, कारण धर्म हा अहिंसकच असणार. धर्म म्हणजेच अद्रोह. जेथे धर्माधर्मांमध्ये झगडे चालतात आणि संख्याबळाची उत्सुकता दिसून येते तेथे धार्मिकता टिकत नाही, धर्माच्या नावाने अधर्म शिरजोरी दाखवीत असतो. तेथे धर्माचे वीर्य क्षीण झाले आहे असे समजावे. अशा स्थितीतून जगाचा उद्धार जो महावीर असेल, धर्मवीर असेल, तोच करू शकेल.

—जिवंत व्रतोत्सव : २७–२९

११. सुख व दुःख दोन्ही हवीत

ज्याप्रमाणे सुख आणि दुःख, जीवन आणि मरण मानवतेच्या विकासासाठी, जीवन-समृद्धीसाठी सारखेच आवश्यक असतात, त्याचप्रमाणे यश आणि अपयश सुद्ध आवश्यक असतात. ज्यात दुःख, मरण आणि अपयश नसते असे जीवन पूर्ण होऊच शकत नाही; ते अळणीच म्हणावे लागेल. ज्याला दुःखाचा साक्षात्कार झालेला नाही, मरणाची भेट झाली नाही, आणि अपयशाचे मंथन ज्याने अनुभवले नाही त्याचे जीवन पूर्ण नाही, त्याच्यावर ईश्वराची कृपा पूर्णपणे अवतरली नाही.

सर्वसामान्य प्राकृत माणूस असे मानतो की सफलता ही ईश्वराची कृपा आहे आणि असफलता ही ईश्वराची अवकृपा आहे. पण 'असे कशासाठी होते' याची जाणीव त्याला होतच नाही अशी शंका त्याला येत नाही. भगवंताची खरी कृपा ज्याच्यावर झालेली आहे त्याला तो तापवून शुद्ध करीत असतो आणि ज्याला तो आपल्यापासून दूर ठेवावेसे त्याला वाटते त्याला काही काही वेळा सफलतेच्या–यशाच्या मोहात बुडवून टाकत असतो.

—जीवनप्रदीप : ४०

पांडवमाता कुंतीने भगवंताची प्रार्थना करून मागून घेतले होते **आपदः सन्तु नः शश्वत्**। आपत्ती मागितल्या.

माणसाला जर सतत अपयशच मिळत गेले तर तो चिमटला जातो, त्याचे नैतिक जीवन मारले जाते, तो आत्म्याचा इन्कार करून बसतो आणि शेवटी नास्तिक बनून विनाश ओढवून घेतो.

ह्याच्या उलट जर माणसाला सतत सफलताच, यशच प्राप्त होत गेले, त्याचे फासे निरपवादपणे सुलटेच पडू लागले तर त्याला जीवनाचे खरे दर्शनच घडत नाही. त्याचे डोके फिरूनच जाते. त्याचे जीवनदर्शन पूर्णपणे उथळ, छचोर आणि माल नसलेल्या नावेप्रमाणे भरकटत राहते. गणितात नेहमी सहज उत्तरे मिळत गेली, वैद्याला नेहमी साध्या रोगाचेच रुग्ण मिळत गेले, युद्धात नेहमी मित्रे व पोचट प्रतिस्पर्धी मिळत गेले तर त्यांचे जीवन जसे कच्चे, तकलुपी, नेभळट आणि निःसत्त्व बनते तसेच जर त्याला स्वस्त किंवा महाग अशी सफलता जर नेहमीच मिळत राहिली तर त्याचे जीवन असफल आणि शेवटी नीरस व्हायचे.

मोठ्यांतले मोठे सद्गुण प्रयत्न करूनही असफलता मिळण्यानेच अधिक विकास पावले आहेत. माणसाला जर फक्त सफलता व यशच मिळत राहिले तर जीवन नीरस व्हायचे. फक्त असफलता, अपयश मिळत राहिले तर त्याचे जीवन चिमटून व करपून जाईल. त्या दोघांची जरूर आहे. उन्हाळा, हिवाळा, पावसाळा, दुष्काळ या

सर्वांची जशी जरूर असते तसेच सुख व दुःख, स्मृती आणि विस्मृती, जीवन आणि मरण, सफलता आणि विफलता ही सर्वच आवश्यक आहेत, सर्वच रसपूर्ण आहेत. ही सर्व मिळूनच जीवन जगण्यालायक बनत असते. सफलता आणि विफलता दोन्ही ईश्वराकडूनच मिळालेली बक्षिसे होत. एवढे जो जाणतो आणि स्वीकारतो तोच श्रद्धाधन जीवन वीर असतो.

—जीवनप्रदीप : ४०–४१

१२. धर्म म्हणजे प्रेम

धर्मात मोठी वस्तू प्रेम असते. एकमेकांविषयी स्नेह ठेवल्याशिवाय आपल्या जीवनात आनंद कोठून राहणार? प्रेमाविना धर्म नसतो. प्रेम म्हणजे क्षमा, केवळ न्याय नाही. आपण जर शोधायला लागलो तर दोन भांडणाऱ्यांमध्ये कोणी पहिली शिवी दिली हे समजणार नाही. म्हणून सहन करायला शिकण्याची गरज आहे. आपलेच दोन हात लढतील तर दोघांचेही नुकसान आहे. तेथे न्याय करून कोणाला शिक्षा करणार?

—जीवनविकास : १२५

१३. सर्व–धर्म–ममभाव

आपापल्या धर्माविषयी अनन्य भक्ती ठेवूनही सर्व धर्माविषयी समान भाव मान्य करणे हा आहे सर्व–धर्म–समभाव.

यापुढे एक पाऊल चालणे म्हणजे 'सर्व–धर्म–ममभाव' होय.

जे लोक जैनांचा स्याद्वाद आणि सप्तभंगी न्याय जाणतात आणि ज्यांना वेदांताची समन्वयदृष्टी प्राप्त झालेली असते त्यांच्यासाठी सर्व–धर्म–ममभाव पूर्णपणे स्वाभाविक व्हावयास पाहिजे.

—समन्वय संस्कृति की ओर : ५९–६०

१४. हृदय

आपणांस पाहिजे असणारी भावी संस्कृती इतिहास, विज्ञान आणि धर्मशास्त्र यांच्या मदतीने सुसंस्कृत होईल; पण तिला प्रेरणा तर आपणांस स्वयंभू व सनातन श्रद्धांमधून मिळू शकेल. विज्ञान तर फक्त साधनरूपच आहे. जसे हृदय तसे विज्ञान, आणि लिहिला गेलेला इतिहास हा तर केवळ वकीलाप्रमाणेच पक्ष घेत असतो व त्याचे समर्थन करीत असतो. म्हणून धर्मशास्त्राच्या अनुपानाबरोबरच त्याचे सेवन करावे लागेल. उच्चनीचतेच्या भांडणांचा निवाडा करणाऱ्या शास्त्राला आपण धर्मशास्त्र म्हणत नाही. धर्मशास्त्र हे तर समाजरचनेचे शास्त्र आहे, पुरुषसिद्धीचा उपाय आहे. उपनिषदांत म्हटले आहे त्याप्रमाणे धर्मशास्त्र हे तर महर्षींच्या अंतःकरणातून संग्रहित केलेले आहे. '**धर्मशास्त्रं महर्षीणाम् अंतःकरणसंभृतम्।**' धर्मशास्त्राची दृष्टी प्राप्त करण्यासाठी हृदयशुद्धीची गरज आहे. आपणांस जर हृदय मिळाले तर बाकी सर्व आपोआप येऊन मिळेल. सर्व विद्यांचे अधिष्ठान हृदय आहे, सर्व संस्कृतींचा आधार हृदयच आहे. भगवान् याज्ञवल्क्य म्हणतात. '**सर्वासां विद्यानां हृदयमेकायनम्।**' हे एक सूत्र जर आपण नीट समजावून घेतले तर राष्ट्रीय संस्कृतीच्या सर्व समस्या आपण सहज सोडवू शकू. हाच राष्ट्रीय शिक्षणाचा मूलमंत्र आहे.

आपल्या राष्ट्रीय संस्कृतीत हृदयालाच मुख्य समजण्यात आले आहे. हृदय हाच आत्मा आहे, हृदय हेच जीवन आहे. हृदयाचा जेव्हा विनिपात होत असतो, हृदय जेव्हा भ्रष्ट होत असते किंवा सुकून जात असते तेव्हा सर्व लोकांचा विनाश होत असतो.

जर आपल्या हृदयात उणीव नसती तर आपण 'करिअर'च्या मागे लागलो नसतो. आपल्यामध्ये हृदयाची कमतरता नसती तर आपण गरिबांचा द्रोह केला नसता, आपल्या हृदयात उणीव नसती तर आपण खेडी सोडून देऊन शहरांमध्ये येऊन बसलो नसतो. आपल्या हृहयात वैगुण्य नसते तर आपण आपल्या मातृभाषेचा अपमान सहन न करतो. आपल्यात हृदयाचे वैगुण्य नसते तर आपण खेडुतांच्या दुर्दशेचा फायदा घेऊन व्याजखोरी केली नसती. आपल्या ठिकाणी हृदयाची कमतरता नसती तर आपण स्त्रियांना दलित अवस्थेत ठेवले नसते. हृदयाचे दौर्बल्य नसते तर अंत्यजांना तिरस्कृत ठेवण्यात धर्म आहे असा राक्षसी विचार कधीही मान्य केला नसता. हृदयात उणीव नसती तर सर्व धर्मांचा कुटुंबभाव आपण कधीच स्वीकारून बसलो असतो. हृदयात दौर्बल्य नसते तर खेडोपाडी उद्योगप्रधान कला, कौशल्यप्रधान शिक्षण देणाऱ्या आणि समाजसेवेचे पाठ शिकविणाऱ्या शाळा कधीच चालू झाल्या असत्या.

—जीवनविकास : १८४–१८६

'**सर्वासां विद्यानां हृदयं एकायनम्**' हे वचन वाचल्यावर शिक्षणाची सर्वच दिशा फिरविण्यासारखे नाही का वाटणार?

'**हृदयेन हि रूपाणि जानाति। हृदये हि एव रूपाणि प्रतिष्ठितानि-भवन्ति।**' हे याज्ञवल्क्याचे निरूपण वाचणारा कला आणि आनंदमीमांसा नव्या रीतीनेच समजेल, आणि सहज पुढे जाऊन जेव्हा हाच अध्यात्मविद्येचा हिमालय म्हणतो, '**हृदयेन हि सत्यं जानाति। हृदये हि एव सत्यं प्रतिष्ठितं भवति।**' मग तर सगळ्याच तत्त्वज्ञानाची मांडणी बदलण्याची जरूर आहे असे आपणास वाटल्याशिवाय राहात नाही.

— जीवनव्यवस्था : १२४

१५. हृदयधर्माची दीक्षा

सर्वांत श्रेष्ठ धर्म आहे–हृदयधर्म. जगात जेवढे धर्म, पंथ, जमाती, संप्रदाय आहेत, ते सर्वच आज वाटेल तेवढे मानसिक ताणतणाव निर्माण करीत असतील, परंतु खरे तर ते सर्व कोणत्या ना कोणत्या मानवप्रेमी हृदयातूनच उगम पावले आहेत. '**धर्मशास्त्रं महर्षीणां अंतःकरणसंभृतम्**' ज्या उदार हृदयाच्या प्रेरणेतून हे सर्व निघाले त्या उदार हृदयाचा जो व्यापक प्रेमधर्म आहे तोच हृदयधर्म होय. हिंदुस्थानात जगभरचे सर्व धर्म एकत्र झाले आहेत, कारण की त्यांना कळले आहे की येथे हृदयधर्माचे साम्राज्य आहे. येथे जे आले ते सर्व आपापले अभिमान घेऊन आले. त्यांनी आपल्याकडून शक्य झाले तेवढे भले अथवा बुरे केले, परंतु ते सर्व हळुहळू हृदयधर्माच्या प्रेमग्रंथीने बांधले गेले. सर्वांना प्रेमधर्माची जाणीव झाली. पण कोणाला त्याची दीक्षा नाही मिळाली. म्हणून ते सर्व आतल्या आत ओढाताण करू लागले आहेत, आणि या देवभूमीला पृथ्वीवरचा स्वर्ग बनविण्याऐवजी भूतला-वरील नरक बनवीत आहेत. ज्यांच्या हृदयात जितकी संकीर्णता आणि क्षुद्रता असेल तेवढे दुःख ते भोगतील आणि इतरांनाही ते जास्तीत जास्त दुःख देतील. परंतु शेवटी (अथवा अनंतात) विजय तर हृदयधर्माचाच होईल.

प्रभू आपणांस या हृदयधर्माची दीक्षा देवो आणि आपल्या श्रद्धेला अनंत करो. त्याने भारताच्या हृदयधर्माची खरी सेवा करून आपल्या जीवनात आणि मरणात त्याचे साम्राज्य स्थापलेले पाहू या.

—जीवनव्यवस्था : ९७

१६. हृदय व संगीत

माणसाचे सर्वस्व त्याच्या बुद्धीत आहे. त्यापेक्षा अधिक त्याच्या हृदयाला शिकविण्याचे काम तर बुद्धीचा विकास करण्याने आणि सदाचारानेच होऊ शकते. पण हृदयाला जागृत करण्याचे काम संगीताने चांगल्या रीतीने होऊ शकते. म्हणून हृदयाला नेहमी संगीताने भिजवीत राहिले पाहिजे. संगीतार्द्र हृदय सहजरीत्या संस्कारांचे ग्रहण करू शकते.

—जीवनसंस्कृती : ६८३

१७. कवी, तत्त्वज्ञ आणि धर्मज्ञ

कवी, तत्त्वज्ञ आणि धर्मज्ञ या तिघांनी पाहिले आहे की कल्पनेपेक्षा वेगळ्या, अनुभवाच्या वर (श्रेष्ठ) आणि साधनेला प्रेरक अशा कितीतरी अमर श्रद्धा असतात. त्या कोठून येत असतात, त्या का टिकून राहतात, त्यांची शक्ती कशामध्ये बसत असते हे सांगणे कठीण आहे. या श्रद्धा सर्वांना सारख्याच रीतीने चिकटून राहत नाहीत. प्रत्येक काळात त्यांचे स्वरूप बदलत असते. श्रद्धेचे नवनवे अवतार होत असतात आणि म्हणूनच प्रत्येक काळाला त्याचे वैशिष्ट्य प्राप्त होत असते. सर्वच जण बुद्धीचे प्रयोग करीत असतात, पण बुद्धीमध्ये अज्ञात रूपाने ही श्रद्धा मिसळलेली असल्याने दर्शनांची आणि संप्रदायांची विविधता उत्पन्न होत असते. अहिंसा ही याच प्रकारची एक स्वयंभू श्रद्धा आहे. गांधीजींनी तिला सत्यात बसविण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण तसे करण्यासाठी सत्याचे स्वरूपच गूढ करावे लागते, आणि शेवटी आपण होतो त्याच ठिकाणी राहतो. अहिंसा ही एक स्वयंभू, अमर श्रद्धा आहे आणि जीवनाचे काव्य, जीवनाचे तत्त्वज्ञान, जीवनाची साधना आणि साक्षात्कार या सर्वांत ती प्रवेश करीत असते.

सध्या आपल्याकडे जी जीवनचर्चा चालू आहे त्या सर्व चर्चेच्या मागे जाणून व अजाणतेपणे अहिंसेचे तत्त्व आहे असे समजलो तरच आपली चर्चा स्पष्ट होणार आहे, फलप्रद होणार आहे.

जीवनचर्चेत आपण एक गोष्ट लक्षात ठेवायला कमी पडतो की तर्काच्या कसोटीत जे अवैध ठरते ते आपण ठेवायचेच नाही. पण ज्या प्रश्नांसमोर तर्क स्वतःच थकून स्थगित होऊन जातो तेथे तर्काला दोष देऊन उडवून देऊ नये. मनुष्यजीवन तर्क-

बुद्धीइतके सोपे नसते. असंख्य विरुद्ध गोष्टींचा समन्वय करून जीवन घडून आले आहे व प्रवृत्त झाले आहे. त्याची सोपी मीमांसा करायला जाता शेवटी ते छद्मीपणे वैर निर्माण करते म्हणून तर्काचा पूर्णपणे फायदा घेऊनही त्याचे निर्णय सावधगिरीने स्वीकारायला पाहिजेत.

लक्षात ठेवण्यासारखी दुसरी एक गोष्ट अशी आहे की जीवनमीमांसेत अनुभवाच्या विरुद्ध अशा गोष्टी येता कामा नयेत. तसेच तिच्यात मानवी जीवनाच्या अमर श्रद्धांचा द्रोहही होता कामा नये. जुन्या विचारवंतांनी या प्रकारची काळजी घेतली होती असे मी मानतो. मात्र त्यांचा अनुभव अपुरा होता, अनुभवावर विचाराचा प्रकाश पाडण्याची शक्ती आणि निश्चित केलेल्या निर्णयांना पुनः तपासून पाहण्याची प्रयोगवृत्ती कमी होती म्हणून जुने तत्त्वज्ञान त्या त्या काळात टिकाऊ असूनही आज पुरेसे दिशादर्शक होऊ शकत नाही.

पण जगात जितके महान धर्म कार्य करीत आहेत त्या सर्व अनेक दृष्टींनी जीवनमीमांसाच आहेत. प्रयोगवीरांचा खोल अनुभव त्यांच्या पाठीशी असल्याने त्यांचे सिद्धांत आपणांकडून सहज आदरभाव मिळवितात. त्यांच्यावर विचार करायचाच नाही असे मानणे हा जुना चुकीचा समज आहे. तर्काच्या एका झटक्यात त्यांना उडवून लावणे, झिडकारणे ही आजची चूक आहे. अनेक अर्धवट कच्च्या सिद्धांतांचे व्यूह रचून आपण गोलगोल फिरू शकू. प्रगती करू शकणार नाही.

हल्लींच्या काळाचे वैशिष्ट्य तर अर्धसत्यांना घेऊन पळून जाण्याचे आहे. अर्धसत्यात नेहमीच जोश जास्त असतो. परिणामी जे घडते त्याविषयींची बेफिकीर बेजबाबदारीसुद्धा तेवढीच असते. अर्धसत्ये नेहमी घर्षण (संघर्ष) करण्यावर विश्वास ठेवतात. हा त्यांचा स्वभाव केवळ दोषरूपच आहे असे म्हणता येणार नाही. जे सर्व बाजू पाहू शकतात आणि प्रत्येक बाजूच्या सुंदरतेकडे क्रमाक्रमाने कलतात त्यांच्यात कार्य करण्याची जिद्द कमी असते. ते तर परस्परांसमोर केल्या जाणाऱ्या युक्तिवादांवर चिंतन करीत पडून राहतात.

सर्व बाजूंनी विचार केल्यानंतर शेवटी आचरणाची एक योग्य दिशा निश्चित व्हायलाच पाहिजे आणि आपली सर्व शक्ती त्या दिशेत प्रवाहित करता आली पाहिजे; परिस्थिती बदलणार नाही तोपर्यंत तीच दिशा आणि तोच दृष्टिकोन यांना खंबीरपणे चिकटून राहण्याची शक्ती पण असायला पाहिजे. अशी शक्ती आध्यात्मिक चारित्र्याशिवाय येत नाही. जुना काळ अपरिवर्तनशील मानला जातो तर आताचा काळ फळाचा (परिणामाचा) विचार केल्याशिवाय, स्वभाव—आहे—एवढ्याचसाठी परिवर्तन करावयास पाहिजे असे मानणारा आहे. **नवं नवं प्रीतिकरं नराणाम्** असा माणसाचा स्वभाव असतो, धर्म नाही. पण आज त्यालाच वश होऊन जनता वागत आहे. ज्यात चारित्र्याच्या दृढतेची आवश्यकता आहे, ज्यात

सुकाणावर घट्ट हात ठेवून एकाच दिशेने वाहन हाकारायचे असते तेथे आज या निष्ठेची एकाग्रता खूप कमी झालेली जाणवते आहे. लोक प्रतिज्ञादुर्बल आणि चंचलनिष्ठ झाले आहेत. सध्या जीवनमीमांसा आणि जीवनचर्चा हवी तेवढी चालत असली तरी पण विचारपूर्वक आणि कष्टपूर्वक जीवनसाधना करीत असल्याची उदाहरणे पाहिजे तेवढी नाहीत.

—जीवनव्यवस्था : ३०२–३०३

१८. तर्क आणि भावना

तर्क आणि भावना ही दोन्ही मनुष्यत्वाची आवश्यक अंगे आहेत. तर्कशून्य भावना जितकी सदोष असते तितकाच भावनाशून्य तर्कही दुष्ट असतो. बुद्धी आणि हृदय या दोघांचा जेव्हा मेळ बसतो तेव्हाच माणसाची खरी उन्नती होत असते. या दोघांपैकी मुख्य स्थान कोणाचे आणि गौणस्थान कोणाचे हे सांगणे कठीण आहे. असे असले तरी एवढी गोष्ट तरी शास्त्रशुद्ध व अनुभवसिद्ध आहे की माणसाचे मनुष्यत्व विशेषतः भावनेवर आधारलेले असते. 'हा पुरुष श्रद्धामय आहे,' 'जशी ज्याची श्रद्धा तसे त्याचे जीवन' ही परमात्म्याची वचने आहेत. तर्कात प्रेरणा नसते, तर्कात जीवनरस नसतो. तर्क प्रेरणेचा पहारेकरी असतो. जशी एखादी मुग्ध राजकन्या तेजस्विनी होत नाही (वयात येत नाही) तोपर्यंत तिच्या रक्षणासाठी पहारेकरी ठेवावा लागतो, तसे जोपर्यंत प्रेरणा तिच्या शुद्ध स्वरूपात प्रकट झालेली नसते तोपर्यंत तर्काला प्रतिष्ठा मिळत असते. वस्तुतः तर्क अप्रतिष्ठित आहे.

तर्कात शौर्य नसते, तर्कात वीर्य नसते, तर्कात कार्यप्रेरक साहस नसते, तर्कात त्याग नसतो. तर्क निरंतर जागृत राहात असतो, त्यामुळे त्याचे डोळे उघडे असतात. तर्क अतिशय सावध राहात असतो. म्हणून अतितर्क पुरुषार्थविहीन बनत असतो आणि पुष्कळ वेळा तो निर्दय होत असतो. एकटा तर्क माणसाला स्वहितवादी करून अधोगतीच्या खड्ड्यात टाकीत असतो. तर्काच्या हातात केवळ वैश्यधर्माचा तराजूच असतो.

भावनेत वीरवृत्ती असते. भावनेत दिव्य दृष्टी असते. आपल्या भोळेपणानेच भावना नेहमी सुरक्षित राहात असते. भावनेच्या अतिरेकाने होणारे नुकसान क्षणिक आणि तुच्छ असते, तर्काच्या अतिरेकाने होणारी हानी तर आत्म्यालाच क्षीण करून टाकत असते.

जगात असा एकही मनुष्य नसतो की ज्याच्या ठिकाणी तर्क आणि भावना यांचा

मिलाफ होत नाही. तरीही त्या दोघांपैकी राजपद कोणा एकाला मिळते यावर जीवन-मूल्ये पूर्णपणे अवलंबून असतात. जर तर्क राजा बनला आणि त्याने भावनेला आपली दासी बनविले तर मनुष्य धूर्त आणि विद्वान पशू बनून जातो. भावनेचे ढोंग करून तर्क जगाला बराच काल फसवू शकतो आणि स्वतःलाही काही कमी फसवत नाही.

या उलट जर आपण भावनेला हृदयेश्वरा आणि तर्काला तिचा विश्वासू नोकर किंवा सल्लागार केला तर ऐहिक आणि पारलौकिक अशी उभय उन्नती साधू शकू, आपल्या मनुष्यत्वाचा संपूर्ण विकास होऊ शकेल, आणि प्रत्येक व्यक्ती समाजाचे खरे स्वरूप ओळखून समाजाची कल्याणकारक सेवा करू शकेल.

या देशात इंग्रजांनी जे इंग्रजी शिक्षण सुरू केले ते प्रॉटेस्टंटप्रधान आहे. भावने-वर त्याचा जास्त विश्वास नाही. 'भावना ही मनुष्याच्या मनाचा एक विकार आहे, बुद्धीच मनुष्याचे सारसर्वस्व आहे, स्वार्थदृष्टी अत्यंत नैसर्गिक असते व म्हणूनच योग्य असते, आणि तर्काने दूरदृष्टीने साधलेला प्रत्येक जणाचा स्वार्थच संपूर्ण जगाचे कल्याण करण्यास समर्थ आहे' अशा विचाराच्या पायावर या प्रॉटेस्टंट शिक्षणाची इमारत उभी आहे. इंग्रजांची विद्या घेऊन आपण खिस्ती तर नाहींच झालो, पण प्रॉटेस्टंट तर निश्चितच होऊन गेलो आहोत. त्याच कारणाने आपल्या सामाजिक आणि राजकीय चळवळीत आजपर्यंत आपण ऐहिक सुखोपभोग, स्वच्छंद आणि अंगभूत स्वार्थ यांना नैसर्गिक मानून त्यांना प्रतिष्ठा दिलेली आहे. स्वार्थ आणि सुख-लालसा स्वतःच इतके प्रभावी आहेत की त्यांचा अपमान करीत राहून सुद्धा त्यांचा प्रभाव माणसाच्या हृदयावर अनेक वेळा पडत असतो. पण त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळाली म्हणजे मग त्यांच्या लीलेच्या वैभवाची गोष्टच काय करावी? ही प्रॉटेस्टंट वृत्ती निःसंशयपणे अंतिम लाभासाठी क्षणिक त्याग आणि गैरसोय पत्करायला तयार होते, पण ही तर असुरांची तपस्या आहे. दैत्य तपस्येत देवांपेक्षा कमी नसतात.

माणसाने तर्काचा समूळ त्याग करावा असे म्हणण्याचा हेतू नाही. ज्या भावनेला तर्क उखडून काढू शकतो ती शुद्ध भावना नसते, तो तर मोह असतो. तिचा तर त्यागच करणे योग्य ठरेल. शुद्ध भावनेला तर्क काढून टाकू शकत नाही. एवढेच नव्हे तर भावनेपर्यंत पोहोचण्याची स्वतःची असमर्थता मान्य करून तो माघार घेत असतो.

—जीवनचिंतन : २३८–२४०

१९. हिंदुधर्मजागृती धर्मपीठांकडून नव्हे

हिंदुस्थानाचे हे वैशिष्ट्यच आहे. धर्माचे चिंतन आणि चालन आज पीठस्थ शंकराचार्यांच्या हातात राहिले नाही. आसपासच्या शास्त्र्यांच्या सल्ल्याप्रमाणे चालून आपले जुने किती जतन करता येईल एवढ्याचाच विचार आजकालचे शंकराचार्य करीत आहेत. सध्याची धर्मजागृती गांधीजी, मालवीयजी, श्रद्धानंदजी, मिसेस ॲनी बेझंट, टागोर, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, अरविंद घोष, रानडे, भांडारकर वगैरे समाजहितैषी, धर्मपारायण पुरुषांच्या हातानेच होत आहे. वर सांगितलेल्या लोकांची वचने आणि जीवने यातूनच धार्मिक शिक्षण अधिक चांगल्या रीतीने देता येते. आणि याच मार्गाने आपल्या धर्मग्रंथांचा खरा आशय पण समजू शकतो.

—जीवनविकास : ३४०

२०. धर्माच्या अधोगतीची मीमांसा

धर्मसंस्थेची प्रतिष्ठा वाढत राहिली नाही, उलट कमीच होत चालली आहे. राजे (राज्यकर्ते) सर्वश्रेष्ठ बनले आणि धर्म शेवटी राजांचा अंकित बनला. व्यक्तींच्या जीवनात पण धर्माला सर्वोच्च स्थान, आदर न राहता तो कमी होत गेला. सत्ता आणि संपत्ती या दोघांची प्रतिष्ठा वाढली.

धर्माचा असा अधःपात कशाने झाला ? त्याचे कारण स्पष्ट आहे. धर्मांनी राज्य-व्यवस्थेचे अनुसरण केले, अनुकरण केले. राज्यसंस्थेच्या नमुन्यावर धर्मसंस्थेचे तंत्र रचले गेले आणि सत्ता व अधिकार यांची परंपरा उभी करण्यात आली. युरोपात पोपची जी सत्ता होती, इस्लामी जगात खलिफाची जी सत्ता होती तशी सत्ता आपल्याकडे धर्माचार्य, शंकराचार्य आणि राजपुरोहित यांना कधीच नव्हती. जातींचे नियम व नियामक रूढी, गुरुशिष्य संबंधाविषयींचे नियम, मंदिरांची व्यवस्था या सर्वांच्या मागे राज्यतंत्रासारखीच योजना आहे. त्याचा परिणाम होऊन धर्माची मुळेच सडू लागली, कुजू लागली, पण जेव्हा राज्यसत्तेचे अनुकरण सुरू झाले तेव्हा तर लोकांना वाटू लागले की आता धर्माचा विजय झाला आहे, आता धर्माची खरी स्थापना झाली आहे.

पण जेव्हा धर्माचार्यांची सत्ता वाढली तेव्हापासूनच खरा धर्म क्षीण होण्यास सुरुवात झाली आणि खरी धार्मिक प्रेरणा आचार्यांच्या हातातून निसटून संतांपाशी

गेली. भारताचे संत बरेचसे तंत्रविन्मुखच राहिले, आणि जेथे त्यांनी तंत्र उभे केले तेथे त्यांनी ते राजतंत्रासारखे न करता लोकजीवनाला अनुकूल असेच तंत्र रचले. युरोपात काय आणि आपल्या देशात काय तंत्रविन्मुख संतांमुळेच जेवढा धर्म टिकला तेवढाच तो टिकला.

—जीवनव्यवस्था :७४

खरी गोष्ट अशी आहे की राजे व सरकारे मनुष्याच्या बाह्य जीवनावरच अधिकार चालवू शकतात, आणि त्यामुळेच ते प्रापंचिक व व्यवहारी तंत्र तयार करून त्याच्या द्वारा आपला उद्देश साध्य करून घेऊ शकतात, उलट धर्माचा प्रभाव मुळातच आंतरिक असतो. आंतरिक प्रभाव स्वतः होऊनच, स्वेच्छेने बाहेर पडतो तेव्हा तो शुभच असतो हे धर्माला माहीत असते. राजसत्तेच्या वातावरणात धर्मांनी जीवनापेक्षा मान्यतेवर अधिक भर दिला. धार्मिक जीवन कसेही असो, धार्मिक मान्यतेच्या बाबतीत संमती अमली म्हणजे पुरे असे वातावरण निर्माण करून आपण धार्मिकतेला गुदमरवून टाकले. धर्माचे सार त्याच्या पालनात, त्याच्या आचरणात आणि धर्मपरायण चित्तवृत्तीत असते. उलट धार्मिक मान्यतेतून धर्माभिमान आणि परमत–असहिष्णुता उत्पन्न होत असते. धार्मिक जीवनामधून धर्मपरायणता उत्पन्न होत असते आणि तिच्यातूनच सर्वधर्म समभाव शिकवला जातो, विकसित केला जातो.

—जीवनव्यवस्था : ७५

२१. संघटना हानिकारक

सर्व धर्म आणि त्यांना दाखविलेले जगाचे प्रश्न यांना सोडविण्याचा अभ्यास करणे हा आता केवळ संस्कृतीच्या विद्वान अभ्यासूंचा विलास राहिलेला नाही. ती तर आता अधिकाधिक प्रमाणात सुसंघटित सामाजिक जीवनाची आवश्यकता बनत चालली आहे. मात्र त्या अभ्यासाला मानसिक गगनविहाररूप बनू देता कामा नये. त्याला जीवनस्पर्शी करावयास पाहिजे, आणि योग्य उकल मिळविण्यासाठी प्रयोगही करावयास पाहिजेत. लोक सेवेच्या भावनेनेच एकत्र होऊ शकतात आणि हृदयांचे ऐक्य, दिलजमाई साधू शकतात. बुद्धी फार तर एकमेकांचा समज वाढवू शकते, किंवा आधीपासूनच त्यांच्यात जर सद्भाव असला तर त्यांना काही अंशी आधार देऊ शकते; परंतु हृदयांना एकत्र आणून जोडणारी आणि आपणां सर्वांना एका

मानवजातीत एकत्र करणारी वस्तू ही तर सेवाच असू शकते. स्वार्थत्याग आणि स्वार्पण यांच्या सीमेपर्यंत पोहोचू शकणारी सेवा हीच अशी एक वस्तू आहे की जी सर्वत्र सुसंवाद, सुमेळ स्थापू शकेल आणि आपले एक कुटुंब बनवू शकेल. वेगवेगळ्या संघटना, या क्रियेला काही अंशी मदत करू शकतात हे खरे, परंतु संघटन करणे, संघटन हे आत्म्याचे साधन नसते. पृथ्वीवरच्या सर्व संघटना पार्थिवच असतात; आणि अशा प्रकारे त्या पुष्कळ वेळा आध्यात्मिकतेच्या विकासात विघ्नकारक होऊन बसतात. पुष्कळ वेळा तर जे परिणाम घडवून आणणे त्यांच्या स्वभावातच नसते त्या परिणामांची आशा त्या संघटनांपासून ठेवून आपण त्यांच्या उपयुक्ततेचा नाश करीत असतो. खरे सेवक तर परस्परांना स्वाभाविकपणेच ओळखू शकतात, आणि स्वतः स्वतंत्र राहूनच एकमेकांना मदत करू शकतात. आपणांस सर्व धर्मांचे फेडरेशन तयार करावयाचे नाही, पण एकाच क्षेत्रात कार्य करणाऱ्या आत्म्यांचा साहजिक आणि स्वतंत्र सहकार मिळवायचा आहे. जगातील मोठे धर्म आज एकमेकांचे स्पर्धक बनले आहेत याचे कारण त्यांच्या सिद्धान्तात भेद आहे हे नाही, पण प्रत्येकाच्या मागे त्यांचे नियंत्रण करणारी मोठी संघटना आहे हे आहे.

संघटनाचा आणि स्वोत्कर्षाचा सिद्धान्त कायदाकानून आणि सक्तीच्या किंवा बळजबरीच्या सिद्धान्ताचा विश्वासू मित्र बनला आहे. त्यापासून आंधळ्या आणि दुःखपूर्ण मानव प्रवृत्तीचे क्षेत्र विस्तृत करण्यात मदत मिळते, एवढेच. संख्येचे बळ, संघटनाची विशालता आणि सत्तेची केंद्रितता यांनी माणसांमधील न्याय आणि भलेपणा यांच्या स्वाभाविक सामर्थ्यावरील श्रद्धेला दूर केले आहे. संख्या, संघटन आणि केंद्रित सत्ता या तीन जिवंत देवतांनाच आज मानवजात आपली भक्ती अर्पण करीत आहे. प्रचलित धर्म तर आपापसांत लढतच आहेत, आणि दुसऱ्या बाजूला व्यवहारात तर ते लाजिरवाण्या रीतीने वर सांगितलेल्या त्रिमूर्तींच्या ताब्यात जात आहेत.

—जीवनव्यवस्था : ८१-८२

२२. सत्याच्या विरुद्ध सत्ता

मला नेहमी असे वाटत आले आहे की सत्‌च्या (सत्याच्या) विरुद्ध असत् (असत्य) नसते, पण सत्ता त्याच्या विरुद्ध असते. असत्‌ला तर नेहमी सत्यापुढे नमून राहावे लागते, कारण त्याला सर्वच सामर्थ्य सत्‌च्याच आकारातून प्राप्त झालेले असते. सत्‌चे खरे विरोधी तत्त्व सत्ता असते, ते सत्‌चे रक्षण करण्यासाठी किंवा त्याला

अमलात आणण्यासाठी प्रवृत्त होत असते तरीही नेहमी सत्‌ला गुदमरून टाकण्यात, त्याला शरमिंदे आणि दुर्बल करण्यातच त्याची परिणती होत असते. जगातील धर्मांनी मध्ययुगीन राजसत्तेच्या आदर्शाप्रमाणे स्वतःचे संघटन करण्याचा प्रयत्न केला आणि असा समज करून घेतला की सत्याला जर सत्तेचे पाठबळ असले तर ते लवकर प्रचारात येऊ शकते. नास्तिकतासुद्धा यापेक्षा अधिक वाईट गोष्ट किंवा नुकसान करू शकेल असे मला वाटत नाही- जशी ईश्वराची व धनसंपत्तीची एकाच वेळी पूजा करता येत नाही तशीच सत्य व सत्ता यांची एकत्र पूजा होऊ शकणार नाही. शिवाय जे सामर्थ्य असते ते सत्याचेच आंतरिक सामर्थ्य असते. म्हणून धर्मांनी सत्तेची जी दृष्टी व विचारसरणी आपल्या भोवती उभी केली आहे तिच्यातून सुटून जाण्यासाठी त्यांनी प्रयत्न करावयासच पाहिजे. अहिंसा हे सत्याचेच विशिष्ट अंग आहे. खूप आत उतरून जर शोध केला तर प्रत्येक धर्माचे हार्द सत्य व अहिंसा यांच्याविषयी आत्यंतिक भक्तीतच सामावलेले असते. आयरिश कवी ए. ई. योग्य शब्दांत म्हणतो की सत्य स्वतःच स्वतःचे उचित सामर्थ्य असते.

सर्व धर्मांमध्ये जे झगडे होतात त्यांचे मूळ कारण ते या महान् सत्याचा अस्वीकार करतात यातच असते. धर्म आपल्या सत्याशी विन्मुख बनून असे मानू लागले आहेत की त्याचे संघटन, त्यांचे संख्याबळ, थोडक्यात सांगायचे तर त्यांची सत्ता, हेच वस्तुतः त्यांचे सत्य आहे. नाहीतर आपल्या संप्रदायाच्या माणसांची संख्या वाढविण्यासाठी इतकी यातायात होऊ शकेल का? किंवा लोकांच्या मोठ्या गटांचे धर्मांतर करण्याचा अभिमान कशासाठी बाळगला जातो? खऱ्यांतले खरे एकमात्र धर्मांतर तर असत्यातून सत्यात, अंधारातून प्रकाशात, वाईटातून चांगल्यात, अन्यायातून न्यायात होऊ शकते आणि हे धर्मांतर तर जगातील सर्व धर्मांच्या अनुयायांमध्ये होण्याचे अद्याप शिल्लक आहे.

—जीवनव्यवस्था : ८३

२३. आत्म्याचे गुण

गौतम धर्मसूत्रात आत्म्याचे जे आठ गुण सांगितले आहेत ते थोडक्यात असे आहेत. (१) **दया सर्व भूतेषु** : भूतदया म्हणजे प्राणिमात्रांविषयी प्रेम. दया म्हणजे कोमलता. ही दया केवळ माणसांतच नसते, तर सर्व प्राणिमात्रांत असते. ज्याच्या ठिकाणी भूतदया आहे, त्यागवृत्ती आहे, कृतज्ञता आणि जबाबदारीची

जाणीव आहे आणि लूटमार, फसवाफसवी, याचना न करता जो अंगमेहनत करून जगणे उचित मानतो अशा माणसाला आपण कधीही पापी, पतित, भ्रष्ट किंवा चांडाळ समजू शकणार नाही. प्राणिमात्राविषयी आपल्या मनात जी शुभवृत्ती जागृत होते तो आत्म्याचा गुण आहे... भूतदयेशिवाय समाज क्षणभरही टिकू शकणार नाही... जिला आपण सज्जनता म्हणतो तिच्या मुळाशी भूतदयाच वसत असते. भूतदया आहे म्हणूनच जगाचे व्यवहार चालतात.

(२) **क्षमा-क्षान्ति** : आपल्या ठिकाणी बळ व सामर्थ्य असूनही अपराधी लोकांविरुद्ध ते न वापरता त्यांना क्षमा दाखवावी. समर्थो धर्ममाचरेत्। समर्थ बनून विरोधी लोकांना क्षमा करावी आणि ते पुनः आपले नुकसान करू शकतील अशा स्थितीत राहू नये यातच आर्यत्व आहे. विरोधी लोकांनी भले हजारो वेळा दगा दिला, पण प्रत्येक वेळी आपण जागृत राहून त्यांना क्षमा केली तर क्षमेने आपली शक्ती वाढणार आणि विरोधकांचे तेज कमी होणार, त्यांचा आत्मसन्मान नष्ट होणार आणि सामाजिक प्रतिष्ठाही नाहीशी होणार असते. सामर्थ्ययुक्त क्षमेमुळे विरोधकांचे हृदय विरघळणारच आणि त्याचा विरोध संपुष्टात येईल. आर्यपुरुषाला आपल्या शत्रूंच्या हृदयात आर्यत्वाचा उदय जर करता आला नाही तर त्याच्या आर्यत्वाची महती ती काय ? अशा क्षमेशिवाय व दयेशिवाय समाज चालूच शकणार नाही. दया आणि क्षमा यांचे वातावरण तयार झाल्याने व्यक्ती आणि समाज यांच्यातील झगडे सहज मिटतील.

३) **अनसूयता** : जर आपले सामाजिक जीवन कोणत्या एका दुर्गुणाने मलिन व दूषित होत असेल तर ते मत्सर आणि असूयेमुळे होत असते. मोठमोठ्या पराक्रमी लोकांतही हा दुर्गुण असतो; पण हा दोष नामर्दाईचाच असतो. दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून असूयेने लोकांचे मन जळते याचे कारण असूया होय, मत्सर व असूयेने सामाजिक कार्य उद्ध्वस्त होते.

—जीवनसंस्कृती : ११५

मत्सरावर उपाय कोणता ? मत्सरासमोर अनसूयतेची, अमात्सर्याची ढाल धरणे हाच एक उत्तम उपाय आहे. मनाच्या मोठेपणाचा पाठ, औदार्याचा बोध, उपदेशाने किंवा प्रवचनाने किंवा टीकेने देता येत नाही, तर उदारतेच्या, मोठ्या मनाच्या, आर्यत्वाच्या प्रत्यक्ष आचरणानेच वस्तुपाठ देता येऊ शकतो. म्हणूनच समाजहितैषी पूर्वजांनी सांगितले आहे की लोभी माणसासमोर औदार्य दाखवा, क्रोधी माणसासमोर नम्रता दाखवा, मूर्ख माणसासमोर अनाग्रह वाढवा आणि स्वच्छ माणसाला निष्कपटपणाने जिंका, अनसूयेतूनच सेवाधर्म जन्म पावतो, फुलतो आणि कृतार्थ होतो.

४) **शौच** : सामाजिक जीवनात की व्यक्तिगत जीवनात, जोपर्यंत माणसाच्या ठिकाणी स्वमान जागा होत नाही तोपर्यंत त्याच्यापासून कशाचीच अपेक्षा ठेवता येत नाही. स्वमान हा सर्व सामाजिक सद्‌गुणांचा पाया आहे, आणि हा स्वमान वाढविण्याचे प्रथम साधन अंतर्बाह्य स्वच्छता आहे. संस्कृतात त्यालाच शौच म्हणतात. शौच म्हणजे शुचिता. स्वच्छता बाहेरची–शरीराची, घराची, रस्त्याची, गावाची, वातावरणाची असते; तशीच आंतरिक म्हणजे मनाची, चित्ताची, हृदयाचीही असते. शौचाचाराचे पालन करण्यासाठी मनाचा मळही काढून टाकण्याची आवश्यकता असते. मनाच्या मलिनतेमुळे सामाजिक जीवन संकुचित, विषम व विषमय होत असते. विवेक व शिष्टाचार-आचरणात आणण्यासाठी मनाच्या शुचितेची फारच आवश्यकता असते. अंतर्बाह्य स्वच्छता, निष्कपटता आणि सत्याचार ही शौचाची प्रमुख लक्षणे आहेत. त्यांच्या आधारानेच आपले सामाजिक जीवन स्वच्छ व निर्मळ होणार आहे.

—जीवनसंस्कृती : ११९

५) **अनायास** : आयास म्हणजे श्रम, कष्ट, धावपळ. ही न करणे म्हणजे अनायास. आयास म्हणजे उद्योगिता नाही पण अस्वस्थ चित्ताने केली जाणारी निरुपयोगी धावपळ होय. आयासात एक प्रकारचे विव्हळणे असते. इंग्रजीत ज्याला 'फसिनेस' म्हणतात तो आयास होय. अनायास यासाठी इंग्रजीत 'ईज' किंवा 'रीपोज' हे शब्द होत. अनायास हे सत्त्व गुणाचे लक्षण आहे, सत्त्वगुणी मनुष्य अखंड, अविरत उद्योगात राहात असूनही उत्तेजित न होता आंतरिक शांती गमावत नाही.

—जीवनसंस्कृती : १२१

६) **अस्पृहा** : समाजातील बरेचसे अन्याय, पिळवणूक, शोषण व अनाचार अवास्तव स्पृहेमुळे घडत असतात. जेव्हा समाजात असणाऱ्या सर्व वर्गांचे हित व्यवस्थितपणे साधले जाते, कोणी कोणावर अन्याय करीत नसतो, कोणी कोणाच्या खांद्यावर चढून बसत नसतो, सर्वच जण आपापली उन्नती साधण्यासाठी मदत करीत असतात तेव्हाच तो समाज नीट चालत असतो असे म्हणता येते. केवळ कायदे करून समाजात न्याय आणता येत नाही व शोषण थांबविता येत नाही. जेव्हा लोकांच्या मनात अस्पृहेची वृत्ती दृढमूल होईल तेव्हा अन्यायाची प्रवृत्तीही खऱ्या अर्थाने नाहीशी होईल. अस्पृहेमुळे मनुष्य स्वार्थापासून मुक्त होऊन त्याचा लोभीपणा व इतरांशी अन्यायाने वागणे आपोआप नाहीसे होईल.

—जीवनसंस्कृती : १२३–१२४

७) **अकार्पण्यम्** : कृपण म्हणजे कंजूष, संकुचित मनाचा, कृपापात्र मनुष्य. उपनिषदात माणसांचे ब्राह्मण आणि कृपण असे दोन प्रकार कल्पिले आहेत. ब्राह्मण म्हणजे ब्रह्म–परायण. ब्राह्मण उदार, दिलदार, मोठ्या मनाचा, प्रेमाने सर्व विश्वाला आपले समजणारा असतो. तर कृपण हा संकुचित वृत्तीचा, आपल्या स्वतःपुरता पाहणारा असतो. तो कृपेचा याचक असल्याने कृपण असतो. त्याचे वागणे समाजाल लाभदायी नसते उलट तो समाजाला भाररूप असतो. तो आपल्या कामासाठी इतरांच्या मदतीची अपेक्षा करतो, आणि इतरांना मदत करण्याची गरज असते तेव्हा संकुचित मनाने हात आखडून वागतो. पण समाजाचे व्यवहार नीट चालण्यासाठी माणसांची मने मोठी व असायला हवीत. उदार व इतरांच्या दुःखाची जाण ठेवून मुक्त हस्ताने मदत करणाऱ्या वृत्तीच्या माणसांची गरज असते. म्हणून अकार्पण्याला विशेष महत्त्व आहे.

८) **मांगल्यम्** : सर्व सामाजिक सद्गुणांमध्ये भरून राहणारा मांगल्य हा एक सद्गुण आहे. मांगल्याची व्याख्या करणे कठीण आहे. मांगल्य कोठे आहे आणि कोठे नाही हे दाखविणे अवघड असते. मांगल्याचा सुवास वातावरणात, वृत्तीत दरवळत असतो. मांगल्य व अस्तिक्य एकच होत. आत्मा आहे अशा स्मरणाने जसे संपूर्ण जीवन उद्दीपित होत असते, ईश्वर आहे अशा श्रद्धेने विश्वसंस्था यथायोग्य बनत असते तसेच मांगल्यवृत्तीने जीवन सार्थ व समाधानी बनत असते.

अंतिम साध्यावर अचल श्रद्धा असणे हा जसा मांगल्याचा स्वभाव आहे तशीच त्या साध्याला अनुरूप असणाऱ्या साधनांवर श्रद्धा असणे हेही मांगल्यवृत्तीतूनच निर्माण होते. समाजाचा उद्धार होण्यासाठी क्षमा, दया, अनसूया. अकार्पण्य, दान, शौच, अस्पृहा इत्यादी आर्य सद्गुण जर मांगल्यावर श्रद्धा विकसित करतील तर मानवजात सुखी होईल. जर खरोखरच समाजाची रचना निकोप, निर्दोष, विषमता-रहित, अन्यायमुक्त व्हावयाची असेल तर त्यासाठी वर उल्लेखलेल्या आठ आत्म-गुणांचा प्रामाणिकपणे आचार होणे आवश्यक आहे. चांगल्या समाजाच्या घडणीसाठी या आध्यात्मिक गुणांचा आधार व पालन होणे याशिवाय दुसरा अधिक चांगला उपाय व मार्ग नाही.

—जीवनसंस्कृती : १२७–१२९

(येथे स्थलाभावी कालेलकरांनी सांगितलेल्या आठ आत्मगुणांचे स्वरूप अत्यंत संक्षिप्त रूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.)

२४. आत्मौपम्य

आत्मौपम्य म्हणजे काय ?

आत्मौपम्य म्हणजे सर्वांमध्ये समभाव अनुभवणे. हा अनुभाव दोन रीतींनी होतो. ज्ञानाने आणि प्रेमाने. जिच्यापाशी सर्व दुर्गुण गळून जातात अशी प्रेम ही अमोघ शक्ती आहे. प्रेमाला दुर्गुणांचा किंवा न्यूनतेचा परिचय नसतो असे नाही. पण मोठ्यांतल्या मोठा दोष सुद्धा प्रेम लक्षात घेत नाही; ते सर्व बाजूच पाहात असते आणि त्यांचे पोषण करीत असते. प्रेम व्यक्तीच्या पळपुटेपणाला आपल्यापेक्षा मोठा होऊ देत नाही. म्हणजे सर्वांप्रत भरपूर प्रेम वाढविणे हा आत्मौपम्य साधण्याचा एक सरळ आणि चांगला उपाय आहे. आपले ज्ञान जर जागृत नसले तर प्रेम एका बाजूला घसरून पडून दुसऱ्या बाजूला द्वेष उभा करीत असते. सर्वभूतात्मपण तटस्थतेशिवाय शिकता येत नाही. पक्षपातविरहित तटस्थता प्रेमाच्या मुळाशी असायला पाहिजे.

हीच गोष्ट ज्ञानानेसुद्धा साधता येऊ शकते. प्रत्येक जणाच्या परिस्थितीचा सर्व बाजूंनी विचार करता येत असेल, आणि प्रत्येकाविषयी निरपेक्ष तटस्थवृत्ती राहिली, सर्वत्र निर्वैर बनता आले, तरच आत्मौपम्याचा अनुभव घेणे शक्य होईल.

—जीवनप्रदीप : ८६–८७

२५. मांगल्य

सर्व सामाजिक सद्गुणांमध्ये अनुस्यूत असलेला म्हणजे ओवलेला आर्य आत्मगुण **मांगल्य** हा आहे. मांगल्याची व्याख्या करणे कठीण आहे. मांगल्य कोठे आहे आणि कोठे नाही हे दाखविणे अवघड आहे. मांगल्याचा सुगंध अमुक एखाद्या विशिष्ट क्रियेत जाणवत नाही, तर संपूर्ण वातावरणात तो दरवळत असतो. मांगल्य आणि आस्तिक्य या दोन्ही एकच वस्तू आहेत. आत्मा आहे या जाणिवेने आपले संपूर्ण जीवन उद्दीपित होते, ईश्वर आहे अशा श्रद्धेने विश्वसंस्था जशी सुव्यवस्थित बनत असते, तसेच मांगल्यवृत्तीने जीवन सार्थ आणि समाधानी बनत असते. ईश्वर आहे म्हणजे तो सर्वव्यापी आहे; तो सर्वांच्या अंतःकरणात स्फुरत असतो. आत्मा प्रेमस्वरूप आहे यामुळे शेवटी जगातील विग्रहाचा अंत होणार आहे. दुष्टांतील दुष्ट मनुष्यही शेवटी सज्जन होणार आहे, जग अधिकाधिक घिघडत जात असूनही शेवटी

किंवा अनंती ते सर्व स्वच्छ, निर्दोष व्हावयाचे आहे, आणि शांतता, समता, परस्पर प्रेम आणि विश्वात्मक्य भाव सर्वत्र प्रस्थापित व्हावयाचा आहे, अनंत विविधता आहे तरीही विश्वव्यापी ऐक्य कोठेही खंडित होणार नाही, अशा तऱ्हेच्या श्रद्धेलाच 'मांगल्य' म्हणून आपण ओळखत असतो. जसा आपल्या आर्यनाट्कांचा शेवट सुखपरिणामीच होत असतो, आणि भरतवाक्यात विश्वकल्याणाची भावना घुमत असते, त्याच रीतीने या विश्वलीलेचे नाटकसुद्धा सर्वकल्याणाकडेच गमन करीत आहे, अशी जी श्रद्धा ते मांगल्य होय. पाप उद्भवते पण ते त्याचे निर्मूलन होण्यासाठी; उन्हाळ्यात धरणी तापते ती आकाशातून पर्जन्य खेचून आणून वनस्पतिसृष्टी उगवण्यासाठी; गैरसमज निर्माण होतात ते चित्तशुद्धीच्या आनंदासाठी; मनुष्य स्वार्थी होतो तो तशा जीवनाच्या वैफल्याची खात्री करून घेण्यासाठी; परमात्मा अनेक रूपांनी प्रकट होतो तो आपल्या अखंड एकतेचा अनुभव घेण्यासाठी, हे ज्याच्या मनात दृढपणे बिंबलेले असते त्याच्या हृदयाच्या शांतीचा कोण भंग करू शकेल?

समुद्र सुकतील, पर्वतांचा चुराडा होईल, ध्रुव पण आपल्या स्थिर स्थानापासून चळेल, पण मांगल्यावर ज्यांची श्रद्धा असते ती विचलित होत नाही. याचेच नाव आस्तिकता होय. अशी जिवंत आस्तिकता जरी एकाही माणसाने बाळगली व विकसित केली तर तितक्या प्रमाणात समाज एकदम उच्च पातळीवर आरोहण करतो. आत्मनिष्ठा, मांगल्यावरची निष्ठा, हे सामाजिक कल्याणाचे मोठ्यांतले मोठे भांडवल आहे. सध्या समाज जो इतका पीडित होत आहे त्याचे कारण माणसाच्या हृदयातील जिवंत आत्मनिष्ठा जवळ जवळ लुप्त झाली आहे, समाजाचा उद्धार करण्यासाठी, समाजाचे स्वास्थ्य पुनः प्रस्थापित करण्यासाठी रोजच्या रोज समाज-रचनेत बदल करीत बसण्यापेक्षा क्षमा, दया, अनसूया, अकार्पण्य, दान, शौच अस्पृहा इत्यादी सद्गुणांचा मांगल्यावर श्रद्धा ठेवून विकास करीत राहण्याने मनुष्यजात, मानवता सुखी होईल, तिच्या सर्व शक्ती पाहता पाहता खुलतील, प्रस्फुरित होतील, आणि मग कोणतीही रचना असली तरी ती सोयीस्कर आणि समाधानकारक ठरेल.

जसा अंतिम साध्याविषयी अचल श्रद्धा असणे हा मांगल्याचा स्वभाव आहे, तशीच साधनाविषयी सुद्धा दृढ श्रद्धा मांगल्यवृत्तीतून उत्पन्न होत असते. आत्मगुण अंगी बाणविल्यानंतर त्या गुणांना अनुरूप ठरतील अशीच साधने आपण वापरू शकतो. ही साधने पाशवी किंवा स्थूल नसल्या कारणाने त्यांची योग्यता आणि परिणामकारकता याविषयी सर्वसामान्य मनुष्य बऱ्याचदा साशंक राहतो. मांगल्यावरची श्रद्धा ज्यांच्या ठिकाणी असते अशी माणसे साधनांविषयी साशंक राहात नाहीत; आणि थोड्याशा प्रतिकूल अनुभवांवरून निराश होऊन ती सोडूनही देत नाहीत.

—जीवनसंस्कृती : १२६–१२८

आता अशी मांगल्यवृत्ती कशी शिकायची ? तिच्यासाठी एखादी साधना नाही, एखादा अभ्यासक्रम नाही. मांगल्यवृत्तीचाच शेवटी विजय होत असतो हे सिद्ध करण्याइतका पुरावा मनुष्यजातीपाशी अद्याप जमाही झालेला नसेल. एकाही माणसात जर ही श्रद्धा खरोखर जागी झाली, जिवंत बनली तर त्याच्या सहवासाने संसर्गजन्य रूपात इतरांमध्ये ती संक्रमित होताना काही काही वेळा पाहावयास मिळते. काही वेळा माणसाच्या सखोल चिंतनामधून ती अचानकपणे स्फुरण पावत असते. अरणीची दोन लाकडे परस्परांवर घासली जाऊन जसे त्यांच्यातून एकाएकी धूर आणि अग्नी भडकून उठतात तशीच सात्त्विक वृत्तीच्या माणसाच्या मनोमंथनातून ही जिवंत श्रद्धा उफाळून वर येत असते, सळसळून बाहेर येते, आणि नंतर जेव्हा समाजाचा उद्धार व्हावयाचा असतो तेव्हा दावानलाप्रमाणे ती चहूदिशामध्ये पसरत असते; आणि सामाजिक दोषांची व नास्तिकतेची सर्व अरण्ये जाळून टाकत असते. नंतर मानवजात आपल्या नित्याच्या स्वभावानुसार लोकोत्तर पराक्रम करून दाखवीत असते; आणि नव्या युगाला सुरुवात होत असते.

आत्मगुणांचा समाजव्यापी विकास हेच सामाजिक उद्धाराचे अमोघ साधन असते. या विकासातूनच त्या त्या काळासाठी अनुकूल व अनुरूप ठरणारी समाज-रचना मानवजातीला सापडत असते. समाजरचनेत बदल करण्याने आणि सत्तेची विभागणी पुनःपुन्हा नव्याने करीत गेल्याने उत्साह टिकून राहील, नवे नवे अनुभव मिळतील; पण मांगल्याच्या दिशेने प्रगती मात्र व्हावयाची नाही.

—जीवनसंस्कृती : पृष्ठे १२८–१२९

२६. करुणरसः

जेव्हा भवभूतीने 'रस एकच आहे आणि तो करुण आहे, तो अनेक रूपे धारण करीत असतो' असा सिद्धान्त मांडला तेव्हा त्याने 'करुण' शब्दाला कलेइतके व्यापक बनविले आहे. हृदय कोमल असले, उन्नत असले, सूक्ष्मवेदी असले आणि उदात्त असले तर तेव्हा कारुण्याची छटा यावयाचीच. कारुण्याची समभावना किंवा समवेदना सार्वभौम असते, तिच्यातून आपण विश्वात्मैक्यापर्यंत पोहोचू शकतो. करुणरस खरोखरच रससम्राट आहे. पण या करुणरसात शोकाचा भाव असलाच पाहिजे असे नाही. बाकी सर्व रस सागरात जशा नद्या मिसळून जातात तसे, या रसात विलीन होऊन जातात....खरे पाहता सर्व रसांची परिणती योगातच होत

असते. योग म्हणजे समाधी–समाधान–साम्यावस्था–सर्वात्मैक्यभाव. कलांमधून शेवटी हेच निष्पन्न व्हावयाचे. कलेचे साध्य आणि साधन हा योगच आहे. ही दुर्दैवाची गोष्ट आहे की योगाचा हा व्यापक अर्थ आजच्या भाषेत स्वीकारला जात नाही. नाक पकडून, मांडी वाकवून, आसन घालून, दीर्घकालपर्यंत झोप ताणून बसणे व उपवास करणे यालाच लोकमानस योग समजते.

—जीवनभारती : ९६–९७

२७. संयमात संस्कृती

संयम हे संस्कृतीचे मूळ आहे. दौर्बल्याच्या, विलासितेच्या अथवा अनुकरणाच्या वातावरणात कधीही संस्कृतीचा उद्‌भव होत नाही आणि विकासही होत नाही. पंचवीस वर्षांपर्यंत दृढ ब्रह्मचर्य पाळणारांची अपत्ये जशी सुदृढ होत असतात, तशीच संयमाच्या आधारे निर्माण झालेली संस्कृती प्रभावी आणि दीर्घजीवी होत असते.

ऋषींनी तप आणि ब्रह्मचर्य यांच्याद्वारा मृत्यूवर विजय मिळवून एका अमर संस्कृतीला जन्म दिला. बुद्धकालीन भिक्षूंच्या आणि भिक्षुणींच्या तपश्चर्येच्या मुळे अशोकाच्या साम्राज्याचा आणि आर्य संस्कृतीचा विस्तार होत गेला. शंकराचार्यांच्या तपश्चर्येने हिंदुधर्माचे संस्करण झाले. महावीर स्वामींच्या तपाच्या द्वाराच अहिंसाधर्म पसरला. साधे व संयमी जीवन जगल्यानेच शीख गुरूंनी पंजाबात जागृती आणली. त्यागाच्या झेंड्याखालीच साध्या मराठ्यांनी स्वराज्य स्थापन केले. बंगालचे चैतन्य महाप्रभू मुखशुद्धीसाठी हरडेसुद्धा खतःजवळ ठेवीत नसत, त्यातूनच बंगालची वैष्णव संस्कृती विकास पावली. संयमातच नव्या संस्कृती निर्माण करण्याचे सामर्थ्य असते. साहित्य, स्थापत्य, संगीत, कला आणि विविध धर्मविधी संयमाच्या मागून येत असतात. संयम आरंभी तर कर्कश आणि नीरस वाटतो, पण त्यातूनच संस्कृतीची मधुर फळे आपणांस मिळतात.

जे कलेच्या बाजूने पक्षपात दाखवून संयमाला कमी लेखू पाहतात ते कलेला भ्रष्ट करीत असतात, आणि संस्कृतीच्या मुळावरच घाव घालत असतात.

—जीवनसंस्कृती : १५१

२८. अघमर्षण

अघमर्षण म्हणजे पाप धुवून काढणे. ऋग्वेदात या नावाचे एक प्रख्यात सूक्त आहे. (मंडल २० : ऋचा १९०) या ऋषीचे नावही अघमर्षणच आहे. हे सूक्त संध्यावंदनात सकाळ–संध्याकाळ गायिले जाते. या सूक्ताची खुबी तर अशी आहे की त्यात पापाचा उल्लेखसुद्धा नाही.

पापोऽहं पापकर्माऽहं पापात्मा पापसंभवः । इत्यादी श्लोक आपल्यापाशी पडले आहेत. त्यांच्यात आपण तोंड भरून पापाची कबुली देत असतो, आणि ईश्वरापासून क्षमेची व दयेची याचना करीत असतो. अघमर्षण ऋषीची पद्धती वेगळी आहे. त्याने पाप कसे निर्माण होते त्याचे मूळ शोधून काढले आहे. गीतेने तर सांगितलेच आहे की काम आणि क्रोध यांच्यामुळे माणूस पापात बुडतो, पण हे काम–क्रोधसुद्धा आत्म्यापुढे कसे यशस्वी होतात ? अघमर्षण ऋषीचे मत असे दिसते की माणसाचे मन संकुचित बनले की त्यात काम–क्रोध व त्यांच्या बरोबरची सर्व पापे घुसणारच. उपनिषदांच्या ऋषींनी जसे सांगितले आहे की, '**महामनाः स्यात्**' तसेच अघमर्षण ऋषीही म्हणतात. बाह्य विश्वाची विशालता अनुभवा; हृदयाची खोली गाठा, धुंडाळा; ही सर्व आंतरबाह्य सृष्टी कशाच्या आधाराने टिकून राहिली आहे हे पाहा. काळाची व सृष्टीची अनंतता लक्षात आणा म्हणजे तेवढे तुमचे मन आपोआपच विशाल बनेल. जशी मोकळ्या हवेत दुर्गंधी टिकत नाही तसे विशाल मनात पापाला स्थान मिळत नाही. अंधारात, कोपऱ्यात, सांदी–कोपऱ्यात, अडगळीत, संकुचित जागेत, छोट्या छोट्या वाड्यांत, बखळ जागांत पाप भरून राहात असते. त्यांना विसरून जा आणि पृथ्वीच्या विशाल पटावर, अनंत आकाशाखाली परम विराटाचे ध्यान करायला बसा. आकाशात काय दिसते ? सूर्य असतो, चंद्र असतो, अंतरिक्ष असते, त्याच्या पलीकडे तारकांचा महान सागर उचंबळत असतो. या सर्वांच्या पुढे तुमचे शरीर, या शरीराच्या वासना आणि वेदना केवढ्याशा वाटणार ? आणि तुमचे जीवन पण केवढे, किती छोटे ?

—जीवननो आनंद : ९४–९५

आणि तरीही ही जी सृष्टी दिसते ती पहिली किंवा शेवटची नाही. अशा कित्येक सृष्टी यापूर्वी होऊन गेल्या आहेत की त्यांची गणतीच नाही, आणि यानंतर किती होतील हे सुद्धा कोण सांगू शकेल ? या अनादी, अनंत सृष्टीत जे काही स्थायी, टिकावू असेल, विभू असेल, तर ते परमात्म्याचे ऋतम् आणि सत्यम् आहे. ऋतम् म्हणजे विश्वाचा सार्वभौम नियम, कायदा. चराचर विश्वाचा सनातन धर्म ते ऋतम् होय. या ऋतम्च्या आधारानेच ही अनादी, अनंत सृष्टी चालत असते. (ऋ=

चालणे). या ऋताच्या आत वसणारे जे नित्य होऊन राहिलेलेच आहे, आणि ज्याला नाश नसतो, जे परमतत्त्व, त्याला सत्य म्हणतात. ते सत्य सर्वव्यापी असल्याने त्याला विष्णु (सर्वत्र प्रवेश पावणारे) असेही म्हणतात. त्याचे दुसरे नाव 'ऋतधामन्' असेही आहे; कारण की त्याच्या आधाराने या विश्वाचा सार्वभौम आणि सार्वकालिक नियम प्रतिष्ठित आहे.

या ऋतम् आणि सत्यम् द्वारा अनंत विश्वे निर्माण होत आहेत, विलीन होत आहेत आणि पुनः निर्माण होत आहेत. या विश्वचक्राला बाहेरचा आधार नाही. त्याचा आंतरिक जो आधार तेच ऋतम् आणि सत्यम् होय.

या विश्वचक्राला अखंड चालत ठेवणारी, त्याला अखंड नूतन ठेवणारी जी शक्ती तिला तप म्हणतात. अघमर्षण ऋषी म्हणतो : या ऋतम्चा आणि सत्याचा साक्षात्कार करून घ्या. या परमतपाशी एकरूप व्हा. ज्याची दोन्ही टोके कोणीही पाहिली नाहीत तो सनातन काल कसा फेरे मारत आहे त्याचे तत्त्व समजून घ्या, आणि नंतर या विश्वाच्या रचनेच्या अद्‌भुत काव्याचा आस्वाद घ्या. कवी असंख्य होऊन गेले. मनुष्य हृदय आहे तोपर्यंत त्यांची काव्ये, चेतनवत् काव्ये जिवंत राहतील आणि चेतनप्रदान करीत राहतील, पण देवांचे महाकाव्य तर हे विशाल विश्वच आहे. अणोरणीयान् महतो महीयान् असे हे विशाल विश्वच आहे. एका बाजूला दूरदर्शक यंत्राच्या मदतीने आणि दुसऱ्या बाजूला सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्याने तुमच्या चर्मचक्षूची शक्ती वाटेल तेवढी वाढू द्या. या विश्वाची टोके तुमच्या हातात येणार नाहीत, आणि हे त्रिकालव्यापी विश्व तर परमात्म्याचा केवळ महिमाच समजला गेला आहे. परमात्मा तर याच्यापेक्षाही मोठा आहे. **एतावानस्य महिमा। अतो ज्यायांश्च पूरुषः ॥** हे सुखाचे धाम आहे, आनंदाचे निधान आहे. त्याची कल्पना हृदयात जसजशी पसरेल तसतसे हृदय आपोआप स्वच्छ आणि उज्वल होईल. पापाचे स्मरण सतत करण्याची जरुरी नाही. जसजसे मोठे व्हाल, प्रतिष्ठेने नाही पण हृदयाने मोठे व्हाल तसतशी पापाची जाणीव क्षीण होऊ लागेल आणि पापाला उभे राहायला जागाच राहणार नाही. **यो वै भूमा तत्सुखम्। नाल्पे सुखमस्ति।** एवढे समजणे हाच पापनाशक मंत्र आहे.

अघमर्षण ऋषीची ही प्रेरणा घेऊन विधात्याचे विश्वकाव्य आपण पाहावयास पाहिजे. त्यात ज्ञानानंद आहे, सनातन काव्य आहे आणि अनंत शांती आहे. शक्ती तर आहेच.

—जीवननो आनंद : ९४–९६

२९. पक्षीगीत

हे परमसुंदरा ! तो सप्तवर्णी पूल तू आकाशात पसरवून ठेवला आहे. आम्ही या रस्त्याने तुझ्याकडे यावयाचे का ? आम्ही एकेकट्याने का यायचे ! विविध रंगांचे आम्ही एकत्र येण्यापूर्वीच तुझा पूल अदृश्य होऊन जातो. आम्ही एकेका वर्णाचे लोकसुद्धा एकत्र जमू शकत नाही, आणि अनेक वर्णांचे लोक पण एकत्र येऊ शकत नाही. बगळे कावळ्यांना ओळखत नाहीत, आणि कावळे बगळ्यांना ओळखत नाहीत. हा तुझा सप्तवर्णी पूल तर सरळ सरळ सांगून टाकत आहे की सर्व वर्ण एकत्र जमून ऐक्य साधतील तेव्हाच या रस्त्याने तुझ्यापर्यंत येता येईल. काय करावे ? आमचे वर्णच आमच्या आड येत आहेत. पण वर्णाशिवाय कसे राहता येईल ! तेही कठीण आहे. वर्णांचा अभाव तर अंधारातच असतो; आणि आम्हाला अंधार थोडासुद्धा आवडत नाही. अंधार म्हणजे दौर्बल्य. अंधार पडला की त्याच्या ओझ्याखाली आमचे पंख दडपले जातात. उडण्याचे तर बाजूलाच राहते पण साधे पंख फडफडविणेही अवघड होऊन बसते. म्हणून हे सूक्ष्मकिरणा ! एक तर आम्हांला अंधारात पाहण्याची आणि उडण्याची शक्ती दे अथवा सर्व वर्ण एकमेकांना ओळखतील आणि तुझ्या सप्तवर्णी पुलाप्रमाणे वेगवेगळे राहूनही एकमेकांत मिसळून जाऊ शकतील असे हृदय आम्हांला दे. वृद्ध लोक म्हणतात की रात्रीच्या अंधारात पाहू शकतात असेही पक्षी असतात. पण ते फार दुष्ट असतात. आमच्या मुलांनाच खाऊन टाकतात. हे किरणा ! अंधार ही असतेच फार खराब वस्तू. आमच्यासाठी अंधार दूर कर. जसे येईल तसे तुझे नाव आम्ही सकाळ संध्याकाळ गाऊ. सर्व आनंद आहे ! आनंद आहे ! आनंद !

—अवारनवार : ४७–४८

पक्षीगीत

तुझी नावे असंख्य आहेत. आम्ही तुला प्रकाशाचा गोल म्हणून ओळखतो. आम्ही तुला किरण म्हणतो. तूच गायन आहेस, तूच वर्ण आहेस, तूच अन्न आहेस, तूच प्राणी आहेस. चित्रविचित्र छाया पाडणारा पण तूच आहेस. भीतीच्या वेळी धाबरून राहण्याची निवाऱ्याची जागा पण तूच आहेस. तूच ऊन्ह व तूच पर्जन्य. जागृती व निद्रा तुझीच स्वरूपे आहेत. आमच्या छातीला सुख देणारा आणि

आमच्या पंखांना अधांतरी ठेवणारी हवासुद्धा तूच आहेस. दाणे वेचून आणण्यासाठी वाटेल त्या दिशेला उडून गेलो असलो तरी आम्हांला आमच्या पिलांचे स्मरण राहते ते पण तूच आहेस, आणि दाणे खाऊन तृप्त होतो तेव्हा वृक्षाच्या पानांच्या तळाशी किंवा चिखलात वळवळणारे किडे व आळ्याही तूच आहेस. उन्हाळ्यात छाती फुगवून फुगवून तू आमच्या बरोबर अंघोळ करीत असतोस. सकाळीच आमच्या प्रत्येक गळ्यात बसून तू विविध प्रकारचे आलाप काढत असतोस. अंधार पडल्यावर आमच्या डोळ्यांत तूच झोपी जातोस आणि उजाडल्यावर तूच डोळे उघडतोस. सर्व आनंद आहे! आनंद आहे! आनंद.

—अवारनवार : ४८–४९

विभाग पाचवा



कला

काका हे उच्च दर्जाचे सौंदर्यप्रेमी, रसिक, कलावंत साहित्यिक, कला-समीक्षक आहेत. त्यांनी कलेवर मौलिक विचार मांडले आहेत. कलेविषयींचे अनेक गैरसमज त्यांनी दूर करून खरी कला मानवाचे जीवन उन्नत बनवून आनंदपूर्ण करते, आणि कला मानवाला नीतिशुद्ध, पवित्र व उच्च दर्जाचे जीवन जगायला मदत करते असे आवर्जून सांगितले आहे. कलेचा आनंद इंद्रियाद्वारे अनुभवता येतो पण तो स्वरूपाने वैषयिक नसतो. तो उच्चप्रतीचा असतो आणि खऱ्या कलेचे स्वरूप विज्ञान, धर्म, सत्य, धर्म, तत्त्वज्ञान, नीती यांच्या विरुद्ध असण्याचे कारण नाही असे ते म्हणतात. सदाचरण ही सर्वश्रेष्ठ कला आहे असेही ते म्हणतात. काका कला या शब्दाचा अर्थ खूपच व्यापक बनवून शेवटी जीवनाकरिता कला असते व असावी असे आवर्जून म्हणतात. कला ही विलासिता नसते तर ती मानवाला उच्च प्रतीचा आनंद देते आणि म्हणून यापुढे जीवनकलाकार पुढे यावयास पाहिजेत असे ते म्हणतात.

१. शारदेचे उद्‌बोधन
२. कलेचे पूर्ण स्वरूप
३. कलेची व्याख्या अशक्य
४. कलानन्द
५. कलेचा आनंद इंद्रियातीत
६. कलेचा आदर्श
७. कलेचे प्रयोजन
८. कलेचे विज्ञान
९. निसर्गाची कलादीक्षा
१०. परस्मैपदी आणि आत्मनेपदी कला
११. कला आणि विलासिता
१२. कला, जीवन आणि तत्त्वज्ञान
१३. हुन्नर आणि कला
१४. साहित्य, संगीत आणि कला
१५. संगीत ही भावनेची भाषा
१६. संगीतकारांना विनंती
१७. संगीत : जन्मसिद्ध हक्क
१८. काव्य आणि संगीत
१९. कवी
२० कवीचे द्रष्टेपण
२१. तत्त्वज्ञानी आणि कवी
२२. सदाचार ही सर्वश्रेष्ठ कला
२३. पाहिजेत जीवनकलाकार
२४. प्रगतिशील साहित्य
२५. साहित्याची प्रेरणा
२६. अशी कला नको
२७. वीररस
२८. आनंदाचे निर्झर

१. शारदेचे उद्‌बोधन

कोणत्या नवमीला सुरांनी शारदेचे उद्‌बोधन केले हे आपल्याला माहीत नाही, पण तो अत्यंत शुभ, सुभग आणि कल्याणकारी मुहुर्त असला पाहिजे. समृद्धिदायी वर्षा झाल्यानंतर जी शांती, जी निर्मळता, जी प्रसन्नता दृग्गोचर होते त्यांतच देवांना शारदेचे दर्शन झाले. पृथ्वीने हिरवारंग अजून सोडलेला नाही, परिपक्व धान्य सुवर्ण-वर्ण खुलवीत आहे, अशा प्रसंगी देवांनी शारदेचे ध्यान केले. सज्जन हृदयासारख्या अच्छोदकात विहार करणारी प्रसन्न कमळे आणि आकाशात अनंत काव्याचे फवारे सोडणारा रसस्वामी चंद्र हे दोन्ही जेव्हा परस्परांचे ध्यान धरीत होते तेव्हा देवांनी शारदेचे आवाहन केले. शारदा आली आणि पृथ्वीच्या वदनकमलावर सुहास्य पसरले. शारदा आली आणि वनश्रीचा गौरव विकसला. शारदा आली आणि घरोघर समृद्धी वाढली. शारदा आली आणि वीणेचा झंकार सुरू झाला, संगीत आणि नृत्य सर्वत्र पसरले.

शारदेचे स्वरूप कसे आहे ? बाला ? मुग्धा ? प्रौढा ? की पुरंध्री ? शारदा मंजुल-हासिनी बाला नाही, मनमोहिनी मुग्धा नाही. विलासचतुरा प्रौढा नाही. ती नित्य-यौवना पण स्तन्यदायिनी माता आहे. ती आपल्याबरोबर खेळते, हसते, पण ती आपली सखी नाही; ती माता आहे. आपण तिच्याबरोबर बालसहज लडिवाळपणा करावा, पण आपण आईपुढे उभे आहोत हे विसरून जाऊ नये. माता म्हणजे पवित्रता, वत्सलता, कारुण्य आणि विश्रब्धता. माता म्हणजे अमृतनिधान. 'न मातुः परदैवतम्' हे वचन एखाद्या उपदेशप्रिय स्मृतिकाराने काढलेले नाही. तो कोणा मातुःपुत्र धन्य मुलाने काढलेला हृदयाचा उद्‌गार आहे.

चराचर सृष्टीचे ऐक्य अनुभवणारे आपण आर्य संतान एकाच शब्दात अनेक अर्थ पाहतो. शारदा म्हणजे सरोवरांत विराजणाऱ्या कमळांची शोभा. शारदा म्हणजे शरद्-पूर्णिमा, आणि दिवाळीची कांती. शारदा म्हणजे यौवनसहज व्रीडा. शारदा म्हणजे कृषिलक्ष्मी. शारदा म्हणजे साहित्यसरिता. शारदा म्हणजे ब्रह्मविद्या, चिच्छक्ती. शारदा म्हणजे विश्वसमाधी.

अशी ही आपली माता आहे, आपण शारदेची लेकरे आहोत. केवढी धन्यता ! केवढी स्पृहणीय पदवी ! केवढा अधिकार ! आणि त्याचबरोबर केवढी मोठी दीक्षा !

शारदेच्या स्तन्याचा ज्या ओठांना स्पर्श झाला ते ओठ अपवित्र वाणी उच्चारणार नाहीत, निर्बलतेचे शब्द काढणार नाहीत, द्वेष उद्‌गारणार नाहीत, पापाला शृंगारणार नाहीत, पौरुषाचा वध करणार नाहीत, आणि मुग्धजनांना फसविणार नाहीत.

शारदेच्या मंदिरात सर्वोच्च कला असेल, कलेच्या नावाने विचरणारी विलासिता

असणार नाही. शारदेच्या भवनात प्रेमाचे वातावरण असेल, केवळ सौंदर्याचे मोहन असणार नाही. शारदेच्या उपवनात प्राणाचे स्फुरण असेल, विरहाचे वा निराशेचे निःश्वास असणार नाहीत. शारदेच्या लताकुंजात विश्वप्रेमाचे संगीत असेल, एकमेकांच्या अनुनयाचे वेडपट कलकूजित असणार नाही. शारदेच्या विहारात स्वतंत्रतेची धीरोदात्त पावले असतील, उद्देशविहीन आणि स्खलनशील पदक्रम असणार नाहीत. शारदेच्या पीठात ब्रह्मरसाचा प्रवाह असेल, विषयरसाचा उन्माद असणार नाही.

या देवी सर्वभूतेषु श्रद्धारूपेण संस्थिता ।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ॥

—जिवंत व्रतोत्सव : ११४–११५

२. कलेचे पूर्ण स्वरूप

एक हा विचार मी माझ्या डोक्यातून काढून टाकू शकत नाही की साहसाशिवाय, उत्साह आणि पराक्रमाशिवाय, धोका पत्करायची लज्जत, खुमारी चाखल्याशिवाय कला कधीही आपले पूर्ण रूप प्रकट करू शकणार नाही. कला भलेही शांतीच्या दिवसांतच फुलत असेल, सुरक्षिततेच्या वातावरणातच तिला अवसर मिळत असेल; रिकामपणाचे ते फळ असेल; पण कलेची मूळ प्रेरणा तर साहसाच्या, शौर्याच्या पराक्रमाच्या, 'आत्मबलिदाना'च्या उत्कट इच्छेतूनच उगम पावत असते. चंडोलाप्रमाणे कल्पनाकाशात निर्भय होऊन उंच उंच चढणारी कला विमानाच्या पायलटाइतकीच धाडसी व धीट असावयास पाहिजे.

भव्यता आणि पराक्रम हे परस्परांचे सहोदरच आहेत. रावण, दुर्योधन, जरासंध, वृत्र, मिस्टनचा सैतान हे भलेही साधुतेचे शत्रू होत, पण त्यांच्या ठिकाणी पराक्रम आहे, भव्यता आहे, दुर्दान्त महत्त्वाकांक्षा आहे; म्हणूनच त्यांच्या विभूती शोभून दिसतात, आणि कवींना तसेच कलावंतांना आकर्षून घेतात. जे समर्थ आहे, भव्य आहे, व्यापक आहे, उदात्त अथवा गूढ आहे, ते स्वभावसुंदर असतेच.

सहाराच्या वाळवंटाची चित्रे आणि वर्णने पहा. त्यांत काही नाही हेच त्याचे सर्वस्व आहे.

दक्षिण भारतातील उंच उंच मंदिरे, विजापुराच्या मशिदी, ब्रह्मदेशातील विशाल

बौद्ध मूर्ती,–ही सर्व सुंदर नसली तरी त्यांच्या भव्यतेनेच त्या कलापूर्ण समजल्या जात्या. पण आपल्या कलावंतांनी कलाविधानाचे संपूर्ण सतक या सर्व ठिकाणी सिद्ध करून दाखविले आहे. लहानात लहान कोन पाहिले तरी त्यात लालित्य आणि लावण्य गवसेल, आणि समस्त कृतीचा विचार केला तरी त्यांत विशालता, कोमलता आणि प्रमाणबद्धता सापडेल. खरोखर, जवळ जवळ अलौकिक म्हणता येतील अशा आपल्या या कलाकृती भारतीय संस्कृतीची उत्तम प्रतीके आहेत. पिंड–ब्रह्मांड–न्याय त्यांच्यात उत्तम रीतीने सांभाळलेला आहे.

—जीवननो आनंद : ५२०–५२१

३. कलेची व्याख्या करणे अशक्य

कलेचे विवेचन करू जाता व्याख्येपासूनच सुरुवात करावयास पाहिजे. जशी माणसाला इंद्रिययुक्त देहाची गरज असते, कुटुंबाची व घराची गरज असते आणि समाजाला व्यवस्थातंत्राची गरज असते तशी कलेला व्याख्येची गरज असतेच. एखादा मनुष्य व्याख्या करतो म्हणजे सामान्यरीत्या सौम्य प्रकृतीचा माणूसही ती समजण्याकरिता तिला तपासून पाहण्यास प्रवृत्त होतो. प्रत्येक व्याख्येत त्याला एकांगीपणा आढळतो आणि त्यातून वादावादी निर्माण होते. कलेची व्याख्या तर्कशुद्ध करायला गेल्यास त्यात कलेला मार बसतो, अपाय होतो. आणि बुद्धी प्रतिकूल होऊन बसते.

कलेचा आनंद लुटता लुटता कलेला पूर्णपणे ओळखण्याची स्वाभाविक प्रथा सोडून देऊन कलेची व्याख्या करायला सुरुवात करणे हे फुलाचे सौंदर्य पाहण्याऐवजी व त्याचा गंध हुंगण्याऐवजी तीक्ष्ण, धारदार वस्तूने त्याचे तुकडे करून त्याची आतली रचना तपासण्यासारखे होते. झालेली कलाप्रतीती व्याख्येच्याद्वारा भलेही व्यक्त होवो, पण केवळ व्याख्येच्याद्वारा कोणाला कलेची शुद्ध प्रतीती झालेली आहे असे अद्याप तरी कधी घडले नाही.

जशी सदाचाराची किंवा धर्माचाराची व्याख्या करणे अवघड आहे तसेच कलेचे लक्षण निश्चित करणे तितकेच कठीण आहे. एवढे तर कोणीही मान्य करील की जसे मातृमान, पितृमान आणि आचार्यवान तरुणाला वडीलधाऱ्या माणसांच्या सहवासातून सदाचाराचे रहस्य (मर्म) समजते, तसेच कलेचे रहस्य (सारस्वरूप) जीवनरसिक, संस्कारसमर्थ कलावंतांच्या सहवासातूनच आणि त्यांच्या विविध कलाकृतींचे चिंतन करण्याने आपल्या हृदयाला भावते. नंतर जेथे चांगली कला नसते तेथे जर

कोणी तिची कला म्हणून ओळख करून देऊ लागला तर आपणास भोवळच येते.

—जीवननो आनंद : ४९२

...निसर्गाच्या सौंदर्यात कला भले नसो, पण कलेची दीक्षा देण्याचे सामर्थ्य तर असतेच. कलेचे कितीतरी प्रकार आपण मुळात निसर्गापासून घेतले आहेत. प्रथम आकर्षण निसर्गाचे असते. त्याच्या ध्यानातून आपण विशिष्ट मानवी व दैवी भाव निर्माण करीत असतो, आणि सौंदर्यावरच भाववाहितेचे आरोपण करीत असतो. सौंदर्याशी भावांचे मीलन झाले की लगेच त्यातून सर्जनशक्ती जागृत होत असते, आणि ती स्वतःच्या प्रतिमेने नवी नवी रूपे, नव्या नव्या आकृती, नवेनवे वर्ण-विन्यास आणि नवे नवे आलाप निर्माण करीत असते. भावांची जागृती, त्यांची नव-निर्मिती, त्यांची संक्रांती आणि त्यांतून येणाऱ्या अस्वस्थतेच्या शेवटी प्राप्त होणारी तृप्ती--हे सर्व कलेचे स्वरूप असते. त्यासाठी वाहन म्हणून कोणती वस्तू वापरली जाते हा प्रश्न गौण असतो. माती, दगड, लाकूड, धातू, काच, साबण, मेण, हस्तिदंत कोणताही पदार्थ वापरा; रंग, रेषा, दोरा, मणी कशाचीही मदत घ्या. गद्य आणि गेय शब्द वापरा अथवा मूक अभिनय करा; कला स्थापत्याची असो की नगर रचनेची असो, कला सर्व एकच आहे. कलेचा उगम वस्तुजातामध्ये नसतो, पण मनुष्याच्या हृदयात असतो.

—जीवननो आनंद : ४९४

४. कलानन्द

कलेची अनेक वर्णने आणि तिच्या अनेक व्याख्या वाचून व त्यांच्यावर चिंतन करून मी स्वतःसाठी एक सूत्र तयार केले आहे. ती व्याख्या नाही पण त्याला कलेचे व्याकरण म्हणता येईल. मला तर सर्व व्याख्यांपेक्षा हे सूत्र अधिक योग्य व अनुरूप वाटते. हे सूत्र मी शिक्षणात लागू केले आहे, तसेच योगविद्येतही लावीत असतो. जीवन-शास्त्रातही लागू करतो आणि ते कलेचे तर माझ्या मते हार्दच आहे. जगाचे सुखोप-भोग आणि कलेचा आनंद यांच्यात मुळातच वेगळेपण असते ही गोष्ट सर्वच कलावंत मान्य करतात. इंद्रिये आणि त्यांच्या विषयांचा सन्निकर्ष सुखदुःख ही दोन्ही निर्माण करीत असतात, आणि जेथे सुख असते तेथेही ते सुख स्थायी आणि परिणामतः रमणीय असत नाही. कलेच्या आनंदाचे स्वरूपच असे असते की त्याच्यासमोर सुख,

दुःख काहीही येवो, कला तर त्यातून सारखाच निरपवाद आनंद घेऊ शकत असते. एखादी शोकांतिका किंवा शोकात्मिका (ट्रॅजेडी) पाहून विरघळून जाऊन आपण अश्रुमय होऊन जातो, आणि तरीही ती शोकांतिका अनेक वेळा पाहण्याची किंवा वाचण्याची आवड व गोडी आपण सोडू शकत नाही. ज्या दरिद्री अवस्थेत एक क्षण पण राहण्याची आपली हिंमत होणार नाही तिचेच हुबेहूब वर्णन पाहून आपल्या ठिकाणी जो समभाव किंवा पुण्यप्रकोप जागृत होतो तो तर आपणास स्वागतार्हच वाटतो.

—जीवननो आनंद : ५०३

असे का होत असेल? माणसाला दुःख आवडत नाही असे असूनही जीवनात दुःख तर असतेच. दुःख आहे एवढेच नाही, पण त्याचा उपयोगही आहे. दुःखातूनच आपण अनुभवसमृद्ध होत असतो. आपले व्यक्तित्व, आपली पर्सनॅलिटी, अथवा गीतेच्या परिभाषेत सांगायचे झाल्यास आपले अध्यात्म वृद्धिंगत होत असते. (गीतेत 'स्वभावो अध्यात्मं उच्यते' अशी अध्यात्माची व्याख्या केली आहे. तेथे स्वभाव म्हणजे माणसाची Personality, तिलाच अध्यात्मही म्हटले आहे.)

—जीवननो आनंद : ५०३

समभावामुळे आपले व्यक्तित्व आपल्या शरीरातून बाहेर जाऊन इंद्रियांचे बंधन तोडून, संकुचिततेपासून वाचून विकास पावत असते, आणि आपल्या देहापासून भिन्न अशा व्यक्ती, मूर्ती, घटना, प्रतीके आणि तत्त्वे यांच्याशी एकरूप होऊन जाते. असा व्यक्तिवाचा विकास हाच आनंद आहे. सामान्यपणे सुस्त किंवा स्वस्थ दशेत माणसाला स्वतःच्या शक्तीची जाणीव होत नसते. दुखाच्या किंवा संकटाच्या प्रसंगी त्याच्या शक्तीचा आविर्भाव होत असतो. हा आविर्भाव त्यावेळी भलेही कष्टकारक असेल, पण एवढा अनुभव मिळविण्याच्या आपल्या शक्तीचा परिचय तर माणसाला समाधानकारकच वाटत असतो. विज्ञानाचे प्रयोग, लढाईतील पराक्रम व जीवनातील साहसी प्रयोग–सर्वच आपल्याला अध्यात्माच्या विकासाचा आनंद देत असतात. ही व्यक्तित्वविकासाची जी कला किंवा जे कौशल्य तोच योग होय. शिक्षणाचे प्रयोजन पण शेवटी अध्यात्माचा विकासच असते. इंद्रियांच्या द्वारा सुखदुःखादी भावनांचा अनुभव घेणे ही प्राथमिक अवस्था आहे. या भावना विकसित केल्यावरही त्यांना गौण करून त्यांच्यातून अध्यात्माचा आनंद सरळ रीतीने घेणे हे कलेचे काम असते आणि यातच कलेची महती पण असते. गोड गोड पक्वान्ने किंवा मधुर फळे खाताना, उन्हाळ्यात थंड पदार्थांचे सेवन करताना, हिवाळ्यात उबदार अंथरुणात पहुडताना मिळणारे निरतिशय सुख कोणाला वाटत नाही? ही सुखे घेऊन तर माणसे व पशु-

पक्षी जगत असतात आणि त्यांच्यासाठीच जन्मभर खपत असतात. पण एखादा मनुष्य विविध प्रकारची पक्वान्ने आवडीने खातो एवढ्यासाठी त्याला कोणी शूरवीर, बहादुर, महान किंवा समर्थ समजत नाही, म्हणत नाही. पशुपक्षी विषयांचे सेवन करीत असतात, माणसे पण विषयांचे सेवन करीत असतात, त्यांचा उपभोग घेत असतात. त्यात तिरस्करणीय असे काही नाही. पण त्यांचा देखावा, प्रदर्शन करणे, स्मरण आणि चिंतन करणे, इतरांना बोलावणे हे अशिष्ट आहे, जुगुप्सित, आक्षेपार्ह आहे. त्यात कलानंद तर नसतोच.

पण या भोगाबरोबरच ज्या भावना निर्माण होत असतात त्यांची गोष्ट वेगळी असते. या भावनेचा आनंद काव्याचा व कलेचा विषय होऊ शकतो. या भावनांचे स्वरूप विविध असते, तरीही त्यात आनंदाचे तत्त्व तर त्यातून प्राप्त होणाऱ्या अध्यात्माचा विकासच असतो. यालाच शास्त्रीय परिभाषेत तादात्म्य म्हणतात, सूर्योदयाची किंवा सूर्यास्ताची गंधर्वनगरी पाहताना आपण देहभान विसरून जाऊन त्या दृश्याशी तदाकार, तन्मय आणि तल्लीन होऊन जात असतो. ही तल्लीनता हाच आनंद आहे; यातच कलेचा व काव्याचा आत्मा वसत असतो. काव्याच्या आत्म्याला साहित्यकार रस म्हणतात. मला वाटते 'रस' शब्द सृ–सर वरून आलेला आहे. (वर्णविपर्ययात्) झाडांत रस सरत किंवा झरत असतो. तोंडात रस सुटत असतो. तसेच जेव्हा आपले हृदय विरघळून कोणत्याही आकर्षक वस्तूकडे स्रवत असते, सरत असते, रसत असते तेव्हा रस निर्माण होत असतो असे आपण म्हणतो. असाच व्यक्तित्वाचा विकास होऊ शकत असतो.

हा व्यक्तित्वाचा विकास किंवा तादात्म्य हेच आनंदाचे स्वरूप असते. पण जेव्हा हा आनंद चुकीने इंद्रियांना तृप्ती देण्यासाठी झटत असतो तेव्हा ही रसधारा आत्म्याचा विकास करण्याऐवजी आत्म्याला संकुचित करून टाकत असते, आत्मा आणि अनात्मा यांच्यात घोटाळा करते, आणि शेवटी फजित होऊन आनंद घालवून बसत असते. ही स्वरूपच्युती हेच मोठे अधःपतन आहे. इंद्रियतृप्तीद्वारा जर आत्मविकास होत असता तर तिलाच सर्वोच्च साधना समजले गेले असते; पण असे नाही. इंद्रियसुख हा आनंद मिळण्याचा व्यर्थ प्रयत्न असतो. शेवटी त्याच्या पदरात पडतो थकवा ग्लानी, विषाद व पश्चात्ताप. युरोपच्या संस्कृतीचा आचार्य आणि प्रत्येक प्रकारच्या सुरुचीचा उपभोक्ता गटे (गोएथे) ८० वर्षांचे सुखचैनीचे जीवन उपभोगल्यानंतर शेवटी म्हणतो की "मला असे वाटत नाही की आयुष्यात मी खऱ्या सुखाचे ८–१० दिवस तरी घालविले असतील."

जेव्हा आपले हृदय किंवा आपला आत्मा अन्य व्यक्ती, वस्तू किंवा प्रसंग यांच्याशी तादात्म्य अनुभवतो तेव्हाच संकुचितते चे, भेदभावाचे बंधन तुटण्याचा आपणांस आनंद होत असतो. पण त्यात जर आसक्ती शिरली तर आत्म्याच्या

ठिकाणी अनात्मा प्रवेश करतो व त्याने फार गंभीर गुन्हा होऊन जातो.

अनात्म्याला आत्मा मानणे, जो ईश्वर नाही त्याला ईश्वराबरोबर सामील करणे हा गंभीर गुन्हा आहे; हेच मोठ्यातील मोठे पाप आहे. हे पाप टाळण्यासाठी तादात्म्य आणि तटस्थता यांचे व्याकरण समजावून घ्यावयास पाहिजे. जेथे तटस्थता नसते तेथे अध्यात्म नसते, तेथे सुखदुःखाच्या पलीकडे असणारी दैवी अनुभूती नसते. काव्यानंद, कलानंद आणि गानानंद हे सर्व इंद्रियांच्या द्वारा घेतलेले असूनही इंद्रिय-निरपेक्ष होऊ शकतात. आणि जेवढ्या प्रमाणात ते इंद्रियनिरपेक्ष होतील तेवढ्याच प्रमाणात ते परमानंद बनत असतात, कारण की नंतर ते स्थायी बनतात, पवित्र होतात. या आनंदात दुःख, विषाद, विकृती की पश्चात्ताप यांना अवसर राहत नाही. कलेच्या या शुद्ध आनंदात आसक्ती संभवतच नाही. जेथे तादात्म्य आणि ताटस्थ्य एकाच ठिकाणी आपण शिकू शकतो, अनुभवू शकतो तेथेच आपणास कलानंदाचा लाभ होत असतो. मोक्ष-साधनेत अनासक्तीच्या द्वारा जसा व्यापकातील व्यापक तत्त्व, ज्याला विष्णु अथवा परब्रह्म म्हणतात, त्याचा साक्षात्कार होतो, तसाच ताटस्थ्ययुक्त तादात्म्याच्या द्वारा लोकोत्तर आणि विगलितवेद्यांतर आनंद आपण अनुभवतो. म्हणूनच रसकोविदांनी या कलानंदाला ब्रह्मानंदाचा सहोदर म्हणजे सख्खा भाऊ म्हटले आहे.

थोडेसे विषयांतर करून येथे एवढी आणखी भर घालावीशी वाटते की आध्यात्मिक अनासक्तियोगात पण जीवनापासून फाटाफूट करून, दूर जाऊन सांभाळलेली अनासक्ती ही अनासक्तीच नाही, तो जीवनाचा संकोच आहे. ती जडता पण असू शकते. थडग्यात झोपलेले मुडदे आणि त्याला सुरक्षित झाकून टाकणारे थडग्याचे दगड या दोघांत ताटस्थ्य पुरेपूर व सारखे असते, पण त्याला काही कोणी अध्यात्म की मुक्तावस्था म्हणत नाही. ज्ञान, भक्ती आणि सेवा यांच्या द्वारा जेव्हा तादात्म्य मिळविले जाते, आणि पुरेपूर ताटस्थ्य पण जोपासले जाते, तेव्हाच निर्वाण परमा शांती देणारी अनासक्ती संभवत असते.

—जीवननो आनंद : ५०६

तटस्थ आनंदाचा आस्वाद इतरांच्या बरोबर घेण्याची इच्छा होते त्यामुळे ती सात्त्विक असते. त्या आनंदाचा उपभोग इंद्रियांद्वारा घेतला जातो तरीही तो विषयानंद नसतो. याउलट जो आनंद उपभोगत असता मत्सर, असूया किंवा क्रोध जागा होतो तो आनंद वैषायिक असतो. रतिसुख, खाण्याचा आनंद, त्वचेला होणाऱ्या स्पर्शाचा आनंद हे सर्व वैषयिक आनंदाचे प्रकार आहेत. रसना, त्वचा आणि नासिका ही स्थूल इंद्रिये आहेत. या इंद्रियांच्या द्वारा कलात्मक आनंद घेणे शक्य होत नाही. कलात्मक आनंदाची इंद्रिये दोन आहेत. कलारसिक मन, नेत्र आणि कर्णद्वारा

तो आनंद अनुभवू शकतो. ही दोन इंद्रियेच हृदयाची उन्नती करणारी आहेत आणि म्हणूनच माणसांनी त्यांचा कधीही दुरुपयोग करता उपयोगी नाही.

—जीवननो आनंद : ४९–५०

५. कलेचा आनंद इन्द्रियातीत

कलेच्या उपासकांची दृष्टी यापेक्षा काही वेगळी असते. तेही म्हणतात 'इंद्रियांना विषयसेवनासाठी मोकळीक दिली तर क्षणात ती जीवनाची सर्व सुंदरता बिघडवून टाकायची. विषयसेवनात तात्कालिक सुख असेल, उन्माद पण असेल, पण सुंदरता नसतेच; सुंदरता, काव्य किंवा कला या इंद्रियातीत वस्तू होत. त्यांचा आनंद खरे पाहता इंद्रियनिरपेक्ष असतो. म्हणूनच तो शुद्ध सात्विक असतो. या आनंदाचे सेवन करण्यात इन्द्रियांची मदत घेतली जाऊ शकते एवढेच आपण पाहावयाचे. इंद्रियाच्या सर्वच प्रवृत्ती अधःपाताला मदत करीत असतात असे नाही. हृदयाची विशिष्ट शुद्धी झाल्यावर याच इंद्रियांकडून सौंदर्याचे आकलन करता येते.

एकाच तरुणीकडे जसा पती व पिता वेगवेगळ्या दृष्टीने पाहू शकतात तसेच विषयी मनुष्य आणि कलापूजक एकाच वस्तूकडे दोन भिन्न दृष्टींनी पाहू शकतात. पित्याच्या दृष्टीची निर्मळता दुर्लभ असते हे आम्हाला मान्य आहे. कलारसिकाच्या नावाने ओळखले जाणारे आजचे बरेचसे लोक विलासी असतात हेही खोटे नाही. आपल्या जातीत अशा अयोग्य लोकांची संख्याच वाढलेली आहे हे पण आम्हाला ठाऊक आहे.

—जीवननो आनंद : ४१८–४१९

खऱ्या कलापूजकांना माहीत असते की कलापूजनात सर्वच इंद्रियांची समान पात्रता नसते. स्पर्शेन्द्रिय आणि स्वादेन्द्रिय ही इतकी उन्मादकारी आणि असंयत होत असतात की कलापूजनात त्यांची मदत घेऊच नये. गन्ध हा सुद्धा स्पर्शसुखच आहे, म्हणजे गंधग्राही इन्द्रियाचे पण कलापूजनातील स्थान शंकास्पद असते. बाकी उरली दोन ज्ञानेन्द्रिये : श्रवण आणि नयन. ही दोन्ही इन्द्रिये सूक्ष्म असूनही त्यांची प्रचंड शक्ती अलिप्तपणे काम करू शकते अशी असते. या दोघांची विलासिता सीमित करून त्यांना कलाग्रहणाची दीक्षा देता येऊ शकते, भोगपराङ्मुख करून त्यांना फक्त सौंदर्यपूजक करता येते.

पण कलेचा खरा आनंद शब्दाच्या किंवा रूपाच्या आस्वादात नाही. निर्दोष भावसृष्टी निर्माण करण्यातच कलेला आनंद वाटतो. म्हणजे हाताच्या किंवा कंठाच्या मदतीनेच कलेची उपासना चांगल्यातली चांगली होऊ शकते. गळ्यातून स्वर्गीय संगीत काढण्याचा आनंद हाच कलेचा मुख्य आनंद असतो. पण कान जोपर्यंत ते तपासत नाही, श्रवणद्वारा संगीताच्या अनुरंजक शक्तीचे शेवटी भावना उद्दीपित करण्याचे सामर्थ्य तपासत नाही तोपर्यंत संगीताचा आनंद मिळूच शकणार नाही. संगीताचा अंतिम आनंद तर शेवटी इन्द्रियांच्या पलीकडेच असतो, पण कान व कंठ यांच्या मदतीनेच तो जागृत होऊ शकतो.

—जीवननो आनंद : ४२१

खरे पाहता प्रत्येक इन्द्रियद्वारा कलेचा आनंद मिळू शकतो असे आहे. पण तो ओळखण्याची शक्ती असावयास पाहिजे. काही इन्द्रियांचा संपूर्ण संयम करण्यातच एक असाधारण व निर्विषय आनंद मिळविता येतो. मनुष्यजातीने असा अनुभव फारच थोडा घेतला आहे हे मनुष्यजातीचे दुर्दैव आहे. ज्या माणसाला खुजलीचा-खाजेचा आजार झालेला असतो त्याला खाजवण्याच्या सुखातच आनंद वाटत असतो; पण निरोगी माणसाला तर शुद्ध आरोग्यानंदच अधिक पसंत पडतो. थंडीच्या दिवसांत प्रकृती खूप चांगली असेल आणि पहाटे थंड पाण्याने अंघोळ केलेली असेल तर संपूर्ण शरीराच्या रोमरोमातून जो आनंद स्फुरतो, जो उत्साह ओसंडतो, तो सोडून देऊन आपण खाजवण्याचे सुख पसंत करू का ? ब्रह्मचर्याचा आनंद हा आरोग्यानंदापेक्षा हजार पटींनी अद्‌भुत व उन्नत असतो. त्याचा अनुभव घेणारे जर फार थोडे असतील तर तो काही ब्रह्मचर्याचा दोष नाही.

—जीवननो आनंद : ४२८

पालखीत किंवा मेण्यात बसून फिरण्यातही आनंद असतो आणि समोर सुसाट वारा घोंगावत असताना पर्वतावर चढण्यातही आनंद असतो. आळसातही आनंद मिळत असतो व कामातही (उद्योगात) आनंद वाटत असतो. पण या दोघांपैकी जीवनदायी कोणता आहे व प्राणनाशक, विनाशक कोणता आहे हे नीट पारखूनच त्यांची पसंती करावयाची असते, अशा रीतीने विचार करणारा मनुष्य कला आणि मेहनतीचे काम (मजुरी) यांच्यात विरोध असतोअसे मानत नाही. जीवनरस शोषून टाकणारी विसाव्या शतकातील मेहनतीची कामे ही खरी मजुरी नव्हे. कलेच्या नावाने विलासिता वृद्धिंगत करणाऱ्या धनिक लोकांनीच ही जीवघेणी मजुरी, श्रमप्रधान कार्य निर्माण केले आहे हे आपण क्षणभरसुद्धा विसरू नये. अमेरिकन स्त्रियांच्या हॅट्स चांगल्या सुंदर व सुशोभित बनविण्यासाठी जगात अनेक देशांतील असंख्य पक्षी ठार

मारण्याचा धंदा सुरू झाला. यातून कलेला का पोषण व प्रोत्साहन मिळते? लॉर्ड कर्झनने हिंदुस्थानाचे इतर खूप जरी नुकसान केलेले असले तरी हिंदुस्थानातील मोर किंवा इतर पक्षी याची पिसे परदेशात निर्यात करण्यावर जी बंदी घातली हे त्याने एक चांगलेच कार्य केले आहे. प्रत्येक प्रामाणिक शारीरिक श्रमाच्या— मजुरीच्या कामात, जीवनपोषक कष्टाच्या, अंगमेहनतीच्या, कामात कलेचा शुद्ध आनंद वसत असतो. जी वस्तू निर्माण करीत असताना पदोपदी व क्षणोक्षणी मनाच्या एकाग्रतेची आवश्यकता असते, जी आपणांस सर्जनाचा आनंद देत असते तिच्या ठिकाणी कला वसत असते. जिथे जिथे अवधानाची, सावध चित्ताची व मनाच्या एकाग्रतेची आवश्यकता असते तेथे तेथे कलेला स्थान असते, जी जी क्रिया स्वायत्त असते ती ती क्रिया कलेला अवसर देत असते असा सर्वसामान्य सिद्धांत आपण निर्भयपणे मांडू शकतो.

कलेचा आनंद शांत असतो, स्थायी असतो. ज्यामध्ये विलासिता असते त्यात क्लान्ती, ग्लानी व विषाद नेहमी यावयाचाच. म्हणूनच आपण म्हणत असतो की लालित्य आणि लालसा या दोन परस्पर भिन्न वस्तू असतात.

हे तर प्रत्येक व्यक्तीने मान्य करावयास पाहिजे की सदाचार आणि पराक्रम यांच्यामध्ये जसा विरोध असू नये, तसाच कला आणि सदाचार व पराक्रम यांच्याही-मध्ये विरोध असता कामा नये. कला ही जर खरी वस्तू असेल तर ती जीवनाचे संगीतरूप व्हावयास पाहिजे. जीवनाच्या सर्वच अंगप्रत्यंगांमध्ये जेव्हा संगती (मेळ, सुसंवाद) साधला जाईल तेव्हाच जीवनात संगीत खवू लागेल.

६. कलेचा आदर्श

कलेचा माझा आदर्श असा आहे की त्यात तादात्म्य आणि ताटस्थ्य या दोन परस्पर—विरुद्ध वाटणाऱ्या उत्कट वृत्तींचे संपूर्ण मीलन व्हावयास पाहिजे. अनासक्त कर्मयोगात जो आदर्श अभिप्रेत आहे तोच उच्च कलेत पण आहे. तादात्म्य आणि ताटस्थ्य यांच्या किमयेनेच (अल्केमी) जीवन आणि कला दोन्ही सर्वोच्च कोटीला पोहोचू शकतात. हीच एक सर्व श्रेष्ठ रससिद्धी आहे. ही रससिद्धी ज्या कवीने करून दाखविली त्याला विरक्त राजा भर्तृहरीच्या शब्दांत आपण नमन करू या—

जयन्ति ते सुकृतिनो रससिद्धाः कवीश्वराः ।
नास्ति येषां यशःकाये जरामरणजं भयम् ॥

—जीवनभारती : २८२

७. कलेचे प्रयोजन

'कलेचे प्रयोजन काय' या प्रश्नाची नेहमीच चर्चा चालू असते आणि असाही संभव आहे की अशी चर्चा अनंत काळापर्यंत चालू राहील. '**काव्यं यशसे, अर्थकृते, व्यवहारविदे, शिवेतरक्षतये**' अशी प्रयोजने पूर्वाचार्यांनी वर्णिली आहेत. 'यशसे' आणि 'अर्थकृते' हो दोन प्रयोजने आजसुद्धा प्रभावी आहेत. पूर्वीपेक्षा आज ही प्रयोजने अधिक सिद्ध पण होत असावीत. विख्यात कलावंत पाहता पाहता लक्षाधीश होऊ शकत आहेत. त्यांना विविध प्रकारचे किताब, मानमरातब मिळत आहेत. त्यांची सामाजिक प्रतिष्ठा राजदरबारात तशीच विद्वन्मंडळात अमर्याद वाढत चालली आहे; असे असूनही काव्याचा किंवा कलेचा उद्देश धन आणि कीर्ती मिळविणे हा आहे हे आजच्या काळातील मनुष्य कबूल करीत नाही. खरी गोष्ट स्वीकारणे हे साध्या भोळ्या, निष्कपट युगाचे लक्षण असते. जुने लोक असे मानत असत की व्याकरण किंवा संगीत शिकल्याने मोक्ष मिळू शकतो. हल्लीचे लोक म्हणतात की 'जीवनाच्या सर्व समस्यांचे रहस्य ओळखण्याची शक्ती आणि जीवनाच्या सर्व बाजूंचा विकास करण्याचे सामर्थ्य कलेत असते, साहित्य आणि संगीतात असते. कला हे स्वतंत्र, स्वयंभू, अन्यनिरपेक्ष जीवनदर्शन आहे.' ज्याला जुने लोक मोक्षाचे साधन म्हणत असत त्याला आजचे लोक आत्मानुभवाचे साधन म्हणतात एवढाच फरक आहे.

कलेची आजची प्रयोजने खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. Art for art's sake—कलेकरिता कला.

२. Art for life's sake – जीवनाकरिता कला.

३. Art as an escape from life : जीवनाच्या वास्तविकतेपासून सुटका या अर्थी कला.

४. Art as an escape into lite : नीरस व्यवहारांतून निसटून जाऊन जीवनानंदात प्रवेश करण्याचे साधन याअर्थी कला.

५. Art for service : सेवेचे साधन याअर्थी कला.

६. Art for self-realization : आत्मानुभूतीचे साधन याअर्थी कला.
७. Art for joy : निरतिशय समाधानासाठी, आनंदासाठी कला.
८. Art as recreation : मनोरंजन, करमणूक या अर्थी कला.
९. Art as creative necessity : सिसृक्षेच्या (सर्जनेच्छेच्या) अदम्य वृत्तीच्या तृप्तीच्या अर्थी कला.

ज्याने 'व्यवहारविदे' असा आदर्श म्हणून दाखविलेला आहे त्याच्या मनात काय असेल ते आपणास माहीत नाही. काव्य, नाटक, शास्त्र, पुराण वगैरेंच्या परिशीलनापासून व्यवहार समजू शकतो, चातुर्य शिकता येते, कौशल्य वाढते, एवढाच याचा अर्थ नाही. चर्मचक्षूंनी आणि जडबुद्धीने बाजाराचा व्यवहार चालत असेल, विज्ञानाचे सामान्य प्रयोग केले जात असतील, पण विज्ञानाचे काय आणि जीवनाचे काय, परम रहस्य समजण्यासाठी आणि आदर्श व्यवहार–कुशलता प्राप्त करण्यासाठी कलामय दृष्टी, याची अलौकिक समज, प्रतिभायुक्त समज, आणि वस्तू आणि प्रसंग यांच्या हार्दापर्यंत पोहोचण्याची भेदकता, काव्य शक्ती द्वाराच–कलामय वृत्तीद्वाराच प्राप्त होऊ शकते. कलेची दृष्टी ज्याच्यापाशी नाही तो जगाचे रहस्य काय समजणार? त्याच्या व्यवहारात कोणता कस यावयाचा? 'व्यवहारविदे' म्हणजे For the proper conception and realization of the function and fulness of life. (जीवनाचे कार्य व पूर्णत्व यांच्या यथार्थ समजासाठी व साक्षात्कारासाठी).

—जीवननो आनंद : ५१४–५१५

आजचे लोक साध्यातली साधी गोष्टसुद्धा अतिशय गौरवान्वित भाषेत मांडतात, तर जुने लोक भारीतले भारी म्हणजे अत्यंत उच्च दर्जाचेही सिद्धांतदर्शन पण साध्यातल्या साध्या घरगुती शब्दांत मांडत असत. म्हणूनच कवीने म्हटले– '**काव्यं लोक व्यवहार विदे**' त्याने म्हणायला हवे होते '**काव्यं लोकव्यवहार उद्दीपनार्थम्**' व्यवहार म्हणजे व्यवहाराचे रहस्यदर्शन, आणि या दर्शनाचे दैवीकरण, एवढी आपण भर घालायला पाहिजे.

ज्यांना असे वाटते की कला ही जीवनाच्या नीरस वस्तुस्थितीतून वाचण्यासाठी आहे त्यांना जीवनाचा अति कटू अनुभव तर आलाच असेल. पण त्याहून अधिक म्हणजे त्यांचा जीवनात पराभव झालेला असला पाहिजे. दुःख, दारिद्र्य, अन्याय आणि चिंताग्रस्तता यांमुळे माणूस कंटाळतो, चिडखोर बनतो, पण जीवनाकडून हार खात नाही. जीवनाचे स्वरूपच असे असते की त्याच्या प्रत्येक बाजूमधून पराक्रमाची प्रेरणा मिळत असते, रसाचे निर्झर फुटत असतात. पण जेव्हा मनुष्य विषयांचे आकंठ सेवन करीत असतो आणि अर्थविहीन, नीरस व आळशी जीवन घालवीत असतो तेव्हा जीवन अपमानित होत असते. मग माणसाला कोठेही चैन पडत नाही. जे हवे

असते त्याची इच्छा करताच त्याच्या हाती येतेच असे जर होत असले तर माणसाला जगणे पण ओझे वाटू लागते. इच्छातृप्ती व प्रतिष्ठा जीवनाचे सर्व औत्सुक्य मारून टाकत असते, आणि शेवटी उरतात क्लेशच क्लेश, असे कालिदासाचा दुष्यन्त सांगतो ते सर्वथा सत्य आहे. अशा लोकांना scae form lite जीवनातून पळवाट पाहिजे असते, आणि ते अशी पळवाट, सुटका कलेमध्ये शोधत असतात.

पण त्यांना हवी असणारी ती सुटका अशा पलायनापासून मिळते की नाही या-विषयी त्यांनी काही लिहिलेले नाही. ऐदीपणाने खावे प्यावे, नोकरांना पळवावे, आणि संपूर्ण वेळ साहित्य वाचावे, संगीत ऐकावे, नाटकसिनेमा पाहावे आणि सभांच्या शोभेत वृद्धी करावी, एवढेच ज्यांचे जीवन असते त्यांच्यासाठी कलेची धारही बोथट होऊन जाते, त्यांना कशातच रस, गोडी वाटत नाही. असे लोक जेव्हा संस्कारी काळजी दाखवितात, गंभीरपणे निःश्वास सोडतात, तेव्हा अशा लोकांची कीव करण्यातही त्रास वाटतो. त्यांच्या जीवनासमोर एक आंधळी व भयाण भिंतच उभी राहते. जीवनामधून कातडी बचावून कलेत उतरले पण तेथेही कंटाळा व अरुची त्यांची पाठ सोडत नाही. आता पळून जाणार तरी कोठे ? खरे पाहता अशा लोकांनी जीवनद्रोह सोडून देऊन खऱ्या जीवनात प्रवेश करावयास पाहिजे. खरी कला त्यांना यात मदतीची होईल. अशा नाजूक लोकांनी साधनही नाजूकच योजायला पाहिजे. संगीत ऐकण्याऐवजी जर ते स्वतः गायला किंवा वाद्ये वाजवायला शिकतील, नृत्य पाहण्यापेक्षा स्वतःच नृत्य शिकतील, मोठमोठी तिकिटे विकत घेऊन कलाप्रदर्शने पाहायला जाण्याऐवजी स्वतःच चित्रे चितारू लागतील, आणि सुंदर बांधणीची पुस्तके मांडीवर ठेवून विषण्णतेचे निःश्वास सोडण्याऐवजी स्वतःचे खरेखुरे अनुभव शब्दबद्ध करण्यासाठी प्रयत्न करतील तर कला त्यांच्यासाठी Escape into life जीवनानंदात प्रवेश करण्याचे साधन बनेल. जे जीवनद्रोही असतात त्यांना कला कोणत्या रीतीने वाचवू शकणार ?

खरी कला जसा आत्म्याचा विकास साधते तशीच भूतदयेने व करुणेने प्रेरित होऊन केलेली समाजसेवाही माणसाला आत्मविश्वास साध्य करून देत असते. कला व सेवा यांचे साहचर्य जर साधले तर दोघांचाही उत्तरोत्तर विकास होत राहीलच. आपल्या लोकांनी सर्व कलांना भक्तीचा साधन म्हणून उपयोग करून त्यांना सेवापरायण करून टाकले. भोगविलासांना पण मंदिराशी जोडून त्यांची नश्वता झाकण्याचा जुन्या लोकांनी प्रयत्न केला आहे, कलांचा तर सामाजिक धर्माची व व्यक्तिगत साधनेची महत्त्वाची अंगे म्हणून स्वीकार केलेला आहे,

एकट्या कलेच्या साधनेने कोणाला आत्मसाक्षात्कार झालेला आहे असे मानणे कठीण आहे. पण साधनेची पूर्वतयारी म्हणून शुद्ध कलेची उपयुक्तता पुष्कळ असते हे कोणी नाकारणार नाही. कलेत विनोद तर असतोच, पण तो त्याचा वरचा दर्शनी

भाग असतो. विनोदाला कोणी कलेचे अंतिम प्रयोजन मानणार नाही. Art as creative necessity (कला ही सर्जक आवश्यकता असते) म्हणजे प्रत्येक माणसाच्या ठिकाणी 'एकोऽहं बहुस्याम्' ची जी अदम्य वृत्ती असते तिची तृप्ती करण्यासाठी मनुष्य जेव्हा हृदयाच्या गूढ आणि उत्कट भावांना व्यक्तरूप देण्यासाठी प्रेरणा देत असतो तेव्हा त्याच्या मनात जे प्रयोजन (हेतू) असते त्याची अधिक मीमांसा होणे आवश्यक आहे.

—जीवननो आनंद : ५१६–१७

जसे कित्येक लोक स्वातंत्र्यप्राप्तीसाठी किंवा समाजसेवेसाठी ब्रह्मचर्यजीवन पसंत करतात, तसेच काही कलाकार आपल्या कलेलाच वरून आपला सर्व वेळ, सर्व लक्ष आणि सर्व शक्ती या कलेच्याच सेवेसाठी अर्पण करून देत असतात. कलेच्या सेवेपेक्षा वेगळे असे कोणत्याही प्रकारचे जीवन त्यांना नको असते. माणसात वीर्य असते ते या ना त्या पुरुषार्थात प्रकट होणारच. कित्येक लोकांना आपल्या सर्व शक्तीचे रूपांतर कलेच्या अभिव्यक्तीतच करण्याची अभिलाषा वाटत असते. त्यांच्या साठी कलेची उपासना ही पसंती-नापसंतीचा विषयच राहात नाही. तारे जर चमकणे सोडून देऊ शकतील, कमळ जर हसण्याचे सोडून देऊ शकेल, तरच असे कलावंत स्वतःच्या जीवनाच्या कलाप्रवाहाला अडवू शकतील, रोखू शकतील. एक मुलगा रस्त्याने जात असता स्वतःच्या धुंदीतच तोंडाने शीळ वाजवीत होता. पोलिसाने त्याला अडवून म्हटले– 'अरे ए, शिटी का वाजवतो आहेस?' त्या मुलाने आश्चर्याने त्या शांतिरक्षकाकडे पाहून म्हटले, 'कोण मी? मी कोठे शिटी वाजवतो आहे? ती तर स्वतःच सहज वाजते आहे.' या प्रकारच्या कलेला आपण 'अपौरुषेय' म्हटले तर त्यात हरकत कोणती? यालाच जर Art for art's sake म्हटले तर कोणाची हरकत असणार नाही. जेव्हा विलासासाठी कलेचे सेवन होते आणि याच उद्देशाने गोंडस नाव देऊन, सदाचाराचा द्रोह करून Art for art's sake (कलेकरिता कला) चे सूत्र पुढे केले जाते तेव्हाच हरकत उभी राहते. Art for art's sake (कलेकरिता कला) ही खरे पाहता Art for market's sake (विक्रीकरिता कला, बाजाराकरिता कला), Art for vulgarity's sake (सवंगतेकरिता कला), Art for dissipation 's sake (दुराचरणासाठी कला) पुष्कळ वेळा होऊन बसते. म्हणूनच या सूत्राला विरोध करावा लागत आहे.

—जीवननो आनंद : ५१७

आजच्या जाहिरातबाजीच्या काळांत कित्येक उदात्त ललित वस्तूंना स्वस्त, विकृत आणि किळसवाण्या होण्याचा धोका निर्माण झाला आहे. समाजनेते लोकजागृतीच्या

कार्यात जी प्रचलित बोलीभाषा वापरतात, तीच चार सहा महिन्यांच्या काळात जाहीर बातम्यांत प्रसिद्ध होऊ लागून लोकांपर्यंत पोहोचते, आणि आपल्या कृतीचे विडंबन अथवा भ्रष्टीकरण झालेले पाहून माणसाला लाजेने खाली मान घालण्याची पाळी येते. 'फ्रूट सॉल्ट' औषधासाठी शेक्सपिअरच्या वचनांचा उपयोग केला जातो तसेच आपल्याकडेही होऊ लागले आहे. याच्यावरील इलाज सरकारच्या हाती नाही तसा लेखकाच्याही हाती नाही. संपूर्ण समाजानेच पवित्र वस्तूचा केला जाणारा अपवित्र उपयोग थांबविण्यासाठी खटपट करायला हवी.

एवढे तर स्पष्ट आहे की जोपर्यंत व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात संस्कारिता, संयम आणि आर्यता अथवा सौजन्य येत नाही तोपर्यंत सर्व ज्ञान, सत्ता आणि कला यांना धोका संभवतोच. कलेची शुद्धी जोपासण्यासाठी सुद्धा कलावंतांना जीवनशुद्धीचा, स्वच्छतेचा आग्रह धरावा लागेल. जीवनशुद्धीच्या गोष्टी करून जीवनापासून दूर पळून जाणारे वैराग्य मी सुचवीत नाही, पण ज्यातून उथळपणा, छचोरपणा निघून जाऊन जीवन समृद्ध होत असते, अर्थपूर्ण व वीर्यवान होत असते अशा जीवनाविषयी मी सांगतो, आणि असे झाले तर Escape from life (जीवनापासून पलायन) ची गोष्ट कोणी करणार नाही, मग तर 'Art of life (जीवनाची कला), 'Art through life' (जीवनातून कला), 'Art out of life' (जीवनामधून कला) अशाच गोष्टी समजूतदारपणे, विचारपूर्वकपणे होऊ लागतील. मग सध्याची निरर्थक भांडणे चालवावी लागणार नाहीत.

Art for art's sake–कलेकरिता कला किंवा केवळ कलेचा आदर्श मी समजू शकतो, आणि ज्या अर्थाने मी समजतो त्या अर्थात त्याच्याविषयी माझा समभावही आहे. जीवन ज्याप्रमाणे निष्काम वृत्तीनेच कृतार्थ होत असते तशीच कलेमधून जर आपण बाजारी वृत्ती, धनाची की कीर्तीची लालसा, काढून टाकली, उपदेशकाचा असंस्कारी दंभ दूर केला, कलेला धर्मोपदेशक, धर्माचार्य, राजपुरुष आणि कारखानदार यांच्या हातात जाऊ न दिली, आणि कला स्वतःच स्वतःची काळजी घेऊन स्वतःची जोपासना करू शकते असे म्हणू लागलो तर ते Art for art's sake (कलेकरिता कला) झाले असे समजता येईल. कलेच्या द्वारा धर्माच्या सूक्ष्म वृत्ती समजू शकतात व विकसित करता येतात. कलेच्या द्वारा समाजव्यवस्थेत सहकार, समाधान, सामर्थ्य, समृद्धी आणि सुसंगतीचे संगीत प्रस्थापित करता येते. एवढे मिशन जर आपण कलेसाठी स्वीकारू, आणि तिचे आवाहन (अपील) सार्वभौम करू तर मग Art for art's sake– कलेकरिता कला म्हणण्यास हरकत येऊ नये. कलेपेक्षा कमी प्रतीचा आदर्श कलाविकासात नसावा एवढाच जर त्याचा अर्थ होत असेल तर Art for art's sake– कलेकरिता कला असे म्हणावयास मी तयार आहे. पण जर कोणी म्हणत असेल की 'आम्ही कलारसिक आहोत, कलाधर

(कलाकार) असण्याचा दावा करतो, कलेच्या नावाने लोकांना आकर्षित करून घेऊ शकतो व बनवू व फसवू शकतो, म्हणून आमच्या वागण्यावर किंवा सर्जनावर सदाचार, धर्म, शिष्टसंकेत, कायदा किंवा लोकरूढी कशाचेही बंधन असता कामा नये' तर नम्रतेने त्याला असे सांगावे लागेल की तुमच्या संपर्काने समाज सुरक्षित नाहीच, पण कलाही सुरक्षित नाही हे आम्हाला कळते. जो पक्ष यशस्वी होऊन जातो तोच सत्पक्ष होय असे अद्याप सिद्ध झाले नाही, आणि यशस्वी होण्यातही जे शेवटी यशस्वी होते तेच यशस्वी होय असे समजावे. आदर्श कलेतून जो सर्वोच्च आनंद माणसाला मिळतो, तोच त्याचा अंतिम हेतू असल्यानेही 'कलेसाठी कला' म्हणता येईल. सर्वोच्च आनंदाचा ज्याला स्वाद चाखायला मिळाला, त्याला सदाचार, स्वाभाविक अथवा सहज बनत असतो. अशा वेळी आपण म्हणू शकतो की कलेचे मुख्य प्रयोजन तर 'ब्रह्मानंद सहोदर' असा कलानंद असतो. सदाचार आणि सामाजिक सामर्थ्य ही त्याची अयुतसिद्ध उपप्राप्ती (by products) असते. या अर्थाने जर कोणी 'कलेकरिता कला' च्या सूत्राचा वापर करणार असेल तर आपली हरकत नाही. तक्रार ही सूत्राविषयी (formula) नाही. परिणाम पाहून परीक्षा करू.

—जीवननो आनंद : ५१८–५१९

शुद्ध कलेद्वारा आपणास जीवनाचे सर्वच रस मिळत राहिले तर जीवन अवनत होण्याची भीती राहणार नाही. रसाच्या नावाखाली जेव्हा आपण दुसऱ्याच गोष्टी शोधू लागतो तेव्हाच सर्व काही बिघडते. खरे रस किती व कसे असतात याची शुद्ध मीमांसा जर करता आली तर कलेत सदाचार जोपासता येईल की नाही याची चिंता करावी लागणार नाही. जुन्या लोकांनी रस आठ, नऊ, दहा मानले आहेत. आपणास या नवरसांची मीमांसा करावयास पाहिजे.

—जीवननो आनंद : ५१९

८. कलेचे विज्ञान

जुन्या काळात विज्ञान आणि कला यांच्यात विरोध कल्पिला जात होता. विज्ञानाचा जितका विकास अधिक होईल तितके कलेचे क्षेत्र संकुचित व्हायचे. विज्ञानसूर्य उगवला की कलेचे चांदणे निस्तेज व्हायचेच, असे मानले जायचे.

कलेचे क्षेत्र वृद्धिंगत करण्यास विज्ञानाकडून झालेली मदत लहानसहान नाही, आणि कलेच्या कल्पनाशक्तीच्या मार्फतच विज्ञान वाढू शकते असे पण आता आढळून आले आहे. 'फक्त वैज्ञानिक' विज्ञान शिकवू शकतात, विज्ञानाची पाठ्यपुस्तके रचू शकतात; पण विज्ञानात शोध संशोधन करणारे, ज्ञानाकाशात उंच उंच भराऱ्या घेणारे, पूर्वी कधीही जेथे पोहोचले नव्हते अशा उंचीवर विहार करून येणारे वैज्ञानिक असाधारण कलावंत असले पाहिजेत, हे आता सर्वांना मान्य होत आहे. विज्ञानाचा उपयोग करून मानवजातीच्या सुखकारीत आणि आनंदोपभोगाच्या शक्तीत वाढ करणारे विनियोजक हेसुद्धा कलाकार असलेच पाहिजेत.

आता प्रश्न असा उभा राहिला आहे की कलेसारखी नाजूक गोष्ट शास्त्राची अस्त्रे, शास्त्राच्या भट्ट्या व विज्ञानाचे तेजाब सहन करू शकेल अशी आहे का? तर्काच्या तेजकिरणासमोरही जी कला टिकू शकत नाही ती विज्ञानाच्या जीवघेण्या जुलमापुढे कशी निभावू शकेल?

या प्रश्नामध्ये विज्ञान व कला या दोघांविषयी अश्रद्धा आहे. विज्ञानाच्या कुशलतेची सीमा अजून गाठली गेली नाही. नाजुकांतल्या नाजूक (सूक्ष्म) वस्तूवर पण विज्ञान स्वतःचे प्रयोग करून पाहू शकते, आणि कला अबला समजली जाऊनही कमी शक्तिरूपिणी नाही. कलेचे विज्ञान; कलेचे शास्त्र अवश्य होऊ शकते; पण खरा प्रश्न असा आहे की कलेचे विज्ञान करण्याची आवश्यकता आहे का, कितपत आहे? बाह्य वस्तूला जितकी विज्ञानाची आवश्यकता असते तितकी आंतरिक गोष्टींना नसूही शकेल. माणसाचे मन, त्याच्या भावना, इच्छा, त्याचे प्रेम, त्याच्या आकांक्षा व त्याचे समाधान– या सर्वांचे शास्त्र होऊ शकते. अशी शास्त्रे बनलेली पण आहेत.

त्यांची उपयुक्तता सिद्धही झालेली आहे. असे असूनही मला तर वाटते की कलेचे विज्ञान तयार करण्याची काही विशेष आवश्यकता नाही. कला ही सर्वोपरी–सर्वांच्यावरची, पलीकडची गोष्ट आहे. तिच्या प्रकाशाने सर्व विज्ञाने प्रकाशित व्हावी अशी आपली इच्छा आहे. कलेचे विज्ञान रचायला जाऊन कलेला संकुचित करू नये. आपण जीवनाचे शास्त्र बनविण्यासाठी जेव्हा जेव्हा प्रयत्न केले तेव्हा तेव्हा आपण अशीच स्थिती होतांना पाहिली आहे. शास्त्र (विज्ञान) मात्र एकांगी असते. जीवन आणि कला यांची सर्वांगपरिपूर्ण होण्याची योग्यता असते. त्यांना अश्वमेधाच्या घोड्याप्रमाणे स्वैरपणे संचार करायला द्यावे हेच चांगले. कला जोपर्यंत जीवन आणि जीवनस्वामी अंतरात्म्याला बेजबाबदार ठरत नाही तोपर्यंत तिला शास्त्राच्या बंधनात अडकवू नये. तिला आपले स्वतःचेच तंत्र विकसित करू द्यावे.

—जीवननो आनंद : ५१२–५१३

(कलाकार) असण्याचा दावा करतो, कलेच्या नावाने लोकांना आकर्षित करून घेऊ शकतो व बनवू व फसवू शकतो, म्हणून आमच्या वागण्यावर किंवा सर्जनावर सदाचार, धर्म, शिष्टसंकेत, कायदा किंवा लोकरूढी कशाचेही बंधन असता कामा नये' तर नम्रतेने त्याला असे सांगावे लागेल की तुमच्या संपर्काने समाज सुरक्षित नाहीच, पण कलाही सुरक्षित नाही हे आम्हाला कळते. जो पक्ष यशस्वी होऊन जातो तोच सत्पक्ष होय असे अद्याप सिद्ध झाले नाही, आणि यशस्वी होण्यातही जे शेवटी यशस्वी होते तेच यशस्वी होय असे समजावे. आदर्श कलेतून जो सर्वोच्च आनंद माणसाला मिळतो, तोच त्याचा अंतिम हेतू असल्यानेही 'कलेसाठी कला' म्हणता येईल. सर्वोच्च आनंदाचा ज्याला स्वाद चाखायला मिळाला, त्याला सदाचार, स्वाभाविक अथवा सहज बनत असतो. अशा वेळी आपण म्हणू शकतो की कलेचे मुख्य प्रयोजन तर 'ब्रह्मानंद सहोदर' असा कलानंद असतो. सदाचार आणि सामाजिक सामर्थ्य ही त्याची अयुतसिद्ध उपप्राप्ती (by products) असते. या अर्थाने जर कोणी 'कलेकरिता कला' च्या सूत्राचा वापर करणार असेल तर आपली हरकत नाही. तक्रार ही सूत्राविषयी (formula) नाही. परिणाम पाहून परीक्षा करू.

—जीवननो आनंद : ५१८–५१९

शुद्ध कलेद्वारा आपणास जीवनाचे सर्वच रस मिळत राहिले तर जीवन अवनत होण्याची भीती राहणार नाही. रसाच्या नावाखाली जेव्हा आपण दुसऱ्याच गोष्टी शोधू लागतो तेव्हाच सर्व काही बिघडते. खरे रस किती व कसे असतात याची शुद्ध मीमांसा जर करता आली तर कलेत सदाचार जोपासता येईल की नाही याची चिंता करावी लागणार नाही. जुन्या लोकांनी रस आठ, नऊ, दहा मानले आहेत. आपणास या नवरसांची मीमांसा करावयास पाहिजे.

—जीवननो आनंद : ५१९

८. कलेचे विज्ञान

जुन्या काळात विज्ञान आणि कला यांच्यात विरोध कल्पिला जात होता. विज्ञानाचा जितका विकास अधिक होईल तितके कलेचे क्षेत्र संकुचित व्हायचे. विज्ञानसूर्य उगवला की कलेचे चांदणे निस्तेज व्हायचेच, असे मानले जायचे.

कलेचे क्षेत्र वृद्धिंगत करण्यास विज्ञानाकडून झालेली मदत लहानसहान नाही, आणि कलेच्या कल्पनाशक्तीच्या मार्फतच विज्ञान वाढू शकते असे पण आता आढळून आले आहे. 'फक्त वैज्ञानिक' विज्ञान शिकवू शकतात, विज्ञानाची पाठ्यपुस्तके रचू शकतात; पण विज्ञानात शोध संशोधन करणारे, ज्ञानाकाशात उंच उंच भराऱ्या घेणारे, पूर्वी कधीही जेथे पोहोचले नव्हते अशा उंचीवर विहार करून येणारे वैज्ञानिक असाधारण कलावंत असले पाहिजेत, हे आता सर्वांना मान्य होत आहे. विज्ञानाचा उपयोग करून मानवजातीच्या सुखकारीत आणि आनंदोपभोगाच्या शक्तीत वाढ करणारे विनियोजक हेसुद्धा कलाकार असलेच पाहिजेत.

आता प्रश्न असा उभा राहिला आहे की कलेसारखी नाजूक गोष्ट शास्त्राची अस्त्रे, शास्त्राच्या भट्ट्या व विज्ञानाचे तेजाब सहन करू शकेल अशी आहे का? तर्काच्या तेजकिरणासमोरही जी कला टिकू शकत नाही ती विज्ञानाच्या जीवघेण्या जुल्मापुढे कशी निभावू शकेल?

या प्रश्नामध्ये विज्ञान व कला या दोघांविषयी अश्रद्धा आहे. विज्ञानाच्या कुशलतेची सीमा अजून गाठली गेली नाही. नाजुकांतल्या नाजूक (सूक्ष्म) वस्तूवर पण विज्ञान स्वतःचे प्रयोग करून पाहू शकते, आणि कला अबला समजली जाऊनही कमी शक्तिरूपिणी नाही. कलेचे विज्ञान; कलेचे शास्त्र अवश्य होऊ शकते; पण खरा प्रश्न असा आहे की कलेचे विज्ञान करण्याची आवश्यकता आहे का, कितपत आहे? बाह्य वस्तूला जितकी विज्ञानाची आवश्यकता असते तितकी आंतरिक गोष्टींना नसूही शकेल. माणसाचे मन, त्याच्या भावना, इच्छा, त्याचे प्रेम, त्याच्या आकांक्षा व त्याचे समाधान– या सर्वांचे शास्त्र होऊ शकते. अशी शास्त्रे बनलेली पण आहेत.

त्यांची उपयुक्तता सिद्धही झालेली आहे. असे असूनही मला तर वाटते की कलेचे विज्ञान तयार करण्याची काही विशेष आवश्यकता नाही. कला ही सर्वोपरी–सर्वांच्यावरची, पलीकडची गोष्ट आहे. तिच्या प्रकाशाने सर्व विज्ञाने प्रकाशित व्हावी अशी आपली इच्छा आहे. कलेचे विज्ञान रचायला जाऊन कलेला संकुचित करू नये. आपण जीवनाचे शास्त्र बनविण्यासाठी जेव्हा जेव्हा प्रयत्न केले तेव्हा तेव्हा आपण अशीच स्थिती होतांना पाहिली आहे. शास्त्र (विज्ञान) मात्र एकांगी असते. जीवन आणि कला यांची सर्वांगपरिपूर्ण होण्याची योग्यता असते. त्यांना अश्वमेधाच्या घोड्याप्रमाणे स्वैरपणे संचार करायला द्यावे हेच चांगले. कला जोपर्यंत जीवन आणि जीवनस्वामी अंतरात्म्याला बेजबाबदार ठरत नाही तोपर्यंत तिला शास्त्राच्या बंधनात अडकवू नये. तिला आपले स्वतःचेच तंत्र विकसित करू द्यावे.

—जीवननो आनंद : ५१२–५१३

९. निसर्गाची कलादीक्षा

एक मत असे आहे की कला ही मनुष्यकृत वस्तूंतच असू शकते. पशुपक्षी, जीव जीवाणू, झाडपान, फळफूल, शंख आणि मासे, ढग, बीज आणि तारका, या सर्वांत सौंदर्य असते, पण त्यांत कला नाही; हे एका अर्थाने खरे आहे. माणसाच्या मनात सौंदर्यभावना जन्म घेते आणि ती पार्थिव वस्तूंच्या द्वारा प्रकट होण्यासाठी प्रयत्न करते तेव्हाच कला संभवते. मनुष्यकल्पनेच्या प्रसूतिवेदनांमधून कलेचा जन्म होत असतो. तरी या विचाराला चिकटून राहिल्याने संकुचितता व एकांगीपणा येतो. मनुष्य निर्माण करतो ते काव्य, आणि सर्व लोकमहेश्वर जे निर्माण करून आपल्या आनंदासाठी आपल्यासमोर ठेवतो ते काव्य नाही असा फरक करणे ठीक का आहे? निसर्गाला यांत्रिक व भावशून्य का कल्पावे? आपण, आपल्या कल्पना, आपली उड्डयने व आपली अवगाहने, आपला विवाद आणि भावावेश ही सर्वच निसर्गाची अपत्ये आहेत.

आपण निसर्गाचे अंश आहोत, प्रकृतिमाता परिपूर्ण आहे. आपल्यापेक्षा प्रकृतिमातेची शक्ती व महती (विभूती) कमी असू शकत नाही. खवळलेल्या सागराच्या किनाऱ्यावर बसल्यावर किंवा त्याच्या वक्षःस्थळावर विहार करतानां त्याचे ध्यान कधी केले आहे का? समुद्र हे महाभारतासारखे महाकाव्य आहे. त्याच्या हृदयात सर्व भावना उसळत असतात. त्याची आशीर्वादरूप शांती आणि त्याचा रुद्रावतार, त्याचे अट्टहास्य आणि त्याचे भीषण क्रंदन, त्याच्या वर्णच्छटा आणि त्याचे गांभीर्य, त्याची प्रसन्नता आणि त्याची गूढता–सर्वच सत्य असते, सर्वच भावपूर्ण असते. महासागराची वादळे आणि शांती, मैलांगणिक पसरलेले त्याचे भोवरे आणि एका खंडापासून दुसऱ्या खंडापर्यंत धावणारे जलप्रवाह हे मानव–इतिहासापेक्षा कमी भव्य नसतात. रामेश्वरला जाऊन जमिनीच्या छोट्याशा पट्टीवर उभा राहून रत्नाकर आणि महोदधी यांचा संगम पाहताना एकच भाव निर्माण झाला आणि तेथून जाफनाला जाताना भारतवर्षाला श्रीलंकेशी जोडणाऱ्या सेतूचे काव्य पाहून पण वाल्मीकीचे हृदय क्षणात प्रत्यक्ष बनले.

आणि कोट्यवधी भारतीयांना स्तन्यपान करणाऱ्या गंगामाईकडे कलावंताच्या दृष्टीतून पाहाल तर ती देवी आहे, भारतमाता आहे, याविषयी शंका सुद्धा वाटणार नाही.

हे सर्व पाहण्यासाठी काहीशी भ्रमंती करावी लागते; पण परमपितामहासारखे आकाश तर आपण जेथे असू तेथे आपल्या डोक्यावर असतेच. आकाशाला दिवसा पाहा आणि रात्री पाहा, सकाळी पाहा आणि सायंकाळी पाहा, उन्हाळ्यात भर दुपारी भोवऱ्याच्या खांबाभर आधार ठेवून हे पसरलेले असते तेव्हा पाहा अथवा महासमु-

द्राला आपल्या बाहूंमध्ये घेऊन त्याला आलिंगन देऊ शकेल एवढा विस्तार पहा. त्याच्या वृत्तींची विविधता आणि त्याची भव्यता केवढी तरी परिणामकारक असते ? चातुर्मासात हिमालयासारख्या प्रचंड ढगांचा तांडा आकाशात इतस्ततः स्वैरपणाने भटकंती करीत असावा, आणि त्यातच बालकांसारखे पक्षी इकडे तिकडे हुंदडत असावेत तेव्हा विराटदर्शन आणि ललितभाव यांचे भीषण मृदुल संगीत ऐकायला मिळत असते. सूर्योदयाच्या वेळी ढग जमतात तेव्हा काही काही वेळा पडद्यामागे पडदा आणि त्याच्यामागे अनेक पडदे--अशा वैभवाने झाकलेला, त्यांच्यामागे लपलेला कोणी एखादा चक्रवर्ती सम्राट दरबारात विराजमान होतो आहे असे दृश्य दिसते. आणि मग कलावंताच्या तोंडून उच्चारले जाते–

प्राणः प्रजानां उदयत्येषः सूर्यः ।

आणि त्या सौर ऋषीने गायिले–

ध्येयः सदा सवितृमंडल-मध्यवर्ती
नारायणः सरसिजासन संनिविष्टः ।
केयूरवान् मकरकुंडलवान् किरीटी
हारी हिरण्मयवपुर्धृतशंखचक्रः ॥

विविध देशांच्या पुराणकारांनी तारांचे काव्य अनुभवले आहे व वर्णिलेले आहे. वैदिक ऋषी जेव्हा देवांच्या काव्याविषयी बोलत तेव्हा त्यांच्या दृष्टीसमोर आकाशातील ज्योतीच होत्या असे मला वाटते. पण सध्या ज्योतिःशास्त्रात जे नवे नवे शोध लागत आहेत त्यांच्यासमोर सारे जुने काव्य फिके वाटू लागते. एका ज्योतिष्याने आता जाहीर केले आहे की पृथ्वीचा वेडा किंकर चंद्रमा पृथ्वीच्या आसपास आदराने फिरता फिरता थोडा थोडा जवळ येत चालला आहे. असा चालता चालता जेव्हा तो मर्यादेच्या जवळ येऊन पोहोचेल तेव्हा त्याचे तुकडे होऊन जाणार आहेत. दोन, चार, पाच की शेदोनशे एवढेच तुकडे होतील असे नाही, तर त्याचा चक्काचूर होऊन जाणार आहे. त्या चुऱ्यापासून एक मोठे सुवर्णकंकणासारखे वर्तुळ तयार होईल आणि जसे शनीचे वलय आपणास दुर्बिणीतून पहावयास मिळते तसेच आपल्या पृथ्वीच्या जवळपास एक वलय फिरताना दिसेल. आकाशाच्या मधोमध पण थोडे तिरके कडे जेव्हा पसरेल आणि सूर्याच्या प्रकाशाने ते रात्री पूर्ण किंवा अंशतः चमकू लागेल तेव्हा ती आतषबाजी कशी असेल ! हे होण्यास फार दीर्घकाल लागणार नाही. दहा वीस लाख वर्षे त्याला पुरे होतील. कल्पनेला धावायला हा काळ फार दीर्घ समजण्याची जरूर नाही. खरोखर हल्लीच्या ज्योतिषात काव्य आणि सौंदर्यकला कधीही संपणार नाही अशी भरून राहिली आहे.

आणि आता तर विमानातूनही आपण नवी कला खुलवू शकू. वाल्मीकी आणि कालिदास हे तर विमानात बसून आसेतु हिमाचल प्रवास करीतच होते. चारधामांची यात्रा योजणारा तीर्थपरायण धर्मकार कल्पनाकाशात विहार करणारा एक मोठा कलाधर, कलावंत होताच. पण आता हा वारसा विमानातून उडणाऱ्या साहसिकांना मिळाला आहे. आता तर काव्याचा एकाधिकार त्यांच्याकडेच आहे.

बिहार आणि क्वेटा यांच्या भूकंपाचा आपला अनुभव ताजा आहे. हे रुद्रावताराचे दर्शन ही पण एक मोठी दीक्षाच समजता येईल. कवी आणि कलाधर अशा आविर्भावाने घाबरून जात नाहीत. ते तर प्रार्थना करणारच की जेव्हा हृदय सुकून जात असते, श्रद्धा अस्त पावत असते आणि शुद्ध स्वार्थ आणि परस्पर अविश्वास हाच मानवधर्म होऊन बसतो तेव्हा हे परमगंभीर 'तुमि रौद्र वेशे एशो'

आणि रणरणत्या दुपारी जेव्हा आकाशातून अग्निवर्षा होत असते आणि तेव्हा यमराजाच्या कुत्र्याच्या जिभांशी तुलना करावी असे वैदिक ऋषीला पण जाणवते आणि कोण 'Feast of Youth' च्या कर्त्यालाही जाणवते. मनुष्याने स्वतःला चेतनशील समजावे आणि जिच्या ओटीत हे चैतन्य उसळते त्या प्रकृतीला जड मानावे हा केवढा मूर्खपणा आहे. प्रकृतीचे (निसर्गाचे) हृदय ओळखण्याची किंवा अनुभवण्याची शक्ती आज त्यांच्यात नाही हा काही प्रकृतीचा दोष नाही. मनुष्य आपल्या अज्ञानालाच पुढे करून मनुष्यसृष्टी आणि मनुष्येतर सृष्टी असा भेद करतो याला विज्ञान म्हणता येणार नाही. अज्ञानालाच विज्ञानाचे रूप देणे हे आजकालच्या माणसालाच शक्य आहे. आणि नंतर माणूस विज्ञान आणि कला यांच्यात फरकही करीत राहतो. कलेची नीतिशास्त्र, धर्मशास्त्र, विज्ञानशास्त्र, समाजशास्त्र, जीवनशास्त्र या प्रत्येकाशी तुलना करण्याची, त्यांच्यातील साधर्म्य शोधण्याची आवश्यकता माणसाला वाटू लागते. कलेच्या क्षेत्राच्या सीमेवर जे कोणते क्षेत्र गवसेल त्याच्याशी कलेची तुलना व्हायलाच पाहिजे.

—जीवननो आनंद : ५११–५१२

१०. परस्मैपदी आणि आत्मनेपदी कला

कलेत परस्मैपदी आणि आत्मनेपदी असा फरक काही काही वेळा करावा लागतो. जिच्यात स्वतःच्या आनंदाचाच विचार असतो, स्वतःसाठीच (स्वलक्षी) कलानिर्मिती केली जाते ती **आत्मनेपदी** कला असते. स्वतःला आलेला अनुभव

दुसऱ्यांच्या ठिकाणी जागृत करण्याच्या दृष्टीने, स्वतःचा आनंद दुसऱ्यांमध्ये संक्रांत करण्याच्या आतुरतेने जी कलानिर्मिती होत असते ती **परस्मैपदी** कला असते. सर्वच कला वऱ्याच अंशी **उभयपदी** असते. मूळ हेतू जरी एकच असला तरी ती 'उभयो विन्दते फलम्' आणि त्यामुळेच कला व्यक्तिगत आहे की त्यांच्यात सामाजिक, असा प्रश्न करून विरोध उभा करण्यात खरोखर काहीच अर्थ नसतो. जेथे विरोध नाही तेथे विरोध आहे असा विकल्प निर्माण करून भांडण लावणे हे आजच्या संकुचित मनाच्या काळाचे विशेष लक्षण आहे. व्यक्ती जर असंस्कृत असतील तर त्या सामाजिक जीवन अशक्य करून टाकतात, आणि असंस्कृत समाज व्यक्तिगत जीवनाला गुदमरून टाकतो. जेथे मन आणि जीवन सुसंस्कारित असते तेथे समष्टी व व्यष्टी यांच्यामध्ये विरोध असूच शकत नाही. संस्कारितेद्वारा जीवनात तसाच मानवजातीत अविरोध, सामंजस्य (हार्मनी) अथवा संगीत निर्माण करणे हीच सर्वांत मोठी कला आहे. कलेत व्यक्तिगत व सामाजिक अशा बाजू असतात, पण त्यांच्यात विरोध नसावा.

ताटस्थ्य व त्याचा परिणाम यांचे एक उदाहरण देतो. एकदा एका मित्राला भेटायला मी त्याच्या खेडेगावी गेलो होतो. तेथे मला एक मोठा विंचू डसला. रानात औषध तर मिळाले नाही. विष चढू लागले. आता काय करणार? एक उपाय सुचला. विंचवाचे विष कसे चढते याचे सूक्ष्म निरीक्षण करण्यासाठी ही एक उत्तम संधी आहे असे समजून दुसऱ्याच कोणातरी माणसाला वेदना होत आहे आणि त्या वेदनेचे अंशा-अंशाने निरीक्षण करण्याची व समजण्याची शक्ती आपल्याला व्यासप्रसादात् मिळाली आहे अशा तटस्थतेने विषाच्या परिणामाच्या लहरींचे आक्रमण मी तपासून पाहू लागलो. या लहरींमध्ये भरती-ओहोटी असते. आता वेदना येथपर्यंत आली, आता येथपर्यंत आली असे करून जसजसे मी निरीक्षण करू लागलो, तसतशी वेदना सह्य होऊ लागली, एवढेच नाही तर तिच्यात रसही वाटू लागला. आणि शेवटी झोप लागण्यातही अडचण नाही वाटली.

काही विनोदप्रिय लोक स्वतःच्या झालेल्या फजितीचे तटस्थभावाने रसाळ वर्णन करतात, आणि कोणताही पक्षपात न करता स्वतःची स्मरणयात्रा लिहीत असतात, हे पण ताटस्थ्याचेच एक उदाहरण आहे. जेथे इंद्रियासक्तीच असते, विलास लोलुपत्ता असते, अहंकार असतो, तेथे ताटस्थ्य तर नसतेच, पण तन्मयताही असत नाही हे आपण समजायला पाहिजे. सुख ही काही तन्मयता नसते. सुख म्हणजे आनंद नसतो. पार्थिव व्यवहाराचे सुख हे तन्मयता, आनंद मिळविण्याचे मिथ्या किंवा निरर्थक प्रयत्न असतात. आनंद तर अनासक्त तन्मयतेनेच अनुभवायला मिळतो. अशी तन्मयता किंवा तल्लीनता हाच आनंद असतो. त्यात अहंताममतेला वावच राहात नाही. —जीवननो आनंद : ५०७-५०८

कलेचा दुसऱ्या रीतीचे विचार करता येईल. समाधिस्थितीत माणसाच्या ठिकाणी अहंताममता राहत नसते. त्यावेळचा अनुभव अपौरुषेय असतो, आणि अनिर्वचनीय पण असतो. जेथे भेदच नसतो तेथे निर्वचनाचा प्रश्न कोठून येणार? पण अशा समाधीचे व्युत्थान झाल्यावर, तिचा प्रभाव ओसरल्यावर समाधिकाळाचा अनुभव आणि त्यानंतरची प्राकृत नेहमीची अवस्था यांत जो फरक पडतो, आणि त्या फरकाची जाणीव होते त्यातून कलेची निर्मिती होत असते. जीवस्थितीच्या व्यक्तित्वावर आल्यानंतर हरवलेले सर्वांच्या बरोबरीचे ऐक्य पुनः अनुभवण्याचा कलेच्या द्वारा मनुष्य प्रयत्न करीत असतो. विश्वात्मैक्यभाव, सर्वात्मैक्यभाव हाच परम आनंद असतो. समाधीत जो (आनंद) क्षणैक अनुभवलेला असतो तो आनंद इंद्रियांद्वारा व्यक्त करून इतरांना त्याचे ईषद्दर्शन घडविण्याचा जो प्रयत्न तेच खरे काव्य असते, तीच कला असते. म्हणूनच खरी कला हृदयाला उन्नत करत असते, विग्रहाचा अंत करीत असते, उन्नत आत्म्यांना जवळ आणीत असते आणि समाजाच्या कितीतरी गुंतागुंतीच्या प्रश्नांचा सहजपणे उकल करीत असते. कलेचे हे प्रयोजन, तिचा हा अधिकार जाणून जर आपण म्हटले की कला एक प्रकारचा संचार आहे, प्रचार आहे–प्रोपॅगन्डा आहे तर त्याला काही हरकत नाही. अशिक्षित लोकांना प्रचाराच्या सर्वोत्कृष्ट पद्धतीची माहिती नसते. म्हणून ते 'प्रोपॅगन्डा'ला बिघडवून टाकतात, आणि कलेला पण खाली खेचतात. कलेमध्ये प्रोपॅगन्डा नसावा अशी तक्रार सध्याच्या बाजारी प्रोपॅगन्डाला कंटाळून लोक करीत असतात. परस्मैपदी कला संचार आहे, प्रचार आहे, प्रचाराचा हेतू जितका उदात्त असेल तितके चांगले.

—जीवननो आनंद : ५०८

११. कला आणि विलासिता

हृदयाचे अमूर्त भाव मूर्त रूपात व्यक्त करणे हे कलेचे मुख्य कार्य आहे. जर या मूर्त गोष्टी अमूर्त भावांचे वाहन होण्याशिवाय स्वतःकडेच माणसांचे लक्ष वेधून घेत असतील आणि इंद्रियांना त्यांची स्वाभाविक वैषयिक तृप्ती देऊ लागतील तर तेथे कलेचा अंतच झाला असे समजावे. जरी प्रत्यक्षात तिचा शेवट झाला नाही तरी ती विकृत तर होऊनच जाईल.

तसेच कला आणि विलासिता एकमेकींच्या शेजारी राहात असूनही आणि जीवनात दोघींनीही स्थान मिळविले असूनही त्या दोघींचा कधीही मेळ बसत नाही. त्यागी

माणूस जीवनाच्या मोहापासून शंभर योजने दूर पळून जाईल; तपस्वी या मोहावर विजय मिळवील. तांत्रिक या त्या दोघींना वश होऊनही त्यांच्यातूनच परमतत्त्वाची झलक पाहण्यासाठी व्यर्थ धडपडी करील; पण कला या मोहाच्या विषयांचे अलिप्तपणे, तटस्थपणे दर्शन किंवा श्रवण करून या विषयांमधूनच एखाद्या विषयाला (वस्तूला) केवळ तटस्थ साधन बनवून, त्यातून ब्रह्मानंदसहोदर अशा आनंदाचा अनुभव घेईल. कलेची साधना अवघड असते, जबाबदारीची असते, पण तिचा कुंचला ज्याच्या हातात येतो त्याला ती साधना आरंभापासून शेवटापर्यंत आल्हाददायक ठरते.

—जीवननो आनंद : ४९४

१२. कला, जीवन आणि तत्त्वज्ञान

सामान्यतः तत्त्वज्ञान हा नीरस विषय समजला जातो आणि कला ही रसमय काय, रसरूप समजली जाते. आज समाजात दोहींप्रत अनास्था आहे, कारण की दोघांचा समाजात अभाव आहे. खरे पाहता प्रत्येक कलेच्या मागे तत्त्वज्ञान असते, आणि तत्त्वज्ञान जेव्हा जीवनात प्रवेश करते व जीवनाच्या आनंदात मिसळून जाते तेव्हा तत्त्वज्ञान कलेचे रूप धारण करीत असते. सुंदर गायनाच्या मागे जसा भावगम्य छंद आणि तालबद्धता असते तसे कलेच्या मागे तत्त्वज्ञान पण असते. भिन्न भिन्न समाजात कला भिन्न भिन्न असते याचे कारण सुद्धा, त्या त्या समाजाच्या जीवनाचा आदर्श अथवा पुरुषार्थाची कल्पना भिन्न असते ते असते. त्याचमुळे आपल्या देशात धर्म-भेदाला अनुसरून तांत्रिक, वैष्णव, शैव, जैन, बौद्ध, इस्लामी, वगैरे कला भिन्न रीतींनी व्यक्त झालेल्या पाहावयास मिळतात. धर्मभेद हळुहळू होत असतो, त्यामुळे कलेतही परिवर्तन मंदगतीने होत असते. एकेश्वरवादी ख्रिस्ती धर्माने ग्रीक लोकांच्या अनेक देवदेवतांचा त्याग केला, पण युरोपची प्रजा एवढे परिवर्तन एकाएकी कसे झेलू शकणार ? लोकांनी देवदेवतांच्या स्थानी ख्रिस्ती संतांना बसवून दिले आणि उपासनेची बहुविधतेची जुनी अभिलाषा तृप्त करण्याचा नवा मार्ग शोधून काढला; आणि अशा रीतीने ग्रीक कलेत जी कल्पनासमृद्धी होती तिचे जतन करून ठेवले. आपल्याकडे पण अशोकाच्या वेळेची कारागिरी हेच सुचविते की अशोकाच्या पूर्वी काष्ठस्थापत्य खूपच लोकप्रिय होते, आणि पाषाणासारख्या पदार्थातही काष्ठस्थाप-त्याच्या मर्यादा सांभाळण्यात त्या वेळच्या कारागिरांनी धन्यता मानली. कार्ला किंवा अजंठा येथील गुंफांची कारागिरी व कौशल्य यांच्यावरही काष्ठस्थापत्याचा पुरेपूर

प्रभाव पाहावयास मिळतो.

जीवनात जेव्हा बदल होत असतात तेव्हा स्थापत्य, शिल्प यांच्यात, एवढेच नाही तर नगररचनेत सुद्धा, बदल होत जातात...सामान्य मंदिरांतसुद्धा आपल्या जीवनाचा विकास पाहावयास मिळू शकतो. निवृत्तिप्रिय एकांतात ध्यानमग्न राहणाऱ्या शिवउपासकांनी गुंफेचा प्रतिकृतिरूप छोट्यासा गाभारा बांधण्याची प्रथा सुरू केली. त्याला हल्ली 'गर्भगृह' म्हणातात.

प्रवृत्तिप्रिय वैष्णव लोकांनी जेव्हा सामुदायिक भक्तिमार्ग सुरू केला तेव्हा त्या गर्भगृहासमोर सभामंडपाची आवश्यकता भासली. त्या दोघांच्या दरम्यान असलेला अंतराल प्रदेश बांधकामाने झाकण्यात आला त्याला 'अंतराल' हेच नाव देण्यात आले. अशा रीतीने मंदिराचे तीन विभाग झाले: गर्भगृह (गाभारा), अंतराल आणि सभा मंडप. या तीन विभागांचे प्रतिबिंब राजमहालात पण पडले. तेथेही जुलमी सुलतानाचा (हुकुमशहाचा) मसलतखाना, मंत्री-परिवेष्टित राजाचा दीवाने-खास दिवाणखाना, आणि प्रजारंजक बादशहाचा दीवाने-आम सामान्य प्रजाजनासाठीचें दरबारगृह किंवा सभागृह असे. जेथे राजाच नसे अशा हिमालयाच्या गणराज्यांत ना मसलतखाना ना दरबारगृह. तेथे तर खेड्यांपाशी एखाद्या टेकडीवर मोठमोठ्या दगडांचा एखादा ओटा किंवा चौथरा बांधलेला असे. त्यावर बसून वडीलधारी वृद्ध माणसे स्वराज्यरक्षणाचा विचार करीत असत. आज आपण एक विराट राष्ट्र बनलो आहोत. आजचे आपले कार्य दीवाने-आम किंवा दिवाणखान्यातही मावणार नाही. त्यासाठी आपणास आता मोठी रंगमंदिरे बांधायला हवीत. मात्र हिंदुस्थानाच्या उपवनसंस्कृतीला शोभतील अशीच रंगमंदिरे (रंगसभा) असावयास पाहिजेत. विटा आणि दगड यांच्यापेक्षा वृक्षांच्यावर हिंदी संस्कृती अधिक निर्भर आहे. म्हणून हा अॅम्फिथिएटर किंवा रंगमंदिराचा विभाग अर्धवर्तुळाकार ओळीने वृक्ष लावूनच करावा लागेल. सभा जर दुपारी भरायची असेल तर या झाडांना चांदवा किंवा छत बांधावे लागेल. हेच रंगमंदिर किंवा हेच रंगसभागृह कायम ग्रामदेवाचे मंदिर म्हणून समजता येईल. म्हणजे ग्रामवासी लोक सहज त्याची देखभाल, दुरुस्ती करीत राहतील. स्पर्धा, व्याख्याने, खेळ, नाटके इत्यादी सर्व काही येथेच होत राहतील. हिंदु-मुसलमान ऐक्याचा सूचक असा एक विस्तीर्ण तलाव या रंगमंदिरापाशी अवश्य असेल.

— जीवननो आनंद : ४०४-४०५

याप्रमाणे सामाजिक जीवन आणि सामाजिक कला यांचा त्रिकालीन संबंध आपण पाहिला, आणि त्यावरून आपणास दिसून आले की जसे जीवन तशीच कला असते. आता एवढे पाहायचे राहिले की जसे तत्त्वज्ञान, जसा सामाजिक पुरुषार्थाचा आदर्श असतो, तशीच राहणी आणि तशीच कला असते. अशा दृष्टीने आपण वर वर्णिलेली

मंदिराची रचना तपासून पाहू या. मंदिरांमध्ये तीन प्रकारचे उपासक जात असतात. 'देवो भूत्वा देवं यजेत्' अशा तल्लीनतेने गाभाऱ्यात बसून पूजाअर्चा करणारा एक वर्ग; तो शेवटी म्हणणार असतो–'**यो सावसौ पुरुषः सोऽहमस्मि**'. देवदर्शनाच्या नावाने मंदिरात जमा होऊन पुराणश्रवण, कथाकीर्तन आणि धर्मविवरण करणारा सभामंडपस्थ वर्ग; आणि या दोन्ही वर्गांशी समभाव बाळगणारा, आणि ध्यान अथवा जप हीच श्रेष्ठ साधना मानणारा एक मधला वर्ग असतो; तो या अंतरालात बसत आलेला आहे.

असे होण्याचे कारण आपणास आपल्या तत्त्वज्ञानात गवसेल. आपले तत्त्वज्ञान आत्मपरायण आहे. दार्शनिक आत्म्याचे तीन विभाग कल्पितात; बहिरात्मा, अन्तरात्मा आणि परमात्मा. बहिरात्मा स्वतःला या बाह्य सृष्टीशी संलग्न आणि अभिन्न मानत असतो. अन्तरात्मा देहधारी असूनही देहापासून स्वतःचे भिन्नत्व जाणत असतो. आणि परमात्म्याला तर देहभान असतच नाही. मनुष्याच्या या तीन अवस्था आहेत; आणि या तीन अवस्थांप्रमाणे तो जीवनमन्दिरात प्रथम सभामंडपात बसत असतो, त्यानंतर अंतरालात बसून आत्मदेवाचे दर्शन घेत असतो, आणि ती साधना पूर्ण झाल्यानंतर गर्भगृहात (गाभाऱ्यात) प्रवेश करून अभेद भक्तीत विलीन होत असतो. समाजात कलेची प्रगती पण या तीन अवस्थांतच होत असते. समाजाची काय, अखिल मानवजातीची प्रगती याच दिशेत आहे. सृष्टिसंलग्न अवस्थेत कला अधिकात अधिक बहिर्मुखी आणि सृष्टिउपासक असते. तिला यथार्थदर्शी–वास्तववादी–Realistic म्हणतात. सृष्टी कामरूपिणी असल्याने तिची विविधता अनंत आहे, म्हणून तिच्या उपासनेचा अंत सहज येत नाही. एका रूपात दमलात तर दुसरे रूप तुमच्या समोर उभे राहिलेलेच असते. जसजसे तुम्ही सृष्टीच्या पाशात सापडत जाता तसतशी तुमची शक्ती वाढत असते असा आभास होत राहतो. ज्या समयी स्वामित्वाचा (प्रभुतेचा) मद चरम सीमेला जाऊन पोहोचलेला असतो त्या समयी वस्तुतः मनुष्य सृष्टीचा दासानुदास झालेला असतो. पण ईश्वराच्या सृष्टीत चिरपतित कोणी नाही. आत्मतत्त्व अमर आहे; आणि म्हणून मायेचा पाश स्वतःच्याच ओझ्याने शेवटी गळून पडत असतो तेव्हा माणसाला वाटू लागते की **नियतिकृत नियमरहिता** (ब्रह्मदेवाने निर्माण केलेल्या सृष्टीच्या बाह्य नियमनाच्या मर्यादांपासून मुक्त), **ल्हादैकमयी** (सुखदुःखात्मक नाही, पण शुद्ध आनन्दरूप), **अनन्यपरतंत्रा** (दुसऱ्यावर अवलंबून नसणारी अशी स्वतंत्र), **नवरसरुचिरा** अशी भावगम्य सृष्टी आपण का निर्माण करू नये?

—जीवननो आनंद : ४०६

ही बाह्यसृष्टी आपल्या सुवर्णमय मुलाम्याने रसरूप परमात्म्याला झाकून ठाकीत

असते. म्हणून वास्तववादी कलेमध्ये सुखाबरोबर अतृप्ती, विषाद कालवलेला असतो. त्याच्या आनंदाने समाधान होण्याऐवजी वासनाज्वर जागृत होत असतो. प्रवृत्तीचा प्रवाह कितीही रमणीय असला तरी तो अधोगामी व शेवटी विषादमयच असतो.

एवढा अनुभव आल्यानंतर उपासक आत्माभिमुख होत असतो. तो इंद्रियजन्य रस सोडून देऊन भावात्मक रस घ्यावयास लागतो. मग तो आनंद व्यक्त करण्याची साधने भलेही पार्थिव आणि इंद्रियगोचर असोत; पण त्यांच्याद्वारा व्यक्त करण्याचा भाव मात्र इंद्रियातीत असतो; आणि म्हणून त्यांच्याद्वारा मिळणारा आनंद शुद्ध, निष्कलंक आणि स्थायी असतो. तो आनंद शमप्रधान असतो. त्याच्यापासून विलासितेला पोषण मिळत नाही. त्या आनंदात प्रवेश केल्यानंतर माणूस **विगलितवेद्यांतर** होऊन जात असतो. या कलेला आदर्शदर्शी Idealistic म्हणतात, कारण अशा कलेत आत्म्याचे प्रतिबिंब पडलेले असते. भारतवर्षात या आदर्शदर्शी कलेलाच प्राधान्य असे. यथार्थदर्शी–वास्तववादी कला येथे नव्हती असे नाही. असे म्हटले जाते की मयासुराची कला ही वास्तववादी (यथार्थदर्शी) होती, तर विश्वकर्म्याची कला आदर्शदर्शी होती. पण शेवटी या धर्मपरायण समाजात विश्वकर्म्याची कलाच लोकमान्य बनली. मयासुराची कला एखाद्या वेळेस चीन देशातून आलेली असल्याने ती येथे टिकली नसेल, नाहीतर ती कला आपल्या धार्मिक भावनांना पोषक नसल्याने लोकांकडून तिची उपेक्षा झाली असेल. अशी आदर्शपरायणता जशी चित्रकलेत तशी शिल्पात, जशी संगीतात तशी स्थापत्यात पण आहे; ती जशी पूजा–अर्चेत आहे तशी जीवनसंस्कारांमध्येही आहे, जशी साहित्यात आहे तशी आपल्या रीतिरिवाजांतही आहे. तिच्यात कलेचा उत्कर्ष आहे पण ती परमोच्च (पराकाष्ठा) नाही. काष्ठा (परमोचता) आणि परागती तर आत्मप्राप्तीतच असते. आत्मप्राप्तीत माणूस कलातीत होत असतो. रवींद्रनाथ टागोर यांच्या 'राजा' ('राजा' नाटकातील) प्रमाणे आत्मा सुंदरही नसतो, तसा कुरूप पण नसतो. तो सत्यरूप असतो, आणि म्हणूनच जीवराणीला त्याच्यासह रममाण व्हावयाचे असेल तर त्या राणीने पण कलातीत व्हावयास पाहिजे. हीच 'अभेदभक्ती' असते, हाच गर्भगृहात (गाभाऱ्यात प्रवेश असतो, हीच **सायुज्यमुक्ती** असते. तिचे वर्णन होऊ शकत नाही, फक्त सूचन होऊ शकते. तो शब्दातीत असतो, अवर्ण्य असतो, तो निष्कल परब्रह्म आहे. आदर्शदर्शी कला आपणांस त्याच्याकडे घेऊन जात असते त्याचे स्मरण करून देत असते, त्याच्या बाजूला जाण्यासाठी शक्तिमान बनवीत असते. म्हणूनच तर अशा कलेची उपासना ही ब्रह्मप्राप्तीची एक साधना आहे. म्हणूनच जुन्या शास्त्रकारांनी म्हटले आहे की नादोपासनेने शुद्ध ब्रह्मप्राप्ती होते. कलेची सम्यक् उपासना करण्याने माणूस कलातीत होत असतो आणि मोक्ष मिळविण्यास लायक बनत असतो.

—जीवननो आनंद : ४०७–४०८

या कलेची उपासना योगाने होत असते. नाक धरून श्वास रोखून धरणे याचे नाव योग नाही. योग म्हणजे समत्व. योग म्हणजे वासनाराहित्य. योग म्हणजे निर्विकारता. योग म्हणजे संयम. योग म्हणजे ध्यान. योग म्हणजे तदाकारता. हा योग ज्याला साधेल तोच आर्यकलेचे रहस्य समजू शकेल, तिचे पुनरुज्जीवन करू शकेल, तिच्यात नवा प्राण फुंकू शकेल, आणि त्याद्वारा समाजात नवीन युग प्रवर्तू शकेल. कलेचा उगम आतून व्हावयास पाहिजे. त्यासाठी आज कलावंतांनी तपस्यापूर्वक ध्यान करावयास पाहिजे. आपले शरीर, आपला समय आणि आपली स्फूर्ती विलासासाठी किंवा विलासी लोकांना संतुष्ट करण्यासाठी नाही, पण आपल्या कलेच्या द्वारा जनार्दनाची सेवा करण्यासाठी आहे हे लक्षात ठेवावयास पाहिजे.

—जीवननो आनंद : ४०८

१३. हुन्नर आणि कला

आजकाल आपण ललितकला आणि उद्योगहुन्नर यांचे वेगवेगळे विभाग पाडतो ही गोष्टही हल्लीच्या काळाची असंस्कारिता सुचविते. आज आपण कलेचा केवळ संग्रह करीत राहतो. कलेला फक्त दिवाणखान्यातच स्थान असते. पूर्वी जेव्हा राष्ट्रीय जीवनात चैतन्य सळसळत होते, जिवंतपणा खेळत होता, तेव्हा आपल्या कलाही जिवंत, चैतन्यमय होत्या. एकदा मला एका गर्भश्रीमंत माणसाकडे जेवण्याचा प्रसंग आला टेबलावरची भांडी तर हल्ली आहेत तशीच होती. पण दिवाणखान्यातील काचेच्या कपाटात मात्र भारतीय कारागिरीचे अप्रतिम नमुने असलेली भांडी व्यवस्थित रीतीने मांडून ठेवली होती. ही परिस्थिती आजच्या काळाचे प्रतीक आहे हे लक्षात येण्यास वेळ लागत नाही. कला तर काचेच्या कपाटात ममीप्रमाणे (मड्याप्रमाणे) जाऊन बसली आहे आणि सुविधा व सुखदता यांच्या नावाने विकला जीवनात शिरली आहे.

...कला बऱ्याच अंशी दुःख विसरण्यासाठी किंवा झाकण्यासाठी नसते, पण जीवनाचा आनंद व्यक्त करण्यासाठी असते. कासार एक वाटी घडवितो. आपल्या वाडवडिलांकडून ही कला त्याने शिकलेली असते. त्याचे गिऱ्हाईक निश्चित असते. त्याची वार्षिक कमाई किती होईल हे पण त्याला निश्चित माहीत असते. त्याच्याशी स्पर्धा करणारे त्याच्याच जातीचे असतात. सर्वांचे जीवन परस्परामध्ये मिसळून गेलेले असते. बाहेरून कोणी आपल्यावर हल्ला करणार नाही असा त्याला विश्वास

वाटत असतो. जीवनात त्याला धोका पत्करावा लागत नाही. त्याचे जीवन व त्याचा परिश्रम, त्याचा उद्योग व त्याचा आराम ही सर्व तालबद्ध रीतीने चालत असतात. आता हा आनंद त्या वाटीवर मुद्रित करण्याशिवाय तो आपल्या हाताने वेगळे कसे काही करू शकेल? वाटीची घडण पूर्ण झाल्यानंतर त्याला वाटले की चला त्याच्या किनारीवर थोडीशी वेलबुट्टी करू या. वाटीतून लहान बालके ताजे ताजे धारोष्ण दूध पिणार आहेत, म्हणून चला त्याच्यावर आपली शेपटी उंच व ताठ करून हुंदडणारे एखादे वासरू कोरून टाकू. हिचे नाव कला आहे. कासार वासरे कोरीत जातो व त्याची मुले त्याच्या जवळ उड्या मारून बागडू लागतात. हुन्नरकला आणि ललितकला यांच्यात कोठे फरक करायला जाल?...

मनुष्य सायंकाळी समोर उद्देश न ठेवता फिरायला जातो हे उत्तम; आणि पर्वत-शिखरावरील मंदिरात देवदर्शन करायला जातो तेव्हा ते योग्य नाही, असे का? स्काउट होऊन फिरेल ही संस्कारिता आणि रानातील सीताफळाचे पिकलेले फळ आपल्या बहिणीला देण्यासाठी एखादा भाऊ सहज चालत जाईल ते खेडवळ प्रेम. असेच ना?

खरोखरच, आपण शहरांचे, बाजारांचे आणि परदेशी तयार मालाचे जीवन जगण्याने साधा, मधुर जीवनरस पूर्णपणे विसरून गेलो आहोत; आणि समाधाना-ऐवजी उत्तेजन, उग्रीपन, संक्षोभ यांना शोधत फिरत आहोत. जर दुधाची पौष्टिकता दारूत मिळत असेल तरच समाधानाच्या मधुर कलेचा आनंद हा उत्तेजनातून मिळू शकेल. आपण जीवन वेचव, नीरस, सपक, अळणी करीत चाललो आहोत, वास्तविकतेपासून वेगळे करीत जात आहोत, आणि मग त्यात बाहेरून कला भरून त्याला गोंडस, आकर्षक करण्यासाठी खटपट करीत आहोत. पती जर पत्नीपासून प्रेम चोरून ठेवीत असेल आणि त्याऐवजी कपडे व सोन्याचे दागदागिने तिला मुक्त हस्ताने देत राहिला तर त्याने का पत्नीला जीवनाचे समाधान का मिळू शकेल?

कला ही जीवनाची प्रतिष्ठा आहे. तिचा नाश होण्याने जीवनामधून धर्म आणि सदाचार सुद्धा अदृश्य होतील, आणि नंतर समाज निश्चितच वर्गविग्रहाला लायक बनतो. मग अशा विग्रहात सफलता मिळाली तरी काय, आणि न मिळाली तरी काय?

—जीवननो आनंद : ५२६-५२७

१४. साहित्य, संगीत आणि कला

जसे कपड्याच्या शोभेसाठी 'किनार व पदर (पालव) असतो, तशा जीवनाच्या आनंदासाठी साहित्य, संगीत आणि कला असतात, हे जगात सर्वत्र मान्य आहे. किनार आणि पदर याशिवाय साडी तयार होऊ शकत नाही; तरीही ते असले तरच आपणास साडी साडीसारखी वाटते. त्याचप्रमाणे साहित्य, संगीत आणि कला यांच्यापासून जगता येणे शक्य असूनही आपण त्यांना 'जीवन' हे नाव देत नाही. किनार आणि पदर हे साडीचे आकर्षक भाग आहेत, पण मुख्य भाग नाहीत. नुसती किनार किंवा नुसता पदर काही कोणी अंगावर परिधान करीत नाही. साडी असते म्हणून तर किनार व पदर यांना महत्त्व असते. साडीमुळे ती कृतार्थ होत असतात...मीच जीवन आहे की जीवनसर्वस्व आहे असे कला कशी म्हणू शकेल? कला ही जीवनाचा शृंगार–साजसजावट म्हणूनच शोभते व कृतार्थ होते.

साहित्य, संगीत आणि कला हे तीन परस्परांचे मित्र आहेत, एक कुटुंबीय आहेत, त्यांच्या परस्पर सहकार्याने जीवन परम रमणीय आणि सुवासित, सुगंधी बनत असते. पण हळुहळू ही तिन्ही आपापले सार्वभौम साम्राज्य स्थापण्याचा प्रयत्न करीत असतात. असे प्रयत्न आताच होऊ लागले आहेत असे नाही; वेळोवेळी असे प्रयत्न होत आले आहेत, आणि नेहमी ते निष्फळच ठरत गेले आहेत. 'मी तर फक्त एका संगीताचीच उपासना करतो, हे नादब्रह्म मला मोक्षाप्रत नेईल' असे म्हणून कित्येक गायनाचार्यांनी संगीताची अनन्य भक्ती केली. आद्य आचार्यांच्या या अनन्य निष्ठेच्या मागे जीवनाची विभूतीही अलौकिक असल्यामुळे संगीताच्या मार्गाने ते तर जीवनाला परमोच्च कोटीला नेऊन पोहोचवू शकले. पण त्यांचे अनुकरण करणाऱ्या कित्येक अनुयायांना हे दिसले नाही की जीवनाच्या कोणत्याही एका अंगाचा पूर्ण रीतीने विकास करताना समग्र जीवनालाच वळण द्यावे लागते, त्याचा विकास करावा लागतो, आणि असे जर केले नाही तर एकांगीपणाची अभद्र व विद्रूप शक्ती आपणांस खावयास उठत असते. केवळ निष्णात गायक आपणांस अनेक पाहावयास मिळतात.

त्यांची सामाजिक विवेकबुद्धी किंवा तिचा अभाव, त्यांच्यापैकी कित्येकांचे साहित्यविषयींचे अज्ञान, रसिकतेशी त्यांचे वैर, त्यांचा लहरी स्वभाव–– ही सर्व पाहता संगीत विद्या अशा माणसाच्या पदरी कोठून पडली असेच प्रत्येक रसिक सुसंस्कृत माणसाला वाटते. चित्रकलेविषयी पण अनेक वेळा असेच सांगता येईल.

साहित्याच्या बाबतीत स्थिती थोडी वेगळी आहे. साहित्याचा विकास धर्मप्रसारासाठी व शिक्षणाचे साधन म्हणून झालेला असल्याने साहित्यात सामान्य आणि विशेष संस्कारितेला वाव राहिला. पण 'साहित्याकरिता साहित्य' असे म्हणून जर स्वतंत्र

तत्त्वज्ञान करण्यात आले तर साहित्यकोविद पण कारागीर व वस्ताद यांच्या रांगेत जाऊन बसल्याशिवाय राहणार नाहीत.

व्यापक अर्थ घेतल्यास कलेची पण स्वतंत्र, स्वयंभू व संपूर्ण तत्त्वज्ञाने होऊ शकतात. पण साहित्याला जे सामाजिक जीवन आणि संस्कारिता मिळाली आहे ती त्यांना अजून पुरेशी मिळाली नाही. म्हणून साहित्याने मोठ्या भावाचे कर्तव्य समजून संगीत आणि कला यांना स्वतःबरोबर ठेवावयास पाहिजे, आणि त्यांना शिक्षणापुरता लाभ करून देऊन स्वतःचे स्वतंत्र क्षेत्र निवडण्यासाठी आशीर्वाद देऊन मोकळे करावयास पाहिजे. त्यांना मोकळीक दिली पाहिजे याचा अर्थ असा नाही की त्यांना मोकाट सोडायचे. भाऊबिजेच्या दिवशी जसे भाऊबहिणी एकत्र येतात तसे साहित्य, संगीत आणि कला काही उत्सवांच्या प्रसंगी एका घरी एकत्र येणे हे जसे आवश्यक आहे तसे स्वाभाविकही आहे.

—जीवननो आनंद : ४९०

...जे यशस्वी कलावन्त होऊन गेले आहेत त्यांची जीवने तपासून पहा. ते आदर्श महात्मा, तपस्वी की संत पुरुष भलेही नसोत पण त्यांच्या ठिकाणी असाधारण भावना, भावनेची उत्कटता आणि कोमलता आणि त्याच्या मागे सर्वस्वाचा त्याग करण्याची तीव्र इच्छा या होत्याच.

जर याच लोकांना सर्वांगीण संस्कारितेची दीक्षा मिळाली असती तर त्यांनी आपल्या कलेला क्षणोक्षणी सम्राज्ञीची पदवी देऊन टाकली नसती का?

जोपर्यंत साहित्यिकांसमोर धर्मतेज, समाजहितैषा अथवा भक्तीचे रसायन होते, किंवा त्यांच्यासमोर ज्ञानाची मृगया आणि समाजाची सेवा करण्याची उत्कटता होती, तोपर्यंत ते जीवनधुरीण होते. आजही जीवनधुरीण बऱ्याच प्रमाणात साहित्य-कुशल आहेतच. जेथे जीवन उत्कट असते तेथे त्यांच्यातील साहित्यशक्ती सबलीच पाहिजे.

जोपर्यंत साहित्याजवळ जीवनदृष्टीव्यतिरिक्त कोणताही संप्रदाय, पंथ किंवा पक्ष यात न मिळणारी सर्वसंग्राहक उदारता आहे तोपर्यंत साहित्याचे हे गुरुपद, उच्च स्थान टिकणारच. आणि याच कारणास्तव त्याने संगीत आणि कलेलाही आपल्याकडे निमंत्रित करून त्यांना स्वतःचा रंग चढवायला पाहिजे. ज्या दिवशी साहित्य अहंप्रेमात सापडून 'साहित्यासाठी साहित्या'चा आदर्श पुरस्कारील आणि केवळ साहित्यविकासात स्वतःची कृतार्थता पाहील त्या दिवशी त्याचे गुरुपद, महत्त्वाचे स्थान, गौरव आणि व्यापक दृष्टी सर्वच गळून पडून राजदरबारात राहणारे नट, विट, गायक व विदूषक यांच्या रांगेत ते जाऊन पडेल.

—जीवननो आनंद : ४९१-४९२

१५. संगीत ही भावनेची भाषा

संगीत ही तर भावनेची भाषा असते, जीवनाचा उद्‌गार असतो. खरे संगीत जीवनाचे प्रतिबिंबच असते, आणि पुढे जाऊन ते जीवनाचे मार्गदर्शक पण बनू शकते. जीवनात नवरस जेव्हा विकास पावतील तेव्हा साहित्यात, कलेत, आणि संगीतात नवरस उमलतील. संपूर्ण समाजाचे जीवन जागृत असले तर संगीत पण सर्वत्र जागृत राहावयाचे. जीवन जेव्हा मंद बनते, क्षीण होते, जीवनरूपी देवतेवर जेव्हा राख चढते तेव्हा संगीतही समाजात अप्रतिष्ठित बनून राहते अथवा संस्कार-विहीन होते. अशा वेळी काही संगीताचे उपासक प्रयत्नपूर्वक संगीताचा वारसा टिकवून ठेवण्यासाठी प्रयास करीत असतात. हळुहळू त्याचा धंदेवाईक वर्ग तयार होत जातो. हरिदासानंतर तानसेन यावयाचाच. ही स्थिती अपरिहार्य असते. जुन्या वारशाची जपणूक करणारा वर्ग जर नसेल तर अपमार्गाला लागलेल्या समाजाला सर्व काही गमवून बसायला वेळ नाही लागणार. संगीताचा वारसा जिवंत ठेवणारा एक स्वतंत्र वर्ग तयार झाला म्हणजे मग तो रिकामपण आणि योगक्षेमाची निश्चिती मागणारच. अशी निश्चिती मिळवण्याचा त्याला हक्क आहे. त्यात त्याला फायदा आहे की नाही हा प्रश्न वेगळा आहे. मुळांशिवाय झाड, चिखलाशिवाय कमळ जसे निष्प्राण आणि असत्य बनते तसेच जीवनयात्रेचा प्रयास आणि कष्ट यांच्याशिवाय जीवन दिवसेंदिवस कळकट जाते, गंजत जाते, समाजापासून तुटत जाते, स्वतःचा जीवनमंत्र विसरत जाते, आणि शेवटी त्याला विकृत अवस्था प्राप्त होत असते.

—जीवननो आनंद : ४४८

१६. संगीतकारांना विनंती

संगीताच्या संरक्षकांना रिकामपण, फुरसत भले मिळो, संगीताच्या रसिकांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नये, त्यांना संतुष्ट ठेवण्यात आपण प्रसन्न राहावे. पण संगीत-रक्षकांना अत्यंत नम्रतापूर्वक एवढे तर अवश्य सुचवू या की तुमची विद्या, सर्व विद्यांतील श्रेष्ठ विद्या, व्यर्थ जाऊ नये यासाठीच तुम्ही जीवनाच्या सर्व अंगांशी व उपांगांशी परिचित राहयला पाहिजे. समाजाचा पुरुषार्थ, समाजाच्या व्यथा, समाजाच्या आकांक्षा, समाजाचे साहित्य आणि समाजाचे आदर्श यांच्याशी तुम्ही एकरूप व्हायलाच पाहिजे. तुमच्यापैकी बऱ्याचशा लोकांनी एकरूप होण्याची गोष्ट तर बाजूला

राहिली, पण वरवरच्या प्रश्नांशी पण त्यांचा परिचय नसतो.

संगीताला निर्बंध रिकामपण व फुरसत हवी असते अशा विचाराने संगीताचार्य राज्याश्रय शोधू लागले. आणि का शोधू नये? स्वराज्यात राज्याश्रय शोधणे यात हीनपणा तर नाहीच. पण जेव्हा **अनाश्रया न शोभन्ते पंडिता वनिता लताः** असे म्हणून पंडित आणि साहित्याचार्य राजस्तुती लिहिण्यात मग्न झाले तेव्हा संगीताचार्यांनी त्यांचे अनुकरण करावे यात नवल ते कोणते? संगीताचार्यही गाऊ लागले—

तू वे मोमदशा दरबार
निझामदीन सुजान।
धवल कलसपर, बलबल जैइये
तुमपर जीये कुरबान
निझामदीन सुझान॥

उच्च संगीत आणि विशुद्ध कलाशून्य खुशामतीचा हा एक मोठा विलक्षण नमुना आहे.

राजाश्रयामुळे उच्चसंगीत प्रभुयोग्य झाले होते हे खरे, पण त्या काळात श्रीमंत व गरीब यांच्यात आजच्यासारखा असहकार निर्माण झाला नव्हता. राज्याचे गायक मंदिरात जाऊन रोज गायन करायचे, यात्रांनाही जात, गरिबांमध्ये राहून गरिबांनाही काही शिक्षण देत, आणि समाजाच्या जीवनात संगीत वाहते ठेवत. आपल्या लोकांचे जीवनच संगीतमय आहे. मूल जन्माला येते तेव्हा संगीत, मौंजीत संगीत, विवाह-प्रसंगी संगीत. काही जमातीत तर माणूस जगाचा निरोप घेतो तेव्हा पण संगीताची साथ देतात. आपल्या जवळजवळ सर्वच धार्मिक क्रिया संगीताशिवाय अपुऱ्या राहतात. (आपल्या सार्वजनिक संगीतात कितीतरी कर्णकठोर भाग शिरला आहे तो काढून टाकायला हवा एवढे जाता जाता येथेच सांगून टाकतो.)

राज्याश्रयाचा काळ जाऊन आता लोकाश्रयाचा काळ आला आहे. लोकाश्रय म्हणजे मध्यमवर्गाचा आश्रय. या आश्रयात कलावंत बऱ्याच अंशी स्वतंत्र राहू शकतो आणि स्वाभिमान वाढवू शकतो. पण हा लोकाश्रय पश्चिमेच्या पद्धतीचे अनुकरण करील तर तो समाजाला आशीर्वादरूप ठरणार नाही. राज्याश्रयाच्या जुन्या काळात गरीबांवर बहिष्कार नव्हता. धर्मसंस्था संगीत गरीबांसमोर सादर करण्याचे काम करीत असत. आजच्या नास्तिक काळात, जे तिकिटाचे पैसे देतील तेच संगीत ऐकतील; अशा स्थितीत मात्र गरीबांना संगीत ऐकण्याच्या एकमात्र समाधाना-वाचून वंचित राहावे लागत आहे. लोकाश्रयावर विसंबून राहून संगीताचा उद्धार

करणारे पंडित विष्णु दिगंबर जेव्हा हरद्वारला येऊन गंगेच्या किनाऱ्यावर गंगामाईला आपले संगीत ऐकवीत तेव्हा मला खूप आनंद व्हावयाचा, कारण त्या निमित्ताने सर्व जनतेला पण त्यांच्या उत्तम संगीताचा लाभ मिळावयाचा. ज्या दिवशी लोक संगीतापासूनही पूर्णतः वंचित राहतील त्यादिवशी ते सैतान बनावयाचे. आपले जुने साधेभोळे जीवन भंग होत चालले आहे आणि जीवनकलहात माणसाच्या बऱ्याचशा सहजप्रवृत्ती नष्ट केल्या जात आहेत. अशा प्रसंगी तर संगीताची आवश्यकता विशेषतः अधिकच आहे. हजारो नव्हे लाखो मजुरांना एकत्र करणाऱ्या मीलमालकांना मी अवश्य सांगेन की तुमच्या भल्यासाठीसुद्धा तुमच्या या सहकाऱ्यांना शुद्ध संगीत ऐकविण्याची व्यवस्था करा; मग ते लोकसंगीत असो की शास्त्रीय संगीत. त्यांच्या भजनी मंडळांना आपल्या ताब्यात न घेता उत्तेजन द्या. संगीतामृताचा प्रवाह वाहत राहिला म्हणजे दारू व भांडणे काही प्रमाणात तरी कमी होतीलच.

—जीवननो आनंद : ४५०

१७. संगीत : जन्मसिद्ध हक्क

खरे पाहता संगीत हा गरीबांचा जन्मसिद्ध हक्क आहे. शास्त्रीय संगीताची घडण होण्यापूर्वी लोकसंगीताचा उगम आहे, आणि तो भोळ्या प्रजेतूनच झालेला आहे. बऱ्याच प्रमाणात लोक आपला हा हक्क गमावून बसले हा त्यांचा अपराध आहे– अथवा अपराध कसा म्हणता येईल ? त्याचा आपल्या जीवनावर हक्क आहेच कोठे तर त्याला अपराध (गुन्हा) समजता येईल ? पण त्यांचे दुर्दैव तर खरेच. लोकसंगीत हे शुद्ध सोने आहे. त्याला कोरून कोरून आणि त्याच्यावर मुलामा, चमक चढवून आचार्यांनी शास्त्रीय संगीताचे अलंकार घडविले आहेत...

१८. काव्य आणि संगीत

काव्य आणि संगीत यांच्यामध्ये अत्यंत जवळचा संबंध असतो हे येथे सांगण्याची आवश्यकता नाही; काव्य आणि संगीत हे दोन एकमेकांचे आश्रित नाहीत. काव्य

स्वतंत्र रीतीने राहू शकते. संगीतही काव्याच्या मदतीशिवाय स्वतःची भावगम्य वाणी बोलू शकते. संगीत ही स्वतंत्र भाषा आहे. त्याचे व्याकरण वेगळे आहे. त्याचे भाव स्पष्ट असतात. शब्दांपेक्षा संगीताचे आलाप अधिक व्यापक आणि अधिक परिणामकारक असतात. संगीताची भाषा सार्वभौम म्हणता येणार नाही, तरीही एखाद्या विशिष्ट समाजाच्या जीवनाचा थोडासा परिचय असला तर त्याची भाषा कळल्याशिवायही त्याच्या संगीताद्वारा त्याचे उत्कट भाव अनुभवता येतात. यामुळेच संगीतप्रवीण बऱ्याच वेळा संगीतामागे असलेल्या शब्दांविषयी बेफिकीर राहतात. पण त्यांनी एवढे तरी समजायला पाहिजे की संगीत भलेही भाषानिरपेक्ष असेल, पण काव्य आणि संगीत यांच्यात विसंवाद कोणीही संस्कारी रसिक मनुष्य सहन करू शकणारच नाही. बरेचसे गायक असे समजतात की जुन्या प्राचीन 'चिजां'मध्ये शब्द बदलून चालणार नाही. यामुळे कितीतरी सर्वोच्च रागदारी 'चिजां'मध्ये नीरसता अथवा अश्लील काव्य आढळते, आणि चीड येऊन सुद्धा ते ऐकावे लागते. 'सैयां गुच्यां'चे शब्द सुद्धा गवयाच्या मते वेदमंत्रांइतके अपौरुषेय असतात; त्यांच्यात बदल होणारच कसा? ही जडता त्यांनी सोडली पाहिजे.

...जीवनाच्या गहनतेत जे उतरू शकतात, भविष्याच्या आकांक्षा जे आपल्या हृदयात अनभवू शकतात, आणि त्याचबरोबर जुना वारसा ज्यांनी पचविलेला असतो तेच नवी निर्मिती करू शकतात. राष्ट्रीय जीवनात जेव्हा जेव्हा परिवर्तन होत असते तेव्हा संगीतातही परिवर्तन होणारच.

—जीवननो आनंद : ४५१-४५२

आपल्या सामाजिक जीवनात मिसळून जाईल, भिनून जाईल असे संगीत आपण जरूर निर्माण करू शकू. आपले सामाजिक जीवन नवीन रूपे धारण करीत आहे, नवनवे सामाजिक आदर्श आणि भाव समाजात प्रकट होत आहेत, व पसरत आहेत, आणि ते सर्व नव्या संगीताला आमंत्रण देत आहेत, आवाहन करीत आहेत. आपली सभासंमेलने, परिषदा, आश्रम व नवीन स्थापन होणारे व्यवसाय नव्या संगीताची मागणी करीत आहेत.

भाववाही संगीताचे दोन प्रकार असतात. काही संगीत आपली स्वररचना आणि आलापांनीच हीन विकारांना उद्दीपित करीत असते. असे संगीत अशिष्ट असते. दुसऱ्या प्रकारचे संगीत विकारशामक आणि शुभ भावनांचे पोषक असते. हा भेद समजण्याची व करीत राहण्याची फार गरज आहे. या दिशेने प्रयत्न करणारे सुरुचिसंपन्न विदग्ध लोक फार थोडे आहेत. आणि सध्याचा काळ जीवनात तसाच साहित्यात स्वच्छंदीपणा आणि उच्छृंखलता यांना प्रतिष्ठा देणारा आहे. म्हणजे हे काम अपुरे आहे यात शंका नाही.

जीवनाचे दोष तत्त्वज्ञानात उतरत असतात, समाजशास्त्रात उतरत असतात. मग कलेत कसे नाही उतरणार ?

शुद्ध संगीत निष्पाप, तेजस्वी आणि कारुण्यपूर्ण जीवनामधूनच उत्पन्न होऊ शकते; कारण संगीत ही भावनेची नैसर्गिक भाषा आहे. जसे जीवन तशा भावना. जशा भावना तसे संगीत.

संगीत म्हणजे नुसते गायन नसते. गायन, वादन, नर्तन आणि अभिनय या सर्वांचा संगीतात समावेश होत असतो. आपल्याकडे गायन-वादनाचा प्रचार तर ठीक आहे, पण नर्तन काही प्रमाणात स्त्रैण समजले जाते, याचे कारण पुरुषांचे नर्तन विसरले गेले असेल किंवा पुरुषांची शरीरे नर्तनयोग्य राहिली नसतील. गायनापेक्षा नर्तन अधिक उद्दीपक होण्याचा संभव असतो, यामुळेही नर्तन जुन्या काळात अप्रिय झाले असेल. मंदिरांत बऱ्याच वेळा भक्त नर्तन करतात. गुजराथेत गोपरास, दांडियारास, गरबा वगैरे नर्तनाचे काही प्रकार रूढ आहेत. काही रानटी समजल्या जाणाऱ्या पण निष्पाप जीवन जगणाऱ्या जमातींत स्त्रीपुरुषांचे मिश्र नृत्य पहावयास मिळते.

गायन, वादन, नर्तन या तिघांचा मेळ जमला म्हणजे संगीत पूर्ण झाले असे नाही. आपल्या पूर्वजांनी रागरागिणींची स्वरूपे आणि ध्याने कल्पिली आहेत. ऋतू, वेळ, गंध, रूप, आलेखन सर्वच गोष्टींचे सहकार्य असलेले संगीत त्यांनी कल्पिले आहे. रेखा, वर्ण आणि रूप; गंध, रस, समय, रचना, औचित्य आणि तारतम्य; न्याय, कारुण्य आणि प्रेम या सर्वांचा संगीताबरोबर अविरोध अथवा संवाद उभा केल्याशिवाय संगीत संपूर्ण झाले असे समजता येणार नाही. जीवनाच्या अंगप्रत्यंगांत जोपर्यंत थोडाही विसंवाद राहील तोपर्यंत **जीवनव्यापी संगीत** ऐकायला मिळणार नाही. जेव्हा माणसामाणसांत, पशू-माणूस यांत, वनस्पती आणि मनुष्य यांत, वनस्पती आणि मनुष्य यांत एकत्वाचा संबंध निर्माण होईल, जेव्हा सर्व एकहृदय होतील तेव्हाच विश्वसंगीताला आरंभ होईल. शुद्धनीती, सदाचार, पावित्र्य हे या विश्वसंगीताचे व्याकरण आहे. अहिंसा म्हणजे आत्मौपम्य हा त्याचा अंतिम रस आहे.

—जीवननो आनंद ४५६

१९. कवी

'प्राचीन काळी 'कवि' शब्दाचा अर्थ वेगळा होता. हल्लीचा अर्थ वेगळा आहे. आज कवीचे कार्य कल्पनांना धावायला लावणे आणि सूक्ष्म जटिल भावांचे खरे

खोटे पृथक्करण करून ते आकर्षक रूपात व्यक्त करण्याचे आहे. माणसाचे अनुभव, त्याच्या शंका आणि भीती, त्याच्या आशा व आकांक्षा, त्याच्या वासना व हेतू यांना शब्दबद्ध करून अथवा दुसऱ्या रीतीने व्यक्त करून सर्वग्राह्य बनविणे हे कवीचे आजचे क्षेत्र आहे. या सर्व जीवनविभागांत जितकी अव्यवस्था, अनवस्था आणि बेजबाबदारी असेल तितकी कवीच्या काव्यात दिसून येते. कवी शास्त्रशुद्ध विचार करायला बांधलेला नसतो. कवीला तर त्या त्या क्षणी जे काही सत्य किंवा सत्यकल्प जाणवेल ते तशाच रूपात प्रकट करायचे असते. या दृष्टीने कवीचे उद्‌गार हा तत्त्व-ज्ञानाचा कच्चा माल असतो...जगाचे ज्ञान, अनुभव किंवा श्रद्धा यांच्याशी आपल्या उद्‌गारांचा मेळ जमला पाहिजे असे कवींनी मान्य केलेले नाही. आपल्या स्वतः च्याच वेगवेगळ्या वेळेच्या व वेगवेगळ्या वृत्तींच्या उद्‌गारांमध्ये मेळ असला पाहिजे असेही कवींना वाटत नाही. कवीच्या कल्पनाविहारात यदृच्छेने, योगायोगाने जी जीवनउपासना येऊन गेली आणि तिच्यामुळे जर त्याचा उद्‌गारांत तर्कशुद्ध सूत्र-मयता व अखंडता जमून आली तर ती अनिष्ट नसते. सानंदाश्चर्याने तो ही वाढवून घेईल. पण त्यात जरी काही मेळ बसला नाही तरी त्याची त्याला क्षिती नसते. "Do I contradict myself ? Well, then I contradict myself. I contain multitudes" असे सांगून कवी सटकून जाईल. समाजात जर विचारांचे आणि सिद्धान्तांचे अराजक चालत असेल तर ते त्याच्या डोक्यातही चालले तर त्याची तक्रार काय ? राजाला जसे अनेक सल्लागार असतात, राज्यतंत्रात जसे अनेक पक्ष असतात, वर्षात जसे अनेक ऋतू असतात तसे माणसात त्याच्या जीवनाचा ताबा घेणारी अनेक तत्त्वे असणारच. इन्द्रियांच्या वृत्ती व कला, विविध प्रकारच्या वासना, कल्पना, अनुभव, अतृप्त जीवनप्रयोग, नव्या जुन्या निष्ठा आणि संशय हे सर्वच एकत्र येऊन निवडीसाठी उमेदवारी करावयाचे. त्यांच्यामध्ये मेळ असण्याची अपेक्षा कसली ?

—जीवनव्यवस्था : २९८–२९९

कवींच्या काव्यविहारात जबाबदारीची अपेक्षा भले नसेल, पण गांभीर्याची (Seriousness) अपेक्षा पुरेपूर असते. त्यात कृत्रिमता, सहेतुक असत्यकथन, दंभ इत्यादी येताच कामा नये. तार्किक सुसंवादिता (Logical consistency) भलेही न होवो, पण मनोवैज्ञानिक सचोटी व प्रामाणिकता (Psyehological intensity) असायलाच पाहिजे. कवी निरंकुश असावा हे खरे, म्हणजे बाह्य निर्बंध तो स्वीकारीत नाही. पण त्याला आपला स्वतःचा आंतरिक स्वयंभू अंकुश, निर्बंध धुडकावून लावता येणार नाही. तसे करायला गेला तर तो कवी राहणार नाही.

कवीचे जीवन शास्त्रशुद्ध की स्मृतिशुद्ध भले न होवो, पण ते उच्च, पारमार्थिक

आणि वीर्यवत्तर– पराक्रमी, पुरुषार्थी तर असलेच पाहिजे. आपल्या स्वतःच्या जीवनात कवी बाह्य नियमनाचा भलेही स्वीकार न करो, पण त्याच कारणास्तव त्याचे जीवन इतके तरी आर्य, विशुद्ध आणि रहस्यमय असायला पाहिजे की त्याच्या जीवनामधून असंख्य लोकांना जीवनाचा आदर्श आणि आदर्श जीवनाचा मानदंड मिळावयास पाहिजे. कवीत जर जीवनदारिद्र्य व्यापलेले असेल तर त्याचे कल्पनावैभव, त्याची शब्दसमृद्धी आणि त्याचा गगनविहार काय कामाचा ? ही सर्व बाह्य उपकरणे, साधने जितकी जितकी अधिक वाढत जातील तितके तितके त्याचे स्वतःचे जीवन अधिक फिके, निस्तेज, बेचव, सपक आणि तिरस्करणीय व्हावयाचे. कवीपेक्षा कवीचे काव्य अधिक भव्य असण्याचा संभव असेल खरा, पण त्याचे जीवन त्याच्या काव्याशी काही प्रमाणात तरी सारखे असेल एवढे तर व्हायलाच पाहिजे. काव्याच्या जवळ बसायला कवीला लाज वाटता कामा नये अथवा त्याला निर्लज्जपणा धारण करावा लागू नये.

—जीवनव्यवस्था : २९९–३००

२०. कवीचे द्रष्टेपण

कवी म्हणजे द्रष्टा, खूप वाचून, चौकशी करून अथवा अनुमान करून सुद्धा पुष्कळ लोकांना जे समजू शकत नाही ते कवींना सहज दिसत असते. आपली दृष्टी वर्तमानकाळाकडून मर्यादित होत असते. निर्मळ दृष्टीचे कवी भविष्यकाळातही पाहू शकतात...ज्याला जीवनरहस्य दिसते, ज्याला इह–पर सृष्टी या दोन्ही एकसारख्याच प्रत्यक्ष (दिसत) असतात, जो अतिवादात (अतीतात) उतरू शकतो, जो या जगात राहूनही या जगाचा नसतो, तो कवी चर्मचक्षूला जे दिसत नाही, तर्कदृष्टीला ज्याचे आकलन होत नाही, व्यावहारिक जगात ज्याला प्रमाण मिळत नाही अशा अतीन्द्रिय सूक्ष्म आणि स्वसंवेद्य अनुभवांचा संपूर्ण साक्षात्कार करून घेऊन शब्द किंवा वर्ण यांसारख्या मर्यादित साधनांद्वारा ते सर्व इतरांसाठी जे प्रत्यक्ष करू शकतो तो कवी. या सृष्टीच्या मागे असणारी–बाह्य तशाच अंतःसृष्टीच्या मागे असणारी ईश्वरी योजना, ईश्वरी लीला आणि ईश्वरी आनंद यांचा जो साक्षात्कार घडवू शकतो तो कवी होय.'

—जीवनभारती : ८

२१. तत्त्वज्ञानी आणि कवी

तत्त्वज्ञानी हे एक प्रकारचे कवीच असतात. त्यांच्या ठिकाणी सुद्धा कल्पनेची, तीक्ष्ण बुद्धीची, क्रांतदर्शितेची आणि तत्त्वदर्शनाची चमक, झळाळी तर असलीच पाहिजे. पण तत्त्वज्ञाने दुसरी एक-दोन बंधने स्वीकारलेली असतात. तो जे म्हणतो त्यांत परस्पर-मेळ असावा लागतो, तर्कशुद्धी असावयास पाहिजे, सांगोपांग विवेचनाची पूर्णता असली पाहिजे. आपले जीवनदर्शन संपूर्ण आहे, सुसंगत आहे असे त्याने सिद्ध करावयास पाहिजे. आपले म्हणणे दुसऱ्यांच्या गळी पुरेपूर व सारख्या रीतीने उतरविण्याची त्याची तयारी असावयास पाहिजे. कोणत्याही क्षेत्रात तो विहार करो, तरी शेवटी तो बुद्धीचा दास असतो, युक्तिवादाचा (Reasoning) उपासक असतो. आणि बुद्धीचा तर असा दावा असतो की तिचे म्हणणे नेहमी एकसारखे असते, सार्वभौम असते, तिचे 'अपील' सार्वजनिक, जागतिक स्वरूपाचे असते. तत्त्वज्ञानामध्ये धर्मापेक्षाही अधिक संप्रदाय पडले असतील तरीही माझे म्हणणे सर्वांच्या गळी उतरलेच पाहिजे असा आपला दावा बुद्धीने सोडलेला नाही. लोक जर पूर्ण विचार करतील तर ते माझ्याच मताचे व्हावयाचे अशा प्रकारची अपेक्षा आणि या प्रकारची प्रतिज्ञा तत्त्वज्ञान करीत असते. जीवन जर केवळ बुद्धीचेच बनलेले असते तर ही गोष्ट खरी ठरली असती; पण जीवन हे एक अद्‌भुत रसायन आहे. त्याचे हवे तेवढे पृथक्करण करा, तरी त्यात कित्येक अदृष्ट तत्त्वे राहणारच. मानवजात वयात आली तेव्हापासून तिने जीवनाचीं समीक्षा सुरू केली आहे, पण अजूनही तिची गूढता संपली नाही. जसजसे ज्ञान आणि पृथक्करण यांचा विकास होत जातो तसतशी जीवनाची गूढता क्षितिजासारखी पुढे पुढे वाढतंच जाते. म्हणून तत्त्वज्ञान रोज अधिकाधिक परिपुष्ट होत असले तरी जीवनाच्या शोधात आणि मृगयेत त्याची दमछाक होतच राहिली आहे.

म्हणून तत्त्वज्ञान्याला वारंवार थांबून आपली साधने अधिक सूक्ष्म व अधिक तीक्ष्ण करावी लागतात. तर्क जसा प्रामाण्यवादात अडकून बसतो तसे तत्त्व ज्ञान मनोविश्लेषणात सतत अडकून पडत आले आहे. तत्त्वज्ञाने बुद्धी तीव्र करण्याची आवश्यकता स्वीकारली, पण जीवन शुद्ध करण्याची आणि त्यामार्गे जीवन-साक्षात्कार करण्याची शक्ती मिळविण्याची आवश्यकता स्वीकारली नाही. हे कर्तव्य धार्मिकतेने, निष्ठेने स्वीकारले आहे.

—जीवनव्यवस्था : ३००

कवी आणि तत्त्वज्ञ या दोघांचा समन्वय करून धर्माने ज्ञानसाधनेसाठी जीवन-

शुद्धिरूपी जीवनसाधनेची आवश्यकता स्वीकारली. जीवन हेच ज्ञानप्राप्तीचे उत्कृष्ट साधन आहे, आणि ती ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर त्याचा विनियोग पण जीवनविकासासाठीच आहे एवढे समजल्यानंतर कवीच्या दर्शनाची चमक आणि तत्त्वज्ञाचे पृथक्करण या दोन मार्गांनी साक्षात्काराचा रस्ता धर्माने आपलासा व अधिकृत केला.

यात जीवनशुद्धीची स्पष्ट कल्पना आरंभी आरंभी तयार झाली नाही. शुद्धीच्या नावाने जीवन शून्यरूप–रहस्यरहित–करून टाकणारे कितीतरी पंथ झाले. जीवनात संयम हवा, तप हवे, वीर्य हवे असते. ते आणण्याऐवजी कित्येक लोकांनी जीवनाला जीवनविन्मुख करण्याचा प्रयत्न केला. आपल्या बैराग्यांमध्ये याचे कितीतरी दाखले मिळतात. जादू, किमया, जडीबुट्टी, ज्योतिष आणि मंत्रसाधना अशा विचित्र प्रवृत्ती बैराग्यांमध्ये दिसून आल्या आहेत खऱ्या. पण बैराग्यांच्या शून्यतेच्या आदर्शात त्या मिसळून जाणाऱ्या नाहीत. ज्या वृक्षवनस्पतीपासून ईश्वराने माणसाला वेगळे केले त्यांचेच जीवन पुनः स्वीकारण्यात ईश्वराचा पराजय करण्यासारखे आहे. त्यात धार्मिकता नाही. धर्मविजय कोठून असणार ?

धर्माची खरी प्रवृत्ती मनुष्य जीवनाचे क्षुद्र प्रवाह एका बाजूला खोल करायचे आणि नंतर त्यांना योग्य दिशेने वळवून त्यांचे बलवान आणि वेगवान प्रवाह बनवायचे यात सामावलेली असते.

तत्त्वज्ञानात अनेक वाद उत्पन्न होत असतात. धर्म ही जिवंत वस्तू असल्यामुळे त्यात अनेक पंथ व साधना तयार होत असतात. जोपर्यंत जिवंत लोकांच्या हाती हे पंथ व साधनक्रम राहतात तोपर्यंत हे सर्व प्रयोगरूप असतात ही गोष्ट विसरता येणार नाही. पण नंतर जड लोक या प्रयोगांना तंत्रांचे रूप देऊन टाकतात, आणि नवे किंवा अधिक अनुभव घेण्यास नकार देतात. पंथ वाढण्यात नुकसान असे काही होत नाही, पण न्यायबुद्धीने या प्रयोगांच्या परिणामांची देवाण घेवाण करण्याची तयारी ठेवली पाहिजे. भगवान बुद्धांनी आत्यंतिक तपस्येच्या मार्गाचा अनुभव घेऊन त्याची व्यर्थता जाहीर केली. त्यांच्या प्रयोगाचा हा निष्कर्ष कित्येकांनी अंतिम मानला आणि कित्येकांनी सुरुवातीपासूनच त्याला विरोध केला. भौतिकशास्त्रज्ञ जसे तटस्थपणाने सिद्धान्त घडवितात आणि सोडून देतात, पुनः तपासून पाहतात आणि त्यांत सुधारणा करतात, आणि शेवटी ते अनुभवालाच प्रमाण मानून निष्ठावंत राहतात, तसेच धर्ममार्गांतही व्हावयास हवे. पण येथे व्यक्तिनिष्ठा, ग्रंथनिष्ठा किंवा वचननिष्ठा, मताग्रह, पक्षाभिमान, स्थलाभिमान हे नडत आले आहेत, आणि सत्तेचा लोभ त्यात मिसळून सर्वच सडले आहेत. धर्म जिवंत राहिला नाही तर विषारी बनून जीवनसमस्ताला तो मारून टाकत असतो. धर्मासारख्या तीव्र वस्तूची विकृती त्याला मारकच असू शकते.

—जीवनव्यवस्था : ३००–३०१

२२. सदाचार ही सर्वश्रेष्ठ कला

सदाचार ही सर्वश्रेष्ठ कला होय. सदाचारातच कलायुक्त जीवन असते. रूपाच्या उपासनेपेक्षा प्रेमाची उपासनाच श्रेष्ठ असते. लैला आणि मजनू यांची कथा रूढ करणाऱ्या सूफी कलावंतांनी मजनूला सुदामाचा दुसरा अवतार कल्पून आणि श्यामा लैलाला कृष्णरात्रीचे कुसुम कल्पून हीच गोष्ट स्पष्ट केली आहे की उच्च कलेने बाह्य-रूपाची उपासना करू नये. घराच्या दिवाणखान्यात हरणाच्या शिराचे किंवा शिंगांचे प्रदर्शन करणाऱ्या मनुष्याला भलेही सौंदर्याचा उपासक समजावे, पण त्याचे जीवन कलाशून्य असते या बाबतीत काही शंका तर नाही ना ? मग शत्रूच्या कवट्या गोळा करणाऱ्या लोकांना तुम्ही जंगली, रानटी का म्हणता ? शिकारी जीवन जगणाऱ्या राष्ट्रांकडून जर कलेचे धडे शिकायला आपण बसलो तर कला व विकला यांच्यात संकर किंवा भेसळ झाली तर त्यात नवल ते कोणते ? हरणांच्या मुंडक्यांनी आपला दिवाणखाना सजविणारा आधुनिक रसिक माणूस आणि जिंकलेल्या लोकांची डोकी ओल्या मातीत गाडून त्यांचा उंच स्तंभ रचणारा तैमूर लंग या दोघांत काळाचा फरक असेल पण जातीचा भेद मात्र नाही. छोट्या छोट्या गोंडस बालकांचे हात तोडून ते फ्लॉवरपॉटमध्ये रचून आपल्या दिवाणखान्याला सजविणाऱ्या माणसाला जर तुम्ही नरपशू राक्षस म्हणत असला तर प्रेमधर्माला विसरून कला विकसित करू न पाहणाऱ्या माणसाला तर नावच देता कामा नये ! **ते केन जानीमहे** ।

—जीवननो आनंद : ४२२-२३

२३. पाहिजेत जीवनकलाकार

आपल्याकडे डॉक्टर, वैद्य, एंजिनिअर, वकील वगैरे त्या त्या शाखेतील विशेषज्ञ खूप झाले आहेत. पण समग्र संस्कृतीच्या, संपूर्ण जीवनाच्या जीवनशास्त्रज्ञांचा अभाव आहे. संस्कृतीची चर्चा करणारे अध्यापक आपणांस मिळतील, पण संपूर्ण समाजाला मार्गदर्शन करणारे राष्ट्रपिता किंवा ऋषी समाजात किती आहेत ? राजा व सरकार यांच्याशिवाय चालू शकेल पण जीवनऋषी, समाजधुरीण यांच्याशिवाय चालू शकणारच नाही हे ज्यादिवशी आपणांस समजेल त्या दिवशी आपण आपले समाजनेते तयार करू. मधमाशांची एक राणी गेली तर त्या लगेचच दुसरी राणी तयार करायला सुरुवात करतात...व्यक्तीप्रमाणे समाजही मातृमान, पितृमान, आचार्यवान

व्हायला पाहिजे; तेव्हाच सामाजिक जीवनात स्वास्थ्य, सामर्थ्य आणि संगीत अस्तित्वात येईल. समाज जेव्हा मातृमान, पितृमान आणि आचार्यवान होईल तेव्हा जीवनकला पद्धतशीरपणे वाढीस लागेल, ललितकला आणि हुन्नरकला परस्परांना पोषक बनतील व वर्गविग्रहाला वाव राहणार नाही.

—जीवननो आनंद : ५२८–५२९

२४. प्रगतिशील साहित्य

स्वतंत्रता, समता, बंधुता, परिश्रम, त्याग, बलिदान, प्रेम, सेवा, अज्ञानविनाश, ज्ञानवृद्धी, ज्ञानप्रचार, व्यसनविनाश, आत्मसंयम, संस्कारी रसिकता, दुःखहरण, शक्तिसंघटन,–थोडक्यात जीवनशुद्धी, जीवनसिद्धी आणि जीवन समृद्धी ही प्रगतीची लक्षणे आहेत. म्हणून साहित्यात जीवन-परायणता असावयास पाहिजे, आणि शिवाय वरील तत्त्वांचे प्रसन्न प्रतिबिंब त्यात पडावयास पाहिजे...

संपूर्ण जनतेला जे साहित्य सूक्ष्म विचारक्षम, संस्कारी, समर्थ आणि कार्यकुशल बनविते तेच साहित्य प्रगतिशील म्हणता येईल. अशा साहित्याने जीवनाचा साधेपणा वाढेल पण त्यात सुतकीपणा येणार नाही, प्रसन्न गंभीरता बाढेल पण समाजाचे मुख खिन्न बनणार नाही, समाजात वीरता वाढेल पण क्रूरता वाढणार नाही; वंश, वर्ण आणि वर्ग यांत जागृती येईल पण विद्वेष पसरणार नाही. वंश, वर्ण आणि वर्ग यांच्यामध्ये समता आणि सहकार वाढून शेवटी एकता प्रस्थापित होईल.

—अवारनवार : १०२

२५. साहित्याची प्रेरणा

धीरोदात्त जीवन अथवा उत्कट चिंतनाशिवाय भावोत्कट साहित्य निर्माण होऊच शकत नाही. पुरुषार्थ भलेही आपला असो की दुसऱ्याचा असो, आंतरिक जीवनात असो की बाह्य घटनांमध्ये असो, व्यक्तिगत असो की समाजगत असो, पुरुषार्थच साहित्याला खरी प्रेरणा देणारा असतो. जीवनाच्या व्याकुळ वेदनेतून साहित्य निर्माण

होत असते याला ना नाही. पण खरे पाहता ती वेदनासुद्धा पुरुषार्थाचीच प्रसव-वेदना असते आणि एवढ्यासाठीच ती साहित्याला प्रेरक होत असते. जे साहित्य पुरुषार्थाला वंचित होते ते स्वतः तर क्षीण बनतेच पण ज्या समाजात ते पसरते त्या समाजालाही अल्पसंतुष्ट, अदूरदर्शी आणि क्षीणसत्त्व करीत असते.

(मराठी साहित्य संमेलन, कल्याण)

—कालेलकर अध्ययन ग्रंथ : ४५९

२६. कला अशी नको

कला कोणत्याही काळात धर्माचे स्थान घेऊ शकणार नाही, आणि ती धर्माच्या विरुद्धही होता कामा नये. कला भलेही अंतिम सत्यापर्यंत पोहोचू न शको, पण कलेने सत्याचा द्रोह तर करताच कामा नये. कलेमध्ये संपूर्ण पुरुषार्थ न सामावलेला असो, पण कला ही पुरुषार्थाला विघातक तर होताच कामा नये. समाजोपयोगी अशा कोणत्याही श्रमाच्या कामात कला पाहण्याइतकी दृष्टी आपल्यापाशी नसली तरी कलेने अशा मजुरीचा तिरस्कार तर करताच कामा नये. श्रमाचे, मजुरीचे जीवन विषम की विषादमय तर नकाच करू.

श्रमपूर्ण जीवनाचा (मजुरीचा) द्रोह करून जर जीवन पण टिकू शकणार नाही तर कला कितपत टिकणार होती?

कोणी म्हणतील, कलेला इतक्या बंधनांत जखडून टाकल्यावर तिचे क्षेत्र तरी केवढेसे राहणार? याला उत्तर असे आहे की ही कलेला घातली जाणारी बंधने नसून ते तिचे संरक्षक भाऊ आहेत. त्यांच्या सहवासातच कला उमलू शकते, फुलू शकते. त्यांची तिला मदत मिळणार नसेल तर कलेचे नाव धारण करणारी कलेची नित्य-वैरिणी विकला क्षणाक्षणाला कलेला गुदमरवून मारून टाकील. भावांच्या सहवासात बहीण जीवनव्यापी क्षेत्रात विहार करू शकेल. भाऊ बहिणीचे क्षेत्र संकुचित करणार नाहीत, पण तिला संपूर्ण क्षेत्राचा अधिकार देत असतात, आणि ते उपभोगण्यासाठी परिस्थितीची अनुकूलता निर्माण करून देतात.

—जीवनचो आनंद : ४२२-४२३

२७. वीररस

वीररस हा मानवद्रोही नाही. वीररस परम कल्याणकारी, समाजहितैषी, धर्मपरायण व आर्यवृत्तीचा द्योतक आहे. त्याला तसाच ठेवावयास पाहिजे. वीररसाचे पोषण व संगोपन वीरांच्याच हाती राहावयास पाहिजे.

जुन्या काळातील वीरकथा आपण जरूर वाचाव्या, आदरपूर्वक वाचाव्या, पण त्यातून जुनी प्रेरणा मात्र घेऊ नये. हीन समाधान आपणास त्याज्यच वाटावयास हवे. जीवनाच्या वीर्याचा नवा आदर्श स्वतंत्र रीतीने फुलवून, त्याच्यासाठीची जुनी तत्त्वे वीरकथांमधून जेवढी मिळू शकतील तेवढी शोधून काढून ती जरूर वापरावी. पण वीररसाच्या जुन्या क्रूर किंवा जीवनद्रोही आदर्शात अडकून पडू नये. एवढेच लक्षात ठेवावयास पाहिजे की जीवनातून जर वीरता निघून गेली तर त्या क्षणापासूनच ते सडू लागेल आणि शेवटी एकही सद्गुण टिकून राहणार नाही.

...शान्तिप्रिय, अहिंसापरायण, सर्वोदयकारी, समन्वयप्रेमी संस्कृतीचा वीररस त्यागरूपानेच प्रकट व्हावयाचा. आत्मविलोपन, आत्मबलिदान हीच जीवनाची खरी वीरता आहे. त्याचे असंख्य भव्य प्रसंग कलेचे विषय होऊ शकतील असे आहेत. असे प्रसंग कलेला उन्नत करतात आणि लोकांना जीवनदीक्षा देतात.

—जीवनभारती : ८५-८६

वीररस त्याच्या शुद्ध स्वरूपात आत्मविकास सुचवीत असतो. सामान्य स्वस्थ स्थितीत माणूस आपल्या आत्मतत्त्वाची उत्कटता अनुभवत नाही; कारण तो देहाशी एकरूप झालेला असतो. जेव्हा असाधारण प्रसंगामुळे कसोटीची वेळ येते तेव्हा मनुष्य आपल्या शरीराच्या बंधनापासून वर चढतो. त्यातूनच वीररस प्रकट होत असतो.

—जीवनभारती : ९१

प्रेमरस :

खऱ्या प्रेमरसात स्वतःच्या व्यक्तित्वाच्या पलीकडे (वर) जाऊन इतरांशी तादात्म्य अनुभवायचे असते. म्हणूनच प्रेमरसात आत्मविलोपन आणि सेवा मुख्य असतात. प्रेम हा आत्म्याचा गुण असतो, म्हणूनच ते शरीरावर विजय मिळवीत असते. प्रेम हाच आत्मा होय. अमर प्रेमाहून आत्मा वेगळा नसतोच असे सर्व प्रेमिकांनी, भक्तांनी आणि वेदांती तत्त्वज्ञांनी सुद्धा स्पष्ट सांगितले आहे.

—जीवनभारती : ९१

२८. आनंदाचे निर्झर

जीवनाचा आनंद प्रत्येक माणसाला वेगवेगळ्या क्षेत्रांत गवसतो. जास्तीत जास्त लोकांनी खावेप्यावे आणि मुलांबाळांत राहावे यातच आनंद मिळत असतो. राष्ट्र जेव्हा दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडलेले नसेल आणि जर त्याने काही अदम्य महत्त्वाकांक्षा बाळगलेली नसेल तेव्हा माणसाची हीच स्थिती स्वाभाविक असते असे समजावयास हरकत नाही. सुखी व निश्चित कौटुंबिक जीवनात धर्माचे संस्कार, ज्ञानाची थोडीशी निष्ठा व सहज प्राप्त झालेली समाजसेवा एवढे वृद्धिंगत केले म्हणजे जीवन पूर्ण झाले. कोट्यवधी लोकांसाठी यापेक्षा अधिक उत्कट जीवन नसते.

जीवनाच्या स्वाभाविकतेत निसर्गाशी थोडाअधिक परिचय, नात्यागोत्यातील लोकांना भेटण्याच्या निमित्ताने अथवा यात्रा उत्सवाच्या प्रसंगी जो आपण थोडासा प्रवास करीत असतो त्याच्याद्वारा होत असतो. आणि धार्मिक संस्काराचे विधी व पूजा, व्रते व उत्सव वगैरे येत राहिल्याने स्थिरपणाने निर्माण होणारे दोष सहज नाहीसे होत असतात.

पण माणसाला एवढ्यावर समाधान वाटत नाही. सामान्यपणे जगत राहून जीवनाची सर्वसाधारण संपूर्णता त्याला आकर्षत नाही. त्याला असे जीवन अळणी वाटते. जीवनाच्या काही एका किंवा अनेक अंगांचा संकोच करूनही दुसऱ्या कोणत्या तरी विशेष दिशेत माणूस उत्कटतेने धावू इच्छितो. कोणी प्रयोगवीर होतो, कोणी ज्ञानवीर होतो, कोणी प्रवासवीर होऊन परिव्राट, संन्यासी बनतो, कोणी एखाद्या संघटनेचा अग्रणी बनून सामुदायिक पराक्रम करतो, कोणी आत्म्याच्या शोधात त्यागवीर बनतो, कोणी गरुड आणि चंडोल यांनाही हरवून कल्पनाकाशात उत्तरोत्तर अधिक उंच उंच भराऱ्या व झेपा घेतो. कोणी रचनाकुशल स्थपती बनतो, तर कोणी नगरसंस्थापक म्हणून अमर होऊन राहतो. कोणाला तर राष्ट्रपती किंवा राष्ट्र-पिता बनल्याशिवाय राहवत नाही. आणखी काही तर असे असतात की जे कोणत्याही एका राष्ट्राविषयी किंवा संघटनेविषयी निष्ठा न शिकता संपूर्ण मनुष्यजीवनासाठी नवे बीरबहादर बनून जातात. कोणी सत्याचा शोध करतो तर कोणी शिवाची उपासना करतो. कोणी सामर्थ्य वाढवितो तर कोणी भावनांना खेळवितो. प्रत्येकाचा आनंद वेगवेगळा असतो.

असे सर्व असूनही सौंदर्याची उपासना, हस्तकला (हुन्नर) आणि कलेचे अनुशीलन, निसर्गाचे निरीक्षण तसेच जीवनकलेचे शिक्षण हे आनंदाचे खास विषय गणले जातात. प्रत्येक माणसाच्या जीवनाची ही बाजू कमीअधिक प्रमाणात विकसित झालेली असते. जीवनाकाशात जर हा आनंदसूर्य तळपत नसेल, हा आनंदचंद्र मधुमंद स्मिताने चमकत नसेल तर कोणाला जीवनात रस वाटेल?

आनंद ही वस्तूच अशी आहे की त्याचा अनुभव घेण्यासाठी इतरांना निमंत्रित करण्याने, सहभागी करून घेण्याने तो द्विगुणित होत असतो. दुःखे वाटून घेतली तर त्यांची वेदना सहन करण्याइतकी सौम्य होत असते, आणि सुखात इतरांना सहभागी करून घेतल्याने ते अधिकच वाढत असते, बऱ्याच वेळा ते सात्विक बनत असते; आणि त्याच्यापासून सुखापेक्षासुद्धा निराळा असा नवाच आनंद प्राप्त होत असतो. सर्वांना अशा आनंदात सहभागी कसे करता येईल? प्रत्येकाचे जीवन वेगवेगळ्या स्वतंत्र प्रवाहातून वाहत असते. सर्वच जगाला काही आपण आपल्या जीवनाचे साथी बनवू शकत नाही. पण कलांद्वारा—साहित्य, संगीत, चित्र, स्थापत्य, रचना आणि घटना यांच्या द्वारा आपण असंख्य लोकांना आपल्या आनंदाची झलक दाखवू शकतो, दर्शन घडवू शकतो, आणि जर विशिष्ट प्रकारची शक्ती विकसित केली असेल तर जेथे असंख्य लोकांना आनंदप्रतीती होत नसेल अशांनाही आनंद ग्रहण करण्याची शक्ती अथवा क्षमता प्राप्त करून देऊ शकतो. हिलाच 'कलादृष्टी' म्हणतात.

—जीवननो आनंद : ५–६

कलेची अनुभूती ज्याला आलेली असते तो एकलकोंडा राहू शकतच नाही. त्याला दुसरे कोणी जर मिळाले तर तो स्वतःचा आनंद स्वतःसाठी या ना त्या रीती लिहून किंवा साकार करून ठेवू शकतो. एकांतात राहून ध्यानमग्न होणारे ऋषीसुद्धा तत्त्वप्राप्तीचा आनंद होताच गाऊन उठतात, त्यांना गीत स्फुरते; काही झाडांच्या साली‌वर, हाडकांच्या पाटीवर किंवा दगडाच्या पृष्ठभागावर कोरून ठेवीत असतात. आनंदाची अशी सर्जकता अदम्य असते आणि या सर्जनामुळे पुनः नव्या आनंदाला ज्या नव्या धारा फुटतात त्या तर आणखीनच वेगळ्या.

—जीवननो आनंद : ६

अशाच सिसृक्षेमुळे (सर्जनेच्छेमुळे) परमात्म्याने एकाचे अनेक होण्याचे पसंत केले, ही अनंत लीलामयी सृष्टी निर्माण करून तिच्यात अनंत अवतार घडविले, आणि तिच्यात सनातन म्हणजे नित्यनूतन यौवन भरून टाकले. विधात्याचा हा आनंद तो कोणाला अर्पण करणार? 'एकाकी न रमते' म्हणजे तो एकाचा अनेक बनला; आणि हे अनेकत्व कितीही जरी वाढत राहिले तरी मूळ एकत्व भंग पावत नाही अशा अनुभवाचा आनंद त्या परमेशाने मिळविला, अनुभवला. विविधतेमध्ये एकता अनुस्यूत असते; एवढेच नाही तर ती खंडित न होता अखंड राहात असते, आणि अधिक परिस्फुट, आविर्भूत होत असते. अशा अनुभवातच दैवी समाधान वसत असते. जगात कितीही जरी भ्रमंती केली तरी आकाशातील तारे बरोबरच राहतात हे पाहून जसा आपण आपल्या घरीच आहोत असा अनुभव येत असतो

तसेच विविधतेत वसणारी एकता अनुभवण्याने सर्वत्र एकच तत्त्व भरलेले आहे याचा अद्वैतानंद होत असतो.

ज्याची वृत्ती या अद्वैताला ओळखू लागते त्याच्यामध्ये आत्मनेपदी आणि परस्मैपदी अशा दोन्ही भावना फुलतात, आणि या दोघींमध्ये एक उभयपदी एकराग तयार होत असतो. कलावृत्तीने प्रेरित होऊन लिहिलेल्या नोंदी, टिपणे, रचलेले निबंध आणि दिलेली भाषणे यांना जरी कितीही परस्मैपदी (Objective) केले तरी त्यांचा मुख्यसूर आत्मनेपदीच (Subjective) राहतो. या लिखाणांतही एकच प्रकार दिसून येईल. त्यात असाधारण असे काही नसले तरी मौलिकता तर असतेच. आणि त्यामुळेच समानधर्मा वाचकांसमोर ती ठेवण्यात कोणताच क्षोभ होत नसतो.

—जीवननो आनंद : ६–७

विभाग सहावा

सौंदर्य

काका हे असामान्य प्रतीचे सौंदर्यप्रेमी आहेत. ते जीवनातील विविध प्रकारच्या सौंदर्यावर लुब्ध होतात. निसर्गातील सौंदर्याचा त्यांनी भरपूर आस्वाद घेतलेला आहे. निसर्ग सौंदर्याचे त्यांना कमालीचे आकर्षण वाटत असे. त्यांनी निसर्गातील नद्या, डोंगर, झाडे, समुद्र, ढग, तारका, सूर्य, चंद्र, सरोवरे, पक्षी, पशू, बदलते ऋतू, दुपारचे रणरणते ऊन्ह, रात्रीचे शुभ्र चांदणे, सागराची भरती–ओहोटी यांची केलेली वर्णने सौंदर्याने ओतप्रोत भरलेली आहेत. त्यांच्या लेखणीतून उतरलेला निसर्ग जिवंत चैतन्याने सळसळणारा, खेळकर, आनंदी, नित्यप्रफुल्ल, टवटवीत व चित्ताला मोहविणारा आहे. त्यांनी केलेले हिमालयाचे, गंगा, यमुना, नर्मदा, गोदावरी, मार्कंडी, कृष्णा यांची वर्णने बहारदार तर आहेतच, पण सर्व निसर्ग इतका जिवंत रेखाटला आहे की तो जणू आपणाशी बोलायला लागतो. काकांचे निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण अप्रतिम आहे व त्यात त्यांची अभिजात कल्पकता, रसिकता, सौंदर्यग्राही दृष्टी आणि मनाची प्रसन्नता अत्यंत विलोभनीय रीत्या व्यक्त झाली आहे.

१. सृष्टीचे रहस्य
२. सृष्टिसौंदर्य नित्य ताजे टवटवीत
३. निर्हेतुक आनंद
४. सौंदर्य आणि सत्य
५. लावण्य
६. नदीमुखेनैव समुद्रम् आविशेत्।
७. सागर-सरितेचा संगम
८. कृष्णेच्या आठवणी
९. दक्षिणगंगा गोदावरी
१०. गंगामाई
११. यमुनाराणी
१२. बदरीधाम
१३. नगाधिराज
१४. अर्णवाचे आमंत्रण
१५ लाटांचा तांडवयोग
१६. सागराची पूर्णता
१७. रण की सरोवर ?
१८. हिंदुस्थानची व्याख्या
१९. परमस्नेही अंधकार
२०. पक्षी होणे आवडेल

१. सृष्टीचे रहस्य

ज्यात कमी दिसते तो अंधार आणि जास्त दिसते तो प्रकाश; ही व्याख्या जर बरोबर असेल तर दिवसाचा धवल अंधार असतो त्यामुळे आपण पृथ्वी आणि सूर्य हे फक्त दोनच पाहू शकतो. पण रात्री जेव्हा काळा प्रकाश सर्वत्र पसरतो तेव्हा ईश्वराची अनंत सृष्टी प्रकट होत असते आणि विश्व किती विशाल आहे याची थोडी तरी कल्पना येते.

—जीवननो आनंद : ९३

२. सृष्टिसौंदर्य नित्य ताजे टवटवीत

सृष्टिसौंदर्य निरतिशय आनंद देणारे असते हे खरे, एकदा पाहिलेले सौंदर्य पुनः पाहायला मिळत नसते हेही खरे; पण सृष्टिसौंदर्य नेहमी ताजे टवटवीत असते, त्याचा झरा सुकून जाण्याची भीती कधीही बाळगू नये. माणसाच्या प्रतिभेसारखी सृष्टिसौंदर्य दिवसेंदिवस घटत जाण्याची शंकासुद्धा आजपर्यंत कोणाला आली नाही. काही थोडे चित्रकार सृष्टिसौंदर्याला चित्रबद्ध करून ठेवू शकतील एवढ्यासाठीच काही परमेश्वराने एवढी मोठी अद्‌भुत लीला पसरवून ठेविली नाही, आणि जगातील जरी सर्व चित्रकार या निसर्गाच्या सौंदर्याला रंगवायला बसले तरी ते काय सर्वच दृश्ये रंगविणार आहेत? 'अनंत हस्ते कमलावराने देता किती अंकिशि त्वत्करांने?' सौंदर्यप्रवाह अनंत रूपांनी जो शृंगार करीत असतो, क्षणाक्षणाला जो नवा नवा उन्मेष दाखवीत असतो आणि मानवजीवनाचा विचार करता जो कधीही सुकून जाणार नाही, त्याला रेखा, शब्द किंवा वर्ण यांच्यात बांधून ठेवण्याचा प्रयत्न करणे हे किती हास्यास्पद आहे! आणि सृष्टिसौंदर्य हे कधी काळी तरी बांधले गेले आहे का? जे बांधले जाते ते मेलेच म्हणून समजा, कारण ते स्थिर होऊन गेले. हसतमुख बालकाचे छायाचित्र काढले तर त्यात त्याचे हास्य कधी व्यक्त होऊ शकेल का? हास्याचे सौंदर्यच त्याच्या अस्थायीपणात असते. त्याला स्थायी केले रे केले की ते विकृत झालेच असे समजावे.

कदाचित् वर्णरेखांनी सौंदर्य व्यक्त करता येणे शक्य आहे. पण शब्दांच्या मार्फत ते कसे होऊ शकेल? शब्दांत तर आपण केवळ आपला आनंदच व्यक्त करीत असतो, दुसऱ्याला तो पकडता येवो की न येवो. शब्दांच्या ठिकाणी अंकनकला नसते पण सूचनकला असते.

—जीवननो आनंद : ४८-४९

३. निर्हेतुक आनंद

माणसे मद्य पिऊन आनंद उपभोगत असतात, तर (पाकोळ्या) पक्षी आंनद पिऊन उन्मत्त होत असतात आणि सबंध दिवस आकाशात भ्रमण करून आपला आनंद अनुभवत असतात. ईश्वराने उडण्याची शक्ती प्रदान केली आहे तिचा आनंद त्यांच्या पंखांत काही केले तरी मावत नाही. देव जसे एक क्षणसुद्धा खंड न पाडता अमृत पीतच राहतात तसे हे पक्षी एक क्षणाचाही उसंत न घेता फिरत, भिरभिरतच राहतात. उपयुक्ततावादी कंजूष मनुष्य भलेही त्याचा सिद्धांत रचो की **नहि कुर्यान्निष्फलं कर्म जलताडवनत्**। पण जीवनानंद ओळखणारी लहान मुले सृष्टीच्या अंतापर्यंत कोणताही लाभ, फायदा–तोटा न पाहता जलताडन करणारच करणार; आणि पक्षी मनात कोणताही बाह्य उद्देश न ठेवता इथे तिथे भिरभिरतच राहणार. आनंदात प्रयोजन? छट.... अशी गोष्टच करू नका. आनंद का स्वभावतः वैश्य आहे?

—जीवननो आनंद : ५३

४. सौन्दर्य आणि सत्य

कलेच्या द्वारा परमतत्त्वाची प्राप्ती होईलच असे तर कोणी निश्चितपणे सांगू शकत नाही. कलेची साधना पूर्ण झाल्यावर कलातीत आणि निष्कल अशा परम तत्त्वाला पोहोचण्यासाठी दुसरी साधना करावयाची राहात असेल आणि ती साधना सिद्ध झाल्यानंतरच सत्यनारायणाचे दर्शन होत असेल. विशुद्ध कला तत्त्वज्ञानाचे स्थान कधीच घेऊ शकत नाही. बऱ्याच वेळा कला अद्‌भुत रीतीने तत्त्वाचे सूचन करीत असते, पण तत्त्वाचा शोध करू शकत नाही. यासाठीच तर सत्यनिष्ठेच्या स्वतंत्र व तर्ककर्कश साधनेची जरूर असते. सौंदर्यदर्शन सत्यशोधनाची गरज भागवू शकणार नाही.

सत्य सुंदर असते आणि सौंदर्य हे पण एक महान सत्य असते. पण सर्व सत्य आकर्षक किंवा रमणीय असेलच असे म्हणता येणार नाही, आणि सौंदर्यानुभव केवळ सत्यघनच आहे असेही म्हणता येणार नाही. एवढे स्पष्ट आहे की सत्यं शिवं आणि सुंदरम् या तीन एकाच मंगल तत्त्वाच्या स्वतंत्र विभूती असल्याने या तिघांत परस्परानुकूलता आणि सुसंगती असायलाच पाहिजे. तिन्ही स्वतंत्र आहेत, स्वयंभू आहेत

याविषयी शंका नाही. एकामधून दुसऱ्याची उत्पत्ती किंवा उपपत्ती करू शकलो असतो तर आपल्या तर्ककठोर पूर्वजांनी या तिघांना ईश्वराच्या तीन विभूती मानल्या नसत्याच.

सत्याचा शोध आणि कलेची प्रतीती हे दोन्ही व्यापार वेगळे आहेत. तत्त्वाचा गड जिंकण्यासाठी हे वेगवेगळे हल्ले आहेत. दोघांच्या मागील वृत्ती वेगळ्या असल्याने त्यांची फलप्राप्तीही वेगळी असते. कलारसिक स्वतःच्या वृत्तींना आणि भावनांना कोमल, उत्कट आणि शीघ्रचेतन (तरल) बनवून टाकतो, परंतु सत्यशोधक स्वतःच्या वृत्ती व भावना यांना ताब्यात ठेवतो, उलट त्यांचा संयम करून स्वतःची जिज्ञासा तीव्र करून बुद्धीला एकाग्र, अनन्यनिष्ठ आणि पारगामी बनवितो. मूळ साधनेतच एवढा फरक असतो. सत्यशोधकाला जे गवसते तेवढ्याने कलादर्शीला संतोष होत नाही, आणि कलादर्शी जेवढ्यावर संतोष मानतो तेवढ्याने तर सत्यशोधक अस्वस्थ होऊन जातो. कलावंत जेथे विराम पावतो तेथूनच सत्यशोधक आरंभ करतो. कलेचे दर्शन हे विजेच्या चमचमाटासारखे असते, तर सत्याचा शोध वैज्ञानिकाच्या प्रयोगाइतका खोल असतो.

आणि आता तर एक गोष्ट सर्वांनी मान्य केली आहे की सत्याचे खोल खोल शोध कलादृष्टिशिवाय संभवतच नाही. मोठमोठे वैज्ञानिक आणि तत्त्वज्ञ मुळात कलादर्शक होते असे आता दिसून येते.

पण या शोधामुळे कलावंतांची जेवढी प्रतिष्ठा वाढली आहे तेवढी त्यांची जबाबदारीही वाढली आहे. जर ते कलादर्शनावरच समाधान मानून बसून राहतील तर ते जीवनद्रोही समजले जातील. 'कलावंताची कलाकृती पहा, त्याच्या जीवनाचा विचार करू नका' असे रसिक लोक आजपर्यंत म्हणत आले आहेत. आता तर कलादर्शी जीवनवीर बनला नाही तर त्याला समाज जी काही सजा देऊ शकेल ती व्हायलाच पाहिजे असे सर्वजण म्हणतील. फुकटात मिळालेले भांडवल सुखाने वापरून त्यावर चैन करण्याचे दिवस आता राहिले नाहीत.

—जीवननो आनंद : ४९६

५. लावण्य

मुक्ताफलेषु छायायाः तरलत्वम् इवान्तरा।
प्रतिभाति यदंगेषु तल्लावण्यमिहोच्यते ॥

मोत्याची उपमा, मोत्यानंतर ताज्या फळाची उपमा आणि छाया किंवा कान्तीच्या तरलत्वाची कल्पना सर्वच सुंदर आहे. लावण्य म्हणजे निरागस आरोग्य आणि यौवनाची कान्ती. हे उषेच्या व संध्येच्या मुखावर अखंड व नेहमी असतेच. आणि म्हणूनच या उभय संध्यांमध्ये इतकी मोठी पवित्रता आलेली आहे. संध्यावंदनापेक्षाही संध्यादर्शन मला नेहमी पुण्यकर वाटलेले आहे.

—जीवननो आनंद : ६९

६. नदी मुखेनैव समुद्रम् आविशेत्

जीवनाच्या प्रतीकासारखी असणारी नदी कोठून येते आणि कोठे जाते? शून्यातून येते आणि अनंतात सामावून जाते. शून्य म्हणजे अत्यल्प, सूक्ष्म पण प्रबल; आणि अनंत म्हणजे विशाल आणि शांत. शून्य आणि अनन्त दोन्ही सारखेच गूढ आहेत, दोन्ही अमर आहेत, दोन्ही एकच आहेत. शून्यातून अनंत–ही सनातन लीला आहे. कौसल्या किंवा देवकी यांच्या प्रेमात सामावण्यासाठी जसे परब्रह्माने बालरूप धारण केले, तसे कारुण्याने प्रेरित होऊन अनंत स्वतःच शून्यरूप धारण करून आपल्यासमोर उभे राहते. जसजशी आपली आकलनशक्ती वाढत जाते तसतसे शून्य विकसित होत जाते आणि स्वतःचाच विकासवेग सहन न होण्याने मर्यादा ओलांडून किंवा तोडून अनंत बनून जाते–बिंदूचा सिंधू होऊन जातो.

मानवी जीवनाची पण अशीच स्थिती आहे. व्यक्तीतून कुटुंब, कुटुंबातून जात, जातीतून राष्ट्र, राष्ट्रातून मानव्य आणि मानव्यातून भूमा विश्व अशा हृदयाच्या भावना विकास पावत जातात. स्वभाषेद्वारा आपण प्रथम प्रथम स्वजनांचे हृदय समजत असतो, आणि शेवटी संपूर्ण विश्वाचे आकलन करीत असतो. गावातून प्रांत, प्रांतातून देश आणि देशातून विश्व असा आपल्या स्वचा विकास करून सर्वांमध्ये सामावून जात असतो.

नदीचा आणि जीवनाचा क्रम–(रीत) सारखाच असतो. नदी स्वधर्माला जबाबदार राहात असते आणि आपली किनाऱ्याची मर्यादा सांभाळून असते, व त्यामुळेच प्रगती करीत असते; आणि शेवटी नामरूपाचा त्याग करून समुद्रात विलीन होऊन जात असते. ती विलीन होते तरीही ती नष्ट मात्र होत नाही; ती वाहातच राहते. हा आहे नदीचा क्रम. जीवनाचा आणि जीवनमुक्तीचा पण तसाच क्रम असतो.

जीवनदायी शिक्षणाच्या क्रमाविषयी यावरून आपण कोणता बोध घेऊ?

—जीवनलीला : १५

७. सागर–सरितेचा संगम

नदी जेव्हा आपला पती सागराला मिळते तेव्हा तिचे पूर्ण स्वरूप बदलून जात असते. या प्रवाहाला नदी म्हणून ओळखणे कठीण होऊन जाते. सातान्याजवळ माहुलीपाशी कृष्णेचा आणि वेण्णेचा संगम मी पाहिलेला. पुण्यास मुळा आणि मुठेचा संगम. पण नदी–सागराचा संगम पहिलावहिला पाहिला तो कारवारला–उत्तरेकडील सुरूच्या वनाच्या सीमेवर. आम्ही दोघे भाऊ समुद्र वेलाच्या रेतीत खेळता खेळता, फिरता फिरता पुढे चालत होतो. रोजच्यापेक्षा पुष्कळ दूर गेलो आणि एकाएकी एक सुंदर नदी समुद्राला येऊन मिळताना पाहिली. दोन नद्यांच्या संगमापेक्षा नदी समुद्राचा संगम अधिक काव्यमय असतो. दोन नद्यांच्या संगमाचा आनंद गूढ–शांत असतो; तर सागर–सरिता जेव्हा एकमेकांना मिळतात तेव्हा दोघांनाही शुद्ध उन्माद दिसून येतो; आणि या उन्मादाचा कैफ आपल्याला न चुकता चढतो. नदीचे पाणी शांत आग्रहाने समुद्रामध्ये जोरात घुसत असते. तर कधीही आपली मर्यादा न सोडण्यासाठी प्रसिद्ध असलेले समुद्राचे पाणी चंद्रम्याच्या चिथावणीप्रमाणे क्षणात नदीला वाट करून देते, आणि क्षणात तिला आडवे येऊन सामना करते. नदी आणि सागराचा समोरासमोर जेव्हा सत्याग्रह चालतो तेव्हा अनेक प्रकारची दृश्ये बघायला मिळतात. समुद्राच्या लाटा पाणी तिरपे कापत कापत येतात तेव्हा पाण्याचे एक कारंजे एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत धावत जाते. काही काही ठिकाणी पाणी गोल गोल फिरून भोवरा बनवीत असते. सागराचा जोर वाढला म्हणजे नदीचे पाणी मागे मागे हटत जाते. अशावेळी दोन्ही बाजूंच्या काठावर तिच्या माराचा तडाखा जोराचा असतो. नदीची उलटी दशा पाहून त्याचा फायदा घेणाऱ्या लबाड होड्या पूर्ण वेगाने आत घुसत असतात. त्यांना माहीत असते की या भाग्याच्या भरतीबरोबर जेवढे आत जाता येईल तेवढे खरे. आणि नंतर समुद्राची ओहोटी सुरू होते आणि सागराच्या लाटा आपला विरोध सोडून देऊन बाहू पसरून नदीच्या पाण्याचे स्वागत करतात, तेव्हा मतलबी होड्यांना आपली त्रिकोणी पगडी फिरवायला वेळ लागत नाही. वारा कोणत्याही दिशेने वाहिला तरी जोपर्यंत प्रत्यक्ष विरोध नसतो तोपर्यंत कोणता ना कोणता फायदा साधण्याचे चातुर्य या वैश्यवृत्ती होड्यांतच असते. त्यांच्या पगडीची म्हणजे शिडाची रचना आणि बांधणीच अशी केलेली असते.

—जीवनलीला : १२–१३



८. कृष्णेच्या आठवणी

कृष्णा ही महाराष्ट्राची आराध्य देवता. तिचा एक थेंब जरी पोटात गेला तर आपण पावन होऊन जातो. ज्याच्या पोटात कृष्णेचा एक बिंदूही गेलेला असेल तो महाराष्ट्रीयत्व विसरणार नाही. श्रीसमर्थ आणि शिवाजी महाराज, शाहू आणि बाजीराव, घोरपडे आणि पटवर्धन, नाना फडणवीस आणि रामशास्त्री प्रभुणे-- थोडक्यात सांगायचे म्हणजे महाराष्ट्राचे साधुत्व आणि वीरत्व, महाराष्ट्राची न्यायनिष्ठा आणि मुत्सद्दीपणा, धर्म आणि सदाचार, देशसेवा आणि विद्यासेवा, स्वतंत्रता आणि उदारता, सर्वच कृष्णेच्या वत्सल कुटुंबात पालनपोषण होऊन वाढलेले आहे. देहू व आळंदीचे पाणी कृष्णेलाच मिळते. पंढरपूरची चंद्रभागासुद्धा भीमा नाव धारण करून कृष्णेलाच मिळते. 'गंगेचे स्नान आण तुंगेचे पान' या म्हणीत जिचा गौरव स्वीकारायचा आहे ती तुंगभद्रा कर्नाटकाच्या प्राचीन वैभवाच्या स्मरणासह कृष्णेतच एकरूप होऊन जाते. खरे सांगायचे तर महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगण (आंध्र) या तीन प्रांतांचे ऐक्य साधण्यासाठीच कृष्णा नदी वाहात आहे. हे तिन्ही प्रांत कृष्णेचे दूध प्यायले आहेत. कृष्णेच्या ठिकाणी पक्षपाती प्रांतीयता नाही.

कृष्णेच्या पाण्यात कितीतरी महाराष्ट्रवीरांचे आणि महाराष्ट्राच्या शत्रूंचे रक्त मिसळलेले असेल! पावसाळ्याच्या चातुर्मासाच्या मस्तीत कृष्णेने कित्येक खेडूत आणि त्यांची जनावरे यांना जलसमाधी दिली असेल! पण कृष्णेला त्याचे काय? मदोन्मत्त हत्ती तिच्या पाण्यात विहार करतात आणि वीतराग साधू तिच्या काठावर तपश्चर्या करतात; कृष्णेला दोघेही सारखेच. जीवनलीला कशी अगम्य असते!

—जीवनलीला : ७-८

९. दक्षिणगंगा गोदावरी

गंगा आणि गोदा एकच आहेत. दोघींच्या माहात्म्यात थोडाही फरक नाही. फरक असला तर एवढाच आहे की कलिकाळाच्या पापामुळे गंगेचे माहात्म्य अमुक काळी कमी होऊ शकते. गोदावरीचे कधी कमी होतच नाही. श्री रामचंद्राचे अत्यंत सुखाचे दिवस या गोदावरीच्या काठीच गेलेले, आणि जीवनाचा दारुण आघात पण त्याला येथेच पोहोचला. गोदावरी तर दक्षिणेची गंगा.

कृष्णा आणि गोदावरी या दोन नद्यांनी दोन विक्रमशाली महाप्रजांना पोसले आहे.

महाराष्ट्राचे स्वराज्य आणि आंध्राचे साम्राज्य या दोन नद्यांचेच आभारी आहे असे म्हटले तर त्यात थोडीसुद्धा अतिशयोक्ती नाही. साम्राज्ये घडली व भंग पावली, महाप्रजा चढली व पडली, पण या ऐतिहासिक भूमीत या दोन नद्या वाहातच राहिल्या आहेत. या नद्या भूतकाळाच्या गौरवशाली इतिहासाच्या जितक्या साक्षी आहेत तितक्याच भविष्यकाळाच्या महान् आशांच्या प्रेरक आहेत. त्यातही गोदावरीचे माहात्म्य काही वेगळेच, आगळेच आहे. या जितक्या सलिल-समृद्ध आहेत तितक्या इतिहास-समृद्ध पण आहेत. गोपालकृष्णाच्या जीवनात जशी पाहाल तेथे विविधताच भरलेली आहे आणि एकसारखा उत्कर्षच दिसून येतो तशी गोदावरीच्या अतिदीर्घ प्रवाहाच्या काठी सृष्टिसौंदर्याची विविधता आणि विपुलता भरलेली आहे. ब्रह्मदेवाच्या एका कल्पनेमधून जसा सृष्टीचा विकास होतो, वाल्मीकीच्या एका कारुण्यभावनेत जशी रामायणी सृष्टी विस्तारली आहे, तसाच त्र्यंबकाच्या पर्वतांच्या कपारीतून ठिबकणाऱ्या गोदावरीतूनच पुढे जाऊन राजमहेंद्रीचा विशाल वारिराशी पसरलेला आहे. सिंधू आणि ब्रह्मपुत्रेला जसे हिमालयाला आलिंगन देण्याचे सुचले, नर्मदा आणि तापीला जसे विंध्य-सातपुडा पर्वतांना वितळविण्याचे सुचले, तसे गोदावरी व कृष्णा यांना दक्षिणेचा उंच प्रदेश भिजवून धनधान्याने समृद्ध करण्याचे कळले. पक्षपाताने सह्याद्री पश्चिमेकडे वळला हे जणू न आवडून त्याला पूर्वेकडे ओढण्याचा अखंड प्रयत्न या दोन नद्या करीत असल्या पाहिजेत असेच वाटते.

—जीवनलीला : २७-२८

या दोन्ही नद्यांचा उगम पश्चिम समुद्रापासून ५०-७५ मैलांपेक्षा दूर नाही, तरीही दोघीजणी ८००-९०० मैलांचा प्रवास करून स्वतःचा जलभार किंवा खंडणी पूर्व समुद्रालाच अर्पण करीत आहेत. आणि या खंडणीचा विस्तार काही लहान-सहान नाही. त्यात संपूर्ण महाराष्ट्र प्रदेश येऊन जातो. हैदराबाद आणि म्हैसूर यांच्या राज्यांचा अंतर्भाव होतो, आणि आंध्र प्रदेश तर सगळाचा सगळा सामावून जातो. मिश्र संस्कृतीची माता नाइल नदीचे गोदावरी पुढे काही महत्त्व नाही. (२८)

पण गोदावरीचा इतिहास तर सहनवीर रामचंद्र आणि दुःखमूर्ती सीतामातेच्या वृत्तांतानेच सुरू होतो. राजसिंहासन सोडताना रामाला दुःख वाटले नाही, पण गोदावरी तीरावर सीता आणि लक्ष्मण यांच्यासह अनुभवलेल्या आनंदाचा शेवट आला तेव्हा रामाचे हृदय एकदम शतधा विदीर्ण झाले. वाघ-लांडग्यांच्या अभावाने निर्भय बनलेली हरणे आर्य रामभद्राचे दुःखाने व्याकुळलेले नेत्र पाहून दूर पळून गेली असतील, सीतेच्या शोधात निघालेल्या दीर लक्ष्मणाच्या मोठमोठ्या हाका ऐकून मोठमोठे हत्तीही भयकंपित झाले असतील, आणि पशुपक्ष्यांच्या दुःखाश्रूंनी गोदावरीचे स्वच्छ पाणी मलिन बनले असेल. हिमालयात जशी पार्वती होती तशी जन-

स्थानात सीता अशेष विश्वाची अधिष्ठात्री होती. ती गेल्यानंतर कल्पांतिक दुःख जर सार्वभौम झाले असले तर त्यात आश्चर्य कोठले?

रामसीताचे तर पुनः मलिन झाले, पण जनस्थानाचा (दंडकारण्य भागाचा) वियोग तर कायमच राहिला. आज पण नाशिक पंचवटींत फिरून पहा, पावसाळ्यात जा की उन्हाळ्यात, सबंध पंचवटी जणू जटायूप्रमाणे 'सीता सीता' अशी उदास-वाणी हाका मारीत आहे असेच वाटते. महाराष्ट्राच्या साधुसंतांनी जर आपली मंगल वाणी येथे पसरविली नसती तर हे जनस्थान जणू भयानक वैराण प्रांत होऊन गेला असता. उन्हाळ्याची उष्णता झाकण्यासाठी जशी तृणसृष्टी सर्वत्र पसरत असते, तसे साधुसंत जीवनाची विषमता विसरविण्यासाठी सर्वत्र फिरत असतात हे केवढे भाग्य आहे!

माते गोदावरी, राम-लक्ष्मण-सीता यांच्यापासून सुरुवात करून वृद्ध जटायूपर्यंत सर्वांना तू स्तन्यपान करविले आहे. तुझ्या काठावर शूरवीर पण निपजले, आणि तत्त्व-चिंतकही होऊन गेले. संतही निर्माण झाले आणि मुत्सद्दीसुद्धा होऊन गेले.

देशभक्त तयार झाले आणि ईश्वरभक्त विकसित झाले. तू चारही वर्णांची माता आहेस. माझ्या पूर्वजांची तू अधिष्ठात्री देवता आहेस!

—जीवनलीला : ३३-३४

१०. गंगामाई

गंगा काहीही न करती आणि एकट्या देवव्रत भीष्माला जन्म देती तरीही आर्य-जातीची माता म्हणून आज ती ख्याती पावली असती. पितामह भीष्मांची प्रतिज्ञा, भीष्माची निःस्पृहता, भीष्माचे ब्रह्मचर्य आणि भीष्माचे तत्त्वज्ञान ही आर्यजातीला सर्वदा आदरपात्र ध्येय बनून राहिली आहेत. अशा आर्य संस्कृतीच्या आधार स्तंभा-सारख्या महापुरुषाची माता म्हणून आपण गंगेला ओळखतो.

नदीला जर कोणती उपमा शोभणारी असेल तर ती मातेचीच आहे. नदीच्या काठी राहायचे म्हणजे दुष्काळाची भीती तर राहात नाही. मेघराज दगा देतात तेव्हा नदीमाता आपले पीक पिकवते. नदीचा किनारा म्हणजे शुद्ध आणि शीतल हवा. नदीच्या काठी फिरायला जावे म्हणजे निसर्गाच्या मातृवात्सल्याच्या अखंड प्रवाहाचे दर्शन होते. नदी मोठी असेल आणि तिचा प्रवाह धीरगंभीर असेल तेव्हा तर काठावर राहणाऱ्या लोकांचा रुबाब व वैभव हे नदीचेच आभारी असतात. खरेच, नदी

जनसमाजाची माता असते...नदी ईश्वर नाही पण ईश्वराचे स्मरण करून देणारी देवता आहे. जर गुरूला वंदन करणे योग्य असते तर नदीलाही वंदन करणे योग्य असते.

ही तर झाली सामान्य नदीची गोष्ट, पण गंगामाई तर आर्यजातीची आई आहे. आर्यांची मोठमोठी साम्राज्ये या नदीच्या किनाऱ्यावरच स्थापलेली आहेत. कुरु-पांचाल देशाचा अंगवंगादी देशांशी गंगेनेच संयोग घडविला आहे. आजही हिंदुस्थानची लोकवस्ती गंगेच्या किनाऱ्यांवरच अधिकात अधिक आहे.

—जीवनलीला : १५

आपण जेव्हा गंगेचे दर्शन घेतो तेव्हा फक्त पिकांनी भरगच्च भरलेली शेतेच लक्षात येत नाहीत, मालाने भरलेली जहाजे, नावाच, समोर येत नाहीत, पण वाल्मीकीची कवने, बुद्ध महावीरांचे विहार, अशोक, समुद्रगुप्त किंवा हर्ष यांच्यासारख्या सम्राटांचे पराक्रम आणि तुलसीदास कबीर यांच्यासारख्या संतजनांची भजने—या सर्वांची आठवण होते. गंगेचे दर्शन शैत्यपावनत्वाचे हार्दिक तसेच प्रत्यक्ष दर्शन होय.

—जीवनलीला : १६

पण गंगेचे दर्शन काही एकाच प्रकारचे नाही. गंगोत्रीजवळील हिमाच्छादित प्रदेशातले तिचे खेळकर व आनंदी कन्यारूप, उत्तर काशीकडील चीडदेवदारांच्या काव्यमय प्रदेशांतील मुग्धास्वरूप, देवप्रयागच्या पर्वतमय आणि अरुंद प्रदेशात चमकदार, तेजस्वी अलकनंदेबरोबरची तिची क्रीडा, लक्ष्मणझूलाच्या कराल दंष्ट्रांमधून सुटका झाल्यावर हरद्वारजवळील तिचे अनेक धारांतून स्वच्छंद विहरण, कानपूरला घासून जाणारा तिचा इतिहासप्रसिद्ध प्रवाह, प्रयागच्या विशाल मैदानावरील तिचा कालिंदीशी झालेला त्रिवेणी संगम, प्रत्येकाची शोभा काही वेगवेगळीच आहे. एक दृश्य पाहिल्याने दुसऱ्याची कल्पना येऊ शकत नाही. प्रत्येकाचे सौंदर्य वेगळे, प्रत्येकाचा भाव वेगळा, प्रत्येकाचे वातावरण वेगळे, प्रत्यकाचे माहात्म्य वेगळे.

प्रयागापासून गंगा वेगळेच स्वरूप धारण करते. गंगोत्रीपासून प्रयागापर्यंत गंगा मोठी होत जाऊनही एकरूप समजता येईल. पण प्रयागापाशी तिला यमुना मिळते. यमुनेचे तर पहिल्यापासूनच ऐसपैस दुहेरी काठ. ती जणू भक्कम दुहेरी हाडाची सुदृढ वाटते. ती खेळत, नाचत असते, उड्या मारीत असते, पण आनंदी, खेळकर दिसत नाही. गंगा शकुंतलेसारखी तपस्विनी कन्या दिसते, तर काळी यमुना द्रौपदीसारखी मानिनी राजकन्या दिसते. शर्मिष्ठा आणि देवयानीची कथा ऐकतो तेव्हा पण प्रयागाजवळचा गंगा आणि यमुना यांचा मोठ्या कष्टाने एकमेकांशी जुळणारा प्रवाह आठवतो....

प्रयागाच्या पुढे गंगा कुलवधूसारखी गंभीर आणि सौभाग्यवती दिसू लागते. या पुढे तिला अनेक मोठमोठ्या नद्या येऊन मिळतात. यमुनेचे जल मथुरावृंदावनपासून श्रीकृष्णाच्या आठवणी अर्पण करते, तर अयोध्येपासून वाहात येणारी शरयू आदर्श राजा रामचंद्राच्या प्रतापी पण करुण जीवनाच्या आठवणी आणते. दक्षिणेकडून येणारी चबळ नदी रंतिदेवाच्या यज्ञयागाच्या गोष्टी सांगते, तर महान कोलाहल करणारा गर्जणारा शोणभद्र गजग्राहच्या दारुण युद्धाचे अंधुक दर्शन घडवितो. अशा रीतीने पुष्ट झालेली गंगा पाटलिपुत्रापाशी मगध साम्राज्यासारखी विस्तीर्ण होऊन जाते, तरीही गंडकी आपला अमूल्य करभार घेऊन येण्यास कचरत नाही. जनक आणि अशोकांच्या, बुद्ध आणि महावीरांच्या प्राचीन भूमीतून पुढे जाता जाता आता पुढे कोठे जावे अशा विचारात जणू ती पडते. एवढा प्रचंड वारिराशी आपल्या अमोघ वेगाने पूर्वेकडे धावत असताना त्याला दक्षिणेकडे वळविणे ही काय साधीसुधी गोष्ट आहे? तरीही तिने तो वळविला आहे. दोन सम्राट किंवा दोन जगद्गुरू जसे एकदम एकमेकांना भेटत नाहीत तसे गंगा आणि ब्रह्मपुत्रा यांचे झालेले दिसते. ब्रह्मपुत्रात हिमालयाच्या दूरदूरच्या पर्वतराजी तून सर्व पाणी घेऊन आसाममधून पश्चिमेकडे येते आणि गंगा या बाजूने पूर्वेकडे जोरात वाहात जाते. त्यांचा समोरासमोर मिलाफ, भेट कशी होणार? कोण कोणापुढे प्रथम नमणार किंवा कोणाला वाट करून देणार? शेवटी दोघींनी ठरविले की दोघींनी दाक्षिण्य पत्करून सरित्पतीच्या दर्शनाला जावे, आणि भक्तिनम्र होऊन जाता जाता जमेल तेथे रस्त्यात एकमेकीला भेटून घ्यावे.

याप्रमाणे गोआलंदापाशी जेव्हा गंगा आणि ब्रह्मपुत्रा यांचे विशाल पाणी एकत्र होते तेव्हा सागर यांपासून काही वेगळा असेल की काय अशी शंका उत्पन्न होते. विजय प्राप्त केल्यानंतर चांगले शिक्षित सैन्यसुद्धा जसे अव्यवस्थित बनते, अस्ताव्यस्त पसरून जाते, आणि विजयी वीर हवे तसे फिरू लागतात तसे यापुढे या महान नद्यांचे होते. अनेक मुखांनी त्या समुद्राला जाऊन मिळतात. प्रत्येक प्रवाहाचे नाव वेगवेगळे आहे, आणि काही काही प्रवाहांना तर एकापेक्षा अधिक नावे आहेत. गंगा आणि ब्रह्मपुत्रा एक होऊन पद्मेचे नाव धारण करतात. तीच पुढे गेल्यावर मेघना या नावाने ओळखली जाते.

ही अनेकमुखी गंगा कोठे जाते? सुंदरबनात वेताची घनदाट बने उगविण्यासाठी की सगरपुत्रांची वासना तृप्त करून त्यांच्या उद्धार करण्यासाठी? आज जर जाऊन पाहाल तर जुन्या काव्यातील येथे काही राहिले नाही. जेथे पाहाल तेथे तागाची पोती बनविणाऱ्या गिरण्या आणि असेच इतर भयंकर कारखाने...गंगामाई पूर्वीसारखी आपणांस अनेक प्रकारची समृद्धी अर्पण करीत राहते, पण आपले दुबळे हात ती झेलू शकत नाहीत.

गंगामाई! असले दृश्य बघण्याचे तुझ्या नशिबात अद्याप कधीपर्यंत राहणार आहे?

—जीवनलीला : १७–१८

११. यमुनाराणी

हिमालय तर भव्यतेचे भांडार आहे. सर्वत्र भव्यता विखरून देऊन भव्यतेची भव्यता कमी करावयाची हाच जणू हिमालयाचा उद्योग आहे. तरीही अशा हिमालयामध्ये एक स्थान असे आहे की ज्याची ऊर्जस्विता हिमालयवासींच्याही नजरेत भरते. यमराजाच्या बहिणीचे ते उगमस्थान आहे.

दोन बहिणींत गंगेपेक्षा यमुना मोठी आहे, प्रौढ आहे, गंभीर आहे. कृष्णभगिनी द्रौपदीसारखी कृष्णवर्णा तशीच मानिनी आहे. गंगा जणू बिचारी, मुग्ध शकुंतलाच, पण देवाधिदेवाने तिचा स्वीकार केला म्हणून यमुनेने आपले मोठेपण सोडून देऊन गंगेलाच वडीलकीचा मान देऊन टाकला. या दोन्ही बहिणी एकमेकींना भेटायला अतिशय आतुर दिसतात. हिमालयात एका ठिकाणी तर जवळजवळ त्या नजीक येतात, पण मत्सरी दंडाल पर्वत मध्येच विघ्नसंतोष्याप्रमाणे आडवा पडल्याने त्यांचे तेथे मीलन झाले नाही. काव्यहृदयी एक ऋषी तेथे यमुनेच्या काठावर राहून रोज गंगास्नानाला जायचा, पण जेवण करायचा परत येऊन यमुनेच्या घरी. पुढे तो ऋषी म्हातारा झाला (ऋषी पण शेवटी म्हातारे होतात), तेव्हा त्याच्या थकलेल्या पायांची दया येऊन गंगेने आपला एक छोटासा निर्झर यमुनाकाठी ऋषीच्या आश्रमाकडे पाठवून दिला. आजही हा इवलासा शुभ्र प्रवाह या ऋषीचे स्मरण करीत वाहात आहे.

... गंगा तर उत्तरकाशी, टेहरी, श्रीनगर, हरद्वार, कनोज, ब्रह्मावर्त, कानपूर वगैरे पुराण आणि इतिहासप्रसिद्ध स्थानांना दूध पाजीत पाजीत धावत असते, तर यमुना मात्र कुरुक्षेत्र आणि पानिपतची युद्धभूमी पाहात पाहात भारतवर्षाच्या राजधानीजवळ येऊन पोहोचते. यमुनेच्या पाण्यात साम्राज्याची शक्ती असली पाहिजे. तिच्या स्मरण-ग्रंथालयात पांडवांपासून आरंभ करून मोगल साम्राज्यापर्यंतचा आणि क्रांतीच्या दिवसांपासून स्वामी श्रद्धातंदाच्या खुनापर्यंतचा सर्व इतिहास भरून राहिलेला आहे दिल्लीपासून आग्र्यापर्यंत बाबरचे वंशज आपल्याशी गोष्टी करू इच्छितात असे जाणवते. दोन्ही शहरांचे किल्ले साम्राज्याच्या रक्षणासाठी नव्हे पण यमुनेच्या सौंदर्याच्या निरीक्षणासाठी बांधलेले असले पाहिजेत असे वाटते.

मोगल साम्राज्याचे नगारे तर थंडावले, पण मथुरावृंदावनाचीं मुरली अजून वाजत आहे.

—जीवनलीला : १८-१९

मथुरावृंदावनाची शोभा काही न्यारीच, असाधारण आहे. हा प्रदेश जितका रमणीय तितकाच समृद्ध आहे. हरियाणाच्या गायी त्यांच्या मधुर, सरस, सकस

दुधासाठी हिंदुस्थानात प्रसिद्ध आहेत. यशोदामातेने अथवा गोपराज नंद यांनी हे स्थान पसंत केले होते हे जणू येथील भूमी विसरूच शकत नाही. मथुरावृंदावन म्हणजे बालकृष्णाची क्रीडाभूमी, वीरकृष्णाची विक्रमभूमी, द्वारकावास सोडून दिला तर श्रीकृष्णाच्या जीवनाशी कालिंदीनेच अधिकात अधिक सहकार्य केले आहे. ज्या यमुनेने काळ्यामर्दन पाहिले त्याच यमुनेने कंसाचा शिरच्छेद देखिला. ज्या यमुनेने हस्तिनापुराच्या दरबारात श्रीकृष्णाची सचिववाणी ऐकली त्याच यमुनेने राजकुशल श्रीकृष्णाची योगमूर्ती कुरुक्षेत्रावर विचरत असलेली निरखिली. ज्या यमुनेने वृंदावनाच्या प्रणयवासरीशी स्वतःचा कलरव मिळविला, त्याच यमुनेने कुरुक्षेत्रावर रोमहर्षक गीतावाणीचा प्रतिघोष घुमविला, गीतावाणीने परिसर दुमदुमून टाकला. गीतावाणीचे प्रतिध्वनी वातावरणात ऐकविले. यमराजाच्या बहिणीचे बंधुत्व श्रीकृष्णालाच शोभते.

जिने भारतवर्षाच्या कुलाचा अनेक वेळा संहार पाहिला आहे त्या यमुनेला पारिजातकाच्या फुलासारख्या ताजबिबीचे मरण किती मर्मभेदी वाटावयाचे होते ? तरीही प्रेमसम्राट शहाजहांच्या थिजलेल्या अश्रूंचे प्रतिबिंब पाडत राहण्याचे काम तिने स्वीकारलेले आहे.

—जीवनलीला : २०

आता यमुनेला घाई झाली आहे. खूप दिवस झाले गंगामाईचे दर्शन झाले नाही. सांगायच्या गोष्टी पोटात मावेनाशा झाल्या आहेत. विचारायचे असंख्य प्रश्न जमा झाले आहेत. कानपूर आणि काल्पी फार दूर नाहीत. येथे गंगेची बातमी कानी पडली या आनंदानेच तोंडात साखर टाकून यमुना जी धावत सुटली ती थेट प्रयागराजला गंगेच्या गळ्यातच जाऊन पडली व तिला घट्ट बिलगली. कसला तो दोघींचा उन्माद ! भेटल्या तरी आपण भेटलो असे जणू त्यांना खरेच वाटेना. भारतवर्षाचे सर्व साधुसंत हा प्रेमसंगम पाहायला गोळा झाले आहेत, पण या बहिणींना त्याचे भान नाही. अंगणात अक्षयवट उभा आहे याची त्यांना पर्वा नाही. वृद्ध अकबर छावणी टाकून पडला आहे त्याला विचारणारच कोण ? आणि अशोकाचा शिलास्तंभ आणून तेथे उभा केला तरी काय या बहिणी त्याच्याकडे दृष्टिक्षेप करणार होत्या ?

—जीवनलीला : २०

१२. बदरीधाम

येथे नारायणाच्या दारी राजा–रंक एक, गरीब–धनवान एक, ब्राह्मण शूद्र एक, पापी पुण्यवान एक, सुखीदुःखी, रोगी कुष्ठी, धेड–चांभार, शूद्र–अतिशूद्र, चांडाळ पतित, उच्चनीच, बालक स्त्री, सर्वच एक आहेत. येथे भेद नाही. येथे जात नाही, येथे संप्रदाय नाही की पंथ नाही. येथे तुझे माझे नाही, येथे द्वैत नाही, द्वेष नाही. येथे वाद नाहीत, येथे भांडणे नाहीत. येथे सनातनी आणि समाजवादी नाहीत, येथे सुधारक नाहीत आणि उद्धारक नाहीत. येथे पूर्व नाही, पश्चिम नाही. येथे सर्व काही एकच एक; कारण की ही सर्व भावंडे येथे पुनः एकाच पित्याला भेटण्यासाठी परदेशातून परत आलेली आहेत. येथे कोणाचा दर्जा श्रेष्ठ नाही. येथे कोणी अगदी तृणवत् नाही, कोणी तुच्छ नाही. अहंकाराने निष्कारण फुललेला लोकांचा मद येथे नारायणाच्या द्वारी गळून पडतो. जे लहान आहेत त्यांना नारायण आपल्या हातांनी वर उचलून, पावन करून सर्वांच्या पंक्तीत नेऊन बसवील. येथे नारायणाची दृष्टी पोहोचणार नाही इतके लहान, इतके पापी कोणीच नाही.

—जीवननु काव्य : १००–१०१

१३. नगाधिराज

....इतिहासकार आर्यांचे मूळ स्थान म्हणून भलेही उत्तर ध्रुव मानोत, भाषाशास्त्रज्ञ हा मान भलेही मध्य आशियाला देवोत, देशाभिमानी भलेही हिंदुस्थानालाच आर्यांची आद्य भूमी सिद्ध करोत, परंतु राष्ट्रहृदयात वसणाऱ्या प्रेरणेला जर काही ऐतिहासिक महत्त्व असेल तर हिमालय हेच आपले आर्यांचे आद्यस्थान आहे. राव असो की रंक, वृद्ध असो की युवा, पुरुष असो की स्त्री, प्रत्येकाला वाटत असते की जास्त नाही तरी एकच वेळ, पण हिमालयाचे दर्शन घ्यावे. हिमालयाच्या अमृतजलाचा आस्वाद घ्यावा, हिमालयाच्या एखाद्या विशाल शिलेवर बसून क्षणभर ईश्वराचे ध्यान करावे, आयुष्याची करावयाची सर्व कामे आटोपल्यानंतर, इंद्रियांच्या सर्व शक्ती क्षीण होऊन गेल्यावर, जीर्ण देह आणि उर्वरित आयुष्य भाररूप वाटू लागल्यावर, शेवटी या जगरूपी परक्या घरात पडून न राहता स्वगृही जाऊनच प्राण सोडावा. अशा उद्देशाने कितीतरी हिंदू लोक अन्नपाण्याचा त्याग करून देह पडेपर्यंत हिमालयात ईशान्य दिशेकडे चालत राहतात. आपल्या शास्त्रकर्त्यांनी हाच मार्ग लिहून ठेवला आहे. कोणा राजाचे सिंहासन गमावले की तो जाणार हिमालयात.

भर्तृहरीसारख्याला हवे तेवढे वैराग्य येवो, पण त्यालाही हिमालयाविषयींचा अनुराग अणुमात्रही कमी व्हावयाचा नाही. कोणा व्यापाऱ्याला दिवाळे काढण्याचा प्रसंग आला, कोणा सौदागराचे सर्वस्व समुद्रात बुडून गेले, कोणाची स्त्री कुलटा निपजली, कोणाची प्रजा परागंदा झाली, कोणाच्या माथी एखादे राजकीय किंवा सामाजिक संकट येऊन पडले, कोणाला आपल्या अधःपतनामुळे समाजात तोंड दाखवायला जागा राहिली नाही,—अशा कोणत्याही अवस्थेत आस्तिक हिंदु मनुष्य अत्महत्या नाही करणार. परम दयाळू महादेवावर हिंदूची जेवढी श्रद्धा आहे तितकीच अटळ श्रद्धा त्याची हिमालयावर आहे. पशुपति-नाथासारखाच हिमालय पण अशरणशरण आहे. राष्ट्रोद्धाराचे चिंतन चंद्रगुप्ताने हिमालयात जाऊनच केले होते. समर्थ रामदास स्वामींनाही राष्ट्रोद्धार करण्याची शक्ती बजरंग बली रामदूतापासून हिमालयातच प्राप्त झाली होती. हिंदुधर्माचे रहस्य अनायासे प्रकट होईल असे पृथ्वीच्या सपाट पृष्ठभागावर जर कोणते स्थान असेल तर तो हिमालयच होय.

श्री वेदव्यासांनी आपला ग्रंथसागर हिमालयाच्या मांडीवर बसून रचला होता. श्रीमत् शंकराचार्यांनी आपली विश्वविख्यात प्रस्थानत्रयी हिमालयातच लिहून काढली होती. स्वामी विवेकानंद आणि स्वामी रामतीर्थ यांनीसुद्धा सनातन धर्माची तत्त्वे आधुनिक काळाला कशी लागू करावयाची याचा विचार हिमालयातच केला होता. गांधीजींनी आपला गीतेचा अनुवाद-अनासक्तियोग हिमालयातच पुरा केला होता. हिमालय-आर्यांचे हे आद्यस्थान, तपस्व्यांची ही तपोभूमी, पुरुषार्थी लोकांसाठी चिंतन करावयाचे एकान्तस्थान, थकल्या-भागल्या जीवांचा विसावा, निराश झालेल्यांचे सांत्वन, धर्माचे माहेर, मुमुक्षूंची अंतिम दिशा, साधकांचे आजोळ, महादेवाचे धाम आणि अवधूताचे निद्रास्थान आहे. माणसांनाच काय, तर पशुपक्ष्यांना पण हिमालयाचा आधार अपूर्व आहे. सागराला मिळणाऱ्या अनेक सरितांचा तो पिता आहे. याच सागरामधून निर्माण होणाऱ्या मेघांचे हे तीर्थस्थान आहे. कविकुलगुरूने या 'देवतात्मा नगाधिराजा'ला पृथ्वीचा मानदंड म्हटले आहे. ते अनेक अर्थांनी बरोबर आहे. हिमालय हा भूलोकाचा स्वर्ग, यक्षकिन्नरांचे वसतिस्थान आहे. जगातल्या सर्व दुःखांना सामावून घेऊ शकेल इतका तो विशाल आहे, सर्व चिंताग्नींना विझवू शकेल इतका थंडगार आहे. कुबेरालासुद्धा आश्रय देऊ शकेल इतका तो धनाढ्य आहे, आणि मोक्षाची शिडी बनू शकेल इतका तो उंच आहे. अगदी बालपणापासून आपण हिमालयाचे नाव ऐकत आलो आहोत. बालगोष्टी, बालगीते, प्रवास किंवा यात्रा वर्णने, इतिहास किंवा पुराणे, कोठेही पहा, सर्वांना अंतिम आश्रय तो हिमालयाचाच मिळावयाचा. लहानपणापासूनच जर आदर्श रमणीय स्थान कल्पनासृष्टीत आले असेल तर ते हिमालयातूनच कल्पिलेले असावयाचे.

अरे, या हिमालयाने काय काय नाही पाहिले? पृथ्वीवरचे असंख्य भूकंप आणि

आकाशातील हजारो धूमकेतूंना डोळ्यांच्या पापण्यांची हालचाल न होऊ देता त्याने पाहिले होते. महादेवाचा विवाह यानेच करून दिलेला आहे. सतीच्या विहाराचे आणि कुमारसंभवाचे यानेच अपत्यवात्सल्याने कौतुक केले आहे. रघुकुलाच्या भगीरथापर्यंतच्या अनेक पिढ्यांच्या अवघड तपस्यांचा हा साक्षी आहे. पांडवांची महायात्रा ह्यानेच सफल केली आहे. पण जुन्या गोष्टी कशासाठी ? सत्तावन सालच्या पराक्रमात शिकस्त करूनही शेवटी हताश व्हाव्या लागलेल्या व पळ काढाव्या लागणाऱ्या वीरांना आणि मुत्सद्द्यांना हिमालयाचाच आश्रय मिळालेला आहे. भूस्तरशास्त्राच्या दृष्टीने पाहावयाचे असेल, प्राणिशास्त्राच्या दृष्टीने विचार करावयाचा असेल, धर्म तत्त्वांचा उलगडा करण्याचा जर तुम्हाला प्रयत्न करावयाचा असेल, तर हिमालयातच तुमचे समाधान व्हावयाचे; कारण आर्यावर्ताच्या प्रत्येक काळाचा पुरुषार्थ हिमालयाला माहीत आहे.

—जीवननुं काव्य : ६१–६३

१४. अर्णवाचे आमंत्रण

समुद्र अथवा सागर यांसारखे परिचित शब्द टाकून देऊन अर्णव शब्द मी निवडला हे केवळ त्याच्या आमंत्रण शब्दाशी असलेल्या अनुप्रासाच्या लोभाने नव्हे. अर्णव शब्दामागे उंच उंच उडणाऱ्या लाटांचे अखंड तांडव सुचविलेले आहे. वादळ, अस्वस्थता, अशांती, वेग, प्रवाह आणि प्रत्येक प्रकारच्या बंधनाविषयी अमर्ष म्हणजे असहिष्णुता व राग हे सर्व भाव अर्णव शब्दात येऊन जातात. धात्वर्थ आणि त्याचा उच्चार या भावात मदत करतात. आणि त्यामुळेच पुष्कळ वेळा वेदात 'अर्णव' हा शब्द विशेषणासारखा वापरला जातो. विशेषतः वेदाच्या प्रसिद्ध अघमर्षणसूत्रात जो अर्णव समुद्राचा उल्लेख आहे तो त्याची भव्यता सुचवितो.

—जीवनलीला : २७९

१५. लाटांचा तांडवयोग

आम्ही जागा बदलत जाऊन बेगवेगळ्या दृष्टींतून लाटांचे सुंदर व धुंद नर्तन पाहात

होतो म्हणून लाटांच्या मनात आमच्याविषयी सद्‌भाव जागा झाला. त्या म्हणत 'या की या. इतक्या दुरून नुसते आमच्याकडे पाहता काय? तुम्ही काही परके नाहीत. जवळ या. मजा उपभोगा. पाण्याचा आनंद घ्या. हसा व उड्या मारा. हा क्षण आणि अनंत काळ यांच्यामध्ये कोणताही फरक नाही. या की रे या!' लाटांचा विवेक वेगळ्या प्रकारचा असतो. त्या बोलावतांना हात हालवीत नाहीत, पण आपले पाय धूत असतात. आम्ही सौजन्याने त्यांच्या निमंत्रणाचा स्वीकार करून म्हटले— "खरोखरच, यावेसे फार वाटते, पण आताच नाही. अद्याप आमचे कार्य पुरे झाले नाही. खूपच काम शिल्लक आहे. कितीतरी संकल्प पार पाडायचे राहिले आहेत. ज्या भारतमातेच्या चरणांचे प्रक्षालन तुम्ही अखंडपणे करीत आहात ती भारतमाता अजून स्वतंत्र झाली नाही. माणसामाणसांतील झगडे, कलह अजून शमले नाहीत. गरीब आणि दलित जनता यांच्याशी एकता जोपर्यंत पूर्णपणे अनुभवली नाही तोपर्यंत तुमच्याबरोबर एकता साधण्याचा अधिकार आम्हाला कोठून मिळणार? तुम्ही मुक्त आहांत, अखंड कर्मयोगी आहांत. सतत कार्य करीत राहूनही कर्तव्य असे तुम्हाला काही राहिलेच नाही. कर्तव्याचे ढीग आमच्यासमोर दिसत असतानाही आम्ही आळसात पडून राहात आहोत. तुमच्या रांगेत येऊन नाचण्याचा आम्हाला अधिकार नाही. तुम्ही आम्हांला प्रेरणा द्या, आमच्या हृदयात तुमची मस्ती भरून द्या. तुमचा वेदान्त आमच्या चित्तात पेरून द्या. मग आमचे कार्य पूर्ण करायला, भारताला स्वतंत्र करायला आम्हाला विलंब लागणार नाही. आणि हा एक संकल्प सिद्ध झाला म्हणजे मग कोणताही विषाद न वाटू देता आम्ही तुमच्यापाशी धावत येऊ. तुमच्याशी अद्वैत साधू आणि तसे करण्यात जर आमची हाडे, त्वचा व मांस आडवी येतील तर आम्हाला अडविणारे कपडे फाडून टाकतो तसा आम्ही शरीराचा चुरा करून टाकू, आणि मग या लगद्याला जे नवेनवे आकार येतील त्यांच्याकडे पाहात आम्ही हसायला लागू."

'ठीक. तुम्हाला जमेल तेव्हा या. तुम्ही या न या, आमचे हे तांडव नृत्य तर चालूच राहणार. जीवनाचा रास पूर्ण करून गोपी यात मिसळून गेल्या आहेत, एकजीव झाल्या आहेत. विज्ञानवीर आणि सत्याचे उपासक यात एकजीव होऊन शांत झाले आहेत, आणि म्हणूनच आमचा हा संघ अखंड अशांती माजवून राहूनही शांतीचे सागरसंगीत ऐकवू शकतो. 'ऐकायला येते का हे संगीत?'

—जीवनलीला : १४६–१४७

१६. सागराची पूर्णता

समुद्राच्या पाण्यावर आणि आकाशातील ढगांवर विविध रंगांचा नाच धरताना पाहिल्यावर ही गंभीरता इतकी तृप्तिदायक वाटत होती की त्या तृप्तीबरोबर स्थितप्रज्ञाचा आदर्श गाण्यात आणि संध्येची उपासना साधण्यात अनोखा आनंद उत्पन्न झाला. हा सागर पूर्ण आहे. त्याच्यावर पसरलेले हे आकाश पूर्ण आहे. या दोघांच्या दर्शनापासून जीवनाच्या सायंकाळी हृदयात निर्माण झालेला आमचा उपशमप्रधान आनंदही पूर्ण आहे. आता या त्रिविध पूर्णतेमधून हवे तेवढे काढून घेतले की त्यात हवी तेवढी भर घातली तरी पूर्णत्वात कोणतीही उणीव होणार नाही. मिळविलेली पूर्णता कमी होऊ शकते, कारण ती खरी पूर्णताच नसते. शिकलेली, विकसित केलेली पूर्णता स्थायी, टिकाऊ असते. कारण त्या वारशाबरोबरच आपण जन्मलो होतो. तोपर्यंत पोचावयास उशीर लागतो हीच उणीव. जे शिकलो ते आत्मसात झाले. आता त्यापासून वाढणे व कमी होणे नसणारच.

—जीवननुं काव्य : ३३१–३३२

१७. रण की सरोवर ?

घटना नियमित होऊ लागली म्हणजे का तिची अद्‌भुतता संपते ?

सहा तासांपूर्वी कोठे पाणी दिसत नव्हते. उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत सरळ समुद्रकिनारा पसरलेला आहे. पश्चिमेकडे जेथे आकाश नम्र होऊन धरतीला स्पर्श करते तेथपर्यन्त– क्षितिजापर्यंत–पाण्याचे नावही नाही दिसत. एक लाट दिसत नाही. या क्षणी ही जागा नव्याने पाहणाऱ्याला वाटते की हा कोणी रणाचा भाग असावा. पाऊस पडून गेल्यामुळे तो ओला झालेला असेल, तेवढेच. किंवा त्याला असे वाटेल की ती एक मोठीच दलदल आहे, पण तिच्यावर गवत वगैरे नाही एवढेच. दृष्टी पोहोचेपर्यंत सपाट सरळ जमीन दिसल्याने केवढा आनंद होतो ! एवढी सपाट जमीन तयार करण्याचे काम एंजिनिअर्सवर सोपविले तर त्यांना केवढे प्रचंड श्रम करावे लागतील; पण ही तर निसर्गाची कारागिरी. उंच उंच डोंगरात भव्यता असते, तर अशा समतल–सपाट प्रदेशांत विशालता, विस्तीर्णता असते. या विशालतेचे प्राशन करण्यात मग्न असताना एवढ्यातच दूर क्षितिजावर काहीतरी वाहात येत असलेले दिसले. जमिनीवर पुनः पाणी कसले ? एवढ्यात दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत पसरलेली एक

धूसर रेषा हळुहळू दिसायला लागली. तिच्यावर मध्येमध्ये पांढरे तरंगही दिसू लागले. पाण्याचे सैन्यच चालून आले. सेनापतीच्या हुकुमाप्रमाणे लाटा एका कतारीत पुढे सरकू लागल्या. आले, पाणी पुढे आले. अर्धा पट त्याने व्यापून टाकला. सूर्य वर चढू लागला, ऊन्ह कडक होऊ लागले आणि लाटांची मस्ती पण वाढू लागली. का या लाटा ईश्वराचे सोपविलेले काही असाधारण कार्य करण्यासाठी चालून येत आहेत? यमदूताप्रमाणे नाहीत, पण देवदूताप्रमाणे तर जरूर वाटतात. अरण्यात लांडग्यांचे टोळके उंच टांगा टाकीत, उड्या मारीत धावत यावे तशा लाटा वाढत पुढे धावू लागल्या. जेथे नीरव ओले रण होते तेथे उसळणाऱ्या, उचंबळणाऱ्या गर्जणाऱ्या लाटांचा सागर पसरून भरून गेला. भरती पूर्ण जोरात आली. लाटा येतात आणि काठावर आपटू लागतात. थोडी टक लावून लाटांकडे तास, अर्धातास पाहाल तर मनात अशी चमक उठून वाटून जाते की या लाटा जड, निर्जीव नसून चैतन्याने ओसंडत आहेत. त्यांचा तो स्वभावधर्म आहे. जेथे पाहावे तेथे पाणीच पाणी. डाव्या बाजूची शिंदीची झाडे पाण्यात डोलू लागली. वाटते की ती पाण्यात बुडून जातील. मर्यादा-वेल पुष्कळ दिवसांनी भाचा भेटायला आलेला आहे असे पाहून प्रेमाने ओली झाली आहे असे वाटू लागले. आणि लाटांची मस्ती तर उतरतच नाही. हत्तीप्रमाणे धावतात आणि किनाऱ्यावर वप्रक्रीडा अनुभवतात. किती अद्‌भुत दृश्य! जमिनीवर ढाळ असेल, उतार असेल आणि पाणी नदीप्रमाणे वाहात असेल तर त्याचे आश्चर्य नाही वाटत. उताराकडे वाहाणे हा पाण्याचा स्वभावधर्म असतो. पण सपाट जमिनीवर जेथे पाणी नव्हते, तेथे पावसाशिवाय किंवा पुराशिवाय पाणी धावत येते, आणि पाण्याचा जाड थर जमिनीवर पसरू लागतो हे केवढे आश्चर्य! जेथे आताच आपण धावत होतो, फिरत होतो तेथे पायसुद्धा टिकू शकत नाही अशी जलाकार स्थिती कशी बरे झाली असेल? इतक्या थोड्या वेळात एवढा मोठा विपर्यास! जेथे आम्ही हवेत हात हलवीत फिरत होतो तेथे उसळणाऱ्या लाटांमध्ये हाताचे सुकाणू चालवीत पोहण्याचे आनंद लुटत आहोत. जणू घोड्यावर बसून फेरफटका मारायला निघालेलो. या भरतीच्या वेळी जर कोणी माणूस नवीनच येऊन पाहील तर त्याला वाटेल की खाऱ्या पाण्याचे हे चमचमणारे सरोवर हजारो वर्षांपासून येथे असेच पसरलेले असेल. पण जर काही तास उभे राहण्याचा त्रास घेतला आणि पाहिले तर कळून येईल की एवढ्या मोठ्या महायुद्धासारख्या आक्रमणालाही अंत आहे. आपली लीला जशी पसरली, तशी ती मागे ओढून घेण्याची वेळही येऊ लागते. ईश्वराचे कार्य जणू समाप्त झाले. ईश्वराने जणू आपली प्राणशक्ती मागे ओढून घेतली. आता एकेक लाट किनाऱ्याकडे धावत येत असूनही पाणी मागे सरकत चालले आहे असे स्पष्ट दिसते आहे.

—जीवनलीला : २३९-२३१

चालले, पाणी कमी होऊ लागले, ओसरू लागले. समुद्राच्या पलीकडच्या बाजूला का एवढा मोठा खड्डा पडला की तो भरायला हे सर्व पाणी धावत चालले ? अग्रभागी आलेल्या लाटा मागे वळताना पाहून पाठीमागून आलेल्या लाटांचा मध्येच विरस होऊन जातो आणि त्या धावता धावता हसू लागतात. सागराच्या पाण्याची मोजणी कोण करणार ? ते कसे मोजता येणार ? एवढे पाणी आले कसे आणि परत जाते कसे ? का त्याला कोणी विचारणारे नाही ? किंवा विचारणारे आहे म्हणूनच ते इतके नियमानुसार येते व जाते ? जेवढा जेवढा विचार करू लागावा तेवढी तेवढी अशा घटनेची अद्‌भुतता मनावर अधिकाधिक ठसू लागते. भरती व ओहोटी गोष्ट आहे तरी काय, त्याचा उपयोग काय आहे, त्या नसत्या तर समुद्राचे काय झाले असते, समुद्रजीवी प्राण्यांच्या जीवनात कोणकोणते बदल झाले असते ? चंद्र आणि सूर्य यांचे आकर्षण आणि सागराचे पृथ्वीच्या पृष्ठभागापासूनचे वेगळेपण वगैरे वाद आहेत तर बरोबर, पण यांच्यामागे कोणता उद्देश असावा हे समजून घेण्याकडेच मन धाव घेते. पण ही जिज्ञासा अद्याप तृप्त झाली नाही.

जितक्या वेळा समुद्रावर भरती–ओहोटी पाहतो तितक्या वेळा ती तितकीच अद्‌भुत वाटते आणि ईश्वराच्या सृष्टीत जेथे तेथे हा ज्ञानमय प्रभू सनातनपणे विराजत आहे अशी प्रतीती येते.

सर्वम् समाप्नोषि ततोऽसि सर्वः । असे म्हणून हृदय त्याला प्रणाम करते. सृष्टी महान आहे तर सर्जनहार विभू कसा असेल ? त्याला कोण ओळखणार ? त्याला स्वतःला तरी ओळखण्याची गरज असेल का ?

—जीवनलीला : २२९–२३१

१९. हिंदुस्थानची व्याख्या

हिंदुस्थानची एक ज्योतिर्मय व्याख्या मला सुचते. आपण जर कन्याकुमारीच्या दक्षिणेस गेलो तर ध्रुव दिसणे बंद होते. आणि जर काश्मीरच्या उत्तरेस गेलो तर अगस्ती दिसणारच नाही. म्हणून मी अशी व्याख्या बनवली आहे की जेथून ध्रुव आणि अगस्ती दोघे दिसू शकतात तोच आपला भारत देश आहे.

–जीवनलीला : २४८

२०. परमस्नेही अन्धकार

जगात सार वस्तू काय आहे व असार वस्तू कोणती आहे याचे ज्ञान जर सर्व लोकांना एकाच वेळी व एकाच तऱ्हेने झाले तर जगाचे हे घटनाचक्रच थांबून जाईल. मनुष्य असाराला सार समजून चालत असतो, म्हणून त्याला जगण्यात आनंद वाटत असतो, आणि मोठ्या उत्साहाने तो जगत असतो व कर्म करीत असतो. आणि असेही नाही की त्याचे सर्व कर्म, कृती चांगल्याही असतात. माणसे काही वेळा जन्मभर एक दुसऱ्याचा द्वेष करीत असतात. राष्ट्रे शतकानुशतके वैर चालू ठेवतात आणि महायुद्धे करून संहाराचा महोत्सव करीत असतात. या सर्व मुळात अज्ञानाच्याच कृती असतात. म्हणून माणसाने प्राचीन काळापासून आपली प्रार्थना चालू ठेवली आहे. '**तमसो मा ज्योतिर्गमय।**'

जेव्हा आपण तत्त्वदर्शी बनून अथवा तत्त्वजिज्ञासू म्हणून जीवनाचा विचार करतो तेव्हा असे दिसते की जीवन आणि मृत्यू ही दोन्ही परस्परपूरक, परस्पर पोषक व एकसारखी आवश्यक तत्त्वे आहेत.

केवळ अज्ञान व ज्ञान यांचीच ही गोष्ट नाही. अंधकार आणि प्रकाश यांचेही असेच आहे. अज्ञान म्हणजे कमी ज्ञान, अपूर्ण ज्ञान, अस्पष्ट ज्ञान, भ्रमयुक्त मिळालेले ज्ञान; असाच अज्ञानाचा अर्थ होत असतो. तसाच अंधकाराचा कमी प्रकाश अपूर्ण प्रकाश असाच अर्थ करावयास पाहिजे. रात्री जेथे आपणास दिसत नाही तेथे मांजराला दिसत असते व ते न चुकता उंदरावर झडप मारीत असते; तेव्हा जो आम्हाला अपुरा प्रकाश वाटतो तो मांजरासाठी मात्र पूर्ण प्रकाश ठरतो. या उलट दिवसाचा लख्ख प्रकाश मांजर व वाघ यांच्यासाठी मात्र आवश्यकतेपेक्षा जास्त ठरत असल्यामुळे त्यांचे डोळे किलकिले होतात अशी निसर्गाची व्यवस्था आहे. छायाचित्र घेण्यात कॅमेराच्या डोळ्याचे भोक जसे लहान-मोठे करता येते, तसाच काही प्राण्यांच्या डोळ्यांचा पडदा (डायफ्रेम) प्रकाशच्या तीव्रतेप्रमाणे कमी जास्त करता येतो. असे जर होऊ शकले नाही तर त्या प्राण्यांना अतिप्रकाशाचा अंधार किंवा आंधळेपण सहन करावे लागते. म्हणून घुबडाला (उलूकाला) दिवाभीत किंवा दिवान्ध म्हणतात.

आवाजाविषयीसुद्धा अशीच गोष्ट आहे. आवाजाची सूक्ष्म स्पंदने (Vibrations) असतात. प्रतिसेकंद अमुक इतकी स्पंदने झाली नाहीत तर आवाज ऐकायला येत नाही. चार हजार किंवा दहा हजारांपेक्षा जास्त स्पंदने एका सेकंदात होऊ लागली तर आवाज एकदम ऐकू येईनासा होतो. अंधकाराचेही असेच कशावरून नसेल? गीतेत म्हटले आहे—

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥

अध्यात्माच्या क्षेत्रात भगवान् शिव परमज्ञानी योगेश्वर आहेत. पुराणकर्ते सांगतात की व्यवहाराच्या बाबतीत शिवाचे सुस्त डोके चालतच नाही. मनुष्याचे ज्ञानसप्तक आणि महादेवाचे ज्ञानसप्तक भिन्न असले पाहिजेत. (मनुष्य आपल्या गळ्यातून जास्तीत जास्त 'सा रे ग म प ध नी सा' चे तीनच सप्तक काढू शकतो. तो मंद्राच्या खाली जाऊ शकत नाही आणि तार सप्तकाच्यावर नाही जाऊ शकत. ही गळ्याची गोष्ट आहे. कानांच्या बाबतीतसुद्धा याच प्रकारे दोन्ही सीमांची मर्यादा आहे.)

ज्या स्थितीत कमी दिसत असते त्याला जर अंधकार म्हटले, आणि जास्त दिसते त्याला प्रकाश म्हटले तर दिवसा उजेड हा गडद, काळाकुट्ट अंधार होतो, म्हणून आम्हाला फक्त पृथ्वी व सूर्य हे दोनच खगोल दिसतात. त्यांना आपण तारे, नक्षत्र आणि तारकापुंज म्हणतो. दुर्बिणीच्या साहाय्याने आम्ही या कृष्णप्रकाशाला अनेक अंशांनी वाढवितो, म्हणून मग आम्हांला सूक्ष्म आकाशस्थित तारे दिसू शकतात. दिवसाच्या धवल अंधकाराला इष्ट समजायचे की रात्रीच्या विश्वव्यापी कृष्णप्रकाशाला परमसखा समजायचे ? विचार करूनच हे निश्चित करावयास पाहिजे.

—(हिंदी) उडते फूल : ३२-३४

प्रार्थनेच्या वेळी दिवे मालवून अंधार करण्याने वातावरणात अधिक शांतता जाणवते.

कितीतरी योगी सायंकाळी प्रकाश क्षीण होऊन जेव्हा अंधकार सुरू होतो त्याच वेळी ध्यानाला बसणे पसंत करतात; कारण अंधकार एकाग्रतेला, अंतर्मुख वृत्तीला विशेष पोषक होत असतो. रात्री आकाशात असंख्य तारे चमकत असतात. जेव्हा चांदणे पडलेले असते तेव्हा फक्त मोठे व ठळक तारे दिसतात, आणि चंद्रम्याचा प्रकाश सौम्य रूपाने आकाश व पृथ्वी यांना काव्याची शोभा देतो. इतके आकर्षण असूनही रात्रीची वेळ इतकी सौम्य व शांत असते की अंतर्मुख होऊन ध्यान करण्याकरिता बाहेरची परिस्थिती थोडीही बाधक ठरत नाही.

सध्या विजेचे दिवे सर्वत्र अंधाराचा संहार करीत असतात, आणि मनात शांती निर्माण होत असली तर तिला पळवून लावून तिच्या जागी उत्तेजना उत्पन्न करतात. या प्रकाशाने जर रात्रीचा फक्त दिवस झाला असता तर इतकीशी तक्रार नसती केली. पण ही उत्तेजना दिवसा होणारे कामही करू देत नाही आणि रात्रीची विश्रांती अथवा विश्रब्ध वार्तालाप, निवांत गोष्टीही होऊ देत नाही. याचे कारण दिव्यांचा प्रकाश व उत्तेजना असते. यामुळे जे काम करायचे नसते तेही करायला मनुष्य

उद्युक्त होतो. अशा वेळी कोणत्याही प्रकारचा शुद्ध निर्णय करणे जवळ जवळ अशक्य होते.

भगवान, अशा कृत्रिम प्रकाशामधून शांतिदायक अंधाराकडे घेऊन जा अशी प्रार्थना करण्याचे दिवस खरोखरच आता आले आहेत. नैसर्गिक प्रकाशात मनुष्यता असते. नैसर्गिक अंधारात आत्मीयता असते आणि चिंतनालाही अवसर मिळत असतो. नैसर्गिक प्रकाश आणि नैसर्गिक अंधार हे दोन्ही ईश्वराने मानवाला दिलेला प्रसाद किंवा त्याची कृपा आहे. या दोघांत मनुष्याचे व्यक्तित्व निर्मळ बनत असते व विकास पावत असते. प्रकाश प्रवृत्तिपरायण असल्याने तो गडबड, धांदल निर्माण करू शकतो. अंधारात आत्मपरीक्षणाला स्थान असते. आणि म्हणून अंधकार आत्मसाधना करण्यास विशेष अनुकूल ठरतो.

(हिंदी) —उडते फूल : ३५–३६

अंधकाराला भावरूप म्हणा की अभावरूप म्हणा, अंधकार मानवाच्या मनाला हृदयाला आणि आत्म्याला पोषक वस्तू आहे. अनेक बंधने कापून सुटका करणारी वस्तू हितकर असते. संपूर्ण रात्र खोलीत प्रकाश ठेवण्याची सोय असूनही झोपणारी व्यक्ती तेथे अंधकार करून घेणे पसंत करीत असते. दिवसा झोपणारी व्यक्तीही प्रकाश कमी किंवा सौम्य करून झोपत असते. झोप जशी थकलेल्या माणसाला विश्रांती देऊन पुनः उत्साही करीत असते, तसाच अंधारही थकवा दूर करून माणसाला ताजातवाना करीत असतो. आणि म्हणून मनुष्य अंधारात जाऊन बसला तर त्याला नव्यानव्या कल्पना सुचतात, गोंधळलेल्या माणसाला संकटातून मुक्त होण्याचा मार्ग सुचतो आणि निराश झालेल्या माणसाला आशेची शिदोरी मिळत असते. माझे तर असे स्पष्ट मत आहे की जगात जर अंधकार नसता तर सध्या होत आहेत त्यापेक्षा अधिक आत्महत्या झाल्या असत्या. अंधाराच्या शांत वातावरणात उत्तेजित व क्षुब्ध मन स्थिर होत असते, दुसऱ्या बाजूचा विचार करू लागते, अंतर्मुख होऊन मनुष्य आत्मप्रवण होऊ शकतो, आणि इहलोकाबरोबरच परलोकाचा विचार केला गेल्याने मनुष्याच्या ठिकाणी दिव्य दृष्टीचा उदय होऊ शकतो. अंधारापाशी यथेच्छ व भरपूर जागा असल्यामुळे गर्दी न होऊ देता तो माणसांना परस्परांच्या समीप आणत असतो.

—(हिंदी) उडते फूल : ३५–३६

२१. पक्षी होणे आवडेल

मला तर पक्षी होणेच आवडेल. पहिला फायदा असा आहे कीं पंडितजी (गवई) जवळ शिकल्याशिवाय गावयास येईल. दुसरी गोष्ट, सूत कातल्याशिवाय सुंदर कपडे घालावयास मिळतील. साबणाशिवाय ते स्वच्छ राहतील. कपडे बदलावे लागणार नाहीत. बटणे काढण्या घालण्याचा त्रास नाही. सोवळे वस्त्र नेसण्याची गरज राहणार नाही–जसे असतील तसे पवित्र. कपडे न काढता स्नान करता येते. आचार्य रॉय यांनासुद्धा सुचणार नाहीत असे स्वदेशी रंगांचे कपडे! सुरुवातीपासूनच स्वतःला आवडतील असे रंग निवडून घ्यावयाचे. कावळा विलायतचा मनुष्य दिसतो. त्याला काळे कपडेच पसंत पडतात, किंवा मजूर असेल, तर त्याने कोळशात काम करावयाचे आणि पांढरे कपडे वापरायचे, हे कसे जमायचे? तो बगळा गांधीपंथाचा भलेही दिसो, त्याला शुभ्र रंगच आवडतो, आणि पोपट का मुसलमान? काहींना दोन रंगांची विशेष आवड, तर काहींना पंचरंगांचे आकर्षण. काहींचा रंग वतनदाराच्या फेट्यासारखा तर काहींचा पारशाच्या टोपीसारखा. पण मी रंगासाठी नाही पक्षी होणार. पक्षी तर उडण्यासाठी व्हायचे. पायथ्यावरून उडाला की थेट डोंगरमाथ्यापर्यंत. वरून मुसंडी मारली की पुनः थेट तळावर. नदी माजलेल्या हत्तीप्रमाणे धावत असली तरी काय? आपण तर चाललो भुर्रर्रर्र समोरच्या तीरावर.

पक्ष्यांनी निसर्गावर खूप नियंत्रण मिळविले आहे. मला तर सबंध दिवस पक्ष्यांकडे पाहात बसावे असे वाटते. ते कसे उडतात! काही पक्षी पंख फडफडवितात. काही तर दोन्ही पंख पसरून जणू हवेवर पोहत असतात. क्षणात आपला विचार बदलून टाकतात, छाती फुगवून हलके होऊन एकदम वर झेप घेतात. तेथे मोठमोठ्या फेऱ्या मारतात, गिरक्या घेतात, दोन पक्षी आकाशात फिरतात तेव्हा त्यांना पाहण्याची अधिकच मजा येते. त्यांच्या गोल गोल चकरा एकमेकांशी टक्कर घेतात. क्षणात ते समोरासमोर येऊन फिरतात. वर असतो तो खाली जातो. खालचा वर चढतो. खूप आनंद होतो तेव्हा किल किल किल आवाज करतात. त्यांची नजरही किती तीक्ष्ण असते. खाली काही दिसताच एकदम मुसंडी मारून झटक्यात खाली येतात; डोके खाली व पिसारा वर. ते खाली उतरतात तेव्हा त्यांच्या उतरण्याच्या रेषेला गणिती 'पॅराबोला' म्हणतात. पण हा पक्षी मनात आणील तर त्या रेषेला 'हायपर बोला' पण करू शकतो.

—अवारनवार : ४३–४४

काही उंच उडणारे पक्षी उजवा पंख आकाशाकडे आणि डावा पंख पृथ्वीकडे वळवून मोठी फेरी मारतात, आणि नंतर पुनः सरळ होऊन जातात. त्यात त्यांना

किती आनंद वाटत असेल? पोहण्यात आपणास जसा आनंद मिळतो तर त्यांना उडण्यात किती आनंद मिळत असेल!

काही पक्षी उडत असतात तेव्हाच गातात. स्थिर होऊन बसले की ते मौनी मुनी! काहींचा ह्याच्या बरोबर उलटा स्वभाव. गावयाचे असेल तेव्हा चांगली जागा शोधून गंभीर चेहरा करून बसतात, आणि नंतर आपल्या गाण्याचे फवारे उडवीत राहतात. एकदा सुरुवात केली की तासचेतास गातच राहायचे. कोकिल आणि चातक या जातीचे आहेत. संस्कृत काव्यांत जेव्हा सर्ग पुरा होतो तेव्हा शेवटच्या श्लोकाचे वृत्त बदलले जाते. कोकिळाचे काम असेच असते; त्याचे एक गाणे पुरे झाले म्हणजे तो विशिष्ट प्रकारचा आवाज काढतो, थोडा थांबतो, आणि नंतर नवा राग सुरू करतो. छोटे छोटे पक्षी छोटे राग पसंत करतात. ते एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उड्या मारीत जाताना गात असतात. काही वेळा जणू आधीच ठरविल्याप्रमाणे तीन चार जातीचे पक्षी एकाच झाडावर बसून एकत्रच गाणे सुरू करतात. या वृंद-गायनात ताल जरी दिसला नाही तरी एक प्रकारचे संगीत व माधुर्य जमून येते. अशा प्रकारचा आनंद मिळविणे काही पक्ष्यांना फार आवडते. इतर पक्षी गात असतील तर त्यात हे पक्षी येऊन स्वतःचा राग मिसळवितात.

पक्षी जेव्हा फुलझाडांवर येऊन बसतात तेव्हा त्यांना काय होत असेल? फळझाडावरील प्रश्न तर सरळ आहे. रसाळ फळ दिसले की ते सरळ त्याच्याकडे खाण्यासाठी धावतात. भक्ष्य-भक्षकाचा हा निसर्गाचा मुख्य न्याय आहे. पण रंगीबेरंगी फुले पाहून पक्ष्यांना काय होत असेल? आपल्यासारख्याच आनंदी आणि सौंदर्याने नटलेल्या फुलांना पाहून पक्ष्यांच्या मनात मत्सर तर निर्माण होत नसेल? नाही. मत्सर हा फक्त मानवाकरिताच असतो. निसर्गसृष्टीत इतर कोणतेही भाव असतील, पण मत्सर पाहायला मिळत नाही. मत्सर ही मानवी कृती आहे. मला वाटते की पक्षी फुलांना पाहून समभावाने त्यांना गाण्यासाठी किंवा उडण्यासाठी बोलावीत असतील, आणि फुले उत्तर देत नसल्याचे पाहून गोंधळून जात असतील.

—अवारनवार : ४५–४६ (पंखीगीत)

विभाग सातवा

समाज आणि संस्कृती

काका समाजालाच ब्रह्म, नारायण समजतात. व्यक्ती व समाज यांच्यात खरे म्हणजे विरोध असण्याचे व मानण्याचे कारण नाही. व्यक्तीने उदार व व्यापक दृष्टिकोणाचा अवलंब करून आपले हित समाजाच्या हितापेक्षा श्रेष्ठ न समजता समाजाशी समरस होऊन समाजाच्या कल्याणासाठी झटावे त्यातच व्यक्तीचे कल्याण साधले जाते, आणि भारतीय संस्कृती या दृष्टीने व्यक्ती व समाज यांच्या संबंधाकडे पाहते असे काका म्हणतात. काका मुख्यतः समन्वयाचा, सौहार्दाचा व समाजपरायण वृत्तींचा व्यक्तीने अंगीकार करावा असे म्हणतात. संस्कृतीचे स्वरूप सतत परिवर्तनशील राहिले पाहिजे आणि बदलत्या काळाच्या गरजा व परिस्थितीनुरूप संस्कृतीने मूळ मूल्यांना अपाय न होऊ देता नित्यनूतन राहावयास पाहिजे असे ते म्हणतात. संयमाशिवाय संस्कृती तयार होत नाही, टिकत नाही व समृद्ध होत नाही असे ते म्हणतात.

१. समाजब्रह्म
२. नारायण
३. समाजजीवनाची आधारतत्त्वे
४. संस्कृतीचे हार्द
५. संस्कृतीचा जीवनक्रम
६. संस्कृतीचा विस्तार
७. भारतीय संस्कृती
८. भारतीय संस्कृती वृक्षासारखी
९. परंपरा आणि सुधारणा
१०. समन्वय
११. संस्कृतिनिष्ठा म्हणजे कातनिष्ठा नव्हे
१२. बेसुमार संग्राहकता
१३. सुधारणेची खरी दिशा
१४. ऋषी
१५. संस्थायुग
१६. समाजाच्या अवनतीची कारणे.

१. समाजब्रह्म

श्रेष्ठ कोण–व्यक्ती की समाज ? याची चर्चा युरोपात खूप चालली. व्यक्तींचे व्यक्तित्व पवित्र आहे, त्यांचे स्वातंत्र्य आणि त्यांचा पूर्णविकास हाच समाजरचनेचा अंतिम हेतू असावयास पाहिजे, असे म्हणणारा एक पक्ष आणि काळ होऊन गेला. त्यानंतर या विचाराला कंटाळून लोकांनी दुसरी बाजू घेतली. व्यक्ती समाजासाठी आहे, व्यक्तीने समाजहितासाठीच जगले पाहिजे, समाजजीवनातच व्यक्तींचे जीवन कृतार्थ होत असते अशा प्रकारची फिलॉसॉफी आज प्राधान्य उपभोगत आहे; पण कोणी असा विचार करीत नाही की व्यक्ती आणि समाज हे एकमेकांचे विरोधी किंवा शत्रू नव्हेत. व्यक्ती समाजाविषयींची सर्व कर्तव्ये स्वेच्छेने, प्रसन्नपणे पार पाडून स्वतःचे मुख्य स्वातंत्र्य अवश्य जतन करू शकते, आणि व्यक्तीच्या सर्व अधिकारांचे आणि हक्कांचे रक्षण करून समाज समष्टीचे हित अधिकाधिक साधू शकतो. व्यक्ती आणि समाज या दोघांचा जर व्यवस्थित विकास केला गेला, सामाजिक सद्गुणांचा विकास झालेला असेल, आणि संस्कारांद्वारा हे सद्गुण जर दृढ झाले असतील, तर समाज आणि व्यक्ती ही कोणताही विरोध मनात आणण्याशिवाय उत्तम रीतीने चालू शकतात; आणि एकासाठी दुसऱ्याची अवगणना करावी लागत नाही.

—जीवनसंस्कृति : ११२

व्यक्तीच्या दृष्टीने समाज हे त्याचे ब्रह्म होय. सामाजिक सद्गुण शिकवण्याने व्यक्ती आपल्या समाजब्रह्माशी सायुज्य अनुभवते, असे आपल्या धर्मकारांनी म्हटले आहे. ज्या व्यक्तीवर सर्व सामाजिक संस्कार झालेले आहेत, आणि जिने सर्व आत्मगुण विकसित केलेले आहेत तिला सामाजिक ब्रह्माशी सायुज्य प्राप्त होते. (यस्य ते चत्वारिंशत् संस्काराः अष्टौ आत्मगुणाश्चस ब्रह्मणः सायुज्यं आप्नोति। गौतम धर्मसूत्र प्र. २, अ. ८.)

—जीवनसंस्कृति : ११९

'ब्रह्म' शब्द 'बृहद्' म्हणजे मोठे यावरून आलेला आहे. व्यक्तीपेक्षा कुटुंब मोठे; व्यक्तींचे ब्रह्म कुटुंब होय. कुटुंबापेक्षा जात (ज्ञात) मोठी; जात हे कुटुंबाचे ब्रह्म होय. जातीच्या तत्त्वापेक्षा वर्णाचे तत्त्व अधिक व्यापक आहे आणि वर्ण विराट पुरुषाचा भाग आहे, म्हणजे ही सर्व उत्तरोत्तर ब्रह्म आणि परब्रह्म होत जातात. घरापेक्षा गाव मोठे, गावापेक्षा प्रांत मोठा, प्रांतापेक्षा, देशापेक्षा पृथ्वी मोठी, पृथ्वीपेक्षा विश्व मोठे. अशी उत्तरोत्तर विभूती वाढत जातात. या विभूतींशी तन्मय किंवा तल्लीन होऊन जाणे, एकरूप होऊन जाणे, हेच सायुज्य होय. हे सायुज्य साध्य

झाल्यानंतर स्वार्थ की परार्थ असा झगडा मनात राहात नाही. कारण परमार्थात या दोघांमधील विरोध विरून जातो.

...ज्याच्यापाशी सर्व समाजाचा विचार असतो, समाजव्यवस्था काय आहे, समाजव्यापार कसे चालत असतात, समाजहिताच्या दृष्टीने काय महत्त्वाचे आणि काय निरुपयोगी आहे असा विवेक ज्याच्यापाशी आहे, तात्कालिक महत्त्वाच्या वाटणाऱ्या कितीतरी गोष्टी वेळ निघून गेल्यानंतर पूर्णपणे क्षुद्र होऊन जातात हे सर्व जो ओळखतो त्याच्याच हातून समाजाचे कल्याण होते. अशा माणसाला कोणी अंकित करू शकत नाही. अनायास हे सत्त्वगुणाचे लक्षण आहे. सत्त्वगुणी मनुष्य अखंड अविरत उद्योगात राहूनही आपली शांती गमावत नाही. नदीच्या शांत प्रवाहासारखी त्याची प्रगती चालूच राहते. नदी खाली वाहात जाते, सत्त्वगुणी मनुष्य उंच (वर) चढत असतो. (**ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्थाः**). रजोगुणी मनुष्य खूप धावपळ करून स्वतः अस्वस्थ होत असतो, दुसऱ्यांनाही अस्वस्थ करीत असतो, आणि शेवटी असतो तेथल्या तेथेच राहात असतो. (**मध्ये तिष्ठन्ति राजसाः**)

इंद्रियांच्या प्रेरणेने जे प्रेरित होतात त्यांच्या ठिकाणी आयासाचे तत्त्व वाढतच जाते. अशी माणसे परस्पर विरोधी अशा असंख्य कृती करीत असतात...पण जे आत्म्याच्या प्रेरणेने प्रेरित होतात, सर्वोदयाचा विचार करतात, ते शुष्क विग्रहांपासून, झगड्यांपासून दूर राहतात, निष्फळ भांडणे उभी करीत नाहीत, सर्वांचे कल्याण चिंतून शांत प्रगती साधतात; कारण त्यांची प्रवृत्ती आंधळी, एकांगी, संकुचित अथवा परस्पर-विनाशक नसते. पाण्यात पोहायला शिकणारा नवा माणूस पाण्याचा स्वभाव न कळल्याने पाण्यात हात मारून मारून थकून जातो. त्याला वाटते की पाण्याशी महायुद्ध करायचे असते. पण कुशल पोहणारा पाण्याचे स्वरूप व स्वतःचा स्वभाव ओळखून कमीत कमी थकवा येऊ देऊन पोहण्याचा आनंद जास्तीत जास्त वेत असतो, आणि जरूर पडल्यास इतरांनाही वाचवत असतो. अनायास ही ज्ञानाची व कर्माची परिपक्वता असते. ज्या माणसाचा स्वार्थ लोपला आहे, सर्वार्थासाठी जो जगतो अशा समाजपुरुषात अनायासाची शांती, संतोष आणि सार्थकता आपोआप प्रकट होत असते.

—जीवनसंस्कृति : १२०-१२२

...आत्मगुणांचा समाजव्यापी विकास हेच सामाजिक उद्धाराचे अमोघ साधन आहे. या विकासातूनच त्या त्या काळासाठी अनुकूल समाजरचना मानवजातीला गवसत असते. समाजरचनेत फरक करण्याने आणि सत्तेची वाटणी पुनः पुन्हा नव्याने करण्याने उत्साह टिकेल, नवे नवे अनुभव मिळतील, पण मांगल्याकडे प्रगती व्हावयाची नाही.

—जीवनसंस्कृति : १२९

२. नारायण (God of Humanity)

भूत, भविष्य, वर्तमान नरनारींचा समुदाय तो 'नार'. या नारामध्ये म्हणजे त्रिकालव्यापी मनुष्यसमाजात व्यापून राहिलेले चैतन्य–तत्त्व तो नारायण–The God of Humanity. या नारायणाची जो अखंड उपासना करतो तो 'मुनि' अशी जुनी व्याख्या आहे. (**नारायणपरो निर्द्वंद्वो मुनिः**). निर्द्वंद्व म्हणजे ज्याच्या हृदयात आपला आणि परका (आपपर) असा भाव, आपपरभाव, असा भेद राहात नाही, जो सर्वांशी समान असतो, सर्वांकडे जो मित्रत्वाच्या दृष्टीने पाहतो तो.

ब्रह्म म्हणजे विराट समाज :

शास्त्रांत म्हटले आहे की '**अस्य ते चत्वारिंशत् संस्काराः अष्टावात्मगुणाश्च स ब्रह्मणः सायुज्यमाप्नोति।**' ज्या माणसावर असे चाळीस संस्कार झालेले असतात, आणि ज्याने आठ आत्मगुण विकसित केलेले असतात असा मनुष्य ब्रह्माशी सायुज्य प्राप्त करून घेत असतो. ब्रह्म हा शब्द बृहद्वरून आलेला आहे. बृहद् म्हणजे मोठे–विशाल–विराट. विराट समाज किंवा विश्वात जे तत्त्व भरून राहिलेले आहे तेच ब्रह्म होय. आठ आत्मगुण जो शिकला आहे, ज्याने अंगी बाणवले आहेत तो या विराट विश्वसमाजाचा कधीही द्रोह करणार नाही. हे आठ गुण व्यवस्थितपणे अंगी बाणवले जाण्यासाठी त्या वेळेच्या कल्पनेप्रमाणे चाळीस संस्कारांची योजना केलेली आहे.

आज मनुष्यस्वभाव आणि नैसर्गिक प्रवृत्ती यांविषयी आपण पुष्कळ ऐकत असतो. अमुक एक गोष्ट मनुष्य स्वभावाच्याविरुद्ध आहे, बलिदान हे नैसर्गिक प्रवृत्तींना अनुकूल नाही, त्याचा नैसर्गिक प्रवृत्तींशी मेळ बसत नाही, वगैरे युक्तिवाद करून प्रत्येक उच्च आदर्शाला खाली खेचण्याचे प्रयास चालू आहेत. परंतु काही सामाजिक सद्गुणांशिवाय माणसाचे एक दिवससुद्धा चालू शकणार नाही. अशा सद्गुणांना मनुष्यस्वभाव मानण्याऐवजी त्यांना समाजाचे अधिकार म्हणून ओळखण्यात येते, आणि समाजनियंत्रणाने त्याचे वातावरण समाजात टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. खरे पाहिल्यास आज ज्याला नैसर्गिक प्रवृत्ती किंवा मनुष्यस्वभाव म्हणून स्वीकारण्यात आलेले आहे तो मध्यम प्रतीच्या आणि मध्यम वर्गाच्या लोकांच्या रूढ स्वभावाचा आदर्श आहे. आपल्या लोकांनी मानव म्हणजे आत्मा आणि त्याचे शरीर–आवरण असा फरक केलेला आहे, आणि म्हणून शरीराचा धर्म वेगळा आणि आत्म्याचा धर्म वेगळा, शरीराचा गुण वेगळा आणि आत्म्याचा गुण वेगळा, असे पाहिले आहे, मनुष्य स्वातंत्र्यासाठी लढतो ते केवळ शरीरगुणांना मोकळीक मिळविण्यासाठी नाही, पण आत्म्याच्या गुणांना अनियंत्रित अवसर मिळावयासाठी. आत्म्याचे गुण हा पण मनुष्य–स्वभावच आहे. आत्मस्मरण ही जशी

नसर्गिक पद्धतींची वृत्ती समजता येईल तशी आत्मबलिदानाची वृत्तीही नैसर्गिक प्रवृत्ती आहे. एक प्रवृत्ती सामान्य आहे, प्राकृत आहे, दुसरी उच्च आहे. आत्म्याचे गुण पण मनुष्यस्वभावच आहे, आणि तो जितका विकसित होईल तितकी सामाजिक जीवनात न्याय, शांती, समता, प्रेम आणि उदारता ही खुलतील.

—जीवनसंस्कृति : १०९–११०

३. समाजजीवनाची आधार–तत्त्वे

दैवी आणि आसुरी संपत्

मनुष्यसमाजाचे गीतेने मुख्य दोन विभाग कल्पिले आहेत : दैवी आणि आसुरी.

द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन् दैव आसुर एव च । (१६.६)

आणि म्हटले आहे–

दैवी संपद् विमोक्षाय निबंधायासुरी मता । (१६.५)

दैवी संपत्तीने मनुष्याचा विकास होत असतो आणि हळुहळू समाजविनाशक दुर्गुणांपासून तो मुक्त होतो. आसुरी संपत्ती स्वार्थ, अहंकार, मत्सर इत्यादी समाज-द्रोही दुर्गुणांचे अधिकाधिक पोषण करीत असते. भोग आणि ऐश्वर्यात चित्त गुंतवून लोक आंधळे बनत असतात. ते खरे ज्ञान गमावून बसतात, आणि शेवटी अधो-गतीला जाऊन भिडतात. काम, क्रोध आणि लोभ या तिघांचा स्वीकार करण्याने समाजाची अवनतीच व्हायची. नरकाच्या द्वारासारख्या या तीन दुर्गुणांना सतत विरोध करण्यानेच संस्कृती टिकू शकते.

गीतेचे समाजशास्त्र दैवी संपत् आणि आसुरी संपत् यांच्या विभागात सामावलेले आहे. दैवी संपत्तीत समाजाच्या स्थैर्याची आणि अभिवृद्धीची सर्व लक्षणे आलेली आहेत, तर आसुरी संपत्तीत विजय आणि ऐश्वर्य यांच्या आभासाने माणूस कसा आंधळा बनतो हे दाखविले आहे. अध्यात्मशास्त्र अथवा वेदांतविद्या परलोकासाठीच आहे, ती इहलोकाच्या विरुद्ध आहे असे समजून आपण आजकाल त्याकडे बऱ्याच वेळा उदासीनता दाखवितो. पण इहलोक आणि परलोकामध्ये असा विरोध असूच शकत नाही असे उपनिषदांनी स्पष्ट म्हटले आहे. इहलोकात जे नालायक ठरले ते परलोकात अनायासे यशस्वी ठरतील असे नाही होणार. जे येथे असते तेच तेथे. जे

तेथे तेच येथे. या दोघांत ज्यांना विरोध दिसतो ते एका विनाशातून दुसऱ्या विनाशात उतरतात असे विनाशाचा स्वामी यमराज याने स्वतःच सांगितले आहे. श्री शंकराचार्यांनीही धर्माविषयी हेच सांगितले आहे की धर्मात दुहेरी शक्ती आहे. इहलोकाचा अभ्युदय आणि पारलौकिक कल्याण ही दोन्ही जो साधून देतो तोच धर्म होय.

—जीवनप्रदीप : ७७–७८

व्यक्तीचा आदर्श वेगळा आणि समाजाचा आदर्श वेगळा असे नाही म्हणूनच व्यक्तिवाद की समाजवाद या भांडणात अर्थ नाही. व्यक्ती किंवा समाज स्वतःचा विकास साधून कोणत्या दिशेने जाऊ इच्छितो हे जर आरंभीच निश्चित केलेले असेल तर युरोपच्या समाजशास्त्रज्ञांमध्ये दीर्घ कालापासून चालत आलेले हे भांडण अर्थहीन आहे हे सहज लक्षात येईल असे आहे.

पुरुषार्थ म्हणजे विघ्नांवर विजय. माणसाच्या स्वभावात जीवनसाफल्याकडे जीवनाला घेऊन जाण्याची वृत्तीही आहे, आणि जीवनाचा उद्देश, ध्येय, मारले जाईल अशा प्रकारच्या आत्मघातकी वृत्ती पण आहेत. त्यांना विकृती अथवा विकार म्हणतात. स्वार्थ, संकुचितता, विरोध, वैर, द्रोह, हिंसा, अभिमान वगैरे विकारांनी जीवन प्रयोजनावर आघात होतो, आणि माणूस अधिकाधिक अडचणीत येऊन पडतो.

—जीवनप्रदीप : ७९

गीतेत अध्यात्मशास्त्र आणि समाजशास्त्र एकत्र विणलेले आहे. त्यामुळे गीतेच्या समाजशास्त्रात गीतेचे अध्यात्म ओवलेले आहे असे पाहणे आवश्यक आहे.

गीतेमध्ये मुख्यत्वे दैवी संपत् आणि आसुरी संपत् यांच्यातील सनातन संघर्ष दाखविलेला आहे. दैवी संपत् आत्मार्थी असते, आणि आसुरी संपत् भोगैश्वर्यप्रसक्त असते; म्हणून प्रथम आत्म्याला ओळखा, आत्म्याला गुदमरवून टाकणाऱ्या विषयांवर विजय मिळवा, विषयांनी पुढे केलेली सुखदुःखांची कसोटी फेकून द्या, त्रिगुणांचे रहस्य समजून सत्त्वगुण वृद्धिंगत करा, आणि शेवटी तिन्ही गुणांच्या पलीकडे जाऊन सर्व प्रकारची आसक्ती सोडून देऊन यज्ञरूप कर्तव्यकर्म करून अमृतरूपी शांती मिळवा, असा गीतेचा उपदेश आहे. ईश्वराला शरण जाऊन, ईश्वराची भक्ती करून, व जीवनसर्वस्व ईश्वराला अर्पण केल्याशिवाय साधना अथवा प्रगती अशक्य आहे, हे पण गीतेने दाखविले आहे. समाजशास्त्रात गीतेने दैवी संपत्चा स्वीकार, स्वधर्मपालन, श्रेष्ठांचे अनुसरण, लोकसंग्रह, सर्वभूतहितसाधन, यज्ञमय जीवन आणि ज्ञानदान याच गोष्टींना महत्त्व दिलेले आहे. उच्चनीच भावाला स्थान नसलेच पाहिजे असे पण

आग्रहपूर्वक सांगितले आहे.

—जीवनप्रदीप : १८३–१८४

दैवी आणि आसुरी संपत्ती म्हणजे नेमके कोणते आचारगुण आहेत हे गीतेच्या १६ व्या अध्यायात खालीलप्रमाणे दिलेले आहेत. ते येथे देणे सोयीचे व उपयुक्त ठरेल :

अध्याय १६ :

१. निर्भयत्व मनःशुद्धि योग–ज्ञानीं सुनिश्चय ।
यज्ञ निग्रह दातृत्व स्वाध्याय ऋजुता तप ॥
२. अहिंसा शान्ति अक्रोध त्याग सौजन्य सत्यता ।
अलुब्धता दया भूती मर्यादा स्थैर्य मार्दव ॥
३. पवित्रता क्षमा तेज धैर्य अद्रोह नम्रता ।
हे त्याचे गुण जो आला दैवी संपत्ती घेउनी ॥
४. दंभ मीपण अज्ञान क्रोध दर्प कठोरता ।
लाभती गुण हे त्यास ज्याची संपत्ती आसुरी ॥
५. सुटका करिते दैवी, आसुरी बंध घालिते
भिऊ नको चि आलास दैवी संपत्ती जोडुनी ॥

—गीताई.

(काकांनी यासंबंधी म्हटले आहे–लोभ, भोगलालसा, असूया वगैरे माणसाच्या ठिकाणी असतील तोपर्यंत तो निर्भय नसतो; आणि जो स्वतः निर्भय नसतो तो इतरांना कसा निर्भय बनवू शकेल? जो तृप्त अथवा विरक्त असतो तोच निर्भय होऊ शकतो, आणि तोच इतरांनाही अभयदान देऊ शकतो; कारण तृप्ती किंवा विरक्ती या दोघीतूनच समाधानाचे वातावरण आपण मिळवू शकतो.)

समाजाच्या दृष्टीने, मनुष्यजातीच्या दृष्टीने, समाधान हीच आज जगाला मुख्य वस्तू पाहिजे आहे. स्वतःची उन्नती पूर्ण झाली नाही, ज्ञानाची कितीतरी क्षेत्रे अद्याप खेडली गेलेली नाहीत, द्वेष मत्सरादी शत्रूंवर अद्याप विजय मिळाला नाही, म्हणून माणसाने असंतोष बाळगायला पाहिजे. पण भौतैश्वर्याच्या बाबतीत अतृप्ती किंवा असंतोष शिकून जग कधीच सुखी होऊ शकणार नाही. आज जगातील भिन्नभिन्न समाजांचे मन तपासल्यास लोक भयभीत अवस्थेत आहेत किंवा इतरांना भयभीत करण्याच्या तयारीत आहेत असे दिसते. हे प्रगतीचे लक्षण तर होऊच शकत नाही. म्हणूनच अभय, द्विविध अभय, समाजाचे स्थैर्य आणि उत्कर्ष यांसाठी आवश्यक असा सामाजिक सद्गुण आहे.

—जीवनप्रदीप : ८१

४. संस्कृतीचे हार्द

संस्कृती म्हणजे काय हे अद्याप पुरते स्पष्ट झाले नाही. एके वेळी नैतिक जीवन, चारित्र्याची दृढता, आर्यत्व हाच संस्कृतीचा पाया समजला जात असे. आज तसे राहिले नाही असे म्हणता येणार नाही. विविध प्रकारचे अनुभव घेणे, प्रसंग येतील तसे अथवा विनाकारण बदल करणे, धीराने परिणाम तपासून न पाहणे हा सध्याचा स्वभाव आहे. नीती, सदाचार आणि चारित्र्याचा आग्रह यांच्याशिवाय जर संस्कृती घडविता आली तर लोकांना ती आज पाहिजे आहे. चारित्र्याला आज सरळ सरळ कोणी विरोध करीत नाही. सदाचाराच्या आदर्शांत आवश्यक अशी शुद्धी व परिवर्तनही होत आहे, परंतु 'चारित्र्याचा विकास ही प्रत्येक व्यक्तीची खाजगी बाब आहे; त्यांच्या आधाराने समाजाचा आणि राज्यव्यवस्थेचा विचार करायलाच नको' अशा प्रकारची वृत्ती अनेक ठिकाणी पाहावयास मिळते.

आणि म्हणून चारित्र्याच्या ऐवजी भौतिक साधनशक्ती; भौतिक विकासाची सूक्ष्मता, राजतंत्राची युक्तता, कलेचे रहस्य वगैरे अन्य गोष्टींचा संस्कृतीकरिता आधार शोधण्यात येत आहे. आणि सबंध रात्र जंगलात भटकून कर (टोलनाक्यावरचा) चुकवू पाहणारी गाडी सकाळी अचूकपणे टोलनाक्यासमोरच येऊन उभी राहावी तशी प्रत्येक सामाजिक प्रयोगाची स्थिती होत आहे, आणि शेवटी नैतिक प्रगतीशिवाय उपाय नाही या अनुभवावर गाडी येऊन थांबते. सध्या जगाचे अर्थशास्त्र सदाचाराला टाळण्यासाठी व्यर्थ खटपट करीत आहे.

जगाचे व्यवहारी राजकारण नीतीचे ढोंग करून नीतिशून्य रीतीने चालू बघते; शिक्षणाच्या क्षेत्रात नीतीवरील आग्रहाविषयी लोक अधिकाधिक साशंक व्हायला लागले आहेत. सर्व जीवनसाधनेतून सदाचाराचा अंश, नीतीचा अंश अथवा अंकुश जेवढ्या प्रमाणात कमी करता येईल तेवढे चांगले अशी वृत्ती तयार होत आहे.

— जीवनव्यवस्था : ३०३–३०४

आंधळे बनून अनेक प्रयोग करण्यापेक्षा जर मनुष्य प्रथम मनाशीच विचार करून घेईल आणि समान विचारवंतांशी चर्चा करून घेईल तर जीवनात अनावश्यक खर्चिक प्रयोग करण्याऐवजी मनातच, विचार क्षेत्रातच, मनन आणि चर्चारूपाने प्रयोग करून आपण मौल्यवान निर्णयाप्रत येऊ शकू, आणि असे करण्याने शक्तीची बचतही होईल. फलदायी चर्चेचे शास्त्र जे लोक जाणतात ते अनेक ठोकरा खाण्यापासून बचावतात. कोणत्याही निर्णयाला येऊन पोहोचण्यापूर्वी विचार करण्यासाठी आपण समिती नेमतो तिचा उद्देश हाच असतो.

पूर्वीच्या काळी समाजतंत्र एकाच प्रकारे चालत असे. त्याच्या कित्येक बाह्य

नियमांत सामान्य बदल भलेही होवोत, पण समाजाचा पाया कसा आहे, समाज कोणत्या तत्त्वांच्या आधाराने चालत असतो याविषयी कोणी पुष्कळ विचारांच्या भोवऱ्यात पडत नसे; आणि पडले तर समाजरचनेविषयींची एखादी पौराणिक उपपत्ती देऊन तिच्यावरच समाधान मानीत. त्याकाळात समाज ही काही एक अगम्य वस्तू आहे, ती स्वयंगतिक आहे, आपण तिला अडविण्यास भ्यावे, अशा प्रकारची वृत्ती लोकांमध्ये असे. आज ती अगम्यता नष्ट करण्याचे प्रयत्न चालू आहेत. अमुक गोष्ट गूढ आहे, अगम्य आहे, म्हणून पवित्र आहे अशा प्रकारची मनोवृत्ती कोणी सहन करू शकत नाही. समाज जीवनाची मुळे आपण समजत होतो तितकी गूढ आणि दुर्ज्ञेय नाहीतच अशा प्रकारची वृत्ती अधिकाधिक शिकविली जात आहे.

गायीचा जबडा मोठा असला तर ती अधिक गवत खाईल. नाक रुंद असेल तर ती अधिक श्वास घेईल. गाईची कास मोठी असेल तर त्यात अधिक दूध मावेल; यावरून सबंध गायीचे लक्षण निश्चित करून घ्या, यापेक्षा अधिक काही गूढ नाहीच, असे म्हणण्याकडे आजच्या गोपालनशास्त्राची प्रवृत्ती आहे. गुणभेदाच्या पृथक्करणापेक्षा ते परिणामभेदांवर येऊन पोहोचते; म्हणजे त्यात रहस्य, गुप्तित अशी काही गोष्टच नाही, असे सिद्ध करता येईल असे सध्याचे मत आहे.

गूढवाद जेवढा कमी होऊ शकेल तेवढे चांगले. अज्ञान आणि आळसातून गूढभाव निर्माण करणे हे माणसाला शोभत नाही. प्रत्येक गोष्ट अमीमांस्य आहे असे सांगण्यात श्रद्धा नाही, पण जडता आहे हे आपण समजायला हवे. त्याचबरोबर हे पण लक्षात घ्यावयास पाहिजे की उतावीळपणाने केलेली मीमांसा तत्त्वांचा विसर पाडते आणि शेवटी **घट्टकुटी प्रभात न्याये** गाडीप्रमाणे मूळ अडचणीचे टोलनाके आपल्यासमोर पुनः उभेच राहते.

मानवजीवन आता महान् परिवर्तनाच्या टोकावर आलेले आहे. यात जे संकल्प पेरले जातील, प्रयोग अजमावले जातील, जी प्रेरणा स्वीकारली जाईल, त्यांची एक भव्य, व्यापक आणि तेजस्वी संस्कृतीत परिणती होईल. क्षुद्र वासनांना व तुच्छ आदर्शांना जर मनुष्य वश झाला, उत्तुंग महत्त्वाकांक्षांच्या मागे शास्त्रीय निष्ठेने पण फकीराच्या बेफिकिरीने जर जीवन झोकून देऊन अर्पून टाकायला माणूस तयार झाला नाही, तर हा हंगामाचा ऋतू वाया जाईल. रोजचे सुख, रोजची सुरक्षितता आणि करंटी विलासिता यातच जर माणूस सामाधान मानू लागेल तर काळाच्या असाधारण परिस्थितीमुळे अशा जीवनात विकृती निर्माण होईल आणि जीवन कुजून जाईल. पण जर महासागराच्या भयानक प्रभंजनात झेपावण्याची हिंमत मनुष्य करील, जर तो सागरात बुडी मारून तळाशी जाणारा पाणबुड्या होईल, तर आतापर्यंत न कल्पिलेली अशी महान संस्कृती व अलौकिक प्रगती त्याचीच आहे. गंभीर चर्चेच्या शेवटी बलवान जीवन फुलावयास पाहिजे. या जीवनातून जो नवा माणूस निर्माण

होईल तो मानवजातीला नवी दिशा देईल.

आपण या महान संकल्पांना नीट ओळखू या, त्यांना आव्हान देऊ या, त्यांची दीक्षा घेऊ या आणि त्यांचे अंकित बनू या.

अज्ञात पण उज्ज्वल अशा भविष्यात उडी घेऊ या.

—जीवनव्यवस्था : ३०५–३०६

५. संस्कृतींचा जीवनक्रम

संस्कृती ही काही चारही बाजूंना अडविलेल्या पाण्याचा तलाव नाही. जिच्या दोन्ही बाजूंचे किनारे मर्यादित पात्रात पाणी वाहात ठेवते, आणि जिच्यात वरून हवे तेवढे पाणी येऊ शकते, आणि जिचे पाणी अनुकूल दिशेत स्वेच्छापूर्वक सहजरीत्या पुढे जाऊ शकते अशी संस्कृती ही तर एक सुदीर्घ व विशाल नदी आहे. नदी जसजशी पुढे वाहात जाते तसेतसे अनेक लहान मोठे ओहोळ, जलप्रवाह, तिच्यात येऊन मिसळतात, आणि काही काही वेळा एकच नदी असते पण अनेक प्रवाहांत तिचे पाणी वाटले जाऊन तिला अनेक फाटे फुटून ते सर्व सुट्यासुट्या रीतींनी महासागरात जाऊन मिसळून जातात. काही नद्या तर अशाही आहेत की ज्यांच्या एका प्रवाहाला फाटे फुटून त्यांचे दोन तीन मोठे प्रवाह बनून ते स्वतंत्रपणे वाहू लागतात, आणि बरेच पुढे वाहून गेल्यावर ते पुनः एकत्र येऊन त्यांचा एक मोठा प्रवाह बनून वाहतो.

नद्यांचा असा प्रवाहक्रम अथवा जीवनक्रम माणसाच्या हातातली गोष्ट नसते. निसर्गाची अगम्य लीलाच हे जीवनक्रम निश्चित करीत असते. मनुष्य आपला दृढ संकल्प आणि तपस्येच्या बळाने त्यांच्यात विशिष्ट बदल घडवू शकतो. तो जो काही कमी जास्त फरक करतो त्यापासून त्याला स्वतःला योग्य असा लाभही मिळत असतो.

हिंदुस्थानात जगाच्या सर्वच मानवी संस्कृतींचे महासंमेलन होत आले आहे. त्यात थोडा भाग आपले साधुसंत, साहित्यिक, आणि तत्त्वज्ञ यांचा आहे आणि त्यापेक्षा अधिक भाग इतिहासविधात्याच्या लीलेचा आहे.

अशा स्थितीत संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी आपण असा काही प्रयत्न करू नये की ज्यामुळे नदीचा तलाव बनून जाईल. फार फार तर ज्या प्रवाहाच्या पाण्याची आपणास अधिक गरज वाटेल त्या प्रवाहाला अधिक गतिमान करावे. एवढ्यावरच आपण समाधान मानावयास पाहिजे.

—जीवनव्यवस्था : ४

६. संस्कृतीचा विस्तार

वृक्ष आपापल्या ठिकाणीच राहतात, पण वारा वृक्षांच्या बीजांना एका जागेहून दुसऱ्या जागी उडवून नेत असतो. फूल आपल्या स्वतःच्या जागीच राहते, पण फुल-पाखरांच्या पायांना फुलांचे जे पराग चिकटतात त्यांच्यामार्फत दूरदूरच्या फुलांमध्ये असणाऱ्या पुंकेसरांशी आणि स्त्रीकेसरांशी त्यांचा संयोग होत असतो आणि असा पुष्पसृष्टीचा विस्तार होत असतो. मानवी संस्कृतीचे पण असेच आहे. माणसामध्ये दोन्ही वृत्ती पाहावयास मिळतात—स्थावर आणि जंगम. स्थावर माणसे एकाच जागी राहात असतात. त्यांच्या ठिकाणी संरक्षक वृत्ती विशेष प्रमाणात असते. स्थावर लोक पुराणप्रिय असतात, शांतीचे उपासक असतात. जंगम लोक त्यांच्या अगदी उलट; त्यांच्या ठिकाणी स्थिरता नसते. कितीही जरी फायदा होत असला तरी जंगम माणूस एका स्थानाला चिकटून बसत नाही. स्थावर माणसाचा धंदा शेती आहे, जंगम माणसाचा धंदा शिकार किंवा पशुपालन आहे. शिकार ही रानटी स्थिती आहे, पशु-पालन ही तिच्यापेक्षा सुधारलेली स्थिती आहे. स्थावर तशीच जंगम या दोन्ही वृत्ती ईश्वरनिर्मित आहेत. दोघींच्याही द्वारा ईश्वराचा हेतूच फलीभूत होत असतो. या तत्त्वाला लक्षात ठेवून आपण भिन्नभिन्न संस्कृतींचे अध्ययन करू या.

—जीवनसंस्कृति : ३

जगात मुख्य तीन संस्कृती पाहावयास मिळतात : मुसलमानी, ख्रिस्ती आणि हिंदू. या संस्कृतींना आम्ही जरी येथे ते ते नाव दिलेले असले तरी धर्म आणि संस्कृती या दोन वस्तू एकच नाहीत....

मुसलमानी संस्कृती अरब लोकांच्या तंबूमध्ये निर्माण झाली आणि घोड्याच्या पाठीवरून तिचा विस्तार झाला. जेथे जेथे घोडा पोहोचू शकला तेथे तेथे मुसलमानी संस्कृती गेली. प्रत्येक जन्म जसा दोन व्यक्तींच्या संयोगातून घडतो तसे संस्कृतीचेही घडते. मुसलमानी धर्माच्या अरबी वीर्याचा इराणी संस्कृतीशी संयोग झाला आणि इस्लामी संस्कृती निर्माण झाली.

—जीवनसंस्कृतिः : ४

ख्रिस्ती संस्कृतीचा जन्म भूमध्य समुदाच्या किनाऱ्यावर झाला आहे आणि तिचा प्रसार समुद्राच्या देहावर फिरणाऱ्या नौकांच्या मार्फत झाला आहे. ख्रिस्ती धर्माच्या तत्त्वाला ग्रीक संस्कृतीचे पोषण मिळाले आणि पुढे जाऊन रोमन संस्कृतीच्या आखाड्यात शिकून तो तयार झाला. ख्रिस्ती संस्कृतीवर मातापित्यांपेक्षा गुरूच्या शिक्षणाचा परिणाम अधिक झालेला दिसतो. जेथे जेथे नौकेचे फिरणे होते तेथे तेथे

या संस्कृतीचा विस्तार झालेला आहे.

तिसरी संस्कृती हिंदूंची. मुसलमानी संस्कृतीचे चित्र तंबूजवळ घोडा बांधून दाखविता येईल, ख्रिस्ती संस्कृतीचे चित्र समुद्राच्या लाटांवर डोलणाऱ्या नौकेने व्यक्त करता येईल; तर हिंदु संस्कृतीचे चित्र वटवृक्षाच्या खाली एखाद्या झोपडी शेजारी गाय बांधून दाखविता येईल. आर्यधर्माचा द्राविडी इत्यादी संस्कृतींशी विवाह झाला; त्यातून हिंदुसंस्कृती निर्माण झाली.

ख्रिस्ती संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी चांगली होडी आहे, मुसलमानी संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी चांगला घोडा आहे; हिंदु संस्कृतीचा प्रसार करणारे कोण आहे ? अरण्ये साफ करून शेती करणाऱ्या आणि शहरे वसविणाऱ्या आर्यांनी हिंदु संस्कृतीचा थोडाफार विस्तार केला खरा, पण हिंदु संस्कृतीचा विस्तार करणारा तर झोपडीवर उगवलेल्या तुंबडीचे भिक्षापात्र बनवून अंगावर घेतलेल्या वस्त्राला लाल मातीने रंगवून '**न धनेन न प्रजया त्यागेनैकेन अमृतत्वमानशुः**' असे म्हणून धर्माचा आणि अमृतत्वाचा पेला जगाला पाजून निघून जाणारा सर्वसंगपरित्यागी परिव्राजक आहे. या मार्गाच्या आद्य परिव्राजकाने तर उत्तर हिंदुस्थानातच विहार केला, पण त्याचे शिष्य '**अक्कोधेन जिने क्कोधम्**' म्हणत सबंध युरेशियाला व्यापते झाले.

—जीवनसंस्कृति : ४–५

विविधता हा सृष्टीचा मूलमंत्र आहे. एकाच संस्कृतीचा प्रसार सबंध जगात व्हावा अशी इतिहासविधात्याची इच्छा नाही. विविधतेच्या संबंधात एकतेला प्रस्थापित करण्यातच प्रभूचा आनंद सामावलेला आहे.

ज्याला एकांगी साक्षात्कार झालेला असतो त्याला हे तत्त्व समजत नाही, आणि म्हणूनच स्वतःच्याच तत्त्वाचे सार्वभौमत्व प्रस्थापित करण्यासाठी तो बाहेर पडत असतो. हा प्रचारक पुनः नेहमी निःस्वार्थीच असतो असे पण नाही.

—जीवनसंस्कृति : ५

या जंगम संस्कृतीचा तिसरा नमुना हिंदुधर्मातूनच निघालेल्या बौद्ध धर्माचा आहे. या धर्माची पण सार्वभौम होण्याची आरंभापासून इच्छा होती, पण त्याची साधने सौम्य आणि सात्त्विक होती. म्हणून त्याच्या विस्तारात किंवा संकोचात रक्त-पाताची आवश्यकता दिसली नाही. या धर्मात सत्याचा जेवढा अंश आहे त्याचा आपोआप प्रसार होतो आणि भ्रामक कल्पना किंवा अहंकार बुडाशी उरतो. जशी समुद्राच्या पाण्याची वाफ होऊन ती आकाशात उडून जाते आणि खारट मीठ खाली पडून राहते तसे बौद्ध धर्माचे आजपर्यंत होत आले आहे.

हिंदुस्थानच सर्व धर्मांचे माहेर आहे. धर्मांची व्यवस्था लावण्याची शक्ती हिंदुस्थानात वसत आहे. हिंदुसंस्कृतीत जंगमापेक्षा स्थावर तत्त्व विशेष आहे, आणि मुख्य गोष्ट तर अशी आहे की हिंदु-संस्कृतीत अहंकार नाही. सर्व संस्कृतींच्या समन्वयाचा प्रथम प्रयोग परमेश्वर हिंदुस्थानात नाही करणार तर दुसरीकडे कोठे जाऊन करणार ?

—जीवनसंस्कृति : ७-८

७. भारतीय संस्कृती

भारतीय संस्कृती ही केवळ आर्य संस्कृती किंवा हिंदु संस्कृती नाही. ही संस्कृती फक्त प्राचीन काळाच्या स्मरणात बुडून राहिलेली नाही. भारतीय संस्कृतीचे केंद्र आहे हिंदुस्थान, परंतु तिचा परीघ किंवा क्षेत्राचा विस्तार हिंदुस्थानापुरता सीमित नाही.

भारतीय संस्कृती ही भारताच्या इतिहासापेक्षाही अधिक विशाल आहे, कारण इतिहास तर फक्त भूतकाळाचीच जाणीव ठेवतो, तर संस्कृतीचा संबंध भूत, वर्तमान आणि भविष्य या तिघांबरोबर असतो. इतिहासाला आपल्या भविष्याचे अज्ञान असते. संस्कृती आपल्या भविष्याच्या ध्रुवताऱ्यावर अप्रतिहतपणे दृष्टी स्थिर ठेवून पुढे वाटचाल करीत असते.

हिंदुस्थानात अनेक धर्म आहेत, अनेक भाषा आहेत, अनेक देशांतून येऊन राहिलेले अनेक वंशांचे लोक आहेत. संपत्ती, बुद्धिशक्ती, कौशल्य, उदारता आणि शालीनता इत्यादी प्रत्येक दृष्टीने भिन्न कोटींचे लोक येथे येऊन वसले आहेत. असे असूनही आपण म्हणत आहोत की हिंदुस्थानची संस्कृती एक आहे, अखंड आहे, अविभाज्य आहे. पुष्कळ लोकांना हे समजू शकत नाही की भिन्न भिन्न धर्मावलंबी लोक एका संस्कृतीत कसे येऊ शकतात ?

हिंदुस्थानात शक, हूण इत्यादी बाहेरचे कितीतरी लोक येऊन गेले. त्यांनी येथील धर्म आपला मानला; एवढेच नाही, पण संस्कृतीने पण ते या देशाचे बनले. हिंदुस्थानच्या बाहेर त्यांच्यासाठी कोणताही स्वदेश नाही राहिला. बाहेरून जी काही संस्कृती ते लोक येथे घेऊन आले ती येथील लोकांनी कायम आपलीशी केली आणि येथल्या सर्व चांगल्या–वाईट गोष्टी त्यांनी आपल्याच मानल्या. याप्रमाणे ते संपूर्णपणे येथले बनून राहिले.

—जीवनव्यवस्था : ५

भारतीय संस्कृतीत अशी एक महत्त्वाची गोष्ट होती की जी अन्य देशांत नशीबानेच मिळू शकेल. भारतीय जनता पहिल्यापासूनच असे मानत आलेली आहे की ईश्वराकडे पोहोचण्याचे मार्ग अनेक आहेत. मनुष्य अज्ञानी आहे हा काही त्याचा दोष नाही. ईश्वर सर्वज्ञ आहे. प्रत्येक मनुष्याच्या हृदयाची गोष्ट त्याला कळत असते. मनुष्यामध्ये जर दुष्टता नसली तर त्याला ईश्वर सुरुवातीपासूनच क्षमा करून टाकत असतो. ईश्वराच्या समोर लहान-मोठे, पंडित-मुल्ला, विद्वान-रानटी सगळेच अज्ञानी असतात. एकाचे अज्ञान काजळासारखे असेल तर दुसऱ्याचे अज्ञान कोळशासारखे असेल. त्यांत कोणाला शिक्षा करायची आणि कोणाला बक्षीस द्यावयाचे ?

जगात इतके अनेक धर्म अस्तित्वात आहेत पण त्या सर्वांचे एक विशाल धर्म-कुटुंब बनविण्याचे सामर्थ्य भारताच्याच संस्कृतीत आहे. भारतीय संस्कृतीने कधीच सांगून टाकले आहे की मानवजातीत प्रचलित असलेले सर्व धर्म सत्य आहेत. सर्वांची प्रेरणा ईश्वरापासूनची आहे. पण या सर्व माणसांच्या द्वारा प्रचार झाल्यामुळे त्या धर्मांमध्ये माणसांची अपूर्णतासुद्धा आली आहे...वैदिक संस्कृतीपासून तिचा उगम असेल. त्या पूर्वीची आपणांस माहिती नाही. पण तिच्यात वेळोवेळी जगभरच्या संस्कृतींनी आपापले योगदान केले आहे व भर घातली आहे...जे लोक ईश्वर मानत नाहीत, कोणत्याही धर्माविषयी आदर दाखवायला तयार नाहीत, कोणतेही शास्त्र मानीत नाहीत, बुद्धीपेक्षा श्रेष्ठ असे काहीही स्वीकारायला तयार नाहीत असे लोकही भारतीय संस्कृतीने बहिष्कृत मानलेले नाहीत. अशी एक मजेदार परंपरा या देशात प्राचीन काळापासून चालत आलेली आहे.

—जीवनव्यवस्था : ७

८. भारतीय संस्कृती वृक्षासारखी

उपासनेचा हा एवढा प्रचंड पसारा शेवटी सहन करावा लागतो तो बिचाऱ्या भगवंताला. म्हणून त्याला कंटाळून आपल्याकडे इस्लामला पाठविले. त्या इस्लामची स्थापनाच तीनशेसाठ कोनाड्यांतून तीनशेसाठ देवदेवतांना खाली पाडून झाली होती. इस्लामच्या मूर्तिभंजक एकेश्वरी उपासनेने प्रभावित होऊन आपण शीखपंथ, ब्राह्मसमाज, प्रार्थनासमाज आणि आर्यसमाज यांसारखे समाज स्थापन करून आपल्या घरची एकेश्वरी उपासना पुढे चालवली. पण भारतीय मानसच असे आहे की सुधारक असो की उद्धारक, जो येईल त्या प्रत्येकाला नमस्कार करून ते

त्यासाठी एक कोनाडा तयार करून देते. तुला पण आमच्याकडे आदराचे स्थान असेल, पण तू 'सर्वांमध्ये एक' होऊन राहावे लागेल. 'सर्वांच्या ऐवजी एक' हे सूत्र आपल्याकडे चालले नाही व चालणारही नाही. आपली संस्कृतीच वृक्षरूप संकृती आहे. तिच्यात फांद्या, उपफांद्या, डहाळ्या, पाने यांचा विस्तार वाढतच राहणार. म्हणजे आपण शहाणे होऊ तर सर्वांना पोषण देणाऱ्या बुंध्याचा पण विचार करू आणि तो बुंधा मोठा, रुंद व विस्तृत व्हावा यासाठी प्रत्येक वेळी निसर्गक्रमातच त्याच्या तुटणाऱ्या साली़चाही विचार करू; आणि जेवढ्या फांद्या फुटतील व वाढतील त्या सर्वांचे स्वागत करू.

—जीवनव्यवस्था : ५–६

९. परंपरा आणि सुधारणा

परंपरेचा अर्थ असा नाही की जुनेच साठवायचे, त्यालाच चिकटून राहावयाचे व तेच चिघळत बसायचे, त्याचीच खंथ करीत बसायचे. परंपरा म्हणजे जुन्या बांधकामावरच नवे नवे मजले चढवायचे आणि नव्या नव्या उंचीवरून दूर दूर पर्यंत पाहता येण्याची सोय मिळवायची. परंपरा म्हणजे सुधारणा व दुरुस्त्या यांचा स्वीकार करणारा व वाहात राहणारा अखंड प्रवाह. मला माझे जे शरीर मिळाले आणि जे संस्कार मला वारशात मिळाले, त्यासाठी मी माझ्या कुलपरंपरेचा आभारी आहे. ही कुलपरंपरा म्हणजे काय ? माझ्या कुलातील जितके पूर्वज विवाहबद्ध झाले त्या सर्वांनी इतरच वेगवेगळ्या कुळांतील मुलींना त्यांच्या त्यांच्या संस्कारांसह आपल्या घरी आणले, आणि अशा रीतीने भिन्न भिन्न कुळांच्या संस्कारांचा समन्वय साधला. या समन्वयात नवीनतेचे प्रमाण पुरेसे असावे यासाठी पूर्वजांनी नियम केला की विवाह करायचा असेल तर तो आपल्या कुलात नको, आपल्या गोत्रातही नको, आणि विशिष्ट अत्यंत जवळचे संबंध टाळूनच लग्न करावयास पाहिजे. त्यात एवढेच पाहायचे की (१) **स्वतःची राहणी**– म्हणजे स्वतःचे संस्कार, (२) **स्वतःची करणी** म्हणजे स्वतःच्या व्यवसायासंबंधीचे सर्व पुरुषार्थ, आणि (३) **विचारसरणी**– म्हणजे स्वतःच्या संस्कृतीची जीवनदृष्टी– या सर्वांना अनुकूल ठरेल अशा रीतीनेच पुरुषाने स्त्रीची व स्त्रीने पुरुषाची निवड करावयास पाहिजे. (जेवणात आपण धान्य, कडधान्ये, भाजीपाला, मसाला आणि अनेक सुवासिक वस्तू एकत्र करून खात असतो. आयुर्वेद म्हणतो की या मिश्रणात 'विरुद्ध अशन' होणार नाही एवढे तरी पाहायला

पाहिजे. नाहीतर उचकी लागणे, पोटात वायूंनी गुबारा धरणे असे होऊन प्रकृती बिघडते.)

कुलपरंपरेत जसे आपण प्रत्येक विवाहाबरोबर इतर कुलाचे संस्कार आग्रहपूर्वक स्वीकारून घेतो, तसेच तीर्थयात्रांच्या द्वारा आपण सामाजिक जीवनाची विविधता पाहात असतो, आणि त्यातून जे चांगले वाटेल ते निवडून घेतो व आत्मसात् करून घेत असतो. शिवाय प्रत्येक पिढीत नवनव्या संस्कारांत सुधारणा वगैरे सारखे होतच असतात.

आपल्या पूर्वजांनी मानवी स्वभावाची वैशिष्ट्ये ओळखून व रुचीचे, आवडी-निवडीचे वैचित्र्य स्वीकारून अनेक प्रकारची उपासना सुचविली आहे. याप्रमाणे शैव, वैष्णव, शाक्त हे जीवनसंस्कृतीचेच तीन प्रकार आहेत. ज्ञान, कर्म, भक्ती हे जीवनसाधनेचे मार्ग आहेत. चार वर्ण ही जीवनसिद्धीची व जीवनसेवेची चार अंगे आहेत. चार आश्रम हे जीवनविकासाचे चार टप्पे आहेत. हे सर्व मिळून विराट जीवन फुलत असते.

—जीवनव्यवस्था : ४-५

१०. समन्वय

अशा विविध व्यवस्थेमुळे जीवनात जेव्हा एकांगीपणा येऊ लागतो तेव्हा आपल्या संस्कृतिधुरीणांनी या सर्वांचा समन्वय शिकवायला आपणांस शिकविले. पंचायतन पूजेत सर्वच देवांची पूजा एकत्र करावयाची असते. हीच परंपरा जर पुढे चालवायची असेल तर आपण म्हणू की जेव्हा या पूजेत हिंदुसंस्कृतीची सर्व अंगे तर येतीलच, पण त्यात पारशी, यहुदी, ख्रिस्ती, इस्लामी उपासनेला स्थान दिले जाईल तेव्हाच आपली प्रार्थना पूर्ण होईल. परंपरेत जुन्यातील जे टिकण्यासारखे असेल त्याची जोपासना करून त्याला नवे रूप द्यावयाचे आणि त्यात नवे नवे असे जे एकरूप होऊ शकणारे असेल ते मिसळून त्या सर्वांना एकजीव करावयाचे असते. जसे रोप वाढून वृक्ष बनत असतो, लहान बालकांतून पुरुषार्थी साहसवीर विकसित होत असतात, तसेच प्रत्येक समाजाची व देशाची संस्कृती जुन्यात परिवर्तन करून आणि नवीन आत्मसात् करून नवजीवन साधत असते.

—जीवनव्यवस्था : ५

११. संस्कृतिनिष्ठा म्हणजे कातनिष्ठा नव्हे

साप जेव्हा कात टाकतो, तेव्हा तो आपल्या शरीराविषयी बेफिकीर होत नसतो. पण जे जीर्ण झालेले असते, प्रगतीला बाधक ठरत असते, तेवढेच मागे ठेवून टाकून देऊन अधिक शक्तीनिशी, जोरदारपणे पुढे जात असतो. अगदी अलीकडे कात टाकून पुन्हा तरणाबांड झालेला साप कोणी पाहिला आहे का ? काय त्याची कांती ! काय त्याची चमक, तेजस्विता ! आणि काय उत्साह ! क्षणापूर्वी ज्याचे डोळे निस्तेज दिसत होते आणि वार्धक्यामुळे जो कसेतरी शरीर खरडत खरडत चालत होता, तोच साप कात टाकल्यावर वाऱ्याचा स्पर्शही असह्य वाटावा एवढ्या वेगाने, अत्यंत झपझप सरपटत धावायला लागतो ! जेव्हा मी हे दृश्य पाहिले तेव्हा मला समजून चुकले की संस्कृतिनिष्ठा म्हणजे कातनिष्ठा नसते.

—जीवनव्यवस्था : ५

शैव, वैष्णव, शाक्त इत्यादी उपासनांची विविधता विकसित झाल्यानंतर आपल्याकडे बौद्ध आणि जैन जीवनदृष्टींचा विकास झाला. या पुरुषार्थाने विशिष्ट कालखंडापर्यंत जणू सर्व राष्ट्राला व्यापून टाकले. त्यातही महायान संप्रदायाने शाक्त व बौद्ध दृष्टींचा मिलाफ घडवून त्यातून वेगवेगळ्या प्रकारची खिचडी शिजविली. येथे जैनांना सुद्धा शक्तिउपासनेबरोबर जुळणी करण्याची आवश्यकता दिसून आली. हिंदुसमाजाने निगम, आगम आणि तंत्रे यांना एकत्र करून टाकले. लोकरुचीचे, लोकांच्या आवडीचे समाधान करण्यासाठी वेडे होऊन आपण कोणास ठाऊक किती व्रते, उत्सव, सणवार तयार केले. आपल्या देवदेवतांची संख्या भारताच्या लोकसंख्येपेक्षा कमी तर नसणारच.

१२. बेसुमार संग्राहकता

आपण विविधतेचे इतके भोक्ते आहोत की सतत नवी नवी भरच घालत जात असतो; आणि जुने काहीच सोडत नाही, टाकून देत नाही. कात तर कसली, मेलेला सापसुद्धा कामाचा आहे असे समजून त्यांचाही संग्रह करून त्यांना जतन करून ठेवले पाहिजे असे आपण मानत असतो.

—जीवनव्यवस्था : ५–६

१३. सुधारणेची खरी दिशा

मनुष्याच्या स्वाभाविक वृत्ती आणि त्याची सद्‌बुद्धी या एकमेकींना अनुकूल जेव्हा होतील तेव्हा होतील; आजतरी वस्तुस्थिती तशी नाही. आज त्या दोघींत विरोध आहे. आज जे मधुर लागते ते पथ्य, हितकारक नसते, जे सुखकारक भासते ते कल्याणकारक नसते; जे प्रिय असते ते श्रेय नसते; कर्तव्याचा मार्ग दुःखद वाटतो आणि सुखाचा मार्ग हितकर नसतो. आपल्या नैसर्गिक वासना आपणास आपोआप पशुजीवनाप्रत ओढून नेतात. ईश्वराने माणसाला पशूपेक्षा विशेष असणारी अशी विवेकबुद्धी दिलेली आहे. पशूंना कार्याकार्य विचार (योग्यायोग्य विचार) करता येत नसतो. माणसाला असा विचार करावा लागतो. पण आपल्या वासना बऱ्याच वेळा इतक्या काही प्रबळ बनतात की त्या विवेकबुद्धीला दाबून टाकून त्या तर्कशक्तीला आपल्या ताब्यात घेतात. नंतर ही तर्कशक्ती न्याय-अन्यायाचा कोणताही विचार न करणाऱ्या पोटभरू वकीलप्रमाणे वासनांचा पक्ष घेते. जे सुखकारक असते तेच कल्याणकारी असते, प्रेय असते तेच श्रेय असते, असे सिद्ध करण्यात तर्कशक्ती खर्ची पडते. त्यागात असणारा आनंद विसरून जाऊन भोगाची लालसा वाढत असते, आणि तर्कशक्ती मधुर वाणीने म्हणत असते की मनुष्यजन्म भोगासाठीच आहे, भोगांचा उपभोग घेण्याचा माणसाला हक्क आहे; हा हक्क त्याने बजवायला पाहिजे. भोगातच मानवजीवनाची सफलता वसत असते, भोगक्षमता हीच संस्कृती आहे, हीच सुधारणा आहे. याप्रमाणे जो अधर्म आहे तोच धर्म आहे असे वाटण्याने आत्मवंचना होत असते.

—जीवनसंस्कृति : १५४–१५५

याप्रमाणे खूप लोक वासनेला वश झालेले असतात. 'सु' कोणाला म्हणावयाचे आणि 'कु' कोणाला म्हणावयाचे हेच समजेनासे झाले आहे. उच्छृंखल मनाला तर्कशक्तीचा आधार मिळाला म्हणजे मग अनर्थ परंपरेला कोण रोखू शकणार? ज्याच्याकडून आत्मसंयम होऊ शकत नाही त्याला मनुष्यजात किती उंच चढू शकते याची कल्पना कशी येऊ शकेल? मानवजातीचे श्रेय कशामध्ये सामावलेले आहे, कोणत्या वृत्तींना उच्च समजायचे, आर्यजीवन कसे असावे, अर्हत्‌पदाचा मार्ग कोणता, समाजाचे अंतिम ध्येय कोणते, या बाबतींचा निर्णय अशी अनधिकारी माणसे नाही करू शकत. धनलोभाने हृदयशून्य झालेल्या कृपण माणसाला विचाराल तर तो म्हणेल 'पैसा! पैसा हेच मानवजातीचे ध्येय आहे.' **अर्थो हि नः केवलम्।** शृंगारिक कादंबऱ्या वाचून बहकलेल्या स्त्रीलंपटाला विचाराल तर तो लगेच **रम्या रामा मृदुतनुलता** गोष्टी करू लागेल. असेच क्रिकेट, टेनिस खेळणारे म्हणतील

की आमच्या खेळांनीच माणसाची उन्नती व्हावयाची आहे. गाणे बजावणे करणे, चौपट, पत्ते किंवा बुद्धिबळ खेळणे, पैजा मारणे, पक्षी पाळणे वगैरे छंदांत मग्न झालेल्या लोकांना विचारावे की 'बंधूंनो, मानवजातीचे अंतिम ध्येय कोणते आहे?' आणि मग त्यांचे एकेकाचे उत्तर ऐकून घ्यावे.

ज्याने आपल्या पशुवृत्तींवर विजय मिळविलेला असतो, ज्याचे मन क्षुद्र स्वार्थाला वश झालेले नसते अशा अनासक्त, साम्यस्थित मनाचा महात्माच मानवाचे श्रेय कशामध्ये वसत असते ते बरोबर समजू शकतो. भांडणात व फिर्यादीत न्याय कोणता आहे हे जसे पक्षकार पाहू शकत नाहीत, निष्पक्षपाती पंचच ते पाहू शकतात, तसे मानवजातीचे ध्येय कोणते आहे हे निरपेक्ष आणि धर्मज्ञ असे स्मृतिकार समाजव्यवस्थापकच सांगू शकतात. स्वतःच्या पशुवृत्तीवर विजय मिळवून मनुष्यप्राणी किती उंच चढू शकतो हे बुद्ध, ख्रिस्त, तुकाराम वगैरेंसारख्या महात्म्यांनी प्रत्यक्ष उदाहरणाने दाखवून दिले आहे. जगातील सर्व देशांत, सर्व जातींत, सर्व धर्मांत आणि सर्व युगांत अशी देवमाणसे उत्पन्न झाली आहेत. यावरून कोणीही मनुष्य प्रयत्न केला तर तो या भूमिकेवर पोहोचू शकतो ही गोष्ट निर्विवाद सिद्ध झाली आहे.

मनुष्यप्राणी आपल्या पुरुषार्थाने काय काय करू शकतो, कोठपर्यंत स्वतःची उन्नती करू शकतो याचा वस्तुपाठ देण्यासाठी मनुष्यप्राण्याने आपले ध्येय किंवा श्रेय काय आहे हे नक्की करण्यासाठीच परमेश्वर अवतार घेऊन, मानव देह धारण करून मानवी कृती करीत असतो, असे जे म्हटले जाते त्याचे रहस्य पण हेच आहे. ध्येय ही मानवजातीच्या उन्नतीची परिसीमा असते. ध्येय हे विशिष्ट व्यक्ती आणि त्या व्यक्तीची शक्ती यांप्रमाणे बदलायचे नसते. एकाही माणसाने जर हे ध्येय प्राप्त करून दाखविले असेल तर ते शक्य कोटीतलेच समजायला पाहिजे.

—जीवनसंस्कृति : १५५–१५६

या दृष्टीने पाहता मनुष्याच्या जीवनक्रमात दोन टोके निश्चित होतात. एका टोकाला विषयलोलुपता, आहारनिद्राभयादी पशुव्यवहारपरायणता, स्वार्थ आणि हक्क ही असतात. दुसऱ्या टोकाला निर्विषयता, निर्भयता, इंद्रियदमन, परोपकारपरायणता आणि कर्तव्य इतक्या गोष्टी असतात. प्रत्येकाने आपल्या स्वतःच्या शक्तीप्रमाणे व परिस्थितीप्रमाणे या उच्च ध्येयाला कृतीत उतरविण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे, पण आपल्या मागे राहणाऱ्यांना रानटी किंवा पापी म्हणून त्यांची चेष्टा करता कामा नये. तसेच आपल्यापेक्षा अधिक धैर्याच्या लोकांना वेडे म्हणूनही चालणार नाही. आणि काहीही झाले तरी उच्चतम ध्येयाला कोणत्याही काळात अशक्य-अप्राप्य ठरविणे ही सुद्धा चूकच ठरेल, कारण ध्येयाला जर एकदा जरी त्याच्या उच्च स्थानापासून खाली पाडले तर त्याचा विनिपात शतमुखांनी नाही तर अनंतमुखांनी होईल. जे

स्थिर नसेल ते ध्येय कसले ? आणि त्यासाठी माणूस स्नेह, दया, सुख आणि जीवन या सर्वांना तिलांजली देण्यास तयार होईल एवढी निष्ठा पण कशी निर्माण होणार ? म्हणून ध्येयाचे स्थान विचलित होता कामा नये. आराध्य देवाप्रमाणे सर्वकाल त्याची उपासना व्हायला पाहिजे, आणि ध्येयाशी उत्तरोत्तर सालोक्य, सान्निध्य, सारूप्य सायुज्य मिळविण्यासाठी प्रयत्न व्हावयास पाहिजे.

जे मागे राहिले असतील त्यांना पुढे न्यावयास पाहिजे. जे पुढे गेले असतील त्यांना त्याच्याही पुढे न्यायला पाहिजे. ध्येयाला जाऊन पोहोचेपर्यंत कोणीही थांबता कामा नये.

सर्व सामाजिक सुधारणा या उच्च ध्येयाच्या, कर्तव्याच्या, इंद्रियनिग्रहाच्या आणि संयमाच्या दिशेने व्हावयास पाहिजेत. जे उच्च पातळीवर असतील त्यांना खाली खेचणे, पवित्र ध्येयाचा त्याग करून सुखकारक पाहून किंवा मानून खालच्या पातळीवर त्यांनी येणे ही कुधारणा आहे, तो अधःपात आहे.

.. आजकाल सर्वांना सुधारणा पाहिजे आहे. पण 'सु' आणि 'कु' यांच्यातील भेद तर कोणी पाहत नाही. पूर्वपरंपरा, उच्च मनोवृत्ती, आजपर्यंत शिकविलेली पावित्र्याची भावना, शास्त्रे (रूढींचे तर काही विचारायलाच नको) हे सर्व आम्ही फेकून देणार अशी आजच्या आपल्या समाजसुधारकांची मनोवृत्ती आहे.

...आपल्या सर्व सामाजिक व्यवहारांत न्याय आणि उदारता असायला पाहिजे. कोणावर टीका करण्याच्या वेळी मनुष्यप्राणी स्खलनशील आहे, इंद्रियग्राम बलशाली आहे, परिस्थितीसमोर मनाचा निश्चय टिकणे कठीण आहे, या सर्व गोष्टी लक्षात घेऊन जर चूक झाली असेल तर त्यासाठी क्रोध किंवा तिरस्कार न करता दया, अनुकंपा आणि सहानुभूतीच बाळगणे योग्य आहे. सामाजिक अन्याय होत असतील तेथे अनाथांचे रक्षण आणि पालन करणे हे पण आपले कर्तव्य आहे. सामाजिक आदर्शांना खाली खेचणे कधीही योग्य समजता येणार नाही, आणि सुधारणा करायची ती सामाजिक न्याय, पावित्र्य आणि सामर्थ्य वाढेल अशीच करणे योग्य ठरेल.

—जीवनसंस्कृति : १५६–१५७

१४. ऋषी

हिंदु समाजव्यवस्था ज्या लोकांनी नक्की करून दिली त्यांना आपण 'ऋषी' म्हणतो. सत्य, अहिंसा आदि यमांचे आणि शौच, स्वाध्याय आदि नियमांचे ज्यांनी

पालन केलेले असते व जे तप आणि योगाने संपन्न असतात ते ऋषी होत, अशी ऋषीची एक व्याख्या आहे. आजच्या भाषेत हाच विचार व्यक्त करावयाचा असला तर ज्यांचे जीवन शुद्ध, संस्कारी आणि निष्पाप असते, ज्यांना सामाजिक परंपरा बरोबर समजतात, आणि ज्यांच्या हृदयातून समाजविरोधी सर्व वृत्ती आणि वासना नष्ट झालेल्या आहेत, असे जे समाज पुरुष तेच 'ऋषी' होत. त्यांनी वर्णाश्रमाची समाज-व्यवस्था ठरवून दिली. त्यात आश्रमव्यवस्था व्यक्तीच्या क्रमानुसार बसविली आणि वर्णव्यवस्था सामाजिक सुस्थितीसाठी आणि उत्कर्षाकरिता रचिली. समाजपरायण आणि नारायणपरायण अशा ऋषिमुनींना दिसले की समाजव्यवस्था ही केवळ बाह्य व्यवस्था होऊ शकत नाही. समाजव्यवस्था जर बाह्य म्हणजे कृत्रिम असली तर ती टिकत नाही आणि टिकली तरी विकृत झाल्याशिवाय राहात नाही. असे पाहून सामाजिक जीवनाचे प्राणरूप असे कितीतरी सद्गुण त्यांनी समाजासमोर ठेविले, आणि सांगितले की हे सद्गुण जर बाणवले तरच तुमचा समाज टिकणार आहे; आणि हे सद्गुण बरोबर आचरिले जावे, स्वभावरूप होऊन जावे, त्यांचा विसर पडू नये यासाठी जीवनाच्या विशिष्ट प्रसंगी त्यांची आठवण करून देणाऱ्या व सवय करणाऱ्या संस्कारांचीही त्यांनी योजना केली. सद्गुणाशिवाय समाजव्यवस्था टिकणार नाही आणि संस्काराशिवाय सद्गुण शिकता येणार नाहीत असे आपल्या समाजशास्त्राला व समाजशास्त्रज्ञांना आरंभापासून दिसून आले.

—जीवनसंस्कृति : १०४–१०५

अशा प्रकारचे शिक्षण प्रत्येकाला मिळायलाच पाहिजे असा जुना आग्रहसुद्धा असे. ज्यांना असे शिक्षण मिळत नसे त्यांना 'व्रात्य' म्हणत आणि हे शिक्षण घेऊन ते जे सोडून देत त्यांना 'पतित' म्हणत....आईबापाच्या पोटी मनुष्याचा प्रथम जन्म होत असतो, आणि संस्कार देणाऱ्या आचार्य समाजपुरुषाद्वारा धर्मशास्त्राच्या मदतीने त्याला संस्कारांचे जे शिक्षण मिळते तो त्याचा दुसरा जन्म असतो. आचार्य हा पिता आणि धर्मविद्या सावित्री ही माता. त्यांच्या पोटी जन्म होतो तेव्हा द्विज होतो. म्हणजे मग समाजजीवनात आपला प्रवेश होतो.

मनुष्य जन्मतो तेव्हा केवळ देहधर्मच प्रभावी असतो. म्हणजे भूक लागेल तेव्हा खायचे, तहान लागेल तेव्हा पाणी प्यावयाचे, थकवा आला की झोप घ्यावयाची, सुखाकडे धावत जावयाचे आणि दुःख दिसेल तेथून पळून जावयाचे हाच त्याचा स्वभावधर्म असतो.

पण एवढ्याने समाज चालू शकत नाही. समाजजीवनासाठी माणसाच्या वृत्तींवर खूप ताबा असण्याची जरूरी असते. सर्व वृत्ती पुरेशा फुलल्या नसतील तर त्यांना उत्तेजन देऊन त्या विकसित करायला पाहिजेत. आणि निरुपयोगी वृत्ती जर बलवान

असल्या तर युक्तिप्रयुक्ती करून आणि खंबीरपणे त्यांनां ताब्यात आणावयास पाहिजे, आणि काही वृत्तींचा तर कायमचा नाश करावयास पाहिजे. असे झाले तरच मनुष्य समाजाबरोबर पूर्णपणे एकरूप होऊ शकतो. हृदयाच्या पूर्ण विकासाने मनुष्य विराट समाजाशी एकरूप होत असतो. समष्टीच्या हिताच्या विरोधी असे विचार किंवा विकार त्याच्या मनात उत्पन्नच होणार नाहीत, स्वार्थ आणि सर्वार्थ यांच्यात त्याच्या हृदयात संघर्ष निर्माणच होणार नाही अशी स्थिती जेव्हा होते तेव्हा तिला सायुज्य म्हणतात. 'सायुज्य' म्हणजे विराट समाजाशी एकरूप होणे असते.

—जीवनसंस्कृति : १०६

१५. संस्थायुग

प्राचीन काळचे वैद्य युगेच्या युगे खपून असा शोध करीत होते की सर्व आजारांवर एकच औषधोपचार मिळू शकतो की काय? पौराणिक कवींना असे औषध, उपाय मिळाला खरा; पण तो कल्पनेतच राहिला आणि वैद्यांना तर तेही जमले नाही. सध्याच्या काळात कवींना नव्हे पण समाजसेवकांना सर्व सामाजिक दुःखांवर एक उपाय सापडला आहे. समाजाला काहीही पाहिजे असो, किंवा काहीही टाळावयाचे असो, इलाज एकच असतो–संस्था काढा! देशात परराज्याने घर केले आहे? काढा संस्था. संगीताची उन्नती होत नाही? काढा संस्था. विधवांचे विवाह करावयाचे? काढा संस्था. देशाला युरोपच्या मालिकेत बसवायचे आहे? काढा संस्था. साहित्याचा विकास करावयाचा आहे? कला फुलवायची आहे? लोकांचे आरोग्य सुधारावयाचे आहे? शत्रूंना मित्र बनवायचे आहे? लढाया टाळावयाच्या आहेत? हिंदु–मुसलमानांना एक करायचे आहे? देशी राज्यकारभार सुधारायचा आहे? कवी निर्माण करावयाचे आहेत? शौर्य शिकवायचे आहे? व्यापार वाढवायचा आहे? या सर्वांवर इलाज एकच. फंड (निधी) जमा करा आणि संस्था काढा. काढलेल्या संस्था टिकत नसतात. अल्पजीवी होत असतात, निःसत्त्व बनत असतात, तर त्याच्यावरही इलाज एकच आहे व तो असा की संस्थासुधारक संस्था काढा. सध्याच्या काळाला संस्था काढण्याची सवय लागली आहे ती सुधारावयाची आहे का? तर त्यासाठी एक खास संस्था काढली म्हणजे झाले. सध्याचे युगच **संस्थायुग** आहे.

—जीवनविकास : ३२७–३२८

कित्येक संस्था ईश्वरानेच निर्माण केल्या आहेत. आपले शरीर ही एक अद्‌भुत संस्था आहे. आपल्या भावना दुसरी संस्था. कुटुंब ही मर्त्यलोकाची मोठ्यांत मोठी अमर संस्था आहे. आणि मानवसमाज–स्पर्धा, कारस्थाने, खून आणि लढाया करणारा मानवसमाज, ही सुद्धा ईश्वराच्या मायेएवढीच गूढ आणि विराट सहकारी संस्था आहे. जेव्हा मनुष्य या संस्था नीट चालवू शकत नाही, किंवा त्यांच्याद्वारा आपले मनोरथ पूर्ण करू शकत नाही तेव्हा तो अनेक कृत्रिम संस्था उभ्या करत असतो. माणसाच्या संस्था कितीही सुंदर असल्या तरी त्या एकांगी आणि अदूरदृष्टीच राहावयाच्या. जहाज बुडायला लागले म्हणजे सर्वांचा विचार सोडून देऊन जसे थोडेच लोक होडी समुद्रात उतरवून जहाजापासून अलग होतात, अथवा रेल्वेस्टेशनावरील तिकिटांच्या खिडकीसमोरील गर्दीला घाबरून खाजगी व्यवस्था करून चटकन तिकिट मिळविण्याची कित्येक लोक जशी युक्ती करतात, त्यांच्यासारखीच मानवी संस्थांची स्थिती होत असते. श्रीकृष्णाने पण द्वारका बुडण्याच्या वेळी नारद आणि उद्धव यांसारख्या भक्तांना द्वारकेबाहेर काढले होते.

—जीवनविकास : ३२८

याच रीतीने माणसाला भवसागरामधून वाचविण्यासाठी 'धर्म' ही एक संस्था योजलेली आहे. क्षितिजात जसे आकाश व पृथ्वी एकत्र येतात तसाच धर्मात ईश्वर आणि मनुष्य यांचा संयोग होत असतो. धर्म ही सनातन संस्था ईश्वराने निर्माण केली आहे, पण तिची वहिवाट माणसाच्या हातात सोपविली आहे. मनुष्यात जसे देव आणि असुर मिसळले आहेत, शरीरात जसा जड आणि चैतन्य यांचा अवघड कटकरीचा संसार चालत असतो, तशी धर्माचीही अवस्था आहे. गेल्या पंचवार्षिक युद्धात लाखो लोकांचा संहार केल्यानंतरही युद्धमान राष्ट्रे आपण नेमके कशासाठी लढत होतो हे निश्चित करू शकली नाहीत, तसेच मनुष्यजातीच्या एवढ्या वयानंतरही धर्माचे स्वरूप काय आहे हे आपण स्पष्ट व निश्चितपणे सांगू शकत नाही. सुखाच्या व्याख्या जशा व्यक्ती आणि परिस्थितीपरत्वे भिन्न भिन्न होत असतात तसे धर्माविषयी पण आहे. अनेक रीतींनी धर्माचे मर्म लक्षणबद्ध केले तरी काहीतरी मागे शिल्लक राहूनच जाते. असे असूनही या धर्माचा लोभ सोडवत नाही.

—जीवनविकास : ३२८–३२९

लोकांना शक्य होईल तेवढे ईश्वराचे दर्शन घ्यावयाचे असते, पण मोक्ष नको असतो. मोक्ष जर मरणाइतका झटकन व सहज मिळू शकला असता तर मला वाटते की लोक मोक्षालासुद्धा मरणाइतके घाबरले असते. धर्मासंबंधी असेच आहे. लोकांना खरी धार्मिकता नको असते. त्यांना विशिष्ट धर्माचा स्वीकार, प्रचार आणि बाह्य

आचार पाहिजे असतो. ईश्वरभक्तीपेक्षा धर्माभिमानाची किंमत अधिक समजली जाते. दारूचा व्यापारी जसा प्रत्येक माणसाला आपल्या गुत्त्याकडे ओढत असतो तसे धर्माभिमानी लोक आपली मते व आचार याकडे लोकांना खेचत असतात. पण 'शराबी शौक' तर मिळतो, ना कलालापाशी ना दारूबाजापाशी. प्रत्येक जण उगीचच नशेचे, कैकेचे ढोंग करीत फिरत असतो.

—जीवनविकास : ३२९-३३०

१६. समाजाच्या अवनतीची कारणे

कोणताही समाज वृद्ध किंवा क्षीणवीर्य होण्याची दोन मुख्य कारणे असतात : विलासिता आणि धर्मजडता.

समाज विलासी बनतो तेव्हा त्याच्यापाशी असलेली सर्व संपत्ती त्याला अपुरी पडते व त्याचा पुरुषार्थ आपोआप कमी होऊ लागतो. 'असे झाले तरी काय ? तसे झाले तरी काय ? कशातच काही अर्थ नाही' अशा प्रकारचे नैष्कर्म्य आणि एक प्रकारचा ऐदीपणा त्याच्यामध्ये येतो, आणि नंतर नवनवे अनुभव घेण्याऐवजी जुन्या गोष्टींविषयी कृत्रिम व दांभिक आदरभाव आणि आग्रह विलासी माणसे वाढवितात, आणि स्वसंरक्षणासाठी त्यांचा ढालेसारखा उपयोग करतात.

दुसऱ्या बाजूने मनुष्यात जेव्हा बौद्धिक जागरूकता मंद होऊ लागते, प्रयोगापेक्षा प्रामाण्यावर अधिक भर देण्याची वृत्ती वाढू लागते तेव्हा समाजात एक प्रकारचे धर्मजाड्य निर्माण होते. हे धर्मजाड्य दिसते मात्र धर्माभिमानासारखे; परंतु वास्तविकरीत्या ती बेफिकिरी असून एक प्रकारची नास्तिकताच असते. अभिमान आणि आग्रह यांच्या मुळाशी आदरभाव आणि खरी श्रद्धा असतेच असा मात्र अनुभव नाही.

—जीवनव्यवस्था : ७०

विभाग आठवा

भगवत्गीता आणि दैवीसंपत्

भगवद्गीतेविषयी सर्वच विचारवंतांना निरतिशय आदर आहे. तसाच काकांनाही आहे. काका गीतेला जगद्गुरू व आत्मज्ञानाचा ग्रंथ म्हणतात. गीतेने त्यांना जीवन-दृष्टी दिली आहे व म्हणून त्यांच्या मते गीता हा केवळ ग्रंथ नसून जिवंत मंगलमूर्ती व्यक्ती आहे. काका जसे रसिक साहित्यिक आहेत तसेच सखोल चिंतन करणारे तत्त्वज्ञ व समाजशास्त्रज्ञही आहेत. गांधीजीप्रणीत सर्वोदयी समाज हा आदर्श समाज होईल आणि स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, नैतिक सदाचार व उच्च आध्यात्मिक मूल्ये ज्या समाजात साकार होऊ शकतील अशा समाजाची नवरचना करण्यासाठी गीतेने जी दैवीसंपत् सांगितली आहे, त्या गुणांवर लोकाचरण व लोकनीती जर आधारली तर समाजातील सर्व अनिष्ट प्रवृत्ती व दुरिते दूर होऊन साम्ययोग, सहयोग, सहानुभूती व आत्मौपम्य यांवर आधारलेला निर्दोष, शांतिप्रिय, पुरुषार्थी, पराक्रमी व अध्यात्मप्रवण नवा समाज तयार होईल म्हणून काकांनी 'गीताधर्म' या पुस्तकाद्वारा गीतेचे समाजशास्त्र बसवून दैवी गुणांचे समाजजीवनात कसे उपयोजन करता येईल याविषयी दिग्दर्शन केले आहे.

१. जगद्गुरु गीता
२. गीता : आत्मज्ञानाचा ग्रंथ
३. गीतेचा संदेश
४. गीताधर्म : गीतेचे समाजरचनाशास्त्र
५. दैवी संपत्
६. अभय
७. सत्त्वसंशुद्धी
८. धृति
९. शम-दम
१०. तेज
११. यज्ञ, दान, आणि तप
१२. क्षमा
१३. मार्दव
१४. आर्जव
१५. अद्रोह
१६. अपैशुन
१७. ह्री
१८. शौच
१९. अलोलुप्त्वम्
२०. अचापलम्
२१. नातिमानिता
२२. अक्रोध
२३. ज्ञानयोग- व्यवस्थिति
२४. स्वाध्याय
२५. दया
२६. अहिंसा
२७. सत्य
२८. शान्ति
२९. खरे ब्रह्मचर्य

१. जगद्‌गुरु गीता

पितामह हिमालय, भारतमाता जाह्नवी आणि सर्व तीर्थांचे जेथे संमेलन होते असा सरित्पति सागर, या तिघांची भव्यता आणि प्रसाद आपणास भगवद्‌गीतेत पाहावयास मिळतो. मनुष्य जीवनाची साधना विश्वरूपदर्शनयोगात आहे. हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे. हीच सनातन साधना आहे. त्याचाच साक्षात्कार घडविण्यासाठी भगवद्‌गीतेचा आविष्कार झाला आहे. फळाफुलांसाठीच जशी वृक्षाची समृद्धी असते, तसाच भगवद्‌गीतेचा संदेश देण्यासाठी महाभारताचा विस्तार झाला आहे. मानवजातीचा प्रतिनिधी अर्जुनाने स्वतःचे दौर्बल्य, आपले कार्पण्य आणि आपला विषाद पूर्णपुरुष पुरुषोत्तमाच्या चरणी अर्पण केला. स्वतःचे दौर्बल्यच अशी एक गोष्ट आहे की जिला मनुष्य स्वतःची वस्तू म्हणून प्रभूच्या चरणी अर्पण करू शकतो. शुद्ध भावाने नैवेद्य अर्पण करण्याने नैवेद्याचे रूपांतर प्रसादात होत असते. अर्जुनविषादाचे रूपांतर होऊन भगवत्‌प्रसादरूपाने भगवद्‌गीता मानवजातीला प्राप्त झालेली आहे.

भगवद्‌गीता हा आरंभापासून शेवटपर्यंत एक अखंड **सहानुभूतियोग** आहे. येथे परमात्मा स्वयं नरपतीची, जगत्पतीची अथवा जगदेकसम्राटाची भाषा बोलत नाही, पण जगत्पित्याच्या कारुण्याने आश्वासन देतो. पार्थिव आश्वासन दुःखी जीवांना दिलासा देते पण दृष्टी नाही देत.

पण गीतेचे फक्त वाचन आणि मनन करण्याने तिचे ज्ञान आपण आपल्यामध्ये उतरवू शकत नाही. गीता आपणास जीवनदृष्टी देते. जेव्हा आपण त्या जीवनदृष्टीलाच जीवनाचा सारथी बनवून आपली जीवनसाधना वाढवू तेव्हा गीताज्ञान स्वतःच आपली जीवननिष्ठा बनून जाईल. म्हणून केवळ गीतेचे अध्ययन करण्यात मग्न न राहता प्रत्येक गीतापारायणानंतर किंवा त्याच्याबरोबर जीवनसंग्रामात त्याचे अनुशीलनही आपण करीत राहिले पाहिजे.

—जीवनप्रदीप : १७-१८

२. गीता : आत्मज्ञानाचा ग्रंथ

भगवद्‌गीता हा काही फक्त एक तत्त्वबोधक शास्त्रीय ग्रंथ नाही; ती एक उच्च कोटीची कलाकृती सुद्धा आहे. हे दिव्य गीत अशा वेळी गायिले गेले की जेव्हा धनुष्यांचे टणत्कार आणि रणवाद्यांच्या गंभीर ध्वनींनी समग्र समरभूमी पुलकित

झालेली होती. रणक्षेत्राच्या प्रक्षुब्ध परिस्थितीतही आपल्या चित्ताची स्थिरता आणि बुद्धीची विचारशक्ती यांना कायम ठेवण्याची योग्यता ज्या अलौकिक तत्त्वज्ञान्याच्या आणि कलावंताच्या ठिकाणी होती तोच पुरुषोत्तम एका बाजूला अर्जुनाच्या घोड्यांना सांभाळत असताना मौलिक तत्त्वज्ञान आणि आश्वासन यांनी परिपूर्ण असे संगीत गाऊ शकत होता. गीतेचा उपदेश हा काही एखाद्या पर्वताच्या अंधाऱ्या गुंफेत किंवा गुरूच्या पर्णकुटीत एकान्तात दिलेला नाही. तो तर रणभूमीत केलेला तत्त्वबोध आहे. त्यातच त्याचे वैशिष्ट्य आहे. पण त्याची अपूर्वता तर यात आहे की त्याचा कोणीही युद्धगीतांत समावेश करीत नाही. तो हिंदुधर्माचा अजोड, असामान्य असा धर्मग्रंथ गणला गेला आहे.

—जीवनप्रदीप : २०

भगवद्गीता हा आत्मज्ञानाचा आणि नीतीचा एक आगळा वेगळा, असामान्य ग्रंथ आहे. गीताकाराने समरांगणात बंधुत्वाच्या सिद्धान्ताचा, निर्वैर वृत्तीचा, आपले आणि परक्याचे हा भेद विसरून जाऊन प्राणिमात्राप्रति आत्मीयतेचा संबंध प्रस्थापित करण्याचा उपदेश एका युयुत्सु–युद्धवेड्याला दिला.

—जीवनप्रदीप : २०–२१

३. गीतेचा संदेश

गीता सांगते, सुखदुःखाने सहज दबले जाण्याइतके पोचट, ठिसूळ बनू नका, जयपराजयाची तमा तुम्ही बाळगू नका. जे निश्चयी असतात, आग्रही असतात, जिद्दी असतात ते शेवटी आपले इच्छित ध्येय प्राप्त करीत असतातच. म्हणून निर्मळ बना, वीर बना. दूरच्या यात्रेला निघालेल्या लोकांना वाटेत थंडी सहन करावी लागते, उन्हाचा ताप सहन करावा लागतो. रस्त्यात दिवसा उठतात व चालत राहतात आणि रात्री विश्रांतीसाठी पडतात. यात्रा तर चालू राहिलीच पाहिजे. कोणत्याही संपूर्ण जातीची अशी जीवनयात्रा व्यक्तिगत स्वार्थासाठी नसते, थोड्याशा स्वार्थाकरिता नसावी. या यात्रेला निघालेले लोक **सर्वभूतहिते रताः** असले पाहिजेत. त्यांच्या मनात कोणाही विषयी द्वेषभाव तर असणारच नाही. गीताधर्मी लोक फक्त ईश्वराला ओळखतात; सर्व प्राणी ईश्वराचीच लेकरे असल्याने ते कोणाचा द्वेष करीत नाहीत. त्यांची लढाई केवळ, पाप, अनाचार आणि अत्याचार यांच्याशी अविरत चालूच

राहणार. कामरूपी, वासनारूपी शत्रूंना असंग किंवा असहकाराच्या दृढ शस्त्राने छेदून टाकून ते अविचल पद मिळवितात...धर्मयुद्धाच्या आवाहनाला नकार देऊ नये. नकार देण्याने स्वधर्म आणि कीर्ती या दोघांचा नाश होत असतो आणि फक्त पाप आणि फजितीच पदरात येऊन पडते. धर्मयुद्धात हरणे, पराभव होणे असे काहीच नसते. जिंकला तरी धर्माचा विजय असतो, हरला तरी, मार खाल्ला तरी, धर्माचाच विजय असतो.

—जीवनप्रदीप : १४–१५

४. गीताधर्म : गीतेचे समाजरचनाशास्त्र

गीतेच्या १६ व्या अध्यायात 'भूतसर्ग' आणि 'संपत्' असे दोन शब्द येतात. त्यांचा साधा सरळ अर्थ तर स्पष्ट आहे. भूतसर्ग म्हणजे प्राण्यांची उत्पत्ती, त्यांची सृष्टी. पण हा शब्द जेथे वापरलेला आहे तेथे त्याचा अर्थ जीवनाचा प्रकार अथवा संस्कृतीचे वेगवेगळे नमुने किंवा घाट असा करावयास पाहिजे. 'संपत्' या शब्दाचा सामान्य अर्थ 'संपत्ती' असा आहे. पण येथे या शब्दाचा जीवनवैभव, जीवन-समृद्धी असाच अर्थ करावयास पाहिजे. जीवनसमृद्धीचे किंवा संस्कृतीचे दोन विभाग पाडण्यात आले आहेत.

नवव्या अध्यायात (श्लोक १२–१३) दैवी, आसुरी आणि राक्षसी अशा तीन प्रकारच्या प्रकृती सांगितलेल्या आहेत. दीर्घ काळापासून निरंतर लोक समाजात दिसणारे लोकस्वभावाचे तीन भिन्न भिन्न प्रकारच येथे दाखविले आहेत. या प्रकृतींचा संस्कार करून त्यांचा 'मोक्ष' करणे त्याचेच नाव धर्म आहे. हा गीताधर्म हेच आपले समाजशास्त्र आहे.

—गीताधर्म : ३

गीतेत दर्शविलेली दैवी संपत् हाच आर्यांच्या समाजशास्त्राचा किंवा लोकशास्त्राचा पाया आहे. समाजाचे सर्व घटक सहीसलामतीने, सुरक्षतापूर्वक आणि सुखपूर्वक राहून आपापला उत्कर्ष साधू शकतील यासाठी कशी समाजव्यवस्था असावयास पाहिजे याविषयींच्या मीमांसेचे नाव 'समाजशास्त्र' आहे. परस्परांवर अवलंबून राहणाऱ्या आणि एकमेकांच्या हिताची काळजी घेणाऱ्या मनुष्यप्राण्यांचाच समाजशास्त्राच्या विचारात समावेश होत असतो. सध्याचे समाजशास्त्र मनुष्येतर प्राण्यांविषयींच्या

मानवाच्या नैतिक विचाराला स्पर्श करीत नाही. मनुष्याच्या मागील, चालू आणि येणाऱ्या पिढीपुरताच विचार करण्याची आपली जबाबदारी आहे असे समाजशास्त्र मानते. परंतु लोकशास्त्राची कल्पना याहून व्यापक आहे. विश्वात सर्व चैतन्यमय आहे म्हणून तर सर्वांविषयी आपली जबाबदारी निर्माण झालेली आहे. निःसंशयपणे, हृदयाचा आणि जीवनाचा जितक्या प्रमाणात विकास झालेला असेल तितक्या प्रमाणातच या जबाबदारीचे भान होते. पण शास्त्रच रचायला बसल्यास दूरदर्शी लोकांची दृष्टी पोहोचू शकेल तेथपर्यंतचा परत विचार करून नियम तयार केले पाहिजेत.

लोकशास्त्राच्या सामान्य क्षेत्रमर्यादांत मनुष्य आणि त्याचे आश्रित पशुपक्षी वगैरेंचा समावेश होतो. त्यापेक्षाही विशेष व्यापक कल्पना केली तर तिच्यात मात्र पंचमहाभूते आणि त्यांच्यापासून निर्माण होणारी वनस्पतिसृष्टी, कीटकसृष्टी आणि मासे वगैरे जलचर तसेच पशुपक्षी इत्यादी भूचर तसेच खेचर प्राण्यांचाच नाही, तर प्रेतयोनी, भूतयोनी, यक्षगंधर्व, अनेक कोटींचे देव वगैरे अदृष्ट, काल्पनिक अथवा रूपकात्मक कोटींचाही समावेश होतो. आणि शिवाय या सर्वांचा अधिष्ठाता, अध्यक्ष, लोकभृत्, लोकनायक जो भगवंत आहे त्याचीही त्यात गणना व्हावयास पाहिजे.

तिर्यग्योनी विषयींचे आपले कर्तव्य आज योग्य रीतीने स्वीकारण्यात येत नाही, आणि प्रेतयोनी वगैरेंच्या तर अस्तित्वाविषयी पण सर्वत्र नास्तिकतेचे वातावरण आहे. अशा स्थितीत गीतेचे लोकशास्त्र बसविण्याच्या वेळी या सर्व कल्पनांची उपपत्ती आपण कोणकोणत्या अर्थांनी समजतो, तसेच या सर्व कल्पनांपासून आपणास कोणता बोध होतो ते सांगायला हवे. पुनः समाजशास्त्राच्या दृष्टीने मरणोत्तर जीवन काय असते तेही स्पष्ट करावयास पाहिजे. मरणोत्तर जीवनाची कल्पना स्पष्ट झाली म्हणजे पुनर्जन्माच्या कल्पनेवर नवीनच प्रकाश पडतो. मुसलमानांची बर्झकची, बौद्धांची अनात्मवादी पुनर्जन्माची, महाभारतात वर्णन केलेल्या मृतांच्या साठी वेगवेगळ्या काढून ठेवलेल्या भिन्न भिन्न लोकांची, आणि वेदांत्यांची आत्मैक्याची, या सर्व कल्पनांच्या दृष्टीतून सांपराय अथवा पारलौकिक जीवनाची कल्पना समजावून घ्यावयास पाहिजे.

गीतेत दैवी संपत्तीचीं २६ लक्षणे सांगितली आहेत. आजपर्यंतच्या गीतेचे टीकाकार फक्त अध्यात्माच्या दृष्टीतूनच विचार करीत आले असल्याचे मोक्षाचा अधिकार मिळविण्यासाठी जे जे गुण आवश्यक आहेत ते सर्व येथे सांगून झटपट ते पुढे निघून जातात. यतिधर्माची विस्तारपूर्वक व्याख्या करणाऱ्या काही ग्रंथांत आणि प्रकरणांत या सव्वीसांपैकी एकेक गुणांचे विश्लेषण करून ते समजावून दिले आहेत. ते फार धार्मिक आहेत, परंतु समाजाची ऐहिक सुस्थिती आणि उत्कर्ष यांचा

विचार न करता संसाराच्या जंजाळाला कंटाळून समाजापासून अलग होऊन जाणाऱ्या संन्याशांच्या दृष्टीतूनच हे सर्व विवेचन झालेले आहे. हे सर्व लक्षात ठेवूनही दैवी संपत्तीचा आपण नव्याने विचार करावयास पाहिजे.

—गीताधर्म : ३–५

(काका कालेलकरांनी गीतेने प्रतिपादिलेल्या खालील गुणांच्या पायावर आधारून निकोप समाजशास्त्र कसे रचता येऊ शकेल याविषयी अत्यंत मौलिक, स्पष्ट व मार्गदर्शक विवेचन 'गीताधर्म' या पुस्तकात केलेले आहे. ते गुण असे आहेत : अभय, सत्त्वसंशुद्धी, धृती, शम-दम, तेज, यज्ञ, दान, आणि तप, क्षमा, मार्दव, आर्जव, अद्रोह, अपैशुन, ह्री, शौच, अलोलुपत्व, अचापल्य, नातिमानिता, अक्रोध, ज्ञान–योग व्यवस्थिती, स्वाध्याय, दया, अहिंसा, सत्य, शांती, चातुर्वर्ण्य इत्यादी.

[पहा गीता अध्याय १६ : श्लोक १–५]

केवळ पारमार्थिक विचारांवर भर न देता या पार्थिव व ऐहिक जीवनात आपणास निर्दोष, निकोप, शांताप्रिय व सहकार्यावर आधारलेल्या नव्या समाजाच्या रचनेसाठी हे सर्व गुण कसे पायाभूत व उपयुक्त ठरू शकतात याचे मार्मिक विवेचन या पुस्तकात वाचावयास मिळते. या पुस्तकातून गीतेवर कसे नवे समाजशास्त्र, सामाजिक तत्त्वज्ञान व सामाजिक मानसशास्त्र आधारता येऊ शकते याविषयींचे अत्यंत नावीन्यपूर्ण व पोषक मार्गदर्शन या पुस्तकातून मिळू शकते.)

—संपादक

५. दैवी संपत्

[आदर्श समाजरचनेसाठी गीतेत सांगितलेले दैवी गुण अत्यावश्यक आहेत आणि त्यांचा व्यक्तींनी स्वतःच्या जीवनात आचार केला व समाजात ते पसरून व्यक्ती-व्यक्तींमध्ये सहकार्य, समता, बंधुभाव, विश्वास, आदरभाव, आणि सामूहिक पुरुषार्थ करीत राहून समाज उच्च पातळीवर नेण्यासाठी प्रयत्न केले तर समताधिष्ठित, न्याययुक्त, शोषणमुक्त, व्यक्तिस्वातंत्र्याला व व्यक्तीच्या प्रतिष्ठेला मान देणारा नवा आदर्श समाज निर्माण होऊ शकेल अशी काका कालेलकरांची निश्चित धारणा आहे. २६ दैवी गुणांचा– म्हणजे प्रत्येकाचा प्रामाणिक आचार केला गेला तर गीता

अध्यात्मावर आधारलेला नवा निर्दोष व निकोप समाज निर्माण करावयास कसे मार्गदर्शन करू शकते याचे सविस्तर विवरण त्यांनी 'गीताधर्म' या पुस्तकात केले आहे. त्यातील प्रत्येक गुणांचा समाजजीवनात आचार सध्याच्या काळात कसा करता येईल याविषयी कालेलकराचे मार्गदर्शन फार उपयुक्त व नवीन दृष्टी देणारे असे आहे. त्या प्रत्येक गुणाचे आचारस्वरूप खालीलप्रमाणे त्यांच्याच शब्दांत दिले आहे.]

दैवी संपत्तीविषयींचे गीतेतील श्लोक खालीलप्रमाणे आहेत.

अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोग व्यवस्थितिः ।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥ १६-१
अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम् ।
दया भूतेष्वलोलुप्त्वम् मार्दवं ह्रीरचापलम् ॥ १६-२
तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।
भवन्ति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥ १६-३

अभय : सर्व समाजजीवनाचा अथवा लोकजीवनाचा पाया अभयावरच आधारलेला असला पाहिजे. ज्याच्या घटकांना परस्पराविषयी अविश्वास किंवा भीती वाटत राहते त्याला खऱ्या अर्थाने 'समाज' नाव देता येणार नाही. अभय दोन प्रकारचे असते– आपण कोणाला भिऊ नये आणि दुसऱ्याला आपली भीती वाटेल असे वागू नये....जेथे भीतीच्या अवस्थेत राहावे लागते तेथे खरा उत्कर्ष व विकास होऊ शकत नाही.

—गीताधर्म : ६–७

निर्भयतेशिवाय कोणताही सामाजिक अथवा आध्यात्मिक सद्गुण जोमदार बनत नाही. न्यायनिष्ठा, परोपकार, स्वार्थत्याग, आग्रहपूर्वक प्रतिकार करण्याची उत्कट इच्छा हे सर्व गुण निर्भयतेच्या मार्गेच आपल्या रक्तात उतरतात. कोणाही व्यक्तीविषयी आपल्या मनात जर शंका, भय किंवा मत्सर वाटत असला तर त्याच्या बरोबरच्या व्यवहारात आपणास स्वाभाविकता कधीच ठेवता येणार नाही. हृदयाचा विकास न होता त्यामुळे संकोचच होत राहतो.... जर माणसाच्या ठिकाणी निर्भयता आणि लोभवृत्तीचा अभाव असला तर त्याच्या ठिकाणी खरी निर्भयता रुजू शकेल. खऱ्या वीराच्या ठिकाणी निःस्पृहता असते. निर्भयतेशिवाय व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तिप्रतिष्ठा, समता हे गुण टिकू शकत नाहीत. समाजात अभयाचे वातावरण असल्याशिवाय खरी प्रगती होऊ शकत नाही.

—गीताधर्म : ९–१०

सत्त्वसंशुद्धि : समाज म्हणजे संघटन. हे संघटन परस्पर–आत्मीयतेच्या भावनेवर आधारले जाते...हृदयाचा विकास, हृदयाची शुद्धी, आणि जीवनाची समृद्धी यांवर संघटन व त्याची क्षेत्रमर्यादा अवलंबून राहते....प्रत्येक बदलत्या काळात जेवढ्या व्यापक संघटनाची गरज पडते तेवढे ते व्यापक करणे हाच धर्म होय... हृदयाच्या शुद्धीवर, त्याच्या विकासावर, उदारता अथवा आर्यत्व यांवर संघटन अवलंबून राहते. समाजाच्या हृदयाच्या या संस्काराला च गीतेने 'सत्त्वसंशुद्धि' नाव दिले आहे. सत्त्व म्हणजे चारित्र्य, सत्त्व म्हणजे हृदय, सत्त्व म्हणजे विचार, भावना, आकांक्षा, कल्पना आणि जीवनसर्वस्व. हे सत्त्व ज्या प्रमाणात शुद्ध असते त्याच प्रमाणात सामाजिक जीवनाची बांधणी होऊ शकते...आपण जीवनाला संशुद्ध व सुसंस्कारी करू शकलो आणि व्यष्टी आणि समष्टी, व्यक्ती आणि जाती या द्वंद्वात वसणारा विरोध हृदयपरिवर्तनाद्वारा मुळातच काढून टाकू शकलो तरच समन्वयाचा मार्ग उपलब्ध होईल. सामाजिक रचनेला अनुकूल अशी मनोरचना करावी लागते. दंभ, दर्प, अभिमान, द्वेष, पारुष्य आणि अज्ञान हे षड्रिपू सामाजिक जीवनाला विघातक असतात. या सहा विकारांचा समूळ नाश करणे म्हणजेच सत्त्वसंशुद्धीचा विकास करणे असते. समाजविरोधी वृत्ती हृदयात उगवणारच किंवा जाग्या होणारच नाहीत अशी हृदयाची स्थिती करणे म्हणजेच सत्त्वसंशुद्धीची सिद्धी होय. विकारांना दाबून टाकणे हे वेगळे; परंतु विकारांना जागाच मिळणार नाही अशी हृदयाची भूमी तयार करणे हे त्याहून वेगळे व श्रेष्ठ आहे. या आदर्शाला पोहोचणे तीच सत्त्वसंशुद्धी होय.

—गीताधर्म : ११–१८

धृति : धृती हे दैवीसंपत्तीचे एक मोठे लक्षण आहे. धृती या शब्दाचा सामान्य अर्थ धैर्य, युद्धाविषयींचा उत्साह, युद्धात टिकून राहण्याची तयारी, असा आहे. 'धृ' म्हणजे धारण करणे, या धातूपासून 'धृति' हा शब्द तयार झाला आहे. शास्त्रीय परिभाषेत सांगायचे झाल्यास सूक्ष्म कणांना एकत्र पकडून ठेवून त्यांचा एक घट्ट तुकडा बनविणारी जी रासायनिक शक्ती ती धृती होय. तुरटी, खडीसाखर, डिंक, मोरचूद हे पदार्थ तापवल्यानंतर त्यांच्या तुकड्यातून धृतीचे पाणी निघून जाते व त्यांचा चुरा होऊन जातो. त्यांच्या चुऱ्याला आपण 'लाही' म्हणतो. जे पाणी त्यांच्या सूक्ष्म कणांना एकत्र पकडून ठेवते त्याला इंग्रजीत Water of Crystallisation म्हणतात. काचेत, हिऱ्यात, गारगोटीत तेच पाणी असते. समाजात ज्या गुणांच्याद्वारा अशी एकता येते व टिकून राहते त्यांना धृती म्हणतात. भूकंप, महापूर, रोगाच्या साथी, परचक्र अशा प्रसंगी लोकामध्ये ही धृती जर टिकून राहिली तर तो समाज मतिमान, समर्थ व सुसंस्कृत आहे असे समजायला हरकत नाही. शंकरा-

चार्यांनी म्हटले आहे की देह व इंद्रिये जेव्हा पूर्णपणे गळून जाण्याच्या सीमेवर पोहोचतात तेव्हा अंतःकरणाच्या ज्या वृत्तीने सर्व गात्रे उल्हसित राहतात, आणि देह कार्यक्षम बनतो तिला 'धृति' नावाने ओळखावी. समाजात जेवढ्या प्रमाणात धृतीची मात्रा (अंश, तीव्रता) विशेष असते तेवढ्या प्रमाणातच पुरुषार्थाची सिद्धी होत असते.

—गीताधर्म : १९-२०

ज्या समाजात परस्पर स्नेह, विश्वास व प्रेमादर दृढ असतो त्या समाजाला कोणी छिन्नविच्छिन्न करू शकत नाही, आणि स्नेहाची धृती नसली तर समाजाच्या ठिकऱ्या होण्याला कोणतेही कारण पुरते. सामाजिक जीवनात भिन्न भिन्न वर्ग, जाती, धंदे आणि वर्ग यांच्यात मेळ असला तरच तो समाज कार्यक्षम होऊ शकतो.

—गीताधर्म : १९-२२

शम-दमः व्यक्तीच्या ठिकाणी सामाजिक वृत्तीचा उदय व्हावा म्हणून प्रथम शम-दमाची भूमिका तयार करावी लागते. सर्वांच्या हिताच्या जे विरुद्ध असते ते आपण करता कामा नये हे समजण्यासाठी समाजाशी आपला संबंध कसा आहे, समाजाच्या हितामध्येच स्वतःचे हित कसे सामावलेले असते हे सर्व माणसांनी समजायला पाहिजे. आपले जीवन देहापेक्षा, आपल्या मनोवृत्तीपेक्षा आणि आपल्या आयुष्यापेक्षाही विशेष व्यापक आहे ही गोष्ट जेव्हा माणसाला समजते तेव्हाच त्याच्या ठिकाणी ज्याला व्यापक स्वार्थ म्हणता येईल ती दूरदृष्टी विकास पावते...आपल्या देहगत जीवनापेक्षा आपले समाजगत जीवनच व्यापक, दीर्घकालीन तसेच अर्थपूर्ण असते, आणि म्हणून आपल्या देहगत वासनांना प्रतिबंध करून आपले सामाजिक जीवन शुद्ध तसेच निष्पाप करणे आवश्यक बनत असते. देहगत वासनांना ताब्यात आणून अडविण्यासाठी ज्या आत्मिक शक्तीचा आपण उपयोग करीत असतो तिलाच 'शम दम' हे नाव दिलेले आहे. दोघांपैकी शमाचे कार्य अंतःस्थ वृत्तींना वळण लावून त्यांना सामाजिक जीवनाला पूर्णपणे अनुकूल करण्याचे आहे. त्यापूर्वी बाह्य इंद्रियांना वेसण घालून त्यांना सुविनीत करण्याचे कार्य दमाचे असते. दमामुळे सामाजिक जीवन काही नसले तरी बाहेरून सरळ बनत असते. म्हणून आरंभ दमापासून करावयाचा असतो.

शम, उपशम अथवा शांती म्हणजे अंतःस्थ वृत्तींचा बंडखोरपणा काढून टाकून त्यांना सर्व प्रकारे आदर्श जीवनाला अनुकूल करून घेणे असते, आणि दम म्हणजे फक्त बाह्य आचरणाला ताब्यात घेऊन योग्य सवयी लावून सामाजिक जीवनाच्या रक्तात भिनविणे असते.

....शम आणि दम दोघांचे प्रथमपासूनच यथाप्रमाण अनुशीलन करावयास पाहिजे....म्हणून धर्म म्हणा, कायदा म्हणा की शिक्षण म्हणा, त्या सर्वांनी सामाजिक शम प्रस्थापित करण्यासाठी एक मोठी साधना करावयाची आहे. जो मनुष्य शम-दमान्वित झालेला असतो तोच सामाजिक मनुष्य असतो.

—गीताधर्म : २४–२९

तेज : दुसऱ्यांच्या प्रभावाखाली दबून न जाणे, आणि स्वतःचा प्रभाव इतरांवर पाडणे याचे नाव 'तेज' होय. या गुणामागे मत्सर, असूया वगैरे असामाजिक वृत्ती लपलेल्या असण्याचा संभव बराच असतो...इतरांचा प्रभाव सहन न करणे हा काही सार्वत्रिक सद्गुण तर होऊच शकत नाही. प्रत्येकाला आपला स्वधर्म तर असतोच. तो सांभाळण्यासाठी आणि दुसऱ्या कोणाचा बळी होऊ नये म्हणून तेजस्वितेची जरुरी असते. संस्कृतात या गुणाचे नाव 'अमर्ष' असेही आहे. त्याच्या अभावी समाज 'मुकी बिचारी कुणी हाका' अशी मेंढरे, गुरेढोरे यांसारखा शेळपट बनण्याचा संभव असतो...परिस्थितीची आणि स्वतःच्या सामर्थ्याची समग्रपणे एकाच वेळी जाणीव व्हावी म्हणून त्या त्या परिस्थितीत स्वतः जास्तीत जास्त आपण काय करू शकतो आणि काय करणे इष्ट आहे हे समजण्यासाठी बुद्धीची जी प्रगल्भता लागते तिचाही तेजातच समावेश होतो. व्यक्तीला जेवढी तेजाची आवश्यकता असते त्यापेक्षा अधिक आवश्यकता समाजाला असते. समाज तेजस्वी असला तर त्याच्या हातून वाटेल तेवढ्या चुका होऊनही त्या सर्व सांभाळूनही तो पुढे जाऊ शकतो... शहाण्या लोकांनी दुसऱ्यांचा तेजोवध करण्याच्या मोहाला जिंकून स्वतःचे तेज सांभाळावे आणि इतरांविषयी आदरभाव बाळगून त्यांना अभयदान द्यावयास पाहिजे.

—गीताधर्म : ३०–३२

• यज्ञ, दान आणि तप : सामाजिक जीवनाचा पाया यज्ञ, दान आणि तप यांच्यावर आधारलेला आहे. ही तीन कर्तव्ये जर उत्तम रीतीने पार पाडता आली तर योग किंवा जीवनकला साध्य झाली असे म्हणता येईल.

तप हे एक सामाजिक तत्त्व आहे. तपाचा लोकमानसात रूढ असलेला अर्थ टाकून देण्याच्या लायकीचा आहे. काहीही करून शरीराची दुर्दशा करावी आणि शरीराच्या इंद्रियांशी वैर बाळगावे व त्याच्या मार्फत कर्माध्यक्षाला चकित करून सोडण्यासाठी झटावे असा तपाचा लौकिक अर्थ होऊन बसला आहे. पण खरे पाहता एखादे महान कार्य हातात घेऊन ते पार पाडण्यासाठी प्रथम विचार करावा, साधने गोळा करावी, कामाची योजना तयार करावी आणि ती प्रत्यक्षात साकार करावी, आणि हे सर्व करता करता भूक, तहान, कष्ट, अथवा, त्रास सर्व विसरून जाऊन

एकाग्रतेने कामाच्या मागे चिकाटीने लागावे हा संपूर्ण व्यवहार, ही संपूर्ण प्रक्रिया 'तप' या नावाने ओळखली जाते.

यद् दुस्तरं यद् दुरापं यद् दुर्गं यच्च दुष्करम्
तत् सर्वं तपसा साध्यं तपोहि दुरातिक्रमम्॥

(मनु. अ. ११ : श्लोक २३८).

तपश्चर्येने असाध्य असे काहीच नाही असा पौरुषयुक्त तसाच उत्साहवर्धक उपदेश आपल्या धर्मकारांनी केलेला आहे...आपणास नेहमी असे दिसते की उपभोगाने नैसर्गिक शक्तींचा व साधनांचा क्षय होत असतो. अशा क्षयानेच समाज निरुत्साही बुद्धिमंद, निर्वीर्य आणि शत्रूंना आनंद देणारा ठरतो. समाजाने आनंद अनुभवणे आणि भोगांचा उपभोग घेणे पूर्णपणे सोडून देणे इष्ट आहे असे म्हणता येणार नाही. जीवनाचा अनुभव घेण्यासाठी, वृत्तींना तृप्त करण्यासाठी आणि पुरुषार्थाची नवी नवी क्षेत्रे खोलण्यासाठी सामाजिक जीवनात उपभोगाला स्थान आहे आणि ते राहणारच; परंतु या उपभोगामुळे समाज क्षीण होणार नाही तेवढे चांगले. प्रत्येक समाजाने उपभोगाची तीव्रता व प्रमाण काहीही करून तपश्चर्येच्या तुलनेने कमीच राहील अशी व्यवस्था करावयास पाहिजे. जे उपभोग सामाजिक शक्ती कमी करतात त्यांचा प्रथम त्याग करावयास पाहिजे. त्याच्यापासूनच तपाला आरंभ होतो.

—गीताधर्म : ३३–३५

शक्तिक्षय टाळण्यासाठी सर्व समाजाने, आणि विशेष करून नेत्यांनी अविरतपणे तप करीत राहिले पाहिजे. सर्व सुखे तपावर अवलंबून असतात. तपाने सामर्थ्य व तेज वाढत असते. सामर्थ्य आणि तेज असले तरच उपभोग अनुकूल ठरतात; मग त्यात स्वतःचा स्वार्थ असो की नसो.

आपण केलेले दोष दूर करण्यासाठी, झालेले नुकसान भरून काढण्यासाठी केवळ सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने जे कर्म करावयाचे असते त्यालाच यज्ञ म्हणतात.... स्वतःचा यज्ञ स्वतःच करावयास हवा. स्वतः यज्ञ करायचा नाही आणि तो दुसरा कोणी करीत असेल तर ते दुसऱ्याचे तप ठरते.

...आसुरी वृत्तीचे लोक प करतात, वेळप्रसंगी भरपूर तप करतात पण यज्ञ करीत नाहीत. ते लोक अदूरदर्शी असतात. देव किंवा सुधारलेले लोक यज्ञ करायला चुकत नाहीत.

...जो समाज यज्ञ करण्यात दक्ष असतो त्याला क्षीण होण्याची भीती नसते. त्याची संस्कृती शिथिल होण्याचे कारण नसते. वापरलेल्या शक्तीची झीज व उणीव

थोड्याफार मेहनतीने वेळेवर भरून काढल्याने तो समाज दिवसेंदिवस अधिकाधिक तप करण्यास समर्थ बनत असतो. सामर्थ्यपूर्वक सुख भोगत असतो आणि सुखाचा उपभोग घेत राहूनही अवनत होत नाही. यक्षवृत्ती सामाजिक जबाबदारी द्योतक आहे.

तप आणि यज्ञ या दोघांप्रमाणे समाजाच्या सुस्थितीसाठी दानाची पण आवश्यकता असते. दानाशिवाय समाजात एकसारखे, समान समाधान राहात नाही. मागण्याची कटकट नाहीशी करण्यासाठी दिले जाणारे दान हे खरे दान ठरत नाही.

कष्ट करून तपश्चर्येने आपण जे काही मिळवीत असतो त्यावर खरे पाहता आपल्या एकट्याचा हक्क नसतो. जितक्या लोकांच्या सहकार्याने संपत्ती किंवा सुविधा प्राप्त झालेली असेल त्या सर्वांमध्ये त्या फलप्राप्तीची वाटणी व्हावयास पाहिजे....आणि केवळ हक्काच्या तत्त्वाचा आधार घेऊन ज्याचा त्याचा हिस्सा ज्याला त्याला देऊन टाकण्याने आपल्या सामाजिक हृदयाला समाधान मिळू शकणार नाही. गरजवंत लोक आपले बंधू आहेत, सहकारी आहेत, आपल्या मदतीवर त्यांचा हक्क आहे अशा भावनेने, आंतरिक ऊर्मीने आणि नैसर्गिक उमाळ्याने तावडतोब त्यांना मदत करायला प्रवृत्त होणे हे नैसर्गिक व आवश्यक आहे. त्यालाच **दान** म्हणतात.

—गीताधर्म : ३८–३९

दान करताना दान घेणारा मनुष्य हीन, कमी प्रतीचा, आहे, आश्रित आहे, आपण त्याच्यावर उपकार करीत आहोत अशी वृत्ती मनात उठता कामा नये. दान घेणाऱ्याविषयी आपणास आदर वाटला पाहिजे. दान देण्याने आपण आपले फक्त कर्तव्य बजावीत आहोत असे आपणास वाटले पाहिजे. **दातव्यं इति यद् दीयते।** आणि म्हणूनच प्राचीन धर्मकारांनी दानाचा अर्थ सर्वांशी संविभाग असा केलेला आहे. खरे पाहता दान करणे हे एक सामाजिक कर्तव्य आहे. दान स्वेच्छेवर आधारून ठेवण्यात बंधुत्वाच्या वृत्तीचा सुगंध कायम ठेवायला पाहिजे.

...साधनसंपत्ती वाटेल तेवढ्या झपाट्याने वाढत गेली तरी माणसाची लालसा, भोगवासना, ऐश्वर्यतृष्णा आणि आशा यासुद्धा तिच्यापेक्षा अधिक मोठ्या प्रमाणात वाढतच राहणार. शेवटी मनुष्य दरिद्री तो दरिद्रीच राहणार. **स तु भवति दारिद्री यस्य तृष्णा विशाला।**

असाही अनुभव आहे की ज्या प्रमाणात भूक वाढते, माणसाचा लोभ आणि ऐश्वर्यमद वाढतो तेवढ्याच प्रमाणात त्याची सर्वांबरोबर ऐक्य अनुभवण्याची अडचण वाढते. संपत्तीविषयीचे प्रेम आणि मनुष्य जातीवरील निष्काम प्रेम यांचे प्रमाण नेहमीच व्यस्त असते. संपत्तीविषयी ममता नसेल आणि संपत्ती ही आपणापाशी ईश्वराने सोपविलेली ठेव आहे अशी बुद्धी असली तरच संपत्ती माणसाला बाधा करीत

नाही. बाकी दुसऱ्या रीतीने खाजगी मिळकत अथवा संपत्ती बाधा केल्याशिवाय राहात नाही. म्हणून ज्याला आत्मविश्वास साधावयाचा असेल त्याने संपत्तीचा त्याग करणे हेच चांगले. संपत्तीद्वारा पुष्कळ धर्म करण्याची इच्छा बाळगणाऱ्यांना सत्पुरुषांनी उत्तर देऊन ठेविले आहे की—

धर्मार्थं यस्य वित्तेहा, वरं तस्य निरीहता।
प्रक्षालनाद् हि पंकस्य दूरादस्पर्शनं वरम् ॥

संपत्ती याप्रमाणे आदर्श सिद्धीच्या आड येत असल्याने तिचा त्याग करणे हाच उत्तम उपाय आहे. संपत्ती जितकी एकत्रित होईल, पुंजीभूत होईल तितकी ती नुकसानकारक व भयानक बनत असते. म्हणूनच ती एक तर अनेक लोकांमध्ये वाटून टाकावी आणि योग्य व्यवस्था होत असली तर ती सार्वजनिक करून टाकावी. विश्वकुटुंबत्व हा आपला अंतिम आदर्श आहे. जेव्हा हृदय विशाल होईल आणि योजनाशक्ती आणि जीवनतंत्र सुसंघटित बनेल तेव्हा हा आदर्श सिद्ध झाला असे म्हटले जाईल.

—गीताधर्म : ४१–४२

विश्वकुटुंबत्वाचा आदर्श सिद्ध करण्यात व्यक्तिगत संपत्ती विघ्नरूप आहे म्हणून ती सोडून देण्याची सवय माणसाने करावयास पाहिजे. तरच माणसाचा विकास होऊ शकेल. सामाजिक विकासासाठी केवळ दान करून भागणार नाही. ते काम तर त्यागाचेच आहे. दानाने प्रेमभाव वाढतो, समाधान वाढते, परंतु हृदयाचा पूर्ण विकास तसेच आत्मिक सामर्थ्य तर त्यागानेच येते. त्यागाच्याऐवजी दान हा पर्यायी धर्म आहे. ज्यांच्याकडून त्याग होणार नाही त्यांनी दानावर भागवावे एवढाच त्याचा अर्थ आहे.

एका फ्रेंच लेखकाने एका ठिकाणी म्हटले आहे– 'The less I have, the more I am.' ज्या प्रमाणात माया कमी त्याच प्रमाणात आत्मा परिपुष्ट होत असतो. त्यागशक्ती जसजशी वाढत जाईल तसतसा विश्वबंधुत्वाचा अनुभव येत जाईल. त्यासाठी दुसरा मार्ग नाही. **यत्र विश्वं भवत्येकनीडम्।**

— गीताधर्म : ४२

क्षमा : आत्मौपम्याचा अनुभव क्षमावृत्ती अंगी आणल्याशिवाय होणारच नाही...स्वतःच्या दोषांकडे क्षमाबुद्धीने पाहण्याची वृत्ती, अशीच सहनशीलता, असेच प्रेम व असाच विश्वास सर्वांच्या विषयी जो ठेवू शकेल त्याने क्षमावृत्ती सिद्ध केली आहे असे समजावे.

जगात विविधता तर नेहमी राहणारच. म्हणून माणसांमध्ये कळतनकळत मनोरचना, आदर्श आणि आग्रह यांच्यात भेदभाव राहणारच. सामाजिक जीवन शक्य व्हावे यासाठी अमुक एका प्रकारचे एकसारखेपण सर्वसाधारण असावयास पाहिजे हे खरे, पण हे सारखेपण जितके सर्वमान्य होईल तितकेच पथ्यकर होईल. जबरदस्तीने लादलेली एकरूपता थोडा काळ सामर्थ्य देणारी होते खरी, परंतु शेवटी तिच्यामुळे समाजात विकृती उत्पन्न होत असल्याने ती मूळ उद्देशालाच मारून टाकते....क्षमेमध्ये एकच दोष असतो असे महाभारतात म्हटले आहे, व तो म्हणजे क्षमावान मनुष्य दुर्बळ दिसतो.

—गीताधर्म : ४४–४५

मार्दव : क्षमावृत्तीच्या मुळाशी एक प्रकारचे मार्दव, मृदुता असावयास पाहिजे. स्वतःच्या दोषांच्या बाबतीत अधिकाधिक कडक व्हावयाचे आणि इतरांच्या बाबतीत अत्यंत सौम्य व्हावयाचे हे या मार्दवाचे मुख्य लक्षण आहे. असंस्कृत माणसाचा स्वभाव याच्या अगदी उलट असतो...सर्वांशी अत्यंत मऊपणाने, सौम्यपणाने वागावे, सोपा आदर्श लोकांसाठी कल्पून त्याला अनुसरून इतरांबरोबर वागावे हे मृदुतेचे लक्षण आहे. जो स्वतःशी कठोरतेने वागतो व इतरांबरोबर मृदुतेने व नम्रतेने वागतो त्याच्या शीतल सहवासाने लोक त्याच्याकडे आकर्षित होतात व त्याच्याभोवती वावरू लागतात, त्याच्या आग्रही जीवनापासून आपापल्या शक्तीनुसार काही शिकतात आणि मोठी कार्ये पार पाडण्यास समर्थ बनतात. याचमुळे मार्दवाचे सामाजिक महत्त्व फार मोठे आहे. ज्यांच्याठिकाणी मार्दव असते तेच क्षमेचे प्रसंग कोणते ते आणि त्यांच्यासाठी कोणती स्थाने आहेत ती ओळखू शकतात.

—गीताधर्म : ४६–४७

आर्जव : मार्दवाशी ज्याची तुलना होऊ शकेल व त्याच्या इतकाच महत्त्वाचा गुण आर्जव आहे. आर्जव म्हणजे सर्वांशी सरळपणे, निष्कपटपणे वागणे. स्वतःचा असा कोणताही स्वार्थ ज्या माणसाला साधावयाचा नसतो, जो अजातशत्रू, विश्वमित्र (जगन्मित्र) असतो त्याचे वर्तन निःसंशयपणे सरळच असते. जेथे मलिन स्वार्थ साधावयाचा असतो तेथेच छक्केपंजे खेळण्याची बुद्धी होते. कुटिलता सर्व सामाजिक व्यवहार कलुषित करून टाकते, आणि जे सहकार्य विश्वासाच्या पायावरच दीर्घकाल टिकून राहते ते अशक्य करून टाकते.

आर्जवाचा गुण समाजात परस्पर-विश्वासासाठी जितका आवश्यक असतो तितकीच बुद्धीच्या निर्मळतेलाही त्याची जरुर असते. आर्जवाने युक्त असलेली बुद्धी आपोआप भेदक बनते आणि प्रत्युत्पन्न म्हणजे नैसर्गिक समजूतदारपणाची होते.

आर्जवाशिवाय समाजाचे व्यापक संघटन व सुव्यवस्थित कार्य अशक्य बनत असते.

—गीताधर्म : ४८–४९

अद्रोह : सामाजिक वृत्तीला जर अहिंसा या नावानें ओळखले तर असामाजिक वृत्तीला 'द्रोह' हे नाव द्यावयास पाहिजे. आपल्या हातून कोणाचाही द्रोह होऊ नये, कोणाचे नुकसान होऊ नये, कोणाचेही नुकसान करण्याची बुद्धी हृदयात उठू नये अशी जी उत्कट वृत्ती तिला 'अद्रोह' म्हणतात...ज्या तत्त्वज्ञानात संपूर्णपणे अद्रोह आहे तेच मनुष्य जातीला अधिकात अधिक हितकारक ठरेल. द्रोहाला ज्या प्रमाणात स्थान असेल त्या प्रमाणात त्याचे परिणाम घातक ठरतात....अद्रोहाच्या मुळात आत्मौपम्य काठोकाठ भरलेले असते. जसा आपला प्राण आपल्याला प्रिय असतो तसाच इतरांनाही त्यांचा प्राण प्रिय असतो. जसे दुःख टाळून सुख मिळवावे असे आपणास वाटते तसेच इतरांनाही वाटते. आणि खरे पाहता सर्वांचा आत्मा एकच असल्याने कोणत्याही जीवाचा द्रोह आपल्या हातून होऊ नये अशी भावना असावी अशी नेहमी काळजी वाटावी यातच हृदयाचा विकास असतो. आध्यात्मिक दृष्टीने पाहता निःस्पृहतेने सुखाला सोडून द्यावे आणि शांतीने आणि धीराने दुःख सहन करावे हेच योग्य आहे. धर्माचा मार्ग असा आहे की दुसऱ्यांना सुख मिळावे आणि त्यांचे दुःख कमी व्हावे असाच आपला प्रयत्न असावयास पाहिजे.

अपैशुन : आर्जवात अपैशुनही येते. पिशुन म्हणजे चहाडी करणारा, चहाडी-खोर. कोणाचीही त्याच्या गैरहजेरीत निंदा करून त्याचे नुकसान करणाऱ्या कुटिल आणि वायकी वृत्तीचा मनुष्य पिशुन असतो...जगातील सर्व लोकांना आपल्याविषयी असा विश्वास वाटायला पाहिजे की त्यांची अब्रू, इज्जत आपल्या हातात सुरक्षित आहे. मर्मान्तिक दुःख होईल असे काहीही आपण त्यांच्या मागे, त्यांच्या गैरहजेरीत बोलणार नाही असा भरवसा त्यांना आपल्याविषयी वाटला पाहिजे. आपले आचरण तरी असे असले पाहिजे.

—गीताधर्म : ५४–५५

शंका, अनादर, स्वार्थ आणि धूर्तपणाच जर समाजात सर्वत्र भरून राहिला तर समाजात परस्पर–सद्भाव नामशेष होऊन जातो आणि शेवटी समाज छिन्नविच्छिन्न होऊन जातो. आपल्या मागे चहाडीखोराने केलेली निंदा माणसाला असह्य होते. जोपर्यंत आपल्या ठिकाणी पैशुन्य शिल्लक राहील तोपर्यंत समाजाचा विकास झालेला आहे असे समजता येणार नाही.

—गीताधर्म : ५७–५८

ह्री : जे काही करता करता किंवा केल्यानंतर माणसात शरम किंवा लाज निर्माण होते ते अनार्य आचरण होय. कोठे आणि कोणत्या कारणासाठी लाज वाटायला पाहिजे याचे व्याख्याशुद्ध शास्त्र होऊ शकत नाही. माणसात जर आर्यभाव असला तर तो आपोआपच उगवून वर येत असतो, मग त्यासाठी वाटेल तेवढे नुकसान होवो की प्राणही जावोत, पण अमुक प्रकारची कृती आपल्या हातून होताच कामा नये असे या लज्जाभावामुळे वाटते. आर्यवृत्तिमूलक ही लाज किंवा शरम 'ह्री' म्हणून ओळखली जाते. ही ह्री ज्यांच्या ठिकाणी नसते त्यांना निर्लज्ज किंवा बदमाष, नंगे म्हणतात... समाज अशा काही विलक्षण रीतीने काही कृत्यांबद्दल असा काही तिरस्कार दर्शवितो की पूर्णपणे निर्लज्ज, निगरगट्ट आणि बदमाष माणसालाही मरण-प्राय दुःख वाटते. काही दुष्ट वर्तनासाठी समाजाकडून कोणतीही भौतिक शिक्षा होत नाही आणि म्हणूनच त्यासाठी मिळणारी नैतिक शिक्षा अधिकाधिक सलते. नैतिक शिक्षा जितकी रामबाण असते तितकीच नाजूकही असते.

ह्रीची दुसरी एक बाजू 'अब्रू' नावाने ओळखली जाते. अब्रू किंवा प्रतिष्ठा घालवण्यापेक्षा मनुष्य प्राण गमावण्यासही तयार होतो... सामाजिक तिरस्कार हे जिवंतपणी मरण्यासारखे आहे. प्रत्येक माणसाच्या ठिकाणी वसणारी ह्री व अब्रू विषयींची भावना हे समाजाचे शेवटचे अस्त्र असते.

....निसर्गात वाटेल तेवढे प्रचंड वादळ उठले तरी शेवटी शान्तीची स्थापना होत असते, कारण प्रकृतीच्या स्वभावात स्थायी रूपात शांतीच वसत असते.

प्रकृति ही Constitution आहे.

...समाजात काहीतरी व्यवस्था असावी, त्यात विशिष्ट प्रकारच्या त्रुटी नसाव्यात, असे प्रत्येक माणसाला आतून वाटत असते. ही जी अस्पष्ट, 'अव्यक्त कल्याणेच्छा' प्रत्येक हृदयात वसत असते तेच समाजाचे शेवटचे भांडवल किंवा शिदोरी असते, आणि हीच शिदोरी लाज, शरम, लज्जा, अब्रू या नावांनी ओळखली जाते.

—गीताधर्म : ६१

...ज्यांच्या ठिकाणी या ह्रीचा उदय झालेला नसतो त्यांना आपण 'अनार्य' म्हणतो आणि ज्यांच्या ठिकाणी ह्रीचे तेज प्रखर असते त्यांना आपण 'आर्य' म्हणतो.

—गीताधर्म : ६२

शौच : दैवी संपत्तीच्या सामाजिक गुणांमध्ये शौच हा गुण महत्त्वाचा आहे. या गुणाची सामाजिक व व्यक्तिगत अशी दोन रूपे आहेत. ही दोन रूपे परस्पर विरुद्ध नाहीत; उलट ती परस्परांस पोषक आहेत. आपले शरीर, आहार, वापरण्याच्या वस्तू, दृष्टीसमोरील देखावे हे सर्व स्वच्छ, व्यवस्थित आणि श्रीयुक्त असले तर

माणसाला आवडते.

...आपल्या अव्यवस्थितपणामुळे किंवा आळशीपणामुळे दुसऱ्याचे नुकसान होऊ नये, दुसऱ्यांच्या कार्यात विघ्न येऊ नये, उलट जमल्यास मदतच व्हावी अशी एक सामाजिक वृत्ती कमी-अधिक प्रमाणात प्रत्येक माणसाच्या ठिकाणी असते. सर्वांच्या आरोग्यासाठी व प्रसन्नतेसाठी स्वच्छता ठेवणे हे एक महत्त्वाचे सामाजिक कर्तव्य ठरते. एखाद्याची मनोवृत्ती जर मलिन, रोगट व दुष्ट असली तर सबंध समाजावर तिचा परिणाम झाल्याशिवाय राहात नाही. तसेच एखाद्या माणसाची चित्तवृत्ती पवित्र, उदात्त आणि आर्य असेल तर त्याचाही प्रभाव समाजावर पडल्याशिवाय राहात नाही...मनाला पवित्र करणे व ठेवणे हे आंतरिक शौच आहे. वाईट, दुष्ट, मलिन विचारांनी मनुष्य समाजाचे नुकसान करू शकतो.

—गीताधर्म : ६३-६५

म्हणून आंतरिक शौच म्हणजे मनाचा निर्मळपणा सांभाळणे हे आपले जणू आध्यात्मिक कर्तव्य आहे, तसेच सामाजिकही कर्तव्य आहे. या गुणांची कार्यवाही समाजाजवळील बाह्य नियंत्रणाने करता येणार नाही. व्यक्तींच्या पवित्र व शुद्ध आचरणाने सभोवतालचे वातावरणही शुद्ध व पवित्र होत असते.

—गीताधर्म : ६५

अलोलुप्त्वम्: बाह्य आणि आंतरिक शौचाच्या विरुद्ध ज्या कोणत्या वृत्ती असतात ती लोलुपता होय. शारीरिक आणि मानसिक स्वच्छता किती राखायला पाहिजे याचे ज्ञान जर नसेल, किंवा त्याचा स्पष्ट आदर्श समोर नसेल तर माणूस अस्वच्छ राहावयाचा. समाजकारणात आणि राजकारणात लोलुपतेमुळे लोक किती तेजोहीन व भ्रष्ट होऊन निष्ठा विकून टाकतात हे आपण रोजच पाहात आहोत. जेथे लोलुपता येते तेथे प्रतिष्ठा, निष्ठा आणि तेजस्वितेची जाणीवच नष्ट होत असते. लोलुपता व्यक्तीचा तर नाश करतेच पण समाजाचेही अनेक रीतींनी नुकसान करीत असते. यामुळे अलोलुप्त्व हे चारित्र्याचे मुख्य लक्षण आहे असे जाणकार लोक मानतात.

लोलुपता सर्वच इंद्रियांना चिकटू शकते. आळस, निद्रा आणि शैथिल्य यांना स्वतंत्र इंद्रिये नाहीत, तरीही त्यांच्या बाबतीत ही लोलुपता असू शकते...उन्मादक वातावरणात राहात असूनही ज्याचे मन अविकारी राहते तोच खरा इंद्रियजय... समाजात राहूनच अलोलुप्त्वाची साधना करावयास पाहिजे. समाजात राहणाऱ्यांकडून हे प्राप्त होऊ शकणार नाही असे मानणारे लोक माणसाच्या प्रगतीच्या बाबतीत नास्तिक आहेत असेच म्हणावयास पाहिजे. —गीताधर्म ६६-६९

अचापलम् : अलोलुप्त्वाच्या सामाजिक सद्गुणाच्या जोडीला दुसरा एक गुण आहे अचापलम्. ज्यांच्याठिकाणी स्थिरता नसते, विचारजागृती नसते, धीर व धैर्य नसते, आणि केवळ रजोगुणाचे प्राबल्य असते, त्यांच्याठिकाणी एक प्रकारचे चापल्य, चपळता किंवा चंचलता शिरलेली असते. हाती घेतलेल्या साधनांचे सामर्थ्य व कुवत न अजमावता कामाची सतत अधिकाधिक चिंता करून अनावश्यक धावपळ करीत राहणे हे चापल्याचे लक्षण आहे. चिंताक्रांततेचा, anxiety complex चा हा परिणाम असतो. अमर्याद प्रमाणात चिंता करण्याची एकदा सवय पडली की असे होते. चापल्य वृत्तीचे स्वरूप इंग्रजीत fussy या शब्दाने बरोबर व्यक्त होते...सत्त्व-गुणात सत्त्व (कस) असते म्हणून प्रगती होत असते. रजोगुणात धांदरटपणा, धावपळ करूनही प्रगतीसारखे फारसे काही निष्पन्न होत नसते. आजच्या जगात ज्या काही चळवळी, धावपळी, गडबड आणि 'प्रगती' चालू असते त्या सर्वांतून खरो-खरच परिणामकारक व उपयुक्त किती, आणि व्यर्थ, निरुपयोगी किती, हे निवडून काढावयास पाहिजे.

—गीताधर्म : ७०–७१

नातिमानिता : नातिमानिता आणि अमानित्व एकच होत. ज्ञानप्राप्तीच्या बाबतीत बौद्धिक नम्रतेची आवश्यकता असते. माझेच म्हणणे खरे असा अहंकार असता कामा नये; कारण असे करण्याने ज्ञान एकांगी व कलुषित होण्याचा संभव असतो. मन विकारी बनते तेव्हा ज्ञानही कलुषित होत असते आणि अनुभव एकांगी ठरतो...माणसाला मान तर असला पाहिजे, पण त्याचा अतिरेक होता कामा नये. मान मुळात अहंकारमूलक असतो... समाजाचा विचार करताना आपला विचार समाजाच्या हिताकरिता आहे ही गोष्ट विसरून जातो आणि स्वतःलाच मध्यबिंदू मानून सर्व घटना आपल्याच भोवती फिरत राहाव्या असा आग्रह जर मनुष्य धरून बसेल तर तो अभिमान झाला. त्यामुळे समाजाचे नुकसान होते...मी स्वतःच पूज्य आहे, मी केंद्रस्थान आहे, अशा मूर्खपणाने भरलेल्या भावनेने माणसाची तेजस्विता पुष्ट होत नाही, उलट त्याची सेवाशक्तीच कमी होते. तेजस्विता असावयास पाहिजे, स्वत्त्वाचा अभिमान पण असावयास पाहिजे, परंतु अतिरेक करून समाजहिताला स्वत्त्वापेक्षा कमी लेखता कामा नये, असा अर्थ नातिमानिता शब्दाने व्यक्त होतो... सिद्धांताला बाध येणार नाही अशा रीतीने कोठे धीर धरावयाचा, कोठे छापा मारण्याच्या हेतूने लपून राहावयाचे आणि अनुकूल परिस्थितीची वाट पाहायची, या सर्वांचे भान जागृत राहावे यासाठी नम्रतेची आवश्यकता असते. तिलाच 'नाति-मानिता' असे नाव दिलेले आहे. सिद्धांताचा विजय हा धर्माचा विजय असे होणारच. आपण स्वतः सर्व अहंकार सोडून देऊन आपल्यापुरते क्षणिक यश येवो की न येवो,

सार्वत्रिक कल्याणाच्या विचाराला चिकटून राहून सर्वहिताच्या दृष्टीने ज्यावेळी जे करणे योग्य वाटेल त्यावेळी ते करण्यासाठी तयार राहणे हे भक्तहृदयाचे लक्षण आहे.

गीताधर्म : ७२–७४

अक्रोध : नातिमानिता सिद्ध करण्यासाठी अहंकार नसणे हे जसे आवश्यक असते, त्याचप्रमाणे आपले सहकारी व विरोधी या दोन्ही अनुकूल–प्रतिकूल लोकांवर न रागावण्याच्या वृत्तीची पण गरज असते. राग किंवा क्रोध हा दारूसारखा असतो. दारूने जसा जोर वाढत नाही पण शरीरात शक्ती वाढल्याचा किंवा नव्याने आल्याचा फक्त भास होतो तशीच क्रोध ही एक प्रभावी, तीव्र लढाऊ शक्ती असते असा खूप लोकांना भास होतो. परंतु वस्तुस्थिती तशी नसते. दारू प्याल्याने मनुष्य जसा आंधळा बनत असतो तसाच क्रोधानेही मनुष्य आंधळा बनतो व त्या धुंदीत मनुष्य स्वतःचे नुकसानही करून बसतो. स्वतःच्या हिताचा नाश करणारे जे दोष आहेत ते क्रोध, लोभ आणि काम हे आहेत; म्हणूनच गीतेत त्यांना नरकाची तीन द्वारे म्हटले आहे....शत्रूशी सौजन्याने वागल्यास आपणास दुहेरी विजय मिळतो... सामाजिक कल्याणासाठी अक्रोधाची आवश्यकता असते.

—गीताधर्म : ७५–७६

ज्ञानयोग–व्यवस्थिति

सर्व प्रकारच्या गुणांचा उत्कर्ष करण्यासाठी आणि आदर्शांत विकृती किंवा बाधा शिरू नये यासाठी समग्र जीवन अखंड विचारमय तसेच आचारपरायण असायला पाहिजे. विचार पाहिजे तितका जागृत नसतो तेव्हा अबुद्धी, जडता आणि आंधळेपण ही सर्व झपाट्याने जोरात वाढीस लागतात. जीवनतत्त्वे सनातन आहेत हे खरे आणि ती स्थायी अथवा नित्य आहेत हेही खरे, परंतु परिस्थिती सतत बदलत राहते आणि त्याचप्रमाणे जीवनाचा आणि जीवनाच्या आदर्शांचा एकसारखा अव्याहतपणे विकास होत राहतो. म्हणजे तत्त्वांच्या आकलनात आणि परिपालनात नेहमी फरक पडत राहतो, किंवा फरक, बदल करावा लागत असतो. हे परिवर्तन व्हावे, त्यात कृत्रिमता, जडता अथवा विकृती शिरू नये यासाठी अखंड विचार किंवा विचाराची एकसारखी चाळणी चालू राहिली पाहिजे. ज्ञान म्हणजेच परमेश्वर, त्याचा आविष्कार आपल्या हृदयात आपल्या योग्यतेच्या प्रमाणात क्रमाक्रमाने होत राहतो. म्हणूनच क्रममुक्तीची

कल्पना योग्य वाटते. ज्ञानाने ज्ञान वाढत असते आणि त्याच्याबरोबरच आपली शक्ती आणि जबाबदारी या दोन्ही वाढत असतात.

...विचारशक्तीबरोबरच माणसाला ईश्वराने कल्पना करण्याची शक्ती पण दिलेली आहे. विचाराची गती जेथे थांबते तेथपासून कल्पनेने उडी मारावयाची असते. परंतु बऱ्याच वेळा विचारशक्तीचा पुरेसा उपयोग केल्याशिवायच माणूस कल्पनेच्या पंखावर आरूढ होऊन बसतो आणि अशा रीतीने कल्पनाशक्तीचा दुरुपयोग करून तिला निःसत्त्व किंवा अप्रमाण किंवा प्रमाणाबाहेरची करून टाकतो. जीवनरथाला ओढण्यासाठी खरे म्हणजे विचाराबरोबर त्याला आचारही जोडायला पाहिजे. विचार आणि कल्पना यांचा जीवनाच्या दृष्टीने मेळ घालायला पाहिजे. म्हणून आचार म्हणजे प्रत्यक्ष क्रिया, प्रयोग, निरीक्षण, परीक्षण आणि अनुभव असल्याने या सर्वांची आवश्यकता असते. विचाराला प्रथम तर्कबुद्धीच्या साहाय्याने तपासून घ्यावे, नंतर प्रयोगाच्या प्रत्यक्ष अनुभवाच्या भट्टीत त्याला तावून सुलाखून पाहावे, आणि पुन्हा नंतर त्याचे कठोरपणे चिंतन-मनन करावयास पाहिजे.

...असे करीत राहिले तरच ज्ञानाचा विस्तार वाढत जातो; ते खोल आणि तेजस्वी बनते आणि अखंड क्रियेत दिवस जात राहतात. म्हणून जीवन पण शुद्ध व समृद्ध होत असते. बुद्धीमध्ये माहितीचा आणि व्यवस्थेचा जो विकास होतो, आणि त्यांच्यासंबंधी ज्ञानेंद्रियांमध्ये जे कौशल्य निर्माण होते त्यालाच ज्ञान म्हणतात. ज्ञानाचा जीवनात उपयोग करून पाहावा आणि तसे करता करता नैतिक सामर्थ्य वाढवीत राहावे याला 'योग' म्हणतात. ज्ञान आणि योग या दोघांचे यथार्थ भान असणे, दोघांची सारखीच सिद्धी होणे, दोघांचे वाजवी प्रमाण साधणे आणि परिणामतः जीवन एकांगी न होऊ देणे यालाच गीतेने ज्ञान-योग-व्यवस्थिती असे नाव ठेवले आहे. लोकांच्या पुरुषार्थाचा आणि शिक्षणाचा अंतिम आदर्श हाच आहे. ज्ञान-शक्तीचा क्रियाशक्तीशी मेळ बसून नंतर दोघांचाही सर्व बाजूंनी विकास व्हावयास पाहिजे. म्हणजेच समाजात बुद्धिवैभव आणि कर्मकौशल्य या दोघांवर सारखेच लक्ष ठेवावे लागते. असे सर्वांगीण शिक्षण फक्त शाळांतून मिळत नसते...संपूर्ण जीवन ज्ञान आणि सामर्थ्य हे वाढविण्याकडेच वळवायला पाहिजे.

—गीताधर्म : ७७–७९

स्वाध्याय : सामान्यपणे जीवनव्यापी शिक्षण पचविल्यानंतर सामाजिक व्यवहारात जर आपण सर्व वेळ गुंतून राहिलो तर ज्ञान आणि कौशल्य ही दोन्ही बोथट होऊन जातात. नेहमीच्या व्यवहाराची जर सवय पडली असेल तर कर्माचे कौशल्य कदाचित निस्तेज बनणार नाही व त्याच्यावर गंज चढणार नाही; पण ज्ञान तर क्षणार्धात गंजून जाते, मलिन बनते, त्याच्यावर धूळ बसते. त्याच्यावर धूळ चढू नये

म्हणून ज्ञानाचा ज्यात सर्वांगीण विचार केलेला आहे व ज्याचे सिद्धांत आपल्याला पूर्णपणे पटलेले आहेत अशा ग्रंथांचे वारंवार पारायण करावयस पाहिजे. अशा प्रकारचा स्वाध्याय मोठे तप असते, त्यात मोठे सामर्थ्य असते.

— गीताधर्म : ८०

दया : मार्दव, क्षमा, अक्रोध, दान वगैरे सामाजिक सद्गुणांत प्राणिमात्राविषयी दया हाच मुख्य भाव असावयास पाहिजे. ज्यांच्याशी आपला संबंध येतो त्यांच्या सुखाने आपणांस आनंद होतो आणि त्यांच्या दुःखाने आपण व्यथित होतो. सर्व लोकांचे ममतेचे हे वर्तुळ सारखे नसते. ज्याच्या हृदयाचा जितका विकास झालेला असेल त्या प्रमाणात त्याच्या प्रेमाचा परीघ लहान किंवा मोठा असणार. अत्यंत स्वार्थी माणसाला कोणाहीविषयी ममतेची भावना नसते. पशुपक्ष्यांच्या ठिकाणीसुद्धा प्रेमभावनेचा विकास होऊ शकतो. घोडा, कुत्रा, गाय, म्हैस, हत्ती वगैरे जनावरे पण किती प्रेम दाखवू शकतात याचा आपणांस नेहमी अनुभव येत असतो.

आपण म्हणत असतो की ईश्वर प्रेमळ आहे, एवढेच नाही, तर ईश्वर प्रेमस्वरूप आहे. प्रेम म्हणजेच परमेश्वर...प्रेमाचे स्वाभाविक लक्षण आणि त्याची उत्तम कसोटी ही आहे की आपल्या सुखाविषयी किंवा जीवाविषयी बेफिकिरी वाटते आणि स्वार्थ-त्याग करण्याची तयारी असते. प्रत्येक मनुष्येतर प्राण्यात आपणास अपत्यवत्सलता पाहावयास मिळते. असे आपण पाहात असूनही प्राण्यांना आत्मा नसतो असे आपण जर म्हणू तर आपणास जे सत्य सर्वत्र दिसते त्याच्याकडे डोळेझाक केल्यासारखे होते.

...'दया भूतेषु' मध्ये फक्त एकट्या माणसाविषयीच नाही तर सर्व प्राण्यांविषयी प्रेम, करुणा आणि आत्मीयतेची अपेक्षा ठेवण्यात आलेली आहे.... 'दया भूतेषु' या सामाजिक सद्गुणात मनुष्य आणि मनुष्येतर या दोघांचाही समावेश होतो... माणसाचा माणसाशी आणि इतर प्राण्यांशी प्रेम, सद्भाव, दया या वृत्तींनी व्यक्त होणारा आणि या वृत्तींनी भरलेला संबंधच असावयास पाहिजे. ही वृत्ती सात्त्विक आणि सामाजिक असल्याने ती शिकण्याने समाज पुळचट होईल असे समजणे चुकीचे आहे.

—गीताधर्म : ८२-८६

अहिंसा : जीवशास्त्राचे सारसर्वस्व, सर्व गुणांमध्ये श्रेष्ठ असलेल्या आणि आध्यात्मिक साधनांचा शिरोमणी अशा अहिंसेचा विचार करणे आवश्यक आहे. समाज अस्तित्वात आहे, त्याचा नाश झाला नाही, एवढेच नाही, तर समाजात अनेक प्रकारची विविधता वाढत चालली आहे यावरून हे सिद्ध होते की अहिंसा हा मनुष्य-

जीवनाचा मुख्य धर्म आहे. मृत्यूचे राज्य सर्वत्र चालू असते; द्वेष, मत्सर, असूया वगैरे दोष समाजात दृढमूल होऊन राहिले आहेत तरी पण या सर्वांना वाटेला लावून त्यांना पुरून उरलेली अहिंसा सर्वत्र प्रत्येक हृदयात क्रीडा करीत आहे, आणि आपल्या प्रेमाचे साम्राज्य पसरवीत चालली आहे; म्हणून तर समाज टिकून राहिला आहे, आणि अनेक प्रकारची प्रगती करीत आहे.

....दुसऱ्यांना मारून टाकल्याशिवाय जगता येणे शक्य नाही असा निसर्गाचा नियम आहे खरा, पण हा नियम ओळखून त्यावरून माणसाने आपला जीवनधर्म शोधून काढावयाचा आहे.

....जगणे म्हणजे मारणे असा जरी निसर्गाचा नियम आहे खरा, पण मानव-जीवनाचा धर्म हा नाही होऊ शकत. जीवनधर्म म्हणतो 'कमीत कमी मारावे' हे उत्तमांत उत्तम जगण्याबरोबरचे आहे. न मारण्याकडे, सर्वांना वाचविण्याकडे, सर्वांना अभयदान देण्याकडे हृदयाला उत्कटतेने वळविणे हेच जीवनाचे रहस्य आहे. शरीराला विशाल आणि बलशाली बनवून आयुष्य दीर्घ करण्यासाठी काही आपण जगत नाही. आपण तर हृदय विशाल करण्यासाठी जगत असतो. आपले जगणे तसेच आपले मरणे ही दोन्ही हृदयाचा विकास करण्यासाठीच आहेत. जीवनाचा दुसरा कोणता हेतू नाही व होऊही शकत नाही. जगायचे ते जीवन कृतार्थ करण्यासाठी. प्रेमाच्या विस्तारानेच, त्याच्या विशालतेनेच, आत्मौपम्यानेच ते सिद्ध होऊ शकते. सर्वत्र मीच आहे ही गोष्ट ज्याला समजलेली असते तो कोणाला आणि कशासाठी मारणार?... सर्व धर्मांमध्ये या अहिंसेचा उपदेश कमी-अधिक प्रमाणात केलेला आहे. ज्या धर्मात अहिंसेला प्राधान्य दिलेले नाही तो धर्मच नाही असे म्हणता येईल.

—गीताधर्म : ८८-९०

गीतेत म्हटले आहे.

समं पश्यन् हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।
न हिनस्त्यात्मनात्मानम् ततो यान्ति परां गतिम् ॥

(अ. १३, २८)

ईश्वराला सर्वत्र सारख्याच रीतीने व्यापलेला पाहून, भरलेला पाहून ज्ञानी पुरुष हिंसेची प्रवृत्ती ठेवीत नाही. हिंसा करणे हे स्वतःचा घात करण्याबरोबरचे आहे हे त्याला समजते, आणि अशा रीतीने हृदय शुद्ध आणि पूर्णपणे विकसित होण्याने तो उत्तम गती पावतो; म्हणजे त्याला या विश्वाचे बृहत्तम तत्त्व जे ब्रह्म त्याची प्राप्ती होते. आत्मज्ञानाची एकमात्र साधना अहिंसाच असते आणि म्हणूनच तिला अमृत नाव दिलेले आहे...अहिंसा पूर्णपणे पचनी पडल्यावर कामविकाराचा आपोआपच

शम व्हावयास पाहिजे. कामुकता ही खरे पाहता एक प्रकारची हिंसाच असते. म्हणून तिचे नियमन करण्यात समाजहित सामावलेले आहे.

—गीताधर्म : ९१

अहिंसा म्हणजे जगाच्या प्रगतीसाठी न्याय, नीती आणि प्रेम यांच्या विजयासाठी स्वतःचे सुख, आपले हित व जीव यांचाही बळी देणे होय....जगाला सुधारावयाचे असेल तर प्रथम आपण स्वतः शुद्ध व्हावयास पाहिजे हा अहिंसे चासवर्तिं मोठा सिद्धांत आहे...सज्जनता किंवा सौजन्य दिसते सौम्य व त्याचा परिणाम प्रखर असतो या प्रकारचा भरवसा अहिंसेला असतो, आणि म्हणूनच अहिंसेची कार्यपद्धती किंवा युद्धनीती अलौकिक किंवा लोकविलक्षण आहे. सामाजिक मनोरचना बदलण्यानेच सर्वोदयकारी समाजव्यवस्था स्थापन करणे शक्य होईल...अहिंसा आणि आत्मनिष्ठा या दोघाचा परस्पर संबंध स्वाभाविक आहे. आत्मनिष्ठा, अहिंसा आणि ब्रह्मचर्य या एकाच वस्तूच्या तीन वेगवेगळ्या बाजू आहेत, एकाच रत्नाला पाडलेले तीन पैलू आहेत, आणि हे रत्न मनुष्यजीवनाचा चिंतामणी आहे.

—गीताधर्म : ८४-८७

सत्य : अभय आणि सत्य वास्तविकपणे एकच आहेत. महाभारतात व्यास-मुनींनी सत्याचे तेरा आकार किंवा रूपे मानली आहेत, व ती ही आहेत. सत्य, समता, दम, अमात्सर्य, क्षमा, ह्री (लाज), तितिक्षा, अनसूया, ध्यान, आर्यता, धृति (लोककल्याणेच्छा) आणि दया. प्राचीन काळच्या लोकांना व्यापक दृष्टीने विचार करण्याची सवय होती आणि व्यापक सिद्धांत घडविण्याची आवड होती. ज्या माणसात सत्य पूर्णपणे पचून गेले आहे त्याच्या ठिकाणी वर उल्लेखलेले बारा किंवा तेरा गुण असणार नाहीत असे होणेच शक्य नाही असे त्यांनी पाहिले. आणि म्हणूनच या गुणांना सत्याचे आकार ते समजले. ज्यांच्या ठिकाणी सत्य आहे. त्यांच्या ठिकाणी औदार्याने वागण्याची आर्यता असणारच ... सत्यात समाजहिताची परम शक्ती भरलेली असल्याने सत्य आणि धृती परस्परांना पोषक बनतातच. कोणत्या प्रसंगी कसे वागावे ते आपोआप समजावून देणारे तत्त्व ह्रीच आहे. एका बाजूला ह्री आणि दुसऱ्या बाजूला ध्यान अशी साधना प्रत्यक्षात आली म्हणजे सत्याचे आचरण पूर्णतः स्वाभाविक बनत असते. दमाशिवाय सत्य शक्य नसते. दमामुळे वासनांचा क्षय होत असतो आणि आत्मा स्वाभाविकपणे विकास पावत असतो. दमामुळे सत्याचे स्वरूप समजते आणि सत्याचे पालन करण्याइतके धैर्य प्राप्त होते. समता, अमात्सर्य, क्षमा, दया, अनसूया हे सर्वच सामाजिक गुण होत.

—गीताधर्म : ९८-९९

सत्याविना समाज एक क्षण सुद्धा टिकू शकणार नाही....या जगात असत्यापेक्षा सत्याचे प्रमाण अधिक आहे. सत्यच पृथ्वी धारण करते, सत्यानेच व्यवहार चालतो. लुच्चया लोकांना सुद्धा सत्याच्या ढालीमागे आपले असत्य लपवावे लागते. सर्व सद्‌गुणांमध्ये सत्य हे प्राणाच्या स्थानी असते. सत्याशिवाय बाकीचे सद्‌गुण निष्प्राण झाले असे समजावे.

असे हे सम्राट सत्य पांगळे नसते. त्याला दुसऱ्या कोणत्याही विजातीय तत्त्वाची मदत खपत नसते. सत्याच्या मदतीसाठी जर हिंसा धावत आली तर सत्य दुर्बल आणि अपमानित होत असते. सत्य जसे स्वयंभू असते तसेच ते सर्वसमर्थ असते, आणि स्ववीर्य गुप्त म्हणजे स्ववीर्यरक्षित असते...सत्य ही अद्‌भुत शक्ती आहे ही गोष्ट जोपर्यंत माणसाला पूर्णपणे पटत नाही तोपर्यंत माणसाची सत्यनिष्ठा अनन्य तशीच अखंड होणे फार कठीण आहे.

—गीताधर्म : ९९–१००

सत्य हे स्थितिशील नसून गतिमान असते. जो थांबतो, मध्येच चालणे बंद करून उभा राहतो, त्याला सत्याची प्राप्ती होत नाही. जो चालत राहतो, गतिमान राहतो त्याच्यासाठीच सत्य असते. हातात कंदील घेऊन जर रात्री उभे राहिलो तर सगळे जग काही आपणास दिसत नाही. पण तो दिवा हातात घेऊन आपण चालू लागलो तर जितकी पावले चालू तितका पुढचा प्रदेश आपणास दिसू लागतो, आणि अशा रीतीने सर्व भूप्रदेशाचा आपणास अनुभव येऊ शकतो. सत्य हे चालणाऱ्यासाठी असते, थांबणाऱ्यासाठी, उभे राहणाऱ्यासाठी नसते. जो मनुष्य स्वार्थाच्या चिखलात रुतून बसतो, किंवा ज्याला पक्षाभिमानाचा पक्षाघात झालेला असतो त्याच्यापासून सत्य दूर गेलेले आहे, त्याच्यात व सत्यात अंतर पडले आहे असे समजावे.

—वेदांत सत्यम् आणि ऋतम् हे दोन शब्द एकाच वेळी येतात. दोघांचाही भाव एकच आहे. सत् म्हणजे असणे. जे त्रिकालाबाधित असते ते सत्य. जे चिरकाल टिकणारे असते, ज्याच्यापुढे विरोध टिकाव धरत नाही, जे विकार पावत नाही, विकाराला दाद देत नाही ते सत्य. ऋ म्हणजे जाणे, चालणे, नियमपूर्वक येणे व जाणे. 'ऋतु' शब्द यावरूनच आलेला आहे. ऋतम् म्हणजे या सर्व विश्वात अनुस्यूत असलेला सार्वभौम नियम... ऋषि शब्द ऋ धातूपासून निघाला आहे. जो जात असतो, उत्कटतेने जीवन जगून त्याच्या पार जाऊन पोहोचतो आणि इतरांसाठी जीवनशास्त्र रचून देतो तो ऋषी होय. या ऋषींचा परम आदर्श सूर्य असतो. तो सूर्य अखंड, सतत चालत असतो, सर्वांना प्रकाश देत असतो, प्रेरणा देत असतो व सर्वांचे पोषण करीत असतो त्यालाच एकर्षि म्हटले आहे. ऋतार्थी ऋषींनी ऋतमूला जाणून स्वतःचे जीवन ऋतनिष्ठ केले तेव्हा त्यांना ऋतमूचा आधार जे सत्य ते

सापडले...ऋतू जसजसे बदलतात तसतशी आपण आपली राहणी बदलत राहिलो तर आपण निरोगी व दीर्घायू होतो. नियमांना नीट समजावून किंवा जाणून घेऊन त्यांना अनुरूप परिवर्तन जीवनात करणे हीच सनातन जीवनाची गुरुकिल्ली आहे. सनातन म्हणजे नित्यनूतन, अखंड ताजे, टवटवीत राहण्याची कला. हेच खरे यौवन आहे... जीवन हे जीवन आहे म्हणजे ते परिवर्तनशील तर असणारच. आजचे नियम उद्या बाधक होतील आणि आजचा प्रेमरज्जू उद्या फाशीचा दोर बनेल असे होऊ नये यासाठी जीवनात आणि आदर्शात जसजसे बदल होतील तसे त्यांना अनुकूल बदल वागण्यातही करावयास पाहिजेत.

इंद्रियजन्य सुख आणि सामर्थ्यजन्य सत्ता या दोघांशी सत्याचा बारावा चंद्र असतो. सत्य आणि सत्ता ही दोन एका ठिकाणी राहून फुलू शकत नाहीत, कारण सत्याची स्वतःची अशी असणारी सत्ता बाह्य सत्तेने मलिन होत असते. सत्याच्या साक्षात्कारात समाधान आणि इंद्रियांद्वारा मिळणारे सुख यांचा कधी मेळ बसेल असे नाही. खऱ्या सत्यात तपस्विता आपोआप येत असते, आणि प्रसन्नता पण असते. प्रसन्नताशाली तपस्विता हे जीवनात सत्याचे सहज दिसून येणारे बाह्य लक्षण आहे.

येथपर्यंत जो जाऊन पोहोचतो त्याला मग बाह्य नियमनाची आवश्यकता राहात नाही. तो स्वतःच नियमनमय होऊन जातो. नियम म्हणजेच धर्म. धर्म हा काही यांत्रिक नसतो, जड नसतो ..धर्म हा काही ठोकून बसविलेला नियम नसतो पण तो चैतन्याचा (Supreme Personality) आविष्कार असतो, आणि म्हणूनच त्याला परमेश्वराच्या नावाने ओळखले जाते. सत्यापेक्षा वेगळा असा कोणता धर्म नाही, आणि धर्माहून वेगळा परमेश्वर नाही. जो सत्याला मानतो तो धर्मनिष्ठ असतो, आणि जो धर्मनिष्ठ असतो तो ईश्वरनिष्ठ असतोच असतो...

—गीताधर्म : १०७

शान्ति : जगात विविधता आणि एकता दोन्ही पाहावयास मिळतात. विविधतेतच ऐक्य भरलेले आहे या गोष्टीचा साक्षात्कार जोपर्यंत झालेला नसतो तोपर्यंत वेगवेगळ्या तत्त्वांची रस्सीखेच चालूच राहते. विविधतेचा असा खेळ चालतो तोपर्यंत जग असते असे काही लोक मानतात. विविधता अस्तित्वात असेपर्यंत एकता अप्रतिष्ठित राहते असे मानणे खरे पाहता एक चूक आहे. विविधता अस्तित्वात आहे, भिन्न तत्त्वांमध्ये रस्सीखेच चालते तोपर्यंत एकता साक्षात् किंवा प्रत्यक्ष झालेली नसते, ती सिद्ध झालेली नसते, असे फार तर म्हणता येईल. संगीतात वेगवेगळे स्वर किंवा सूर एकाच वेळी किंवा एकामागून एक येत असल्यामुळे रागांचा अनुभव येतो. सुरांची अशी विविधता परस्परमारक नसते, पण एकमेकांना पोषकच असते. वेगवेगळ्या स्वरांत असलेला हा परस्पर मेळ किंवा संगती तेच संगीत होय.

अशी संगती अथवा असे संगीत समाजात कशा रीतीने उत्पन्न करायचे ते आतापर्यंत चर्चिलेल्या २५ साधनांनीच होऊ शकते. परंतु त्यासाठी परस्पर–संगती, परस्पर अनुकूलता आणि विग्रहाचा अभाव म्हणजे शांतीचा सव्वीसावा आदर्श स्पष्टपणे समोर यावयास पाहिजे. या आदर्शाच्या विरुद्ध समाजात काही येता कामा नये अशी खबरदारी घ्यावयास पाहिजे. म्हणूनच शांतीला सामाजिक उन्नतीचे साधन समजले जाते...शांती आणि संगती हे जेथे सर्वश्रेष्ठ आदर्श आहेत तेथे संघर्षाला किंवा विरोधाला कोणत्याही भूमिकेवरून, उन्नतीच्या कोणत्याही स्थितीत मान्यता मिळता कामा नये. जगात जोपर्यंत एकतेचा अनुभव मिळत नाही तोपर्यंत वर्गविग्रह आणि ओढाताण चालायचीच...विविधता जोपर्यंत राहील–आणि ती अविरतपणे राहणार नाही असे मानण्याचे कारण नाही–तोपर्यंत एकमेकांत ओढाताणीचे अस्तित्व अपरिहार्य आहे, एवढेच नाही पण आवश्यक आणि इष्टही आहे...जगात सर्व प्रकारच्या भिन्नतेमधील अंतिम आदर्शाची एकता प्रस्थापित झाल्यानंतर कार्याच्या भेदामुळे जो विरोध शिल्लक राहतो त्याच्या मुळाशी वैर आणि शत्रुत्व नसते.

शांती म्हणजे गतीचा अभाव असा तिचा सामान्य अर्थ होतो. पण येथे असा अर्थ अभिप्रेत नाही. शांती ही एक सात्त्विक वृत्ती आहे. रजोगुणाची निरर्थक धांदल आणि तमोगुणाचे आंधळेपण आणि आळस ही दोन्ही शांतीत नसतात. शांतीत व्यवस्थित स्थिर राहून सर्वांनी सर्वोदयासाठी चांगला प्रयत्न करीत राहायला पाहिजे.

शांतीत सर्व प्रकारच्या प्रवृत्ती जोमदारपणाने चालण्यास वाव राहतो. आदर्शाच्या अभावी जो एकांगीपणा आणि पक्षाभिमान येत असतो तो परस्परांना घातक अशा प्रवृत्तींचे कारण बनत असतो. सामाजिक शक्तीचा असा निष्कारण अपव्यय होणार नाही अशी खबरदारी जर ठेवली तर मानवजात केवढी प्रचंड कार्ये पार पाडू शकते!...आजच्या स्थितीतील माणसाला जर आपण माणूस म्हणू तर भावी संस्कृतीच्या माणसाला देव म्हणावे लागेल, आणि म्हणूनच या सव्वीस साधनांनी संपन्न असणाऱ्या संस्कृतीला 'दैवी संपत्' असे नाव दिलेले आहे. ही दैवी संपत्तीच लोकजीवनाचा अंतिम आदर्श आहे.

—गीताधर्म : १०९–११२

२८. खरे ब्रह्मचर्य

जे विराट आहे, भूमा आहे त्याच्याशी एकरूप झाल्यानंतरच जे जीवन सहजतेने जगले जाते तेच खरे ब्रह्मचर्य असते. वासना दाबून टाकल्या तर त्या केव्हातरी

पुनः उसळून वर येणार, वासनांना मारून टाकले तर त्या भुतांसारख्या छळायच्या. वासनांना तृप्त करण्याच्या घाट घातला तर व्यसनाप्रमाणे त्या सतत घोंघावत वाढत राहतात. वासनांना जर वाढवून ठेवले तर डोक्यात त्यांचे चक्र गरगरतच राहणार. वासनेला सरळ आव्हान देऊन विचारायलाच पाहिजे की 'तू आहेस तरी कोण?' मित्राचा बहाणा करून शत्रुत्व करायला आली आहेस की जीवनाला समृद्ध करण्याची साधना म्हणून आली आहेस? वासना जोपर्यंत स्पष्ट होत नाही आणि उघडी पडत नाही तोपर्यंतच ती मोहक असते. मोह अस्पष्टतेचाच असतो, एकांगी दर्शनाचा असतो. वासनेला वश होण्यात मुख्य मदत आंधळेपणाकडूनच होत असते. वासनेला केलेला आंधळा विरोधही तिला मजबूत बनवीत असतो. दोन डोळ्यांनी पाहिल्यास वासनेला ओळखता येत नाही, तिचे खरे स्वरूप समजत नाही, तिला महादेवाप्रमाणे तीन डोळ्यांनी पाहावयास पाहिजे, म्हणजे मग तिची शत्रुता आपोआपच विरघळून जाते.

वासनेशी लढाई केवळ तपस्येने होऊ शकत नाही. प्रज्ञा स्थिर झाल्यावर वासनेला विरोधच करावा लागत नाही.

—जीवननुं काव्य : ३३१–३३२

जीवनात जोपर्यंत अपूर्णतेची जाणीव असते तोपर्यंत ब्रह्मचर्य सिद्ध झाले असे समजता घेणार नाही. अपूर्णता स्वतः बाधक, वाईट नसते. लहान मुलांत अपूर्णता कोठे कमी असते? बालक निर्मळ भावाने जगत राहते आणि त्याची अपूर्णता स्वाभाविक क्रमाने कमी होत जाते. अपूर्णतेची जाणीव झाली की लगेच माणूस पामर, क्षुद्र बनतो. सागराप्रमाणे पूर्ण झाल्यावर कितीही लाटा उसळोत, पाण्याचे लोट कितीही जोरात धावोत पण सागराच्या ठिकाणी वाहतेपण नसते, त्याला वाहणे येत नसते. सागर 'आत्मनि तृप्त' असतो म्हणून त्याला आपली मर्यादा सोडावी लागत नाही. त्याला मर्यादांची जाणीवच नसल्याने त्याच्याकडून मर्यादा अनायासे, अभावितपणे, सहजपणे पाळली जाते. हेच खरे ब्रह्मचर्य होय.

जीवननुं काव्य : ३३२–३३३

विभाग नववा

विचार कलिका

'विचार कलिका' ही काकांची सुभाषितांसारखी छोटी अर्थपूर्ण वचने आहेत. त्यांत त्यांनी मोठे महत्त्वपूर्ण विचार सूत्रमय पद्धतीने अत्यंत सोप्या पण अर्थपूर्ण भाषेत मांडले आहेत. ही त्यांची वचने त्यांच्या विविध लेखांतून निवडलेली आहेत.

विचार कलिका

* भविष्याविषयी चिंता न करणे ही आस्तिकतेची उत्तमांतील उत्तम कसोटी आहे.

* धर्म ही वस्तू प्रवाही आहे; काळाप्रमाणे त्याचा आकार आणि स्वाद बदलत असतो.

* चारित्र्याचे शिक्षण हे खरे शिक्षण. ते सत्समागमातून मिळत असते. कोणताही प्रसंग येवो त्यातही आपण धीरोदात्त आणि आर्यवृत्तच राहू एवढा आत्मविश्वास आला म्हणजे शिक्षणाची सीमा गाठली गेली, बाकी जगाच्या माहितीची काय किंमत आहे ? माहिती तर व्यवस्थित माणूस जन्मभर अनुभवाने, प्रयोगाने, विद्वानांच्या सहवासाने आणि सद्ग्रंथांच्या परिशीलनाने मिळवीत असतो.

* सनातनधर्म प्रगतिशील असतो, प्रवाहशील असतो, आणि धर्माचा प्रवाह वाहात राहील तरच धर्म सनातन-नित्यनूतन राहील व टिकेल. सनातन धर्म ही वाहती गंगा आहे. पाणी साचलेलेच राहील आणि ते जर वाहात राहिले नाही तर शेवटी त्याला दुर्गंधी येईल.

* सर्व जगाची जाण ठेवण्याची जेवढी जरूर आहे तेवढीच आपल्या हृदयाचीही जाण ठेवणे इष्ट आहे. केंद्राशिवायचे वर्तुळ काय कामाचे ?

* जगाची जेवढी प्रगती झाली आहे ती बऱ्याच अंशी रचनात्मक डोक्याच्या कल्पनाशक्तीमुळेच आहे.

* गरीब लोकांच्या हृदयातून जन्मलेल्या निश्चयाची शक्ती ईश्वराच्या शक्तीइतकीच अमोघ असते. तिच्या समोर विज्ञानाची, प्रज्ञानाची आणि साम्राज्याची शक्ती एकत्र झाली तरी ती टिकू शकणार नाही.

* हृदयाला पवित्र, उन्नत आणि दैवी बनविण्याचा एक मात्र उपाय तेजस्वी भावना हा आहे. ज्याचे हृदय तरुण आहे तोच अशी भावना ग्रहण करू शकतो आणि पचवू शकतो.

* माणसाचे सर्वस्व त्याच्या बुद्धीत आहे; त्यापेक्षा अधिक त्याच्या हृदयात आहे. हे हृदयाला शिकविण्याचे काम बुद्धीच्या विकासाने आणि सदाचारानेच होऊ शकते. पण हृदयाला जागृत करण्याचे काम संगीताने चांगल्या रीतीने होऊ शकते; यासाठी हृदयाला नेहमी संगीताने भिजवायला पाहिजे. संगीताने आर्द्र झालेले हृदय सहज-रीतीने संस्कार ग्रहण करू शकते.

* कला ही ऐषआरामाची वस्तू नाही. ती मनुष्याचा स्वभाव आणि अभिलाषेचा परिचय करून देत असते. माणसाला आपल्या कार्यात आणि जीवनात किती व कसा आनंद मिळतो याचा निर्णय त्याच्या कलेवरून होत असतो.

* कला म्हणजे प्रेमाने, आनंदाने, प्रसन्नतेने केलेले काम. प्रसन्नतेशिवाय (प्रसादाशिवाय) कला संभवत नाही.

* मनुष्य भाषेच्या द्वारा स्वतःचे अंतरंग लपवू शकेल, पण कलेत अशी प्रतारणा होऊच शकत नाही.

* वाणी हे विचाराचे व भावाचे परोक्ष वाहन आहे. संगीत आणि कला हे प्रत्यक्ष वाहन आहे — जवळजवळ असेही म्हणता येईल की कला हे सार्वभौमच वाहन आहे.

* वाणी ही विचाराची भाषा. कला ही हृदयाची भाषा. आचार ही धार्मिकतेची म्हणजे जीवनाची भाषा.

* जगायचे कशा रीतीने हे समजणे हीच सर्वात मोठी कला आहे.

* मोक्ष मिळविणे ही उच्चतम कला आहे. या उच्च कलेच्या द्वारा शेवटी कलातीत होणे हेच आपले ध्येय आहे.

* एखादी वस्तू सुंदर आहे म्हणून तिला वापरू नका, वापरण्याची वस्तू सुंदर पाहून घ्या अथवा सुंदर करा.

* जीवनात निर्धनता हे दुःख किंवा हानी नाही, पण नीरसता सहन होणे हीच महाहानी आहे.

* कलेच्या उपासनेत अहंकाराचा लय करणे हा एक कलेचा महदानंद आहे. विगलितवेन्द्यातरं परमानन्दम् ।

* जीवनात काय की कलेत काय, अनुकरण म्हणजे मरण.

* उपासनेशिवाय कोणतीही कला अवगत किंवा हस्तगत करण्याची आशाच व्यर्थ आहे.

* कला ही काही यदृच्छाप्राप्य वस्तू नाही, तिच्यासाठी तपस्या करायला पाहिजे, पवित्रपणे तिची उपासना करायला पाहिजे.

* सौंदर्योपासना आणि भोगविलास यांच्या परिणामांत स्वर्ग आणि नरक यांच्याइतके अंतर असते.

* मोक्षाच्या मार्गात जशी सिद्धी आडवी येते तशी कलेच्या प्राप्तीत विलासिता आड येते.

* नीतिशिक्षण आणि कलेचे शिक्षण अगदी लहानपणापासून देणे इष्ट व हितकर असते; पण ते कृतीद्वाराच प्रथम द्यावयास पाहिजे. तत्त्वे नंतर हळूहळू आपोआप व्यक्त होत असतात अथवा करता येतात.

* कलावंत व त्याची कलाकृती यांच्यातील संबंध दुकानदार गिऱ्हाइकाला वस्तू विकत देतो तसा असू नये.

* कलेच्या द्वारा कलावंताने योगक्षेम चालण्याची इच्छा करायला हरकत नाही,

विचार कलिका

* भविष्याविषयी चिंता न करणे ही आस्तिकतेची उत्तमांतील उत्तम कसोटी आहे.

* धर्म ही वस्तू प्रवाही आहे; काळाप्रमाणे त्याचा आकार आणि स्वाद बदलत असतो.

* चारित्र्याचे शिक्षण हे खरे शिक्षण. ते सत्समागमातून मिळत असते. कोणताही प्रसंग येवो त्यातही आपण धीरोदात्त आणि आर्यवृत्तच राहू एवढा आत्मविश्वास आला म्हणजे शिक्षणाची सीमा गाठली गेली, बाकी जगाच्या माहितीची काय किंमत आहे ? माहिती तर व्यवस्थित माणूस जन्मभर अनुभवाने, प्रयोगाने, विद्वानांच्या सहवासाने आणि सद्ग्रंथांच्या परिशीलनाने मिळवीत असतो.

* सनातनधर्म प्रगतिशील असतो, प्रवाहशील असतो, आणि धर्माचा प्रवाह वाहात राहील तरच धर्म सनातन-नित्यनूतन राहील व टिकेल. सनातन धर्म ही वाहती गंगा आहे. पाणी साचलेलेच राहील आणि ते जर वाहात राहिले नाही तर शेवटी त्याला दुर्गंधी येईल.

* सर्व जगाची जाण ठेवण्याची जेवढी जरूर आहे तेवढीच आपल्या हृदयाचीही जाण ठेवणे इष्ट आहे. केंद्राशिवायचे वर्तुळ काय कामाचे ?

* जगाची जेवढी प्रगती झाली आहे ती बऱ्याच अंशी रचनात्मक डोक्याच्या कल्पनाशक्तीमुळेच आहे.

* गरीब लोकांच्या हृदयातून जन्मलेल्या निश्चयाची शक्ती ईश्वराच्या शक्तीइतकीच अमोघ असते. तिच्या समोर विज्ञानाची, प्रज्ञानाची आणि साम्राज्याची शक्ती एकत्र झाली तरी ती टिकू शकणार नाही.

* हृदयाला पवित्र, उन्नत आणि दैवी बनविण्याचा एक मात्र उपाय तेजस्वी भावना हा आहे. ज्याचे हृदय तरुण आहे तोच अशी भावना ग्रहण करू शकतो आणि पचवू शकतो.

* माणसाचे सर्वस्व त्याच्या बुद्धीत आहे; त्यापेक्षा अधिक त्याच्या हृदयात आहे. हे हृदयाला शिकविण्याचे काम बुद्धीच्या विकासाने आणि सदाचारानेच होऊ शकते. पण हृदयाला जागृत करण्याचे काम संगीताने चांगल्या रीतीने होऊ शकते; यासाठी हृदयाला नेहमी संगीताने भिजवायला पाहिजे. संगीताने आर्द्र झालेले हृदय सहज-रीतीने संस्कार ग्रहण करू शकते.

* कला ही ऐषआरामाची वस्तू नाही. ती मनुष्याचा स्वभाव आणि अभिलाषेचा परिचय करून देत असते. माणसाला आपल्या कार्यात आणि जीवनात किती व कसा आनंद मिळतो याचा निर्णय त्याच्या कलेवरून होत असतो.

* कला म्हणजे प्रेमाने, आनंदाने, प्रसन्नतेने केलेले काम. प्रसन्नतेशिवाय (प्रसादाशिवाय) कला संभवत नाही.

* मनुष्य भाषेच्या द्वारा स्वतःचे अंतरंग लपवू शकेल, पण कलेत अशी प्रतारणा होऊच शकत नाही.

* वाणी हे विचाराचे व भावाचे परोक्ष वाहन आहे. संगीत आणि कला हे प्रत्यक्ष वाहन आहे — जवळजवळ असेही म्हणता येईल की कला हे सार्वभौमच वाहन आहे.

* वाणी ही विचाराची भाषा. कला ही हृदयाची भाषा. आचार ही धार्मिकतेची म्हणजे जीवनाची भाषा.

* जगायचे कशा रीतीने हे समजणे हीच सर्वात मोठी कला आहे.

* मोक्ष मिळविणे ही उच्चतम कला आहे. या उच्च कलेच्या द्वारा शेवटी कलातीत होणे हेच आपले ध्येय आहे.

* एखादी वस्तू सुंदर आहे म्हणून तिला वापरू नका, वापरण्याची वस्तू सुंदर पाहून घ्या अथवा सुंदर करा.

* जीवनात निर्धनता हे दुःख किंवा हानी नाही, पण नीरसता सहन होणे हीच महाहानी आहे.

* कलेच्या उपासनेत अहंकाराचा लय करणे हा एक कलेचा महदानंद आहे. विगलितवेन्द्यातरं परमानन्दम् ।

* जीवनात काय की कलेत काय, अनुकरण म्हणजे मरण.

* उपासनेशिवाय कोणतीही कला अवगत किंवा हस्तगत करण्याची आशाच व्यर्थ आहे.

* कला ही काही यदृच्छाप्राप्य वस्तू नाही, तिच्यासाठी तपस्या करायला पाहिजे, पवित्रपणे तिची उपासना करायला पाहिजे.

* सौंदर्योपासना आणि भोगविलास यांच्या परिणामांत स्वर्ग आणि नरक यांच्याइतके अंतर असते.

* मोक्षाच्या मार्गात जशी सिद्धी आडवी येते तशी कलेच्या प्राप्तीत विलासिता आड येते.

* नीतिशिक्षण आणि कलेचे शिक्षण अगदी लहानपणापासून देणे इष्ट व हितकर असते; पण ते कृतीद्वाराच प्रथम द्यावयास पाहिजे. तत्त्वे नंतर हळूहळू आपोआप व्यक्त होत असतात अथवा करता येतात.

* कलावंत व त्याची कलाकृती यांच्यातील संबंध दुकानदार गिऱ्हाइकाला वस्तू विकत देतो तसा असू नये.

* कलेच्या द्वारा कलावंताने योगक्षेम चालण्याची इच्छा करायला हरकत नाही,

पण कला विकून श्रीमंत होण्याचा प्रयत्न करणे हे निंद्य व आत्मघातकी आहे.

* कलावंताने कोणाचा नोकर बनता कामा नये.

* कलावंत आणि कारागीर यांना अलग करू नका. तसे कराल तर कलावंताची कला चिमटली व मुडपली जाईल आणि कारागिराच्या कौशल्याचा लय होईल. कला भुतासारखी आणि कारागिरी मुडद्यासारखी दिसेल.

* चित्रकार, शिल्पकार, गायक अथवा कवी यांना केवळ पुरस्कार देण्याने कलेची उन्नती होणार नाही. कलेला समाजाने आपल्या हृदयात, कुटुंबात, मंदिरात आणि समाजात स्थान द्यावयास पाहिजे. आपल्या जीवनात कलेला प्रतिष्ठा द्या म्हणजे कलावंत आपोआप निर्माण होतील.

* खरा कलावंत स्वभावाने म्हणजे साहजिकच कलेचा प्रचारक (मिशनरीच) असतो.

* दृश्यसृष्टी भासमान आहे, पण आदर्शसृष्टी–ध्येयसृष्टी सत्य आहे अशी कलावंताची धारणा असते. तत्त्वज्ञानसुद्धा हेच सांगत आलेले आहे.

* प्रकृतीचा प्रयत्न इंद्रियातीत आनंद विषयोपभोगाद्वारा अनुभवण्याचा असतो. कलेचा प्रयत्न इंद्रियातीत आनंदाला विषयवासनेच्या संसर्गाने दूषित न करता त्याला शुद्ध स्वरूपात अनुभवण्याचा असतो.

* एकाच सूर्याचा प्रकाश चंद्रावर पडतो तेव्हा तो शीतल, प्रसन्न व सुखद बनतो, पण तो वाळूवर पडतो तेव्हा वाळू तापून तिचा स्पर्श असह्य बनतो.

* निष्पाप जीवनात केवढे सौंदर्य असते त्याची जाणीव प्रत्यक्ष अनुभवाशिवाय होत नाही.

* जीवन सुंदर आहे, सेवानंद सुंदरतर आहे, प्रेम परम सुंदर आहे.

* जीवन्मुक्त असो, मुमुक्षू असो, संसारी असो की पतित असो सर्व एकाच जगात राहतात, एकाच प्रकारचे काम करतात, पण हेतू वेगवेगळे असल्यामुळे त्यांना फळ मात्र वेगवेगळे मिळते.

* स्वतःची कल्पना स्वतःच प्रत्यक्षात आणावी यातच खरे स्वारस्य असते.

* नीतिनियमापेक्षा प्रेम, दाक्षिण्य, दया आणि सहृदयता या स्निग्ध आणि उदार भावांची किंमत अधिक असते.

* आधुनिक चळवळीमुळे सामाजिक दुःख दूर करण्याकडे प्रवृत्ती झाली आहे खरी, पण सामाजिक दुःख कशात आहे ते ओळखण्याची शक्ती किंवा दृष्टी अद्याप समाजाला लाभली नाही.

* हृदयाचा जीर्णोद्धार करा म्हणजे समाजाचा, धर्माचा, संस्कृतीचा जीर्णोद्धार आपोआप होईल.

* समाजाचा खरा पाया संतोष, समाधान होय, स्पर्धा नव्हे. मत्सर म्हणजे प्रेमाचे

मरण. स्पर्धा म्हणजे समाजाचा नाश.

* सुखदुःखाचा आधार श्रीमंती किंवा गरिबी नाही. गरिबी हे महादुःख नाही. कंटाळवाणे, नीरस आणि घाणेरडे किंवा वाईट काम करावे लागणे हे मोठ्या शिक्षेसारखे आहे.

* 'प्रगती प्रगती' म्हणून हवे तेवढे नगारे वाजवा; पण जगातून निघून गेलेली स्वस्थता (Repose) जोपर्यंत परत येत नाही तोपर्यंत या जगाची स्थिती दयनीय राहणार.

* समजूतदारपणा किंवा सौंदर्य हे शेवटी वस्तुगत नसते, पण भावनागत असते.

* माणूस उपयुक्ततेच्या विचारापासून स्वतःचा बचाव करणार नाही तोपर्यंत सौंदर्याचे हार्द समजू शकणार नाही.

आचार्य काका कालेलकरांचे जीवनचिन्तन

हे पुस्तक तयार करण्यासाठी त्यांच्या खालील गुजराती पुस्तकांतून लेख व उतारे निवडले आहेत. थोडी पुस्तके मराठीत व हिंदीत आहेत.

संदर्भ ग्रंथसूची

पुस्तकाचे नाव	प्रकाशकाचे नाव, प्रकाशन-वर्ष व आवृत्ती	भाषा
१. जीवननो आनन्द	नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, १९३६ आ. १	गुजराती
२. जीवनभारती	,, ,, ,, १९३७ आ. १	,,
३. जीवनविकास	,, ,, ,, १९३६ आ. १	,,
४. जीवनसंस्कृति	,, ,, ,, १९३९ आ. १	,,
५. जीवनलीला	,, ,, ,, १९५९ आ. १	,,
६. जीवनव्यवस्था	,, ,, ,, १९६३ आ. १	,,
७. जीवनचिन्तन	,, ,, ,, १९५९ आ. १	,,
८. जीवनप्रदीप	,, ,, ,, १९५६ आ. १	,,
९. जीवननुं काव्य सं. भोळाभाई पटेल	१९८२ लोकमिलाप ट्रस्ट, भावनगर आ. १	,,
१०. अवार नवार	नवजीवन प्रकाशन मंदिर, अमदाबाद १९५६ आ. १	,,
११. गीताधर्म	,, ,, ,, १९४४ आ. १	,,
१२. रविच्छविनुं उपस्थान अने तर्पण	,, ,, ,, १९६१ आ. १	,,

पुस्तकाचे नाव	प्रकाशकाचे नाव, प्रकाशत वर्ष व आवृत्ती	भाषा
१३. समन्वय संस्कृती की ओर	सर्व सेवासंघ प्रकाशन, वाराणसी १९६७ आ. १	हिंदी
१४. जिवंत व्रतोत्सव अनु. भाऊ धर्माधिकारी	सुलभ राष्ट्रीय ग्रंथालय १९४७ आ. १	मराठी
१५. काका कालेलकर जीवन अने साहित्य. डॉ. जयंत पटेल	चूनीलाल गांधी विद्याभवन, सूरत, १९७४ आ. १	गुजराती
१६. कालेलकर अध्ययन ग्रंथ संपादक—उमाशंकर जोशी, अनंतराय रावळ, पांडुरंग देशपांडे	वोरा ॲण्ड कंपनी मुंबई. १९६१ अ. १	गुजराती

आचार्य काका कालेलकरांची मूळ पुस्तके

१. स्वामी रामतीर्थनुं जीवनचरित्र (मराठी– श्री– गुणाजीसह) १९०८
२. स्वदेशी धर्म १९२०
३. कालेलकरना लेखो : भाग १ १९२३
४. गामडामां जइने शूं करवूं ? १९२३
५. हिमालयनो प्रवास : पहिली आवृत्ती १९२४
तिसरी ,, १९३४
पाचवी ,, १९३८
सहावी ,, (पुनर्मुद्रण) १९५७
६. पूर्वरंग (श्री. नरहरि परीखसह) १९२३
७. कालेलकरना लेखो : भाग २ १९२५
८. ओतराती दीवालो १९२५
,, पुनर्मुद्रण : १९३६, १९४०, १९४३, १९४७, १९४९, १९५६
९. राष्ट्रीय शिक्षाके आदेशोंका विकास (हिंदी) १९३०

१०. जिन्दा वनो (हिंदी) १९३०
११. ब्रह्मदेशनो प्रवास १९३१
,, पुनर्मुद्रण १९४०, १९५०, १९५१
१२. गीतेचे समाजरचनाशास्त्र (मराठी) १९३३
१३. हिंडलग्याचा प्रसाद (मराठी) १९३४
१४. जीवता तहेवारो : पहिली आवृत्ती १९३४
दुसरी ,, १९३७
तिसरी ,, १९३९
चौथी ,, १९४३
सुधारित ,, ,, १९४९
परिवर्धित पाचवी ,, १९५७
१५. लोकमाता : पहिली आवृत्ती १९३४
दुसरी ,, १९३८
तिसरी ,, १९४७
चौथी ,, १९५३
१६. जीवनलीला– हे पुस्तक ' लोकमाता ' पुस्तकाची परिवर्धित १९५६
आवृत्ती आहे. आ. २ १९५९
१७. स्मरणयात्रा १९३४
,, पुनर्मुद्रण १९४०, १९४१, १९४३, १९४४, १९४७
१८. लोकजीवन (मराठी हिंडलग्याचा प्रसादचा गुजराती अनुवाद) १९३५
१९. जीवननो आनंद : पहिली आवृत्ती १९३६
पुनर्मुद्रण १९३९, १९४४, १९५२, १९६१
२०. जीवन विकास १९३६
२१. सहजीवनकी समस्या (हिंदी) १९३७
२२. सद्‌बोध शतकम्‌ । १९४१
२३. जीवन भारती १९३७
२४. गीताधर्म (मराठी ' गीतेचे समाजरचनाशास्त्र ' याचा १९४४
गुजराती अनुवाद)
१९५७
२५. जीवनसंस्कृति १९३९, १९४६
२६. संकलिता भगवद्‌गीता १९४५
२७. मानवी खंडियेरो (किशोरलाल मश्रुवालासह) १९४६, १९४८

२७. हिंदूंचे समाजकारण (मराठी) १९४६
२९. हिंदुस्तानी की नीति (हिंदी) १९४७
३०. गीतासार १९४७
३१. श्री. नेत्रमणिभाईने १९४७
३२. हिंदुस्तानीके प्रचारक गांधीजी (हिंदी) १९४८
३३. साहित्याची कामगिरी (मराठी) १९४८
३४. बापूकी झाँकियाँ (हिंदी) १९४८
३५. बापुनी झांखी (मूळ हिंदीवरून) १९४९, १९५५
३६. पूर्व आफ्रिकामां १९५१, १९५३
३७. मृगजळातील मोती (मराठी) : खलिल जिब्रान १९५१
३८. मालंच (मराठी) : रवींद्रनाथ ठाकुर १९५२
३९. लोकजीवन : (मराठी— 'हिंडलग्याचा प्रसाद' ची संक्षिप्त आवृत्ती (गुजराती) १९५२
४०. धर्मोदय १९५२
४१. रखडवानो आनंद १९५३, १९६१
४२. जीवनसंस्कृति की बुनियाद : (हिंदी) १९५५
४३. रवींद्र– प्रतिभेचे कोवळे किरण (मराठी) रवींद्रनाथ : लिपिकेवरून १९५५
४४. जीवन प्रदीप १९५६
४५, अवार नवार १९५६
४६. मधुसंचय (संपा. कनुभाई वोरा) १९५७
४७. उगमणो देश– जपान १९५७
४८. चि. चंदनने १९५८
४९. जीवनचिंतन १९५९
५०. मीठाना प्रतापे १९५९
५१. नारी गौरवनो कवि १९६०
५२. रवींद्र सौरभ (मूळ मराठी). त्याचा गुजराती अनुवाद १९५९
५३. शुद्ध जीवनदृष्टिनी भाषानीति : गुजरात नई तालीम संघ : व्याख्यान १९६०
५४. भारतीय संस्कृतिनो उद्‌गाता : (गुजरात युनि. टागोर शताब्दी ज्ञानसत्र व्याख्यान) १९६१
५५. चिंतन अने पुरुषार्थमां समन्वय : (विद्याबहेन नीलकंठ स्मारक व्याख्यान) १९६१
५६. साहित्यमां सार्वभौम जीवन (विद्याबहेन नीलकंठ स्मारक व्याख्यान) १९६१
५७. रविच्छविनुं उपस्थान अने तर्पण

५८. आवती कालना प्रश्नो
५९. नक्षत्रमाळा
६०. स्वराज्य भाषा (हिंदी)
६१. स्मरणयात्रा (संक्षिप्त आवृत्ती)
६२. नैवेद्य (मराठी) १९६८
६३. रवीन्द्र वीणा (मराठी) १९६१
६४. रवीन्द्र मनन (मराठी) १९५८
६५. रवीद्र झंकार (मराठी) १९६२
६६. खेळकर पाने (मराठी) १९६४

काका कालेलकरांनी संपादित केलेली पुस्तके

१. बापुना पत्रो– १ आश्रमनी बहेनोने १९४९
२. बापुना पत्रो– ३ कुसुमबहेन देसाईने १९५४
३. बापुना पत्रो– ५ कु. प्रेमाबहेन कंटकने १९६०
४. बापुना पत्रो– ६ गं. स्व. गंगाबहेनने १९६०
५. गीता पदार्थ कोश (गांधीजी) दुसरी आवृत्ती १९६०

[काका कालेलकरांची बहुतेक पुस्तके मूळ गुजराती भाषेत असून ती नवजीवन प्रकाशन मंदिर, अमदाबाद, कडून प्रसिद्ध झाली आहेत. तसेच त्यांच्या अनेक पुस्तकांचे मराठी अनुवाद लहानमोठ्या आकारांच्या पुस्तकांच्या रूपाने वेगवेगळ्या वेळी व वेगवेगळ्या प्रकाशकांकडून प्रसिद्ध झाले आहेत. ते निवडक लेखांचेही आहेत. त्यांची काही पुस्तके मराठी, हिंदी, हिंदुस्तानी भाषांतही आहेत.— संपादक]

REFBK-0026356

Scan
11/03/19

काका कालेलकरांच्या मूळ १५ गुजराती पुस्तकांतून निवडलेल्या लेखांचा/उताऱ्यांचा हा संग्रह आहे. काका कालेलकर हे सुप्रसिद्ध गांधीवादी विचारवंत, लेखक व स्वातंत्र्यसैनिक होऊन गेले. त्यांची जन्मशताब्दी १९८५ साली साजरी झाली. त्यांच्या गौरवार्थ मतम मंडळाने या ग्रंथाच्या रूपाने त्यांना वाहिलेली ही 'वैचारिक आदरांजली' आहे. काका हे एक शैलीकार, ललित लेखक होत. त्यांची शैली काव्यमय, ललित, प्रासादिक व प्रसन्न आहे. त्यांची भाषा साधी, सोपी, स्पष्ट व हृदयाचा ठाव घेणारी आहे. त्यांनी गांधीजींची जीवनदृष्टी आत्मसात् करून जीवनविषयक विविध प्रकारचे विचार आपल्या सुंदर व प्रासादिक भाषेत मांडले आहेत. काका हे एक जीवनपरायण जीवनऋषी होऊन गेले. त्यांचे जीवन, शिक्षण, कला, धर्म, नीती, सौंदर्य, समाज, संस्कृती इत्यादी विषयांवरील महत्त्वपूर्ण लेख या पुस्तकात संग्रहित केले आहेत. काकांचे जीवनविषयक हे विचार तरुण पिढीला सद्यः-परिस्थितीत अत्यंत महत्त्वाचे व मार्गदर्शक ठरतील.